**DRISHTIKON Journal (UGC Care Listed) Peer Reviewed**

**श्री वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ दहिफळ संचलित,**

**शाम गदळे कला वरिष्ठ महाविद्यालय,**

**दहिफळ वडमाऊली, बीड**

**व**

**मुर्ती व शिल्प संशोधन संस्था, औरंगाबाद**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

# मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे

# पहिले राष्ट्रीय चर्चासत्र

**✻ संपादिका ✻**

**डॉ. शांता जाधवर**

**प्रमुख संपादक-**

**डॉ. शांता जाधवर**

शामराव गदळे महाविद्यालय वडमाऊली

**प्रकाशक व कार्यकारी संपादक -**

**डॉ. धम्मपाल माशाळकर**

**संकल्प प्रकाशन, सोलापूर.**

**मो. ९७३०३९३७५३**

**प्रथमावृत्ती-**

८ फेब्रुवारी २०२०

**अक्षरजुळणी व मुखपृष्ठ-**

अल्ताफ कुडले

© **सर्वाधिकार-**

**संपादक मंडळास**

सर्व हक्क सुरक्षित (या पुस्तिकेतील प्रकाशित माहिती संपादक मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय कुठल्याही माध्यमाद्वारे पुर्नप्रकाशित करता येणार नाहीत.)

या पुस्तिकेतील लेखातून प्रकाशित माहिती, मते, विधाने, विचार इत्यादी लेखकाची वैयक्तिक असून लेखकाने व्यक्त केलेली माहिती, मते, विधाने, विचार इत्यादी बाबत प्राचार्य, लोणीकाळभोर, संपादक मंडळ आदी सहमत असतीलच असे नाही.

# मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेची कार्यकारणी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. झाकीर पठाण | - | अध्यक्ष |
| २. | डॉ. स्मिता शिंदे | - | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. संजय पाईकराव | - | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. गजेंद्र बिराजदार | - | सचिव |
| ५. | डॉ. जगदीश भेलोंडे | - | सहसचिव |
| ६. | डॉ. अनिता शिंदे | - | सहसचिव |
| ७. | श्री. मयुरेश खडके | - | कोषाध्यक्ष |
| ८. | श्री. प्रदीपदादा म्हैसेकर | - | प्रमुख मार्गदर्शक सल्लागार समिती |
| ९. | डॉ. धम्मपाल माशाळकर | - | सदस्य |
| १०. | डॉ. शांता जाधवर | - | सदस्य |
| ११. | डॉ. माधवी महाके | - | सदस्य |
| १२. | डॉ. कामाजी डक | - | सदस्य |
| १३. | प्रा. शालिनी कांबळे | - | सदस्य |
| १४. | श्री. तारिक तांबोळी | - | सदस्य |
| १५. | श्री. लक्ष्मीकांत सोनवटकर | - | सदस्य |

# संपादकीय

आज आमच्या महाविद्यालयाच्यावतीने मूर्ती व शिल्प संशोधन शिल्प या संस्थेचे पहिले राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात येत आहे. याचा मनस्वी आनंद होत आहे. मंदिर आणि मूर्ती यावर स्वतंत्रपणे अभ्यास करण्यासाठी परिषदेची स्थापना झाल आणि अल्पावधीतच परिषदेचे पहिले चर्चासत्र संपन्न होत आहे.

व्हॉटस्‌अ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून मूर्ती अभ्यासक एकत्रित येऊन परिषदेची स्थापना होणे आणि त्या परिषदेचे चर्चासत्र संपन्न होणे ही बाब महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच होत आहे. परिषदा अनेक होतात. त्यामध्ये अनेक विषय असतात पण एकच विषय घेऊन चर्चासत्र आयोजित करणे हे खूप मोठे धाडस केलेले आहे. त्यामध्ये सर्वांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग आहे अशा सर्वांचे मनापासून धन्यवाद!

**- डॉ. शांता जाधवर**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | मंगळवेढा (जि. सोलापूर) येथील ब्रह्मदेवाची मूर्ती<br>डॉ. शांता जाधवर | 9-11 |
| २. | **ANCIENT ARTISTIC UMA-MAHESH ICON AT VELAPUR (In Solapur District-Maharashtra)**<br>**Dr. Nabha Kakde** | 12-14 |
| ३. | नागशिल्प - एक अभ्यास<br>प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के | 15-19 |
| ४. | पानगाव येथील विठ्ठल मंदिरावरील बोधिसत्व अमिताभ—एक नवा शोध<br>डॉ. धम्मपाल माशाळकर | 20-22 |
| ५. | बीड येथील कंकालेश्वर मंदिर—स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ठ नमूना<br>डॉ.अनिता शिंदे | 23-24 |
| ६. | अंबानगरीतील हेमांडपंथी मंदिर स्थापत्य व जलव्यवस्थापन<br>डॉ. प्रशांत अ. साबळे | 25-30 |
| ७. | **शेडवई येथील विष्णुमूर्ती**<br>**Dr. Jyoti Pethakar** | 31-38 |
| ८. | मराठवाडयातील गणेश प्रतिमांची विविध रूपे : ऐतिहासिक अभ्यास<br>भिकाणे शोभा राजेंद्र | 39-43 |
| ९. | गुप्तपूर्वकालीन प्रारंभिक मंदिरांचा विकास : ऐतिहासिक चिंतन<br>चिलमे प्रिया तुकाराम | 44-46 |
| १०. | कदमापूर देवीच्या मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास<br>डॉ. किशोर मारोती वानखडे | 47-51 |
| ११. | निलंगा तालुक्यातील निवडक ऐतिहासिक स्थळे व मंदिरे<br>डॉ.व्यास सी.पी. | 52-55 |
| १२. | कोटतीर्थ येथील शिल्पवैभव<br>डॉ. सुभाष रामराव रगडे | 56-59 |
| १३. | **वेरुळ लेणीतील त्रिपुरांतक मूर्तीशिल्प**<br>डॉ.भेलोंडे जगदीश व्यंकटराव | 60-63 |
| १४. | प्रतिमापूजनाचा प्रारंभिक इतिहास<br>प्रा.डॉ.गंगथडे आर.डी. | 64-67 |
| १५. | **नांदेड जिल्हयातील शिवमूर्तीचे प्रकार**<br>**प्रा.डॉ. विजया साखरे** | 68-72 |
| १६. | मंदिर शिल्प कला स्थापत्याचे ऐतिहासीक अवलोकन<br>डॉ.जि.व्ही.गट्टी, डॉ. राधाकृष्ण जोशी | 73-74 |
| १७. | मंदिराच्या बाह्यांगावरील कंदुकावती/कंदुकधारिणी | 75-79 |

| | | |
|---|---|---|
| | (विशेष संदर्भ–वडेश्वर मंदीर, अंभई)<br>कु.गुडदे श्रीमाला कालिदास | |
| १८. | पानगावच्या विट्ठल मंदिरावरील विधीचित्ता<br>कु.होनराव दिपाली प्रदिप | 80-82 |
| १९. | कुशाण कालखंडातील बौध्द कलेचा विकास : एक ऐतिहासिक अवलोकन<br>डॉ.प्रा.सुरेखा विठ्ठलराव जावळे | 83-86 |
| २०. | **मंदिर और मूर्तिशास्त्र (मंदिर निर्माण शैलीके विशिष्ट संदर्भ में)**<br>करपे अश्विनी सहदेवराव | 87-89 |
| २१. | प्राचीन काष्ठ चल मूर्ती : एक शोध<br>श्री.शिरपुरे शुभम लालू, प्रा.डॉ.महाके माधवी गोपीनाथराव | 90-93 |
| २२. | महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठ देवतांचे मुर्ती स्थापत्य<br>डॉ. शिवाजी हरी चौगुले | 94-97 |
| २३. | उक्कडगाव (जहांगीर) येथील सतीगळ<br>प्रा. महेश शिवाजीराव जाधव, डॉ. रवी सुभाषराव सातभाई | 98-99 |
| २४. | रत्नापूर (लातूर) येथील मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास<br>मलवाडे मेघाराणी बाबुराव | 100-102 |
| २५. | त्रिविक्रम विष्णु मंदिर<br>अरुण सत्यप्रेम मते | 103-104 |
| २६. | ''मंदीर मुर्ती इतिहास आणि पुरातत्व व संस्कृती'' विशेष संदर्भ (विट्ठल आणि गणेश पूजन)<br>डॉ. एम.एस. कांबळे | 105-107 |
| २७. | मंदिर स्थापत्य शैली<br>फुलवाड शकुंतला हरिश्चंद्र | 108-110 |
| २८. | मेहकरची नृसिंहमूर्ती<br>प्रा.डॉ.श्रीहरी रंगनाथराव पितळे | 111-115 |
| २९. | महाराष्ट्रातील प्रमुख बौध्द लेणींचा आभ्यास<br>प्रा. घाडगे रघुनाथ व्यंकटी | 116-119 |
| ३०. | वडेश्वर मंदिर अंभई<br>नाव राजेश ईश्वर निर्मळ | 120-121 |
| ३१. | मराठवाडयातील दुर्लक्षित पर्यटन स्थळ–धारासुरचे प्राचीन मंदिर<br>डॉ. विट्ठल व्यंकटराव घुले | 122-124 |
| ३२. | **“**प्रागैतिहासिक भारतीय सभ्यता**:** दृश्य कलाकृतींमधील लिंग स्थाननिश्चिती, विशेष संदर्भ भीमबेटका आणि सिंधू संस्कृती**”**<br>स्वाती राजन | 125-131 |
| ३३. | देवणी गावातील नागशिल्पे<br>कु.शिवणखेडे माया लक्ष्मीकांत | 132-134 |
| ३४. | मंदिर व मुर्तीशास्त्र<br>डॉ. शिला स्वामी, श्री. सुर्यवंशी सुनिल सुधाकरराव | 135-137 |
| ३५. | निलंगा येथील निळकंठेश्वर मंदिर<br>स्वामी शिवसांब विरपक्षप्पा | 138-140 |

| | | |
|---|---|---|
| ३६. | कंदूक क्रीडा सुरसुंदरी – जीवनाचे उत्फुल दर्शन<br>वैशाली गंगारामजी टोम्पे, डॉ.जी.एस.पिसे | 141-142 |
| ३७. | बीड जिल्ह्यातील प्राचिन मंदिर कंकालेश्वर<br>परमेश्वर मधुकर उबाळे | 143-145 |
| ३८. | **बुद्धमूर्तीची निर्मिती, विकास व पूजा पद्धती अन्वयार्थ**<br>**विजय ज्ञानोबा साळवे** | 146-149 |
| ३९. | **आमळी येथील कन्हैयालाल महाराज मंदिरातीलमुर्तीशास्त्र**<br>**गायकवाड पोपट काशिराम, दुबे जुगलकिशोर विजयकुमार** | 150-154 |
| ४०. | **चारठाणा येथील मानस्तंभ व त्यावरील शासनदेवता**<br>**लक्ष्मीकांत सोनवटकर** | 155-161 |
| ४१. | **चालुक्य कलेचा अप्रतिम आविष्कार: सिद्धेश्वर मंदिर**<br>डॉ. स्मिता साहेबराव शिंदे, | 162-164 |
| ४२. | **नेमगिरिच्या लेण्या, जिंतूर**<br>**श्री. बोरकर विनोद सखाराम** | 165-167 |
| ४३. | कंकालेश्वर मंदिर बीड<br>डॉ.बाबासाहेब शेप | 168-169 |
| ४४. | **यादव कालीन मंदिर स्थापत्य**<br>प्रा.डॉ.सय्यद मुजीब | 170-172 |
| ४५. | **हातकणंगले तालुक्यातील धार्मिक स्थळे, मंदिरे व मूर्ती यांचा अभ्यास**<br>**श्री. प्रकाश धोंडीराम माने, प्रा.डॉ.शिला स्वामी** | 173-177 |
| ४६. | **बेटसांगवी येथील शिवमंदिर**<br>**डॉ. किशन केंद्रे** | 178-179 |
| ४७. | अहमदनगर शहरातील मंदिरांचा अभ्यास<br>प्रा. नवनाथ काषिनाथ वाव्हळ | 180-184 |
| ४८. | देगलूर तालुका : येरगी येथील मुर्तिशिल्पांचे अध्ययन<br>डॉ. मारोती चव्हाण | 185-189 |
| ४९. | **The Iconographic Programme of The Virūpākṣa Temple, Pattadakal, Dis. Bagalkot, Karnataka**<br>**Shalaka Pravinkumar Bhandare.** | 190-193 |
| ५०. | **STONE SCULPTURE AT JAIN DARMA IN PARBHANI DISTRICT**<br>**Dr Rajaram R Pimpalpalle** | 194-196 |
| ५१. | **Kamsutra Sculptures at Daitysudan Temple of Lonar**<br>**Dr. Shyam Prakash Deokar** | 197-200 |
| ५२. | **Caves of Panhalkaji: The Cultural Heritage of Konkan**<br>**Dr. Dnyanoba Tukaram Kadam** | 201-204 |
| ५३. | **स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना : चिंतेश्वर मंदिर**<br>**प्रा. चव्हाण आर. ए.** | 205-207 |

| | | |
|---|---|---|
| ५४. | **गेवराई येथील खंडोबा मंदिर - एक दृष्टिक्षेप**<br>**प्रा.डॉ. सावंत के. डी.** | **208-210** |
| ५५. | **दुर्मिळ चतुर्भुज गरुड शिल्प – धर्मापुरी**<br>**श्री. मयुरेश खडके** | **211-216** |
| ५६. | **हम्पी मंदिर स्थापत्य कला**<br>**मधुकर मुरलीधर काळे** | **217-220** |
| ५७. | दिघी येथील अंबिका मंदिरातील मूर्तिशिल्पावशेष<br>प्रा.डॉ सोमवंशी एस.आर. | **221-224** |
| ५८. | महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवरील मूर्तीकलेची वैशिष्ट्ये<br>प्रा.डॉ. कबाडे साईनाथ शंकरराव | **225-228** |
| ५९. | राजतडाग (औरंगाबाद) लेणीतील राजनर्तिका या नृत्यशिल्पपटावर नवा प्रकाश<br>संजय पाईकराव | **229-231** |
| ६०. | लोकमाता सप्तमातृकांचे बहुप्रवाही ऐतिहासिक अन्वेषण<br>प्रा. रामचंद्र घुले, प्रा.डॉ. रमेश गंगथडे | **232-241** |

# मंगळवेढा (जि. सोलापूर) येथील ब्रह्मदेवाची मूर्ती

**–डॉ. शांता जाधवर**
इतिहास विभाग,
शाम गधळे कला वरिष्ठ महाविद्यालय,
दहिफळ वडमाऊली.

भारतीय धार्मिक जीवनाचा विचार करीत असताना त्यामध्ये आपणास अनेकविध पैलू दिसून येतात. स्थल आणि कालानुसार त्यामध्ये सातत्याने बदल झालेला दिसून येतो. भारतीय कलेमध्ये जेव्हापासून मूर्तीकलेस सुरुवात झाली तेव्हापासून मानवाने त्याला वाटेल तसे परंतु धर्माच्या आणि धर्मग्रंथाच्या अधिन राहून मूर्तीकलेस बदल केलेला दिसून येतो. एखाद्या धार्मिक कथेच्या आधारे त्या देवतेची मूर्ती घडविल्याची अनेक उदाहरणे आपणास पाहावयास मिळतात. देवांच्या उत्पत्ती कथा आजही पुराणांच्या माध्यमातून आपणासमोर आहेत. प्रत्येक देवाच्या उत्पत्ती कथेनुसार त्याच्या मूर्ती घडविल्या गेल्या. ह्या मूर्ती घडवित असताना तत्कालीन समाजजीवनाचा तसेच आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनाचाही परिणाम भारतीय मूर्तीकलेवर झाल्याचे स्पष्ट दिसून येते. मूर्तीची आभूषणे, वस्त्रप्रावरणे, आयुध्ये यावरूनही तत्कालीन परिस्थितीचा अंदाज आपणास काढता येतो. संबंध भारताचा विचार केला तर भारतामध्ये सर्वात जास्त मूर्ती ह्या शिव व विष्णू यांच्या आहेत.[1] परंतु ब्रह्मा, विष्णू, महेश यांना भारतीय धार्मिक परंपरेत विशेष महत्वाचे असताना देखील आजच्या घडीला फक्त शिव आणि वैष्णव म्हणजे महेश व विष्णू यांचीच पूजा के जाते. ब्रह्मदेवाची पूजा का केली जात नाही हा प्रश्न निर्माण होतो. उत्पत्ती, स्थिती आणि लय ही कामे अनुक्रमे ब्रह्मा–विष्णू–महेश यांची असताना यापैकी विष्णू आणि महेश यांची स्वतंत्र मंदिरे पहावयास मिळतात. मग ब्रह्मदेवाचे पुष्कर याच ठिकाणी स्वतंत्र मंदिर आहे. यावरून असे स्प होते की ब्रह्मदेव हा पूजेतून अपूज्य ठरविला गेला. याचे धार्मिक कारण पूराणात सांगितले गेले आहे. त्यावरून ब्रह्मदेव पूजेतून हळूहळू कसा लोप पावत गेला हे दिसून येते.[2]

पौराणिक कथेच्या आधारे सर्वप्रथम या भूतलावर शिव लिंगरूपाने प्रकट झाला. मग ब्रह्मा आणि विष्णू प्रकट झाले. शिवलिंगाचा आदि आणि अंत पाहण्याचे ठरले. त्यानुसार ब्रह्मदेवाने हंसाचे रूप धारण केले आणि तो आकाशाकडे झेपावला व विष्णूने वराहाचे रूप धारण करून शिवलिंगाचा अंत पाहण्यासाठी पाताळात शिरला. ब्रह्माला शिवलिंगाचे टोक दिसले नाही ना विष्णूला त्याचा शेवट दोघेही परत फिरले. परंतु ब्रह्मदेवाला शिवलिंगावर वाहिलेले फूल सापडले त्याने ते उचलले व विष्णू खोटे सांगितले की, मी शिवलिंगाच्या टोक पाहिलेले आहे आणि ही त्यावर वाहिलेली कमळाची फुले, ब्रह्मदेव खोटे बोलल्याचे पाहून शिव प्रकट झाला, त्याने आपल्या डाव्या हाताच्या नखाने ब्रह्माचे पाचवे शिर खुडले व त्याला पूजेतून अपूज्य होण्याचा शाप दिला.[3]

दूसरी एक कथा अशी सांगण्यात येते की, ब्रह्मदेवाला दोन बायका होत्या. एक गायत्री व दूसरी सावित्री, एखादा यज्ञांचे वेळी ब्रह्मदेवाने सावित्रीस पाचारण केले परंतु ती वेळेवर आली नाही. म्हणून गायत्रीस बोलावून यज्ञाला सुरुवात केली, तेव्हा सावित्री आली व तिने चिडून ब्रह्मदेवास पूजेतून होण्याचा शाप दिला.[4]

तिसरी कथा अशी सांगण्यात येते की, एखादा ब्रह्मदेवाची मूलगी अंघोष करून आली असता ब्रह्मदेव तिच्यावर आसक्त झाला तेव्हा चिडून त्या मुलीने ब्रह्मदेवास शाप दिला व तो पूजेतून अपूज्य झाला.[5]

अशा वेगवेगळ्या पौराणिक कथांच्या माध्यमातून ब्रह्मदेव जरी अपूज्य कसा झाला हे जरी सांगितले असले तरी राजकीय सत्ता तर हे देखील कारण असू शकते. प्रत्येक

राजाने आपल्या काळात प्रत्येक धर्माला व देवतेला राजाश्रय मिळाल्याने त्यांची मंदिरे व मूर्ती भरपूर प्रमाणात तयार केल्या गेल्या. शैव, वैष्णव, ब्राह्मण, गाणपत्य, शाक्त आणि सौर हे मुख्य पंथ भारतीय धार्मिक जीवनात पाहावयास मिळतात. त्यापैकी शैव, वैष्णव आणि शाक्त इत्यादी पंथाचीच मंदिरे व मूर्ती जास्त प्रमाणात तयार केले गेले. आणि बाकीची पंथ व त्यांची देवता ही पूजेतून सरळ सरळ बाहेर फेकली गेली. त्यापैकी एक म्हणजे ब'ह्मदेव होय. ब्रह्मदेवाची स्वतंत्र अशी मंदिरे आज कुठेही दिसून येत नाहीत. त्याची स्वतंत्र अशी पूजा केली जात नाही. त्याची स्वतंत्र अशी पूजा विधी नाही. मंदिराच्या बाह्य भिंतीव अथवा ललाट बिंबावर शिव आणि विष्णू समवेत त्याची मूर्ती असते. शिवाय शेषशायी विष्णूच्या नाभीतून उमलेल्या कमळात त्याला दाखविले जाते.[6] परंतु सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे या गावी ब'ह्मदेवाची स्वतंत्र अशी मूर्ती आहे.

**मंगळवेढा येथील ब्रह्मदेवाची वैशिष्ट्योपूर्ण मूर्ती :–**

सोलापूर–पंढरपूर मार्गावर मंगळवेढा नावाचे गाव आहे. ह्या गावाला खूपमोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. संत दामाजी चोखामेळा, कान्होपात्रा यांच्या ब तसेच महात्मा बसवेश्वर यांच्या सान्निध्याने पूनित झालेली ही भूमी आहे. गावाच्या मधोमध एक किल्ला आहे. सध्या याठिकाणी तहसिल कार्यालय आहे. या किल्ल्याच्या पाठीमागील बाजूस काशीविश्वेश्वर नावाचे महादेवाचे हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस एक कलाकुसरयुक्त बारव आहे. बारवात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. बारवाच्या आतील बाजूस देवकोके असून वेगवेगळ्या देवतेच्या खंडीत मूर्ती या देवकोकात आहेत. बारवाच्या दक्षिण कोपऱ्यात अगदी उंच जिथे कुणालाही जाता येऊ नये अशा ठिकाणी चार दगडी खांबावर दगडी छत असलेले छोटे खानी मंदिर नजरेस पडते. तेच हे ब्रह्मदेवाचे मंदिर होय.

ही मूर्ती सुमारे पाच फूट उंच व उभी असून चतुर्भुज आहे. मूर्ती अतिशय सुंदर व सुबक आहे. मूर्ती स्थान असून समपाद आहे. प्रदक्षिणा क्रमाने मूर्तीच्या हातात अक्षमाला स्रूक, वेद (नक्षीची पट्टी अर्थात पोथीची सरंक्षक) कमंडलू या चार वस्तू आहेत. मूर्तीला तीन डोकी असून चौथे लूक्त आहे. मधल्या तोंडास दाढी दाखविली आहे. ती छातीपर्यंत रुळणारी आहे. कर्णकुंडले, बाजूबंध, उदरबंध, मोत्याची माळा, दंडातील अलंकार, बोटातील अंगठ्याा, हातातील तोडे, नक्षीदार व सुबक आहेत. कमरेभोवती गुंडाळलेल्या वस्त्राचा सोगा दोन्ही पायाच्या मधोमध सोडला आहे. कमरेभोवती गुंडाळलेल्या मोत्याच्या माळेच्या लडी गुडघ्यापर्यंत सोडलेल्या कोरण्यात आलेल्या आहेत. मूर्तीच्या उजव्या बाजूस ब्रह्मदेवाची पत्नी सावित्री व सव्यमुख हंस आहे. डाव्या बाजूस गण आहे, मूर्ती हिरव्या ग्रॅनाईटमध्ये तयार केलेली आहे. डोक्यावर किरीटमुकुट आहे. ओठांवर मिशी आहे. क्षेत्र अर्धोन्मीलीत असून चेहऱ्यावर स्मित हास्य आहे.[7] मूर्ती बारवाच्या एका कोपऱ्यात असल्याने ती आजही सुस्थितीत आहे. बह्मदेव पूजेतून अपूज्य असताना देखील बारवाच्या कोपऱ्यात ब्रह्मदेवाची मूर्ती स्थापण्यामागचा उद्देश मात्र लक्षात येत नाही. सध्या जिथे ब्रह्मदेवाची मूर्ती आहे तिथे सहज जाता देखील येत नाही. तरीही मूर्तीशास्त्राच्या दृीकोनातून ही मूर्ती अतिशय महत्वपूर्ण ठरते. ब्रह्मदेवाच्या स्वतंत्र अशा मूर्ती अगदी मोजक्याच प्रमाणात पाहावयास मिळतात. त्यापैकीच ही एक मूर्तीभजनाच्या काळात देखील ही मूर्ती अतिशय सुस्थितीत राहिली हे वैशिष्ट्योच म्हणावे लागेल. अशाही स्थितीत आजच्या घडीला ऊन, वारा, पाऊस यांचा मारा सहन करीत ही मूर्ती मग धरून उभी आहे. ब्रह्मदेवाची एकाकी अवस्था पाहिली की खरच तो शापित होता काय हा प्रश्न मनात निर्माण झाल्यावाचून राहत नाही.

**निष्कर्ष :–**

हिंदू धर्मशास्त्रानुसार ब्रह्मा, विष्णू, महेश या त्रिदेवांना महत्वाचे स्थान दिलेले दिसून येते. अगदी अनादी काळापासून यांची पूजा चालू होती आणि आहेत. मानवाच्या उत्क्रांतीवरून ते त्याच्या स्थिरजीवन जगण्याच्या कालावधीत बरेच बदल घडून आल्याचे दिसून येते. यामध्ये मूर्ती आणि मूर्तीपूजा हा महत्वाचा भाग समजला गेला त्यानुसार मूर्तीची निर्मिती केली गेली. शिवलिंग रूपाने तर ब्रह्मा आणि विष्णूमूर्ती रूपाने पूजले जात असत. सोलापूर हे शैव संप्रदायाच्या परिक्षेत्रात येत असल्याने सबंध जिल्ह्यात शिवलिंग पहावयास मिळतात. विष्णूची मंदिरे फार थोड्या प्रमाणात आढळतात. परंतु ब'ह्माची मंदिर पहावयास मिळत नाहीत. शैव आणि वैष्णव पंथाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे ब्रह्मपंथ मागे पला आणि कालांतराने तो नामशेष होण्याच्या मार्गावर आला असे म्हणावे लागेल. त्यामुळे ब्रह्मदेवाची मंदिरेच काय पण त्याच्या मूर्तीही तयार करण्यास कोणाची तयारी नव्हती. याचे आणखी एक महत्वाचे कारण असे सांगितले जाते की, ब्रह्मदेवाला पूजेतून अपूज्य होण्याचा शाप मिळाला शिवाय त्याचे दर्शन घेणाऱ्याची बुद्धी भ्रष्ट होईल असाही अपसमज पसरविल्यामुळे ब्रह्म देवाची मंदिरे आणि मूर्ती घडविल्याचे काम बंद करण्यात आले. त्याचाच परिणाम जिथे—जिथे ब्रह्मदेवाची मंदिरे अथवा मूर्ती होत्या त्यांचे भंजन करण्यात आले. ब'ह्मदेवाविषयी अशी काही लोकांच्या मनात चित्र निर्माण झाली की, त्याचे साधे दर्शनही घेतले जात नसे सृष्टीचा निर्माता, वेदांचा पालनकर्ता, पितामह धाता, विधाता, स्रष्टा, विश्वसक, विधी, विश्कर्मन, लोकेश सूरज्येष्ठी, अब्ज योनी कमलायन, चतुरानन इत्यादी नामाभिधान प्राप्त ब्रह्मा भ्रष्ट झाला आणि अपूज्य ठरला. शिवाचा शाप, सावित्रीचा शाप अथवा त्याच्या मुलीने दिलेला शाप असो पण आजही ब्रह्मा शापीतच आहे असेच म्हणावे लागेल. मंगळवेढ्यातील ब्रह्मदेवाची बारवातील मूर्ती त्या ठिकाणी का बसविली असावी या प्रश्नाचे उत्तर अकलनीयच वाटते. धार्मिकतेचा विचार केला तरी अपूज्य अशा ब्रह्माचे हे बारवातील मंदिर निर्मिती मागील प्रयोजनाचा हेतू स्पष्ट होत नाही. कुणीही सहजा सहजी न पोहचेल अशा ठिकाणी ही मूर्ती का बसविली असावी. असे प्रश्न निर्माण होतात.

**संदर्भ सूची :–**


1) भारतीय मूर्तीशास्त्र, डॉ. नी.पु. जोशी, म.वि.ग्रंथ.नि.मंडळ पुणे–30 (1979), पृ. क्र. 301–302.
2) The History and culture of the Indian People Vol.-I, Vedic Age : P. 211.
3) मूर्तीविज्ञान, डॉ. ग.ह. खरे, भा.इ.सं. मंडळ पुणे (इ.स. 1939), पृ.क्र. 1–2.
4) इलेमेंटस् ऑफ हिंदू इकोनोग्राफी खंड–2, टी.ए. गोपिनाथराव, लॉ. प्रिटींग हाऊस मद्रास, पृ.क्र. 210.
5) कित्ता, पृ.क्र. 275.
6) बृहत्संहिता, वराहमिहिस्कृत, जगन्मित्र प्रेस रत्नागिरी, 1932, पृ. 92.
7) पहा फोटो.

# ANCIENT ARTISTIC UMA-MAHESH ICON AT VELAPUR

## (In Solapur District-Maharashtra)

**Dr. Nabha Kakde**
**Social College, Solapur**

**Introduction :-**

We do not find early references of Solapur history but it has been traced that Solapur was under rule 'Andhra-Bhrutya', 'Chalukya', 'Rashtakuta' and later 'Chalukya' till 1184. After Chalukya, Solapur was captured by Yadva's of Devgiri. The Hemadpanthi temples inscription and wells are available references of Yadva's rule. These references are from Yadav ruler Bhilam in 12th century and Yadav ruler Ramchandra in 13th century.[1] In Solapur district there are so many temples. One of them is 'Ardhriari Nateshwar' temple of Velapur. This village is very small in the map. It is situated n Malshiras taluka on Pandharpur-Pune road, 110km distance from Solapur city. In Velapur also there are some Hemadpanthi temples of Shiva and Vishnu but the only one temple of Uma-Maheshwar in Solapur district is at Velapur.

The local people described this temple as 'Aardhnari-Nateshwar temple. This temple was built in the period of Yadavas of Devgiri.[2] This temple is 1km from Velapur Bus-stand and in good condition. The structure of the temple is east-west and artistically so beautiful. The campus of the temple is big. When we enter from the stoneage entrance of the temple, we can see well square shape in front of entrance. Behind that well there is Shiva temple. At the left side of the well there is small temple in which there are icons of Ganesh, Nag and Shivling.

At one step of the well there is one inscription on 2 feet stone. Which is in Devnagari script and Marathi language of shake 1227.[3] In this inscription there is the information that on this small temple. The Shikhar of the temple was built Yadav King Ramchandra Dev was ruling at that time.[4]

In this temple there is broken water pot of clay. Tulsi Vrindavan, Nandi and icons in devkoshtas. The entry door of this temple is at east. Mukh Mandap, then Sabhamandapa then Antral and then Garbhagriha. This is the structure in Sabhamandapa, there are Saptamatrikas, Surya, Rudra, Chamunda, Durga. The temple is rectangle and Kakshasanas on both side of in Mukhmandapas. There are 28 pillars (Stambhas) in garbhagriha and antral, which are of Yadav period because the sculpture of Saptamatrikas are Chalukya and Snake Sculpture are of Yadavas at the left side of the entrance of the temple, there is inscription of 1212.[6] In this inscription "Yadav King Ramdeva's officer 'Joidevas' messengers 'Bramhadev Rana' and his brother 'Baldev Rana' built some parts of this temple.[7]" is the important information in Devnagari script. The period of this structure should be of 11th or 12th century.

**UMA-MAHESHWAR :**

The Uma Maheshwar temple of Velapur which is described 'Ardhanari Nateshwar' or Vateshwar temple by the local people is artistically beautiful and structurally Yadava's.[8] The icon of Uma Maheshwar is of green granite, actually 'Ardhnari Nateshwar' means half 'Shankar' and half 'Parvati' but this icon is not like that. I think description as 'Ardhnari-Nateshwar' is against inconography. So, I will stressfully say that this icon is of 'Uma-Mahesh'. Some scholars and researchers described it as 'Nar-Nari Nateshwar'. But it is also in ichnographically wrong. This 'Uma-Mahesh' is standing posture. Mahesh is in 'Samapada' and 'Uma' is in 'Ardhsamapada'. Icon is carved and standing on 'Shalunka'. Mahesh' is 'Chaturbhuj' (four armed) on the first right hand is in 'Abhaymudra' having 'Japmal' in next right hand there is 'Trishul', first left hand having snake is put on Uma's head and the next left hand is on the waist of 'Uma'. 'Uma' is dwibhuj and having lotus in her left hand and right hand on the shoulder of Mahesh. On Rathambika, we can see 'Shivgan and nandi' at the foot of Mahesh'. 'Ganesh and Godha' the vehicle of Uma at her foot. There are 'Mahevehpot. There are artistic anklets in the legs of both Uma and Mahesh. The vastra of Mahesh around the waist is rich. There is pearl garland around the waist that is called 'Kamarbandh'. On the chest ornaments, beautifully necklace & there is Kundal in the ears. The Mukut is Jatamukut and Nagbandh in center of the mukut.[9]

In the legs of Uma, there are Nupur and Tode. The reach cloths of Uma from waist to the knees. On Kamarbandh there is Kirtimukh in the center and pearl garlands on the thies. There are four Necklaces and also Kundals in the ears. Her hair style so attractive. On the left side of rathambika, there is Vishnu and at the right side there is Bramha. On the shring of icon there are Ashtadikpad and Kirtimukha in the middle of icon. The height icon is of 3 feet. Art and Architecture of later Chalukyan temple at Velapur.

**CONCLUSION :-**

Velapur is small village in Solapur District event through it is very famous for this temple. The temple situated in this village is related to later Chaluykan period. The temple was built in Chaluykan period as well as in Yadav period because the Architecture of the temple is related to Chaluykan and Yadav period.

Saptamatrikas are situated on the wall of Sabhagraha, Saptamatrikas was the emblem of Chaluykan. The temple is known as Ardhanari Nateshwar but it is the icon of Shiv and Parvati. Two shrines are separate. Velapur was situated on the cross road of north and south, so religious, political and social significance of this village was known to all. Inscription from Yadav density are there menace the territory was under the supremacy of Yadava's rulers.

The temple at Velapur is unnoticed and lesser known. The scholars and researchers are not reached to this temple, with the help of icon in this temple. This paper will enlightened to the scholars to focus this unnoticed temple. We can study social and religious life in ancient period also we can study the dress ornaments in those period. The icon of Uma Maheshwar is significant beautiful and example of Chalukyan art.

**REFERENCES :-**

1. Solapur district gazetteer - Vol.-xx, Page 275.
2. Prachin Maharashtratil Koriv Lekh - 1933. S.H. Tulpule - Page 248.
3. Dakshin Maharashtrachya Itihasachi Sadhane - 1930 G. H. Khare - Page 78-80.
4. Marathi Vishwakosh - Vol. 8, Edit. : Mahadeoshastri Joshi - Page 128.
5. Iconography of Hindu Temple B. S. Deshmukh - Page 11.
6. Bhartiya Murtishastra - N. P. Joshi - Page 183.
7. Maharashtra Va Gowe Shilalekh Tamrapatachi Varnanatmak Sandarbh Suchi S. B. Deo - Page 60.
8. Plate - I, II, III
9. Plate - IV, V

***

# नागशिल्प - एक अभ्यास

**प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के**
संशोधन मार्गदर्शक,
दिंगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड
9423139676 (arvindsontakke72@gmail.com)

भारतातील कुठल्याही शहरात अथवा लहानातील लहान खेड्यात गेल्यास नागशिल्पे दृष्टीस पडणार नाहीत असे गाव मिळणे विरळच. एखादे मंदिर, झाड, तलावाच्या शेजारी किंवा घाटावर एका सपाट शिळेवर वळसेदार शरीर असलेल्या नागाचे शिल्प हमखास असतेच. त्यावर कधी हळद कुंकू तर कधी शेंदूर लावलेले दिसते. तर कांही ठिकाणी मनागयुगलफ एकमेकांना वेटोळे घातलेले शिल्पे पहावास मिळतात. नागाशी संबंधीत असंख्य कथा या देशात अस्तित्वात आहेत. अवैदिक, वैदिक, अदिवासी समाजात वेगवेगळ्या कथांची गुंफण असून अशा कथांतून भारतीय संस्कृती भक्कमपणे उभी आहे. नागांशी संबंधीत असलेले अनेक शिल्पे असून सूर्य व नागाचे अन्यन्य संबंध सर्वश्रृत आहेतच.

**उद्देश :-** नागशिल्प निर्मीती मागिल कल्पनेचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात करण्यात येत आहे.

**संशोधन पध्दती :-** प्राथमिक आणि दुय्यम साधने प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरण्यात आली आहेत.

**कीवर्ड्स :-** नागशिला, नागशिल्पे, कुळचिन्ह, नागयुगल.

प्राचीन काळापासून भारत निसर्गपुजक देश असल्याने सुर्यपुजेचे उल्लेख ऋग्वेदातही आलेली आहेत. सादृष्याधिष्टित कल्पनेच्या जोरावर नाग आणि सुर्याच्या अनेक कथा गुंफण्यात आल्या आहेत. नाग हा सुर्याप्रमाणे गायब होतो, सुर्याप्रमाणेच विद्युल्लता नागाच्या ठाई दिसते, सुर्याची दाहकता व नागाचे विष यांची तुलना, सूर्याचे तेज व नागाचा लखलखीतपणा यातील साम्यस्थळे पाहुन नाग आणि सूर्य यांचे एकत्रितकरण पौराणिक कथेतून शिल्पकलेत उतरलेले दिसते. त्यासोबतच नागाचा लिंग सदृष्य आकारही त्यास लैंगिक प्रतिक बहाल करते.

नागपुजेची सुरूवात इजिप्त मध्ये झाली असे मत सी. एफ. ओल्डहॅम यांनी आपल्या The Sun and The Serpent A Contriution to The History of Serpent Worship या ग्रंथात मांडले आहे. तर ग्रॅफिटन एलिएट स्मिथ यांनी 'Geographical Distribution of the Practice of Mummification' चा संशोधनपर अभ्यास करताना सूर्यपूजा आणि सर्पपूजा यांचा जन्म इजिप्त मध्ये झाला असल्याचे सूचित केले आहे. जगात जिथे जिथे या पूजा केल्या जातात त्या इजिप्शियन प्रभावातून केल्या जातात असेही ते मानतात. The migrations of early culture या ग्रंथात स्मिथ यांनी मांडलेल्या मतांना विरोध दर्शवत लायन कॅप यांनी त्यांच्या Lost continents the Atlantis theme in history science and literature या ग्रंथात असे म्हटले आहे की, मसंस्कृतीचे एकच एक केंद्र असते व तिथून ती संस्कृती जगात प्रसरण पावते असे समजणे योग्य नाही. वास्तविक संस्कृतीचे विशेष जगात अन्यत्र पसरत असतात. म्हणून इजिप्तच्या लोकांना किंवा अन्य कोणत्याही लोकांना असे श्रेय देणे योग्य होणार नाही.फ असे त्यांना वाटते.(1)

## भितीतून नागपूजा

जगातील सर्वच प्राथमिक धर्मामध्ये व आदिम समाजांमध्ये नागपूजा प्रचलित असल्याचे आढळते. भारतात सर्वत्र नागपूजा प्रचलित आहे. वेदपूर्व काळापासून भारतात

नागपूजा प्रचारात असावी. मोहेंजोदडो येथील उत्खननातही नागमूर्ती आढळल्या आहेत. नाग विषारी असल्यामुळे मनुष्याला त्याची फार भीती वाटते. ऋग्वेदात नागाचा उल्लेख मअहिफ या शब्दाने केला असून तेथे त्याचे क्रूर, घातकी व भयंकर असे वर्णन केले आहे. नागाची स्तुती करून त्याला वश करून घेतले, तर त्यापासून भय राहणार नाही, या कल्पनेने यजुर्वेदात (13.6.8) नागस्तुतिपर मंत्र आढळतात. नागपूजा नागापासून वाटणाऱ्या भयातून सुरू झाली असावी. शतपथ ब्राम्हणात (3.6.2) नागमाता कद्रू हिला पृथ्वीचे प्रतीक समजून पूज्य मानले आहे. सर्पवेद या नावाचा अथर्ववेदाचा एक उपवेद आहे. त्यात सर्पांचे विष उतरविण्यासाठी, त्यांना वश करण्यासाठी अनेक मंत्र सांगितले आहेत. कर्कोटक नागाचे स्मरण करणे हे पापनाशक आहे, असे एका प्रसिध्द श्लोकात म्हटले आहे. नागांना संतुष्ट करण्यासाठी सर्पबली, नागबली इ. विधी गृह्यसूत्रा मध्ये सांगितले आहेत. अशा प्रकारे नागांपासून आपले संरक्षण व्हावे, या उद्देशाने प्राचीन काळापासून नागपूजा भारतात प्रचारात आली आहे.(2)

मराठीत नागशिला म्हणून संबोधन केल्या जाणाऱ्या या शिळा सारा भारत नागपूजक होता हे सिध्द करतात. नागाला विषारी मदंशफ दिल्याने मानवजातीला त्याची प्रारंभी पासूनच भिती होती. त्याचे हे मशस्त्रफ किती घातक आहे. याची प्रचिती सातत्याने मानवाने घेतलेली असल्याने तो या नागांपासून दूर रहात असे. भितीतूनच आकर्षणाचा जन्म झाला. या सर्पयोनीची भिती इतकी जबरदस्त होती की, त्यातून तो नागपूजेकडे वळला. नागाचे जमीन आणि पाण्यात ही वास्तव्य, कात टाकून द्विजत्व प्राप्त करून घेणे, त्याच्या द्विजिव्हा, हस्तपादपंख विरहीत शरीर, आश्चर्यकारक संभोग, अप्रतिम नागफणा, त्याचा फुत्कार, भेदक नजर या सर्वामुळे नाग मानवजातीत कुतुहाल आणि आदराचा विषय बनला व त्यातूनच वेगवेगळ्या समजुती प्रचलित होऊन नागपूजा अस्तीत्वात आली असावी.(3)

**नागनगरे**

भारताचं अतिशय प्राचीन नगर जे वायव्य सीमेवर ऐन भारताच्या प्रवेश द्वारावर वसलेलं नगर म्हणजे तक्षशिला होय. जगातील विद्याभ्यासाचं प्राचीनतम केंद्र, भारतीय लोकपरंपरे नुसार ही नागराजा तक्षकाची नगरी. उत्तर प्रदेशातील मअहिच्छत्रफ नगरी ही परंपरेने नागांशी जोडल्या जाते. तिचे नावच (अहि म्हणजे नाग) तिचा नागांशी संबंध सांगणारे आहे. मध्यप्रदेशात ग्वाल्हेर जवळ हे शहर होते. प्राचीन पद्मावती नगरी ही पुराणप्रसिध्द नगर. पुराणात येथील नागवंशी राजांची विस्तृत वर्णने आहेत. येथील नागसेन नामक राजाचा उल्लेख सम्राट हर्षवर्धनाचा राजकवी बाणभट्ट याने आपल्या हर्षचरित्रात केला आहे. नागद, नागपूर, नागापूर, नागग्राम, नागठाण, नागहल्ली, नागूर, नागझरी अशी नाग नामक गावे भारतात सर्व प्रांतात आहेत. हल्लीचे पद्म पवाया जे ग्वाल्हेरजवळ आहे. पुर्वी पद्मावती या नावाने प्रसिध्द होते. येथे वृषनाग, भीमनाग, स्कंदनाग, वसूनाग, व्याग्रनाग आदी राजांची नाणी सापडली आहेत.(4)

**नागवंश**

नगवंशाच्या उत्पत्तीच्या अनेक कथातील ही एक कथा आहे की, कश्यप ऋषीला कद्रू नावाची एक पत्नी होती. त्या कद्रूच्या पोटी जी संतती झाली ती नाग या नावाने प्रसिध्द झाली. हीच कथा अनेक पुराणांत थोड्याफार फरकाने आली आहे. वासुकी हा नाग राजा होता त्याची राजधानी भोगावती नगरी होती. या वासुकीनंतर शंख, फुलिका, महाशंख, कंबाला, अश्वतारा, धृतराष्ट्र, शंखपूर्ण व देवदत्त या नावाचे महान नागराजे होऊन गेले. या नागांना विविध पुराणानुसार एक, पाच किंवा सात पासून हजारपर्यंत फणा असल्याचा उल्लेख मिळतो. अनंत हा सहस्त्रफणा असलेला नाग होता. त्यावर विष्णू झोपलेला आहे असे मानतात. नंदीवर शंकर प्रसंन्न झाल्यावर नंदीचा सन्मान करण्यासाठी

आलेल्या सर्प किंवा नाग मंडळीची यादी वराहपुराणात दिली आहे. त्या यादीत वासुकी, अनंत, महाभाग, सर्पराज, अमृताशी, शृंग, अरिजया, प्रज्ञावंत, केवाल, अश्वतर, धनंजय आणि कर्कोटक यांच्या नावाचा समावेश आहे. या नागांना वर्ण, रंग व चिन्हेही होती. ती पुराणानुसार अशी होती.[5]

| नाव | वर्ण | रंग | चिन्ह |
|---|---|---|---|
| अनंत | ब्राम्हण | शुक्ल | पद्म |
| वासुकी | क्षत्रिय | आसम | खपर |
| तक्षक | वैश्य | पीत | स्वस्तिक |
| कर्कोटक | शुद्र | कृष्ण | कमळ |

महाराष्ट्रातील कांही वंशाची नावे मशेषफ अशी आहेत. प्रख्यात शिंदे घराणे हे ही नागपूजकच होते. कर्नाटक, महाराष्ट्रात अनेक शिंदे घराणी आहेत. राष्ट्रकुट नृपती गोविंद तृतीय याच्या नेसरी ताम्रपटात त्याचा सामंत नागहस्ती याचा उल्लेख येतो. कर्नाटक राज्यातील चंद्रवल्ली, बागलकोट, भैरणमट्टी, हरिहर, मात्रहल्ली येथील शिलालेखात नागवंशी राजांचे अनेक उल्लेख येतात. पुणे जिल्हातील जुन्नर येथेही नागवंशीय शिंदयांची एक शाखा राज्य करीत होती.[6] पैठणचे सातवाहन हे नागवंशीयच राजे होते. महाराणी नागनिका ही नाग कन्याच.

**नागप्रतिके**

भारतीय कलेने भावना प्रकटीकरणासाठी प्रतिकांना जन्म दिला. जसे नाग हे कश्यप आणि कद्रू यांचे पुत्र असल्याचे पुराणात उल्लेख आहेत. पौराणिक नाग लोकांमधील अनंत, वासूकी, शेष हे नाग मानवानुकून होते. तर तक्षक, कार्कोटक, कालीया हे मानववैरी होते. नाग हा वारूळात रहातो आणि वारूळ हे भूदेवतेचे प्रतीक मानले आहे. त्यामुळे भूमीच्या सृजन शक्तीशी त्याचा संबंध जोडला गेला.[7] शिव व विष्णू या दोघांचाही नागाशी संबंध आहे.नागफणी धारण करणारी कालीका देवी आहे. त्याच प्रमाणे गणेशाच्या पोटवरही नागबंध आवळलेला असतो. कंसाच्या कैदेतून बाहेर पडल्या नंतर पावसापासून रक्षण करण्यासाठी वासुकी नागाने कृष्णावर फणाछत्र धरले होते. बुध्दांच्या जन्मानंतर नंद व उपनंद या नागांनी स्नान घातले होते. तर ज्ञान प्राप्ती नंतर मुचलिंग नागाने त्यांच्यावर आपल संरक्षक असे फणाछत्र धरले होते. जैन तिर्थंकर पार्श्वनाथ यांचे नाग हेच अभिज्ञान चिन्ह आहे. कामठा किंवा मेघमाली हा पूर्व जन्मीचा पार्श्वनाथाचा भाऊ जो वैरी बनला होता. त्याच्या हल्यापासून यक्ष धरणेंद्र हा आपल्या सातफण्यांचे छत्र पार्श्वनाथच्या डोक्यावर धरले असल्याचे शिल्प वेरूळ लेणीत आहे.[8] श्रावणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या प्रचंड मूर्तीभोवती अनेक वारूळे निर्मिली असून त्यातून नाग हे बाहेर येत आहेत असे शिल्पात दाखविले आहे.[9] नाग हे योगाचे ही प्रतिक मानले जाते. त्यामुळे शिवाचे योगीराजत्व दाखविण्यासाठी नाग शिवाजवळ सातत्याने दाखविला जातो.

**आयुधरूपातील नागप्रतिक**

बहुतांश देवतेसोबत नाग हे चिन्ह आयुध म्हणून दाखविण्यात येत असले तरी प्रत्यक्षात शिवासोबत सर्प हे लांछण कायमस्वरूपी जोडले गेलेले आहे. प्रतिमालाक्षणिक विवरण पहात असतांना विष्णुधर्मोत्तरपुराण, मत्स्यपुराण, मानसार, मयमत, कामिकागम, अंशुमद्भेदागम, देवतामूर्तीप्रकरण आदि शिल्पशास्त्रीय ग्रंथात शिवाच्या आयुधात कृष्णमृग, खड्ग, खेटक, वज्र, परशु, त्रिशुल, खट्वांग, डमरू, पाश, हस्तिचर्म, दण्ड, कपाल, अक्षमाला, धनुष (पिनाक), शंख, चक्र, गदा आणि सर्प किंवा नाग सांगितले आहेत.[10]

**नाग आणि लैंगिक कामप्रतिक**

नाग किंवा साप यांना लैंगिक भावनेचे प्रतीक मानण्यात येते. ज्यावेळी एखादा साप खांबाला वेढा देऊन बसतो तेंव्हा तो खांब प्रेरीत झालेले 'लिंग' वाटतो. [11] साप हे पुरुषवाचक शब्द म्हणून वापरला जातो. या सरपटणाऱ्या प्राण्यात लिंगाची रचना असल्यामुळे ते वासनाधिषाचे प्रतीक आहे. त्यासाठी त्याला वैषयिक मन, संभोगेच्छा आणि संभोगेच्छा कमी होणे इत्यादीचे प्रतिनिधित्व सरपटणारे प्राणी करतात, ज्यावेळी स्त्री व पुरुष उत्तम परिस्थितीत व तंदुरुस्त शरीराने एकमेकांकडे आकर्षित होतात. त्यावेळी त्यातील लिंगाची किंवा योनीची स्थिती एखाद्या वळवळणाऱ्या प्राण्यासारखी होते. [12] ग्रीक कथेत ॲडम व इव्हा जवळ साप हे प्रतीक यामुळेच दाखवण्यात येते.

वारूळ हे भूमीचे – भूमीच्या सर्जनेंद्रियाचे प्रतीक आहे, नर नाग हे पुरुष तत्वाचे प्रतीक आहे. त्याची उपासना प्राधान्याने संतानदाता देव म्हणून होते. दक्षिणेत अनेक जमातीत वधूने व विवाहीत स्त्रियांनी नागपूजा करण्याची चाल आहे. काही ठिकाणी विवाहीत स्त्रिया वारुळाची पूजा करतात. संतानप्राप्तीची अपेक्षा करणाऱ्या स्त्रिया नागाच्या अथवा नागयुगलाच्या मूर्तीची पूजा करतात आणि नवसफेडीसाठी नागमूर्ती (नागशिळा) तयार करुन मंदिराच्या आवारात अथवा झाडांच्या पायथ्याशी प्रतिष्ठित करतात.

नागाचे संतानदायी सामर्थ्य भारतीय जनमानसातील अनेक धारणांतून व्यक्त होत असते. दक्षिणेतील सर्व प्रमुख क्षेत्रपाळ देव आपले नागरूपत्व सांभाळून आहेत. [13]

ग्रामिण भागातून आजही अशी दृढ समजूत आहे की, एखाद्या गर्भवती स्त्रीने साप (नाग) पाहिला असता, त्याचे तत्क्षणी डोळे जातात आणि ती स्त्री प्रसूत झाल्यावर तिच्या न्हाणीघराचा गंध अनुभवल्यावर तो नाग पुन्हा डोळस होतो. ती गरोदर असतांना त्या स्त्रीचा आणि पुरुषाचा संबंध येऊ नये किंवा समागम घडू नये. असा निषेध त्यात अभिप्रेत असावा. सर्व पुरुष नागाचे प्रतिनिधी आहेत आणि नाग हे पुरुषतत्वाचे प्रतीक आहे. म्हणूनच वारुळाची पूजा भूमीच्या सर्जनेंद्रियाचे प्रतीक म्हणून केली जाते. [14]

वारूळ यास पृथ्वीची योनी म्हणतात. ती योनीरुपिनी भूदेवी आहे. वारूळ ते योनीमूर्ती हा क्रमविकास आहे. योनीप्रतीक म्हणून नैसर्गिक वारुळाची उपासना अतिप्राचीन काळापासून आजपर्यंत दक्षिण भारतात तरी अखंड प्रचलित आहे. वारुळ हे फारच नाजूक असल्यामुळे वारूळ सदृश्य घडीव शीला मूर्तीचे प्रचलन क्वचित कोठे झाल्याचा पुरावा उपलब्ध आहे. वारुळाच्या शीलारूप प्रतिकृतीनंतर नाभीपर्यंतच्या योनीमूर्ती घडविल्या जाऊ लागल्या. तसेच प्रसवा बरोबरच पोषणाचाही मातृत्वाशी संबंध असल्यामुळे योनीप्रमाणेच स्तनांना उठावदेणाऱ्या स्कंधापर्यंतच्या मूर्तीची निर्मिती होत गेली. भूदेवीच्या सर्जक आणि पोशक इंद्रियांच्या मूर्तीचा हा, वारूळ ते योनी–स्तन–युक्त मूर्तीपर्यंतचा क्रमविकास पुराव्यांनी श्री रा.चि. ढेरे [15] यांनी सिध्द केला आहे.

कामशास्त्रीय ग्रंथात कल्याणमल्ल, कोक्कोक, दीक्षित शामराज, श्रीप्रौढदेवराज, मथुराप्रसाद दिक्षीत यांनी नायिकेच्या मानसप्रकृतीचा ही उल्लेख केलेला आहे. देवसत्वा, गन्धर्वसत्वा, यक्षसत्वा, मनुष्यसत्वा, पिशाच्यसत्वा, नागसत्वा, काकसत्वा, वानरसत्वा आणि खरसत्वा असे प्रकार मानण्यात आलेले आहेत. सत्व या शब्दाचा अर्थ शील असा होतो. अर्थात नायिकेच्या चारित्र्य किंवा वागणुकीवरुन हे सत्वाचे प्रकार दिलेले आहेत. त्यानुसार जी नेहमी एखादी घटणा किंवा काम विसरते, विसराळू स्वभावाची जी नेहमी व्याकूळ (घाबरलेली) असते, सापाप्रमाणे दीर्घ श्वास घेणारी, नेहमी निद्राधिन राहणारी, नेहमी जांभळी देणारी ती 'नागसत्वा' जाणावी, असे म्हंटले आहे. [16]

वरील विवेचनावरून सारांशरुपाने असे म्हणता येईल की,

1. जगातील सर्वच प्राचीन मानवी सभ्यतेत नागा विषयी भिती आणि त्यातून आदरभाव प्रकटीकरण झालेले आहे.

2. नागाचे सादृष्याधिष्टीत कल्पनेच्या जोरावर सूर्यासोबत संबंध जोडून कथा निर्मिती केल्या गेली.
3. नाग हे अत्यंत जहाल विष बाळगून असल्यामुळे आमचाही वंश नागासम आहे. हे दाखविण्यासाठी कुळवंश प्रतिकाच्या रुपाने नाग हे **'कुळचिन्ह'** म्हणून ज्या जमातींनी किंवा राजवंशांनी स्विकारले त्यास नागलोक या नावाने ओळखण्यात येते.
4. नागाची शरीररचना ही पुरुष लिंगाप्रमाणे असल्यामुळे आणि वारुळ स्त्री लिंग अथवा भूमिचे / सृजनाचे प्रतिक म्हणून स्विकारले गेले असावे.
5. दक्षिणेतील अनेक क्षेत्रपाल देवता आपले नागरुप टिकवून आहेत.
6. नागाच्या या मानव जातीवर पडलेल्या प्रभावामुळेच आजही भारतातल्या प्रत्येक गावात नागशिला पहावयास मिळतात.
7. नागाच्या भितीपोटीच त्यास देवत्व बहाल करुन नागशिला तयार करण्यात आले.

**संदर्भ :-**


1. डॉ. नानासाहेब सुर्यवंशी, सम्पा., अक्षरवाङ्मय, डॉ. अरुण प्रभुणे, त्रैमासिक, वर्ष पहिले, अंक पहिला, जून ते ऑगस्ट, 2010, पृ. 05,06
2. तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री जोशी, प्र. संम्पा., मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1979, पृ.410
3. डॉ. नानासाहेब सुर्यवंशी, पुर्वोक्त.
4. सागर औरंगाबादी, नागमंडल, झूम, दै. लोकमत, दि. 11 ऑगस्ट 1994, पृ. 1,3
5. श्री प्र. र. अहिरराव, श्री ह. अ. भावे, भारतीय शिल्पातील प्राणी, वरदा प्रकाशन, पुणे, 2005, पृ. 82,83
6. सागर औरंगाबादी, पुर्वोक्त.
7. पं. महादेवशास्त्री जोशी, भारताची मूर्तीकला, अनमोल प्रकाशन, पुणे,2004, पृ. 77,78
8. टिपरे राधिका, वेरुळ लेण्यातील शिल्प वैभव, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, 2006, पृ. 216
9. कित्ता. पृ. 79
10. डॉ. रुमी गुप्ता, देवी देवताओं के अस्त्र शस्त्र, स्वाति पब्लिकेशन, दिल्ली, 2003, पृ. 76 ते 79
11. Wall, O.A., Sex and Sex worship in the world, inter-India publications Delhi, 1979, p.534
12. Cutner H., Short History of Sex and Sex Worship, London, 1953 p.171,176
13. ढेरे, रा.चि., लज्जा गौरी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 2004.पृ. 150—151
14. देशपांडे, सु.र., भारतीय कामशिल्प, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, 1986 पृ. 46
15. ढेरे, रा.चि लज्जा गौरी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे,2004.पृ. 56
16. डॉ. चौहान दलविर सिंह, संपा; रतिकल्लोलीनी (59), चौ.सं.सी. ऑफिस, वाराणसी 2004, पृ. 26

# पानगाव येथील विठ्ठल मंदिरावरील बोधिसत्व अमिताभ– एक नवा शोध

**–डॉ. धम्मपाल माशाळकर**
सोलापूर, मो. 9730393753
Email : dhammapalmashalkar@gmail.com

भारताच्या प्राचीन इतिहासात मूर्तिशास्त्राचा अनेकपरिने उपयोग करून घेतला गेला. या शास्त्राच्या अनेक आयामांचा देशकाल परिस्थितीनुसार विचारही करण्यात आला. सामाजिक सामंजस्य, प्रबोधन, विविध गटांचे सम्मीलन, एकोपा इत्यादिंसाठीचे. या शास्त्राचा दूरदर्शीपणाने समाज धुरिणांनी, पंडितादीनी, तत्ववेत्यांनी अत्यंत परिणामकारकपणे उपयोग करून घेतला. याच काळात मूर्तीच्या प्रकारात वाढ झाली. मूर्ती आणि प्रतिमा यामध्ये फरक आहे. मूर्तीही सुशोभनासाठी असते ती मंदिराच्या परिसरात अथवा मंडोवरावर असते. प्रतिमा ह्या गाभाऱ्यात पूजेसाठी असतात. (पुष्पा त्रिलोकेकर, देवांची जन्मकथा, श्रीविद्या प्रकाशन, पूर्ण, पृ.क्र. 23) पण एक मात्र खरे, भारतात निव्वळ पूजा म्हणून मूर्तीची प्रतिष्ठापना केलेली नाही. या मूर्तीच्या बाबतीत नेमक्या शब्दात सांगायचे तर प्रतिमांच्या अनुषंगाने त्याने त्यांचे स्वतंत्र शास्त्र व विज्ञानही विकसित केले आहे. *(डॉ. नी.पु. जोशी, प्राचीन भारतीय मूर्तिविज्ञान, प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.क्र. 65)*

प्रत्येक मूर्ती अथवा प्रतिमा तयार करण्यापाठीमागे आध्यात्माचे अधिष्ठान असे. धार्मिक, पौराणिक कथेला अनुरूप अशाच मूर्ती घडविल्या जात असत. अशा मूर्ती आज आपणास अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात. मागच्या पिढीतील मूर्ती अभ्यासकांनी उपलब्ध साधनांच्या आणि माहितीच्या आधारे आणि आपल्या आकलनशक्तीनुसार मूर्तीची ओळख सांगण्याचा प्रयत्न केला. पण यामध्ये अनेक अशा मूर्ती सांगता येतील, ज्यांची वेगळीच ओळख इतिहासात नमूद आहे. त्यापैकी एक मूर्ती म्हणजे पानगाच्या विठ्ठल मंदिरावरील देवकोष्टातील बोधिसत्व अमिताभ होय. ज्याला आजपर्यंत योगविष्णू म्हणून संबोधले जाते. *(डॉ. माया पाटील, मंदिर शिल्पे, ग'थाली प्रकाशन, मुंबई, पृ. 26)*

लातूर जिल्ह्यातील, रेणापूर तालुक्यात पानगाव हे गाव लातूरपासून 34 कि.मी. अंतरावर आहे. या गावाभोवती पाणी होते म्हणून ह्या पानगाव म्हणतात असे सांगितले जाते. *(सु.म. नांदे रेणापूर व परिसर एक ऐतिहासिक अभ्यास, पृ. 24)* पानगावच्या पश्चिमेस जिल्हा परिषद शाळेजवळ चालूक्यकालीन 'विठ्ठल मंदिर' आहे. या मंदिराच्या स्थापत्य शैलीवर होयसाळ. चालूक्य आणि काकतीय शैलीचा प्रभाव जाणवतो. नंदिमंडप, मुखमंडप, अर्धमंडप, मंडप, अंतराळ, गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. गाभाऱ्यात सद्या विठ्ठल–रुक्मीणीच्या प्रतिमा आहेत. परंतु हे मंदिर विठ्ठलाचे नसून महादेवाचे आहे हे नंदिपंडपावरून सहज लक्षात येते. हे मूळचे शैव देवालय असून त्याचे नंतर विठ्ठल म्हणजेच वैष्णव मंदिरात रुपांतर झाले असावे. *(डॉ. अरुण चंद्रपाठक (संपा.) महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ, पृ. 117)*

विठ्ठल मंदिराची उभारणी 4 फूट उंच जोत्यावर केलेली असून मंदिराच्या मंडोवरावर अनेक मूर्तीशिल्प कोरलेली आहेत. यामध्ये विविध प्रकारातल्या सुरसुंदरी आहेत. किर्तीमुख, पाने–फुले, भौमितिक आकृतीने अलंकृत हे मंदिर आहे. या मंदिराला पूर्व, पश्चिम व उत्तर असे तीन देवकोक असून पूर्व दिशेच्या देवकोात स्थानक नृवराह आहे व त्याच्याच विरुद्ध दिशेला पश्चिमेस बोधिसत्व अमिताभाचे मूर्तीशिल्प आहे.

बोधिसत्व अमिताभ मूर्तीशिल्प यावर नव्यानेच प्रकाश टाकण्यासाठी हा शोध आहे. यापूर्वीच्या अनेक इतिहास अभ्यासकांनी उपरोक्त मूर्तिशिल्पास योगविष्णू किंवा योगनारायण, योगीश्वर असे संबोधले आहे. *(डॉ. प्रभाकर देव, अनुवादक–सौ. कल्पना*

*रायरीकर, मराठवाड्यातील प्राचीन स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे, पृ.22)* असे म्हणण्याचे नेमके प्रयोजन काय लक्षात आले नाही.

**योगीश्वर विष्णूची लक्षणे :—**

मूर्तीचे योगीभोगादी चार प्रकार असतात हे आपण जाणतोच. पैकी योगावस्थेतील विष्णूच्या स्थानक तशाच बैठ्याा म्हणजे योगासन मूर्ती आढळतात. योगीश्वर विष्णू पद्मासनात बसलेला असून पुढील दोन्ही हात ध्यानमुद्रेत मांडीवर एकत्र ठेवलेले असतात. त्याचे मागील हातात गदा व चक्र ही आयुधे असतात. *(गो.बं. देगलूकर, विष्णूमूर्ती नमस्तुभ्यम द्वारकाधीश चॅरिटी प्रकाशन, पृ. 72)* अशाच प्रकारचे शिल्प योगीश्वर विष्णू धर्मापूरी, जि. बीड व उमरगा, ता. उस्मानाबाद येथील शिवमंदिरावर आहे.

पानगाव मंदिराच्या देवकोकात असणाऱ्या मूर्तीमध्ये वरिल प्रकारचे कोणतेही लक्षण अथवा आयुध दिसत नाही. विष्णू परिकरामधील कोणत्याही देवता नाहीत मग तो योगीश्वर विष्णू कसा? हा प्रश्न उपस्थित झाल्यावाचून राहत नाही.

**पानगाव येथील बोधिसत्व अमिताभ :—**

पानगावच्या देवकोकातील मूर्ती द्विभूज असून अर्धसमपाद अवस्थेत बसलेली आहे. मूर्तीची उंची 34 से.मी. आहे. मस्तकावर उंच असा किरिट मुकूट आहे. त्यावर रत्नअंकित केलेले आहेत. चेहरा मोहक असून धनुष्याकृती भुवया, अर्धोन्मीलीत मत्स्यकृती नेत्र, चाफेकळी नाक, प्रमाणबद्ध देहयी, कानात मकरकुंडल, गळ्यात एकवली आणि यज्ञोपवीत, बाजूबंद, कंकण, मेखला, कटीवस्त्र, तोडे, पैंजण, इत्यादी अलंकार त्याने परिधान केलेले आहेत. डाव्या हातावर उजव्या हाताचा तळहात असून उजव्या हाताच्या बोटाने कमळ धरलेले आहे. बोधिसत्व नेहमीच अलंकारानी मंडीत असतात. *(नी.पु. जोशी, भारतीय मूर्तीशास्त्र, पृ. 54)*

उपरोक्त वर्णन बोधिसत्व अमिताभ या मूर्तिशिल्पाशी अगदी तंतोतंत जुळते. हे वर्णन टी. गोपीनाथराव यांच्या ग्रंथात आहे. (*Benoytosh Bhattacharya, The Indian Buddhist Iconography Calcutta-1958, Page No. 49-50*)

**निष्कर्ष :—**

पानगावच्या विट्ठल मंदिरावरील योगीश्वर विष्णू म्हणून सांगितले जाणारे शिल्प हे विष्णूचे नसून बोधिसत्व अमिताभचे आहे हे सिद्ध होते. मूर्तीशास्त्रासंबंधित ग'थात योगीश्वर विष्णूची जी लक्षणे सांगितलेली आहेत त्यापैकी एकही लक्षण आपणास संबंधित मूर्तीत पहावयास मिळत नाही. मग कोणत्या आधारावर त्यास योगीश्वर विष्णू म्हटले गेले? कोणत्याही मूर्तीची ओळख ही त्याच्या आयुधावरून, वाहनावरून व लांच्छनावरून होत असते. परंतु या मूर्तीत विष्णूचे एकही लक्षण आढळून येत नाही. उलट बोधिसत्व अमिताभाची सर्व लक्षणे इथल्या मूर्तीत आढळून येत असल्याने ही बोधिसत्व अमिताभाचीच मूर्ती आहे हे साधार स्पष्ट होते.

महाराष्ट्रात अशा प्रकारच्या बोधिसत्वाच्या अनेक मूर्ती आहेत, पण त्यांची ओळख दुसऱ्याच नावाने करून दिली जाते. त्यामुळे अशा मूर्त्यांवर संशोधन होऊन त्यांची खरी ओळख होणे काळाची गरज आहे.



पानगांव येथील बोधीसत्व अमिताभ



बोधीसत्व अमिताभ



योगेश्वर विष्णू

# बीड येथील कंकालेश्वर मंदिर–स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ठ नमूना

**डॉ.अनिता शिंदे**
इतिहास विभाग
सौ.के.एस.के.महाविद्यालय, बीड

बीड हे जिल्हाचे ठिकाण असून त्याला प्राचीन वारसा प्राप्त झालेला आहे. बीडची प्राचीन नावे आपणास पाहवायास मिळतात. चंपावती, ब्राह्मणी, अश्मक, बीळ व भोर अशी त्याची प्राचीन नावे पाहवयास मिळतात.[1] बिंदुसारा नदिच्या काठावर वसलेले बीड हे नगर उस्मानाबाद पासून पश्चिमेस 100 किमी अंतरावर आहे. जयवंती नदिच्या पूर्वेस एक किमी अंतरावर कंकालेश्वर शिव मंदिर आहे. कला व स्थापत्यशास्त्राच्या दृष्टिकोणातून मंदिर अत्यंत महत्वपूर्ण आहे. या मंदिराचे प्रथम सर्वेक्षण डॉ.गुलाम याझदानी यांनी केले त्यांनीच या मंदिराला खाक मंदिर (Khanqach Temple ) असे नाव दिले.[2] तलावाच्या मध्यभागी एक मोठ्या आकाराचा कट्टा आहे. त्याच कट्यावर कंकालेश्वर महादेवाचे मंदिर आहे.

दहाव्या ते अकराव्या शतकात चालूक्य राजा विक्रमादित्य (सहावा) यान हे मंदिर बांधले. हे दशावतारी मंदिर आहे. चालूक्य काळातील स्त्रिया लढ़ाईत प्रत्यक्ष भाग घेत असत. मंदिरावर लढणाऱ्या स्त्रियांची शिल्पे आहेत. त्यावर ग्रीक शैलीचा प्रभाव असल्याचे दिसून येते. मंदिराचा आकार स्टार फिश प्रमाणे असून मंदिराच्या मंडपाखाली आणखी एक गर्भगृह आहे. ते पाचशे वर्षापासून बंद आहे कंकालेश्वर मंदिर अनेक वर्ष बंद होते. तिथे खनकाह होते. पुढ़े महाशिवरात्रीच्या जत्रेलाही बंदी घालण्याचा निर्णय निझामाच्या मंत्रिमंडळात पारित झाला. निझामाने या मंदिराचा पुजारी म्हणून शामबुवा पाठक यांची नेमणूक केली ही कोंडी फुटायला 1915 उगवावे लागले. क्रांतिकारी तरुण पुरूषोत्तम गोडसे याने निझामाचा हुकूम मोडला. पोलिसांचे कडे तोडून कंकालेश्वर मंदिरातील शिवपिंडीला अभिषेक केला. हैदराबाद स्वातंत्र्यदिनी म्हणजे 17 सप्टेंबर, 1948 रोजी मंदिर खऱ्या अर्थाने मुक्त झाले. या प्राचीन मंदिराचा उल्लेख पुराणातही आहे. अत्री ऋषी व अनुसया यांनी या ठिकाणी शिधेश्वराचा अभिषेक केला. ब्रह्मा–विष्णू–महेशाला प्रसन्न करुन घेतल्याची दंतकथा सांगितली जाते.[3]

**कंकालेश्वर मंदिराची रचना**

कंकालेश्वर मंदिर तलावाच्या मध्यभागी एक मोठया आकाराच्या 1.52 मीटर उंचीच्या जोत्यावर उभे आहे. एका तलावात जशी नौका असते तसे हे मंदिर दिसते.[4] इतर मंदिराची ज्या प्रमाणे रचना असते त्याच पद्धतीने याही मंदिराची रचना आपणास पहावयास मिळते. मुखमंडप, अर्धमंडप, मंडप अंतराळ व गर्भगृह अशी मंदिराची एकंदरित रचना आहे. पहाताच क्षणी मंदिर नजरेत भरते.

**मंदिराचा पदविन्यासः**

तलावाच्या मधोमध 6 फुट उंच जोत्यावर पूर्णपणे दगडांनी बांधलेले हे मंदिर म्हणजे कंकालेश्वर मंदिर होय. मंदिर पूर्वाभिमूख असून हे महादेवाचे अर्थात् शिवाचे मंदिर आहे. या मंदिराची रचना उमरगा येथील नीलकंठेश्वर महादेव मंदिरासारखीच आहे. या दोन्ही मंदिराच्या बांधकामाचा कालखंड एक सारखाच असावा असे तज्ञांचे म्हणणे आहे.

**मुखमंडपः**

मुखमंडप हा लहान मुखमंडप आहे. त्याच्या छताला चार स्तंभ आहेत. मुखमंडपालगत 24 स्तंभ असून या ठिकाणी दोन दोवकोण्ट आहेत. मंदिराची लांबी पूर्व–पश्चिम 100 फूट व दक्षिण उत्तर रूंदी 100 फुट आहे. मुखमंडपाचे छत सोळा स्तंभावर तोलून धरलेले आहे. मुखमंडपाची दक्षिण–उत्तर लांबी 25 फूट आणि पूर्व–पश्चिम रुंदी दहा फूट आहे. द्वारमंडपाच्या बाहेरील भिंतीवर नक्षीकाम केलेले आहे.

**अर्धमंडपः**

मुखमंडपाच्या दोन्ही बाजूला दोन अर्धमंडप आहेत. दोन्ही अर्धमंडपाचे छत 12 फूट उंच असून ते 12–12 स्तंभावर उभारलेले आहे. उत्तर दिशेच्या अर्धमंडपाच्या पूर्व बाजूला पाच घोड्याच्या रथाचे शिल्प असून त्यावर दोन व्यक्ती आहेत. त्यापैकी एक व्यक्ती रथ चालविण्याचे काम करीत असून दूसरी व्यक्ती मागे पाठलाग करत असलेल्या दोन घोडयाच्या योद्धांशी युद्ध करत असलेले शिल्प आहे. या शिल्पाच्या शेजारीच शिव व गणेश मूर्ती कोरलेल्या दिसून येतात. [5]

**मंडपः**

अर्धमंडपातून गेल्यानंतर मंदिराचा 22×22 चौरस फूट आकाराचा मंडप चोविस खांबावर स्थित असलेला दिसून येतो. मंडप वर्तुळाकार असून मध्यभागी महादेवाचे वाहन नंदि आहे [6] मंडपाचा छत व स्तंभ यावर अतिशय सुंदर व सुबक कलाकुसल केलेली आहे.

**गर्भगृह**

मुख्य गर्भगृह 8.8×10 चौरस फूट आकाराचे आहे. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर पुष्पपट्ट, अर्धस्तंभ, व्याल व भोवऱ्याची नक्षी आढळते. या गर्भगृहात महादेवाची शिवपिंड आढळून येते. दक्षिणेला असलेले गर्भगृह 8.8×10 चौरस फूट आकाराचे आहे. गर्भगृहात विष्णूची मूर्ती आहे. या गर्भ गृहात विष्णूचे दशवतार शिल्प पहावयास मिळते.

उत्तरेचे गर्भगृह 8.8×10 चौरस फूट आकाराचे आहे. गर्भगृहात बह्मदेवाची मूर्ती आहे. तिनही गर्भगृहाच्या ललाबिंबावर गणेश व गजलक्ष्मीचे शिल्प आहे.[7] उपरोक्त तिनही गर्भगृहात ब्रह्मा–विष्णू–महेश यांच्या मूर्ती असून हे त्रिकूट पद्धतीचे मंदिर आहे. उपरोक्त मंदिरास एकूण 75 स्तंभ असून काही स्तंभ कोरीव तर काही स्तंभ फारसे कोरीव नसलेले आहेत. स्तंभावर विविध भौमितिक आकृत्या काढलेल्या आहेत.

**बाह्यभिंत**

मंदिराच्या अलंकरणासाठी बाह्यभिंतीवर विविध देवदेवतांच्या मूर्ती, सुरसुंदरी, शिकारी मनुष्य, प्राणी, लढणारा शिकारी, वादक इत्यादी शिल्पे कोरलेली दिसून येतात. त्याच पद्धतीच शिल्प कंकालेश्वर मंदिरावरही पहावयास मिळतात. मंदिराच्या बाह्यभिंतीवर एकूण 15 देवकोष्ट असून ते कोरीव आहेत. ब्रह्मा, विष्णू, वराह, नृसिंह आणि शिव मूर्ती या देवकोष्टात आहेत. शिवाच्या विविध अवतारातील मूर्ती मंदिराच्या बाह्यांगावर पहावयास मिळतात.[8]

कंकालेश्वर मंदिराच्या बाह्यभिंतीवरील शिल्पाची बऱ्याच प्रमाणात तोडफोड झालेली असली तरी मंदिर आजही कला व स्थापत्याच्या दृष्टीकोणातून महत्वपूर्ण आहे. चालूक्यकालीन मंदिराची सर्व लक्षणे उपरोक्त मंदिराच्या स्थापत्य शैलीत आढळून येतात. ब्रह्मा–विष्णू–मेहश यांचे त्रिकूट पद्धतीचे असणारे हे कंकालेश्वर मंदिर आहे आजही पर्यटनाच्या दृष्टीने कंकालेश्वराचे मंदिर आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरते.

**संदर्भ ग्रंथसूचीः**


1. जयपाल घोगरे, बीड जिल्हातील किल्ले/मंदिरे–एक ऐतिहासिक अभ्यास, पृ.84
2. Dr.gulam yazdani, Annual Report of the Archeological p.27
3. डॉ.अरुणचंद्र पाठक, (संपा.) महाराष्ट्र इतिहास प्राचीनकाळ, पृ.211
4. डॉ.अनिल कठारे व इतर प्राचीन शिव आणि जैन मंदिरे, पृ.54
5. Dr.prabhakar deo-The Temple of Marathwada, op.cit.p.51
6. प्रा.रा.अहिराव भारतीय शिल्पातील प्राणी, पृ.15
7. Dr.gulam yazdani, Annual Report of the Archeological p.37
8. भाग्यश्री काळे–महाराष्ट्राची मंदिर शैली, पृ.83

# अंबानगरीतील हेमांडपंथी मंदिर स्थापत्य व जलव्यवस्थापन

**डॉ. प्रशांत अ. साबळे**
वसंतदादा पाटील महाविद्यालय,
पाटोदा जि. बीड.
मो.नं. 942295167.

प्राचीन भारतीय कलाचे चौसष्ट (64) पुकार सांगितले आहेत. त्यामध्ये शिल्पकला स्थापत्यकला, नृत्यकला आणि चित्रकला या सर्व श्रेष्ठ कला मानल्या जातात. प्राचीन भारतीय मूर्ती कलेने भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये जोपासली. त्यामुळे त्या काळाच्या समाज जीवनाचा आणि संस्कृतीचा आभ्यास करण्यासाठी आपल्या स्थापत्य व शिल्पकलेचा सहज संदर्भ घेता येतो. भारतीय स्थापत्यकला व शिल्पकला ही जगातील सर्वश्रेष्ठ कला आहे. या कलेमध्ये सामाजिक, राजकीय, धार्मीक सांस्कृतिक तसेच तत्कालीन आर्थीक परिस्थितीचे प्रभावी चित्रण आपल्या प्राचीन, मध्ययुगीन शिल्पकलेमध्ये सापडते.

महाराष्ट्रातील मराठवाडा ही भूमी संताची म्हणून ओळखली जाते. या भूमीने संत ज्ञानेश्वरा पासून ते संत नामदेवापर्यंत अनेक संत या देशाला दिले. त्यामुळे साहजिकच आध्यात्मीक व धार्मीक प्रेरणा वाढीस लागल्या त्यामुळे प्राचीन मध्ययुगीन कालखंडातील ही परंपरा पुढे ही चालू राहीली. मराठवाड्यातील बीड जिल्हयातील अंबाजोगाई हे शहर सुद्धा पूर्वीपार संताची व धार्मीक आध्यात्मीक चळवळीचे केंद्र राहीलेले आहे. आद्यकवी मुकुंदराज महाराज पासोडी चे निर्माते संत दासोपंत यांच्या पदस्पर्शाने पावन भूमीमध्ये विशेषता यादव कालखंडामध्ये येथे मोठ्या प्रमाणात मंदिर स्थापत्याची निर्मीती झाली. यादवाचा काळ हा मंदिर स्थापत्याच्या बाबतीत सुवर्णकाळ मानला जातो. मंदिर निर्मीतीची प्रक्रीया सुलभ व्हावी म्हणून हेमाडपंथी मंदिराचा प्रकार या काळात लोकप्रिय झाला होता. अंबानगरीच्या विविध भागात अशी हेमांडपंथी मंदिरे मोठ्या प्रमाणात उभारली गेली. ही मंदिरे उत्कृष्ट मंदिर स्थापत्याचा आविष्कार आहेत. तसेच या मंदिर निर्मीती बरोबरच या परिसरात बारव, घाट, कुंड (पुस्कर्णी) या सारखी जलाशये निर्माण करण्यात आली.

**अंबानगरीचा संस्कृतिक पूर्व इतिहास :**

महाराष्ट्रातील बीड जिल्हातील बालाघाट डोंगरांगेत जयंती नदीच्या काठावर हे प्राचीन शहर वसलेले असून ते निजाम कालीन तालूक्याचे ठिकाण आहे. या शहराला प्राचीन अंबानगरी व जयवंती राजाच्या काळात जयवंती नगर म्हणून ही ओळखले जात होते. हैद्राबाद निजामाच्या कालखंडात या गावाचे नाव बदलून मोमिनाबाद असे ठेवले होते. पुढे या गावाचे नाव येथे अवतरित झालेल्या देवी पार्वतीच्या (अंबाबाई) व तिचे येथेच माहेर आसल्यामुळे (जोगाई) असल्यामुळे असे एकत्रित होऊन झालेले आहे. ही महाराष्ट्रातील व कोकण वाशीयांची कुलदेवता आहे.

मराठी भाषेचा उगम बीड जिल्हातील अंबाजोगाई येथे झाला. याबाबत सर्व भाषातज्ञाचे एकमत आहे. त्यामुळे अंबाजोगाईला मराठी भाषेची जननी म्हणून ओळखले जाते. मराठी भाषेचे आद्यकवी मुकुंदराज यांनी विवेकसिंधु ग्रंथाची रचना याच ठिकाणी केली. त्यामुळे या नगरीला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले. त्यामुळे मुकुंदराज महाराजाची समाधी अंबाजोगाई पासुन 5 की.मी. अंतरावर आहे. या नगराच्या परिसरात एकुण आठ शिलालेख सापडले आहेत. या शिलालेखावरून या नगरीचे प्राचीन व मध्ययुगीन वैभव अधिक ठळक होते. विवेकसिंधूच्या आठराव्या प्रकरणात या स्थळनामाचे वर्णन करताना आद्यकवी मुकुंदराज म्हणतातत. ''या गंगेचिये तिरी। मनोहर अंबानगरी तेथे नगरत्ये श्रीहरी। जगदिश्वेर। अंबाजोगाई चौबारा शिलालेखात लेखात याचा उल्लेख आम्रपुर असा आला आहे.''

अंबाजोगाई चालूक्य, यादवानंतर बहमनी, मुघल, निजाम या सतांनी राज्य केले. निजाम (हैद्राबाद) व इंग्रज यांच्यात तह झाल्यानंतर इथे सैनिकी तळ उभरला गेला. याच काळात 1903 च्या दरम्यान या नगरीचे नाव 'मोमीनाबाद' ठेवले गेले. पुठे महाराष्ट्र राज्य स्थापनंतर पूर्ववत अंबाजोगाई नाव ठेवले गेले.[2]

अंबानगरी खरी कोणी वसवली हे अज्ञात असले तरी सातवाहनांच्या काळात येथे वस्ती असावी असे वाटते. या नगरीला खरे स्वरूप सिंघणदेव यादवाने दिले असावे. कारण यादवकाळातच खोलेश्वरामुळे या नगराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सिंघणदेव यादवच्या काळात खालेश्वर हा सेनापती होता. मुळात तो विदर्भीय असल्यामुळे त्यांने अंबाजोगाईला आपले मुख्य छावणीचे ठिकाण बनविले होते. खोलेश्वर शिवभक्त आणि कलाप्रेमी सेनापती होता. त्याच्या काळात उभारलेल्या मंदिराहून त्याचा प्रत्यय येतो. अंबानगरीच्या परिसरामध्ये खोलेश्वराने अनेक मंदिरे उभारली. त्यामुळे या शहराला प्राचीन मध्ययुगीन कालखंडापासुन संस्कृतीक वारसा लाभलेला आहे. आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये अंबाजोगाईचा वाटा सिंहाचा आहे. स्वतंत्र्यानंतर स्वामीरामांद तिर्थ यांना शिक्षणक्षेत्रात उल्लेखणिय कार्य केले स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात ही हे शहर अनेक चळवळीचे केंद्र होते.

अंबाजोगाईतील मंदिर स्थापत्य आणि त्या अनुषंगाने असणारे जलव्यवस्थापन या विषयावर अनेक संशोधकांनी इतिहासप्रेमींनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये डॉ. ब्रम्हानंद देशपांडे, डॉ. सतिश सोळूंखे, श.न. पोहनेरकर, डॉ. अरूणचंद्र पाठक इ. संशोधकांनी येथील मंदिर स्थापत्य व जलव्यवस्थापनाच्या काही प्रमाणात आढावा घेतला आहे. डॉ. ब्रम्हानंद देशपांडे, डॉ. तळपुळे, डॉ. यू.एम. पठाण यांनी येथील शिलालेखाचा आभ्यास केलेला आहे. तरी पण अंबानगरातील मंदिर स्थापत्य व जलव्यवस्थापन या विषयावर आणखी प्रकाश टाकण्याची गरज आहे कारण परवाच अंबाजोगाईतील काही नागरीकांनी मोठया प्रमाणात स्वच्छता मोहीम हाती घेतली तेंव्हा जमीनी खाली मंदिरे व मूर्तीचा खजिना सापडला आहे. त्यामुळे पून्हा या विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे त्यामुळे संशोधकांनी या विषयावर पून्हा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

1) अंबाजोगाई परिसरातील ऐतिहासिक महत्व जाणून घेणे.
2) अंबाजोगाई शहर परिसरात निर्माण झालेली मंदिर स्थापत्याचा अभ्यास करणे.
3) या परिसरातील मंदिर स्थापत्य रचनेत झालेली स्थित्यंतरे व मुर्तीशिल्पे यांचा आभ्यास करणे.
4) अंबाजोगाई नगरीतील मंदिराच्या उद्‌गम, विकास शैलीचा अभ्यास करणे.
5) तत्कालीन वास्तूशास्त्र व शिल्पशास्त्राच्या प्रगतीचा आढावा घेणे.
6) मंदिर स्थापत्याच्या अनुषंगाने झालेल्या बारव स्थापत्याचा मागवा घेणे.
7) धार्मीक पर्यटनासह मंदिराच्या व मंदिर जलव्यवस्थापनाच्या बाबतीत ऐतिहासिक जाणीव जागृती करून पर्यटनात वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.

**संशोधनांची गृहीतके :**

1) अंबानगरी परिसर म्हणजे मराठवाडयातील बीड जिल्हातील पूर्वेकडील एक निजाम कालीन तालूका होय.
2) प्राचीन कालखंडामध्ये या परिसरात मोठ्या प्रमाणात मंदिर निर्मीती झाली.
3) यादवकालखंडात या परिसरातील मंदिर निर्मितीला राजकीय शक्तीचा पाठींबा होता.
4) अंबानगरीतील मंदिर स्थापत्य हे प्रामुख्याने हेमांडपंथी आहे.
5) अंबाजोगाई परिसरातील बारव स्थापत्य व कुंड इ. जलस्त्रोचाचे जलव्यवस्थापन वैशिष्टये पूर्ण आहे.

**अंबानगरीतील मंदिर स्थापत्य :**

आद्यकवी मुकुंदराज महाराजांची कर्णभूमी म्हणून ओळखली जाणारी अंबानगरीमध्ये अनेक प्राचीन, मध्ययुगीन मंदिरे आहेत. नगरीच्या मध्योमध गगनचुंबी लंबोदराचे देवालय असून संकलेश्वर, योगेश्वरी देवालय, अंम्रतेश्वर मंदिर, केदारेश्वर मंदिर, मणकेश्वर मंदिर हे सर्व मंदिरे हमांडपंथी मंदिरे असून, काही मंदिराजवळ विहिर बारव; व कुंड इ. जलव्यवस्थापन स्त्रोता कदारे जलव्यवस्थापन केलेले आहे. या अनेक मंदिराजवळ शिलालेख आहेत, थोरल्या देवघरामध्ये दासोपंताची पासोडी पाहवयास मिळते.

**योगेश्वरी मंदिर स्थापत्य :**

अंबेजोगाई शहराच्या मधून वाहणाऱ्या जयंती नदीच्या पश्चिम तिरावर योगेश्वरी देवीचे पुराणप्रसिद्ध मंदिर आहे. मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी स्वरूपाचे आहे. या देवीला जोगेश्वरी म्हणून ही ओळखले जाते. या देवाचे मंदिर जरी हेमाडपंथी शैलीतल्या बांधकामाचे असले तरी या बांधकामाची खास वैशिष्टये दिसून येतात. या मंदिराचे शिखर इतर मंदिराच्या शिखराहून वेगळे आहे. हे शिखर पाच मजली असून त्याची उंची सत्तर फुट आहे.[3] पहिल्या मजल्यावरील चारी बाजूच्या देवळयातून रामायण – महाभारततातील निवडक प्रसंगाच्या शिल्पाकृती असून दुसऱ्या मजल्यावरील देवळयातून श्री योगेश्वरी देवीच्या द्वादश अवताराच्या शिल्पाकृती प्रतिष्ठित केलेल्या आहेत. यातीलच एक शिल्पाकृती मातृस्वरूप योगिनी गणेशाची आहे. अशा स्वरूपातील मातृस्वरूप गणेश दुसरीकडे कुठे ही आढळत नाही. तिसऱ्या मजल्यावर दशावताराची शिल्पचित्रे आहेत, चौथ्या मजल्यावर नवग्रह आहेतत्र आणि पाचव्या मजल्यावर सप्तर्षी विराजमान आहेत. अशा तऱ्हेने वैशिष्टयेपूर्ण शिल्पाकृतीनी नटलेले हे अप्रतिम कलात्मक मंदिर शिखर आहे.[4]

योगेश्वरी मंदिर हे नगरातील प्राचीन स्थळ वाटते. महामंडलेश्वर उदयादित्य (शके 1066) च्या भूचरनाथ (शके 1066) च्या भूचरनाथ (हत्तीखाना) शिलालेखात अंबेचा दिप व योजीनादेवी असा उल्लेख आहे. तो योगेश्वरी बद्दलच असावा. नंतर यादवकाळात खालेश्वराने या मंदिरास दान दिल्याचा शिलालेख आहे. याचाच अर्थ हे मध्ययुगाच्या कालखंडा पूर्वीचे मंदिर असावे साधारणता दुसऱ्या ते तिसऱ्या शतकापासून या सीळाला तीर्थक्षेत्र म्हणून नाव लौकीक मिळाला असावा मंदिराचा गाभारा 3.05 × 3.04 मीटर आसून त्यात योगेश्वरीचा अतयंत आकर्षक मुखवटा आहे. योगेश्वरी देवीचे दर्शन घेऊन आपण उजवीकडे वळताच आपणाला महाकली, कुलस्वामीनी, तुळजभ्वानीच्या मूर्तीचे दर्शन घडते सभामंडपातील गणपती केशवराज आणि देवीची भोगमूर्ती इत्यादीना वंदन करीत मंदिराच्या उत्तर द्वारातुन बाहेर येताच समोरएक यक्षकुंड दृष्टीस पडते. या यज्ञकुंडावर मजबूत भव्य मंडप आहे.[5]

मंदिरासमोरच्या उत्तराभिमुख महाद्वारातून बाहेर पडताच समोर दीपमाळ उभी असून नवरात्रामध्ये ही दिपमाळ प्रज्वंलीत केली जाते. या दीपमाळेची उभारणी अत्यंत सुबक असून आज ही ती सुस्थित आहे. या दीपमाळेच्या पलीकडे 'सर्वेश्वरतीर्थ' तथा सर्वतीर्थ म्हणून ओळखली जाणारी बारव आहे ती अत्यंत अकर्षक बांधलेली असुन खाली उतरण्यासाठी उत्तम पायऱ्या तयार करण्यात आलेल्या आहेत. हे तीर्थ देवीच्या स्नानविधीचे तीर्थ म्हणून ओळखले जाते. तीर्थाचे पश्चिम बाजूस सर्वेश्वर, रूद्रभैरव व महारूद्र यांची छोटी छोटी मंदिरे आहेत.

तटबंदीच्या पश्चिमद्वारातून बाहेर पडले की जवळच 'मायामोचन' तीर्थ दृष्टीस पडते. यातार्था मध्ये बारामाही पाणि आसते पण सध्या भाविकांची कचरा टाकून त्यांची दुरावस्था केलेली आहे. या तीर्थाजवळच कालभैरव, अग्निभैरव, गणेश आणि नारदेश्वर यांची लहान लहान मंदिरे आहेत. यातील एका मंदिराच्या भिंतीवर एक शिलालेख होता, तो आता त्या ठिकाणी दिसत नाही. पूर्वी भाविक या बारवेचा उपयोग स्नानसाठी आणि पाणी पिण्यासाठी पण करत असत मंदिरा लगत जलव्यवस्थापनाचे हे दोन्ही तिर्थ उत्तम

उदाहरण आहेत. अशाच प्रकारची अनेक बारवा अंबाजोगाईच्या विविध भागात मंदिरालगत यादव कालखंडात बांधण्यात आलेल्या आहेत.

**2) अंबानगरीतील प्रसिद्ध खोलेश्वर मंदिर :**

अंबानगरीच्या मंदिर स्थापत्यामध्येभर टाकणारे प्रसिद्ध मंदिर म्हणजे खोलेश्वर मंदिर होय. यामंदिराचे बांधकाम मंदिरावर असलेल्या शिलालेखा वरून शके. 1162 (इ.स. 1240) मध्ये झाले आहे. व ते खोलेश्वराने बांधलेले नसून त्यांची मूलगी लक्ष्मी तिचा भाऊ राम हा लढाईत मारलागेला होता. त्यांच्या स्मृती पित्यार्थ हे मंदिर उभारले गेले आहे.[6] पण अंबानगरीतील खोलेश्वराच्या प्रभावामुळे या हे नाव पडले असावे. प्रत्यक्षात ते शिवमंदिर आहे. हे शिवमंदिर एका चबुतऱ्यावर उभे असून मंदिराचे प्रवेशद्वार म्हणजे सुंदर नक्षीकाम केलेला दगडी मंडप होय. शैलीच्या दृष्टीने हे मंदिर तेराव्या शतकाचे प्रतिनिधीत्व करते. हे मंदिर लहान असले तरी वास्तूशिल्पाच्या दृष्टीने प्रेक्षणीय आहे. त्यांच्या भिंती, स्तंभ, आणि छत व त्यावरील कोरीव शिल्प सौंदर्याने नटलेले आहे. या मंदिर स्थापत्यावर चालूक्य स्थापत्य शैलीचा प्रभाव आहे. खोलेश्वर मंदिरातील स्तंभ आकर्षक व कलापूर्ण असून बेलूर (कर्नाटक) च्या विख्यात छननेश्वर मंदितील स्तंभाच्या शैलीशी जुळतात. खोलेश्वर मंदिराची रचना पारंपारिक पद्धतीची आहे. मांडवण, घोटण आणि नागणच्या सुर मंदिराच्या रचना व स्थापत्याशी त्यांची तूलना केली जाऊ शकते.[7]

**3) बाराखांबी मंदिर (संकलेश्वर मंदिर)**

अंबानगरीच्या परिसरातील एक कलात्मक व खास आपल्या रूपगर्विताच्या शिल्पामुळे प्रसिद्ध असणारे संकलेश्वर मंदिर, यालाच स्थानिक लोक बाराखांबी म्हणतात. मंदिर स्थापत्यकलेच्या दृष्टाने वैशिष्टयेपूर्ण असणारे हे संकलेश्वर (बाराखांबी) मंदिर सिंघनदेव यादवाचा सेनापती खोलेश्वराने शके संवत 1150 मध्ये इ.स. 1228–29 मध्ये उभारले आहे. हे या मंदिराच्या शिलालेखाहून स्पष्ट होते.[8] आपल्या वैशिष्टांनी नटलेले हे अप्रतिम शिल्पालय कर्नाटकातील ऐहोळ मंदिराच्या स्थापत्य कलेशी साधर्म्यता दाखविणारे आहे. आज या मंदिराचा बराच भाग उद्ध्वस्त झाला, असून यादव काळातील हे एक अप्रतिम मंदिर होते. यात शंका नाही. हे मंदिर बारा स्तंभावर उभारलेले आसून प्रत्येक खांबावरील शिल्पे लावण्यवंती, सुरसुंदरी व या क्षणी यादवांच्या सौंदर्यदृष्टीची साक्ष देतात. या या क्षणीची वैशिष्टये, असे की ही प्रत्येक लावण्यवती वेगवेगळे भाव घेवून आपल्याशी संवाद साधते आहे असे वाटते. या मंदिराचा शिलालेख देखील मंदिरा इतकाच वैशिष्टये पूर्ण असून एकूण 47 ओळीचा हा शिलालेख आहे. यातून खोलेश्वराच्या प्राक्रामाची माहिती मिळते.[9]

**4) अमलेश्वर मंदिर :**

अंबानगरीच्या ईशान्य दिशेला चणेभरड तळयाजवळ मांडवा रोडने गेले असता, थोडे दुरवर प्रेक्षणीय असे अम्लेश्वराचे मंदिर विविध वैशिष्टयांनी नटलेले आहे. अंबानगरीच्या यादवकालीन वैभवाचे जणू ते प्रतिकच आहे. या मंदिराच्या स्तंभावर मानवी देवदेवताची शिल्पे आहेत. मंदिराच्या मजबूत प्रवेशद्वारातच शिवलिंग, सुर्य आणि चंद्राची चिन्हे असणारा सतीस्तंभ दिसतो. मंदिराचा प्रत्येक स्तंभ सुंदर पणे कोरलेला आहे. वामन अवतार, विभिन्न भावमुद्रेतील सुरसुंदरी, केशरचनेचे प्रकार, भारतीय वाद्य झांज, ढोलक यांच्यासह विविध शस्त्रास्त्रे ची शिलपे कोरलेली आहेत. मुळ गर्भग्रहात जाण्यापूर्वी लागणारे सभामंडप कलात्मक असून, त्यातून गाभाऱ्यात गेले की शिवलिंगाचे दर्शन होते. असलीकडेच या मंदिराचा जिर्णोद्धार स्थानिक लोकांनी वर्गणी करून केलेला आहे. मंदिरांच्या मागील बाजूस खडकात कोरलेले एक तीर्थकुंड असून यातीर्थाचे वैशिष्टये म्हणजे तीर्थांच्या पायऱ्याच्या डाव्या बाजूस बेलाचे पान टाकले तर ते बुडते, आणि उजव्याबाजूस मात्र ते तरंगत राहते. या कुंतीर्थकुंडात बारामहीने पाणी असते. भाविकासाठी मंदिर निर्माण करत्यांनी यादवांनी जलव्यवस्थापनाची ही सोय केलेली आहे.[10]

**5) अंबानगरीतील इतर काही जुनी मंदिरे :**

अंबानगरीमध्ये आणखी काही जुनी यादवकालीन हेमांडपंथी मंदिरे अत्यंत उत्कृष्ट स्थापत्य कलेचा नमुना म्हणून ओळखली जातात. त्या पैकी एक सुंदर मंदिर म्हणजे चतुष्पुष्प यावरील श्री गणेश मंदिर होय, चौबारा गणेश मंदिर असे या स्थानाला म्हणतात. स्थापत्य कलेचा उत्कृष्ट निमूना होय. हे मंदिर तसेच दासोपंताचे समाधी जवळ असलेले नृसिंह मंदिर हे पण हे मांडपथीच असून त्यावरील कोरीवकाम लक्षणीय आहे. हे मंदिर उत्तराभिमुख असून मंदिराच्या भोवती तट पडका असून दिपमाळ ही भंगून गेली आहे. या मंदिराची रचना एखादया गुहे सारखी आहे. गाभाऱ्यात नृसिंह मूर्तीशिवाय आजखी काही सुंदर मुर्ती आहेत. अंबानगरीतील योगेश्वरी मंदिराच्या वायव्येला केवळ अर्धा किलोमीटर अंतरावर इ.स. 9096 मध्ये जमिनीत खोदण्यात आलेले मंदिर आहेत. त्यांच्या हत्तीखाना लेणी किंवा शिवलेणी गुहा म्हटलं जाते. या लेणी अर्धवट आहेत.[11]

**निष्कर्ष :**

या संशोधना अंती काही निष्कर्ष संशोधकांने काढलेले असून ते निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) अंबानगरीतील बहुसंख्य मंदिरे ही यादव कालखंडातील हेमांडपंथीय मंदिरे असून ती वैशिष्ट्ये पूर्ण आहेत.
2) अंबानगरीतील ही सर्वच मंदिरे विटा व चुन्याचा वापर न पाषाणावर पाषण (शिळा) रचुन उभारलेली आहेत.
3) या नगरातील मंदिर स्थापत्यावर चालूक्य कालीन स्थापत्य कलेचा प्रभाव दिसून येतो.
4) यादवकालीन मंदिर स्थापत्यातील रचना अत्यंत कौशल्यपूर्ण आखीव रेखीव आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने स्तंभ, शिळा, तुळा हया अत्यंत वैशिष्टये पूर्ण आहेत.
5) यादव कालीन सर्वच मंदिरातील शिल्प स्थापत्य अत्यंत वैशिष्टये पूर्ण आहेत. द्वारपाल, यक्षणी, वाघ, देवदेवताची शिल्पे अत्यंत बोलकी आहेत.
6) अंबानगरीतील योगेश्वरी मंदिराचे शिखर हे पाचमजली असून गोल घुमट आकार आहे. या पाच ही मजल्यावर देवदेवताची शिल्पे कोरलेली आहेत.
7) बहुतांशी मंदिराच्या जवळ नगरामध्ये विहीर बारव, कुंड इत्यादी जलस्त्रोताची उभारणी केलेली ही यादवकालीन जलव्यवस्थापनाची उत्तम उदाहरणे आहेत.
8) अंबानगरीतील मंदिराचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे जवळ जवळ प्रत्येक मंदिरावर मंदिराच्या जवळ शिलालेख आहे. या शिलालेखामुळे अंबानगरीचा यादवकालीन इतिहास समाजण्यास सुलभ होते.

**समारोप :**

अंबाजोगाई नगर परिसरामध्ये प्राचीन व मध्ययुगीन विषेशतः यादव कालखंडामध्ये मोठया प्रमाणात मंदिरांची निर्मीती झाली. या पैकी काही मंदिरे सुस्थितीत आहेत. योगेश्वरी मंदिराला पर्यटनाचा दर्जा ही प्राप्त झाला आहे. भाविक ही मोठया प्रमाणात येथे येतात, पण शिवमंदिरे, गणपतीची मंदिरे, समधी स्थळे, यांच्याकडे मात्र दुर्लक्ष झालेले आहे. काही मंदिराची मोठया प्रमाणात पडझाड झालेली असून त्यांच्या दुरूस्तीसाठी आणि पूर्ननिर्मीतीची आवश्यकता आहे. त्यासाठी सामाजिक संस्था पूरातत्वविभाग आणि शासनाने ही लक्ष घालणे आवश्यक आहे. मंदिरा बरोबरच त्या अनुषंगाने असणाऱ्या जलव्यवस्थापनाच्या सोयी, बारवा कुंड इ. कालौओंघात नष्ट होत चालल्या आहेत. आंबानगरीमध्ये मंदिराच्या संख्ये बरोबरच बारवाची संख्या ही मोठी आहे. पण आज त्या मृत अवस्थेत आहेत. लोक त्याचा वापर कचरा टाकण्यासाठी करत आहेत. याकडे ही नगर पालिका व समाजाने डोळसपणे पाहण्याची गरज आहे. या विहीरी सुद्धा शहराचा पाण्याचा प्रश्न काही अंशी सोडवू शकतात. अंबाजोगाई परिसर जसाशिल्प सौदर्यासाठी व मंदिर स्थापत्यकलेसाठी

प्रसिद्ध आहे. तसाच तो धार्मिक श्रद्धेसाठी ही सर्वच्युत आहे. हाज ही शिक्षणक्षेत्राच्या बाबतीत अंबाजोगाई नगरीचा नाव लौकिक आहे.

अशाच सांस्कृतिक स्त्रोतामुळे अंबानगराची वैभवशाली दैदीप्यमान संस्कृती भाविकांना पर्यटकांना अकर्षित करते. पण अनेक मंदिराच्या भवती नगरीच्या परिसरात अनेक बेवार, एकाकी पडलेली शिल्पे पाहून मन हेलावून जाते अशा शिल्पाचे जतन करणे व त्यांना सुरक्षित करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**

1) हं.धि. सांडकलिया, व म.श्री. माटे, (संपा.) महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ मुंबई – 1976.

2) डॉ. सतिश सोळूंखे, बीड जिल्हाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, बीड जिल्हा इतिहास परिषद, बीड 2011.

3) डॉ. ब्रम्हानंद देशपांडे, शोध मुद्रा खंड – 1 प्रकाशक के.एस. अतकरे कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद– 1994.

4) डॉ. राजेश करपे, मराठवाडयाचा इतिहास, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद 15 जुलै 2016.

5) मुकुंद हरीपंत पुजारी (प्रकाशक) श्री. क्षेत्र अंबाजोगाई जुन – 2011.

6) डॉ. अरूणचंद्र पाठक, बारव स्थापत्य; (प्रका.) सुं.ग. जोशी मराठवाडा संशोधन मंडळ लातूर – 2011.

7) डॉ. हरिहर मातेकर, श्री. योगेश्वरी माहात्म, प्रका. श्री. योगेश्वरी देवस्थान अंबाजोगाई – 2003.

8) डॉ. ब्रम्हानंद देशपांडे, शोधमुद्रा खंड 4, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद.

9) डॉ. श.गो. तळपुळे, प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापिठ पुणे – 1963.

10) मों.ग. दिक्षित महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख, भारतइतिहास संशोध मंडळ, पुणे 1947.

11) डॉ. ब्रम्हानंद देशपांडे, शोधमुद्रा खंड 1 दुसरी आवृत्ती कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद 1996.

12) श.न. पोहनेरकर, वैजेनाथ ज्योतिर्लिंग महात्म, वेजेनाथ देवस्थान विश्वस्त कमिटी परळी.

# शेडवई येथील विष्णुमूर्ती

**DR. Jyoti Pethakar,**
**Asst. Professor, in History Department,**
**LokneteGopinathajiMunde Arts, Comms & Science College,**
**Mandangad ,district- Ratnagiri. 415203.**
**Mb.-9011035099, Email ID- jyotipethakar@gmail.com**

कोकण प्रदेशाला समृद्ध निसर्गाबरोबरच समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. अनेक लेणी, किल्ले, मंदिरे, मशिदी, बंदरे, शहरे यासारख्या वास्तू व पुरातत्वीय अवशेष कोकणच्या प्रागैतिहासिक काळापासून समकालीन इतिहासाची साक्ष देत आहेत. दक्षिण कोकणमधील रत्नागिरी जिल्हा यास अपवाद नाही. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सुद्धा प्रागैतिहासिक काळापासून मानवाच्या इतिहासाचे पुरावे लाभलेले आहेत. रत्नागिरी जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये या जिल्ह्यातील मंदिरे व मूर्ती यांची भूमिका महत्वाची आहे. येथील लोकपरंपरा, सण, जत्रा, उत्सव, कुलाचार, कुलधर्म हे येथील मंदिर व मुर्तीकेंद्रित आहेत.

मंडणगड हा रत्नागिरी जिल्ह्यातील नऊ तालुक्यांपैकी एक तालुका आहे. मंडणगड तालुक्यातील शेडवई हे ठिकाण मंडणगड व दापोली तालुक्याच्या सीमेवर साधारण ४०० लोकसंख्या असलेले छोटे गाव आहे. त्या ठिकाणी स्थानिक लोकांचे श्रद्धास्थान असलेले एक मंदिर आहे. या मंदिरातील मूर्तीस स्थानिक लोक केसरनाथ या नावाने संबोधतात.


**उद्देश** :- १ शेडवई येथील मूर्तीची ओळख पटविणे हा या लेखाचा उद्देश आहे.

२ केसरनाथमूर्तीच्या प्रभावळी वरील व पायाशी असणारया मूर्तीची ओळखपटविणे.


**संशोधनाची पद्धती** :- १ प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधिकेने निवेदनात्मक विश्लेषण पद्धतीचा अवलंब केला आहे. २ हे संशोधन करताना प्रत्यक्ष भेट व अनौपचारीक गप्पा यांचा माहिती मिळविण्यासाठी उपयोग केला आहे. ३ प्राथमिक व दुय्यम संदर्भ साहित्य व छायाचित्रे, लोककथा यांचा उपयोग संशोधन साहित्य म्हणून केला आहे.

**कीवर्ड्स:-**शेड्वई, केसरनाथ, विभव अवतार, केशव, दशावतार, लक्ष्मी, गरुड, शिवमंदिर, शिलाहार.


**शेडवई गावाचे भौगोलिक स्थान:** मंडणगड पासून २१ किलोमीटर अंतरावर शेडवई हे गाव आहे. मंडणगड वरून दापोलीला जाणारया रस्त्यावर १३ किलोमीटर अंतरावर दहागाव हे छोटे गाव आहेया ठिकाणी उजवीकडे जाणारा कच्चा रस्ता आहे. या रस्त्याने ८ किलोमीटर अंतरावर ओक बाग जवळ बारीस्कर वाडीमध्ये हे शेडवईचे केसरनाथ मंदिर आहे




रत्नागिरी जिल्हा नकाशा



मंडणगड तालुका नकाशा



अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी हे कोकणी पद्धतीचे छोटेसे कौलारू जोड मंदिर आहे. त्यापैकी मुख्य मंदिर केसरनाथाचे व शेजारचे मंदिर महादेवाचे आहे. या मंदिराच्या डाव्या बाजूला टेकाडावर अगदी छोटे मंदिर, ज्यास स्थानिक लोक बुवाचा मठ म्हणतात ते आहे.मूर्ती आणताना बरोबर जे प्रमुख व्यक्ती होते, त्यांना स्थानिक लोक बुवा म्हणून संबोधतात. मंदिरा शेजारी डोंगरातून येत असणारा वाहता झरा व गर्द झाडी आहेत. मुख्य मंदिर केसरनाथ या देवाचे आहे. या मूर्तीजवळ शेंदरी रंगातील गणेशाची मूर्ती आहे.

केसरनाथ मूर्ती चमकदार काळ्या रंगातील ग्रॅनाईटची असून ती ४२ इंच (साढे तीन फुट) उंच, २४ इंच (दोन फुट) रुंद आहे. मूर्तीच्या प्रभावळीचा परीघ ४७ इंचआहे. मुख्य मूर्ती हि चतुर्भुज पुरुष मूर्ती आहे. या मूर्तीच्या उजव्या खालच्या हातात पद्म(कमळ), उजव्या वरच्या हातात शंख, डाव्या वरच्या हातामध्ये चक्र व डाव्या खालच्या हातामध्ये गदा हि आयुधे आहेत. मूर्तीशास्त्राप्रमाणे गदा, चक्र व शंख हि विष्णूची आयुधे मानली जातात.१

विष्णूच्या हातामध्ये शंख, चक्र, गदा या आयुधांबरोबर पद्म (कमळ) असल्याचा उल्लेख महाभारत या महाकाव्यात, मत्स्य पुराण, लिंग पुराण, पद्म पुराणातील सृष्टिखंड, भूमीखंड, पातालखंड, उत्तरखंड यामध्ये व अग्निपुराण यामध्ये एकूण ३७ वेळा आला आहे.२इसवी सन चौथ्या शतकाच्या शेवटापर्यंत साहित्यिक अथवा कलाकृतीच्या पुराव्यांप्रमाणे पद्म हे विष्णूच्या आयुधाच्या रुपात प्रचलित नव्हते. परंतु इसवी सनाच्या दहाव्या, बाराव्या शतकापर्यंत विष्णूच्या हातात शंख, चक्र, गदा या आयुधांबरोबर पद्म (कमळ) असल्याची कल्पना लोकप्रिय झाली होती.३ बृहत्संहिता या ग्रंथामध्ये दोन, चार, अष्टभुजा असलेल्या विष्णू प्रतिमेचा उल्लेख मिळतो. भारतामध्ये मात्र चतुर्भुज विष्णुमूर्ती प्रामुख्याने आढळतात. विष्णुच्या चार हातामध्ये शंख, चक्र, गदा व पद्म हि आयुधे दाखवली गेली.४ विष्णू मूर्तीस अर्ध वस्त्रांकित-कासोटा घातलेले पितांबर, खांद्यावर पांघरलेले उत्तरीय,

कटिसूत्र(कमरेला बांधलेली रुंद पट्टी)/ नेत्रसुत्र व यज्ञोपवीत परिधान केलेले दाखवतात.५ आयुध धारण करण्याच्या क्रमाप्रमाणे विष्णू या देवतेचे २४ अवतार कल्पून २४ प्रकारच्या मूर्तींची निर्मिती करण्यात आली. आयुध धारण करण्याचा क्रम उजवा खालचा हात, उजवा वरचा हात, डावा वरचा हात व डावा खालचा हात या क्रमाने निश्चित करतात.६या चोवीस अवतारांना विष्णूचे २४ विभव अवतार असे म्हणतात. विष्णूच्या चोवीस विभवअवताराची कल्पना गुप्तयुगामध्ये करण्यात आली.७या चोवीस विभव अवतारातील "केशव" या विभव अवताराचे वर्णन "ओम रूप:केशव: पदमशङ्खचक्र गदाधर:" असे केले जाते.८ केशवया विभव अवतारामध्ये दक्षिणवाहु पद्म, वामवाहु गदा, दक्षिण प्रवाहु शंख,वाम प्रवाहु चक्रहा आयुध क्रम व कीर्ती ही शक्ती आहे.९

रुपमंडन या संस्कृत ग्रंथामध्ये "केशव: कमलं कम्बुं धत्ते चक्रगदामपि" असा उल्लेख आहे.१० अग्नी पुराण, पद्म पुराण, रुपमंडन या ग्रंथामध्ये प (पद्म), शं (शंख), च (चक्र), ग (गदा) या क्रमाने आयुधे असणारी मूर्ती विभव अवतारातील केशव अवताराची आहे असा उल्लेख आढळतो.११विष्णूस प्रामुख्याने कौशेय पितांबर परिधान केलेले दाखवितात. ते कधी गुडघ्या पर्यंत तर कधी पायाच्या थोडे वर नेसलेले असते.१२विष्णूचा उजवा हात नेहमी खुला दाखवितात.पण त्यावर कोणतेही पवित्र चिन्ह दाखवत नाहीत.१३शेडवई येथील या मुख्य मूर्तीचा पद्म घेतलेला हात असा खुला दाखविला आहे. पद्म फक्त उजव्या हाताच्या अंगठा व शेजारील बोटाच्या फटीमध्ये पकडलेलेदिसते. शेडवई येथील या मूर्तीस कुंडल, बाजूबंद, कंकण, यज्ञोपवीत व नेत्रसूत्र (कमरेचे वस्त्र स्थिर राहण्यासाठी कमरेला बांधलेली अलंकृत दोरी) घातलेले दाखविले आहे.


लंबगोलाकार प्रभामंड

मुख्य मूर्तीच्या पाठीमागे लंबगोलाकार प्रभामंडळ आहे. या प्रभामंडळामुळे कोरीव द्वारशिल्प व मूर्ती एकदम पाहिल्याची अनुभूती मिळते. प्रभामंडळाच्या शिरोभागी मधोमध कीर्तिमुख आहे.कीर्तिमुख हे संहाराचे प्रतिक मानले जाते. पूर्ण सिंह प्रतिमा कोरण्या ऐवजी सिंह मुख म्हणजेच कीर्तिमुख कोरण्याची सुरवात गुप्तकाळापासून सुरु झाली. प्रभामंडळावर उजवीकडून डावीकडे ब्रह्मा ,विष्णूचे दशावतार व शिव अशा क्रमाने मूर्ती कोरलेल्या आहेत. ब्रह्मा यास वेदांचा स्त्रोत, यज्ञ पुरोहित मानले गेले. ब्रह्माच्या हातामध्ये यज्ञपात्र, पोथी, माळ व कमंडलु दाखवितात.१४

मत्स्य पुराणामध्ये ब्रह्मा ब्रह्मा हंस वाहन अथवा पद्यासन रुपात असून त्याच्या हातात श्रुवा व श्रुक (यज्ञीय पात्र)असल्याचा उल्लेख आहे.मुख्य मूर्तीच्या शंख घेतलेल्या उजव्या हातापाठीमागे प्रभामंडळावर सृक म्हणजेच यज्ञ पळी हातात घेतलेला ब्रह्मा आहे.१५

ब्रम्हा मूर्तीच्या वर पृथ्वीला वाचवत असलेला नृवराह, परशु हातात घेतलेला परशुराम, मत्स्य, छत्री घेतलेला वामन, बुद्ध, घोड्यावर बसलेला कल्की, नांगर धारी बलराम, धनुष्यधारी दाशरथ राम, हिरण्यकशपूचे पोट फाडणारा शंख व चक्र आयुध असणारा नरसिंह असे दशावतार व मुख्य मूर्तीच्या वरच्या डाव्या चक्र घेतलेल्या हाता पाठीमागे त्रिशूळ व नाग हातामध्ये असलेला द्विभुज शिव मूर्ती

कोरलेली आहे.अग्निपुराण या पुराण ग्रंथामध्ये विष्णूचे दहा अवतार सांगितले असून ते पुढीलप्रमाणे आहेत. मत्स्य, कूर्म/कच्छ (कासव), वराह (नृवराह), नरसिंह, वामन, परशुराम, राम, बलराम, बुद्ध व कल्की हे होत.**१६**गुप्त काळापासून पुढे वराह अवतार हा यज्ञवराह किंवा पशुरूप व नृवराह म्हणजे वराह व मनुष्य यांचे मिश्र रूप या दोन रूपांमध्ये पुजण्यास सुरवात झाली.**१७**काही बुद्ध प्रतिमा ध्यानमुद्रा म्हणजे पायांची मांडी घातलेली, दोन्ही हात नाभीजवळ व हाताचे तळवे एकमेकावर ठेवलेले अशा दाखवितात.**१८**बलराम याच्या हातामध्ये मुसळ व नांगर हे आयुध दाखवितात.१९

अंधकासुर-वध कथेमध्ये शिव सर्प व त्रिशूल घेऊन अंधकाचा वध करण्यासाठी निघाले असा उल्लेख आहे. चंद्रशेखर मूर्ती कथेमध्ये शंकराने ऋषींनी उत्पन्न केलेल्या परशु, कृष्ण मृग व सर्प यांना आपले लीला लक्षण बनविले.**२०** परशु-त्रिशूल शंकराच्या अनेक आयुधांपैकी एक आयुध दाखविला जातो. **२१** गुप्त काळामध्ये विशेषतः राजस्थानी कलाकारांनी शिव आयुधांमध्ये नाग (साप) व त्रिशूल दाखविण्यास सुरवात केली.**२२** नाग पुरुष तत्व चे प्रतिक आहे. त्यास शिवाच्या प्रमुख आयुध रुपात दाखवितात. **२३**

मुख्य मूर्तीच्या पायाशी उजवीकडे दोन पुरुष मूर्ती आहेत.गुप्त काळामध्ये मुर्तीकलेमध्ये गरुड प्रामुख्याने मनुष्य रुपामध्ये दाखविला आहे. विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे मानव रुपात कोरलेल्या गरुडाचे नाक टोकदार असले पाहिजे. गरुड एकटा असेल तर त्याचे दोन्ही हात अंजली मुद्रेत असले पाहिजेत. **२४**अपराजित पृच्छा नुसार विष्णू शिवाय अन्य कोणत्याही देवते समोर गरुडाची मूर्ती दाखवू नये. गरुड मूर्ती विष्णूच्या वाहन, पक्षी, मानव, पक्षी-मानव मिश्र स्वरूपात दाखविलेल्या पहायला मिळतात. द्विभुज गरुड मूर्तीमध्ये गरुड मानव स्वरूपामध्ये अंजली मुद्रेमध्ये चित्रित केले आहेत.**२५** हि लक्षणे आपल्याला या मुख्य मूर्तीच्या पायाशी उजवीकडे असलेल्या मोठ्या पुरुष मूर्तीत पहायला मिळतात. मोठी पुरुष मूर्ती अंजली मुद्रेतील (दोन्ही हात जोडलेला) गरुडाची मानव रुपी मूर्ती आहे. छोटी पुरुष मूर्ती सेवकाची असावी. मुख्य मूर्तीच्या पायाशी डावीकडे दोन स्त्री मूर्ती आहेत.कोशंबी येथील शुंग कालीन लक्ष्मी मूर्तीमध्ये तिचा डावा हात अभयमुद्रेमध्ये व उजवा हात कट्यावलंबी आहे. लक्ष्मी धृतपंकजा म्हणजे लांब देठ असलेले कमळ हातामध्ये धरलेली असते.**२६** लक्ष्मीच्या हातामध्ये पद्म (कमळ) असते.**२७**यावरून हि डावीकडील मोठी स्त्री मूर्ती कट्यावलंबी, हातात कमल घेतलेली पाठीमागे प्रभावळ असलेली त्रिभंग अवस्थेतील श्री देवी किंवा लक्ष्मी आहे.लक्ष्मी शेजारी छोटी स्त्री मूर्ती सेविका असावी.

मूर्ती धुतल्यानंतर किंवा कोकणामध्ये कौल लावल्यानंतर (एखादे काम यशस्वी करण्यासाठी त्या कामाची सुरवात करावी का याची परवानगी घेण्यासाठी तसेच कोणी जादूटोणा केला आहे का व केला असेल तर संबंधित संशयितांचीनावे घेऊन मूर्तीवर फुल ठेवणे व पाणी सोडणे)ते पाणी वाहून जाण्याची सोय मूर्तीच्या पायथ्याशी केली आहे.



शिव मंदि

विष्णू मंदिराशेजारी असलेल्या फक्त वर छप्पर असलेल्या शिव मंदिरात जमिनीमध्ये एक मध्यम आकाराचा चौकोनी खड्डा आहे.या मध्ये नंदी व शिव पिंड आहे. नंदी एका चीरयावर ठेवलेला असून त्या खड्ड्यामध्ये उतरण्यासाठी एका बाजूने २ पायरया आहेत. जूनमध्ये पाऊस पडण्यास उशीर झाला तर ग्रामस्थ त्या गाभारयात हंडयाने पाणी ओततात. जर पाऊस लवकर येणार असेल तर गाभारा लगेच पाण्याने भरतो व पाऊस

लवकर पडणार नसेल तर कितीहीपाणी ओतले तरी गाभारा भारत नाही अशी ग्रामस्थांची श्रद्धा आहे.

आठशे वर्षापूर्वी हि मूर्ती दुसरीकडे, स्थानिक लोकांच्या म्हणण्या प्रमाणे आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या माटवण गावी नेत असताना मूर्ती नेणारे लोक ओढ्याजवळ पाणी पिण्यासाठी व आराम करण्यासाठी थांबले. दुसरया दिवशी परत निघताना मूर्ती उचलली गेली नाही म्हणून मूर्ती तिथेच ठेवण्यात आली. ग्रामस्थांनी मूर्तीस पाऊस लागू नये म्हणून छोटे मंदिर बांधले. वर्षातून एकदा दिवाळी नंतर कार्तिक एकादशी दिवशी या ठिकाणी उत्सव होतो. हा उत्सव जवळच्याच माटवण गावच्या मनुभाई मेहता यांनी ग्रामस्थांच्या मदतीने सुरु केला. आजूबाजूच्या गावातील दिंड्या आदल्या दिवशी रात्री नऊ वाजल्या पासून या ठिकाणी येतात.बुवाच्या मठाभोवती प्रदक्षिणा घालून रात्रभर भजन कीर्तन होते. पहाटे काकड आरती होते. चवळी घातलेली लाल भोपळ्याची भाजी,वरण, भात व शिरा असे प्रसादाचे जेवण गावातील सर्व ग्रामस्थ व भेट देणाऱ्या सर्व भक्तांना दिले जाते. मंदिराजवळ मोठ मोठया चुलीवर हे जेवण बनविले जाते.त्याचा खर्च गावकी व दान मिळालेली रक्कम यातून केला जातो. साधारण पाचशे माणसे या प्रसादाचा लाभ या दिवशी घेतात.२८आत्ता अस्तित्वात असलेले मंदिर दीडशे ,दोनशे वर्षा पूर्वी ग्रामस्थांनी बांधले.त्या पूर्वी छोटे मंदिर होते. लवकरच हे मंदिर पाडून नवे शिखर युक्त मंदिर बांधण्याचे ग्रामस्थांचे नियोजन आहे.

रत्नागिरी जिल्हयामध्ये कोळीसरे या गावी अशीच फक्त प्रभावळ वेगळी असलेली मूर्ती "लक्ष्मी-केशव मूर्ती" म्हणून ओळखली जाते. वरवडा केसपूर या गावातील काणे, विचारे व जोशी यांना साढे आठशे वर्षापुर्वी रंकाळा तलावामध्ये मूर्ती असल्याचा व तिची तुमच्या गावाला स्थापना करा असादृष्टांत झाला. त्यांनी शोध घेतल्यानंतर त्यांना रंकाळा तलावामध्ये मूर्ती सापडली.तेमूर्ती घेऊन पायी कोल्हापूर वरून मलकापूर,साखरपा, देवरुख संगमेश्वरमार्गे असे आले. जयपूर शास्त्री नदीतून होडीतून कोळीसरे बंदर येथे आले. काही काळ ते येथेच थांबले. दुसरया दिवशी परत जाताना खूप प्रयत्न केला तरी मूर्ती उचलेना म्हणून देवाला इथेच रहायचे असे समजून मूर्ती इथेच ठेवली.या मूर्तीचे मंदिर बांधायचे ठरल्यावर तेथे झरा लागला. तोमूर्तीच्या पायाखालून लागला असे मानले गेले. शेड्वाई येथे स्थानिक लोकांनी सांगितलेली आख्यायिका व काळ थोड्या फार फरकाने या आख्यायिकेशी व काळाशी जुळणारा आहे.





कोळीसरे येथे सुद्धा लक्ष्मी-केशव मंदिरा शेजारी रत्नेश्वर नावाने ओळखले जाणारे शिवमंदिर

आहे. दोन्ही ठिकाणी शिवमंदिरे २०० ते २५० वर्षापूर्वी बांधल्याचे सांगितले गेले.

रत्नागिरी जिल्ह्यात अकरावे शतक ते तेरावे शतक काही काळ अपवाद वगळता शिलाहार राजघराण्याचे वर्चस्व होते.**२९** शिलाहार राजांच्या काळात रत्नागिरी जिल्ह्यात अनेक मंदिरे बांधली गेली. शेड्वईची मूर्ती हि शिलाहार राजांच्या काळातील आहे.कोळीसरेव शेड्वई येथील मूर्तींचे साम्य व मूर्तीसाठी वापरलेला काळ्या रंगातील ग्रॅनाईट पाहता या मूर्ती बाहेरून आणल्या असाव्यात.(२९ * संपादक पथक अरुणचंद्र, महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, इतिहास, प्राचीन काळ, खंड १, पृ.३९४, ३९५ ,* मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख, नागपूर, १९७४, पृ. १८१,* संपादक खरे ग.ह. पुनःसंपादन, देशपांडे ब्रम्हानंद दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड ३, पृ. १६.)

**निष्कर्ष :-**१ उपलब्ध संदर्भ व पुरावा यावरून शेडवई येथील स्थानिक लोक संबोधत असणारी केसरनाथ मूर्ती प्रत्यक्ष विष्णूच्या विभव अवस्थेतील केशव रुपाची आहे.

२ या विष्णूच्या विभव अवस्थेतील केशव मूर्तीच्या प्रभावळीवर अग्नी पुराणा मध्ये उल्लेख केलेल्या विष्णूच्या दशावताराची शिल्पे, कीर्तिमुख, ब्रह्मा व शिव शिल्पे आहेत.

३ या मूर्तीच्या पायथ्याशी उजवीकडे मानव रुपी अंजली मुद्रेतील गरुड, डावीकडे कट्यावलंबी हातात कमल घेतलेलीत्रिभंग अवस्थेतील श्री देवी किंवा लक्ष्मी आहे.

**तळटीपा :-**


१ संपादक, शर्मा श्रीराम, विष्णुपुराण (प्रथम खंड), संस्कृति- संस्थान, बरेली,१९६७ पृ. ९१ / जोशी नीलकण्ठ पुरषोत्तम, प्राचीन भारतीय मूर्ति विज्ञान, बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटना,२०००, पृष्ठ. ७६.

२ जोशी नीलकण्ठ पुरषोत्तम, प्राचीन भारतीय मूर्ती विज्ञान, पृष्ठ ७९.

३ जोशी नीलकण्ठ पुरषोत्तम, उपरोक्त पृष्ठ. ८०.

४ उपाध्याय वासुदेव, प्राचीन भारतीय मूर्ति-विज्ञान, चौखम्बा राष्ट्रभाषा ग्रंथमाला १०, चौखम्बा संस्कृत सिरीज ऑफिस, वाराणसी, १९७०, खंड द्वितीय, पृष्ठ ९१.

५ जोशी नीलकण्ठ पुरषोत्तम, उपरोक्त ८१.

६ मिश्र इन्दुमती, प्रतिमा-विज्ञान (वैष्णव पुराणों के आधार पर), मध्यप्रदेश हिन्दी ग्रन्थ अकादमी, भोपाल, चतुर्थ आवृत्ती, २००९, पृष्ठ १२५, H. Krishna Sastri, South Indian Images of Gods & Goddesses, Madras Government Press, Madras, 1916, P.55.

७ उपाध्याय वासुदेव, उपरोक्त, पृष्ठ ९१.

८ मिश्र इन्दुमती, उपरोक्त, पृष्ठ १२६.

९ शुल्क द्विजेन्द्रनाथ, भारतीय वास्तुशास्त्र-ग्रन्थ चतुर्थ, प्रतिमा विज्ञान, वास्तु-वाड्मय प्रकाशन शाला, लखनऊ,१९५६, पृ.२५८.

१० आकलेकर भालचंद्र, कोकणचा सांस्कृतिक इतिहास, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई,(इतिहास संशोधन मंडळ ग्रंथमाला पु.क्रं.३०),२००३, पृ. २०८.

११ श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा-विज्ञान एवं मूर्ति-कला, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, षष्ठ संस्करण २०१५ इ., पृष्ठ २०.

१२ htpps://shodhganga.inflibnet.ac.in, अध्याय चतुर्थ, मूर्ति-शिल्पांकन, पृ. ३१९.

१३ जोशी नी.पु.,उपरोक्त, पृ. ७५.

१४ जोशीनीपु.उपरोक्त, पृ.१७५.

१५ द्विजेन्द्रनाथ शुल्क, उपरोक्त पृ.२३४ व २४९.

१६ श्रीमान महर्षी वेदव्यास,अग्निपुराणम, क्लाईव्ह रो, कलकत्ता,१९५७, अध्याय ४९ -१-६ ,पृ.९१,९२.

१७ जोशीनी. पु. उपरोक्त, पृ.९९.

१८ जोशीनी. पु. उपरोक्त, पृ.१९९.

१९ द्विजेन्द्रनाथ शुल्क, उपरोक्त पृ. २३२,२५७.

२० द्विजेन्द्रनाथ शुल्क, उपरोक्तपृ.२७१.

२१ जोशी नी. पु. उपरोक्त पृ. ४७.

२२ जोशी नी. पु.उपरोक्त पृ.४९.

२३ htpps://shodhganga.inflibnet.ac.in, अध्याय चतुर्थ, मूर्ति-शिल्पांकन, पृ. ३१४.

२४ जोशीनी. पु. उपरोक्त, पृ. १८४.

२५ htpps://shodhganga.inflibnet.ac.in, अध्याय चतुर्थ, मूर्ति-शिल्पांकन, पृ.३२५-३२६.

२६ जोशीनी. पु. उपरोक्त, पृ.१२१.

२७ द्विजेन्द्रनाथ शुल्क, उपरोक्तपृ. २३५.

२८ अनौपचारिक गप्पा पार्वती बारकुडे, सुनंदा पांडुरंग सणस, जयवंती बजरंग सणस, गणपत बारस्कर, दिनांक २२-०१-२०२०, वेळ-सायंकाळी पाच.

**संदर्भ सूची:-**


**१ अनौपचारिक गप्पा पार्वती बारकुडे, सुनंदा पांडुरंग सणस, जयवंती बजरंग सणस, गणपत बारस्कर, दिनांक २२-०१-२०२०, वेळ-सायंकाळी पाच.**

**२ आकलेकर भालचंद्र, कोकणचा सांस्कृतिक इतिहास, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई,(इतिहास संशोधन मंडळ ग्रंथमाला पु.क्रं.३०,२००३.**

**३ उपाध्याय वासुदेव, प्राचीन भारतीय मूर्ति-विज्ञान, चौखम्बा राष्ट्रभाषा ग्रंथमाला १०, चौखम्बा संस्कृत सिरीज ऑफिस, वाराणसी, १९७०.**

**४ संपादक खरे ग.ह. पुनःसंपादन, देशपांडे ब्रम्हानंद दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, २००९.**

**५ संपादक पाठक अरुणचंद्र, महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, इतिहास, प्राचीन काळ, खंड १, दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२.**

**६ जोशी नीलकण्ठ पुरषोत्तम, प्राचीन भारतीय मूर्ति विज्ञान, बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटना,२०००.**

**७ मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख, नागपूर, १९७४.**

**८ मिश्र इन्दुमती, प्रतिमा-विज्ञान (वैष्णव पुराणों के आधार पर), मध्यप्रदेश हिन्दी ग्रन्थ अकादमी, भोपाल, चतुर्थ आवृत्ती, २००९.**

**९ संपादक, शर्मा श्रीराम, विष्णुपुराण (प्रथम खंड), संस्कृति- संस्थान, बरेली, १९६७.**

**१० शुल्क द्विजेन्द्रनाथ, भारतीय वास्तुशास्त्र-ग्रन्थ चतुर्थ, प्रतिमा विज्ञान, वास्तु-वाड्मय प्रकाशन शाला, लखनऊ,१९५६.**

११ श्रीमान महर्षी वेदव्यास,अग्निपुराणम, क्लाईव्ह रो, कलकत्ता,१९५७.

१२ श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा-विज्ञान एवं मूर्ति-कला, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, षष्ठ संस्करण २०१५.

१३ **H. Krishna Sastri, South Indian Images of Gods & Goddesses, Madras Government Press, 1916, Madras.**

१४ **htpps://shodhganga.inflibnet.ac.in**

# मराठवाडयातील गणेश प्रतिमांची विविध रूपे : ऐतिहासिक अभ्यास

**भिकाणे शोभा राजेंद्र**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :—**

गणेश म्हणजेच गणपती ही प्राचीन देवता असून ती मुळात आर्येत्तर देवता आहे. हिंदू देवतांमध्ये गणेशाचे आगमन उशिरा झाले असले तरीही फार कमी कालावधीत हिंदू धर्मातील मुख्य व लोकप्रिय देवता होण्याचा मान मिळविला आहे. प्रत्येक कार्याची सुरवात ही गणेश स्मरण वा पूजनानेच केली जाते. ही देवता चौदा विद्या, चौसष्ट कलांची त्याचबरोबर संकटाचे निवारण करणारी देवता मानली जाते. गणेश शब्दाचा अर्थ गणांचा ईश व प्रभू असा आहे. गण म्हणजे शिव व पार्वतीचे सेवक होय. गणांचा अधिपति म्हणून गणपती होय. त्याशिवाय वक्रतुण्ड, एकदंत, महोदय, गजानन, विकट, लंबोदर गणपतीची देहविशेष दर्शविणारी नावे आहेत. वाड्.मयात गणेश पुरातन आहे. पण शिल्पामध्ये मात्र तो नंतरच्या काळात आढळून येतो

अंशुमद्भेदागम, रूपमंडन, मत्स्यपुराण इ.ग्रंथातून गणेशाच्या रूपाचे वर्णन केलेले आहे. त्यानुसार तो सामान्यतः चतुर्भुज असून त्याच्या हातात दंत, पाश, पद्म, मोदक आढळतात. गणपतीचे द्विभुज, चतुर्भुज, षडभुज, दशभुज, अष्टादशभुज इ. अनेक रूपांत वर्णन केलेले आढळते. गणेश प्रतिमा शुंग, कुशाण कालखंडात निर्माण होण्यास सुरवात झाली. हत्तीचे तोंड असलेल्या मानवाकृती यक्ष प्रतिमा शुंग—कुशाण काळापासून उत्तरेत मथुरा व दक्षिणेत अमरावती येथे मिळाल्या आहेत. गुप्त काळापासून गणेशाच्या प्रतिमेला खरे रूप आले. गुप्तकाळापर्यंतचे गणेश उभे वा बसलेल्या स्थितीतील आढळून येतात. तर गुप्तोत्तर कालखंडात नृत्यगणपती विकास पावलेला दिसून येतो. गुप्तोत्तर काळापासूनच गणेश प्रतिमांची संख्या व प्रकार वाढले. सामान्यतः सर्व गणेश हे डाव्या सोंडेचेच आहेत. अपवादात्मक स्वरूपातच उजव्या सोंडेच्या गणेशाची पूजा केली जाते. गणेशाच्या एक किंवा पाच सोंडा सामान्य आहेत त्याशिवाय दोन, तीन किंवा सहा तोंडाचेही गणेश क्वचित आढळून येतात.

मराठवाडयात गणेशाचे स्वतंत्र देवालय अंबाजोगाई (जि.बीड येथे असून ते 'चौबारा देऊळ' नावाने ओळखले जाते. त्याचा जीर्णोध्दार झालेला आहे. या शिवाय शिव, विष्णूंच्या मंदिरात, मंदिरावर व अन्य ठिकाणीही गणेश प्रतिमा आढळतात. त्यात गणेश स्वतंत्र रूपांव्यतिरिक्त इतरही अनेक देवतांसोबत दिसून येतो. जसे की पार्वती, सप्तमातृका, कुबेर आणि गजलक्ष्मी सोबत आढळतो. त्यात गणेश आसन, स्थानक, नृत्य त्याचरोबर आलिंगन स्थितीत, केवल (एकटा) वा परिवार रूपात दिसतो. मंदिराच्या बाहयांगावर अलंकरणासाठी गणेश प्रतिमांचा वापर केला गेलेला आहे.

**मराठवाडयातील गणेशाची विविध रूपे :—**

**1) आसनस्थ गणेश :**

आसनस्थ या प्रकारात गणेश ललितासनात त्याचबरोबर अधिकांश ठिकाणी अर्धपर्यकासनस्थ आढळतो.

**ललितासनस्थ गणेशः—**

**सव्यललितासनस्थ गणेश :—**

प्रदक्षिणाक्रमात दंत, परशू, पद्म व मोदक चार हातात धरलेल्या या सालंकृत गणेश प्रतिमा या औंढा नागनाथ मंदिरावर, शिरूर अनंपाळ व माणकेश्वर येथे आहेत. त्याचबरोबर निलंगा, लातूर, कवठा इ.ठिकाणी सप्तमातृकापटात गणेश आढळतो

**वामललितासनस्थ गणेश :–**

प्रदक्षिणाक्रमात दंत, परशू, पद्म व मोदक चार हातात धरलेला सालंकृत गणेश बीडच्या **कंकालेश्वर मंदिरावर आढळतो**

**अर्धपर्यकासनस्थ गणेश :–**

नीळकंठेश्वर मंदिर (निलंगा) या मंदिरात अंतराळातील देवकोष्ठात अलंकृत चतुर्भुज गणेश प्रतिमा आहे. वरील उजव्या हातात पाश तर डाव्या हातात नाग धरलेला असून खालील दोन्ही बाजूचे हात भग्न झालेले आहेत तर खाली मूषक आहे. वरील प्रतिमेशी साम्य असणाऱ्या गणेश प्रतिमा या लातूर, कवठा, शिरूर अनंतपाळ, होट्टल, पिंगळी, अंबाजोगाई, जांब, मुखेड, चारठाणा, अन्वा इ.ठिकाणीही आढळून येतात. फक्त प्रतिमेच्या हातांमधील आयुधात किंचित फरक दिसून येतो.

**2) स्थानक गणेश :–**

औंढा नागनाथ मंदिरावर या स्थितीतील दोन गणेश प्रतिमा दिसून येतात.

**अ) षड्भुज गणेश :–**

हा गणेश पूर्वाभिमूख असून त्याचा उजवा वरील हात अभय मुद्रेत तर त्याखालील दोन हातात परशू व अंकुश असून डाव्या हातात पाश, पद्म व मोदकपात्र घेतलेले आहे गणेशाच्या डावीकडे उंदीर आहे.

**ब) दशभुज गणेशः–**

हा गणेश अलंकृत असून त्याने उजवा खालील हात वरदमुद्रेत आणि मधील एक हात अभयमुद्रेत ठेवून तर अन्य दोन हातात अंकुश व परशू आणि डाव्या एका हातात नरमुंड धरलेले आहे. अन्या हातांमधील आयुधे भाविकांनी खूपच शेंदूर लावल्यामुळे ओळखता येत नाहीत. गणेशाच्या डावीकडे मोदक खाण्यात मग्न असलेला मूषक आढळून येतो. या स्वरूपातील गणपतीला तंत्रमार्गी व शाक्तपंथीय लोकोपासनेत विशेष महत्त्व असल्याचे समजते. दशभुज गणपतीला 'महागणपती' असेही म्हणतात

**क) द्विभुज गणेश :–**

सकालेश्वर (अंबाजोगाई) येथील मंदिराच्या गर्भगृह प्रवेशद्वाराच्या डावीकडील शाखेवर द्विभुज गणेश प्रतिमेने पाश आणि परशू धारण केलेले आहे.

बोरी येथील शिवमंदिरातील मंडपात स्तंभावर उन्मत्त हत्तीची सोंड स्वतःच्या दोन हातात पकडून त्याच्याशी झुंजणाऱ्या गणेशाची सुंदर प्रतिमा दिसून येते. गणेशाच्या उजवीकडे शक्ती दिसते. महाराष्ट्रातील गणेशाचे या स्वरूपातील हे एकमेव शिल्प असून त्याद्वारे गणेशानेही शिवाप्रमाणेच, गजासुराशी तुंबळ युध्द केल्याचे स्पष्ट होते.

**3) नृत्य गणेश :–**

नृत्यरत गणपतीला दोन, चार, सहा व आठ हात असून काही ठिकाणी तो मूषकारूढ नृत्यात दिसून येतो.

**अ) द्विभुज नृत्य गणेश :–**

मुखेड येथील दशरथेश्वर मंदिरावर दक्षिणाभिमुख दोन्ही हात भग्न झालेली सालंकृ त गणेश प्रतिमा आहे.

**ब) चतुर्भुज नृत्य गणेश :–**

गुप्तेश्वर (धारासूर) मंदिरावर चतुर्भुज गणेश प्रतिमा असून वरील उजव्या हातात परशू व डाव्या हाता पद्म आहे तर खालील दोन्ही बाजूचे हात भग्न झालेले आहेत. मूषक शेजारीच दिसून येतो. याच मंदिराच्या मुखमंडपाच्या बाहयांगावर देवकोष्ठात नृत्यरत गणपतीच्या लहान आकारातील दोन प्रतिमा आहेत.

सकालेश्वर (अंबाजोगाई) मंदिरात सभामंडपातील स्तंभमध्यावर चर्तुर्भुज नृत्यगणेशाची लहान स्वरूपाची पण कोरीव प्रतिमा आहे. गणेशाचे तीन हात भग्न फक्त खालील डाव्या हातामधील बीजपूरक सुरक्षित दिसते. डाव पाय स्थिर ठेवून उजवा पाय

उचलून तलसंस्फाटितम् नृत्यावस्था साधालेली आहे. त्याचबरोबर बीडच्या कंकालेश्वर आणि होट्टलच्या परमेश्वर मंदिरावरही गणेश प्रतिमा आहेत.

**क) षड्भुज गणेश :—**

ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरीत' आरंभीच षड्भुज गणेशाला वंदन केलेले आहे

*देखा षड्दर्शनें म्हणिपती । ते चि भुजांची आकृति ।*
*म्हणूनि विसंवादें धरिती । आयुधांते ।।.....*

षड्भुज नृत्यमग्न गणेश प्रतिमा होट्टलच्या सिध्देश्वर मंदिरावर सालंकृत असून तलसंस्फोटितम् नृत्यात आहे. पदिक्षणाक्रमाने दंत, पद्म, परशू, नाग व मोदकपात्र घेतलेले असून खालील डावा हात नृत्यमुद्रेत ठेवलेला आहे. त्याच्या उजव्या बाजूला मूषक मोदक खाण्यात दंग दिसतो.

**ड) मूषकारूढ नृत्यगणेश :—**

**मूषकारूढ चतुर्भुज नृत्यगणेश :—**

पानगाव येथील विठ्ठल मंदिराच्या मुखमंडप कक्षासनावर बाहयांगी लहान आकाराची मूषकारूढ नृत्यगणेश प्रतिमा अलंकृत आहे. प्रदक्षिणाक्रमात दंत, परशू, पद्म, मोदक हातात घेतले आहेत. तर मूषकाच्या पाठीवरच उजवा पाय स्थित ठेवून डावा पाय नृत्यासाठी वर उचलेला आहे

**मूषकारूढ अष्टभुज नृत्यगणेश :—**

अमलेश्वर (अंबाजोगाई) मंदिरावर उत्तराभिमुख अष्टभुज, मूषकारूढ, अलंकृत, नृत्यगणेश प्रतिमा असून आयुधांसह आठही हात भग्न झालेले आहेत. गणेशाने मूषकाच्या पाठीवरच उजवा पाय स्थिर ठेवून डावा पाय नृत्यासाठी वर उचलेला आहे.

**4) उच्छिष्ट गणेश :—**

सामान्यतः या विशिश्ट स्वरूपाच्या गणेश प्रतिमांचा उपयोग तंत्रविद्येमध्ये करतात मराठवाडयात अशा दोनच प्रतिमा उपलब्ध असून त्यापैकी औंढा येथील स्थानक तर उटीब्रम्हचारीला आसनस्थ आहे.

**अ) स्थानक गणेश :—**

नागनाथ (औंढा) मंदिरावर स्थानक चतुर्भुज गणेशाच्या उजवीकडे सिध्दी व डावीकडे रिध्दी या शक्ती देवता द्विभुज असून त्याच्या आलिंगनात उभ्या आहेत. त्याने वरील उजव्या हातात अंकुश तर डाव्या हातात पद्म पकडले आहे. गणेशाने खालील उजवा हात सिध्दीच्या उजव्या कमरेवर ठेवून त्यात दंत पकडला असून खालील डावा हात रिध्दीच्या डाव्या कटिवर ठेवून त्यात मोदकपात्र घेतलेले आहे. उजवीकडील सिध्दीचा उजवा हात गणेशाचा उदरावर तर डावा हात आलिंगनासाठी त्याच्या पाठीवर ठेवलेला आहे. त्याचबरोबर सोंड ही डावीकडील रिध्दीच्या उजव्या स्तनावर ठेवलेली आहे. गणेशाच्या डोक्यावर सालंकृत मुकुट असून कमरेवर अधोवस्त्र घातलेले आहे.

या गणेशाचे रूप, आयुध इ 'मंत्रमहार्णव' या ग्रंथातील वर्णनाप्रमाणे असून फरक एवढाच आहे त्याची सोंड शक्तीच्या गुप्तांगाशी स्पर्श न करता ती स्तनस्पर्शी आहे.

**ब) आसनस्थ गणेश :—**

शिव मंदिर (उटीब्रम्हचारी) येथील मंदरातील स्तंभावरील आसनस्थ चुतर्भुज गणेशाच्या प्रतिमेत उजवीकडे सिध्दी आणि डावीकडे रिध्दी उभ्या (स्थानक) असून द्विभुज आहेत. गणेश सालंकृत असून त्याने वरील उजव्या हाताने सिध्दीला तर डाव्या हाताने रिध्दींला आलिंगन दिलेले आहे. तर खालील उजवा हात उभयमुद्रेत असून डाव्या हातात मोदकपात्र आहे. उजव्या बाजूच्या सिध्दीने डावा हात गणेशाच्या डाव्या खांद्यावर आलिंगनासाठी ठेवला आहे पण तिच्या उजव्या हातातील आयुध स्पष्ट दिसत नाही. डावीकडील रिध्दीने उजवा हात गणेशाच्या उजव्या खांद्यावर आलिंगनासाठी ठेवला असून

डावा हात तिचा योनीस्पर्श करणाऱ्या गणेशाच्या सोंडेवर लज्जास्तव ठेवलेला आहे. प्रतिमेतील गणेश व शक्ती सालंकृत आहेत. येथील गणेशाचे स्वरूप 'उत्तरकामिकागम्' ग्रंथाप्रमाणे असलेले दिसून येते.

**5) संहार गणेश :–**

शिव आणि विष्णुप्रमाणेच गणेशही संहार देवता म्हणून परिचित आहे. या प्रकारातील मराठवाडयात प्राप्त झालेल्या दोन्ही प्रतिमेत गणेश स्थानक स्थितीतच आहे.

**अ) केदारेश्वर मंदिर (धर्मापुरी) :–**

येथील मंदिरावर चतुर्भुज स्थानक गणेश असून सर्व हात आयुधांसह भग्न झालेले आहेत तर सोंड अर्धवट भग्न झालेली आहे गणेश अलंकृत असून तो सर्व सामर्थ्यासह समोरून झुंजणाऱ्या असुराचा वध करीत असून असुराचा हल्ला करण्याचा पवित्रा याचे सजीव शिल्पांकन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ब) केशव मंदिर (केसापुरी) :–**

हे मंदिर गावाबाहेर नदीकिनाऱ्यावर उद्ध्वस्तावस्थेत आहे. या मंदिराच्या मंडप छतावरच संहार रूपातील अष्टभुज गणेशप्रतिमा अलंकृत आहे. गणेशाच्या उजव्या तीन हातात परशू, पाश व खड्ग आणि डाव्या एका हातात बीजपूरक धरले आहेत. त्याच्या अन्य दोन हातामधील आयुधे भग्न झालेली आहेत. त्याने वरील डाव्या व खालील उजव्या या दोन हातात भाला पकडून सर्वशक्तीसह असूराच्या पोटात खुपसून त्याचा वध केलेले दाखवले आहे.

**अन्य देवतांच्या सान्निध्यातील गणेश :–**

स्वतंत्र मूर्तीशिवाय गणेशाच्या लहान स्वरूपाच्या, चतुर्भुज, आसनस्थ प्रतिमा पानगाव, निलंगा, शिरूर अनंतपाळ, लातूर इ.ठिकाणी शिव–पार्वतीच्या मूर्तीतही आढळून येतात. बहुतांश ठिकाणी तो दंत, परशू, पद्म व मोदकधारी असलेला दिसून येतो.

**समारोप :–**

हिंदू धर्मात गणेशाचे स्थान वैदिक काळापासून असून या देवतेला अनन्यसाधारण महत्व आहे. मराठवाडयातील बहुतांश बांधीव मंदिरात, मंदिरावर व अन्य ठिकाणी ही गणेशाचे स्थान आहे. या सर्व प्रतिमांत साम्यभेद असून त्या स्थानक, आसनस्थ, नृत्य अशा या गणेश प्रतिमा सर्वत्र आढळतात. होट्टल येथील मंदिर बाहयांगावरील षड्भुज नृत्यमग्न गणेश प्रतिमा, पानगाव येथील चतुर्भुज मुषकारूढ नृत्यगणेश, तंत्रविद्येसाठी वापरली जाणारी औंढा, उटीब्रम्हचारी येथील उच्छिष्ट गणेश प्रतिमा, केसापुरी येथील संहार गणेश प्रतिमा या प्रतिमा खरोखरच मराठवाडयासाठी भूषणावह आहेत. शिवाय या परिसरातील गणेश प्रतिमांत सर्वसमावेशकता आहे. म्हणजेच अन्यत्र आढळणाऱ्या बहुतांश प्रतिमा या परिसरात आढळतात. परंतु या प्रतिमांचे वर्णन आजतागायत झालेल्या संशोधनात अत्यंत त्रोटक किंवा नामोल्लेखापुरतेच सीमित आहे.

**संदर्भसूची :–**


1) खरे ग.ह., मूर्तिविज्ञान, भा.इ.सं.मंडळ, पुणे, 2012
2) जोशी नी.पु, भारतीय मूर्तिशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, 2013
3) जोशी महादेवशास्त्री, भारताची मूर्तिकला, अनमोल प्रकाशन, पुणे, 1980
4) ढेरे रा.चिं, लोकदैवतांचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2000
5) ढवळीकर म.के., महाराष्ट्राची कूळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे, 2000
6) देव शां.भा, पुरातत्व विद्या, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ आणि कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, 2008
7) देशमुख किरण, मराठवाडयातील देवतांची रूपे, निर्मल प्रकाशन, नांदेड, 2017
8) देशमुख किरण, जगदाळे दत्तात्रय, महादैव्ये नमोनमः, निर्मल प्रकाशन, नांदेड, 2010

9) देव प्रभाकर (अनुवाद–रायरीकर कल्पना), मराठवाडयातील प्राचीन मंदिर, स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे, 2017

10) कुवळेकर विजय (मु.संपा), सुखकर्ता, झी मराठी दिशा, गणेशोत्सव विशेषांक, 2019

11) सातपुते कांचन (संपा.प्रकाशक), संस्कारभक्तिधारा, श्री.गणपती विशेषांक (त्रैमासिक) जुलै–सप्टें 2019

# गुप्तपूर्वकालीन प्रारंभिक मंदिरांचा विकास : ऐतिहासिक चिंतन

**चिलमे प्रिया तुकाराम**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

मूळ मंदिर (संस्कृत) या संज्ञेचा अर्थ 'घर', मराठीत तो देवालय असाही होतो. मानवी जीवनाचे नियंत्रण करणाऱ्या त्याच्यावर कमी–अधिक प्रमाणात प्रभाव पाडणाऱ्या अतिमानवी शक्ती म्हणजेच देवदेवता. अशा प्रकारची श्रद्धा जगातील अनेक समाजात आढळते. या देवदेवतांचे प्रतिक रूपाने अथवा मूर्तीच्या रूपाने भाविकास दर्शन घडवणारे स्थळ म्हणजे मंदिर होय. मंदिरात दैवी शक्ती व सामर्थ्य यांचा प्रत्यय येतो, अशी सामान्य श्रद्धा असते. अतिप्राचीन काळापासून जगात सर्वत्र मंदिरे बांधलेली दिसतात. मात्र त्यांच्या स्वरूपात फार मोठे वैविध्य आढळते.

**मंदिराचा अर्थ**

'मंदिर म्हणजे मानव आणि ईश्वर यांना जोडणारा दुवा असून इहलौकिक आणि पारलौकिक जीवनाचा भक्तीसेतु म्हणजे मंदिर होय.'[1] असे शंकर अभ्यंकर यांनी आपल्या भक्तीकोषात म्हटले आहे. मंदिराला ईश्वराचा प्रसाद म्हटले जाते. मंदिराच्या शिखर व अधिष्ठानावरील उभारणीला विमान असे म्हणतात. संज्ञेत 'मा' म्हणजे मोजणे हा धातू आहे. संपूर्ण विश्वाला मोजण्याचे कार्य शिव–शक्ती करते. मंदिर हे या समन्वयाचेच प्रतिक आहे.[2] अशी जरी 'मंदिर' शब्दाची व्याख्या केली तरी प्रश्न हा उद्‌भवतो की, मंदिर शब्दाची व्युत्पत्ती कोठून झाली?

'मंदिर' या शब्दाच्या व्युत्पत्तीचा विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, 'मंद' पासून 'मंदिर' शब्दाची निर्मिती झाली. ज्याचे तात्पर्य 'पर्वत किंवा पर्वत देवता मानले जाते.'[3] मंदिराची रचनाही साधारणतः पर्वत रचनेसारखीच असते. शिवाय हिंदू पौराणिक धार्मिक साहित्यात पर्वताला देवता मानल्याचे अनेक उदाहरणे दिसून येतात.

**उद्दिष्ट्ये**

1) मंदिराचा अर्थ समजून घेणे.
2) गुप्तपूर्वकालीन मंदिरांचा अभ्यास करणे.
3) मंदिराच्या रचनेचा अभ्यास करणे.

**गृहितके**

1) मंदिर स्थापत्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.
2) मंदिराला पवित्र वास्तू समजली जाते.
3) भारतात प्राचीन काळापासून मंदिर स्थापत्याचे पुरावे मिळतात.

**संशोधन पद्धती**

1) संदर्भ पद्धत
2) विश्लेषणात्मक पद्धत
3) ऐतिहासिक पद्धत

**गुप्तपूर्वकालीन मंदिरे**

मूर्तीपूजा आणि मंदिर स्थापत्याची मुळे इतिहासकाच्या प्रारंभी भारतात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेल्या यज्ञपुजेत होती.[4] असे कुमारस्वामी यांनी मत मांडले आहे. दगडी फरशी किंवा शिलाफलकावर देवमूर्ती व दगडी कठडा असलेले शिलाफलक संबधित देवतेचे वाहन कोरलेले असे.[5]

यानंतरच्या पुढच्या टप्प्यात पुजावास्तूवर छत, छप्पर घातले जाऊ लागले. या प्रकारच्या मंदिराचे अवशेष इ.स.पू. 300 मधील असून हे अवशेष विदिशा येथे मिळाले आहेत.[6] प्रारंभीच्या या मंदिराचे स्वरूप अत्यंत साधे असून बांधकामासाठी लाकूड, माती, विटा यांचा वापर केल्याचे दिसते. मध्यप्रदेशातील सांची येथील 40 क्रमांकाचे मंदिरही मौर्य काळातील आहे.[7] राजस्थानच्या उदयपूर जिल्ह्यात संकर्षण वासुदेवाचे मंदिर आढळते. तर बेसनगर येथेही विष्णुचे मंदिर आढळते. या मंदिरासमोर एक गरुडस्तंभ असून त्यावर ग्रीक राजरत हेलियोडोरस याने कोरलेला शिलालेख आहे.[8] राजस्थानातील चित्तोड जवळील घोसुंडी (नगरी) येथील शिलालेखात पुजाशिला 'प्राकारनारायणवाटिका' असा उल्लेख असून हे मंदिर वासुदेव व संकर्षणाचे आहे.[9] मध्यप्रदेशातील विलासपूर येथील चतुर्भुज भगवान, कर्नाटकातील रेणीगुंट्याजवळील गुडीमल्लम येथील शिवलिंग हे इसवी पूर्व काळातील आहेत.[10] जयपूरजवळ वैराट येथे देवालयाचे अवशेष सापडतात. देवालयाच्या बांधकामासाठी विटांचा वापर केल्याचे दिसते.[11] पंजाबमध्ये तक्षशिला परिसरातील जनदियाळ मंदिरात प्राशेण सभामंडप व चौकोनी गाभारा अशी रचना दिसते.[12] उत्तर भारताप्रमाणे विंध्य ओलांडून खाली दक्षिणेतही प्रांरभीच्या मंदिराचे स्वरूप लाकूड व दगडाचा वापर घुमटाकार शिखर असे होते. आंध्र प्रदेशात गुंटूर जिल्ह्यात नागार्जुनकोंडा याठिकाणी जे उत्खनन झाले तेथे इ.स. 200 च्या काळातील शिवमंदिर व कार्तिकेय या इक्ष्वाकू राजाच्या काळातील बांधलेल्या मंदिराचे अवशेष प्राप्त झाले आहेत. सातवाहन घराण्यातील राजा हाल याच्या गाथासप्तशतीतही सातवाहन मंदिराचा उल्लेख आढळतो. तसेच गुणाढ्यानेही मंदिराचा उल्लेख केला आहे.[13] पण सातवाहन कालीन मंदिराचे अवशेष प्राप्त झाले नाहीत.

प्रारंभीच्या दुसऱ्या टप्प्यातील मंदिराच्या अवशेषावरून असे लक्षात येते की, दगड, माती, लाकूड, तुळ्या आदींचा वापर करून हे छत निर्माण केले असावे. सांचीच्या महास्तुपाबाहेरील असलेल्या पूर्वेकडील तोरणाच्या स्तंभावर एका चौकटीत चार पूज्य वस्तू, प्रतिमा यांच्याभोवती शिल्पाकार बांधून प्रारंभीच्या देवालयाची केलेली रचना पुढच्या टप्प्यात पर्णकुटीवजा घराच्या स्वरूपात रुपांतरीत झाली, परंतु आकाराची मर्यादा व धार्मिक विधी करण्यासाठी आलेल्या भक्ताची अवस्था यातून सभामंडपाची संकल्पना विकसित झाली व गर्भगृह आणि सभामंडपादरम्यान प्रदक्षिणापथाचीही निर्मिती झाली. मंदिराचा आकार या टप्प्यात चापाकार किंवा अर्धवर्तुळाकार झाला. बौद्ध शैलग्रह याच प्रकारची आहेत. प्रारंभीच्या मंदिराची कल्पना स्तंभावर आधारित चहुबाजूने मोकळ्या अशा कुटीवजा मंदिरात वेदिकेवर विराजमान अनेक फण्यांनी युक्त नागदेवता दर्शवलेली आहे व या कुटीबाहेर नतमस्तक ऋषी असे दृश्य कोरलेले आहे.[14]

**निष्कर्ष**

1) मंदिरे हे केवळ धार्मिक वास्तू नसून स्थापत्य, नक्षीकाम, बाह्यांग छत, प्रवेशद्वार आदीने बहरलेले असून येथे तत्कालीन सामाजिक, राजकीय वास्तू स्थापत्याचे दर्शन घडते.
2) धार्मिक हेतू समोर ठेवून मंदिराचा उगम व विकास झालेला आहे. तरीही इतिहासाचे महत्त्वाचे पुरातत्वीय साधन म्हणून मंदिराचे महत्त्व आहे.
3) गुप्तपूर्वकालीन मंदिरे म्हणजे मंदिर विकासाचा प्रारंभीचा टप्पा असून या टप्प्यात मंदिर स्थापत्याचे प्रायोगिक रूप दिसते.

4) भारतात प्रारंभीचे मंदिरे हे केवळ देवतांची घरे अशी होती. त्यानंतर चापाकार स्थापत्य निर्माण झाले व पुढे याच मंदिराला प्रासादाचे स्वरूप प्राप्त झाले. मूर्तीपूजेच्या उदयानंतर मंदिर स्थापत्याच्या विकासास गुप्तपूर्वकालीन मंदिर स्थापत्याचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असल्याचे लक्षात येते.

**संदर्भ**


1) अभ्यंकर शंकर, भक्तीकोष (खंड 5) भारतीय तीर्थक्षेत्रे व मंदिरे, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, पृ.38
2) अभ्यंकर शंकर, उपरोक्त, पृ.38
3) परमार अजय, प्राचीन भारतीय प्रतिमा कला एवं मंदिर वास्तुकला, विश्वभारती पब्लिकेशन, दिल्ली, 2011, पृ.91
4) प्रभुदेसाई योगेश, कोल्हापुरातील मंदिर परंपरा, अक्षर दालन प्रकाशन, कोल्हापूर, 2015, पृ.17
5) जामखेडकर अ.प्र., संपा.डॉ.अ.शं. पाठक, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर्स, महाराष्ट्र इतिहास : प्राचीनकाळ खंड–1, भाग–2, स्थापत्य व कला प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ, पृ.18
6) सिंग उपेंद्र, अ स्टडी ऑफ ॲन्शीन्ट ॲण्ड अर्ली मेडिवल इंडिया 2009, पृ.445–46
7) काळे पाटसकर, भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड पब्लिकेशन, 2009, पृ.5
8) काळे पाटसकर, भाग्यश्री, पृ.5
9) अभ्यंकर शंकर, उपरोक्त, पृ.46
10) अभ्यंकर शंकर, उपरोक्त, पृ.46
11) अभ्यंकर शंकर, उपरोक्त, पृ.46
12) कित्ता, पृ.46
13) मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, अपरांत प्रकाशन, 2017, पृ.202
14) प्रभुदेसाई योगेश, उपरोक्त, पृ.18

# कदमापूर देवीच्या मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. किशोर मारोती वानखडे**
जिल्हा परिषद शिक्षक, प.स. खामगाव
एम.एस.ई.बी. कॉलनी, शेगाव रोड,
खामगाव, जि. बुलडाणा.
kishor.wankhade85@gmail.com
7588565392/9921245690.

**प्रास्ताविक :**

चौदाव्या शतकापासून इमादशाही राज्यकर्त्यांनी बाळापूर हे एक लष्करी केंद्र म्हणून या शहाराचा विस्तार केला. पुढील कालावधीत इ.स. 1595 मध्ये अकबराने अहमदनगरच्या निजामशाहीचा पाडाव करून वऱ्हाड हा मोगल साम्राज्याचा स्वतंत्र परगणा बनवला. याच कालावधीत शहापूर – जालना हा एक नवा लष्करी मार्ग म्हणून उदयास आला. औरंगजेबानेही बाळापूर परगण्याचा विस्तार केला. येथील सूफी संतांच्या दर्ग्यांना जमिनी दान दिल्या. हैदराबाद राज्याची स्थापना झाल्यानंतर बाळापूर चे महत्व वाढीस लागले. येथेच अचलपूरचा नबाब इस्माईल खान पन्हीने किल्ला बांधला अचलपूरचे नबाब हे निजामाचे दिवाण म्हणून कार्य करीत. इ.स. 1720 नंतर पेशव्यांनी मोगलांकडून चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मिळवल्याने वऱ्हाड प्रांतातील कर गोळा करण्याचे कार्य पेशव्यांचे विश्वासू या नात्याने नागपूरकर भोसले राज्यकर्त्यांनी काम पाहिले. बाळापूर परगण्यातील कदमापूर, शहापूर, चितोडा, पळशी, अंबीकापूर ही महत्वाची केंद्रे होती. त्यामुळे या ठिकाणी संरक्षणाच्या दृष्टीने वास्तुंचे बांधकाम करण्यात आले. याच परिसरात विविध देवींची मंदिरे आजही अस्तित्वात असुन त्यातील मुर्त्या व बांधकामाची शैली ही सतराव्या शतकातील आढळते. वऱ्हाड प्रांतावर मोगल बादशहा, अचलपूरचे नबाब, हैदराबादचे निजाम, नागपूरचे भोसले यांचे राज्य असले तरी सर्व राज्यकर्त्यांमध्ये परस्पर सामंजस्य आढळते. मुस्लिम धर्मिय राज्यकर्ते आणि प्रजा हिंदु धर्मिय असली तरी वऱ्हाड प्रांतात मात्र परस्पर विरोधी टोकाचे मतप्रवाह आढळून येत नाहित. याचे सर्व श्रेय येथील सहिष्णूतेच्या शिकवणूकीलाच जाते.

बाळापूर शहापूर मार्गावरील विविध ठिकाणी असलेल्या मध्यकालातील मंदीरांना निजामाने दान दिले. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शहापूर या ऐतीहासीक शहारालगत असलेल्या कदमापूर येथील देवस्थानाला दिलेल्या आर्थिक सहाय्यावर, येथी देवीच्या मुर्तीवर आणि ऐतीहासिक सनदेवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :**

1) हैदराबादच्या निजामाने कदमापूर देवस्थानाला दिलेल्या सनदेचे महत्व अभ्यासणे.
2) येथील तत्कालीन सोन्याच्या मुर्तीचे विश्लेषण करणे.
3) सद्यस्थितीतील निजामाने दिलेल्या सनदेचे महत्व व देवस्थानाचे महत्व अभ्यासणे.
4) या परिसरात सापडलेल्या मुर्त्यांचे विश्लेषण करणे.

**शोधनिबंध संशोधन पध्दती :**

बाळापूर ते शहापूर हा मोगल काळापासून अत्यंत महत्वाचा लष्करी मार्ग होता. पुढील काळातही लष्करी हालचालीसाठी हैदराबादच्या निजामाने या मार्गाचा अवलंब केला. याच मार्गावर असलेल्या मध्ययुगीन देवस्थानांना निजामाने आर्थिक सहाय्य केले. कदमापूर येथील देवीच्या संस्थानाला केलेल्या आर्थिक सहाय्यावर हा शोध निबंध आधारीत असून या शोधनिबंधामध्ये ऐतीहासिक संशोधन पध्दतीचा आधार घेतला आहे.

**कदमापूरची देवी संस्थान व निजामाची सनद :**

वऱ्हाड प्रांतात साठाचाळीसीच्या तहान्वये नागपूरकर भोसले व निजामाने आपले अधिपत्य स्थापन केले. आर्थिक दृष्टीने हा प्रांत अत्यंत महत्वाचा असल्याने राज्यकर्त्यांनीही या प्रांतात राजकिय ढवळाढवळ केलेली आढळत नाही. इस 1720 नंतर या प्रांतात काही अपवाद वगळता राज्यकर्त्यांमध्ये युध्द झाले नाही. हैदराबादचे निजाम व त्यांचे वंशज बाळापूरच्या सूफी संतांबाबत विशेष आदर ठेवीत असत. इनायतउल्ला नकशबंदी, जहीरूद्दीन नकशबंदी, मासूमअवला यांच्याप्रती निजामांचा विशेष आदर होता. इ.स. 1737 मध्ये निजामाने बाळापूर येथे येऊन जहिरूद्दीन यांच्या दर्ग्याचे बांधकाम पूर्ण केले. त्याच बरोबरच येथील बाळादेवी मंदिरालाही दान दिल्याचे या परिसरात ऐकीवात आहे. वऱ्हाड प्रांतात निजाम व त्यांचे वंशजांनी सहिष्णूतेनेच राज्यकारभार केला. त्यामूळे येथील राज्यकर्त्यांमध्येही परस्पर सामंजस्याचे व मित्रत्वाचे संबंध होते.

बाळापूर शहापूर या मोगल लष्करी मार्गावर कदमापूर हे मध्ययुगीन काळापासुन महत्वाचे गावठाण आहे. येथे मोगल कालावधीपासून देवीचे मंदीर अस्तित्वात होते. या गावामध्ये तत्कालीन वेशीचे तसेच इतर वास्तुंच्या बांधकामाचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत. याच गावात मोगल कालावधीत बांधण्यात आलेली पायविहीर असून सद्यस्थितीतही या बारवचे बांधकाम अप्रतिम आहे. येथील देवीसंस्थान आजस्थितीतही पंचक्रोशीत एक श्रध्दास्थान आहे. बाळापूर परगण्यामध्ये आर्थिक सुबत्ता रहावी यासाठी तत्कालीन राज्यकर्ते या संस्थानला भेटी देत असल्याचे या परिसरात बोलल्या जाते. हैदराबादच्या निजामाने येथील लक्ष्मी मंदीराला दान दिल्याचा उल्लेख आढळतो. निजाम अलिखान अफजल उद्दौला यांच्या कारकिर्दीत इसवी सन 1864 मध्ये या देवस्थानचे महत्व ओळखून या मंदिराला निजामाने आर्थिक स्वरूपात दान दिले हे मुळ दानपत्र सद्यस्थितीतही मंदिरामध्ये उपलब्ध आहे.

**निजामाची सनद :**

कदमापूर येथील देवी संस्थाना विषयी हैदराबादच्या निजामालाही आस्था असल्याने त्यांनी या मंदिरामध्ये अडीच किलो सोन्याची मुर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. ही सोन्याची मुर्ती लक्ष्मीची होती. देवी लक्ष्मी ही आर्थिक सुबत्तेचे प्रतिक म्हणून वैदिक संस्कृतीत महत्वाची मानली जाते. या प्रदेशात आर्थिक सुबत्ता रहावी यासाठी निजामाने या संस्थानला ही अडीच किलो सोन्याची मुर्ती दिली. पुढील काळात अस्तिरतेच्या वातावरणामुळे ही मुर्ती बाळापूर येथे स्थलांतरीत करण्यात आली. मुळ लक्ष्मीची मुर्ती ही सोन्याची असल्या कारणाने येथून ही मुर्ती गहाळ झाली. परंतु बाळापूर येथे ज्या ठिकाणी ही मुर्ती ठेवण्यात आली त्या शक्ती केंद्राबाबत आजही कदमापूर आणि आजुबाजूच्या परिसरातील व्यक्तींना विशेष श्रध्दा आहे.

देवी संस्थानात अडीच किलो सोन्याच्या मुर्तीची प्रतिष्ठापना केल्यानंतर या मुर्तीची व मंदिराची देखभाल करण्यासाठी येथीलच एका व्यक्तीची नेमणूक करण्यात आली. या व्यक्तीच्या नावे 22 सप्टेंबर 1864 साली निजामाने ही सनद दिली. जोध यांचे वंशज हे पूर्वी देवगिरी येथे राहत असल्याने देवगीरीकर या नावानेही ते प्रचलीत होते. या सनदेमध्ये बाळापूर व तत्कालीन देवस्थानाबाबत माहिती दिली आहे. त्यामध्ये हैदराबाद राज्यातील बाळापूर परगना क्रमांक 269 असून ग्राम कदमापूर जिल्हा अकोला येथील जोध कुटुंबास देवपुजेसाठीचा हक्क प्रदान करण्यात आल्याचा उल्लेख आढळतो. हैदराबाद संस्थानातील रजिस्टर नंबर 2089 ग्रॅट नं. 16/13 असा हैदराबाद संस्थानात उल्लेख केलेला आहे. असाच उल्लेख सनदेवरही आढळतो. मुर्तीची व मंदिराची देखभालीसाठी मासिक 12 (बारा) रूपये दान स्वरूपात निजामाने दिल्याचा उल्लेखही या सनदेमध्ये केलेला आहे. या मुळ सनदेची दोन वेळेस पडताळणी झाली असून हैदाबाद संस्थानच्या प्रतिनीधींनी ती केली. 14 जुन 1934 व 13 मे 1942 मध्ये या देवी संस्थानची पाहणी व पडताळणी केल्याचा उल्लेख

आहे. या सनदेची पडताळणी अकोल्याचे तत्कालीन डेप्युटी कमिशनर तसेच इनाम इन्व्हीस्टीगेशन (पडताळणी) ऑफीसर यांनी केली असून यावर त्यांच्या स्वाक्षऱ्याही आहेत. प्रत्यक्ष सनदेवर हैदराबाद संस्थानचे राजकिय चिन्ह, दानपत्राचा उल्लेख, जोध परिवाराला दिलेले प्रमाणपत्र तसेच हमी स्वरूपात तत्कालीन व्यक्तीच्या स्वाक्षऱ्याही या सनदेवर आढळतात. सनदेमध्ये इंग्रजी व मोडी भाषेचा लेखनासाठी आधार घेतला आहे.

देवगिरीकर यांचे मृत्युनंतर त्यांचे जावई सदाशिव अंबादास शिंपी यांना देवी संस्थानाची जबाबदारी देण्यात आली. त्यानंतर शिंपी याचे जावई देविदास राजाराम चिखलकर आणि त्यांचे नंतर चिखलकर यांचे जावई सुधाकर डिगांबर जोध यांना देवपुजेचा व संस्थान प्रमुखाचा अधिकार देण्यात आला. त्यानंतर सद्यस्थितीत या मंदिराची देखभाल करण्याची जबाबदारी विरेद्र सुधाकर जोध यांना देण्यात आलेली आहे.

**देवी लक्ष्मीची मुर्ती :**

देवी संस्थानचे मुळ मंदीराचा सद्यस्थितीत पूर्णतः जिर्णेध्दार झाला असून मुळ मंदिर अस्तित्वात नाही. सोन्याची मुर्ती गहाळ झाल्याने सद्यस्थितीत अष्टभुजाकृती लक्ष्मीची मुर्ती मंदिरता अस्तित्वात आहे. बाळापूर येथून मुर्ती गहाळ झाल्याने कदमापूरच्या परिसरातील व्यक्तींची बाळापूर बाबतही विशेष श्रध्दा आहे. या मंदिरातील देवी पित्तर पाठामध्ये इंदीरा एकादशीला बाळापूर येथे नेऊन दुसऱ्या दिवशी बाळापूरहून वाजत गाजत मुर्ती कदमापूरला आणली जाते व त्यानंतर कदमापूरची यात्रा साजरी केल्या जाते. बाळापूर येथून दरवर्षी आणल्या जाणारी मु र्ती ही चतुर्भुजांची असून दोन हातात कमलपुष्प आहे. आसनावर विराजमान स्थितीत मुर्ती असून एका हाताने आशिर्वाद तर एक हात ध्यानमग्न अवस्थेत आहे. सद्यस्थितीतील मुर्ती ही तांबे, पितळीची असून मुळ सोन्याच्या मुर्ती प्रमाणे मुर्तीची प्राणप्रतिष्ठा केल्याचे बोलले जाते. इंदीरा एकादशी वेळेस बाळापूरहुन कदमापूरला ही मुर्ती वाजतगाजत कदमापूर येथे आणल्या जाते व उत्सवाला सुरूवात होते. इ.स. 1864 पासून निजामाने आर्थिक सहाय्य केल्याने हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असल्याचे बोलले जाते.

**महिषासूर मर्दिनीची मुर्ती :**

ग्राम कदमापूर पासून 3 किमी. अंतरावर पळशी खुर्द परिसरात विजय देशमुख यांचे शेतामध्ये नांगरणी करीत असतांना अखंड काळ्या पाषाणाची मुर्ती सापडली. ह्या मुर्तीची बनावट ही मध्ययुगीन आहे. महिषासूर मर्दीनीच्या मुर्तीला चार भुजा असुन देवीच्या समोरील बाजुस असलेल्या रेड्याचे तोंड असलेल्या असुराला देवी त्रिशुलाने मारताना दाखवीली आहे. देवीच्या उजव्या बाजुला देवीचा सिंह, महिषा सुराचा उजवा हात दाखवला असून त्या पुढे एक मनुष्यकृती मस्तक दाखवले आहे. ही मुर्ती दोन फुट उंचीची असून काळ्या पाषाणाची भरीव स्वरूपातील आहे. या मुर्ती प्रमाणेच मोगल घाट म्हणून प्रसिध्द असलेल्या जुन्या रस्त्यावर काही ठिकाणी मुर्त्यांची भग्न अवशेष सद्यस्थितीतही विखुरलेले आढळतात. कदमापूर देवी संस्थानमध्ये जात असतांना ग्राम पळशी येथील या महिषासुर मर्दीनी देवीच्या मुर्तीजवळ देवीची पालखी आणण्यात येते. नंतर कदमापूरला नेऊन मुर्तीची पुजा कलेल्या जाते अर्थातच मध्ययुगीन कालखंडातील महिषासुर मर्दीनीची मुर्ती आणि कदमापूरची लक्ष्मी देवी याविषयी या परिसरामध्ये आस्थेचे वातावरण दिसून येत.

सद्यस्थितीतील संस्थानचे व मुर्त्यांचे महत्व :

कदमापूरच्या देवी संस्थानाबाबत आजुबाजुच्या परिसरामध्ये प्रचंड आस्थेचे वातावरण आहे. हैदराबादच्या निजामांनी वऱ्हाड प्रांतावर सत्ता स्थापन केल्यानंतर वऱ्हाड प्रांतातील हिंदु, जैन मंदिरांना तसेच येथील मुस्लिमेतर धर्मियांना जाचक त्रास दिला नाही. नागपूरकर भोसले आणि हैदराबादचे निजाम यांचे मध्ये वऱ्हाड प्रांताबाबत मैत्रीचे व परस्पर सामंजस्याचे संबंध होते. अचलपूरचे नबाब व त्यांचे वंशजांनी निजामाचे दिवाण म्हणून या प्रदेशावर राज्यकारभार केला. तिन्ही राज्यकर्त्यांनी प्रजेला सहिष्णूता धोरणातून

वागणूक दिली. हैदराबादचे निजाम व त्यांचे वंशजांनी बाळापूर, शहापूर, कदमापूर, चितोडा येथील दर्गे व हिंदु मंदिरांना आर्थिक सहाय्य केले. या परिसरात मध्ययुगीन काळातील मंदिर आजही अस्तित्वात असून काही मंदिरे सुस्थितीत आहेत. कदमापूरच्या मंदिराचा पूर्णतः जिर्णोध्दार झाल्याने मुळ मंदिर पहावयास मिळत नाही. परंतु हैदराबादच्या निजामाने दिलेली लक्ष्मीची अडीच किलो सोन्याची मुर्ती व मासिक बारा रूपये दान हे वऱ्हाड प्रांतात सहिष्णू धोरणातून राज्यकारभार केल्याचे ऐतीहासिक उदाहरण आहे. बाळापूर, शहापूर, कदमापूर, चितोडा, पळशी, अंबीकापूर ही निजामाच्या परगण्यातील महत्वाची गावे असल्याने या गावांमध्ये निजामाने केलेल्या आर्थिक सहाय्याच्या बाबी प्रचलीत आहेत. कदमापूर व पळशी येथील मुर्त्यांचे महत्व लक्षात घेवून या मुर्त्यांचे व प्राचीन मध्ययुगीन वास्तुंचे संरक्षण व संवर्धन झाल्यास पुढील काळात इतिहासाला महत्वाचे वळण देण्यास हा भाग कारणीभुत असेल हे मात्र नक्की.

**निष्कर्ष :**


1) कदमापूरचे मंदिर ऐतीहासिक असून याचा जिर्णोध्दार केला आहे.
2) हैदराबादचे निजाम अलीखान अफजल उद्दौला यांच्या कारकिर्दीत या मंदिराला आर्थिक सहाय्य देण्यात आले.
3) वऱ्हाड प्रांतात निजामांनी हिंदुधर्म, मंदिर व पुजाअर्चा यास फारसा विरोध केला नाही.
4) कदमापूरच्या देवी संस्थानाला निजामाने केलेले आर्थिक सहाय्य हे वऱ्हाड प्रांतात सहिष्णूतेचे उत्तम उदाहरण आहे.
5) या देवी संस्थानाबाबत परिसरातील लोकांमध्ये श्रध्देचे वातावरण आहे.

**शब्दकुंजी :**


*सनद : अधिकार दायक पत्र, प्रमाणित अधिकारपत्र, राजाने, सम्राटाने, दिलेले अधिकारपत्र.*
*दर्गा : मुस्लिम सूफी संतांचे समाधीस्थळ.*
*संस्थान : एका उद्देशाने स्थापन केलेली संस्था देव देवतांच्या पुजनाचे स्थळ.*

**संदर्भ साधने :**

1) मुळ सनद इसवीसन 1864.
2) अबुल फजल – आईन – ए– अकबरी – दिल्ली.
3) काळे यादव माधव, नागपूर प्रांताचा इतिहास 1934.
4) शेजवलकर त्र्.श. निजाम पेशवे संबंध, 18 वे शतक, इस 1959.
5) पगडी सेतु माधवराव, मराठे व निजाम ऊर्दु फारशी साधने मुंबई – 1961.
6) वानखडे डॉ. किशोर मारोती, बाळापूर शहारातील सूफी संत ( अप्रकाशीत शोधप्रबंध संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ)



मंदिरातील देवीची लक्ष्मीची मुर्ती



महिषासुर मर्दिनीची मुर्ती

निजामाने दिलेली सनद – 1864



# निलंगा तालुक्यातील निवडक ऐतिहासिक स्थळे व मंदिरे

**डॉ.व्यास सी.पी.**
इतिहास विभाग प्रमुख,
के.के.एम.महाविद्यालय,
मानवत जि.परभणी

**Abstract-**

निलंगा तालुक्यातून वाहणारी तेरणा नदीच्या वलयात वाढलेली संस्कृती किंवा मांजरा–तेरणेची संगम स्थली असलेली ही भूमी होय. साधनांचा विखुरलेला ऐतिहासिक ठेवा, साधनांची माहिती विविध ग्रंथातून भौतिक अवशेषांवरून व ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे मिळवून बराच अज्ञात इतिहास स्पष्ट निदर्शनास आणता येऊ शकतो. यातूनच या प्राचीन ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करता येतो. यात या परिसराचे मोठेपण दडलेले आहे. या स्थळांच्या सखोल अशा अध्ययनातून या परिसराला असणारे प्राचीन, मध्ययुगीन कालीन महत्व समोर येऊ शकते.

**Key-** निलंगा तालुका– ऐतिहासिक स्थळे– मंदिरे

**प्रस्तावना**

पृथ्वीतलावरील प्रत्येक घटना, वस्तू आदींच्या ऐतिहासिकतेला तेवढेच महत्त्व असते, जेवढे की वर्तमानाला व भविष्याला असते. कोणत्याही स्थळाची ऐतिहासिकताच त्या स्थळाला महत्त्व प्राप्त करून देत असते. निलंगा तालुक्यातील औराद शहाजानीच्या जवळपास असलेल्या हलगरा, तळीखेड, तांबाळा इत्यादी गावांना आजच नव्हे, तर प्राचीन, मध्ययुगीन  काळापासून अखंड ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. याच लाभलेल्या परंपरेने आज आकाराने लहान का असेनात त्या गावांना भरपूर प्रसिद्धी मिळवून दिलेली दिसते. लातूर जिल्हयातील निलंगा तालुकाएक मोठा तालुका होता. त्यातून शिरूर–अनंतपाळ तालुका वेगळा करण्यात आला आहे. निलंगा तालुक्याची भूमी महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमेवर आहे. या सीमा भागातील दुर्लक्षित प्राचीन व मध्ययुगीन ऐतिहासिक ठेवा अभ्यासला जावा व जोपासला जावा यासाठी येथे त्याचा संकलित विचार मांडण्याचा प्रयत्न होणे गरजेचे ठरते.

**तळीखेड –**

अंतरंगातील शिल्पांनी सालंकृत असे मंदिर असणारे गाव म्हणजेच 'तळीखेड'. निलंग्याहून 10 कि.मी. अंतरावर स्थित जवळपास 150 वर्षापूर्वीचे बाहय आकाराचे मंदिर म्हणून दुर्लक्षित मंदिर आहे. येथील मूर्ती शिल्पे 13 व्या शतकातील असून ते उत्कृष्ट आहेत. सभागृह 1 ते 1.5 फूट खोल व गाभारा 5 फूट खोलगट भागात असून गर्भगृहात शिवलिंग आहे. मंदिराच्या अंतराळ भागात, सभागृहाच्या देवकोष्ठातील दक्षिणेकडे अतिरिक्त अंतराळ वजा भाग दिसतो. तेथे सद्या देवीची मूर्ती आहे. अंतराळवजा भागात ब्रम्हाणी व ब्रम्हदेव दोन देवकोष्ठात आहेत. पूर्वेकडील तशाच वेगळया भागात वैष्णव शिल्प दिसतात. अनेक पद्मनाथ (शेषशायी), विष्णु अवतार इ. वैष्णव शिल्पे असल्याचे दिसते.

**सर्वोत्कृष्ट मूर्तीशिल्प सृष्टी – 1.**विलोभनीय लक्ष्मी–विष्णू, **2.**सालंकृत व सर्वांग सुंदर अर्धनारी नटेश्वर, **3.**निलंगा सारखे हरगौरी (शिव–पार्वती), **4.**डोक्यावर तीन फणाधारी उभे विष्णू शिल्प, **5.**केशव रूपी विष्णू, **6.**हिरण्यकश्यपाचा वध करणारा नृसिंह, **7.**वराह अवतार, **8.**भवानी देवी, **9.**सरस्वती–ब्रह्माणी, **10.**पार्वतीचे एकीभूत शिल्प, **11.**मोदक गणेश, **12.**

शेषशायी विष्णू महत्वपूर्ण ठरतात. मंदिरा बाहेर वीरगळी, सतीशीळा, 2.5 ते 3 फूट लांब दगडावर कानडी शिलालेख आहे. एका शेतात देवी मूर्ती आहे. त्यावरून जवळच्या रस्त्याकडे लक्ष्मीचे मंदिर असावे.

**तांबाळा –**

निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी व उमरगा मार्गावर स्थित असणारे वस्तीचे पवित्र स्थान अर्थात 'तांबाळा'. यास लाल रंगाचा खडकाळ भाग, नयन रम्य निसर्गदत्त तसेच दोन तलावांचे रम्य सानिध्य लाभलेले दिसते. गावालगत जहागिरदाराचा बंगला निजामी काळातील तांबाळयाचा रूबाब सांगतो. गावातील शन्मुखेश्वर समाधी, बसवेश्वर मंदिर येथील धर्म श्रद्धा जोपासून आहेत. येथील मूर्तीशिल्पाचा आविष्कार खूपच विलोभनीय होय. येथील भग्न केलेल्या प्राचीन देवालयातील विखुरलेली शिल्पे, मूर्तीकाम, स्थापत्यकाम व स्तंभ अलंकरण महत्त्वाचे ठतात.

**तांबाळयाचे आकर्षक मूर्ती–शिल्प सौंदर्य :–** 1.मोदक गणेश तळीखेड सारखे गणेश शिल्प, **2.**नृसिंहाच्या अवताराचे शिल्प, **3.**षन्मुखेश्वर समाधी जवळ लक्ष्मी विष्णूचे विलोभनीय शिल्प, **4.**पार्वतीची मूर्ती, **5.**दोन बसलेली सिंह शिल्पे, **6.**अलंकृत स्तंभ, **7.**इतर पुरूष शिल्प व सुटे शिल्प वैभव, नाग, कीर्तीमुख **8.**येथील मंगलकलश वाटणारा प्राचीन मंदिराच्या कळसाचा दगड, येथील षन्मुखेश्वर मंदिराच्या जवळ कोरलेली गुफा व केंगल दगड कापून केलेली त्या लगतची बारव (विहिर) आगळी – वेगळी वाटते

**हलगरा गाव –**

निलंगा ते औराद या मार्गात निलंग्याहून 14 कि.मी.अंतरावर व औरादहून 6 कि.मी. अंतरावर वसलेले गाव म्हणजे हलगरा. मेन रोडवर अर्थात हलगरा पाटीहून उत्तरेकडे एक मार्ग व दक्षिणेकडे एक मार्ग जातो. यापैकी चौकावरून उत्तरेस 1.5 कि.मी. अंतरावर हलगरा आहे. हलगऱ्याचा प्राचीन वारसा फारच जुना दिसतो. पूर्वीपासूनचा बस्वकल्याण (कल्याणी) येणारा एक मार्ग हलगरा पर्यंत दिसतो व पुढे उदगीरकडे ही जातो.

'हलगरा' या गावाला लगतच्या कर्नाटक प्रदेशाच्या कन्नड प्रभावातून निर्माण झालेला दिसतो. कन्नड भाषेतून 'हाल' म्हणजे 'दूध' अर्थात 'दूधाचे आगार' हा शब्द जुळला. त्या दोन्हींचे संमिश्रण होऊन हाल़आगारत्रदूधाचे भांडार असलेले गाव म्हणजे 'हालगरा' असा झालेला दिसतो. हलगरा या गावाच्या नावाच्या संदर्भात संस्कृतीनिष्ठ 'हल' हा शब्द 'नांगर' हा शब्द ध्वनित करतो. येथील सुपीक जमीन भरपूर शेतीचे उत्पन्न व कधी काळी लाकडी नांगर तयार करण्याचे एक प्रभावी केंद्र(आगार) 'हलगरा' असू शकते. या गावाची पाहणी केल्यास आपणास असे जाणवते की या गावात विविध जाती–जमातींचे, धर्म–संप्रदायाचे लोक आढळतात. मुख्यतः येथे हिंदू धर्मीयांची वस्ती आहे. तसेच काही मुसलमान, जैन लोक ही येथे राहत असलेले आपणास स्पष्ट पणे जाणवते. येथील समाज पाहता येथे ब्राम्हण, मराठा, कोळी, जंगम, तेली, कुंभार, सुतार, लोहार, सोनार, फुलारी, गोसावी, लिंगायत(वाणी), कैकाडी, गोंधळी, आतार, मुस्लिम, महार, मांग अशा विविध पद्धतीचे लोक येथे वास्तव्य करीत असल्याचे जाणवते.

**हलगऱ्याची ऐतिहासिकता सांगणारे पुरावे :–**

**बारव** – नारायण मंदिराच्या दक्षिणेस सध्या रस्त्याचा चौक भाग आहे. तेथे एक विशाल अशी चिरेबंद दगडांनी बांधलेली बारव होती.

**समाध्या** – अंबुलगा मार्गावरील महादेव व देवीच्या मंदिराच्या परिसरात काही समाध्या व आधुनिक लेख आहेत.

**शिलालेख –** येथील शिलालेखांनी तर जणू या गावालाचे ऐतिहासिक महत्वच जोपासले आहे. येथील शिलालेख हळकन्नड भाषेतील आहेत. यांचे वाचन झाले तर त्यातून या

गावची / मंदिराची अज्ञात माहिती ज्ञात होण्याची शक्याता वाटते. अ) श्री मारूती मंदिराच्या प्रवेशाकडील जोत्याच्या डाव्या बाजूला बसविलेला शिलालेख याचा काही भाग दिसतो काही भाग बांधकामात गेला आहे. आ) गावापासून 1 ते 1.5 कि.मी. अंतरावरील पवित्र स्थळी अर्थात रोकडोबा या स्थळी ठेवलेला दोन ते तीन ओळींचा (अपूर्ण) शिलालेख.

**विखुरलेली शिल्पे व मूर्त्या** – जास्त करून नारायण मंदिराजवळ काही शिल्पे व मूर्त्या पडून आहेत. मंदिराच्या लगत गणपतीची उत्कृष्ट मूर्ती आहे. तसेच तेथे शिवपिंड आहे. येथे अष्टकोना ऐवजी नऊ पाकळयांचे असलेले दुर्मिळ दगडी कमळदल आहे. येथे दुर्मिळ ठरणारे उभे आकर्षक आहेत. या मंदिराची बांधणी सुद्धा वैशिष्टयपूर्ण आपणास असल्याचे जाणवते.

**पांढरीची गढी** – गावाच्या पूर्वेकडील भागात पांढरीची गढी आहे. त्या वरून त्या गावाची प्राचीनता बोलू लागते.

**प्राचीन अवशेष व स्थळे** – रोकडोबा व हनुमान मंदिराच्या परिसरात शेतात प्राचीन वस्ती होती. मराठवाडयातील सुप्रसिद्ध व गाजलेले पुरातत्त्व संशोधक श्री समुद्रगुप्तजी पाटील, नांदेड व मास्टर दीनानाथ मंगेशकर कॉलेज, औराद शहाजानी येथील इतिहासाचे गाढे संशोधक प्रा.प्रकाशचंद्रजी व्यास यांनी मिळून तेथे काही खापरे, बांगडयांचे तुकडे व मणी शोधले आहेत. त्यावरून अहमदनगर कालीन दिड हजार ते पावणे दोन हजार वर्षा पूर्वीचे अवशेष येथील प्राचीन इतिहासाचे संकेत देतात. हलगऱ्याहून होसूर मार्गावरील एका उंचवटयावर शेत व माळरान भूमीवर सुद्धा पुरातत्त्व अभ्यासक श्री समुद्रगुप्तजी पाटील व इतिहासाचे गाढे संशोधक प्रा.प्रकाशचंद्रजी व्यास या दोघांनी तीन–चारशे वर्षापूर्वीचे अवशेष प्राप्त केले आहेत. मला स्वतःला ही संशोधन प्रक्रिया पाहण्याचा 'मणी कांचण योग' प्राप्त झालेला आहे.

**हलगऱ्याची मंदिर सृष्टी–** हलगऱ्याला मंदिर सृष्टीमुळे जणू खरे सौदर्यं प्राप्त करून दिले आहे.

**खंडोबा मंदिर** – गावात प्रवेश करताच बसस्टॅड जवळ हे लहानसे मंदिर आहे. त्याची पूर्वीची माहिती नष्ट झाली असून एखादया शतकापूर्वीच त्याची नवी झालेले दिसते.

**बिरदेव मंदिर** – शेंदूर लावलेल्या दोन भागांना बिरदेव असे म्हणतात. उस्मानाबाद व लातूर जिल्हयातील धनगर लोक याची उपासना करतात.

**मारूती मंदिर** – हे गावाच्या आतील बाजूस असलेले मंदिर आहे. या मंदिरात गावची भग्नमूर्त्या व शिल्पे ठेवलेली आहेत. शिवलिंग नंदी व इतर जुन्या मूर्त्या येथील बांधकामाची साक्ष देतात.

**देवीचे मंदिर** – येथे देवीचा तांदळा आहे त्याला शेंदूर लावला असून, गाव लक्ष्मी म्हणून याची पूजा केली जाते.

**महादेव मंदिर :–** हलगरा–अंबुलगा मार्गावर हे शिवमंदिर आहे. हे मंदिर भग्न असून फक्त शिवलिंगाची जागा लादलेली आहे. त्यात प्राचीन शिवलिंग गृभगृहात असून समोर नंदी आहे. जवळच भैरव, शिव–पार्वती इ. कोरीव मूर्त्या पडून आहेत. याच मंदिर आवारात देवीचे मंदिर आहे. मंदिर आवारात दक्षिण कोप–यात काही समाध्या आहेत. यांच्या शेजारी लगतच उत्कृष्ट, आकर्षक व कलात्मक असे दगडे पडून असलेले दिसतात.

**नारायण मंदिर** – दगडी कलेचे खरे रूप पाहण्याकरिता आपणास हनुमान मंदिरापासून सरळ मार्गाने पुढिल चौकापर्यंत गेल्या नंतर डावीकडे एक पूर्वाभिमुख प्राचीन चालुक्य प्रभावाचे 'नारायण मंदिर' आहे. मंदिरा समोर पूर्वी भव्य बारव होती. मंदिराचा नकाशा लक्षात घेता पुनर्रचित बाहय भागाला वगळता मुलतः हे मंदिर अर्धमंडप (पूर्वेकडे), सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असे आहे. गर्भगृहात शिवलिंग आहे. पश्चिमेच्या भिंतीला लागून उत्कृष्ट कोरणीची शेषभागी नारायणाचे शिल्प आहे. त्यावर दशावतार कोरले आहेत. सभामंडपात नंदी आहे. शेजारी कोनाडयात देवी, विठ्ठल–रूक्मिणी व काही मूर्ती आहेत.

सभामंडपाला दक्षिणेकडे लहान द्वार आहे. जे नंतर केलेले असावे. उत्तरेकडे ही लहान (बंद केलेले) प्रवेशद्वार आहे.

**नृसिंह मंदिर –** अंबुलगा रोडवर गावाबाहेर असलेले मंदिर आहे. पुढे धर्मशाळा व पटांगण आहे. मंदिराच्या आतील भागात नृसिंह रूपी शेंदूर लावलेली दगडी मूर्ती आहे. शेजारी वर्तुळाकार पण मधोमध चौकोनी असलेली लहानशी विहिर सुद्धा आहे.

**रोकडोबा मंदिर –** गावापासून अंबुलगा रोडवर 1 ते 1.5 कि.मी अंतरावर असलेले हे जागृत वाटणारे देवस्थान आहे. या मंदिराची निर्मीती नव्याने होत आहे. येथे बांधलेला चौथरा व वडाचे झाड आहे. त्याखाली एक शिलालेख असलेला अपूर्ण असा दगड आहे. जवळचा तलाव प्राचीन तलावाचा भाग आहे. शेजारी वाडीकडे जातांना रोड लगतच्या शेतात प्राचीन खापरे व बांगडया मिळतात.

या व अशा विविध स्थळांच्या ऐतिहासिक स्थळांचा शोध व अभ्यास केल्याने या स्थळांना निश्चितच महत्व प्राप्त होईल. यातून जुना इतिहास माहित होवून या परिसराला महत्व प्राप्त होईल. या व अशा असंख्य स्थळांचा अभ्यास होणे गरजेचे ठरते.

## संदर्भ


1. प्रत्यक्ष स्थळ भेट दि.15.01.2003
2. व्यास पी.जी.प्रा. व श्री समुद्रगुप्त पाटील यांच्या सोबत स्थळभेट दित्र17.03.2000
3. व्यास प्रकाशचंद्र प्रा., इतिहासलेखनशास्त्र, अभिजित पब्लिकेशन्स, लातूर
4. लातूर जिल्हा गॅझेटियर

# कोटतीर्थ येथील शिल्पवैभव

डॉ. सुभाष रामराव रगडे
नांदेड

**प्रस्तावना :**

'दक्षिण गंगा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीचे खोरे हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे खोरे आहे. गोदा खोरे हे अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार आहे. हे खोरे अनेक शिल्प, स्थापत्य आणि पुरातत्त्वीय अवशेषांनी व्यापलेले आहे. गोदा काठावर अनेक मंदिरे, किल्ले, गढी, शिल्पे आणि घाट आहेत. शिल्प–स्थापत्यांनी संपन्न असा गोदेच्या किनारा नांदेडला लाभला आहे. नांदेड जिल्हयास फार प्राचीन परंपरा आहे.[1] नांदेड या जिल्हयाच्या ठिकाणापासून 15 कि.मी. अंतरावर नैऋत्य दिशेस कोटीतीर्थ हे गाव आहे. 'दक्षिण गंगा' म्हणजे गोदावरीच्या डाव्या किनाऱ्यावर हे गाव वसलेले आहे. गोदावरी येथे दक्षिण–उत्तर वाहते. या गावच्या आग्नेय दिशेस गोदावरी नदीवर सुप्रसिद्ध उपसा जलसिंचन प्रकल्प आहे. या उपसा जलसिंचन प्रकल्पाला महाराष्ट्र सरकारने कै. शंकरराव चव्हाण प्रकल्प असे नाव दिले आहे.[२] या प्रकल्पाच्या खालच्या बाजूस, गोदेच्या डाव्या किनाऱ्यावर महादेव मंदिर आहे.[3] या मंदिराच्या परिसरात एका ओटयावर खंडोबा, गणपती, नंदी, शिवलिंगे, यक्ष आणि हनुमान यांची शिल्पे आहेत. या सर्व शिल्पांची निर्मिती काळ्या पाषाणात केलेली आहे. या शिल्पांची शैली, अंलकरण आणि सुबकता यांचे निरीक्षण केले असता त्यांचा काळ यादवांच्या नंतरचा वाटतो. साधारणतः इ.स. १५ व्या १६ व्या शतकातील ही सर्व शिल्पे आहेत. या प्रत्येक शिल्पांची माहिती पुढीलप्रमाणे

**गणपती शिल्प :–**

गणपती हा गणेश, गजानन या नावाने सुपरिचित आहे. हा भारतातील प्राचीन देव आहे. प्रा.फौचर यांच्या मते, गणेश ही प्रथम आर्येत्तरांची देवता होती. आर्येत्तरांची ही देवता पुढे वैदिकांनी स्वीकारली.[४] महाराष्ट्रात सातवाहन काळापासून गणपती पुजा सुरु झाली. गणपतीचे चतुर्भूज, षडभुज, दशभुज, अष्टादशभुज इ. अनेक रुपांत वर्णन केलेले आढळते. इ.स. पू. दुसऱ्या शतकापासून गणपतीच्या प्रतिमा निर्माण होण्यास शुंग–कुषाण कालखंडात प्रारंभ झाले.[५] पराक्रमी पेशव्यांचे आराध्य दैवत गणपती होते.[६] गणपती किंवा गजाननाचे कान सुपासारखे, बुटका, चार हातांचा, तीन डोळयांचा, अंकुश व नागपाशिका अनुक्रमे वरच्या उजव्या व डाव्या हातात धारण केलेले असतात.[७] गणपतीचे शिर हे गजाचे असले तरी त्याचा एक तुटलेला दात हातात असतो व दुसरा मुखाला असतो. त्याचे उंदीर हे वाहन आहे.[८] कोटीतीर्थ येथील गणेशाचे शिल्प 26 सेमी उंच, 24 सेमी रुंद आहे. गणपतीचे हे शिल्प चतुर्भुज आहे. वरच्या उजव्या व डाव्या हातात अंकुश व नागपाशिका आहेत. उजवा हात अभय मुद्रेत आहे. डाव्या हातात पाश आहे. या शिल्पातील गणेशाचे गजमुख असून कान सुपासारखे आहेत. पोट सुटलेले आहे. उजव्या पायात बाक आहे आणि डावा पाय दुमडलेला आहे. चौरंगावर गणपती बसलेला आहे, असे आकर्षक हे शिल्पाकंन आहे. गणपतीचे उंदीर हे वाहन या शिल्पात दिसत नाही.[९]

**खंडोबा शिल्प :–**

खंडोबा हे प्रसिदध लोकदेवता आहे. मल्हारी, मार्तंड, मार्तंडभैरव, म्हाळसाकांत, मैलारी इ. नावांनीही खंडोबा प्रसिद्ध आहे. रा. चिं. ढेरे यांच्या मते, हे दैवत सुमारे अकराव्या शतकापासून विशेष लोकप्रिय झााले.[१०] खंडोबा हा ऐतिहासिक वीरपुरुष आहे. प्राचीन काळापासून त्यास देवता मानण्यात येते. प्राचीन काळापासून खंडोबाची पुजा भारतीय समाजात प्रचलीत आहे.[११] अश्वरुढ, उभ्या व बैठया अशा विविध स्वरुपात खंडोबाच्या मुर्ती आढळतात. चतुर्भुज, कपाळाला भंडार, हातात डमरु, त्रिशूळ, खडग,

पानपात्र, वाहन घोडा आणि म्हाळसा व बाणाई या भार्या असे त्याचे वर्णन आढळते.[१२] कोटीतीर्थ येथील महादेव मंदिराच्या परीसरात खंडोबाचे एक शिल्प आहे. या शिल्पाची उंची 45 सेमी व रुंदी 33 सेमी आहे. खंडोबा आपल्या पत्नीसह घोडयावर स्वार आहेत. खंडोबाच्या मिशा पिळदार आहेत. कानात कुंडले आहेत. खंडोबाच्या उजव्या हातात खडग आणि डाव्या हातात ढाल आहे. पत्नीच्या हातात घोडयाची लगाम आहे. खंडोबाचा लढाऊ बाणा दर्शवणारे शिल्प शिल्पकाराने साकारले आहे.[१३]

**यक्ष शिल्पे :—**

प्राचीन भारतीय शिल्पकलेमध्ये यक्ष—यक्षी यांची शिल्पे मोठया प्रमाणात आढळून येतात.[१४] आर्यांनी यक्षपूजा आर्येत्तरांकडून घेतली. यक्षपूजा वेदपूर्व काळापासून चालू आहे. यक्षपूजेचा ऱ्हास झाल्यानंतर यक्षांची शुद्र देवतांमध्ये गणणा झाली.[१५] यक्ष—यक्षी अतिमानुषी शक्तींच्या पण सौम्य व अनुकूल देवता समजण्यात येत. यक्ष मूर्तीकडे पाहिले तर ते अंगाने स्थूल, ठेंगणे पण प्रसन्न मुद्रेचे दिसतात.[१६] कोटीतीर्थ येथील महादेव मंदिराच्या परिसरात दोन यक्ष शिल्पे आहेत. ही दोन्ही शिल्पे सारखीच आहेत. त्यांची उंची 33 सेमी व रुंदी 26 सेमी आहे. यक्षांच्या गळयात अलंकार आहेत. उजव्या हातात जपमाळा आहे. डाव्या पायात किंचित बाक आहे. शिल्पांची ओठे थोडे जाड आहेत. चेहऱ्यावरील भावात प्रसन्नता साकारण्यात शिल्पकार यशस्वी झाला आहे.[१७]

**हनुमान शिल्प :—**

हनुमान हा बंजरंगबली मारुती, पवनसुत, अंजनीसुत इ. नावांनी प्रसिदध आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक गावात हनुमान मंदिर आहे. हनुमान मूर्तीत मात्र विविधता दिसून येते. हनुमानाच्या प्रतिमा इ.स. च्या आठव्या—नवव्या शतकापासून मिळू लागतात.[१८] कोटीतीर्थ येथील महादेव मंदिराच्या परिसरात हनुमानाचे एक शिल्प आहे. या शिल्पाची उंची 35 से. मी. व रुंदी 29 से.मी. आहे. कमी जागेत हनुमानाचे धष्टपुष्ट शरीर शिल्पांकीत करण्यात शिल्पकार यशस्वी झाला आहे. चेहऱ्यावरील भाव प्रसन्न आहेत. उजव्या हातात गदा आणि डाव्या हातात पर्वत घेतलेला मारुती उड्डाण स्थितीत आहे. दोन्ही पायांच्या मधे कंबरेचा सोंगटा लोंबलेला आहे. या शिल्पाच्या गळयात छातीपर्यंत आलेला अलंकार आहे. डोक्यावरील टोप शिल्पाचे आकर्षण जास्तच वाढवितो.[१९]

**नंदी :—**

गणपतीचे वाहन उंदीर, विष्णुचे वाहन गरुड त्याप्रमाणे शिवाचे वाहन म्हणून नंदी प्रसिदधी आहे. नंदी म्हणजे वृषभ होय.[२०] महादेवाच्या बैलाचा नंदी म्हणून ओळखले जाते.[२१] नंदी हा बसलेला असतो. नंदीची स्थापना शिवलिंगासमोर केली जाते. त्याची शिंगे आखूड व टोकदार असून वशिंड खूपच मोठे असते. पुढचा पाय अंगाखाली मुडपलेला असला, तरी दुसरा उचलून किंचित पुढे टाकलेला असतो. गळयात व पाठीवर घुंगरांच्या आणि घटांच्या माळा, साखळया, पायात घुंगराचे चाळ अशा अनेक अलंकारांनी नंदीमूर्ती नटविलेली असते.[२२] कोटीतीर्थ येथे दोन नंदी आहेत. ते मुख्य मंदिराच्या शिवलिंगासमोर न ठेवता अन्य ठिकाणी ठेवले आहेत. त्यांची मुखे पश्चिम दिशेला आहेत. या दोन नंदी पैकी एका नंदीचा मुखाचा भाग फुटलेला आहे. त्याच्या खाद्यांच्या पाठीमागून गळयापर्यंत घुंगराच्या माळांचे अलंकाराने शिल्पकाराने शिल्पांकीत केले आहे. या घुंगराच्या माळेला मध्यभागी मोठी घंटा शिल्पांकीत केली आहे. मागचा व समोरचा पाय (उजवा) बसल्यामुळे दुमडलेल्या स्थितीत दाखविण्यात शिल्पकार यशस्वी झाला आहे. डावा पाय किंचित पुढे टाकलेला आहे. पायात घुंगराचे चाळ आहेत. आकाराने हा नंदी धष्टपुष्ट असला तरी शिल्पाकंनामुळे नाजूमक व आकर्षक दिसतो. दुसरा नंदी सुस्थितीत आहे. परंतु शिल्प निर्मिती कार्य अर्धवट सोडून दिलेले आहे.[२३]

**शिवलिंग :–**

भारतात विविध ठिकाणी महादेव मंदिर व शिवलिंगे मोठया प्रमाणात आढळून येतात. शिवलिंगालाच महादेवाच्या पिंडीची शाळुंखा देखील म्हटले जाते. प्राचीन काळापासून शिवलिंगाची निर्मिती व पुजा केली जाते. सिंधू संस्कृतीच्या धार्मिक कृत्यात लिंग आणि योनी च्या प्रतिकाची पूजा केली जात असे.[२४] आर्यांच्या पूर्वीपासूनच चालत आलेल्या लिंग पूजेला प्रस्थापितांशी जुळवून घ्यायचे, या हेतूने आर्यांनी स्वीकारले आणि शिव हा आर्य आणि अनार्य यांच्यासाठी सारखाच पुजनिय ठरला.[२५] मखलिंग, विग्रहलिंग, स्थाणुलिंग हे लिंगाचे तीन प्रकार आहेत. मुखलिंग प्रकारात शिवलिंगावर मानव मुख कोरलेले असते. तर स्थाणुलिंग प्रकारात कोणतेही मुख किंवा प्रतिमा नसते तर लहानसा थोडा उंच असा गुळगुळीत दगड असतो.[२६] कोटीतीर्थ येथे 5 शिवलिंगे आहेत. ते काळयाभोर पाषाणात निर्माण केलेली आहेत. ती शिवलिंगे स्थाणुलिंग प्रकारातील आहेत. या पाचही शिवलिंगाचा व्यास अनुक्रमे 58 से.मी., 54 से.मी., 54 से.मी.,60 से.मी., 62 से.मी. आहे.[२७] अशाच प्रकारची शिवलिंगे गोदावरीच्या किनाऱ्यावर असणाऱ्या विविध मंदिरात दिसून येतात. सर्वसाधारणतः या सर्व श्विलिंगाची रचना सारखीच आहे.

**समारोप :**

गोदाकाठावर असलेल्या कोटीतीर्थ येथील महादेव मंदिराच्या परिसरातील गणपती, खंडोबा, हनुमान, यक्ष, नंदी आणि शिवलिंग यांची शिल्पे वैशिष्टयपूर्ण आहेत. शिल्पकाराने आपल्या छन्नी हातोडयातून चिरंतन अशी ही शिल्पे साकार केली आहेत. ही शिल्पे म्हणजे इतिहासाची प्राथमिक दर्जांची पुरातत्त्वीय साधने आहेत. गेल्या कित्येक शतकांपासून ही शिल्पे ऊन्ह, वारा, पाऊस आणि थंडी या निसर्गातील बदलाला सामोरे जात आहेत. त्यांचे जतन, रक्षण करणे गरजेचे आहे. पुराणमतवादी पुरातत्त्वज्ञ असो अथवा नवपुरातत्त्वाचा समर्थक असो, त्याला जो पुरावा मिळतो त्याचे मूल्यमापन करण्यासाठी त्या पुराव्याचे शुदधीकरण व जतन करणे अत्यावश्यक असते.[२८] पुरात्त्वखाते, इतिहास संशोधक आणि अतिहासप्रेमी नागरिकांनी वेळीच या शिल्पाची दखल घेऊन त्यांचे रक्षण करावे. तसेच या शिल्पाव्यतिरिक्त अजुन काही शिल्पाव्यतिरिक्त अजून काही शिल्पावशेष त्या परिसरात आहेत का ? असल्यास त्यावर सखोल संशोधन होणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची व टीपा :**

1. महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्राचे जिल्हे नांदेड, महाराष्ट्र सरकारच्या प्रसिदधी खात्याचे प्रकाशन, पृ.5.
2. देशमुख रा.नी., आपला नांदेड जिल्हा, कल्पना प्रकाशन, नांदेड जुलै 2009, पृ.10.
3. हे महादेव मंदिर आधुनिक आहे. इ.स.22006–07 स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत आधुनिक पदधतीने या मंदिराचे बांधकाम केलेले आहे. त्यामुळे हे मंदिर स्थापत्याबाबतीत ऐतिहासिक नाही.
4. जोशी महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड2, पुणे, 1985,पृ. 700.
5. कठारे अनिल, माहूर लेणी, त्रै. भारतीय इतिहास आणि संस्कृति, मुंबई, वर्ष 46, पुस्तक 183, ऑक्टों–डिसें–2009,पृ.15.
6. केळकर कमल, विदर्भातील प्राचीन मूर्ती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2002, पृ.87.
7. कुलकर्णी र.पु.(अनु), शिल्पप्रकाश,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, जाने.2000,पृ.95.
8. जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश, खंड 4, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 1976, पृ.805.
9. स्थळाल भेट आणि छायाचित्रण,दि.06.10.2009.
10. जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), उपरोक्त खंड 4, पृ.517.

11.कठारे अनिल, साखरे विजया, मंदिरे आणि मूर्तिशिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड, डिसें. 2008,पृ.156.
12.जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), उपरोक्त खंड 4, पृ.517.
13.स्थळाला भेट आणि छायाचित्रण, दि.06.10.2009.
14. माटे म. श्री., प्राचीन भारतीय कला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मित मंडळ, नागपूर, 1974, पृ.38.
15. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), उपरोक्त, खंड, 4, पृ.42.
16. कित्ता.
17. स्थळ भेट व छायाचित्रण, दि.06.10.2009.
18. कठारे अनिल, साखरे विजया,उपरोक्त, पृ.161.
19. स्थळाला भेट व छायाचित्रण, दि.06.10.2009.
20. जोशी नि.पु., भारतीय मूर्तीशास्त्र,महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, 1979, पृ.323.
21. Gopinath Rao T.A., Elements of Hindu Iconography, Vol. I.Part II, Delhi, Reprint 1968, P.460.
22. जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), उपरोक्त, खंड 8, 1979, पृ.265.
23. स्थळाला भेट व छायाचित्रण, दि.06.11.2009.
24. मुखर्जी राधाकुमुद, प्राचीन भारत,राजकमल प्रकाशन, दिल्ली, 2004,पृ.23.
25. लंवगारे–वर्मा प्राजक्ता (संपा.), लोकराज्य(मासिक), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, वर्षे 61 वे, अंक 8 वा, ऑक्टो.2009, पृ.39.
26. फडतरे भूषण, वाघोली येथील वाघेश्वर मंदिर त्रै.भारतीय इतिहास आणि संस्कृति, मुंबई, वर्षे 45 वे, पुस्तक 180, जाने–मार्च 2009, पृ.19.
27. स्थळाला भेट आणि छायाचित्रण, दि.14.11.2009.
28. देव शां.भा., पुरातत्त्वविद्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, 1976, पृ. 141.

# वेरुळ लेणीतील त्रिपुरांतक मूर्तीशिल्प

डॉ.भेलोंडे जगदीश व्यंकटराव
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्‌यालय,
कन्नड, औरंगाबाद. मो. नं.९८६०१७१९९८

**प्रस्तावना**

औरंगाबाद पासून ३० कि.मी.अंतरावर वेरूळ गाव आहे. गावाजवळच असलेल्या डोंगरातून एलगंगा नदीचा उगम होतो. त्यावरून या गावास प्राचीन काळी एलापुर नाव होते. वेरूळ परिसराचा सातवाहन व वाकाटक राजवटींशी संबंध आलेला आहे. परंतु येथील लेणीची निर्मिती चालुक्य व राष्ट्रकूटांच्या काळात झालेली आहे. वेरूळ हे काही काळ राष्ट्रकूटांच्या राजधानीचे ठिकाण होते. व्यापारी मार्गावर असलेल्या गावालगतच डोंगरामध्ये जैन, बौद्ध व हिंदू धर्मियांसाठीच्या लेणीची निर्मिती करण्यात आली. याठिकाणी असलेल्या एकूण 34 लेणी पैकी लेणी क्रमांक 13 ते 29 हिंदू धर्मियांसाठी निर्माण केलेल्या आहेत. लेणी व मूर्तीशिल्प निर्मितीमागे निश्चितच धार्मिक दृष्टिकोन होता. देव-देवतांना दगडांच्या माध्यमातून मानवी रूपामध्ये आकार देत असताना पौराणीक कथा, आचार-विचार, भाव-भावनांची व परंपराची योग्य सांगड कारागिरांनी घातलेली आहे. हिंदू लेणी मध्ये असलेले त्रिपुरांतक मूर्तीशिल्प शिव या देवतेच्या संदर्भात आहे.

**गृहितके**

शिवाचे त्रिपुरांतक मूर्तीशिल्प केवळ पौराणिक कथेवर आधारित निर्माण झाले. तत्कालीन समाजामध्ये पौराणिक कथांचा प्रभाव होता. पुरे नष्ट करण्याची घटना अनार्य संस्कृतीशी संबंधित असावी.

**उद्दिष्ट**

शिवाची त्रिपुरांतक मूर्तीशिल्प व त्यासंदर्भात वेरूळ येथे निर्माण झालेल्या त्रिपुरांतक मूर्तीशिल्पांच्या इतिहासाचा अभ्यास करणे आणि मूर्तिशिल्प निर्मितीमागे कारागिरांच्या दृष्टीकोनाचा आढावा घेणे.

**शिव**

सृष्टीची उत्पत्ती, स्थिती व लयासंबंधीचे कार्य देवतांवर सोपविण्यात आले. याकरिता ब्रह्मा, विष्णू व शिव या देवतांची निर्मिती करण्यात आली. शिवदेवता दुष्टांचा संहार करते, तो शीघ्रकोपी आहे, हा स्मशानात राहणारा, अंगाला राख फासलेला, संहारकर्ता म्हणून ओळखला जातो. शिव व शक्तीच्या संयोगातून सृष्टीची निर्मिती झाली असलीतरी शक्तीला नियंत्रित करण्याचे कार्य शिवाकडून होत असते. शिव या सर्व शक्तिशाली देवतेची उपासना शिवलिंगाच्या स्वरूपात व शिवमूर्तीच्या स्वरूपातही केली जाते.

शिवाची उपासना लिंग व मूर्तीच्या स्वरूपामध्ये हडप्पाकालीन संस्कृतीमध्ये प्रचलित होती. हडप्पापूर्व काळातही शिवाची उपासना लिंगाच्या स्वरूपामध्ये होत होती. आर्यपूर्व भारतीय संस्कृती मध्ये पूजनीय असलेल्या शिवाचा उल्लेख आर्यांच्या 'ऋग्वेद या ग्रंथात रूद्र असा आला आहे. यजर्वेदामध्ये शिवास वनस्पती, मानव व पशूंचा महान देव म्हणून ओळखण्यात

आले. तर अथर्व वेदामध्ये शिव शर्व, पशुपती, रुद्र, उग्र, भव, महादेव, एकव्रात्य या नावाने ओळखला जात असे.'[१] चंद्रशेखर, कपर्दिन, शितिकंठ व विरुपाक्षा, त्रिलोचन, धूर्जटी, नीललोहित, व्योमकेश, त्र्यंबक, भीम, उग्र, इत्यादी अशी ४८ शिवाची नावे अमरकोशामध्ये आहेत.[२] गुप्तकालीन अभिलेखामध्ये ईश, भूतपति, महाभैरव, ईश्वर, हर, जयदेव, कपालेश्वर, कोक मुखस्वामी, महेश्वर, पशुपती, पिनाकी, शंभु, शर्व, शिव, स्थागुण, शूलपाणि, शुरभोश्वर, त्रिपुरांतक, भवसृज, इत्यादी नावाने शिवाचे वर्णन केले आहे.[३]

शिवाच्या अवतारासंबंधित किंवा त्याच्या कार्यासंबंधित विविध स्वरूपाच्या मूर्ती निर्माण करण्यात आलेल्या आहेत. शिवाच्या नटराज, अंधकासुरवध, त्रिपुरांतक, रावणानुग्रह, उमामहेश्वर, चंद्रशेखर, लकुलीश, विरभद्र, भैरव, अर्धनारीश्वर, कल्याणसुंदर, सदाशिव, गंगाधर, गजासुरमर्दन, हरिहर, शरभ, महासदाशिव, महाकाल व इत्यादी प्रकारच्या मूर्तींची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रत्येक मूर्तीशिल्पाची वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. शिवाने धारण केलेली आयुद्धे व त्यासोबत संबंधित असलेल्या परिवार देवतांच्या व अवताराच्या मूर्तीशिल्पावरून त्याच्या विविध स्वरूपाच्या मूर्ती तयार करण्यात आल्या आहेत.

**त्रिपुरांतक शिव**

त्रिपुरांतक मूर्तिशिल्प हे शिवाचे संहारक प्रकारातील मूर्तिशिल्प आहे. शिवाच्या त्रिपुरांतक अवतारासंबंधात अशा प्रकारची कथा पहावयास मिळते की, 'तारकासुर नावाच्या असुराचे विद्रून्माली, तारकाक्ष व कमलाक्ष या तीन मुलांनी ब्रह्मदेवाची आराधना करून तीन पुरे मिळवली.'[४] ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार 'मयाने त्यांना स्वर्ग, अंतरिक्ष व पृथ्वी यावर तीन पुरे बांधून दिली. परंतु ब्रम्हदेवाने त्यांना सांगितले की, स्वर्ग अंतरिक्ष व पृथ्वी एकाच रेषेत आले असता एका बाणाने ही पुरे नष्ट होतील. तारकासुरांच्या मुलांना ही पुरे नष्ट होणे अशक्यच वाटले. उन्मत झालेल्या तीन मुलांनी देवतांना त्रास देण्यास सुरुवात केली. देवतांनी या त्रासातून सुटण्यासाठी ब्रह्मदेवास उपाय विचारला असता ब्रह्मदेवाने शिवाने बाण मारल्यास तीन पुरे नष्ट होतील असे सांगितले त्याप्रमाणे शिवाने विष्णू, अग्नी व यमयांच्याकडून शक्ती घेऊन बाण तयार केला. वेदांचे धनुष्य व सावित्रीचे दोरी करून बाणाने तीन पूरे फोडली व या तीन मुलांचा नाश केला.'[५] अशा प्रकारची कथा आहे. तर 'महाभारतात सोने-चांदी व लोखंडाची तीन किल्ले मयासुराने बांधून दिले. जे हजार वर्षात एकदा एका बिंदूवर यावेत आणि त्यावेळी कोणी बाणाने त्यांना पाडले तर ते नष्ट होणार होते. शिवाने ते बाणाने नष्ट केले.'[६] अशा प्रकारची कथा आहे. तीन पुरांचा नाश केला त्यामुळे शिव हा त्रिपुरांतक या नावाने ओळखला जातो.

**त्रिपुरांतक मूर्तीशिल्प**

शिवाशी संबंधित असलेल्या वरील त्रिपुरांतक कथेचा आधार घेऊन शिवाचे त्रिपुरांतक प्रकारातील मूर्तिशिल्पांची निर्मिती करण्यात आली. त्रिपुरांतक मूर्तीशिल्पामध्ये शिवाचे रथामध्ये उभे असलेले व एकाच ठराविक वेळी तीन पुरांचा नाश करण्याच्या उद्देशाने बाण वरच्या दिशेने मारत असल्याचे दाखवण्यात येते तर काही ठिकाणी तीन घरे एकाच रेषेत दाखवली जातात. त्याचबरोबर रथाचा सारथी म्हणून ब्रह्मदेव असल्याचे दाखवण्यात येते.

**वेरूळ लेणीतील त्रिपुरांतक मूर्तीशिल्प**

वेरूळ येथील लेणी क्र. १५ मध्ये सभामंडपाच्या डाव्या बाजूस त्रिपुरांतक शिवाचे मूर्तीशिल्प आहे. रथावर आरूढ असलेल्या शिवास सहा हात दाखवले असून डाव्या एका हातात बाण धरलेला आहे. दुसऱ्या डाव्या हातात ढाल आहे तर तिसऱ्या वरच्या हातातील अयुद्ध अस्पष्ट आहे. उजव्या हाताने बाणाची दोर तानलेली आहे. दुसऱ्या उजव्या एका हातात खडक आहे तर तिसऱ्या उजव्या हाताने पाठीवरील भात्यातून बाण काढत आहे. रथास एका बाजूने दोन चाके दाखवले आहेत. त्याच बरोबर रथ ओढणारे घोडे दाखवले आहेत. तर रथाचा सारथी म्हणून ब्रह्मदेव आहे. शिवाने आपला बाण आकाशाच्या दिशेने भिरकावला असल्याचे दृश्य आहे.

लेणी क्र. १६ मध्ये कैलास मंदिराच्या पाठीमागे ओवरीच्या भिंतीमध्ये त्रिपुरांतक शिवाचे मूर्तीशिल्प आहे. रथावर आरूढ असलेल्या शिवास सहा हात आहेत. रथास एक चाक दर्शनीय आहे. रथावर चाकाच्या दोन्ही बाजूस मांगल्याचे प्रतीक असलेले कलश कोरलेले आहेत. रथाच्या समोर घोडे आहेत. या शिल्पपटामध्ये घोड्यांसाठी जागा कमी आहे. रथावर सारथी म्हणून ब्रह्मदेव बसलेला आहे. शिवाच्या डाव्या एका हातात बाण धरलेला दाखवलेला आहे, दुसऱ्या डाव्या हातात खट्वांग आहे तर तिसऱ्या हातात ढाल असावी. उजव्या एका हाताने बाणाची दोर तानलेली आहे. दुसऱ्या एका हाताने भात्यातील बाण काढत आहे व तिसऱ्या हातातील अयुद्ध अस्पष्ट आहे.

लेणी क्र. १६ मध्येच त्रिपुरांतकाचे आणखी एक शिल्प कैलाश लेणीमध्ये प्रवेश करताच उजव्या बाजूला वळल्यानंतर भिंतीवर हे शिल्प आहे. शिवाचे हे शिल्प रथावर अरूढ असून रथ अस्पष्ट आहे. शिव द्विभूज आहे. डाव्या हाती बाण धरलेला आहे तर उजव्या हाताने बाणाची दोर ओढत असल्याचे दाखवले आहे. रथास दोन घोडे दाखवले असून सारथी ब्रह्मदेव आहे. वेरूळ येथील कोणत्याही लेणीमध्ये त्रिपुरांतक शिल्पपटामध्ये तीन पुरे दाखवले नाही तर शिवाने केवळ बाण वर धरलेला दाखवला आहे.

**शिव व त्रिपुरांतक कथा**

शिवाच्या त्रिपुरांतक संदर्भात सांगितलेल्या कथेतून मय नावाच्या वास्तूविशारदाचा उल्लेख होतो. त्याने आश्चर्यकारक वास्तूंची निर्मिती केली, आर्यपूर्व काळातील येथील अनार्यांची सिंधू संस्कृती प्रगत होती. सिंधू संस्कृतीमधील उत्कृष्ट वास्तू उत्खननातून प्राप्त झालेल्या आहेत. सिंधू संस्कृतीतील नगरे उद्ध्वस्त स्वरुपात मिळालेली आहेत. कृषी व जलसंस्कृतीचा वारसा असलेल्या या संस्कृतीमधील बहुतांश नगरांना तटबंदी किंवा किल्ले असलेले दिसते. “हडप्पा संस्कृतीच्या विविध स्थळांचे उत्खनन केले असता त्यामध्ये तटबंदी, बुरुजे व किल्ल्यांचेही अवशेष प्राप्त झालेले आहेत. कोटदिजी शहराची तटबंदी साधारण १४ फूट उंच व १० फूट रुंद या आकाराची होती तर मोहनजोदडो येथे असलेला दुर्ग ३६५ मीटर लांबी १८३ मीटर रुंदीच्या आकारामध्ये विस्तारलेला होता.[७] ऋग्वेद या ग्रंथातून शत्रुंच्या विरोधात सुरक्षेसाठी बनवलेल्या मातीच्या भिंतीचा उल्लेख आला आहे. दुर्ग किंवा पुर अशा प्रकारचा उल्लेख किल्ल्यासंदर्भात त्यातून आढळतो.[८] ऋग्वेदामध्ये शंबर नावाच्या असूर शत्रूचे इंद्राने किल्ले किंवा पुरे फोडल्याचे अनेक उल्लेख आहेत. त्यामुळे तो पुरंदर म्हणून ओळखला जातो.[९] अनार्य असूरांवर विजय मिळवण्यासाठी अनार्यांची कृषी व्यवस्था नष्ट करण्याच्या

उद्देशाने इंद्राने त्यांची धरणे फोडली. सिंधु संस्कृतीही कृषिप्रधान संस्कृती होती. शिव ही देवता सिंधू व कृषी संस्कृतीशी संबंधित असल्यामुळे या देवतेकडून पुरांचा नाश होणे शक्य नसावे. शिव हा कृषी संस्कृतीशी संबंधित असल्याचे त्याचे वाहन वृषभ यावरून स्पष्ट होते. तेव्हा इंद्र या आर्यांच्या देवतेने अनार्यांची धरणे फोडल्याची घटना शिवाशी संबंधित करून कथेच्या स्वरूपात पुराणातून मांडण्यात आली असावी. सदरील घटनेचा शिव या देवतेशी संबंध जोडण्यामागे शिवास स्वकियांच्या विरोधात उभे करण्याच्या उद्देशाने ही कथा मांडली आणि याच पुराणकथांचा आधार घेऊन कारागिरांनी त्रिपुरांतक मूर्तिशिल्पाची निर्मिती केली.

**निष्कर्ष**

वेरूळ येथील हिंदू लेणी मध्ये शिव या देवतेच्या विविध मूर्तीशिल्पांबरोबरच शिवाचे त्रिपुरांतक मूर्तीशिल्प कोरलेले आहे. सदरील मूर्तीशिल्प कथेवर आधारित आहे, मयाने निर्माण केलेली तीन पुरे शिव या देवतेकडून बाणाने फोडल्याचे हे दृश्य आहे. मयाने आश्चर्यकारक वास्तूची निर्मिती केली, अशा वास्तू वैदिक संस्कृतीच्या पूर्वी सिंधू संस्कृतीत आढळतात तेव्हा मय हा अनार्यांचा किंवा असुरांचा वास्तुविशारद ठरतो. शिव ही अनार्य देवता म्हणून ओळखला जातो. अनार्य संस्कृतीत असलेली जल व्यवस्थापन व्यवस्था व किल्ले ही शिवाकडून फोडली हे दाखवण्यासाठी शिवाशी संबंधित त्रिपुरांतक कथा रचण्यात आली असावी, म्हणजे शिव या देवतेस स्वकियांच्या विरोधात उभे करण्याचे काम सदरील कथेच्या माध्यमातून करण्यात आले आहे व ही कथा मूर्तीशिल्पांच्या माध्यमातून टिकवून ठेवलेली आहे.

**संदर्भ**


१. आनंद सिंह-प्राचीन भारतीय धर्म-हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, प्रथम संस्करण- एप्रिल २०१० पृ. २०५

२. देगलूरकर गो. बा. -शिवमूर्तेय नम: - स्नेहल प्रकाशन, पुणे-प्रथमावृत्ती २०१४ पृ २२

३. डॉ.अहिरराव राजकुमार- भारतीय कला विविध आयाम-आर बी एस ए प्रकाशन, जयपूर प्रथम संस्करण २०१२ पृ.१४४

४. डॉ. माटे म.श्री.- प्राचीन कला भारती-कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती १९९८ पृ. १४६

५. डॉ. खरे ग. ह.-मूर्तिविज्ञान -भारतीय इतिहास संशोधक मंडळ, पुणे प्रथमावृत्ती १९३९ पुंनर्मुद्रण २०१२ पृ.११२

६. डॉ. जोशी नि.पु.- भारतीय मूर्तीशास्त्र- महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती १९७९ पृ.१७२

७. रामसिंह- प्राचीन भारतीय युद्धव्यवस्था- राधाकृष्ण प्रकाशन प्राईवेट लिमिटेड,नई दिल्ली- १९८७ पृ.७२-७३

८. कित्ता पृ.८७

९. डॉ. साळुंखे आ.ह.- बळीवंश- लोकायत प्रकाशन, सातारा प्रथमावृत्ती २००५ पृ.८०




**लेणी क्र. १५**



**लेणी क्र. १६**

# प्रतिमापूजनाचा प्रारंभिक इतिहास

**प्रा.डॉ.गंगथडे आर.डी.**
इतिहास विभागप्रमुख
के.टी.पी. महाविद्यालय, हडोळती
ता.अहमदपूर जि.लातूर

## प्रस्तावना

भक्ती ही मानवाच्या अध्यात्मिक जीवनासाठी अत्यावश्यक बाब आहे. मात्र भक्ती करण्यासाठी उपासकाला ज्याची उपासना करावयाची आहे, त्या देवतेच्या मूर्तीला माध्यम कल्पावे लागते व त्या माध्यमाच्या सहाय्याने चिंतन, पूजन करावे लागते. सगुण स्वरूपात ईश्वराला गृहीत धरून भक्तीची धारा प्रवाहीत करणे भक्तीमध्ये अनिवार्य असते. पूजा करणारा, उपासना करणारा मनुष्य आपल्या कुवतीनुसार, श्रद्धेनुसार ईश्वराची अनेक रुपे कल्पीत करत असतो. खरे तर  परब्रम्ह हे अशरीर आहे असे रामतापनीय उपनिषदात म्हटले आहे. तरीही भगवद्गीतेत सामान्य माणसासाठी सगुण उपासनेला प्राधान्य दिले असून जे भक्त एकाग्र चित्ताने निरंतन भजतात. अतिश्रेष्ठ श्रद्धेने मन सगुण रूप परमेश्वराला भजतात ते मला योग्यामधील अति उत्तम योगी वाटतात.[1] असे वर्णन आढळते. यावरून मूर्तीपूजा व गुणोपासना आवश्यक बाब होती नव्हे तर भक्तीचे महत्त्वाचे अंग होते असे लक्षात येते.

मूर्तीपूजा आणि प्रतिमा हे दोन्हीही शब्द कधीकधी एकाच अर्थाने वापरले जातात. 'प्रतिमा' या शब्दाचा शाब्दिक अर्थ प्रतिरुप, समान आकृती होय. पाणिनीनी आपले सूत्र श्वेचेप्रतिकृतौ (5, 3.93) मध्ये समरुप आकृतीसाठी प्रतिकृती शब्दाचा वापर केला आहे.[2] प्राचीन भारतात प्रतिमा शब्दाचा प्रयोग वैदिक काळातही आढळतो. ऋग्वेदात यज्ञाच्या स्वरूपाच्या संदर्भात प्रतिमा शब्दाचा उपयोग केला आहे.[3] ऋग्वेदात प्रतिमासाठी 'अर्च्या नु मन्वान : एषां देवान अर्च्याः ।'[4] असा शब्दप्रयोग आढळून येतो. प्रतिमेचा उपयोग मूर्तीसाठी केला जातो. मौलिक अर्थाने या दोन्हीत भिन्नता असून 'मूर्ती' या शब्दाचा अर्थ सामान्य माणसे, प्राणी, पशू–पक्षी यांच्या आकृती असा होतो तर साधारणतः प्रतिमा शब्दाचा अर्थ देवदेवता देवी, महात्मा, स्वर्गवासी पूर्वज व पूजेस पात्र अशा व्यक्तीच्या समरूप प्रतिकृतीसाठी केला जातो. प्रतिमा निर्मितीसाठी निश्चित तंत्र, शास्त्र आहे. तर मूर्ती निर्मितीसाठी शिल्पी, मूर्तीकार स्वातंत्र्य घेवू शकते. परंतु प्रतिमा व मूर्ती हे शब्दप्रयोग एकाच अर्थाने वापरल्याचे दिसते. प्रतिकात्मकता व धार्मिकता याच्या अनुषंगाने मूर्तीला एका विशिष्ट चौकटीत बसवून तिचे देवत्त्व स्थायीभावावरुन प्रकट केले जाते व तिचे पूजन केले जाते. ही प्रतिमा पूजनाची परंपरा भारतात प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे दिसते.

## सिंधू संस्कृतीतील प्रतिमापूजन

प्राचीन भारतातील संस्कृतीचा अभ्यास करताना अश्मयुगानंतर सिंधू संस्कृतीचा विचार करणे आवश्यक ठरते. सिंधू नदीच्या खोऱ्यात उदयास आलेल्या व विकसीत झालेल्या नगरांच्या अवशेषात अनेक प्रतिमांचे अवशेष प्राप्त होतात. परंतु तत्कालीन लिपीचे अद्यापही वाचन करणे शक्य न झाल्याने या प्रतिमा पूजनासाठी होत्या की त्यांचा आणखीन दुसऱ्या कारणासाठी उपयोग होत होता. याबाबत संशोधकात मतभेद आहेत. मात्र प्रतिमांच्या अस्तित्वाचे पुढीलप्रमाणे प्राप्त होता.

1) सिंधू संस्कृतीच्या उत्खननात मोठ्या संख्येने लिंगाकार दगड मिळाले असून याचा संबंध लिंगपुजेशी लावला जातो व मध्यभागी छिद्र असणारी काही गोलाकार दगड मिळाले आहेत. ही योनीपीठे मानली जातात.[5]
2) एका चौकोनी तुकड्यावर तीन डोकी असलेला व शिंगाचा मुकूट घातलेला एक पुरुष योगासनात बसलेला दाखविला आहे. या पुरुषाच्या आजूबाजूला म्हैस, गेंडा, हत्ती, वाघ व एक मानव प्राणी दिसतो. डॉ.मार्शल यांच्या मते, हा पुरुष शिवाचे प्रारंभिक रूप आहे.[6]
3) एका तुकड्यावर आसन घालून बसलेल्या पुरुषाच्या डोक्यावर फणा पसरलेला साप दिसतो व आजूबाजूस गुडघे टेकून उपासक बसलेले दिसतात.[7]
4) इतर तीन तुकड्यांवर जैन तीर्थंकराप्रमाणे कायोत्सर्गमुद्रेत उभे विवस्त्र असे वृक्ष–देव दाखवलेले आहेत. या प्रत्येकाच्या जवळ अर्धा वाकलेला व डोक्यावर साप असलेला उपासक आहे.[8]
5) मातीची इतर कित्येक तुकडे आहेत. ज्यावर मानव आकृत्या काढलेल्या आहेत. मॅकेची कल्पना आहे की, त्या गृहदेवता असाव्यात. त्याचप्रमाणे विशिष्ट वेशभूषा केलेल्या मातीच्या स्त्री प्रतिमाही प्राप्त झाल्या आहेत. यांना मातृदेवतेच्या प्रतिमा म्हटले आहे.[9]

सिंधू संस्कृती ही भारतातील प्रारंभिक संस्कृती होती. तत्कालीन सामाजिक, राजकीय बाबींचा विचार करता या संस्कृतीमध्ये पुरोहिताला महत्त्वाचे स्थान होते. मात्र प्रतिमापूजन या संस्कृतीत केले जात होते अथवा नाही याचे निश्चित पुरावे प्राप्त होत नसले तरी या संस्कृतीतील लोक पूजन करत असावेत व द्रविड लोकांच्या मूर्तिपूजेत याच संस्कृतीतील बीजे रूजली गेली असावीत.

**वैदिक व वेदोत्तर कालीन प्रतिमा पूजन**

वैदिक संस्कृतीतील लोक मूर्तीपूजक नव्हते तर ही संस्कृती यज्ञप्रधान होती. तेथील प्रतिमापूजनाबाबत मतभेद असले तरी त्या कालखंडात प्रतिमांचे अस्तित्व असल्याचे पुरावे प्राप्त होतात.

1) ऋग्वेदात एक ऋचा आहे ज्याचा अर्थ दहा घेतू घेवून माझ्या या इंद्राला कोण बरे विकत घेईल असा होतो. म्हणजे एखादा शिल्पी मूर्तीकार मूर्ती घडवून ती विकण्याची इच्छा व्यक्त केल्याचे दिसते.[10]
2) स्थिरैमिडैः पुरुरूप उग्रो ब्रभुः शुक्रेभिः पिपिशे हिरण्यैः।
   ईशानादस्य भूवनस्थ भूरे नर्वा उयोषद रूद्रादसुर्यम।।[11]

हे रुद्राच्या रंगीत मूर्तीचे वर्णन यावरुनही वैदिक काळात प्रतिमा निर्मिती होत असावी असे स्पष्ट होते.

3) इंद्र व अग्नीला अलंकृत करण्याची चर्चा[12] यावरुन इंद्र व अग्नीच्या प्रतिमा निर्माण करत असल्याची साक्ष देतात.
4) अग्निचयनात पुरुषाची सुवर्णप्रतिमा करून तिची स्थापना करावी असे यजुर्वेदतील एक मंत्रात म्हटले आहे.[13]
5) ऐतरेय आरण्यकात मी इंद्राचे शरीर तयार केले असा उल्लेख आढळतो.

या सर्व पुराव्यांवरून मूर्तीचे, प्रतिमेचे अस्तित्त्व मान्य होते. परंतु या प्रतिमा पूजनासाठी होत्या हे स्पष्ट होत नाही. मात्र वैदिक कालखंडातच आर्येत्तर किंवा द्रविड शुद्र जातीत मूर्तीपूजेचा उद्‌भव झाला होता असे मत मात्र डॉ.फरक्युलर व कारपेटीयर आणि बहुतांश विद्वानांनी मान्य केले आहे.[14]

**मौर्यकालीन व मौर्योत्तरकालीन प्रतिमापूजन**

वैदिक कालखंडापर्यंत प्रतिमा पूजनाबाबत एकवाक्यता आढळत नाही परंतु कौटिल्याच्या अर्थशास्त्रात देवप्रतिमा, देवता यांचे सविस्तर वर्णन आढळते. अपराजित,

अप्रतिहत, जयंत, वैजयंत, शिव, वैश्रावण, श्रीमदिरा इत्यादी नगरक्षक देवता व त्यांच्या देवगृहाच्या बांधण्याबाबत चर्चा कौटिल्याने केली आहे.[15] शुंग, सातवाहन काळात मूर्तीची निर्मिती धार्मिकतेच्या दृष्टिकोनातून झाली.[16] या कालखंडापासून ब्राम्हण धर्मातून भागवत धर्माची प्रारंभिक अवस्था सुरु झाली व ही प्रक्रिया गुप्तकाळापर्यंत विकसित होत गेली. शुंग व कण्व काळात गौतम बुद्धाचे अनूसर व उपास यांच्या मूर्तीही विपुल प्रमाणात दिसतात.[17] पाटलीपूत्र, भरहूत, सांची, सारनाथ, कौशंबी, गया, मथुरा, बेसनगर, जगय्यापेठ यासारखी मूर्तीकलेची केंद्रे या काळात विकसीत झाली व मूर्तीकलेला मूर्तता प्राप्त झाल्याचे दिसते.

## गुप्त व गुप्तोत्तर कालीन प्रतिमापूजन

गुप्तकाळ हा प्रतिमा व मूर्ती निर्मितीचा सुवर्णकाळ समजला जातो. ब्राम्हण धर्माची पुनर्प्रतिष्ठा व गुप्त राजांची सहिष्णू वृत्ती यामुळे हिंदूधर्मीय मूर्तीसोबतच जैन, बौद्ध मूर्तीकलेत देव–देवतांच्या मूर्तीच्या पूजेच्या अनुषंगाने बरीच रेलचेल वाढली. आध्यात्मिक गावांचीही अभिव्यक्ती झाल्याचे दिसते. गुप्तकाळाच्या नंतरच्या काळात स्वतंत्र मूर्तीची निर्मिती कमी झाली व मंदिराच्या अलंकरण मूर्तीला बहर आला.[18] मूर्तीकलेची व देवतांच्या प्रतिमांची निर्मिती व पूजनाचे संकेत, प्रतिमांच्या पूजनाचे विधी, महत्त्व सर्वत्र प्रसारित झाले. प्रतिमांच्या पूजनासोबतच प्रतिमांच्या निवासासाठी मंदिराची निर्मितीही सुरू झाल्यामुळे मूर्ती, प्रतिमा, शिल्प यांच्या विकासासोबत स्थापत्याच्या विकासास प्रारंभ झाल्याचे दिसते.

## समारोप

प्रतिमा म्हणजे प्रतिरूप होय. मूर्ती किंवा प्रतिमेचा उदय हा मनुष्याच्या कलात्मकतेतून झाला आहे. स्वतःच्या प्रतिबिंबाप्रमाणे किंवा प्रतिरुपाच्या कल्पनेतून मूर्तीची निर्मिती झाली आणि मूर्तीला ईश्वराचे प्रतिरूप मानण्याच्या दृष्टिकोनातून प्रतिमा पूजनास आरंभ झाला. कारण भक्ती करण्यासाठी साकार रूप अत्यंत महत्त्वाचे आहे. निर्गुण निराकार रुपाची भक्ती करताना भक्ताचे मन विचलीत होण्याचा जास्त संभव असतो. परंतु ईश्वराच्या सगुण साकारतेला स्थायी स्वरुपात मान्य करून त्या ईश्वराची आराधना करणे भक्तांसाठी सुलभ आहे. या भावातून बौद्ध धर्मातही प्रारंभी मूर्तीचे अस्तित्व नव्हते मात्र नंतरच्या कालखंडात बौद्ध, हिंदू, जैन धर्मात मूर्ती, प्रतिमांची रेलचेल वाढल्याचे दिसते. या मूर्तीनिर्मितीच्या प्रारंभीच्या कालखंडात हेतू हा आध्यात्माशी पूरक होता. हे सत्य मात्र नाकारता येत नाही. सिंधू संस्कृतीच्या कालखंडात, वैदिक कालखंडात सगुण साकार ईश्वर किंवा प्रतिमापूजन याबाबत निश्चित पुरावे प्राप्त होत नसले तरी त्यांचा संबंध आध्यात्माशीच असावा असे वाटते. मौर्य पूर्व कालखंड, मौर्य कालखंडात प्रतिमा पूजनाचे पुरावे प्राप्त होतात. मौर्य पूर्व काळापासून प्रतिमा पूजनाचे समाजात प्राबल्य वाढल्याचे लक्षात येते.

## संदर्भ


1) देगलूरकर गो.बं., शिवमुर्तये नमः, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2016, पृ.16
2) श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारत प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, 2007, पृ.1
3) सातवलकर श्री.दा. (संपा.) ऋग्वेद संहिता, 10 वे मंडल, 130.3, पृ.741
4) कित्ता, 7 वे मंडल, 9.19, पृ.400
5) मार्शल जे, मोहोंजोदाडे अँड इंडज सिव्हीलायझेशन, व्हॉल्यूम–1, पृ.59
6) जोशी नि.पु., भारतीय मूर्तीशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, 1971, पृ.17
7) कित्ता, पृ.17
8) कित्ता, पृ.17
9) कित्ता, पृ.17

10) सातवलकर श्रीपाद दामोधर (संपा.) ऋग्वेद संहिता, 4 थे मंडल, सुक्त 24.10, पृ. 255
11) कित्ता, 7 वे मंडल, 9.19, पृ.400
12) कित्ता, 1 ले मंडळ, 22.2, पृ.2
13) जोशी महादेवशास्त्री, भारतीय मूर्तीकला, अनमोल प्रकाशन, पुणे, 1980, पृ.2
14) जोशी नि.पु., उपरोक्त, पृ.19
15) जोशी महादेवशास्त्री, उपरोक्त, पृ.2
16) श्रीवास्तव ब्रजभूषण, उपरोक्त, पृ.271
17) जोशी महादेवशास्त्री, उपरोक्त, पृ.121
18) कित्ता, पृ.126

# नांदेड जिल्हयातील शिवमूर्तीचे प्रकार

**प्रा.डॉ. विजया साखरे**
**श्री. शिवाजी कॉलेज,कंधार**

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहास व संस्कृतीत कला व स्थापत्य यांना विशेष महत्त्व आहे. अश्मयुगीन व सिंधू संस्कृतीत अनेक कला अवशेष प्राप्त झालेले आहेत. प्राचीन भारतातील कला हिंदू, बौद्ध, जैन या धर्माच्या प्रेरणेतून निर्माण झाली. यापैकी हिंदू धर्मात विविध देवी-देवता आहेत. त्यांच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात आल्या. भारताच्या इतर ठिकाणांप्रमाणेच नांदेड जिल्हयात शैव, वैष्णव, शाक्त, सौर आणि गाणपत्य इ. संप्रदायाच्या मूर्ती आढळतात. ब्रम्हा, विष्णु व महेश(शिव) या हिंदू धर्मातील प्रमुख तीन देवता आहेत. त्यापैकी प्रस्तुत शोधनिबंधात शिवमूर्तीचे विविध प्रकार यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**शिवमुर्ती :**

भग आणि लिंग हे शक्ती आणि शिवाचे प्रत्यक्ष प्रतीक होय. सिंधु संस्कृतीपासून भारतात लिंगपूजा प्रचलित आहे. मोहोंजोदाडो आणि हडप्पा येथील उत्खन्नात शंकुच्या आकाराचे व दंडगोलाकार लिंग प्राप्त झाले आहे. हे लिंग चुना व दगडापासून बनविलेली आहेत. शिवपूजनाचे दुसरे प्रतीक म्हणजे शंकराची मानवाकार प्रतिमा हे होय. हिचाही प्रारंभ सिंधु संस्कृतीपासून झालेला दिसतो. महोंजोदाडो येथील उत्खननात पशपुती शिवाचे अंकन असल्याची एक पुरुष प्रतिमा मिळाली आहे. दक्षिण भारतातील प्राचीन शिवप्रतिमा तामिळनाडू राज्यातील रेणुगुंठा नावाच्या गावाजवळ असलेल्या गुड्डीमलच्या परशुरामेश्वर मंदिरात आढळते. ही मूर्ती इ.स.पू. दुसऱ्या किंवा पहिल्या शतकातील आहे. गुप्तकाळानंतर विभिन्न प्रकारच्या शिवमूर्ती बनविणे सुरु झाले. त्रिशूल, सूर्य, खटवांग, डमरु व घट ही शिवाची प्रमुख आयुधे आहेत.[1] याशिवाय जपाची माळ, कमळ व वीणा इत्यादी वस्तू ध्यान भिन्नत्त्वे आढळतात. नांदेड जिल्हयात सर्व प्रकारच्या शिवमूर्ती आढळत नाहीत, केवळ शिवमूर्ती लिंगोद्भवमूर्ती, नरेश मूर्ती, वृषभवाहन मूर्ती, अंधकासूर वधमूर्ती, भैरव, पार्वती, उमामहेश्वर, अर्धनारीश्वर इत्यादी शिवमूर्ती नांदेड जिल्हयात आढळतात. नांदेड जिल्हयात कल्याणीचे चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव काळात अनेक शिवमंदिरे बांधली गेली. या काळात शैव संप्रदायाचा प्रभाव होता. शैव संप्रदायापैकी कालामुख संप्रदाय विशेष प्रचलित होता. नांदेड जिल्हयात शिवमूर्तीचे आढळणारे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

**1) लिंगोद्भव मूर्ती :**

लिंगोद्भव शिवमूर्तीचा हा प्रकार भारतात लोकप्रिय होता. लिंगातून उत्पन्न झालेली ती लिंगोद्भव मूर्ती होय. नांदेड जिल्हयात हदगाव तालुक्यातील शिऊर आणि कंधार या ठिकाणी लिंगोद्भव शिवमूर्ती मिळाल्या आहेत. नांदेड जिल्हयातील सर्वांत प्राचीन शिवमूर्ती म्हणून शिऊर येथील लिंगोद्भव शिवमूर्तीचा उल्लेख करावा लागतो. शिऊर येथे गुप्त-वाकाटक कालीन हिंदू लेण्या आहेत. येथील लेणी क्र.3 मध्ये लिंगोद्भव शिवमूर्ती आढळते.[2] या लेण्यात मूर्ती दर्शवीत असताना केवळ लिंगच दर्शविण्यात आलेले आढळते. मध्यभागी शिवलिंग असून डाव्या बाजूस ब्रह्मा नमस्कार मुद्रेत तर उजव्या बाजूस विष्णू आहे. विष्णुचा डावा हात शिवलिंगावर आहे, तर त्यांनी आपला खालचा डावा हात गुडघ्यावर ठेवला आहे. वरच्या उजव्या हातात चक्र आहे तर खालचा उजवा हात अभयमुद्रेत आहे. अशाच प्रकारची

एक लिंगोद्भवमूर्ती कंधार या ठिकाणी नगरेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या उजवीकडे ठेवलेल्या शिल्पसमुहात आढळते.[3] मध्यभागी मोठे शिवलिंग आहे. ब्रह्मा नमस्कार मुद्रेत असून विष्णुने आपला एक  हात लिंगावर ठेवलेला आहे. त्यांचा दुसरा हात अभयमुद्रेत आहे. या मुर्तीवर शेंदूर लावल्यामुळे ती ओळखणे कठीण जाते.

**2) नटराज शिव :**

शिवाच्या या मूर्तीप्रकारास नटराज, नटेश व नृत्यशिव या नावाने ओळखले जाते. शंकराने 108 प्रकारचे नृत्य केले. अशी दक्षिण भारतात मान्यता आहे.[4] चिदंबरम येथील नटराज मंदिराच्या गोपुरावर शिवनृत्याचे 108 प्रकार प्रतिमारुपाने अंकित केलेले आढळतात.  नांदेड जिल्ह्यात होट्टल नावाचे गाव आहे. येथील सिद्धेश्वर मंदिराचे बांधकाम कल्याणीचा चालुक्य अधिकारी सिद्धुगी यांने इ.स.११२० मध्ये केले. या मंदिराच्या बाह्यभिंतीवर नटराज शिवाची मूर्ती आहे. ही मूर्ती देवकोष्टावर असून पश्चिमाभिमुख आहे. ही मूर्ती 180 सें.मी. उंचीची असून भंगलेली आहे. मूर्तीचा हात तुटलेला असल्यामुळे हातात कोणती आयुधे होती, हे समजणे कठीण आहे. ही संपूर्ण मूर्ती अलंकृत आहे. या मूर्तीच्या डाव्या बाजूस भृंगी ढालके वाजवीत उभा असून शिव नृत्य करीत आहे. मूर्ती नृत्य करीत असलेल्या पद्धतीवरुन हा भुजंगत्रस नृत्यप्रकार दिसतो.

**3) वृषभवाहन मूर्ती किंवा हरगौरी :**

शिवाचे वाहन बैल आणि पार्वतीचे वाहन सिंह आहे.[5] वृषभवाहन मूर्तीत शिव आपले वाहन बैलावर (नंदी) बसलेले दाखविले जातात. त्यांच्या सोबत पार्वतीही बसलेली असते. अशा प्रकारची एक वृषभवाहन शिवमूर्ती नांदेड जिल्ह्यात मुखेड येथील महादेव मंदिराच्या बाहेरील भिंतीवर आढळते. ही शिवमूर्ती स्थानक असून व्दिभुज आहे. ही मूर्ती चांगली असली तरी  भंगलेल्या स्थितीत आढळते. त्यामुळेच मूर्तीच्या हातात असलेल्या आयुधाची कल्पना येत नाही. या मूर्तीच्या रचनेवरुन चिती लक्षणे स्पष्ट होतात. त्यावरुन ही मूर्ती वृषभवान शिवाचीच असल्याचे स्पष्ट होते.

**4) अंधकासूरवध मूर्ती :**

शिवाच्या संहार मूर्तीमध्ये, भैरव मूर्ती, कामांतक मूर्ती, गजासूरवध मूर्ती, कालारी मूर्ती, त्रिपुरांतक मूर्ती, शरभष मूर्ती,  ब्रह्मशिरोच्छेदक मूर्ती, वीरभद्र मूर्ती, जलंधर-हर मूर्ती आणि अंधकासूरवध मूर्तींचा समावेश होतो.[6] अंधकासुराच्या कथेचा उल्लेख वराह, कूर्म व वामन पुराणात आढळतो. या कथेवर आधारित निर्माण केल्या गेलेल्या शिवमूर्तीस आठ हात दाखविले जातात. तो त्रिशुलाने अंधकासुराचा वध करीत असल्याचे दाखविले जाते.  जवळच योगेशवरी महाशक्ती हातात पात्र घेऊन उभी असते. एलिफंटा, वेरुळ, बीड येथील कंकालेश्वर मंदिर व औंढा (नागनाथ) येथील शिवमंदिरावर अंधकासूरवधाच्या मूर्ती आढळतात. नांदेड जिल्ह्यातील होट्टल येथे कल्याणीच्या चालुक्य काळातील एक शिवमंदिर आहे. हे सिद्धेश्वर मंदिर इ.स. 1120 मध्ये सिद्धुगी याने बांधले.[7] सिद्धेश्वर मंदिराच्या जंघा भागावर शिल्पीत केलेल्या अंधकासूरवधमूर्तीस आठ हात आहेत. त्यापैकी सहा हात खंडीत झाले आहेत. शिल्लक दोन हातांपैकी उजव्या हातात डमरु आहे आणि खालच्या डाव्या हातात नरमुंड आहे. शिव एका पायाने एका राक्षसाला  तुडवीत आहे. शिवाच्या उजव्या बाजूस भूत कोरलेले आढळते. ही मूर्ती अलंकृत असून मूर्तीच्या वरच्या बाजूस कोपऱ्यात तलवार व टाक घेतलेला प्रतीकात्मक अंधकासूर शिल्पित केला आहे. इतरत्र पोटात त्रिशूल खुपसून वर फेकलेला दाखविला जातो तसे येथे दाखविलेले नाही, हाच येथे फरक आहे.

**5) आसनस्थ शिव :**

लोहा तालुक्यात उमरा नावाचे गाव आहे. या गावाच्या पुढे 3 कि.मी. अंतरावर धनज गावाच्या शिवेवर व परमेश्वर तांड्याजवळ एक पमरेश्वर मंदिर आहे.[8] या मंदिरात एक आसनस्थ शिवमूर्ती आहे. ही मूर्ती पाषाणात घडविलेली असून ती 110 सें.मी. उंचीची आहे. ही शिवमूर्ती पंचमुख आहे. शिवाच्या डोक्यावर पाच नागफण्या, गंगामूर्ती व शिवपिंड आहे. शिवाच्या डाव्या मांडीवर पार्वती बसलेली असून ती नमस्कार मुद्रेत आहे. शिवाला एकूण दहा हात आहेत. त्याच्या डाव्या आणि उजव्या हातात अनुक्रमे त्रिशूल, फरशी, कुऱ्हाड व हत्यार आहेत. मुख्य दोन हात असून त्यापैकी उजवा हात ओममुद्रेत आहे तर डावा हात मांडीवर ठेवलेला आहे. नांदेड येथे होळी भागात कुंभार टेकडीवर एक लहान मंदिर आहे. या मंदिरात एक शिवमूर्ती असून ती आसनस्थ आहे. शिवाची ही मूर्ती चतुर्भूज आहे. त्याच्या खालच्या उजव्या हातात अक्षमाला व वरच्या हातात त्रिशूल आहे तर वरच्या डाव्या हातात नाग आणि खालच्या हातात बीजपूरक आहे. शिवाच्या उजव्या हाताजवळ नंदी कोरलेला आहे. याशिवाय शिवाच्या डाव्या व उजव्या पायाजवळ दोन परिवारमूर्तीही कोरलेल्या आढळतात.

**6) भैरव मूर्ती :**

शिवाच्या संहारमूर्तीपैकी एक भैरवमूर्ती होय. शिवपुराणानुसार भैरव हे शंकराचे पूर्ण रूप असून तो सर्व जगाचे भरण करतो आणि रुपोन भीषण आहे. तेवढ्याकरीता त्याला ‘भैरव’ हे नाव प्राप्त झाले. काळही त्याला वचकतो, म्हणून भैरवलाच ‘कालभैरव’ असे म्हणतात. भैरव हे शिवाच्या विशिष्ट वर्गाचे नाव आहे.[9] शैवआगमनात शिवाच्या 64 प्रकारच्या भैरवांचा उल्लेख आढळतो. या मूर्ती नग्न,भयानग मुद्रा, हातात तलवार, शूल अथवा कपाल प्रदर्शित केलेल्या आहेत. या मूर्तींना ‘बटूक भैरव’ ही संज्ञा दिली गेली दक्षिण भारतीय भैरव मूर्तीत कुत्रा प्रदर्शित करण्यात आला आहे. कुत्रा हे भैरवाचे वाहन आहे.

नांदेड जिल्ह्यात देगलूर तालुक्यातील होट्टल येथे कल्याणीचा चालुक्य सम्राट विक्रमादित्य सहावा याच्या काळातील सोमेश्वर मंदिर आहे. या मंदिराजवळ भैरव मूर्ती मिळाली असून डॉ.गो.बं. देलूरकरांनी ती सर्वप्रथम प्रकाशात आणली.[10] भैरवाच्या मागील हातात त्रिशूल आहे, तर भैरवाचे वाहन कुत्रा डाव्या बाजूस असून तो नरमुंडातून ठिपकत असलेले रक्त पीत असल्याचे दाखविले आहे. जवळच पार्वती आहे. भैरवाची ही मूर्ती आसनस्थ मूर्ती आहे. भैरवाची स्थानक मूर्ती होट्टल येथील रेब्बेश्वर मंदिराच्या दक्षिण बाजूस आढळते. भैरवाच्या पायथ्यास कुत्रा दाखविला असून जवळच पार्वती उभी आहे.

नांदेड जिल्ह्यात कंधार येथेही भैरवाची एक मूर्ती मिळाली असून ही मूर्ती आज तेथील किल्ल्यात सुरक्षित ठेवलेली आहे. 120 सें.मी. उंच, 60 सें.मी. रुंद आणि 60 सें.मी. जाडी असलेल्या एका दगडी शिलेवर भैरवाचे शिल्प कोरलेले आहे. हा भैरव अष्ठभूत असून नृत्य करीत आहे. या शिल्पाचा खांद्यापासूनचा वरचा भाग खंडीत झाला आहे. भैरवाचे हे शिल्प 90 सें.मी. उंचीचे आहे. भैरवाच्या हातातील आयुधे खंडीत झालेली आहेत.

**7) पार्वती :**

पार्वती ही शिवाची पत्नी आहे. तिला उमा असेही नाव आहे. ती शक्तीचे प्रतीक समजली जाते. शिव-पार्वतीच्या एकत्र मूर्ती आढळतात. परंतु पार्वतीच्या स्वतंत्र मूती फारशा आढळत नाहीत. पार्वती ही साधारणपणे व्दिभुज दाखविली जाते.[11] परंतु कुठेकुठे ती चतुर्भुजही दिसते. तिच्या हातात आरसा, कमळ किंवा फळ आढळते. तिचा सामान्य उजवा हात शिवाच्या मानेभोवती टाकलेला असतो.

पार्वतीच्या मूर्ती स्थानक स्थितीत आढळतात. नांदेड जिल्हयात मुखेड येथील महादेव मंदिराच्या बाह्यभिंतीवर पार्वतीची स्थानक स्थितीतील एक मूर्ती आहे. हे मंदिर कल्याणीचा चालुक्य सम्राट विक्रमादित्य सहावा याच्या काळातील म्हणजेच इसवी सनाच्या बाराव्या शतकातील आहे. महादेव मंदिराच्या बाह्यभिंतीवर जंघा भागावर पार्वतीचा चतुर्भुज मूर्ती कोरली आहे. पार्वतीच्या वरच्या दोन हातात लिंग आणि कमळ आहे, तर खालचे दोन हात तुटलेले आहेत. ही मूर्ती भंगलेली आहे. पार्वतीची अशीच एक मूर्ती नांदेड जिल्हयात कंधार येथे मिळाली आहे. ही मूर्ती राष्ट्कूट काळातील असून इसवी सनाच्या दहाव्या शतकातील आहे. ही मूर्ती स्थानक स्थितीत असून चतुर्भुज आहे. तिची उुंची 90 से.मी. आहे. पार्वतीच्या हातात लिंग आणि कमळ आहे. ही मूर्ती अतिशय सुंदर आहे.

**8) अर्धनारीश्वर :**

एकाच मूर्तीत शिव व पार्वतीचे संयुक्त रुपाने अंकन करण्यात येते. अशा मूर्तीला किंवा रुपाला 'अर्धनारीश्वर' किंवा 'अर्धनारी नटेश्वर' असे म्हटले जाते. भारताच्या विभिन्न भागात अर्धनारीश्वराच्या मूर्ती मिळाल्या आहे. नांदेड जिल्हयात कंधार या ठिकाणी अर्धनारीश्वराची एक सुंदर स्थानक मूर्ती मिळाली आहे.[12] राष्ट्रकूटकालीन ही मूर्ती बहाद्दरपूरा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृहात ठेवण्यात आली आहे. या मूर्तीचा उजवा हात दंडापाससून खंडीत झाला आहे. या प्रतिमेची उंची 74 सें.मी. व जाडी 23 से.मी. आहे. अर्धनारीश्वराच्या शरीरावर स्त्री-पुरुषांचे भरपूर अलंकार आहेत. स्त्रीच्या कानात कर्णफूले, पायात पैंजण, गळ्यात एक लहान व एक मोठा हार, करमपट्टा व दंडात बाजूबंद आहे. डोक्यावरील केसांचा अंबाडा बांधलेला आहे. पुरुषाच्या कानात कुंडले, गळ्यात हार, दंडात बाजूबंद, पायात पैंजणसारख्या दागिना, हाताच्या व पायाच्या बोटात आंगठ्या व अंगावर जाणवे आहे. प्रतिमेचा उजवा भाग पुरुष रुप व डावा भाग स्त्री रुप आहे.

**9) उमामहेश्वर आलिंगन मूर्ती :**

'उमा' म्हणजे 'पार्वती' आणि 'महेश्वर' म्हणजे 'शिव' होय. परस्परांना आलिंगन देत एकाच आसनावर बसलेल्या किंवा स्थानक स्थितीत असलेल्या शिव-पार्वतीच्या मूर्तीस 'उमामहेश्वर मूर्ती' म्हणतात. अशा मूर्ती आसन आणि स्थानक असतात. या दोन्ही प्रकारातील मूर्ती भारतात विविध ठिकाणी मिळाल्या आहेत.[13]

नांदेड जिल्ह्यातील कंधार जवळील बहाद्दरपुरा येथील रामटेक परिसरात असलेल्या एका गणपती मंदिराच्या शेजारी एका विहिरीजवळ दि.07 जुलै 1991 रोजी संभाजी पेठकर यांना त्रिनेत्रधारी शिव-पार्वतीची उमामहेश आलिंगन प्रकारची स्थानक मूर्ती मिळाली. शिवाचा डावा हात पार्वतीच्या गळ्यात असून पार्वतीचा उजवा हात शिवाच्या खांद्यावर आहे. या मूर्तीची उंची 75 सें.मी. आहे. त्रिनेत्रधारी शिव-पार्वती एकमेकांच्या गळ्यात हात घालून 'अवई नृत्य' करीत आहेत. शिवपार्वतीची उमामहेश त्रिनेत्रधारी ही प्रतिमा गुप्त-वाकाटक कालशैली परंपरेतील आहे. शिव चतुर्भुज असून त्यांचा एक डावा हात पार्वतीच्या गळ्यात आहे, तर दुसऱ्या डाव्या हातात डमरु आहे. एक उजवा हात कोपऱ्यापासून खंडीत झालेला आहे, तर दुसरा हात चांगल्या स्थितीत आहे. अशा प्रकारच्या उमामहेश्वर मूर्ती नांदेड जिल्हयात येरगी, हिमायतनगर व मुखेड या ठिकाणी प्राप्त झालेल्या आहेत.

**समारोप :**

नांदेड जिल्हयात अनेक ठिकाणी विविध प्रकारच्या शिवमूर्ती आढळून येतात. त्यांची रचना व शिल्पकला वैशिष्ट्यपूर्ण आहे. शैव संप्रदायातील विचारावर आधारीत या शिवमूर्ती आहेत. या मूर्ती लेणी, मंदिरे व उघडयावर आहेत. प्राथमिक ऐतिहासिक साधन म्हणून यांच्याकडे बघितले जाते. या

मूर्तीवरील अलंकार, केशभूषा, आसन व मुद्रा यावरुन ऐतिहासिक माहिती उपलब्ध होते. त्यामुळे त्यांचे जतन करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


1) जोशी नि.पु.,(1979), भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ,नागपूर.पृ.161.

2) Deshmukh B.S.,(1986),Murtishilpvaibhav, Explorations in local History & Literature, Nanded. p. 59.

3) ञ्andhar through the Epigraphy and Archaeology Journal of Epigraphical Society of India, Vol. VII, 1980,p.23.

4) Veer Avtar Ram, Natraj, Delhi, Pankaj Publications, 1982, p.10.

5) जोशी नि.पु., (1979), उपरोक्त,पृ.144.

6) श्रीवास्तव ब्रजभूषण,(1990),प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, वाराणसी, विश्वविद्यालय प्रकाशन,पृ.78 - 86.

7) Ritti & Selke (Ed.),(1968) Insecriptions from Nanded District, Yeshwant Mahavidyalaya, Nanded. p.33.

8) कठारे अनिल व साखरे विजया,(2008), मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड,पृ.119.

9) श्रीवास्तव ब्रजभूषण,(1990), उपरोक्त. पृ.78.

10) Degloorkar G.B.,(1974), Temple Architecture and Sculputre, Nagpur,p.122.

11) जोशी नि.पु.,(1979), उपरोक्त, पृ.167.

12) दळवे अरुण, राष्ट्रकूटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी., शोधप्रबंध, नांदेड, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, 2004,पृ.222.

13) जोशी नि.पु.,(1979),उपरोक्त,पृ.167-168.

# मंदिर शिल्प कला स्थापत्याचे ऐतिहासीक अवलोकन

**डॉ.जि.व्ही.गट्टी**
इतिहास विभाग प्रमुख
श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा
ता.परळी वै. जि.बीड

**डॉ. राधाकृष्ण जोशी**
अध्यक्ष इतिहास संकलन
संस्था महाराष्ट्र
गांधी महाविद्यालय, कडा

**प्रस्तावणा :**

महाराष्ट्रा मध्ये जेवडे महत्व कला स्थापत्याच्या दृष्टीने मराठवाडयाला आहे. त्याच पध्दतीने औरंगाबाद शहराचे कला षिल्प स्थापत्याच्या दृष्टिने अनन्य साधारण असे महत्व आहे. घृष्णेष्वर मंदिर, भद्रा मारोती मंदीर, सुपारी हणुमान मंदीर इ. मंदिरे महत्वपुर्ण आहेत. मराठवाडयाला कला स्थापत्याच्या दृष्टिने महत्वपुर्ण स्थान आहे. ज्ञात इतिहासा प्रमाणे अष्मघ, मौर्ये या नंतर सातवहान, गुप्त, वाकाटक चालुक्य, यादव अषा प्राचीन राजवंषाच्या अधिपत्याखाली हा परिसर होता. मध्ययुगीन काळामध्ये बहामनी तुगलक, आणि मराठा कालखंडामध्ये षिल्प आणि कला स्थापत्याला राजाश्रय मिळालेला आहे. अधुनिक काळात संपुर्ण हिंदूस्थान ब्रिटाषाच्या नियंत्रणाखाली आला. परंतु मराठवाडयाचा भुभाग मात्र ब्रिटीष साम्राज्यवादी सत्तेच्या मांडलिक असलेला हैद्राबादचा निजाम यांच्या नियंत्रणा खाली होता.

**शोध निंबधाचे उद्देष :**

1. प्राचीन कालखंडातील मंदिर कलास्थापत्याचे महत्व विषद करणे.
2. यादव कालीन कला स्थापत्याचे विष्लेषण करणे.
3. औरंगाबाद परिक्षेत्रातील मंदिर स्थापत्याचा परमर्ष घेणे.

**गृहितके :**

1. सातवहान काळामध्ये षिल्प आणि स्थापत्य कलेला राजाश्रय मिळाला होता.
2. चालुक्य काळामध्ये मंदिर स्थापत्य विकासाला चालना मिळाली होती.
3. राष्ट्रकुट काळामध्ये जैन धर्म मंदिर स्थापत्य कलेच्या विकासाला अश्रय मिळाला होता.

**मंदिर स्थापत्याचे अध्ययन** :इतिहासा प्राथमिक पुरावा म्हणुन मंदिर हे साधन रूपात वापरू शकतो. गुप्त काळामध्ये विविध मंदिर निर्माण होवुन त्या मंदिरावर विविध षिल्पावषेष विविध लेख ताम्रपट त्या त्या राज्य कर्त्यांनी आपल्या शासन काळामध्ये कोरून ठेवलेले आहेत. या ताम्रपट आणि नान्यावरूण आपणास राज्य कर्त्यांच्या कालखंडातील मंदिरांना दिलेल्या दानाचे अध्ययन करता येते. विभीन्न राज्य कर्त्यांच्या काळामध्ये त्यांच्या उध्दार राज्यश्रयामुळे मंदिर षिल्प स्थापत्य कलेला प्रचंड चालना मिळाली. चालुक्य राजे धर्म सहिष्णू होते. चालुक्य राजानी बौध्द व जैन धर्माला उदार हस्ते मदत केली. याची अनेक उल्लेख आढळतात. औरंगाबाद परिसरात अनेक जैनमुर्ती षिल्पे आणि मंदिरे आढळतात. चालुक्याच्या रूपाने महाराष्ट्र व कर्नाटक प्रदेषात एक स्थिर राज्य निर्माण झाले. स्थपत्य केलेला राजाश्रय मिळालेला होता. अप्रतिम मंदिर स्थापत्य या काळात विकसित झाले. चालुक्य कला पंरपरा निर्माण झाली. कल्याणीच्या चालुक्या घराण्याची कारकिर्द औरंगाबद परिसराच्या दृष्टिने महत्वाची ठरली आहे. या काळात बरीच मंदिरे उभारली गेली. बलसुर, येळी, अमृतकुंड, कलदेव लिंबाळा, मुरूम, आलुर, अचलेर, नारंगवाडी आदी ठिकाणी मंदिरे उभारली गेली. या परिसरातील कलावंतानी विष्णुच्या,ब्रम्हदेवाच्या, महिषासुरमर्दिनी, चामुंडा इत्यादीच्या सुरेख मुर्ती याच ठिकाणी निर्माण केल्या. देव देवतांच्या मुर्तीबरोबरच सुंदर नक्षीकाम केलेले आढळतात.

चालुक्य घराण्यातील सर्वात पराकृमी राजा विक्रमादित्य सहाव्याच्या काळात या सत्तेची अफाट भरभराट झाली. त्यानं अनंतपाक भीम, जगदेच परमारसारखे उत्कृष्ट प्रषासक नेमुन राज्य विस्तार केला. हा राजा दानधर्मी असुन प्रतिदिन जमिनी दान करीत असे अषी आख्यायिका आहे. औरंगाबाद परिसरात याची अनेक दानपत्रे उपलब्ध झाली आहेत. औरंगाबाद षिलालेखात विक्रमादित्याचा महाप्रधान भीमानादा याने मराठवाडयात विविध ठिकाणी मंदिराची उभारणी केल्याचा उल्लेख आहे. यावरून चालुक्य काळातील उमरग्याचे स्थान वैषिष्टपुणे ठरते.

**मंदिर स्थापत्य :** हेमाडपंती शैली हेमाडपंत किंवा हेमाद्री महाराष्ट्रात चांगलाच प्रख्यात होता. हेमाद्री यांनी षिल्पकलेत क्रांती घडवुन आणली. हेमाडपंती मंदिरात दगडाचे चिरे एकमेकांवर अगर एकमेकात विषिष्ठ पध्दतीने बसवुन चुना न वापरता बांधलेली आहेत. त्रिकोण, चतुष्कोन, काटकोन वर्तुळ, अर्धवर्तुळ इत्यादी आकारांचे दगडाचे चिरे एकमेकांत इतक्या कुषलतेले बसवलेले आहेत. त्यामुळे इमारतीच्या दर भागास आधार मिळुन त्यावर इमारतीचे छत बिनधोक राहु शकले. मंदिरामध्ये वेगळेस्तंभ उभारण्यात येऊन चार स्तंभावर चौकोन साधुन छताची रचना केलेली आढळते. प्रस्तुत मंदिराची उभारणी ही अषा पध्दतीची ही मंदिरे इसवीनाच्या अकराव्या शतकापासुन चौदाव्या शतकापर्यंत मोठया प्रमाणात उभरली गेली. या प्रकारातील मंदिरे औरंगाबाद परिसरात आजही आहेत. हयापैकी औरंगाबादच्या मंदिर चांगल्या. स्थितीत आहे. डॉ. अरूणचंद्र पाठक यांनीही पुरातन षिल्पांचा आणि स्थपत्याचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत लेखिकेने उमरगा येथील मंदिर षिल्पकला आणि वास्तुकला यांचा सुक्ष्मअभ्यास करण्याच्या प्रयत्न केला आहे. हा भाग निवडण्याचे कारण म्हणजे भुकंपाने औरंगाबाद क्षतिग्रस्त झाले होते. सततच्या बसणाऱ्या भुकंपाच्या धक्याने पुरातन वस्तु आणि वास्तुची अवस्था नाजुक झाली आहे. बऱ्याच ठिकाणी मंदिरावे दगड एकमेकांपासुन सरकले होते आणि काही ठिकाणी भेगा पडल्या होत्या. या षिल्पकला व वास्तु जतन करायला हवे म्हणुन हा खटाटोप होय. हा अमुल्या ठेवा पुढच्या पिढीला घ्यायला छायाचित्रे व वाङ्मयीन स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. औरंगाबाद परिक्षेत्रातील असणाऱ्या मंदिरांचे वेगळेपण हे आहे की, विविध मंदिर कलेला शासन कर्त्यांनी अर्थिक दृष्टया मदत केलेली आहे. या भागात जैन मंदिरे कृष्ण मंदिर, देविचे मंदिरे मोठया प्रमाणात पहायला मिळतात. गुप्त काळाच्या आगोदरही मंदिर अस्थित्वात होते. मात्र गुप्त काळाच्या नंतर तिन नविन शैलीचा उदय झाला. नागर, द्रविड, वेसर या शैली विकसीत पावल्या आगोरच्या काळात या शैलीचा षिलालेखामध्ये कोठेही आढळत नाही.

**समारोप :**

औरंगाबद परिसरामध्ये विभिन्न मंदिरषिल्प विकसीत झालेले आपणास दिसुन येतात. परंतु काही भागामध्ये अनेक मंदिरे अविकसीत असल्याचे दिसुन येते. त्यासाठी त्या मंदिराला विकसीत करणे हि काळाची गरज आहे. अनेक मंदिरेही प्राचीन इतिहासाचा संस्कृतीक ठेवा आहे. या मंदिर षिल्प स्थापत्याचा ऐतिहासीक दृष्टिकोणातुन अभ्यास होणे हि काळाची गरज आहे.

**संदर्भ :**

1. माटे मश्री. : प्राचीन काला भारती, कॉन्टिनेटल प्रकाषन,पुणे, 1998
2. श्रीवास्तव शषीबालाःभारतीय मंदिर एवं मुर्तीचा इतिहास,रामानंद विद्याभवन दिल्ली. 1989
3. देव प्रभाकर : इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाष नांदेड, 1988
4. जे षि. उपाद्याय :प्राचिन मंदिर षिल्प स्थापत्याचा अभ्यास,अनुपम प्रकाषन कानपुर,2002

# मंदिराच्या बाह्यांगावरील कंदुकावती / कंदुकधारिणी
## (विशेष संदर्भ–वडेश्वर मंदीर, अंभई)

**कु.गुडदे श्रीमाला कालिदास**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर
**मार्गदर्शन आणि छायाचित्र सहाय्य**
श्री.अमर रेड्डी

**प्रस्तावना**

'देवतेच्या निवासस्थानाला देवालय किंवा मंदिर म्हणतात' ही देवालयाची सहजरित्या समजणारी पर्याप्त व्याख्या होय. प्रारंभीच्या काळात मंदिराचे रूप पर्णकुटीप्रमाणे होते, नंतर चापाकार बांधकाम केले जावू लागले. ही उभारणी विटांनी केली जात होती.[1] या काळात मूर्तीकला ही बहारास आली होती. मात्र गुप्तोत्तर काळात स्वतंत्र मूर्तीची निर्मिती कमी झाली व मंदिराच्या अलंकरणमूर्तीस बहर आला.[2] अलंकरणमूर्ती शिल्पात स्त्रीशिल्पाचे स्थान प्रभावी होते, कारण स्त्रीला सौंदर्याचे प्रतिक मानले जात असल्याने मंदिरास शिल्पांकने केली जात. काही स्त्रीशिल्पांना देवांगना, अप्सरा, सुरसुंदरी असेही म्हटले जात असून क्षिरार्णवात[3] 32 व शिल्पप्रकाशामध्ये[4] 16 प्रकारच्या देवांगना सांगितल्या आहेत. तसेच काही शिल्पशास्त्री ग्रंथात 24 देवाणंगणाचे प्रकार आहेत.[5] ग्रंथात वर्णन केलेल्या या देवांगणा, अप्सरा व्यतिरिक्त ही स्त्रीशिल्पे आढळतात. हातात कंदूक (चेंडू) घेवून खेळत नृत्य करणारी स्त्री शिल्पात आढळते. मराठवाड्यात औरंगाबाद जिल्ह्यात 'अंभई' येथील 'वडेश्वर' मंदिराच्या गर्भगृहाच्या जंघाभागावर अशा दोन कंदुकधारी स्त्रियांची शिल्पे आहेत. त्यापैकी एका शिल्पाची ओळख प्रथमतः या शोधनिबंधाद्वारे होत आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात कंदुकधारी स्त्रीशिल्पाच्या अनुषंगाने अभ्यास केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1) आधुनिक काळात क्रिडासाहित्यात प्रसिद्ध असलेल्या चेंडूचे प्राचीन संदर्भ शोधणे.
2) स्त्रीशिल्पातील कंदुकधारिणी स्त्रीचे प्रयोजन लक्षात घेणे.

**गृहितके**

1) शिल्पात स्त्रीशिल्पाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.
2) ग्रंथात वर्णन केलेल्या अप्सरा व्यतिरिक्तही अनेक स्त्री शिल्पे शिल्पात आढळतात.

**संशोधन पद्धती**

1) निरीक्षण 2) सर्वेक्षण 3) विश्लेषण संशोधन पद्धती

**साधने**

प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग या शोध अभ्यासासाठी केला आहे.

**'कंदुक' अर्थ :**

'कंदुक' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ चेंडू आहे. ज्याला हिंदीमध्ये 'गेंद' किंवा 'गेंदू' असे म्हणतात. बोलीभाषेमुळे कंदूचा गेंदू, चेंडू असा अपभ्रंश झाला असावा. नारळ, लिंबू, बेल इ. गोलाकार फळावरुन चेंडू, कंदुक या क्रिडासाहित्याचा उगम झाला असावा.

**कंदुकक्रिडेचा व कंदुकनृत्याचा इतिहास**

कंदुक व कंदुकक्रिडेबाबत लिखीत साहित्यात पुढील काही संदर्भ मिळतात.

i) हरिवंशामध्ये श्रीकृष्णाच्या कंदुकक्रिडेचे संदर्भ आहेत, तसेच गोलक्रिडा हाही उल्लेख आहे.[6]

ii) श्रीशिवपुराणात पार्वती आपल्या मैत्रिणीसमवेत कंदुक कृत्रिम पुतळा, गंगेच्या वाळूपासून बनवलेल्या वेदीसोबत खेळत असे, असे वर्णन आहे. तसेच कालिदासांनीही गौरीच्या कंदुकक्रिडेचा उल्लेख कुमारसंभवात केला आहे.[7]

iii) शिवपुराणातच पार्वतीच्या तारुण्यातील कंदुकक्रिडेचे वर्णनही अत्यंत विलोभनीय असून त्यात कंदुकासोबत खेळतानाची हालचाल, नृत्यमयता, गती यांचे वर्णन आढळते. चेंडूला मारणे, फेकणे, त्याच्यामागे धावणे या क्रिया त्यात स्पष्ट केल्या आहेत.[8]

iv) ऋषशृंगाला मोह घालण्यासाठी त्याच्या आश्रमात आलेल्या गणिका चेंडू खेळत व आपली अंगप्रत्यंगे दाखवीत असे वर्णन महाभारतात वनपर्वात आहे.[9]

v) जैनांच्या सूत्रकृतांग ग्रंथात कापडी चेंडूचा उल्लेख आढळतो.[10]

vi) श्रीरामचरितमानसच्या लंकाकांडात चेंडूचा उल्लेख मिळतो.[11]

vii) रघुवंश (16.83), भागवत (3.20.36), मालविकाग्नीमित्रात (कंदुकमनुधान्वती) यात कंदुकक्रिडेचा उल्लेख आहे.[12]

viii) विठ्ठल पुंडरीकच्या नर्तन निर्णयातील वस्तू प्रबंध अंतर्गत कंदुक नृत्याचे वर्णन आढळते.[13]

ix) दशकुमारचरितमध्ये कंदुकधारण करून केलेल्या नृत्याचे अत्यंत सविस्तर वर्णनच आढळत नाही तर कंदुकक्रिडारत होवून नृत्य करण्याच्या कला, कौशल्याचीही माहिती मिळते. कंदुकोत्सव हा प्राचीन भारताच्या इतिहासातील महत्त्वाचा लोकोत्सव होता, हे लक्षात येते. विंध्यवासिनी देवीच्या पूजनार्थ राजकुमारी कंदुकावती प्रत्येक महिन्याच्या कृतिका नक्षत्रात कंदुकासह नृत्य करत असल्याची माहिती दंडीने दिली आहे.[14]

**कंदुकतंत्र**

कंदुक (चेंडू) घेवून नृत्य करताना काही नियम, तंत्र दंडीनी वर्णन केले आहेत. हे नियम अत्यंत शास्त्रीय असून चेंडूच्या गतीच्या नियमनाबाबत ही यात वर्णन आहे. चूणीक्रिया, दशपद चंक्रमण, मध्यम गती, उसळणे, हळूहळू पुढे सरकणे याचा ताळमेळ नृत्य करताना घातला ावा असे म्हटले आहे.[15] हे कंदुकतंत्र खेळताना, नृत्य करताना पाळले जात असे.

**अंभई येथील कंदुकावती/कंदुकधारिणी शिल्प**

वडेश्वर मंदिर अंभई याठिकाणी एक पूर्वाभिमुख शिव मंदिर असून याठिकाणी 280 मूर्तिशिल्पे आहेत.[16] या मंदिराच्या बाह्य भागावर दोन कंदुकधारी नृत्य करणाऱ्या स्त्रियांचेही शिल्प आहेत. ते पुढीलप्रमाणे

**कंदुकधारिणी 1 (छायाचित्र क्र.1)**

या कंदुकधारी स्त्रीचे शिल्प मंदिराच्या दक्षिण गर्भगृहाच्या बाह्य भागावर दक्षिणेकडून क्रमांक एकचे आहे. येथील कंदुकधारिणी ही कंदुकनृत्यात मग्न असून, तिने उजवा हात डोक्यावर धरला असून त्या हातात कंदुक (चेंडू) पकडला आहे. डावा हात कोपरातून दुमडून कमरेच्या उजव्या बाजूस वळवला आहे. त्यामुळे तिच्या शरीराच्या कमरेपासून वरचा भाग सरळ समोर असल्याचा दिसतो. तीने कर्णकुंडले, ग्रीवा, हारसूत्रे, केयूर, हातात कंकण इत्यादी अलंकार परिधान केले असून तिचा चेहरा गोलाकार,

आकर्षक आहे. तिने तिचा डावा पाय सरळ ठेवला असून उजवा पाय गुडघ्यातून दुमडून डावीकडे वळवला आहे. या शिल्पाचे वर्णन करताना पूर्वीच्या अभ्यासकांनी ती केवळ कंदुकक्रिडा नृत्यात मग्न असल्याने तिचे कमरेवरील वस्त्र निसटल्याचे वर्णन केले आहे. परंतु याच मंदिरावरील इतर शिल्पाच्या बाबतीत ही वस्त्ररचना अशीच आहे. शिवाय कंदुकधारी नृत्यांगणेच्या अधोवस्त्राचे, उत्तरीयाचे अस्तित्व दिसते. या स्त्रीने कंदुक डोक्याच्या वर धरले असून ती नृत्य करत आहे. मात्र ती इतकी बेभान नाही की तिचे वस्त्र ओघळल्याचे तिला भान नाही.

**कंदुकधारिणी 2 (छायाचित्र क्र.2)**

वडेश्वर मंदिराच्या दक्षिण गर्भगृहाच्या बाह्यभागावरच कंदुकधारी नृत्य करणाऱ्या कंदुकावतीचे आणखी एक शिल्प आहे. ती नृत्यावस्थेत आहे. तिचा डावा हात डोक्यावर आहे. तो किंचित कोपरातून तिने वाकवला आहे. उजवा हात ही कोपरातून दुमडून खाली पोटासमोर धरला आहे. या दोन्ही हातात कंदुक (चेंडू) आहे. तिने तिचा उजवा पाय गुडघ्यातून वाकवला आहे. तर शरीराचा पूर्ण भागर तिने डाव्या पायावर टाकून ती नृत्य करत आहे. या स्त्रीने कर्णकुंडले, ग्रीवा, हारसूत्र, केयुर, कंकण, पायात तोडे ही आभुषणे परिधान केली असून तिचा चेहरा आकर्षक गोलाकार आहे. धनुष्याकृती भुवया स्पष्ट दिसतात. या नृत्यांगणेच्या पायाजवळ एक कंदुक (चेंडू) आहे. कंदुकधारी नृत्यांगणेस कंदुक (चेंडू) पुरवणाऱ्या सेविका, दासी पायाजवळ कोरतात. अशी शिल्पे मार्कंडी, खजुराहो, नागदा इत्यादी ठिकाणी आहेत. मात्र प्रस्तुत शिल्पात पायाजवळ केवळ कंदुक (चेंडू) कोरला आहे. **हे शिल्प प्रथमतःच अभ्यासले गेले आहे.**

अंभई येथील मंदिरावरील दोन्हीही कंदुकधारी स्त्रिया नृत्यमग्न आहेत. त्या आकर्षक आणि नाजूक दिसतात. त्यासोबतच त्यांच्या कमरेस एक विशिष्ट दुपट्ट्याप्रमाणे वस्त्र आहे. शिवाय यांची अंगकाठीही अत्यंत बारीक आहे.

**इतर ठिकाणच्या कंदुकधारिणी / कंदुकावली**

1) महाराष्ट्रात मार्कंडी याठिकाणी एक कंदुकधारी नृत्यांगणा आहे.[17] तिने डावा पाय जमिनीवर ठेवला आहे आणि उजवा पाय गुडघ्यातून दुमडून डाव्या पायावर टेकवला आहे. उजव्या हातात चेंडू डोक्याच्या वर धरुन ती नृत्य करत आहे. तर पायाजवळ दोन्ही हातात चेंडू घेवून अर्धवट बसलेली सेविका आहे.
2) नागदा येथील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात नवव्या शतकातील अशीच एक कंदुकावती असून तिच्या डोक्यावरील उजव्या हातातून कंदुक निसटला आहे. तर तिची सेविका पाठमोरी असून मान वर करून ती कंदुक (चेंडू) देण्याचे काम करत आहे.
3) खजुराहो येथील खंदारिया महादेव मंदिराच्या बाह्यांगावर पाठमोरी कंदुकधारी स्त्री असून तिने स्वतःचा चेहरा डाव्या बाजूस किंचीत वळून ती उजव्या हाताने चेंडू फेकत आहे. तिच्याही पायाशी सेविका असून ती चेंडू पुरवत आहे.
4) याशिवाय खजुराहो येथील जावरी मंदिर, लक्ष्मण मंदिर याठिकाणीही या कंदुकधारी नृत्यांगणेचे शिल्प आढळतात. येथील एक स्त्रीच्या हातात फळीसदृश्य वस्तू असून त्यावर कंदुक (चेंडू) तिने तोलला आहे. ही अत्यंत सुंदर प्रतिमा आहे. परंतु हे शिल्प भग्न आहे. स्त्रीचा चेहऱ्याचा पाषाण फुटलेला आहे.

**स्मारोप व निष्कर्ष**

प्राचीन काळापासून भारतात धार्मिक उत्सव साजरे केले जात होते. या उत्सवात अनेक कलांचे प्रदर्शन होत असे. या उत्सवापैकीच कंदुकउत्सव सर्वत्र साजरा केला जात होता हे ग्रंथीय वर्णन आढळते. त्यासोबतच गुजरातमधील कानमेर येथे सिंधू समकालीन उत्खननात चेंडूचे अवशेष प्राप्त झाले आहेत. त्यावरून कंदुक हे महत्त्वाचे खेळण्याचे साधन होते आणि फक्त खेळताना नाही तर नृत्य करताना कंदुक (चेंडू) नृत्याचे साधन म्हणून वापरले जात होते. हा उत्सव कंदुकोत्सव म्हणून ओळखला जाई. याच सामाजिक परंपरेचे

प्रतिक ग्रंथात शिल्पात आढळते. कंदुकधारी स्त्री शिल्पाच्या अभ्यासातून पुढील निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

1) आधुनिक काळातही चेंडू हे क्रिडासाहित्यातील महत्त्वाचे साधन आहे. मात्र प्राचीन काळापासून क्रिडा साहित्यात चेंडूचे स्थान असून हे चेंडू कापडी स्वरुपातील रंगीबेरंगी होते.
2) मंदिर हे जरी अध्यात्माचे प्रतिक असले तरी मंदिरावरील प्रत्येक शिल्पाचा अर्थ अध्यात्माशीच संबंधित नसतो. त्यापैकी अनेक शिल्पे सामाजिक, सांस्कृतिक परंपरेची साक्ष देत असतात. त्यामुळे प्रत्येक शिल्पाचा संबंध अध्यात्माशी जोडणे उचित नाही.
3) कंदुकधारिणी अथवा कंदुकावतीच्या शिल्पाला इतिहास आहे. ह्या स्त्रीचे शिल्प अप्सरेचे नाही तर कलेचा, कौशल्याचा आविष्कार दर्शविणाऱ्या स्त्रीचे असून त्या सर्वसामान्य पृथ्वीवरील स्त्रिया आहेत. ज्यात राजघराण्यातील स्त्रियांचाही समावेश आहे.
4) अंभई येथील वडेश्वर मंदिराच्या दक्षिण गर्भगृहाच्या बाह्य भागावरील कंदुकधारी स्त्रिया या भारतात सर्वत्र आढणाऱ्या कंदुकधारिणी स्त्री शिल्पाप्रमाणेच आहेत. असे असले तरी आजपर्यंत केवळ एकाच स्त्रीची ओळख पटली होती.
5) अंभई मंदिरावरील दोन्ही कंदुकधारी नृत्यांगणाची वस्त्रप्रावरणे सारखी आहेत. पण कंदुकसंख्या भिन्न आहे. तसेच इतरत्र असलेल्या कंदुकावतीशीही त्यांचे साम्य आहे. भारतभर ही शिल्पे असली तरी यांची संख्या कमी आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


1) जामखेडकर अ.त्र. संपा—पाठक अ.श., महाराष्ट : इतिहास प्राचीन काळ खंड 1, भाग 2,
स्थापत्य व कला, दार्शनिका विभाग, मुंबई, 2009, पृ.100
2) जोशी महादेवशास्त्री, भारतीय मूर्तिकला, अनमोल प्रकाशन, पुणे, 1980, पृ.2
3) विश्वकर्मा (संपा.सोमपुरा प्रभाशंकर ओ.) क्षीरार्णव, सरस्वती पुस्तक भांडार, पृ. 301—313
4) कुलकर्णी र.पु. (संपा.) शिल्पप्रकाश, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1200, पृ.198—204
5) सोमपुरा प्रभाशंकर ओ., भारतीय शिल्पसंहिता, सोमेय्या पब्लिकेशन्स प्रा.लि., मुंबई, 1975, पृ.64
6) व्यास—श्रीहरिवंशपुराण (हिंदी टिका—पंडित रामनारायणदत्त शास्त्री पांडेय), गीताप्रेस, गोरखपूर, पृ.1318, 1319
7) मंदाकिनीसैकतवेविकाभिः सा कन्दुकेः कृत्रिमपुत्रकैश्च।
रमै मुहूर्तध्यगता सखीनां क्रिडारसं निर्विशतीव बाल्ये।।
(कुमारसंभव 1.19)
8) एकस्मिन्समये शंभुर्विजघर सुलीलया।
कौतुकानैव चिक्रीडे शिवा कंदुकलीलया।।
सखीभिः यह सुप्रीत्या कौतुकाच्छिवसन्निधौ।
उदरचन्त्यदंगानां लाघवं परितन्वती।
निश्वासामोदमुदितभमराकुलितेक्षणा।।
भुश्यद्धम्मिल्लसन्माल्यस्वपुराकृतभूमिका।
स्विद्यत्कपोली पत्रालीस्त्रवदं बुकणोज्ज्वला।।
स्फुटच्चोलां शुकपथ तिर्थदंग प्रभावृत्ता।

उल्लसत्कंदुका स्फालति श्रोणित काम्बूजा।।
कंदुकानुगसद्हदृष्टिनर्तित भृलतांचला।
मृडानी किल खेलंती ददृश्ये जगदम्बिका।।
(शिवमहापुराण, प्रथम खंड, पूर्वार्ध, अध्याय 59, श्लोक 11–16, पृ.1070)

9) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोष, खंड 2 रा, पृ. 7

10) कित्ता, पृ.6

11) सैल बिसाल आनि कपि देही। कंदुक इव नल नी लते लेही
श्रीगोस्वामी तुलसीदास, श्रीरामचरितमानस लंकाकांड, दोहा 001 / 002
सुनहु भानुकुल पंकज भानू। कहऊँ सुभाऊ न कछू अभिमानू
जौ तुम्हारी अनुसासन पावे। कंदुक इव ब्रम्हांड उठावौ।।

12) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृतीकोष, खंड 2 रा, पृ. 7

13) कमात पदैश्च पाटैश्च विरुदैः कंदुकः स्मृत।
उद्ग्राहः पदपाटाभ्यां ध्रुवो विरुद बंधतः।।
आभोगोडम्यपदैः दीपित्य निर्युक्तस्त्रिधातुकः।।
(नर्तन निर्णय, वस्तूप्रबंध 3, 451–52)

14) दंडी (अनु.आयुर्वेदालंकार निंरजन) दशकुमारचरित, राजकमल प्रकाशन, मुंबई, पृ. 283–285

15) कित्ता, पृ.283–285

16) कठारे अनिल, शोधमुद्रा खंड–1, शिवानी प्रकाशन, नांदेड, 2016, पृ.70

17) देगलूरकर गो.बं., सुरसुंदरी (मंदिराच्या बाह्यांगावरील स्त्री प्रतिमा), भारतीय विद्याभवन, पुणे, 2004, पृ.45

# पानगावच्या विठ्ठल मंदिरावरील विधीचित्ता

**कु.होनराव दिपाली प्रदिप**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळखंडापासून शिल्पकलेस महत्त्वाचे स्थान आहे. या शिल्पकलेमुळेच भारतीय संस्कृतीने जगामध्ये एक वेगळीच ओळख निर्माण केली आहे. ही शिल्पकला केवळ सजावटीचेच कार्य करत नसून, ही सजावटीसोबत आपल्या संस्कृतीविषयीची महत्त्वपूर्ण माहिती देत असते. शिल्पकलांमध्ये देवदेवता, प्राणी, सामान्य माणुस, वीर, सती, अप्सरा, सुरसुंदरी यांच्या मूर्ती, भौमेतिक नक्षी इत्यादींचा समावेश केला गेलेला आहे. मूर्ती किंवा शिल्पांच्या निर्मितीनंतर पुजनीय मूर्तीसाठी प्रतिमेसाठी निवास म्हणजे मंदिर बांधण्यास सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात अत्यंत साध्या पद्धतीने बांधले जात होते. इसवीसनाच्या सातव्या–आठव्या शतकापासून मंदिराच्या अलंकरणास अथवा सजावटीवर भर दिला लावू लागला. विविध मंदिरांची लक्षवेधी सजावट करण्यासाठी मंदिराच्या बाह्यांगावर अनेक सुंदर रेखीव स्त्रीशिल्पे कोरलेली आपणास पहावयास मिळतात. मुळात ही स्त्रीशिल्पे मंदिराच्या सौंदर्यवृद्धी सोबतच मानवाला काहीतरी संदेश किंवा शिक्षण देत असतात. प्राचीन काळापासूनच स्त्रीस सौंदर्याचे प्रति मानले गेले आहे. या सौंदर्याच्या माध्यमातूनच समाजशिक्षिकेची भूमिका ही प्राचीन स्त्रीशिल्पे घेतल्याचे दिसून येते. स्त्री शिल्पांना अप्सरा, सुरसुंदरी असेही शिल्पशास्त्रीय ग्रंथात म्हटले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात पानगाव येथील विठ्ठल मंदिराच्या बाह्यांगावरील आरशात पाहणाऱ्या विधीचित्ता या स्त्री शिल्पाचे किंवा देवांगणेचा अभ्यास केला आहे.

**पानगाव येथील विठ्ठल मंदिरावरील स्त्री–शिल्पे**

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात लातूरपासून 33 कि.मी. अंतरावर पानगाव हे गाव आहे. या गावात होयसळ, चालुक्य आणि काकतीय स्थापत्यशैलीचा प्रभाव असणारे इसवी सनाच्या बाराव्या शतकातील विठ्ठल मंदिर आहे. या पुर्वाभिमुख मंदिराची रचना नंदीमंडप, मुखमंडप, सभामंडप, अंतराळ व गर्भगृह अशी रचना आहे. सभागृहाला लागून दोन अर्धमंडपही याठिकाणी पहावयास मिळतात. ज्याप्रमाणे मंदिराच्या अंतर्गत भागात कलात्मकता आहे. त्याचप्रमाणे मंदिराच्या बाह्यांगावर अनेक शिल्प आहेत. या शिल्पांमध्ये अनेक दुर्मिळ अशा अप्सरांचा समावेश आहे. शिल्पप्रकारांत 16, क्षीरार्णवात 32 तर काही शिल्पविषयक ग्रंथामध्ये 24 अप्सरांगविषयी माहिती आढळते. या अप्सरांपैकी अनेक अप्सरांचे स्त्री शिल्पांकन पानगावच्या विठ्ठल मंदिरात आढळते. या अप्सरांचे शिल्पांकन केवळ बाह्य भागावरच नाही तर स्तंभाच्या कर्णिकेवरही वैशिष्ट्यपूर्ण अप्सरांची शिल्पे आहेत.

मंदिराच्या बाह्यभागावर चामरधारिणी, निरनिराळी वाद्ये वाजणाऱ्या वादिका, लवलवत्या अंगाने नृत्य करणाऱ्या नर्तिका, त्रिभंग मुद्रेत पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या सुरसुंदरी, अनावृत्त विषकन्या आणि आपले रोजचे व्यवहार करणाऱ्या सौंदर्यवती या सर्वांमुळे मंदिराच्या बाह्य भागाचे सौंदर्य वाढवले आहे. याठिकाणी मंदिराच्या बाह्यांगावर शिल्पांकित केलेल्या क्षीरावर्णवानुसार 32 प्रकारच्या सुरसुंदरीपैकी अतिशय रेखीव व सुबकपणे कोरली गेलेली एक स्त्रीशिल्प म्हणजे 'विधीचित्ता' किंवा दर्पणा आहे.

**विधीचित्ता**



आपल्या प्राचीन वाङ्मयातही 'दर्पणा'चे प्रतिबिंब उमटलेच असून उपनिषदे, पुराणे, आगमग्रंथ, महाकाव्ये इ. साहित्यात आरश्यांचा उल्लेख आहे. 36 आयुधांमध्ये बाराव्या क्रमांकाला आरशाचे स्थान आहे. कविकुलगुरु कालिदासाने 'ऋतुसंहार' मध्ये 'दर्पण सक्तहस्ता' असा उल्लेख केला असून 'देवतामूर्तीप्रकरण' ग्रंथानुसार संयुक्त प्रतिमेतील शिव पार्वतीच्या दर्पण आयुधरुपात असल्याचे दिसते. सौंदर्य प्रसाधनाचे साधन म्हणून ठरलेला आरशाने मंदिराच्या बाह्यांगावर शिल्पांकित केल्या जाणाऱ्या सुरसुंदरीपैकी एक सुंदरीच्या नाजूक हातात आपले स्थान निर्माण केले. या स्त्रीच्या हातात आरसा असल्याने तिला 'दर्पना' असे म्हणतात. जर क्षीरार्णवात हिचे वर्णन 'विधीचित्ता सदर्पना' असे आढळते. दर्पण घेतलेली स्त्री स्वमग्न होवून आपले मुखकमल आरशात न्याहाळताना व आरश्यात पाहून साजश्रृंगार करताना दिसते.

'दर्पणात पाहते रुप माझेच मी साजरे।
वेडावेल दर्पनही पाहून मुखकमल अन नयने लाजरे।'

पानगाव येथील ही विधीचित्ता स्वतः सौंदर्य प्रसाधन करण्यात मग्न आहे. हिच्या हातात 'दर्पन' (आरसा) आहे. एका हातात आरसा धरुन, तिच्या नाजूक बोटाने कपाळावर तिलक रेखताना, अशा भावभ्रिमात ही स्त्री शिल्पकाराने कोरल्याचे दिसते. सालंकृत साजश्रृंगारयुक्त, मनोवेधक शरीरयष्टी असणारी ही स्त्री सौंदर्य प्रसाधनात मग्न असल्याचे दिसते. ती विधीचित्ता स्त्री त्रिभंगात उभी असून डाव्या हातात तिने आरसा धरलेला आहे. कमरेस मेखला, पायात तोडे घातलेले आहेत. हातात कंगण तर दंडात सुंदर केयूर घातलेले आहेत. गळ्यात बारीक कोरीव काम केलेली ग्रीवा व हारसूत्र घातलेली आहे. तिच्या कानात कुंडल असून तिने विशिष्ट अशी केशरचना केलेली आहे. तसेच या विधीचित्ता स्त्रीच्या पायात पादवलयही विराजमान आहेत. ही दर्पणा गुडघ्यातून दुमडलेली आहे. सुडौल अलंकारयुक्त बांधा यामुळे तिचे लावण्य खुलून गेल्याचे दिसत आहे. रेखीवपणा, बारीक कोरीवकाम दागिन्याचे ठळकपणे येथे दिसते.

पानगाव येथील दर्पना व्यतिरिक्त ही दर्पना स्त्रीशिल्पे इतर ठिकाणीही पाहावयास मिळतात. यामध्ये डोळ्यात हळुवारपणे काजळ घालणारी दर्पणा मार्कण्डीला (जि. गडचिरोली) असून निलंगा येथील ही स्त्री त्रिभंगात उभी आहे व तिने डाव्या हातात आरसा धरलेला आहे. अकोला जिल्ह्यातील तहाकरी जगदंबा मंदिरातील दर्पनाही त्रिभंगात उभी असून आरशात पाहून माथ्यावरील बिंदी नीट करताना दिसते. धर्मापुरी येथील केदारेश्वर मंदिरावरही दर्पणाचे शिल्प आहे. ही दर्पणा आपला विपूल केशसंभार ठिकठाक करताना त्रिभंगात उभी आहे. गुजरात–पाटणा येथील 'राणी की बाग' येथे दर्पणेचे 3–4 शिल्प आहेत. अंबेजोगाई येथील सकलेश्वर मंदिरात ही अत्यंत कमनीय बांध्याची दर्पना आहे. कर्नाटकातील बेलूर हाळेबिडू आदि मंदिरातही या दर्पनाचे नजरेचे पारणे फेडणारे शिल्प पहावयास मिळतात.

**समारोप**

प्रत्येक प्रदेशाचे वेगळे वैशिष्ट्ये असून तेथील सामाजिकता, प्रदेश वैशिष्ट्ये, शारीरिक ठेवण, अलंकार यांचा प्रभाव शिल्पांवर पडत असतो. दर्पणा हे लोकप्रिय आणि शिल्पकारांचे आवडते शिल्प असल्याने तिचे शिल्पांकन सर्वत्र आढळते. मात्र केवळ सौंदर्यप्रसाधरत स्त्रीशिल्प किंवा मेकअप करण्याचे प्रशिक्षण ही दर्पणा समाजाला देत नाही तर प्रत्येक काळाला योग्य ठरणारे सारगर्भित तत्त्वज्ञान ती सांगत असते. जणू माणसाच्या

कालमानापरत्वे बदलणाऱ्या वागणूकीचे दर्शन दर्पणातून घडवणे हाही तिचा उद्देश असू शकतो. इतरांना दोष देण्याच्या वृत्तीचे खंडन करत 'स्व– रूप पहा हाही संदेश ती देत असावी. जेवढे आपण तिला बोलते करू तेवढे ती तत्त्वज्ञान सांगणार हे मात्र सत्य आहे. फक्त या स्त्रीशिल्पाकडे निखळत जाणारे दगड म्हणून न पाहता मानवाचे प्रतिबिंब म्हणून पाहण्याची गरज आहे. पानगाव येथील दर्पना ही अत्यंत सुडौल, वस्त्रप्रावरणे अलंकाराने युक्त दिसून येते. तिने डाव्या हातात धरलेला आरसा व उजव्या हाताची तिची वक्र रचना आणि डाव्या पायावर शरीराचा पडलेला भार यामुळे या शिल्पाला मोहकता प्राप्त झाली आहे. येथील शिल्पासाठीचा पाषाण हा मजबूत आहे त्यामुळे शिल्प सुबक आहे पण या सुंदर दर्पनेला मानवानी विकृत करण्यासाठी केशराचा टिळा लावला आहे. निलंगा, अंबेजोगाई येथील दर्पनेपेक्षाही पानगाव येथील दर्पणेची आकर्षकता जास्त असल्याचे दिसते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1) उपाध्याय वासुदेव, प्राचीन भारतीय मुर्तिविज्ञान, चौखम्बा विद्याभवन, वाराणसी, 1982
2) जोशी नी.पु., भारतीय मुर्तिशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, 1892
3) देगलूरकर गो.बं., सुरसुंदरी, भारतीय विद्या भवन, पुणे, 2004
4) माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे

# कुशाण कालखंडातील बौध्द कलेचा विकास : एक ऐतिहासिक अवलोकन

**डॉ.प्रा.सुरेखा विठ्ठलराव जावळे**
सौ. के.एस.के. महाविद्यालय, बीड.
मो. 9970076926

शुंग वंशाच्या कारकिर्दीच्या शेवटी पश्चिम आशियातून शक, ग्रीक व पर्शियन लोकांच्या टोळया भारतात आल्या. त्यांनी वायव्य व पश्चिम भारतामध्ये आपली सत्ता स्थापन केली. त्यापैकी मध्य आशियातील कुशाण या जमातीतील कॅडफिसेस नावाच्या राजाने भारतातील काश्मीर, गांधार हे प्रदेश जिंकले आणि कुशाण वंशाची राजवट स्थापन केली. पुढे याच जमातीतील पराक्रमी सरदार कनिष्क इ.स. 78 ते 101 या काळात राजा झाला. या काळात अनेक सांस्कृतिक व धार्मिक स्थित्यंतरे झाली. राजा कनिष्क हा या काळातील महापराक्रमी राजा होता. त्याने बौध्द धर्माचा स्विकार केला होता आणि बौध्द धर्माच्या प्रसाराला चांगलाच हातभार लागला होता.

कुशाण काळात पहिल्या तीन शतकांत गांधार व मथुरा ही ठिकाणे बौध्द कलेसाठी विशेष प्रसिध्द होती. गांधार व मथुरा ही ठिकाणे बौध्द कलेसाठी विशेष प्रसिध्द होती. गांधार म्हणजे सध्याचे पेशावर व त्याच्या आजुबाजुचा प्रदेश. हा प्रदेश पूर्वी सिकंदरच्या स्वारीनंतर मध्य आशियातील ग्रीक लोकांच्या सत्तेखाली आल्यामुळे त्या वेळच्या कलेवर ग्रीक कलेचा प्रभाव दिसून येतो म्हणुन तिला इंडो ग्रीक शैली असे नाव पडले. कुशाण काळात वायव्येकडील प्रांतात गांधार शैली, उत्तरेला मथुरा शैली आणि अग्नेयेला अमरावती कला अशा तीन दिशांना बौध्द कलेचा विकास सुरू झाला.

कुशाणाच्या राजवटीत बौध्द धर्म जरी मुख्य धर्म असला तरी त्यात बरेच बदल होत होते. बौध्द धर्माला हिंदु धर्माला तोंड द्यावे लागल्यामुळे त्यांना काही तत्वांना मुरड घालावी लागली आणि काही नवीन तत्वे स्विकारावी लागली. त्यामध्ये त्यांनी हिंदु धर्मातील मुर्तीपुजेचे तत्व स्विकारले व त्याचा परिणाम कलेवर झाला याच्या आधीच्या काळात बुध्दाची प्रत्यक्ष मुर्ती साकार न करता पादुका, बोधिवृक्ष, सिंहासन इ.च्या प्रतीकांव्दारे बुध्दाचे अस्तित्व दाखवले जात असे. कुशाण काळात मुर्तिपुजा मान्य असणा–या महायान पंथाचा उदय झाला आणि बुध्दाच्या मुर्ती बनवल्या गेल्या अशा प्रकारे बौध्द धर्मात हीनयान व महायान असे दोन पंथ निर्माण झाले. कनिष्काच्या काळात महायान पंथाचा बराच प्रसार झााला. या काळातील कला मुख्यतः दोन स्वरूपात प्रकाशित झाली, ती म्हणजे गंधार शैली व मथुरा शैली.

**गांधार शैली :–**

वास्तुकला :–गांधार शैलीची सुरूवातीची वास्तुकला तक्षशिला नगर व तिच्या आजुबाजूच्या इमारतीमध्ये पहायला मिळते. त्यात विशेष प्रसिध्द म्हणजे सिरकाप हे पूर्वीचे राजधानीचे ठिकाण होय. तेथे राजप्रसादाचे अवशेष सापडले आहेत. यामध्ये ग्रीक व भारतीय संस्कृतीचे दर्शन दिसून येते. तक्षशिला येथे अग्निमंदिर व पेशावरजवळ तख्त–इ–बाही येथे बौध्द विहाराचे अवशेष सापडले आहेत. या विहाराची रचना म्हणजे मध्यभागी उघडे पटांगण असून त्याच्याभोवती बौध्द भिक्षुंच्या राहण्याची जागा, सर्वांना एकत्र येण्यासाठी मोठे सभागृह व एक मोठया दालनात स्तूप असावा असे येथील अवशेषावरून वाटते.

**शिल्पकला :–**

या काळात सर्वसामान्य बौध्दधर्मीय लोकांचा हीनयान पंथाकडून महायान पंथाकडे धार्मिक ओढा वाढला. गांधार शैलीत बुध्द प्रतिमा तयार करण्यासाठी गांधार कलावंतांनी ग्रीक व रोमन शिल्पांच्या नमुन्यावरून बुध्दप्रतिमा बनवल्या या उभ्या प्रतिमा गुरू किंवा शिक्षक स्वरूपात किंवा ध्यानस्थ बसलेल्या योग्याच्या अवस्थेत दाखवलेल्या आहेत.

गांधार शैलीतील उभ्या बुध्दप्रतिमेचे उत्तम उदाहरण म्हणजे पेशावरजवळील होटीमार्दन येथील मुर्ती होय या मुर्तीमध्ये ग्रीक शैली प्रमाणे ढब दिसून येते. बुध्द प्रतिमेचे सर्व शरीर रोमन टोगा पध्दतीच्या वस्त्राने झाकले आहे. त्यावर खोलगट व लयदार चुण्या आहेत. रोमन कलेची सर्व लक्षणे पहिल्या शतकाच्या उत्तरार्धातील अनेक बुध्दप्रतिमांमध्ये पहायला मिळतात.[2]

बसलेल्या बुध्दमुर्तीमध्ये तख्त–इ–बाही येथील विहारात सापडलेली मुर्ती प्रसिध्द आहे. ही उठावातील मुर्ती सध्या बर्लिनच्या गुगनहाइम म्युझिअममध्ये आहे. ही मुर्ती गोल असली तरी तिला उठावाची मुर्ती म्हटले जाते. कारण पुढून पाहण्याच्या दृष्टीने त्याचे कोरीवकाम केलेले आहे. या प्रकारात मागची संपुर्ण बाजु सपाट व अपुर्ण सोडलेली असते. असा प्रकार इतरही मुर्तीत बघायला मिळतो. ही मुर्ती होटी–मार्दन बुध्दमुर्तीप्रमाणे आहे. [3]येथेही ग्रीक पध्दतीचा चेहरा व रोमन टोगाप्रमाणे वस्त्र दाखवलेले आहे.

गांधार शिल्पकलेत बुध्दमुर्तीप्रमाणे बोधिसत्वाच्याही अनेक मुर्ती तयार झाल्या होत्या. या सर्व मुर्ती बसलेल्या किंवा उभ्या अवस्थेत आहेत. भगवान बुध्दाप्रमाणेच धर्माचा उपदेष व प्रसार करण्यासाठी आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी बोधिसत्व हे पृथ्वीतलावावर अवतरलेले आहेत अशी बुध्द पुराणग्रंथातील कल्पना होती. अशा बोधिसत्वाच्या अनेक मुर्तीपैकी गांधारमध्ये सापडलेली 'उभा बोधिसत्व' ही मुर्ती विशेष प्रसिध्द आहे. ती लंडनच्या ब्रिटिश मुझियममध्ये आहे.

गांधार पध्दतीच्या उत्कृष्ट शिल्पकौशल्याचा नमुना म्हणजे गांधारमध्ये सापडेले बुध्दमुर्तीचे शीर. सध्या ते लंडनच्या व्हिक्टोरिया ॲन्ड अल्बर्ट म्युझियममध्ये आहे. हे शिल्प स्टक्को प्लास्टरमध्ये केलेले असून ते साधारणपणे चौथ्या ते पाचव्या शतकातील असावे. या शिल्पाची नीट घडण, साधलेला तोल व सुडौल रूप यावरून गांधार शिल्पकौशल्याची कल्पना येते.

गांधार शैलीत बुध्द जीवनातील अनेक प्रसंग उठावशिल्पातून कोरलेले आहेत. रोमन प्रभावामुळे सलग कथनपध्दती स्वीकारून प्रत्येक प्रसंग हा स्वतंत्र रचनाचित्राप्रमाणे बनवला आहे. कधी कधी जातककथांचे प्रसंगही पहायला मिळतात. अशी शिल्पे जास्त करून स्तुपाच्या गोलाकार पृष्ठभागावर काढलेली आहेत. यामध्ये बुध्द प्रतिकांच्या स्वरूपात न दाखवता मानवी स्वरूपात दाखवला आहे. बुध्दाला महत्व देण्यासाठी तो मोठया आकारात दाखवला आणि बाकीच्या आकृत्या लहान दाखवल्या आहेत.[4]यामधील बुध्दाच्या सर्वसंगत्यागाच्या प्रसंगाचे शिल्प विशेष उल्लेखनीय आहे. ते सध्या कलकत्ता मुझियममध्ये आहे.

तसेच दुसरे [5]उठावशिल्प म्हणजे लौरिया तांगाई येथील बुध्दाच्या महानिर्वाणाचा प्रसंग एका उठावशिल्पपटावर दाखवलेला आहे. तेही कलकत्त्याच्या मुझियममध्ये आहे. यामध्ये पार्श्वभुमीला खोलगट जागेत एकावर एक अशा ओळीमध्ये मानवी आकृत्यांची नाटयमय रचना केलेली दिसते. हा शिल्पपट 60 से.मी. उंचीचा असुन त्यावर अवघड रचना केलेली दिसते. त्यामुळे छाया–प्रकाशाचा सुंदर परिणाम साधला गेला आहे. सांची व इतर ठिकाणच्या शिल्पाप्रमाणे एकावर एक माणसांच्या ओळी दाखवून यथार्थदर्शनाचा परिणाम साधण्याची कला येथेही पाहावयास मिळते. भावनावेगाने व दुःखाने व्यथित झालेले चेहरे व त्यांच्या हावभावांतुन कारूण्य दाखवून बुध्दाच्या महानिर्वाणाचा प्रसंग उभा करण्यात कलाकार यशस्वी झालेला दिसुन येतो. तिस–या शतकातील रोमन कलेतील दगडी पेटीवरील शिल्पाप्रमाणे हे शिल्प भासते.

**मथुरा शैली** :– कुशाण काळात मथुरा येथे बौध्द, जैन व हिंदु अशा तीनही धर्मांच्या देवदेवतांच्या अनेक प्रतिमा तयार केल्या गेल्या. कारण तेथील राजे सर्व धर्म समान आहेत असे मानणारे होते. या शिल्पांसाठी तांबडा दगड वापरला गेला. या मुर्ती गांधार शैलीच्या मुर्तीपेक्षा भिन्न असुन त्यामध्ये भारतीय योगी पुरूषाची लक्षणे पहायला मिळतात. भारतीय परंपरेतील पद्मासन, अभयमुद्रा, वरदमुद्रा अशा योगमुद्रांत मुर्ती घडवलेल्या आहेत. उष्णिकेमुळे त्याला भारतीयत्व व अध्यात्मिकता प्राप्त झालेली आहे.

बालभिक्षूने अर्पिलेला बोधिसत्व :

मथुरा येथे सापडलेली ही मुर्ती प्रथम तयार झालेली बौध्द मुर्ती समजली जाते. ही बोधिसत्वाची मुर्ती सारनाथ येथे सापडलेली असुन हिची उंची सर्वसामान्य माणसाच्या उंचीपेक्षा जास्त आहे. 'फ्रियर बाला' या बौध्द भिक्षूने राजा कनिष्काला ही मुर्ती अर्पण केल्याचा उल्लेख या मुर्तीवरील लेखात आहे.[6] ती बुध्दापेक्षा बोधिसत्वाची मुर्ती असावी असे म्हटले जाते. मुर्तीचा कंबरेपर्यंतचा भाग उघडा असून त्याने भारतीय धोतरासारखे वस्त्र नेसले आहे. ही मुर्ती मौर्यकालीन भव्य यक्षप्रतिमेप्रमाणे वाटते. भव्यता, वजन, घनता, अंगावरील मांसल भाग व वस्त्रांचे रेखांकन ही या मुर्तीची वैशिष्टये आहेत.

**बोधिसत्व कत्र :**

ही बोधिसत्वाची मुर्ती मथुरेजवळ कत्र येथे सापडली. ही मुर्ती इसवी सणाच्या दुस–या शतकातील असून बोधिसत्व पिंपळवृक्षाखाली अभयमुद्रेत बसलेला आहे. ही मुर्ती सिंहासनावर पद्मासन घालुन बसलेली आहे. तिचा डावा हात अभयमुद्रेत आहे. तिच्या उजव्या खांद्यावरील वस्त्र पारदर्शक दाखविले आहे. सिंहासनावर कोरलेल्या लेखात या मुर्तीचा उल्लेख 'बोधीसत्व' असा केलेला आहे. कुशाण काळातील मथुरा शैलीतील आणखी एक प्रसिध्द स्त्री शिल्प म्हणजे 'मद्यपानाने धुंद झालेली स्त्री' यामध्ये मद्याची नशा चढलेली स्त्री दाखवलेली असुन सेवक तिला सांभाळताना दाखवले आहे.

**बुध्दमुर्तीचा शिरोभाग –**

हा शिरोभाग मथुरा येथे सापडला असून तो इसवी सनाच्या दुस–या शतकातील आहे. चेह–याचा बाकीचा भाग मात्र दाढी केल्याप्रमाणे गुळगुळीत आहे. चेह–याचे सर्व अवयव गोलाकार पध्दतीने दाखवल्यामुळे ते एकरूप झाल्यासारखे वाटतात. अशा प्रकारचे शिल्प सुरूवातीच्या कुशाण काळातील मथुरा शैलीत पहायला मिळते.

**कनिष्क राजाचा पुतळा –**

कनिष्काचा पुतळा इसवी सनाच्या दुस–या शतकातील आहे. तो डोकेविरहित आहे. हा कनिष्काचा पुतळा आहे. असा उल्लेख पुतळयाने अंगात घातलेल्या कोटावर केलेला आहे.[7] कुशाणांनी उत्तरेला 100 वर्षे राज्य केल्यामुळे त्यांच्या जमातीतील पेहराव पुतळयाला दाखवला आहे. योध्दयाप्रमाणे लांब कोट, पायात जाडजुड मंगोलियन पध्दतीचे बुट आहेत. एका हातात तलवार व दुस–या हातात म्यान धरलेले आहे. या पुतळयाला जरी शीर नसले तरी त्याच्या उभे राहण्यात ऐट व सहजता दिसुन येते. या पुतळयाची उंची 1 मी. 85से.मी. असुन तो रेतीच्या दगडात बनवलेला आहे. तो मथुरा म्युझियममध्ये आहे.

**धातुकला –**

गांधार शैलीच्या कलावंतांनी किंवा त्यांची नक्कल करणा–या अनेकांनी धातुशिल्पे निर्माण केली. या धातुशिल्पांमध्ये कनिष्काचा रक्षा करंडक व भिमरन रक्षा करंडक हे दोन उत्कृष्ट नमुन आहेत.

**कनिष्काचा रक्षा करंडक –**

कनिष्क राजाच्या प्रमुख स्तूपाच्या अवशेषामध्ये हा करंडक पेशावरजवळ शा–जी–की–ढेरी येथे सापडला हा मौल्यवान धातूचा बनवलेला असून त्याच्या दंडगोलाकृती भागावर उठावाचे कोरिवकाम आहे. झाकणावर तीन छोटे गोल पुतळे आहेत

त्यामध्ये मधला पुतळा बुध्दाचा असुन इंद्र आणि ब्रम्ह हे दोन बाजुंना दाखवले आहेत. हा करंडक पेशावरच्या म्युझियममध्ये आहे.

**भिमरन रक्षा करंडक –**

हा करंडक भिमरन स्तूपाच्या अवशेषात अफगाणिस्तानमधील जलालाबाद येथे सापडला. हा उभट दंडगोल आकाराचा करंडक सोन्याचा आहे. कनिष्क करंडकाच्या मानाने हा खूपच सुबक आहे. सध्या तो ब्रिटिश म्युझियममध्ये आहे.

**संदर्भ सूची –**


1. केतकर संध्या– भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्सना प्रकाशन, पुणे पृ. 43, 48.
2. स्मार्त वा.ब. व सौ. ज्योती ठाकोर –कलादर्पण, पृ. 27, 28
3. प्रा. जगताप जयप्रकाश – भारतीय कलेचा इतिहास, पृ. 60
4. कित्ता– पृ.क्र. 65
5. प्रा. शहाणे श्री.अ.– भारतीय कलेचा इतिहास, पृ. 35, 40
6. घारे दिपक, पटवर्धन सुधीर –समकालीन भारतीय दृश्यकला, पृ. 80
7. कित्ता– पृ. 85, 86

# मंदिर और मूर्तिशास्त्र
# (मंदिर निर्माण शैलीके विशिष्ट संदर्भ में )

**शोधछात्रा**
करपे अश्विनी सहदेवराव
मो.9404992380

हिंदु मंदिर एक प्रतीक हैं, अथवा यों कहे कि अनेक प्रतीकों का समन्वय हैं । मनुष्य सबसे विकसित प्राणी हैं और मंदिर उसी का प्रतिरुप हैं। जैसे मनुष्य के शरीर के विभिन्न अंगो के नाम पाद से लेकर शिखा तक के अनुरुप ही मंदिर के अंगो का नामकरण किया जाता हैं। चरण, पाद, जंघा, ग्रीव ओर मस्तक इत्यादी शब्द जो कि मानव शरीर के अंग हैं, एंव जैविक कार्य करते हैं, मंदिर के स्थापत्य के विभिन्न अंगो को इंगित करने के लिए प्रयुक्त किये जाते हैं । १) स्पष्ट हैं कि सुन्दर से सुन्दर शरीर भी आत्मा के बिना निर्जीव हैं । हिन्दुओं के लिए मंदिर उस देवता का स्थान हैं जो विश्व् की अंतरात्मा हैं। इसीलिए मंदिर को देवालय या देवायतन जैसे शब्दो से जाना जाता हैं।

मन से दूर रहकर निराकार ईश्व्र की आराधना या ध्यान करने के स्थान को ' मंदिर ' कहते हैं। जिस तरह हम जुते उत्तारकर मंदिर में प्रवेश करते हैं उसी तरह मन और अहंकार को भी बाहर छोड़ दिया जाता हैं ।जहाँ देवताओं की पूजा होती हैं उसे ' देवरा ' या ' देवस्थ्ल ' कहा जाता हैं ।जहाँ पूजा होती हैं उसे पुजास्थ्ल, जहाँ प्रार्थना होती हैं उसे प्रार्थना स्थ्ल कहते हैं। वेदज्ञ मानते हैं कि भगवान प्रार्थना से प्रसन्न होते हैं पूजा से नहीं जिसप्रकार 'व्दार' किसी भगवान, देवता या गुरु का होता हैं, आलय सिर्फ 'शिव' का होता हैं और मंदिर या स्तूप सिर्फ, ध्यान-प्रार्थना के लिए होत हैं लेकिन वर्तमान समय में उक्त सभी स्थान को मंदिर कहा जाता हैं । जिनमें की किसी देव मूर्ति की पूजा होती हैं

भारत की प्राचीन, स्थापत्य कला में मंदिरो का विशिष्ट स्थान हैं । भारतीय संस्कृति में मंदिर निर्माण के पीछे यह सत्य छुपा था किस ऐसा धर्म स्थापित हो जो जनता को सहजता व व्यवाहारिकता से प्राप्त हो सके इसकी पूर्ति के लिए मंदिर स्थापत्य का प्रार्दुभाव हुआ । इससे पूर्व भारत में बौध्द एवं जैन धर्म व्दारा गुहा, स्तुपों एवं चैत्यों का निर्माण किया जाने लगा था कुषाणकाल के बाद गुप्त काल में देवताओं की पूजा के साथ ही देवलयों का निर्माण भी प्रारंभ हुआ ।

प्रारंभिक मंदिरों का वास्तु विन्यास बौध्द विहारों से प्रभावित था। इनकी छत चपटी तथा इनमें गर्भ गृह होता था । मंदिरों को साकार रुप प्रदान करने के साथ ही देहरुप में स्थापित किया गया चौथी सदी में भागवत धर्म के अभ्युदय के पश्चात (इष्टदेव) भगवान की प्रतिमा स्थापित करने की आवश्यकता प्रतीत हुई । अतएव वैष्णव मतानुयायी मंदिर निर्माण की योजना करने लगे । साँची का दो स्त्म्भ्युक्त् कमरेवाला मंदिर गुप्त् मंदिर के प्रथम चरण का माना जाता हैं। बाद में गुप्त् काल में वृहदस्त्र पर मंदिरों का निर्माण किया गया जिनमें 'वैष्ण्व' तथा 'शैव' दोनों धर्मो के मंदिर हैं।प्रारम्भ् में ये मंदिर सादा थे और इनमें स्तंभ अलंकृत नही थें । शिखरों के स्थान पर छत सपाट होती थी तथा गर्भगृह में भगवान की

प्रतिमा, ऊँची जगती आदि होते थे। गर्भगृह के समक्ष स्तभों पर आश्रित एक छोटा अथवा बड़ा बरामदा भी मिलने लगा`यही परम्परा बाद के कालों में प्राप्त् होती हैं।

प्राचीन भारतीय साहित्य में मंदिर निर्माण संबंधी विविध उल्लेख प्राप्त होते हैं। मंदिर वास्तु के संदर्भ में 'अपराजितापृच्छा' में कहा गया हैं कि नगर की शोभा और विभूति के लिए, लोकधर्म के प्रतीक स्वरुप, कीर्ति, आयु और यश की वृध्दी के लिए और जनपद के कल्यान के लिए मंदिर कानिर्माण किया जाता हैं।फ्फ २) भारत प्रायदिवप के विभीन्न भागों में मदिरों ने अपनी एक विविध प्रकार की यात्रा तय की हैं । यह सब स्थानीक आवश्यकताओं आस्था तथा विषय विशेष के अनुसार हुआ हैं।निश्चय ही इनमें विचार विनीमय तथा पारम्पारिक विचारों के आदान-प्रदान का काफी योगदान रहा । यदयपि मदिरों के मूलतत्व तथा उनकी पूजा विधी वेद तथा पुराण स्त्रोतों से निसृत हुई किन्तु सहस्त्राब्दीयों के काल प्रवाह में उन्हेंने अपने एक विशेष ढंग तथा शैली को अपनाया। यह इसलिए हुआ की यह परंपरा मूल रुप में उत्तर भारत से प्रारंम्भ् हुई और पूरे देश में फैली।3) हिंदु धर्मों में मदिर बहुत ही महत्वपूर्ण स्थान रखते हैं । श्राध्दालू इन मदिरों में जाकर देवी-देवताओं की पूजा कर उन्हे, प्रसन्न करने का प्रयास करते हैं। भारत में मदिर निर्माण के साक्ष्य चौथी सदी ईस्वी से मिलना प्रारंम्भ् होता है। इस ममय भारत में गुप्त शासकों का पूरे भारत पर शासन था। उन्ही के द्वारा मदिर निर्माण को संरक्षण दिया गया। गुप्तकाल से ही मदिरो को प्रभुत्व् बढ़ा और बाद में अन्य शासकों ने भी कई मदिर का निर्माण कराया। अलग-अगल कालखण्ड एवं क्षेत्र में विभीन्न शासाके द्वारा निर्माण कराये जाने के कारण इनकी निर्माण शैली और संरचना में भी परिर्वतन आयें।

प्राचीन भारतीय इतिहास में भारत में मदिर निर्माण शैलीयों को तीन प्रमुख शैलीयों में बांटा गया हैं:-

**1. नागर शैली के मदिर:-** इन शैलीयों के मदिर मुख्यत: मध्य भारत में पाए जाते हैं। इसे उत्तर भारतीय शैली भी कहा जाता हैं। नागर शैली का प्रसार ' हिमाय' से लेकर विध्यं पर्वतमाला तक देखा जा सकता है। वास्तुशास्त्र के अनुसार नागर शैली के मदिर की पहचान आधार से लेकर सर्वोच्च अंश तक इसका चुतष्कोण होना हैं । विकसित नागर मदिर में गर्भगृह, उसके समक्ष क्रमाश: अन्तराल, मण्डप तथा अर्ध्दमण्डप, प्राप्त होते हैं। एक ही अक्ष पर एक दूसरे से संलग्न इन भागों का निर्माण किया जाता हैं। इस शैली में निर्माण हुए- लिंगराज मदिर-भुवनेश्वर ओडिसा, जगन्नाथ् मदिर-पुरी ओडिसा खजुराहो के मदिर- मध्यप्रदेश, दिलवाडा के मदिर- आबू पर्वत (राजस्थान), सोमनाथ मदिर-सोमनाथ(गुजरात) आदि विशीष्ट हैं।

**2. द्रविड शैली:-** इन शैलियों के मदिर दक्षीण भारत में पाए जाते हैं इसीलिए यह द्रविड शैली कहलाती हैं। इसमें मदिर का आधार भाग वर्गाकार होता हैं तथा गर्भगृह के उपर का भाग पिरामिडनुमा सीधा होता हैं, जिसमें अनेक मजिले होती हैं । इस शैली के मदिरों की प्रमुख विशेषता यह हैं कि ये काफी ऊंचे तथा विशाल प्रागण से घीरे होते हैं। प्रांगण में छोटे-बड़े अनेक मदिर, कक्ष तथा जलकुण्ड होते हैं। प्रांगण का मुख्य प्रवेश द्वार 'गोपुरम' कहलता है। चोल काल के मदिर द्रविड शैली के सर्वश्रेष्ठ प्रमाण हैं।इस शैली में निर्माण हुआ

मामाल्लपुरम का रथमदिर- तामिडनाडू, कैलास मदिर- कांची, बैकुंठ मदिर- पेरुमल, कैलास मदिर- महाराष्ट्र यह विशीष्ट हैं।

**3. बेसर शैली:-** बेसर का शाब्दीक अर्थ हैं मिश्रित। नागर और द्रविड शैली के मिश्रित रुप को बेसर की संज्ञा दी गई हैं यहं विन्यास में द्विड शैली का तथा रुप में नागर शैली का होता हैं दो विभीन्न शैलीयों के कारण उत्तर और दक्षीण के विस्तृत क्षेत्र में बीच सतह क्षेत्र बन गया जहां इनके मिश्रित रुप से बेसर शैली हुई इस शैली के मदिर विध्य पर्वतमाला, से कृष्णा नदी तक निर्मितहै। इस शैली में अनरनाथ का मदिर- महाराष्ट्र, खानदेश का मदिर- बुरहानपुर यह विशीष्ट हैं।

इन तीन प्रमुख शैलीयों के साथ भारत के पडोसी देशों में '**पैगाडा शैली**' भी देखी जाती हैं।यह शैली नेपाल, इंण्डोनेशीया का बाली टापू में प्रचलित हैं। इस शैली में छतों का शृंखला अनुलम्बीत रुप में एक के उपर दुसरा रहता हैं।अधीकांश गर्भगृह भूतल स्तर में रहता हैं। परंतु कुछ मदिर में गर्भगृह सम्मुचित स्थल में निर्मित होते हैं। जैसे- भक्तपुर का न्यायपोल मदिर जो भूस्थल से 3-4 मजिल के उंचाई पर स्थीत होते हैं। इस शैली के अन्य उदाहरणों में काठमांडु का आकाश भैरव और भीमसेनस्थान मदिर विशीष्ट हैं। 4) इस प्रकार स्पष्ट होता होता हैं की, भारत में देवस्थान मदिरो का निर्माण कार्य गुप्त साम्राज्य के साथ प्रारंभ होता हैं । तब से लेकर वर्तमान समय तक विभीन्न शौलीयों के मदिर बनाये जाने लगे । मदिर बनाने की कला सम्पूर्ण भारत मे एक समान न थी । दक्षीण भारतीय परम्परा के बने मदिर द्रविड शैली का प्रतिनिधीत्व करते हैं । हाडौती क्षेत्र के मदिर दोनों ही शौलीयों के मिश्रण का परिणाम हैं यहाँ के मदिरो में द्रविड शैली व नागर शैली दोनों का ही प्रयोग हुआ जिसे बैसर शैली का नाम दिया गया हैं। बैसर शैली के मदिर मध्य भारत में बहुतायत से मिलते हैं। तथा मालवा के क्षेत्र में प्राप्त होते हैं। 5) अंततः यही कहना होगा कि मदिर निर्माण के पीछे उद्देश मानव की धार्मिक आवश्यकता को पूरा करना था । धर्म और उपासना के केंद्र के रुप में इन देवस्थानों का अपना अलग-अलग एवं विशेष महत्व हैं। यही देवस्थान प्राचीन समय में वर्तालाप तथा संचार के साधन भी होते हैं।

**संदर्भ ग्रथ सूची**

1. ओमप्रकाश टंडण-उत्तर भारत के मदिर, 1987, पृ.01

2. भूवनदेवाचार्य: अपराजितापृच्छा,115, 3-4

3. उमेश दत्त दीक्षीत-दक्षीण भारत में मदिर, 1996,पृ.01

4. नागेंद्र प्रतापसिंह-2005, पृ.58

5.पिताम्बर शर्मा-बून्दीराज के प्रमुख देवालय पृ.40

**अन्य संदर्भ ग्रथ सूची**

1. आर.नाथ. अग्रवाल: प्राचीन भारतीय अवशेष: एक अध्ययन, मध्यप्रदेश,1998

2.दिनेश मांडोल-भारत की सांस्कृतिक विरासत,2010

3. महेशचंद्र जोशी-युगयुगीन भारतीय कला, जोधपूर 1995

4. भगवतशरण उपाध्याय-भारतीय कला और संस्कृति की भूमिका: नई दिल्ली, 1991

# प्राचीन काष्ठ चल मूर्ती : एक शोध

**श्री.शिरपुरे शुभम लालू**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रा.डॉ.महाके माधवी गोपीनाथराव**
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**सारांश**

मानवाने स्वतःच्या प्रगतीची वाटचाल करताना स्वतःच्या प्रगतीसाठी व स्वसुखाच्या अनुभूतीसाठी कला, भौतिक सेवा सुविधांची निर्मिती केली. भौतिक सुखाच्या व आत्मानुभूतीच्या अनुषंगाने प्राचीन काळातील मानवाने नानाविध प्रयोग केल्याचे दाखलेही प्राप्त होतात. आध्यात्मिक भावना वाढीस लागल्यानंतर प्रतिमा—मूर्तीचा उदय झाला परंतु नंतरच्या काळात याच मूर्ती त्याचे रंजन आणि सेवासुविधा पुरविण्याचे साधनही बनल्याचे दिसते. अशा प्रकारच्या स्वयंचलित असल्या तरी चालकाच्या बुद्धीनुसार सेवा सुविधा पुरविणाऱ्या मूर्तीही प्राचीन काळात निर्माण केल्या होत्या. याचे माध्यम लाकूड असून बीजतत्त्व नैसर्गिक व कृत्रिमरित्या उपलब्ध ऊर्जा यांचा उपयोग या मूर्तीच्या निर्मितीसाठी केला होता. या मूर्तीमुळे सुखानुभूती, कार्यसुलभा यांची प्राप्ती मानवास होत होती. प्राचीन काळातील या काष्ठ मूर्ती ह्या आधुनिक यंत्रमानवाचे प्रारंभिक रूपच म्हणावे लागेल.

**कूटशब्द :** *काष्ठ, चल, अचल, दारूक, संचलन, चलनवलन, स्वीयागती, बीजतत्त्व, शतकुंभी, अशानि*

**प्रस्तावना**

मानवाच्या उच्चतम अभिव्यक्तीचे प्रतिक म्हणजे मूर्तीकला होय. तर अचेतन पदार्थाच्या माध्यमातून स्थायीरूप मूर्त, त्रिमितीय निर्मित प्रतिकृती म्हणजे मूर्ती होय. मानवाच्या कलेचा काल्पनिक आविष्कार असे मूर्ती व शिल्पकलेस म्हटले जाते. मात्र कल्पना करण्यासाठी मूर्त रूपाची जाणीव महत्त्वाची ठरत असते. मूर्तीचा आविषकार होण्यासाठी मूळ रूप, दृश्यता, पायाभूत संकल्पना आवश्यक असलेल्या पायाभूत संकल्पनेच्या आधारे काल्पनिकतेला वास्तविक दृश्यता देता येते. मानवाने आपल्या परिकल्पनांना आकार देऊन मूर्तीची निर्मिती करण्याचा प्रयत्न केला आहे. याच मानवी सृजनशिलतेचा परिपाक म्हणून मूर्तीची रूपे प्राचीन काळापासून खेळणी, मुद्रा, मनुष्याकृती, प्राण्यांच्या आकृती, देवतांची मूर्ती यातून स्पष्ट होतात. परंतु कलेच्या संपूर्ण विकासासाठी शास्त्राची आवश्यकता असते. मूर्तीकलाही यास अपवाद नाही. मूर्तीची निर्मिती ही केवळ रंजन, अध्यात्मक, अलंकरण, पूजन, प्रतिरूप याच हेतूसाठी झाली नाही तर मूर्तीच्या चल, अचल या स्वरूपानुसार आणि मूर्तीच्या घटकानुसारही तिची उपयोगिता प्राचीन मानवाने जपल्याचे दिसते. किंबहुना या मूर्तीचा उपयोग मनुष्याने स्वतःच्या जीवनात भौतिक सुखप्राप्तीसाठी करून घेतल्याचे दिसते.

प्रस्तुत शोधनिबंधात मूर्तीच्या उपयोगितेच्या अनुषंगानेच अभ्यास करण्यात आला आहे. मूर्तीचा वैज्ञानिक तंत्राच्या सहाय्याने केलेला प्राचीन काळातील वापर याचा अभ्यासही यात आहे.

**संशोधनाचा उद्देश**

1) मूर्तीच्या अनुषंगाने प्राचीन काळातील मानवाच्या भौतिक, वैज्ञानिक प्रगतीचा अभ्यास करणे.

2) मूर्तीशास्त्रात विज्ञानाचा वाटा समजून घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध हा माहितीवर आधारित असून या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधने वापरली आहेत व संदर्भ विश्लेषण आदी पद्धतीचा अवलंब केला गेला आहे.

**मूर्ती निर्मितीत वापरले जाणारे घटक**

चल आणि अचल या दोन्हीही मूर्ती काष्ठ, मणी, धातू, पाषाण, चुना, विविध प्रकारचे लोह, मृदा, उत्तम वाळू या आठ द्रव्यांपासून बनवावे हे अगस्ती ऋषींनी सांगितले आहे.

(तद चलं च चलं द्विविधं वपुः सुधर (तरू) सन्मणिधातुशिलासुधा।
विविधलोहमृदुत्तमशर्करा विरचितं स्वयमष्टविधं भवेत।।)

(अगस्त्यमुनि–सकलाधिकार, पृ.1)

धातू, रत्न, पाषाण, काष्ठ (लाकूड) वीट, चुना, माती यापासून मूर्ती तयार करण्याबाबत देवतामूर्तीप्रकरणात वर्णन आढळते. (देवतामूर्ती प्रकरण 1.2, पृ.1) मत्स्यपुराणात सोने, चांदी, तांबे, पाषाण, काष्ठ, लोखंड, शिसे, पीतळ याशिवाय ताम्र–कासे यांच्यापासून बनवलेल्या प्रतिमास शुभ मानले आहे. (मत्स्यपुराण 20–21, पृ.258) तर भागवतपुराणात माती, लाकूड, पाषाण, धातू, चंदन, वाळू, मणी यांच्या सहाय्याने मूर्ती बनवण्याचे निर्देश आहेत. (भागवतपुराण 11, 27, 31) असेच वर्णन विष्णुधर्मोत्तरमध्येही आढळते. (विष्णूधर्मोत्तर 3.43–32)

वरील बाबींवरून एक गोष्ट लक्षात येते की, मूर्ती बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या माध्यमाबाबत अनेक शास्त्रीय ग्रंथात विविधता आहे. तरी प्रामुख्याने पुढील घटकांचा मूर्तीनिर्मितीसाठी वापर करणे अनुकूल ठरल्याचे दिसते व प्राचीन काळापासून त्याच पदार्थांपासून मूर्तीही बनवल्या गेल्या आहेत.

1) **माती** :– मातीपासून मूर्ती बनवल्याची उदाहरणे सिंधू संस्कृतीच्या काळापासून प्राप्त होतात. (जोशी महादेवशास्त्री, भारतीय मूर्तीकला, पृ.2) इतिहासातील प्रत्येक संस्कृतीत मृण्मयमूर्तीची उदाहरणे आहेत व आजतागायत मातीपासून मूर्ती बनवल्या जातात.

2) **धातू** :– सोने, चांदी, पितळ, लोखंड, शिसे, मिश्र धातू यांच्यापासून मूर्तीची निर्मितीची साक्ष्य ही हडप्पा काळापासून प्राप्त होते. या मूर्ती अभंग शुभ, दिर्घायु असल्याने यास समाज मान्यताही दिसते. परंतु या मूर्तीबाबत अवजडपणा, मूल्य या मर्यादा आहेत.

3) **काष्ठ** :– ऋग्वेदात विश्वकर्माला उत्तम काष्ठशिल्पी म्हटले आहे. (ऋग्वेद 1, 161, 1) लाकडापासून मूर्ती बनवण्याचे आजतागायत उदाहरणे प्राप्त होतात. याशिवाय केवळ काष्ठाचा उपयोग वास्तू स्थापत्यातही कसा असावा यासाठी सुत्रधार मल्ल यांनी 900 वर्षे पूर्वी प्रमाणमंजिरी ग्रंथाची रचना केली आहे.

4) **पाषाण** :– मूर्ती बनवण्यासाठी सर्वमान्य, सर्वप्रिय म्हणजे पाषाण आहे जो निसर्गात विनामूल्य सहज उपलब्ध आहे. शिवाय स्थापत्यासाठी पाषाणाचा उपयोग केला जात असल्याने मूर्ती ही पाषाणाच्या बनवल्यानंतर अलंकरणास सहजता येते.

5) **रत्न** :– मौल्यवान मणी, रत्न, शंख, शिंपले यापासूनही मूर्ती बनवल्या जातात. परंतु रत्नादी खड्यांची उपलब्धता किंवा उपयोगिता ही सर्वत्र नसल्याने या मूर्तीच्या निर्मितीसाठी अनेक मर्यादा आहेत.

6) **हस्ती** :– हस्तीदंड, मानवी प्राण्यांची हाडे यापासूनही मूर्तीची निर्मिती मोठ्या प्रमाणात

प्राचीन काळापासून केली जाते. भारत हा हस्तीदंती मूर्तीसाठी प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. पण पूजनयोग्य मूर्ती हस्तीच्या बनवणे ग्रंथात योग्य नसल्याचे काही ठिकाणी म्हटले आहे.

7) **रसायन** :– मीठ आणि साखर, तुरटी यासारख्या पदार्थांच्या रासायनिक अभिक्रियेच्या माध्यमाचा उपयोग करूनही मूर्तीची निर्मिती केली जाते. या मूर्तीचे स्वरूप लघू असते. तसेच त्याचे आयुष्य हे दिर्घकालीन नसते.

**काष्ठमूर्तीचे प्राचीनत्व**

लाकडी मूर्ती ह्या प्राचीन कालखंडात चल व अचल स्वरूपातही बनवल्या जात होत्या. इ.स. 1149 साली गंग राजाकरवी बांधलेल्या पुरी येथील जगन्नाथ मंदिरात जगन्नाथ, बलराम व सुभद्रा यांच्या ओबडधोबड लाकडी मूर्ती आहेत. (शंकर अभ्यंकर, भक्तीकोष, खंड 5, पृ.1218) पद अंगुली नाइ हात। दारुब्रम्ह जगन्नाथ।। असे माणुणिदास कवीने वर्णन केले आहे. काष्ठमूर्तीच्या निर्मिती संदर्भात मूर्तीशास्त्रीय ग्रंथात व पुराणात माहिती प्राप्त होते परंतु या मूर्ती ह्या चिरकाल टिकवण्यासाठी निरुपयोगीही असल्याचे लक्षात येते. असे असले तरी या काष्ठमूर्तीच्या दिर्घकालीन आयुसाठी लेपनादी संस्करणाचे तंत्रही वास्तुशास्त्रीय ग्रंथात वर्णन केले आहे. यासाठी व्रजलेपाचा विधी सांगितला आहे. मात्र या लाकडी मूर्तीची निर्मिती पूजन व अध्यात्माच्या दृष्टिकोनातून कमी प्रमाणात तर रंजनाच्या हेतूने जास्त प्रमाणात होत होती.

**काष्ठमूर्तीचा भौतिक सेवासुविधांसाठी वापर**

प्राचीन काळी काष्ठमूर्ती खेळणी, रंजन, पूजन यासोबतच भौतिक सेवा सुविधांसाठीही निर्माण केल्या जात असत. या मूर्तीच्या निर्मितीसाठी वैज्ञानिक तत्त्वांचा अवलंब केला जात असे. पंचतत्त्वाच्या ऊर्जेचा वापर करून या मूर्तीमार्फत आवश्यक ते काम करून घेतले जात असे. जर घरात सेवक नसतील तर त्यांचे काम करण्यासाठी या लाकडी मूर्तीची निर्मिती करावी, ज्यांना डोळे, गळा, तळहात, छाती, पोट, पाठ, बाहू हात आणि बोटे असे सर्व अवयव असून आवश्यक छिद्रे निम्रण करून वेगवेगळ्या अवयवास योग्यप्रकारे जोडावे असे समरांगण सुत्रधारात सूत्रधार भोजाने मूर्तीनिर्मितीबाबत सांगितले आहे. (भोज – समरांगणसुत्रधार 31, 101–102 पृ.441) या लाकडी मूर्तीवर कातड्याचे आवरण चढवले जावे आणि त्या मूर्तीस स्त्री अथवा पुरुषाचे रूप द्यावे ज्यामुळे या मूर्तीचे रूप रमणीय सुंदर दिसेल. ही मूर्ती बोलेल, चालेल, हनुवटी, ओठ, बोट यांची हालचाल करेल, हात मिळवेल, येणाऱ्यास विडे देईल, पाणी काढण्याचे काम करेल, नमस्कार करेल, आरसा दाखवेल, विणावादन करेल आणि चक्रीय विधीनुसार संचालकाच्या बुद्धीप्रमाणे व संचालकाच्या आज्ञेप्रमाणे कामे करेल (कित्ता, 31.102–105, पृ.441) नगराच्या, किल्ल्याच्या रक्षणासाठीही अशा पद्धतींच्या लाकडी मूर्तीचा वापर केला जाऊ शकतो. या काष्ठमूर्तीची निर्मिती करताना मूर्तीशास्त्राच्या नियमाचा अवयव प्रमाणबद्धतेसाठी वापर व्हावा मात्र क्रियान्वित होण्यासाठी आकर्षणाचा नियम, सूर्यतत्त्व, पृथ्वीतत्त्व यांचा वापर व्हावा. त्याशिवाय काष्ठमूर्तीवर सौंदर्यवर्धन करण्यासाठी वापरल्या गेलेल्या कातडीच्या टिकावूपणासाठी लेपन व कायाकल्पाचा वापर करावा याचीही माहिती सूत्रधार भोजनानी दिली.

ह्या काष्ठमूर्तीच्या निर्मितीचे प्रधान बीजतत्त्व हे पृथ्वी असून जल, अग्नी व वायू या चार बीज तत्त्वापैकी या यंत्रात अग्नी आणि वायू तत्त्वाचेही प्राबल्य असेल. बीजाचे मूलबीज, कांडबीज, पर्वबीज, अग्रबीज आणि वीजबीज हे प्रकार आहेत. (भोज–समरांगणसूत्रधार 31.10–11, पृ.419) बीजाच्या अनुसार स्वयंवाहक यंत्राची निर्मिती होते. हे स्वयंवाहक यंत्र म्हणजे काष्ठ चल मूर्ती किंवा प्राचीन काळातील यंत्रमानव (रोबोट) होय. या काष्ठमूर्तीच्या चलनवलनासाठी स्वीयागतीचा अथवा अंतःप्रेरणामय गतीचा वापर

केला जात असे. ज्यामुळे त्या गतीच्या माध्यमातून बीजतत्त्व व उर्जेच्या योग्य संचलनाच्याद्वारेही काष्ठ मूर्ती आज्ञाकर्त्यांच्या आज्ञा पाळत असे. ही काष्ठमूर्ती मानवाच्या प्रतिरुपाप्रमाणे दिसत असली तरी निर्मितीचा घटक हा लाकूड असे आणि तिचा निर्माणकर्ता मनुष्य असे.

**प्राचीन यंत्र मूर्तीचे पुरावे**

जगाच्या इतिहासात 'हिपैस्टास'ने बनवलेला यंत्रमानव रोमन देशात प्रसिद्ध होता. इ.पू. चौथ्या शतकात अर्खितासने यांत्रिक चिमणी बनवल्याचेही संदर्भ प्राप्त होतात. अल–जजारीने स्वयंचलित यत्रमूर्ती बनवली होती. परंतु महाकाव्य कालखंडात ही कृत्रिम चलमूर्तीची निर्मिती भारतात होत होती व भारतीय लोकांनी त्यास स्विकारले होते. हे बिभीषणाच्या वक्तव्यावरून लक्षात येते. (कुंभकर्णे प्रतीक्ष्यैव हरयोऽद्य प्रदुद्रवु। कथमेनं रणे कुद्धं वारयिष्यन्ति वानरः। उच्चन्तां वानराः सर्वे यंत्रमेतत्समुच्छ्रितम।। वाल्मीकी, रामायण युद्धकांड, पूर्वार्ध, सर्ग 61, श्लोक 31–32, पृ.385–86)

**समारोप**

भारतात प्राचीन यंत्रमूर्तीचे पुरावे प्राप्त होत असले तरी लाकडाला माध्यम म्हणून मूर्तीच्या निर्मितीचे तंत्र हे अत्यंत प्रगत म्हणावे लागेल. त्रिमितीय रचनेचे सर्व शास्त्र वापरुन त्यात बीजतत्त्व, भौतिकादी शास्त्राच्या माध्यमातून स्वयंचलन प्रस्थापित करण्याची कला प्राचीन मानवाने अवगत केली होती. याठिकाणी काष्ठ अथवा लाकूड हे माध्यम म्हणून वापरण्याचे कारण म्हणजे लाकूड हे वजनाने हलके असते. या काष्ठप्रतिमांचे संचलन, वहन याद्वारे सोपे व्हावे हाही हेतू होता. याशिवाय लाकूड ऊर्जेचा दुर्वाहक असल्यामुळे काष्ठमूर्ती अंतर्गत वहन होवून कार्यान्वित करणाऱ्या विजेमुळे चालकाचे नुकसान होवू नये यासाठीही लाकूड हे माध्यम उपयुक्त होते. या काष्ठ प्रतिमेच्या चलनवलनासाठी शातकुंभी अथवा अशानि विद्युतचा वापर केला जात असावा. अगस्त्य संहितेमध्ये प्राचीन कालखंडात रेशमी वस्त्र, रत्नाचे घर्षणापासून निर्माण होणारी सौदामिनी, शंभर इलक्ट्रॉनिक्स सेल्सद्वारे वापरली जाणारी शतकुंभी, चुंबकीय दंडाद्वारे निर्माण होणारी अशानि ऊर्जेची वर्णने व उपयोगिता स्पष्ट केली आहे.

मूर्तीशास्त्राचा अभ्यास करताना मूर्तीच्या चल, अचल प्रकाराच्या अनुषंगाने या स्वयंचलित प्राचीन काष्ठमूर्तीचा अभ्यास हा प्राचीन वैज्ञानिकता जाणण्यासाठी उपयुक्त ठरणारा आहे. त्यासोबतच तत्कालीन भौतिक प्रगतीचा अंदाज व्यक्त करणाराही आहे. शिल्पातही प्राचीन यंत्रमूर्तीचे पुरावे प्राप्त होतात. परंतु इतिहास व मूर्तीशिल्प संशोधकाच्या दृष्टीने हा काही अंशी अज्ञातच विषय आहे असे लक्षात आल्याने हा शोधाभ्यास केला आहे.

# महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठ देवतांचे मुर्ती स्थापत्य

**डॉ. शिवाजी हरी चौगुले**
**जि. प्र. प्रा. शाळा षिंदेवस्ती – बोंडले**
**मो. नं. 7588216501 / 9404961355**

**गोषवारा**

भारतात देव–देवताची व्याप्ती प्रचंड असून पुराणामध्ये त्यांची संख्या तेहतीस कोटी सांगितली आहे. भारताच्या भूमीत अनेक देवतांची निर्मिती झालेली असून त्यांचा इतिहास, वैशिष्टये, विविधता जाणून घेणे अतिशय जिकरीचे व कठीण काम आहे. भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही देवतांची निर्मिती मोठया प्रमाणात झाली असून त्यामध्ये स्त्री देवता आघाडीवर आहेत. या स्त्री देवतांना कालौघात कुलदेवतांचा मान मिळालेला आहे. अशा कुलदेवता म्हणजे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठाच्या देवता होय. महाराष्ट्रातील कोल्हापूर, माहूर, तुळजापूर व वणी येथे या साडेतीन शक्तिपीठाच्या देवता असून त्यांना प्राचीन इतिहास व परंपरा आहेत. शिवाय या शक्तिपीठाच्या देवतांच्या मुर्ती अतिशय विलोभनीय आखीव–रेखीव व सुंदर नक्षीकाम केलेल्या आहेत.

**बीज संज्ञा –** साडेतीन शक्तिपीठे, महालक्ष्मी, रेणुका माता, तुळजाभवानी, सप्तशृंगीदेवी

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृती प्राचीन धर्मग्रंथ व स्थानिक समाजाच्या भावभावना यामुळे ठिकठिकाणी देवतांची निर्मिती झाली. अशा देवदेवता देशात तसेच महाराष्ट्रात स्थिर झाल्या. त्यांची विविधता, वैशिष्टये, इतिहास, मुर्ती याविषयीचा आढावा घेणे अतिशय कठीण व किचकट काम आहे. देवतांच्या मूर्तीचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने आपल्या लक्षात येते, ती म्हणजे काळानुरूप व भौगोलिक परिस्थितीनुसार देवतांच्या मूर्तीचे माध्यम बदलत गेले. अगदी सुरूवातीला स्थानिक दगड वापरून देवतांच्या मूर्ती बनविण्यात आल्या. परंतु नंतर वालुकामय व काळा पाषाण, मार्बल व आता फायबर मूर्तीही बनविल्या जातात. शिवाय सुरूवातीला ओबड–धोबड बनविल्या जाणाऱ्या मूर्ती काळानुरूप आखीव–रेखीव बनविल्या गेल्या. अशा प्रकारे देवतांच्या मूर्तीमध्ये काळानुरूप मोठया प्रमाणात बदल घडून आले. यातील काही उन्नत देवताना कुलदेवतांचा मान मिळाला, त्यामध्ये स्त्री देवतांनी बाजी मारली. यापैकीच काही स्त्री–देवता म्हणजे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठाच्या देवता होत. या साडेतीन शक्तिपीठाच्या देवता केवळ महाराष्ट्रातील भक्तांचे श्रध्दास्थान आहे. असे नाही तर गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलगना, राजस्थान या राज्यातील लोक त्यांचे भक्त आहेत.

**उद्देश**

१. महाराष्ट्रातील स्त्री देवतांचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठ देवतांचा मागोवा घेणे.
3. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठ देवतांच्या मूर्ती स्थापत्यांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

1. महाराष्ट्रात स्त्री देवतांची संख्या प्रचंड आहे.
2. महाराष्ट्रात साडेतीन शक्तिपीठे आहेत.
3. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठ देवतांच्या मूर्ती विलोभनीय आहेत.

**महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे**

आपल्या देशांमध्ये धार्मिक स्थळांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक धार्मिक स्थळांला स्वतःचा असा इतिहास असून प्रत्येकांची वेगळी वैशिष्टये असतात. भारतातूनच नाही तर जगभरातून अनेक भाविक, पर्यटक या स्थळांना भेटी देत असतात. या धार्मिक स्थळांपैकी एक म्हणजे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे होय. पुराणग्रंथामध्ये एकुण 108 शक्तिपीठे आहेत. तर भारतामध्ये एकूण 51 शक्तिपीठे आहेत. या शक्तिपीठापैकीच महाराष्ट्रात देवीची साडेतीन शक्तिपीठे आहेत.

'कोल्हापूर महास्थानं यत्र लक्ष्मी सदा स्थिता।
मातुः पुरूं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितम् ।
तुळजापूर तृतीय स्थान सप्तशृंग तथैव च ।।'[1]

या वर्णनावलन आपल्या असे लक्षात येते की, कोल्हापूरची महालक्ष्मी आद्य, माहुरची रेणुका माता द्वितीय, तुळजापूरची तुळजाभवानी तृतीय ही तीन पुर्ण शक्तिपीठे असून वणीची संप्तशृंगी देवी हे अर्ध शक्तिपीठ आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रात प्रसिध्द पावलेली देवीची साडेतीन शक्तिपीठे आहेत.

**कोल्हापूरची महालक्ष्मी मूर्ती**

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील एक महत्त्वपुर्ण तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्र – कर्नाटक सीमेला लागून आहे. या क्षेत्राला 'दक्षिणकाशी' नावानेही ओळखले जाते. कोल्हापूरला करवीर, कोल्लापूर, कोलापूर, कोलगिरी अशा विविध नावानेही ओळखले जाते. 'वाराणस्थाधिकं क्षेत्रं करवीरं पुरं महतं असा या नगरीचा महिमा स्थलपुराणकाराने गायलेला आहे.'[2] कोल्हापूर येथे महालक्ष्मी देवीचे प्रसिध्द मंदिर असून त्याची निर्मिती सातव्या शतकापुर्वीची आढळते. परंतु कालानुरूप मंदिर स्थापत्यामध्ये विविध राजवटीमध्ये बदल झालेले आहेत. महालक्ष्मी देवीचे उल्लेख स्कंद पुराण, पद्म पुरण, मार्तंडेय पुराण व देवी भागवतामध्ये आलेले आहेत. 'देवी भागवत' या महापुराणातील शक्तिपीठ नामावलीत कोल्हापूरला पहिले स्थान दिलेले आहे.'[3] मंदिराच्या मुख्य गर्भगृहात' महालक्ष्मीची 1.22 मीटर उंचीची मूर्ती असून ती एक 0.91 मीटर उंच दगडी चौथऱ्यावर उभी करण्यात आलेली आहे.'[4] मूर्ती प्रमाणबध्द असली तरी तिचे प्राचीनत्त्व मंदिराइतके नाही. देवीच्या डोक्यावर करंडक मुकुट घातला आहे. वरच्या टोकापासून ते स्कंधापर्यंत अंगचे महिरप आहे. नाकात नथ नाही. दोन्ही स्तनावर रूळणारा, बेंबीपर्यंत लोंबणारा सुरेख हार, केयूर व हातात मोठे कंगण आहे. देवीच्या पायामध्ये तोडे, कमरेला कंबरपट्टा असून तेथे धातुची पट्टी लावलेली आहे. 'मूर्तीला 50 ते 60 वर्षापूर्वी वज्रलेप केलेले आहे.'[5] त्यापुर्वी मूर्तीच्या डोक्यावर लिंग–योनी होत्या. आता नागफणा दिसतो आहे. 'विश्वकर्माशास्त्राप्रमाणे कोल्हापूरची महालक्ष्मी चतुर्भुज असून तिच्या हातात पात्र, गदा, ढाल आणि श्रीफळ अशा वस्तू आहेत.'[6] उजव्या हाताला बाजूला तोंड करून सिंह मागे उभा आहे. ही मूर्ती कायम वस्त्रालंकार व कपडयात आच्छादेलेली असून तिच्यावर दागिने घातलेले असतात.

**माहूरची रेणूका माता मूर्ती**

महाराष्ट्रातील प्रसिध्द दुसरे पुर्ण शक्तिपीठ म्हणजे माहूरची रेणूका माता होय. माहूर गडावर रेणूका मातेचे कमलमुखी मंदिर असून त्यांचे प्राचीनत्त्वाचे लिखीत पुरावे फारसे मिळत नाहीत. असे असले तरी या देवतेचा महिमा व भक्तांची श्रध्दा तसूभरही कमी नाही. महाराष्ट्रातील अनेक देवतांच्या मूर्ती तांदळाच्या रूपात असून त्यापैकी एक प्रमुख देवता म्हणजे रेणूका माता होय. रेणूका मातेचा तांदळा गोल असून खांद्यावरील शिराच्या आकाराचा आहे. तो शेंदूरचर्चित असून भूमितून निघून वर आलेला शिरासारखा दिसतो. 'या तांदळयाला दोन सुरेख डोळे कोरले आहेत. नाक रूंद दर्शविले आहे. नाकात नथ परिधान केलेली आहे. कुंकूही ठसठसीत आहे. वर चांदीचा गोलकार मुकुट परिधान केला असून नक्षीदार आहे.जिवणी रूंद असून आपण खाण्यासाठी आ करतो त्याप्रमाणे आहे. खाली

पादपीठावर समोर पाहणारे सिंहमुख आहे. या तांदळयाची लांबी 1.5 फुट असून याची जाडी 9 इंच आहे. मूर्तीचे मुख आतून पोकळ आहे'.[7] अशा प्रकारे देवीच्या मूर्तीचे भक्तांकडे कृपादृष्टी टाकणारे सुवर्ण नयन, रक्तवर्ण शिंदूरचर्चित मुखावरील शोभा अवनर्णीय आहे.

**तुळजापूरची तुळजा भवानी मूर्ती**

महाराष्ट्रातील तिसरे प्रसिध्द शक्तिपीठ म्हणजे तुळजापूरची श्री तुळजा भवानी देवी होय. शक्तिदेवतांमध्ये सर्वत्र प्रभाव असलेली तसेच धार्मिक व ऐतिहासिकदृष्टया सर्वच काळात महतीमध्ये अग्रेसर राहलेली देवता म्हणजे श्री तुजळाभवानी होय. मंदिराच्या मुख्य गर्भगृहामध्ये भवानी मातेची काळया पाषाणाची साडेतीन फुट उंचीची मूर्ती अष्टभुजा महिषामर्दिनीच्या रूपात असून उंच सिंहासनावर उभी आहे. तिच्या मस्तकावरील मुकुटावर सयोनि शिवलिंग असून हातात त्रिशूळ, बाण, चक्र, शंख, धनुष्य, पानपत्र आणि महिषासुराची शिखा धारण केलेली आहे. तिच्या पाठीवर बाणाचा भाता आहे. देवीमूर्तीचा उजवा पाय महिषासूरावर असून डावा पाय भूमीवर टेकलेला आहे. दोन्ही पायाच्या मध्यभागी महिषासुराचे शिर पडलेले आहे. देवीमुखाच्या डाव्या–उजव्या बाजूस चंद्र–सुर्य कोरलेले आहे. महिषासुराच्या धडाच्या उजवीकडे सिंह व त्याच्या खालच्या भागी मार्कंडेय ऋषी आहे तर 'डावीकडे भवानीने तारलेली, शिरावर शरीर तोललेली, तपोमग्न, सती अनुभूती आहे. देवीवर चक्राकार कुंडले, केयुर, अंगद, काकणे, कंठा, माला , मेखला आणि साखळया कोरलेल्या आहेत. श्री खरे यांच्या मते ही मूर्ती 17–18 या शतकातील असावी.'[8] 'या मुर्तीचे वैशिष्टय म्हणजे ही चलमूर्ती आहे. या मूर्तीला वर्षातून ठराविक वेळा गर्भगृहास्था बाहेर काढून पलंगावर झोपविले जाते. चलमूर्तीचे हे एकमेव उदाहरण आहे असे म्हटले जाते.'[9] अशा प्रकारे अनेक शतकांचा इतिहास असणाऱ्या भवानी मातेला त्वरिता, तुकाई, त्वरचा, तुरजा या विविध नावानीही संबोधले जाते. त्याप्रमाणे तिच्या नावाच्याही विविध आख्यायिका, दंतकथा प्रसिध्द आहेत.

**वणीची सप्तशृंगी मूर्ती**

महाराष्ट्रातील अर्धे शक्तिपीठ म्हणून प्रसिध्द असलेली देवी म्हणजे वणीची श्री सप्तशृंगी देवी होय. 'सप्तशृंगी देवीला वायु पुराणातील सप्त मारूत म्हणजे सप्त शिखराची माता असे म्हटले जाते.'[10] डोंगरांच्या गुहावजा कपारीतील दगडामध्ये सप्तशृंगीची मूर्ती कोरलेली आहे. या मूर्तीची उंची व रूंदी 8 फुट आहे. ही मूर्ती शेंदूरचर्चित असून तिला अष्टदशभुजा आहेत. या मूर्तीमध्ये 'देवीचे शिर एका बाजूला झुकले आहे. शिरावरील मुकुट, करंडक घाटाचा आहे. शेंदूरचर्चित मुर्तीचे डोळे अतिशय रेखीव आहेत. धारदार नाक, त्यावर नक्षीदार नथ आणि कपाळावर रेखीव कुंकू आहे. सिंहारूढ असलेली ही मूर्ती उभी असून समभुज किंवा द्विभुज नाही. तिच्या अठरा हातात मणीमाळा, कमळ, बाण, तलवार, वज्र, गदा, चक्र, त्रिशुल, कुऱ्हाड, शंख, पाश, शक्तिरूपात दंड, ढाल, धनुष्य, पानपत्र, कमंडलू अशी आयुधे आहेत.'[11] अशा प्रकारे महाराष्ट्रातील हे अर्धे शक्तिपीठ असून येथील देवीच्या यात्रा व उत्सव जल्लोषात साजरे केले जातात.

**निष्कर्ष**

पुराणातील 108 व देशातील 51 शक्तिपीठापैकी महाराष्ट्रात कोल्हापूर, तुळजापूर, माहूर व वणी या ठिकाणी साडेतीन शक्तिपीठे आहेत. ही साडेतीन शक्तिपीठे धार्मिक व ऐतिहासिकदृष्टया अतिशय प्रसिध्द आहेत. याठिकाणी देवीची जी मंदिरे बांधली गेली आहेत. त्यामध्ये काळानुरूप विविध राजवटीमध्ये बराच बदल झालेला आपणांस दिसून येतो. शिवाय येथे देवीच्या विविध आख्यायिका, दंतकथा, रूढी, परंपरा, रितीरिवाज प्रचलित असल्याचे आपणांस जाणवते. अनेक घराण्यांच्या कुलदेवता म्हणून ही ठिकाणी प्रसिध्द पावलेली आहे. याठिकाणी महाराष्ट्राशिवाय आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, राजस्थान या परराज्यातील भाविक मोठया प्रमाणात श्रध्दापूर्वक येत असतात. पर्यटनाच्या दृष्टीनेही या

साडेतीन शक्तिपीठाचा मोठया प्रमाणात विकास झालेला असून येथे परदेशी पर्यटक अभ्यासासाठी तसेच भेट देण्यासाठी येत असल्याचे आपणांस दिसून येतो.

**संदर्भ**

1. http://mr.m.wikipedia.org>wiki दि 30/01/2020.
2. श्रीकरवीरमहात्म्यम, संपा. तगारे ग. वा., प्रका. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1980
3. तात्पर्यलेखक : लेले का. वा., श्रीदेवीभागवतम् (श्रीमहर्षीव्यासप्रणितम्), महाराष्ट्रतात्पर्यसमेतम्, वाई
4. http://mr.m.wikipedia.org>wiki दि 30/01/2020
5. अहिरराव प्रतापराव, महाराष्ट्रातील देव–देवता, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2009, पृ. 20
6. जोशी नि. पु., भारतीय मूर्तीशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – 1979, पृ. 300
7. अहिरराव प्रतापराव, उपरोक्त, पृ. 24
8. ढेरे रा. चिं., श्री तुळजाभवानी, पद्यमगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 21 जुलै 2007, पृ. 3
9. अहिरराव प्रतापराव, उपरोक्त, पृ. 18
10. http://mr.m.wikipedia.org>wiki दि 30/01/2020
11. अहिरराव प्रतापराव, उपरोक्त, पृ. 26

# उक्कडगाव (जहांगीर) येथील सतीगळ

**प्रा. महेश शिवाजीराव जाधव**
विभाग प्रमुख इतिहास विभाग
कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी
**डॉ. रवी सुभाषराव सातभाई**
विभाग प्रमुख इतिहास विभाग
ॲड. बी.डी.हंबर्डे महाविद्यालय, आष्टी जि. बीड

**प्रस्तावना**

प्राचीन कालखंडापासून माणसाच्या प्रगतीची अभिव्यक्ती कलेच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. 64 कलाचा उल्लेख अनेक प्राचीन ग्रंथात आलेला आहे. कलेमध्ये शिल्पकलेला अन्यन्यसाधारण महत्व आहे. इतिहासाच्या अभ्यासामध्ये शिल्पकला व मुर्तीकलेच्या अभ्यासाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. शिल्पकला व मुर्तीकलेच्या अभ्यासातून इतिहासाच्या विशिष्ट कालखंडामध्ये सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनाची यथार्थ कल्पना येते. मराठवाडा हा अनेक दुर्मिळ शिल्पांचे माहेरघर आहे. हि शिल्पे देवदेवता, प्राणी, मनुष्य, अप्सरा, वीरपुरूष, सती स्त्रीया यांची असतात. प्राचीन कालापासुन राजनैतिक संघर्षाला मानवाने तोंड दिले आहे. या संघर्षात वीरमरण पत्करलेल्या वीरांच्या स्मरणार्थ वीरगळ उभारले जातात, तर अशा युध्दात निधन पावलेल्या किंवा अन्य काही कारणामुळे पतीनिधनानंतर त्यांच्या पार्थिवासह आत्मदहन करणारी स्त्रीला सती म्हटले जाते. स्थानिक इतिहासाच्या दृष्टिने वीरगळ व सतीगळ यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. उक्कडगाव (जहांगीर) या गावातही अशी सतीगळ व नागशिल्प अस्तित्वात आहेत. त्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोध निबंधात केला आहे.

**सतीगळ संकल्पना**

'गळ' हा शब्द कन्नडमधील कल्ल या शब्दापासून आलेला आहे. कल्ल हया शब्दाचा अर्थ दगड असा होतो. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात आढळणारी सतीशिळमध्ये स्त्रीचा खांदयापासून हात चित्रित केलेला असतो. हात कोपरापासुन काटकोनात वळलेला असतो हातात बांगडया असतात. हाताखाली दोन प्रतिमा कोरलेल्या असतात. त्या स्त्रीच्या मुलांच्या प्रतिमा असाव्यात. हया हातांची रचना आर्शिवाद देणारी हाताप्रमाणे असते. तसेच सतीशिळा देवळाच्या परीसरात उभारल्या जातात.

**उक्कडगाव (जहांगीर) चे स्थानः**

परभणी जिल्हयातील 9 तालुक्यापैकी पालम हा ऐतिहासिक वारसा लाभलेला तालुका आहे. पालम हा हैद्रबादच्या निजामाचा सर्फ–ए–खास होता. राष्ट्रकुट काळापासुन पालम तालुक्यात ऐतिहासिक अवशेष प्राप्त होतात. पालम पासून 18 कि.मी. अंतरावर उक्कडगाव (जहांगीर) हे गाव आहे. ''यांचा अक्षवृत्तीय विस्तार 18.8920 व रेखावृत्तीय विस्तार 76.8894 आहे.''[1] ''गावाची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनूसार 1342 एवढी आहे.''[2] प्रसिध्द देवस्थान रेणूकादेवी मंदीर, राणीसावरगाव हे फक्त 06 कि.मी. अंतरावर आहे.

**उक्कडगाव (जहांगीर) ची ऐतिहासिक पार्श्वभूमीः**

उक्कडगाव (जहांगीर) हया गावचा इतिहास जरी अज्ञात असला तरी अनेक ऐतिहासिक पूरावे उपलब्ध होतात. गावात एक गढी, एक सतीगळ, दोन नागशिल्प व गावाच्या नैऋत्य दिशेला देवीचे मंदिर आहे. काळाच्या ओघात गढीचे मालक व वारसदार शहरात स्थायिक झाल्यामुळे गढीची पूर्णपणे पडझड झाली आहे. तर देवीचे मंदिर लोकसहभागातुन उभारण्यात आले आहे. गावात एक मध्ययुगीन विहीर असून तिला दोन बाजूने उतरण्यास पायरी आहेत. हैद्राबादच्या मुक्तीसंग्रामात या गावाचे मोलाचे योगदान

असुन या ठिकाणाचे स्वातंत्र्य सैनिक मुक्तीसंग्रामात सहभागी झाले होते. त्यापैकी जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्री एकनाथ गोविंदराव जाधव यांनी 25 जानेवारी 2020 रोजी वयाची 104 वर्ष पूर्ण केली असुन आजही ते तरूणाना प्रेरणा देतात.

**उक्कडगाव (जहांगीर) येथील सतीगळः**

सतीप्रथेचे उल्लेख गुप्त कालखंडानंतर प्राप्त होतात. सतीची प्रथा प्रथम चातूवर्ण व्यवस्थेतील क्षत्रियांनी जरी प्रथम आणली असेल तरी ब्राम्हणापासुन ते शुद्रापर्यंत ही प्रथा अस्तित्वात होती. उक्कडगाव(जहांगीर) येथील सतीशिळा हनूमान मंदिरच्या समोर पायरीजवळ आहे. हया सतीशिळेची उंची 4 फुट तर रूंदी 18 सेमी आहे. उक्कडगाव(जहांगीर) येथील आढळणारी सतीशिळेमध्ये स्त्रीच्या खांदयापासून हात चित्रित केलेला आहे. उजवा हात कोपरापासुन काटकोनात वळलेला आहे. हातात बांगडया आहेत. हया हातांची रचना आर्शिवाद देणारी हाताप्रमाणे आहे. वरील टप्यात दोन प्रतिमा कोरलेल्या आहेत, त्या स्त्रीच्या मुलांच्या प्रतिमा असाव्यात. त्याच बरोबर वरच्या टप्यात चंद्र, सुर्य व शिवलिंग कोरलेले आहे. ''अर्थातच यावचंद्र दिवाकरो म्हणजे जोपर्यंत चंद्र व सूर्य आहेत तोपर्यंत वीर सती गेलेल्या स्त्रीयाची कीर्ती अजरामर राहिल असे त्या शिल्पकाराने या ठिकाणी सूचित केले आहे.''[3] तर शिवलिंग ती सती अथवा तिचा परिवार शिवभक्त असावा असे ही प्रतित होते.

**समारोप**.

इतिहास जाणणे व संवर्धन करणे ही आपली सर्वांची नैतिक जवाबदारी आहे. स्थानिक इतिहासाच्या माध्यमातून इतिहासाची जपवणूक होते. वीरगळ, सतीगळ यांच्या विषयी कोणतीच जाणीव, महिती नसल्यामुळे त्यांच्याकडे कायमच दुर्लक्ष होत आले आहे, परंतू अशा शिल्पामुळे प्राचीन व मध्ययुगीन इतिहासावर प्रकाश पडतो. तसेच गावाचा जागृत इतिहास समजतो. गावाच्या हया सतीशिळेवर आतापर्यंत अभ्यास न झाल्यामुळे इतिहासाच्या या मुक्या व वस्तुरूपी साधनावर जिल्हानिहाय संशोधन होणे गरजेचे आहे.

**सदंर्भ ग्रंथः**


1. https://www.google.com/maps/place/Ukkadgaon+Jagir,+Maharashtra+431536/@18.8978675,76.8678726,14z/data=
2. http://censusindia.gov.in/2011-Common/CensusData2011.html
3. file:///D:/Conference%20Procedings/Historiography%20Recent%20Trends%20in%20History%20Writing%202.pdf
4. काळे भगवान(संपा.), मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, 1986
5. जामखेडकर, अ.प्र.पाठक (संपा.),महाराष्ट्र इतिहास प्राचीन कालखंड, खंड. 1दर्शनिका विभाग, मुंबई 2002
6. टेटविळकर सदाशिव, महाराष्ट्रातील वीरगळ, श्रीकृपा प्रकाशन.
7. भालेराव अंनत, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, 1997
8. https://vishwakosh.marathi.gov.in/32889/




# रत्नापूर (लातूर) येथील मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास

**मलवाडे मेघाराणी बाबुराव**
संशोधक विद्यार्थिनी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

भारतात बांधीव मंदिराच्या नंतर गुहामंदिरे निर्मिती झाली. गुहामंदिरात सर्वप्रथम बौद्ध, त्यानंतर जैन आणि शेवटी हिंदू गुहामंदिरे निर्माण केली गेली. गुहामंदिरांप्रमाणेच नंतर बांधीव मंदिरांचीही निर्मिती करण्यात आली. मंदिर बांधकामासाठी दगड, माती, चुना आणि विटांचा वापर करण्यात आला. वास्तु मंदिराचा पहिला पुरावा राजस्थानमधील जयपूर जिल्ह्यातील भरहूत येथे मिळाला. मंदिर स्थापत्याची कलापरंपरा जोपासण्याचे महत्त्वाचे काम बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव, कल्याणीचे चालुक्य, वरंगळचे काकतीय व देवगिरीच्या यादवांनी केले.

महाराष्ट्रात आढळणारी बहुतांश मंदिरे ही भूमीज शैलीत बांधलेली असून महाराष्ट्रातील अनेक राजघराण्यांनी या मंदिर स्थापत्याच्या विकासासाठी योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा हा मंदिराच्या बाबतीत संपन्न आहे. कारण बहुतांश राजघराण्यांची राजधानी मराठवाडा होती. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत उत्तर चालुक्यकालीन यादवकालीन मंदिरे आढळतात. लातूर जिल्ह्यात आणि लातूरमध्येही अनेक मंदिरे पहावयास मिळतात.

रत्नापूर म्हणजे सध्याचे 16 ऑगस्ट 1982 ला निर्माण झालेले लातूर आहे. लातूरचा रत्नापूर महात्म्यात, कृतयुगात–सत्यपूर, त्रेतायुगात मधुपूर, द्वापारयुगात रत्नापूर तर कलियुगात लातनुर असा उल्लेख आढळतो. लातूर शहराचा पहिला ऐतिहासिक संदर्भ इ. स. 812–13 च्या शिरुर शिलालेखात मिळतो. लत्तलूर, लत्तलौर, लत्तनूर, लट्टनौर या शब्दप्रयोगांनी लातूरचा उल्लेख प्राचीन काळात केल्याचे दिसते.

सुमारे पन्नास हजार वर्षांपासून लातूर परिसरात लोकवस्ती असल्याचे पुरावे प्राप्त झाले आहेत. अश्मयुगातील अवशेष मांजरा परिसरात सापडले आहेत. राष्ट्रकुट काळात या परिसराला विशेष वैभव प्राप्त झाल्याचे दिसते. राष्ट्रकूट राजांनी स्वतःला लत्तलूरपूरवरेश्वर, लतलूरपूरवराधिश्वर, लतलूरपूरपरमेश्वर  अशी बिरुदे लावून घेतल्याचे दिसून येते. यावरुन राष्ट्रकूट राजांना या प्रदेशाचा मायभूमीसारखा लळा व अभिमान असल्याचे लक्षात येते. कल्याणीचे चालुक्य व यादव काळातही हे वैभव टिकून होते. आजमितीसही या वारसासंपन्न शहरात अनेक पाऊलखुणा आढळतात. लातूरातील शिलालेख, मंदिरे, शिल्पे, बारवा हे आजही तत्कालीन काळातील वैभवाची साक्ष व इतिहासाचे चिरे बनून गतकालीन वैभव मूकपणे कथन करताना दिसतात. प्रस्तुत शोधनिबंधात या रत्नापुरातील मंदिरांचा अभ्यास केला गेला आहे.

**उद्दिष्ट्ये**

1) लातूर शहरातील मंदिरांचा अभ्यास करणे.
2) मंदिरांची सामाजिक, सांस्कृतिक भूमिका स्पष्ट करणे.

**गृहितके**

1) प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत मंदिरे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.
2) मंदिरशिल्पाच्या माध्यमातून तत्कालीन समाज जीवनाची माहिती प्राप्त होते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, विवेचनात्मक, संदर्भ, सर्वेक्षण इत्यादी संशोधन पद्धतीचा आधार घेतला आहे व प्राथमिक दुय्यम साधने वापरलेली आहेत.

**लातूरची ऐतिहासिकता**

पुराणग्रंथ हे इतिहासाचे विश्वासार्ह साधन नसले तरी प्राचीन भारताचा इतिहास समजण्यासाठी पुराणे महत्त्वाची भूमिका बजावतात. पुराणाची एकूण संख्या 18 व उपपुराणांची संख्याही 18 आहे. या पुराण ग्रंथापैकी 81 हजार श्लोकसंख्या असणारे 'स्कंदपुराण' हे सर्व पुराणात मोठे आहे. या पुराणात विविध स्थान महात्म्याचाही अंतर्भाव करण्यात आला असून त्यातील एकात रत्नापूर येथील महतीचे सखोल वर्णन आढळते. लातूर नगरीतील 12 लिंगस्थानाचा व आठ तीर्थस्थानांचा उल्लेख आहे व लातूरचे पौराणिक महत्त्वही विशद केले आहे.

1) **सिद्धेश्वर मंदिर**

सभामंडप व गर्भगृह अशी मूळ रचना असलेल्या सिद्धेश्वर मंदिराचा सध्या जिर्णोद्धार केला आहे. हा जिर्णोद्धार इ.स. 1910 मध्ये झाला आहे. या मंदिराभोवती दगडी कोट आहे. मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेस असून कोटाला चारही बाजूंनी खोल्या आहेत. प्रदक्षिणा पथावर सप्तमातृकापट्ट आहे. शिवाने अंधकासुराचा वध केला तेव्हा त्याच्या शिरातून रक्त वाहू लागले, त्यातून दैत्य निर्माण केल्याचे वर्णन वराहपुराणात आहे. मात्र या ब्रम्हा, शिव, स्कंद, विष्णू, इंद्र, यम यांच्या शक्ती अनुक्रमे ब्राम्ही, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुण्डा या आहेत. याच्या एका बाजूस गणेश व दुसऱ्या बाजूस वीरभद्र आहे. या मातृका त्यांच्या वाहनावर आरुढ असतात. तर कधी यांची वाहने खाली कोरवलेली असतात. या सप्तामातृकापट्टाच्या समोर शिव—पार्वती, कार्तिकेय व गणपतीसह सुबक शिल्प आहे. गर्भगृहाच्या दक्षिण बाजूस साधारणतः बाराव्या शतकातील एक शिलालेख आहे, ज्यात सिद्धेश्वर मंदिराच्या व्यवस्थेबाबतच्या दानाची माहिती आहे. मंदिराच्या कोटात दक्षिणेस एक भव्य शिवलिंग व नंदी आहे. मंदिराचे शिखर हे आधुनिक पद्धतीने बांधले असून विविध देवतांच्या मूर्ती त्यावर कोरल्या आहेत. या मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला रत्नेश्वराचे मंदिर आहे. रत्नेश्वर मंदिराशेजारील मंदिरात शेषशायी विष्णू आहे. नाग प्रतिमा आहे. मंदिराच्या द्वारशाखेवर रत्नशाखा, गंधर्वशाखा, स्तंभशाखा, व्यालशाखा असून खाली चामरधारिणी, प्रतिहारी आहेत. या मंदिरासमोर एक बारव आहे.

2) **पापविनाश मंदिर / भूतनाथ मंदिर**

हे लातूर शहरातील प्राचीन मंदिर असून या मंदिरात इ.स. 1128 या चालुक्य राजा सोमेश्वर याचा शिलालेख आहे. या मंदिराच्या जवळ बारव आहे. ज्यास पापविनाशक तीर्थ असे म्हणतात. याशिवाय लातूरमध्ये केशवराज मंदिर आहे. या मंदिरात केशवाची सुंदर मूर्ती आहे. बाकीचे मंदिर नवे असून केशवाची मूर्ती मात्र अप्रतिम आहे. इसवीसनाच्या सहाव्या शतकानंतरच्या काळातील ग्रंथातही या मूर्तीचे वर्णन आढळते. अग्निपुराणात या मूर्तीचे सविस्तर वर्णन आहे. केशवराज मंदिरातील मूर्ती गरुड, लक्ष्मीसह आहे व मूर्तीच्या पाठशिळेवर मकरतोरण आणि दशावतारांचे शिल्पांकन केले आहे. मूर्तीखालील उजवा हात वरद मुद्रेत आहे. वरील डाव्या हातात चक्र व खाली गदा आहे. मकर कुंडले, केऊर, मेखला, तोडे इ. दागिने या मूर्तीस आहेत.

3) **पार्श्वनाथ दिगंबर मंदिर**

राष्ट्रकूट राजे हे जैन धर्माचेही उपासक होते. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष पहिला हा जैन धर्माचा समर्थक असून अनेक जैन साधू, विद्वान त्याच्या दरबारात होते. राष्ट्रकुट राजा कृष्ण दुसरा यानेही सौंदती व धारवाड येथे जैन मंदिरे बांधली. वेरुळ, कंधार येथील जैन प्रभावाप्रमाणे राष्ट्रकुटकालीन लातूरातही जैन धर्माचा प्रभाव दिसून येतो. लातूरमधील जैन

गल्लीत श्री 1008 चिंतामणी जैन पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर असून मंदिराची तीन विभागात विभागणी आहे. मंदिराच्या भुयारात पार्श्वनाथाची ध्यानस्थ मूर्ती आहे. मूर्तीच्या वर नाग आहे. मूर्तीच्या एका बाजूस 24 तीर्थंकराच्या मूर्ती आहेत. दुसऱ्या बाजूस एका तीर्थंकराची मूर्ती आहे. मंदिराच्या मधल्या भागात चिंतामणी पार्श्वनाथाची मूर्ती आहे. मंदिराच्या मधल्या भागात चिंतामणी पार्श्वनाथाची मूर्ती आहे. मंदिरात भुयाराजवळ पूर्वाभिमुख शांतीनाथची मूर्ती आहे व दुसऱ्या मजल्यावर महावीरांची स्फटीक मूर्ती आहे.

**4) इतर मंदिरे**

लातूर येथील अष्टविनायक मंदिर, रामलिंगेश्वर मंदिर, गंजगोलाई येथील तुळजा भवानीचे मंदिर ही मंदिरेही विशेष उल्लेखनीय आहेत. रत्नापूर महात्म्यात मयुरध्वज आणि ताम्रध्वज या राजांची लातूरशी संबंधित वर्णन आढळते. याच स्थानमहात्म्यात लातूर येथील पापविनाश मंदिराचा उल्लेख आढळतो तर तत्कालीन कालखंडात अनेक मंदिरे वास्तू असल्याचे लक्षात येते.

**समारोप**

कृतयुगात सत्यपुराणापासून मोगल काळात लाटपूर व आधुनिक काळात लातूरपर्यंत लातूरच्या सर्वांगीण प्रगतीची वाटचाल होत असताना तत्कालीन टप्प्याचे विशेष पुरावे म्हणून लातूरमधील सिद्धेश्वर मंदिर, पापविनाश मंदिर, केशवराजची मूर्ती, रामलिंगेश्वरम मंदिर, श्री 1008 चिंतामणी जैन पार्श्वनाथ मंदिर यांचा उल्लेख करणे अगत्याचे ठरते. किंबहुना हे प्राचीन रत्नापुरचे वैभव आहे. सद्यकाळात बहुतांश मंदिरांचा जिर्णोद्धार केला गेला आहे. तरी त्याचे प्राचीनत्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक काळात तारुण्यावस्थेतून प्रौढावस्थेत पर्दापण करणाऱ्या लातूरच्या मागे कित्येक शतकांचा इतिहास आहे आणि याच इतिहासाची साक्ष लातुरातील मंदिरे, तेथील शिलालेख वेळोवेळी करून देत असल्याचे दिसतात. लातूर येथील मंदिरे, मंदिर स्थापत्यातील महत्त्वाचा टप्पा असून लातूरच्या दृष्टिकोनातून त्याचे ऐतिहासिक महत्व आहे.

**संदर्भ**

**मूळस्थान ग्रंथ**

1) अग्निपुराण –वेदव्यास (संपा.तारिणीश झा / घनश्याम त्रिपाठी), हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग, 1998
2) मत्स्यपुराण – वेदव्या, गीताप्रेस, गोरखपूर, 2005
3) प्रासाद मंडणम (संपा. श्रीकृष्ण जुगनू), परिमल प्रकाशन, दिल्ली, 2005

**दुय्यम साधने**

1) कोलते वि.भी. (संपा.) महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1987
2) जोशी महादेवशास्त्री, भारतीय मूर्तिकला. अनमोल प्रकाशन, पुणे, 1980
3) देव प्रभाकर (अनु.कल्पना रायरीकर), मराठवाड्यातील मंदिर शिल्पस्थापात्याविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे, 2017
4) पाटील माया, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील मंदिर शिल्पे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
5) माटे म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, 2002
6) रत्नापूर महात्म्य–संपा.सु.ग. जोशी, मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर, 2008

# त्रिविक्रम विष्णु मंदिर

**अरुण सत्यप्रेम मते**
**बी. ए.व्दितीय वर्ग**
**इतिहास, सौ.के.एस.के महाविद्यालय बीड**

उस्मानाबाद तालुक्यात तेर या गावी आज असलेले त्रिविक्रम मंदिर ही वास्तु बौध्द धर्माचे चैत्यगृह आहे. कालांतराने या चैत्याचे रुपांतर हिंदुच्या त्रिविक्रम मंदिरात केले गेले. या चैत्यावरिल बौध्द स्तुप नष्ट करुन त्या ठिकाणी हिंदु देवतांची प्रतिष्ठापणा केली. हे मंदिर गावच्या मध्यभागी असुन ते पुर्ण पणे 43 गुणे 23 गुणे 6.4 सेमी आकाराच्या विटांनी बांधलेले आहे. विटा चिकलात बसविलेल्या आहेत. त्यावर माती व चुण्याचा थर दिला आहे मंदिर पुर्वभिमुख असुन त्यामध्ये गर्भगृह व मंडप आहे. मंडप नंतर च्या काळात बांधलेला आहे. गर्भगृह हे पुर्ण पणे बौध्द चैत्यासारखे आहे. त्याची लांबी 8 मीटर आणि रुंदि 4 मिटर असुन त्याचा पृष्टभाग अर्धवर्तूळाकृती असुन त्याचे छत गजपष्टावर आहे. गर्भगृहाच्या भिंतीची जाडी सव्वामिटर आहे. गर्भगृहासमोर मंडप आहे. गर्भगृहाचा दर्षनी भाग बौध्दलेनीच्या दर्षनी भागासारखा म्हणजेच चैत्यगवाक्षासारखा आहे. दर्षनी भागाचे स्वरुप वेरुळ येथील विष्वकर्मा लेनीसारखे आहे. गर्भगृहाचे प्रवेषव्दार लहाण आहे. त्यामध्ये त्रिविक्रमाची मुर्ती आहे. गर्भगृहाच्या बाह्रय भागावर साधा गोलाईचा थर व अर्ध स्तंब येवढेच अलंकरण आहे.

या वास्तुची जमिनीपासुनची उंची 10 मिटर आहे. गर्भगृहात प्रवेष करताच कालभैलवाची दगडी मुर्ति दिसते या मुर्तिच्या मागे 1 विटांची भिंत असुन तीच्या एका बाजुस आत जाण्यासाठी दरवाज्या आहे. या दरवाज्यातुन आत गेल्यावर त्रिविक्रमाची काळ्या दगडाची मुर्ति दिसते. या मुर्तिपुढे दगडाची विश्णुची मुर्ति आहे. विष्णुच्या हातातील गदेवर गरुड आहे. डोक्यावर मोत्यांनी सजविलेला मुकूट आहे. कानात कर्नाअलंकार आहे. गळ्या विभीन्न प्रकारचे 3 हार, बाजुबंद व मनगटावर रुंद नकषिदार कंकणे आहेत. त्रिविक्रमाचा उजवा पाय खाली सोडला असुन डावा बैठकिच्या कडेणे उतरला आहे. या उंचावलेल्या पायाखाली बली व बलीपत्नी यांची मुर्ति आहे. तेर येथील त्रिविक्रम मंदिर व आध्रप्रदेषातील चेंझली येथील चैत्यगृह विटांनी बांधलेल्या चैत्यगृहासमान मंदिराच्या तुळ्या आहेत. मंडपाच्या पुढील 2 ही कोपऱ्यात वाकाटक षैलिचे स्तंभ आहेत. वेदिका आणि कज्ञासणावर असलेल्या वामन स्तंभावरिल अलंकरण उल्लेखणिय आहे. वेदिका खोलगट देवकोश्टा आणि अहर्य स्तंभाने अलंकृत आहे. देवकोश्टामध्ये गण असुन अर्धस्तंभावर फुलांची नक्सी आहे. वेदिकेवरील वामन स्तंभाचे तळखडे पुर्ण कुंभाचे असुन त्यावरिल खाम अर्ध कमल तबकांनी अलंकृत आहे. हे मंदिर मुळ आहे की, सुरुवातीच्या काळात इमारतचीच्या मागील बाजुस असलेल्या मुक्त स्थाई अपस्डील रचनेवर आधारित होते जे लवकरात लवकर बौध्द ॲस्पिडल कटीगृह डिझाईनचे वैषिष्टे आहे.

रचना अढळले महान ॲस्पिडल मंदिरात समकालीन असल्याचे दिसते. हे दुसऱ्या किंवा तिसऱ्या षतकात सात वाहन अंतर्गत बांधले गेले असतिल. बाह्य सपाट असलेल्या मंडपाची रचना षतांपासुन बहुदा फक्त 1 जोड आहे. त्रिविक्रम मंदिर हे महाराष्ट्राच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथे असलेले एक मंदिर आहे. भारत सरकारच्या पुरातत्व सर्वेक्षनाने हे मंदिर राश्ट्रीय सौरक्षित स्मारक म्हणुन घोषित केले आहे. मंदिराची बाधनी चैत्यासारखी असुन त्याचा काळ इ.स.वि.सनाचे दुसरे षतक अस आहे. मंदिराच्या अवषेष्यांची वस्तु वैषिष्टे आणि काहिष्या तुटलेल्या,झीज झालेल्या मुर्तिची षैली यावरुन हे मंदिर वाकाटक कालीन षैलिचे आहे.

मंदिराची रचना त्रिविक्रम मंदिराचा मंडप स्तंभ कुंभ आणि वेदिका या स्तरांच्या पिठावर असलेल्या स्तंभीकांनी बनलेले आहे. या स्तंभीकावर मोजमापाच्या व अलंकाराच्या आहेत. गर्भगृहासमोरील मंडप हा पुर्वेस व उत्तरेस प्रवेष व्दार आहे. त्यावरिल थर व अर्धस्तंभ चैत्यगृहाप्रमाणे असल्याने हा मंडपही प्रचिन असावा. विटांनी व लांकडांचा वापर करुन बांधलेल्या या मंडपाची उंची 4 ते सव्वाचार मिटर आहे. त्याचे छत सपाट आहे. व त्याला लाकडांच्या खांबानी आधार दिला आहे. उपरावर विटांचा थर आहे आणि मंडपाला बाहेरुन चुन्याचा थर दिला आहे. बाहेरिल भागावर उठावता अर्धस्तंभ असुन गोलावरच्या थराचे अलंकरण आहे. मंडप व चैत्य एकाच वेळी बाधलेला नाही. हे स्पस्ट होते मंडपातील चोरस लाकडी खांब चार मोठे व चार लहान आहेत व त्यावर अलंकरण केलेले आहे. उताच्या मध्ये भागी कोरिव पुश्प वर्तुळ आहे. मंदिरातील गर्भगृहाच्या भिंतीत 1 कोनाडा असुन त्यामध्ये कार्तीकेची मुर्ति आहे. हे राश्ट्रकुट कालीन आहे. त्रिविक्रम हे मंदिर इ.स.वि. सनाच्या पाचव्या षतकानंतर बांधले असावे. जेंव्हा मंदिर हिंदु मंदिरात रुपांतरीत झाले त्रिविक्रमाची दगडी प्रतिमा कदाचीत सुरुवातीच्या चालुक्या पर्यंतची आहे. ॲस्पिडल मंदिराचा पुढील भाग बौध्दरॅक – कट आर्किटेक्चर मध्ये सापडलेल्या चैत्यराजाने सुषोभित केला आहे. त्रिविक्रम मंदिर हे महाराष्ट्रातील सर्वात प्राचिन इमारत मानली जाते.

**संदर्भ ग्रंथ**


1 **प्रचिन भारताचा इतिहास, लेखक :– अनिल कठारे व डॉ विजय वखारे**
2 **इंटरनेचा वापर माहितीसाठी केला.**
3 https://mr-m-wikipedia.org

# ''मंदीर मुर्ती इतिहास आणि पुरातत्व व संस्कृती'' विशेष संदर्भ (विठ्ठल आणि गणेश पूजन)

**डॉ. एम.एस. कांबळे**
पदवी व पद्व्युत्तर
इतिहास विभाग
बाबुरावजी आडसकर महाविद्यालय,
केज, जि.बीड

**i) सारांश / Abstract**

प्राचिन काळापासून मानवाला देवाविषयी कुतुहुल व आत्मविश्वास वाटत आलेला आहे. अग्नी, जल, वायु, प्राणी, आत्मा, ईश्वर याची पुजा भारतीय मानव करीत आलेला सहज दिसुन येतो. हिंदु धर्मात तर 33 कोटी देवांची संख्या आढळुन येते. त्याच बरोबर चाळीस संस्कारही सांगितलेले आहेत तर बौध्द धर्मिय सोळा संस्कार सांगतात.

या ठिकाणी पंढरपूरचे विठ्ठल मंदीर, हे महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील लोकांचे अराध्य दैवत आहे. त्याचा इतिहास आणि संस्कृती पाहता मातृ पितृ सेवाभाव उत्पन्न करण्याचे ते उर्जास्थान असल्याचे सहज जाणवते त्यामुळे आज या इतिहास संस्कृतीची जपवणुक करुन महत्व वाढवण्याची निश्चित आवश्यकता वाटते, करीता हा विषय पेपर लेखणासाठी निवडलेला आहे.

**ii) प्रस्तावना / Introduction :-**

गणेशाची पुजा सर्व कार्याच्या आंरभी करण्याची प्रथा महाराष्ट्रीयन समाजात सहज दिसुन येते. या पाठीमागिल इतिहास व संस्कृती लक्षात घेता, केवळ गणेश हा आई वडीलांच्या पेक्षा कोणतेही दैवत 'पृथ्वी' ही देखील श्रेष्ठ नसून आईच देव, 'पृथ्वीच' आई आणि हे ओळखुन तीला प्रदक्षिणा घालतात म्हणुन तर विद्येची देवता म्हणुन गणेशपुजन होते व याचा संबध देखील मातृ पितृ सेवाभाव वाढविण्यासाठी आवश्यक वाटतो. आई वडीलांची सेवा निस्वार्थ असते, आपल्या बाळाचे कल्याण व्हावे म्हणुन आयुष्य खर्ची घालतात. मात्र आपण जेव्हा गलेलठ्ठ पगाराचे मालक बनतो. पत्नी, मुल बाळ यांच्यात रंगतो तेंव्हा या दैवताकडे कधी–कधी दुर्लक्ष होते आणि तीर्थयात्रा, देवदर्शनाला प्राधान्य दिले जाते. वास्तविक पाहता ही दैवत सुध्दा आई वडीलांची सेवा करणाऱ्यांना भेटतात हा धागाही समजुन घेणे महत्वाचे वाटते.

iii) **तथ्य/साधन संकलन** :– वर्तमानपत्र, प्रसार माध्यमे, दंतकथा, लोककथा दुय्यम संदर्भ साधने ईत्यादी व्दारे केलेले आहे.

**पुर्वाभ्यास (Pre-Study) :-** भारतीयांना आई वडीलांची सेवा करण्याची संभाळण्याची जबाबदारी पार पाडावी यासाठी शासनास कायदे करावे लागले ही समस्या सोडविण्यासाठी वृध्दाश्रम निर्माण करावे लागेल. ईत्यादी

**iv) समस्या सुत्रण (Problem formulation) :-** प्रत्येक व्यक्ती आई–वडीलांना संभाळण्याची जबाबदारी आपली मानतो तो कृतव्याचा भाग असून आपण उपकार करीत नाही असे मानतो. मात्र प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मंदीर, धर्मस्थळे, देवदर्शन, तिर्थस्थळावर प्रचंड खर्च करतो आणि आई वडीलांना आर्थिक मदतीसाठी समाजापुढे हात पसरण्याची वेळ येते. तेंव्हा देवदर्शनाच्या मागिल पार्श्वभुमी जर

आपण पाहिली तर सांस्कृतीक व पुरात्वीय धागा मातृपितृ सेवाबंध वृध्दींगत करणारा आहे सहज जाणवते.

**v) अभ्यासाचे उद्दीष्टे (Adjectives) :-** विठ्ठल मुर्ती, मंदीर आणि गणेश मुर्ती मंदीर उपासना या मागिल इतिहास मांडणे व पुरात्वीय आणि सांस्कृतीक दृष्टीने विश्लेषण करुन मातृ–पितृ ऋण आणि सेवेचे महत्व प्रतिपादीत करणे.

**vi) अभ्यासाचे गृहीतक (Hypotheses) :-** आज आई वडीलांना उपासमारीची वेळ आणि पर्यटन, देव दर्शनावर लाखो रुपये खर्च करणारी मंडळी आढळुन येतात अर्थात काहीं लोक याला अपवादही आहेत.

**vii) संशोधन पध्दती (Research Methodology ) :-** हा विषय आध्यात्मीक असल्यामुळे व लोकभावनेशी संबधीत असल्यामुळे आणि इतिहास. लेखणाचा नियम इतिहासातील लेखणामुळे विकृतीकरण होऊ नये हा धागा लक्षात घेऊन लोककथा/ दंतकथा / प्रसारमाध्यमाचा वापर करुन कथनात्मक पध्दतीने अन्वार्थ लावुन मांडणी केलेली आहे. सर्व्हेक्षण, मुलाखत, प्रश्नावली, संदर्भ ई. मिश्र संशोधन पध्दती वापरुन लेखन केले आहे.

**viii) विठ्ठल मंदीर मुर्तीचा पुरात्वीय व सांस्कृतीक इतिहास :-** विठ्ठलपंथ व रुक्मिणी देवी यांचे एकुलते एक पुत्र पुंढलिक लाड, कौतुकात वाढवलेले पुढे जेंव्हा तरुण होतात, खोडया करतात तेंव्हा विवाहाचा प्रसंग येतो, कधीही आई वडीलांशिवाय न राहणारा जेंव्हा विवाहीत बनतो तेंव्हा आई वडीलांना विसरुन पत्नीच्या आहारी जातो, भांडे घासतो, पत्नीच्या चाडया ऐकुन आई वडीलांना तो घराच्या बाहेर हाकलुन देतो. आई वडील भिक मागत जगु लागतात. इकडे बराच कालावधी लोटल्यानंतर पत्नी गरोदर असते तिला मदतीची अपेक्षा असते तेंव्हा या स्वार्थी हेतुने पुंढलिकाला आई वडीलांना शोधुन आणा असे सांगते, शोधायला तो निघतो लोहगाव येथे गेल्यानंतर आई वडीलांची विचारपुस तो लोकांकडुन करतो व त्यांच्या मार्गदर्शनामुळे शोध मोहिमेवर जातो. या वाटचालीत त्याला सप्त अप्सारा कुकुट स्वामीच्या घरी स्वच्छतेचे व पाणी भरण्याचे कार्य करतानां आढळतात व शेवटी त्याचे कारण तो जाणुन घेण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा आई वडीलांच्या सेवेतील उणीव हे कारण दिसुन येते. तो अंर्तमुख होऊन विचार करतो मी तर किती पाप केले मी काय प्रायश्चित घेवु. त्याने निर्धार केला की मी आई वडीलांची सेवा करणे आवश्यक आहे आणि तो आई वडीलांना शोधतो. आई वडील थकलेले असतात. तो त्यांच्या सेवेला लागतो, पत्नीही वाट बघुन तिथे पोहंचते व सासु सासऱ्यांच्या सेवेला लागते. ती आपले कर्तव्य पार पाडते. विठ्ठल प्रसन्न होतात व तिथे उपस्थित प्रगट होतात, भक्त पुंढलिकाला प्रसन्न झालो, मी आलो असे म्हणतात, मात्र तो मातृ–पितृ सेवेपासून थोडाही ढळत नाही आणि दारी आलेल्या पाहुण्याचे आदरतिथ्य म्हणुन विट फेकतो, विठ्ठलही ते स्विकारतात कर कटेवरी ठेवुन त्याची मातृ–पितृ सेवा संपेपर्यंत थांबतात. सेवा संपल्यानंतर आई वडील, पती पत्नी विठ्ठलाकडे जाण्याची वेळ आलेली दिसुन येत नाही तर विठ्ठल स्वतः आपल्या भक्तांच्या भेटीसाठी गेलेला दिसुन येतो. विठ्ठलाचे दर्शन घेतानां पुढंलिक दर्शन आजही घडते.

**ix) इतिहास आणि संस्कृति व पुरातत्व** :– आई किंवा आजी किंवा पंजी जेंव्हा चुलीवर भाकरी बनवत असे तेंव्हा अग्नी पेटवताच अर्थात चुल पेटवताच, पाण्याचा थेंब चुलीत टाकी, पहिली छोटी भाकरी चुलीत टाकीत असे हा धागा लक्षात घेता आपला इतिहास आणि संस्कृती लक्षात येण्यास मदत होईल. त्याचे कारण अग्नी, जल, वायु, निसर्ग, प्राणी, देवता ई. पुजा आपले पुर्वज करत. त्यांच्यात पाप–पुण्य

कर्म कल्पना होत्या. स्वर्ग नर्क मानत आणि म्हणुन नैतिकता व धार्मिकता रुजवली जाई. अस्तीक व नास्तीक वर्गही होता. मात्र नैतिकता व संस्कृती आणि पुरातत्व यांचा संबध मुर्ती मंदीर पुजायासाठी आढळतो हे जपण्यासाठी मंदीर, मुर्ती, उभारुन पुढील पिढयांना त्यारची जागृती–जाणीव निर्माण करुन देणे आवश्यक वाटते.

**पुरातत्व म्हणजे काय ? :–** सर मर्टीमर व्हिलर यांचे मत, पुरात्वीय पुराव्यावरुन मानवी मनाचा वेध घेता येतो व वेध घेणे पुरातत्वाज्ञाचे काम असते.

**संस्कृती म्हणजे काय ? :–** प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा बिघाड तो बिघाड टाळण्यासाठी करावयाचा संस्कार यास संस्कृती म्हणता येईल.

**इतिहास म्हणजे काय ? :–** इति दैवमासीदिती यः कथ्थतेस इतिहासः। जसे घडले तसे सांगणे, महर्षी व्यास इतिहास इतिहास पुराणाभ्यां वेंद समुपबृहयेत। तर भारतीय साहित्यात इतिहासाला वेदाबरोबर मानतात.

**दुसरा संदर्भ गणेश उपासनेच्या पाठीमागिल पार्श्वभुमी ? :–** येथे लक्षात घेवुन 'एकदा गणेश आणि कार्तिकेय यांच्यात श्रेष्ठत्वावरुन वाद झाला. तेंव्हा हा वाद सोडवण्यासाठी शर्यत पृथ्वी प्रदक्षिणेची लावली गेली. या शर्यतीत गणेश विजयी होण्याची चिन्ह कमी होती कारण त्याने प्रवासासाठी उंदीर हे वाहन वापरले अर्थात कार्तिकेय याने गरुड वापरले. शर्यत सुरु झाली गणेशाने आई वडीलांना प्रदिक्षणा घातली आणि तो थांबला. इकडे भरकटत कार्तिकेय गेला पृथ्वी प्रदक्षिणा घालुन वापस आला. मात्र निर्णय गणेशाच्या बाजुने झाला आणि त्याचा विजय झाला. कारण आई 'पृथ्वीरुप' सर्वांनी मान्य केले. इथेही आई वडील सेवेला पुरातत्व व सांस्कृतीक आधार आहे. तो जपला गेला पाहिजे. मंदीर उभारा, देव धर्म तिर्थ करा मात्र माता पित्यांना देव रुपात माना ही शिकवणुक विठ्ठल रुक्मिणी, गणेश पुजनाचे संस्कृतीक व पुरातत्व इतिहसात दिसुन येते.

## x) निष्कर्ष (Conclusion) :–

1) विठ्ठल मंदीर व दर्शनासाठी महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राच्या बाहेरुन लोक आजही पायी दिंडयाने जातानां दिसुन येतात. याला पुरातत्वीय ऐतिहासिक आणि सांस्कृतीक इतिहास व महत्व आहे. हे जाणण्यासाठी मातृ–पितृ सेवा बंध जपणे आवश्यक आहे.
2) मुर्ती, मंदीरे यांचा इतिहास संस्कृती पाहता मानवाला नैतिकता प्रदान करणारी प्रेरणा स्त्रोत ठरतात. त्याची निर्मिती ही इतिहास पुरातत्व आणि संस्कृती जपण्यासाठी आवश्यक आहे.

## XII) संदर्भ सुची – Bio-bolography :–


1. डॉ. कठारे व इतर, पुरातत्व विद्या, वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन, विद्या बुक्स औरंगाबद 2011 पृष्ठ 4
2. (संपा) महादेव शास्त्री जोशी, भारतीय संस्कृती कोश, भा.स.मं.पुणे 2005, खंड 9, पृष्ठ 596
3. प्रा. सुहास जोशी व इतर, इतिहास माहिती कोष, डायमंड पब्लीकेशन पुणे, जा–2009
4. https://m.youtube.com>watch
5- Youtube mythak T.V. India, July 7, 2018 (Story of Pandharpur)
6- https:// marathi.webdunia.com
7. प्रत्यक्ष मुलाखत श्री आश्रुबा आबा गिते वय 70 वर्ष दि. 09/02/2018 – मु. पो. शिंदी, ता.केज, जि.बीड

# मंदिर स्थापत्य शैली

**फुलवाड शकुंतला हरिश्चंद्र**
संशोधक विद्यार्थी
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून मानवाने उत्क्रांतीच्या टप्प्यानुसार कोणते ना कोणते मूर्त, अनाकलनीय शक्तीचे अस्तित्व मान्य केले, तसेच त्याच्या श्रद्धा भावनेतही वाढ होत गेली. स्वतःसोबतच ईश्वराच्या निवासस्थानाचीही त्याने रचना केली. 'वस' म्हणजे (राहणे) या संस्कृत शब्दापासून 'वास्तू' हा शब्द बनला. शुक्रनितिनुसार 'मंदिर, देवप्रतिमा, उद्याने, प्रासाद इ. निर्मितीचे शास्त्र म्हणजे वास्तूशास्त्र होय.'[1] यावरुन मानवाने स्वतःसारखीच देवासही निवासस्थानाची व्यवस्था गृहित धरली.[2] ज्याठिकाणी पूजाकार्य संपन्न होते व इष्ट देवतांची पूजा अर्चा भोग यांच्या माध्यमातून पार पाडली जाते व शास्त्रोक्त प्रतिबिंब म्हणून ज्या वास्तूकडे पाहिले जाते त्यास 'मंदिर' म्हणतात.

'मंदिर' या शब्दाच्या व्युत्पत्तीचा विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, 'मंद' हे संस्कृतमधील विशेषण ज्याचा अर्थ प्रसन्न होणे, आनंदित होणे असा आहे. 'मंद' पासून 'मंदिर' शब्दाची निर्मिती झाली. 'मन+दर' असा विग्रह केल्यास त्याचा अर्थ मनाचे द्वार असा होतो.[3] अर्थात मानव अधिभौतिक जीवन जगत असताना अध्यात्मिक शक्तीचं उन्नयनासाठी ऱ्हदयस्थित परमात्याला जागृत करणे आवश्यक असते. अमूर्त अदृश्य, सुक्ष्म रुपाला जाणण्यासाठी मूर्त रूपात ज्याची प्राणप्रतिष्ठा करावी लागते ती वास्तू मंदिर म्हणून संबोधली जाते.

**उद्दिष्ट्ये**

1) मंदिराचा उगम, विकास, शैली यांचा अभ्यास करणे.
2) मंदिर स्थापत्य रचनेची स्थित्यंतरे अभ्यासणे.
3) तत्कालीन वास्तुशास्त्राच्या प्रगतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

1) ऐतिहासिक संशोधन पद्धत
2) संदर्भ पद्धत

**मंदिर स्थापत्य शैली**

शिल्पशास्त्रानुसार मंदिराच्या तीन शैली मानल्या जातात. भारतीय मंदिर स्थापत्याच्या विकासाचा व शिल्पाविष्कारातून अनेक शिल्पशैली उदयास येण्यास प्रारंभ साधारणतः सातव्या शतकापासून झाला. उत्तरेकडील भागात देवालयाच्या बाह्य भिंतीवरील क्षितिज समांतर शिल्पपट्ट्यांनी एक विशिष्ट रचना साकारलेली शैली विकसित झाली तर पिरॅमिडसारख्या आकाराप्रमाणे चौकोनी आकार असणारी शिखरे बांधण्याच्या प्रघातातून द्राविड शैली विकसित झाली. द्राविड व नागर शैलीचा मंदिर स्थापत्याचा संयोग घडून वेसर शैलीचा आविष्कार झाल्याचे दिसते. मार्कंडेय संहिता व विष्णुतंत्र या ग्रंथात मंदिराच्या 1) नागर 2) द्राविड 3) वेसर 4) सर्वदेशिक 5) कलिंग 6) विराट 7) मंदिर 8) भवन 9) यांग या नऊ शैली सांगितलेल्या आहेत.[4] मंदिराचे स्थापत्य, मंदिराची रचना आणि भौगोलिक विविधता या अनुषंगाने या शैलीचा उद्भाव, विकास झाला आहे. स्थूलमानाने

हिमालय ते विंध्य नागरशैली, विंध्यपासून कृष्णा नदीपर्यंत वेसर व कृष्णा नदी ते कन्याकुमारीपर्यंत द्राविड शैलीची मंदिरे आहेत.

**1) नागर शैली**

'नागर' हा शब्द 'नगर' पासून व्युत्पन्न झाला आहे.[5] उत्तर भारतात हिमालय पर्वत ते विंध्य पर्वतरांग यांच्या दरम्यान या शैलीचा पुरस्कार व प्रचार केल्याचे दिसते. पर्सी ब्राऊन यांनी नागर शैलीला 'इंडो आर्यन स्टाईन' असे नाव दिले आहे. नागर शैली ही सात्विक आहे. (वर्ण ब्राम्हण, रंग शुभ्र, आकार चौकोनी व देवता विष्णू आहे.)[6] रामायणात अशा प्रकारची मंदिरे असत्याचा उल्लेख आढळतो.[7] निमुळते होत जाणारे, लतापट्ट्यांनी आच्छादिलेल्या कुंभ थरांनी युक्त उरोमंजिरींनी व्याप्त आणि ज्याच्या मस्तकावर आमलक आहे असे शिखर असणारी शैली म्हणजे नागर शैली होय. नागर शैलीचे शिखर शेखरी व भूमिज नागर हे उपप्रकार आहेत. शेखरी उपप्रकारात शिखराभोवती लहानमोठी शिखरे दिसतात. त्यांना 'उरुशृंगे' असे म्हटले जाते. भुमिजनागर शैलीत मंदिराचे ताराकृती विधान आणि मूळ शिखराच्या आकारात स्तंभयुक्त छोट्या शिखरांची मालिका असते. नागर शैलीचे कलिंग नागर, ललित नागर हेही रचनात्मक प्रकार आढळतात. नागर शैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उंचीचे महत्त्व उर्ध्वकृतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. मंदिर स्थापत्याची नागर शैली प्रांतानुसार बदलताना दिसते. ओरिसा, बुंदेलखंड आणि गुजरात व दक्षिण राजस्थान या प्रांतात ती विभागली आहे.

**2) द्रविड शैली**

द्रविड शैली ही साधारणतः विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील भागात आढळते. या शैलीचा उद्‌गाता मय मानला जातो. द्रविड देशात विकसित झाल्यामुळे या शैलीला 'द्रविड शैली' असे नाव पडले आहे.

द्रविड शैली ही राजस असून वर्ण क्षत्रिय अथवा वैश्य आहे. तर रंग लाल, आकार अष्टकोनी असून देवता ब्रम्हदेव मानला जातो.[8] द्राविड शैलीचा असाधारण वर्गाकार असून गर्भगृहाच्या वरचा भाग साधारणतः सरळ पिरॅमिडसारखा असतो व त्यात अनेक मजले असतात. द्रविड मंदिरे ही उंच असतात व त्याभोवती अंगण असते आणि अंगणात अनेक मंदिरे, परिवार देवतांची निवासस्थाने, स्नानकुंड कक्ष असतात. अंगणाच्या प्रवेशद्वारावर गोपुराची रचना करण्यात आलेली असते. ही द्रविड मंदिरे उंचीपेक्षा विस्ताराला महत्व देताना दिसतात. अर्थातच या मंदिरांची रचना जमिनीला समांतर आडव्या पटीने विस्तारित असतात. या मंदिराची शिखरे बसकी असतात, भिंती या स्तंभयुक्त असतात. या शैलीमध्ये अजून एक वैशिष्ट्य शिखराच्या बाबतीत गजपृष्ठाकृती शिखर हेही असते.

**3) वेसर शैली**

नागर व द्रविड या दोनच मंदिर स्थापत्याच्या प्रमुख शैली मानल्या जातात. अर्थातच नागर व द्रविड शैलीतूनच द्रविड कर्नाट शैली विकसित झाली.[9] ही शैली तामस प्रधान (वर्ण शुद्र, रंग हिरवा, आकार गोल व देवता रुद्र) असत्याचे वर्णन शिल्परत्नमध्ये येते. या शैलीतील मंदिर वर्तुळाकृती किंवा लंबाकृती असतात. या मंदिराची रचना द्रविड शैलीसारखी तर रुप नागर शैलीसारखी आढळते. या शैली प्रकारातील मंदिरे ही विंध्य पर्वत ते कृष्णा नदीपर्यंतच्या भागात आढळून येतात. केरळमध्ये या शैलीला 'मिश्रक' शैली असे नाव आहे.

विंध्यच्या दक्षिणेकडील म्हणजेच साधारणतः महाराष्ट्रातील मंदिरे हेमाडपंथी शैलीची मंदिरे म्हणून ओळखली जातात. या मंदिरांचा निर्माता म्हणून हेमाडपंत यादव राजा रामचंद्राच्या कर्णाधिप अधिकाऱ्याचे नाव घेतले जाते. त्यामुळे त्यास हेमाडपंती म्हणतात.[10] ज्याप्रमाणे उत्तर गुजरातमधील मंदिराचे श्रेय सिद्धराज, कानडी प्रांतातील मंदिराचे श्रेय जक्कनाचार्य, खानदेशातील मंदिराचे श्रेय गवळी राजे यांना दिले जाते. तसेच मराठवाड्यातील मंदिराचे श्रेय हेमाडपंत याला दिले जाते. परंतु हेमाडपंती मंदिरे ही

चालुक्य, यादव, होयसळ कलाशैलीची आहेत. माती, चुना, सिमेंट यांचा वापर न करता केवळ दगड एकमेकांत गुंफून कौशल्याने ही मंदिरे उभारलेली आहेत. हेमाडपंत किंवा हेमाद्रीच्या कालखंडापूर्वीच ही शैली विकसित झाली होती. मात्र हेमाद्रीने विविध मंदिराचा जिर्णोद्धार केला व दगडी मंदिर बांधकामाच्या शैलीत भर टाकली. इ.स. 1060 मधील अंबरनाथचे मंदिर हे उत्तम उदाहरण आहे. ज्यावरुन हेमाद्रीपूर्वी ही मंदिरशैली विकसित झाली हे लक्षात येते. यावरुन या शैलीस भूमीज मंदिर शैली म्हणजे संयुक्तिक ठरते.[11]

**समारोप**

धार्मिक हेतू समोर ठेवून मंदिराचा उगम झाला तरी मंदिराचा विकास होताना धार्मिकतेसोबतच सामाजिक, राजकीय इत्यादी बाबीही मंदिर विकासास पूरक ठरल्याचे दिसते. मूर्तीपूजेच्या उदयानंतर देवतांसाठी घरे बांधली जाऊ लागली व स्थापत्यशास्त्राच्या विकासाबरोबर मंदिराचे स्थापत्य आकारास आले. प्रदेशानुरुप मंदिराच्या शैलीत बदल असले तरी त्याच्या मूळ गाभ्यात एकात्मता असल्याने मंदिरे ही प्राचीन कालखंडातील पुरातत्वीय साधनात अत्यंत मोलाची भूमिका बजावताना दिसतात.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) जयवंत फोंडू धोंड (अनु.) मानसार (स्वयंस्थापती खंड–1), मठग्राम, 2008, प्रस्तावना
2) डॉ.सुजल पाल साहु, मुर्तिकला का इतिहास, विद्याभारती प्रकाशन, नवी दिल्ली, 2016, पृ.158
3) परमार अजय, प्राचीन भारतीय प्रतिमा कला एवं मंदिर वास्तूकला, विश्वभारती पब्लिकेशन, दिल्ली, 2011, पृ.91
4) अभ्यंकर शंकर, भक्तीकोष (खंड 5 वा) भारतीय तीर्थक्षेत्र व मंदिरे, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, पृ.31
5) गप्रे प्रभाकर, मंदिर स्थापत्याचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, 2010, पृ.2
6) अभ्यंकर शंकर, पूर्वोक्त, पृ.44
7) वाल्मीकी रामायण, अ.खं.61
8) कपिन्जल संहिता 10.70
9) हार्डी ॲडम, इंडियन टेंपन ॲन आर्क्टिटेक्चर फॉर्म
10) देव प्रभाकर (अनु. कल्पना रायरीकर), मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविकषर, अपरांत प्रकाशन, पुणे, 2017, पृ.20
11) काळे भाग्यश्री, पाटसकर, महाराष्ट्रातील मंदिरशैली, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2009, पृ.6

# मेहकरची नृसिंहमूर्ती

**प्रा.डॉ.श्रीहरी रंगनाथराव पितळे**
इतिहास विभाग प्रमुख तथा संचालक,संत नामदेव महाराज
ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अभ्यास केंद्र.
स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड

**गोषवारा**

प्रसिध्द अकरापैकी सहावे नृसिंहक्षेत्र असलेल्या मेहकर येथील नृसिंहमूर्ती प्राचीनकालीन मूर्तीकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. गंडकी षिळेतील विदरण पण शांत प्रकारातील तामस गुणातील ही मूर्ती आपल्या आखीव रेखीव कलाकृतीमुळे भव्य, प्रसन्न आणि आकर्षक झाली आहे. सव्य ललितासनातील हया मूर्तीच्या मांडीवर विराजमान हिरण्यकष्यपू, पायाजवळ असणाÚया प्रल्हाद व दोन पुरूष मूर्ती तितक्याच आकर्षक आहेत. करंडक मुकुट, माळ, मोठा हार, अभयहस्त आणि कर्तरीहस्त मुद्रा वगैरे पहाता मूर्तीषास्त्रातील सर्व संकल्पनांचा व प्रमाणबध्दतेचा पूरेपूर वापर केला गेलेला आहे. कलाकाराने आपली संपूर्ण ताकद पणाला लावलेली आहे. ही मूर्ती विलक्षण स्वरूपाची आहे. सौंदर्य, मोहकता ठासून भरलेली आहे. भक्तांना आष्वस्त करणारी ही मूर्ती आहे.

**प्रस्तावनाः—**

मेहकर हे तसे आडवळणातील गाव. बुलडाणा जिल्हयातील हे तालुक्याचे गाव प्राचीन काळात वैभवसंपन्न होते. आपल्या वैभवाच्या खुणा मूर्तीषिल्पांच्या रूपात अद्यापही येथे नांदत आहेत. आपल्या संपन्न सांस्कृतिक संचिताच्या ठेवा हया मूर्ती प्राणपणाने जपत आहेत. येथे शारंगधर बालाजी या नावाने प्रसिध्द असणारी विष्णुमूर्ती अकरा फुटाच्या उंचीने आणि विलोभनीय सौंदर्याने नटलेली आहे. मूर्तीषास्त्राच्या विभव क्रमाच्या नियमानुसार खरे तर ही मूर्ती त्रिविक्रम विष्णू मूर्ती आहे. पण लोकभाषेने तीला बालाजी रूपातच पूजलेले आहे. असाच प्रकार येथील गोपाळकृष्ण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मूर्तीबाबत आहे. ही वास्तविकतः केषवराजाची मूर्ती आहे. पण गोपाळकृष्णाच्या लुप्त मूर्तीच्या जागेवर स्थापित झाल्याने हया केषवराजाला गोपाळकृष्ण म्हणून लोक मानतात. केषवराजाच्या आणखी दोन विलक्षण सुंदर मूर्ती या गावात आहेत. या मूर्ती प्राचीन काळाषी तादात्म्य सांगतात हे विषेष आहे. या सर्व मूर्तींमध्ये लक्षणीय सौंदर्यवती मूर्ती आहे भगवान नृसिंहाची. ही या सर्वांपेक्षा प्राचीन आहे. सौदर्याने आगळीवेगळी आहे, घडणीने सुबक आहे, मूर्तीषास्त्राचा उत्तम नमूना आहे. घराच्या आकाराच्या मंदीरात स्थापित आणि खाजगी मालकीची असल्याने कदाचित ही दुर्लक्षित राहीली असेल अथवा नृसिंह या दैवताबददल ‘कडक,‘कठोर’ अषा कल्पना असल्यानेही ती दुर्लक्षित राहीली असेल. प्रस्तुत शोधनिबंधाच्या मर्यादेत या नृसिंहमूर्तीचा धांडोळा घेण्याचा अल्प प्रयत्न करीत आहोत.

## नृसिंह दैवताचे संदर्भ

नृसिंह या दैवताचे संदर्भ पुराणे, उपनिषदे, अभंग, ओव्या, यांमधुन मोठया प्रमाणात मिळतात. वेदांमध्ये नृसिंहाचा संदर्भ मिळतो का याबाबत मतांतरे आहेत. वेदांमध्ये नृसिंहाचा उल्लेख नसल्याने ही शुध्द पौराणिक देवता आहे असे मानणारा एक मोठा वर्ग आहे नृसिंहाचा पहिला उल्लेख तैतरीय उपनिषदात येतो [1] तर याउलट वेदांमधील ‘‘द्वे वै रूपः ही ऋच्या या देवतेचे उगम आहे असे मानणारा दुसरा वर्ग आहे. [2] तरीसुध्दा ही देवता लोकश्रध्देतून जपल्या आणि पूजिल्या गेलेली आहे इतके खरे. नृसिंहपूर्वतापनीय उपनिषद,

उत्तरतापनीय उपनिषद, अग्निपुराण, मत्स्यपुराण, भागवत, नृसिंहपुराण, हे सर्वात महत्वाचे संदर्भग्रंथ आहेत. आंध्रप्रदेषातील चंचू नामक जमातीचे सांस्कृतिक समावेषन करण्यासाठी त्या गणाचे कुलचिन्ह असणाऱ्या सिंहमुद्रेला नृसिंहरूपात स्वीकारल्या गेले असेही मत मांडले गेले.[3] त्यासाठी पुरावा म्हणून आंध्रप्रदेषातील कोंडामोत्तू येथे सापडलेली सिंहमूर्ती दाखवली जाते. [4] दक्षिणभारतात उत्तरेपेक्षा अधिक संख्येत मंदीरे व उपासक आढळतात. आपल्याकडे मोठया प्रमाणात आढळणारा पद्मषाली हया समाजाचे कुलदैवत नृसिंह हेच आहेत. वैदिकोत्तर बहुतांष सर्व साहित्यामध्ये नृसिंह दैवताचे वर्णन आढळते. ही देवता पाकिस्तानातील मूलतानपासून, उत्तरेत हिमालयातील केदारनाथ पासून, ते दक्षिणेस तामिळनाडूपर्यत सर्वत्र पूजल्या गेलेली आहे. संगम साहित्यासह सर्व प्रादेषिक साहित्यात ही देवता वर्णिलेली आहे. नृसिंह मंदिरे सर्वत्र आढळतात. यावरून ही देवता लोकप्रिय होती असे म्हणता येईल.

## भक्तीतत्त्व आणि सगुणोपासना

निर्गुण, निराकार, व्यापक विभु, भेदरहित, परिच्छेदरहित असणारे 'ब्रह्म' हे तत्त्व साधकांसाठी, साधनेसाठी आणि उपासनेसाठी अषक्य असल्याने ब्रह्मला मायेची उपाधी लागून ते ब्रह्म सगुण होउन ईष्वर बनले आणि भक्तांसाठी प्राप्त होण्यास सुलभ, कनवाळू, कृपाळू बनले अषी उपपत्ती वेदांत साहित्यामध्ये आढळते. मूर्तीषास्त्राचा संबंध सरळ सगुणोपासनेषीच आहे. ईष्वराची केवळ भक्तीच होऊ शकते. अषा विचारातून 'भक्ती' या सिध्दांताचे महत्व फार वाढले. भक्ती या शब्दाचा प्रयोग श्वेताष्वेतरोपनिषदाच्या शेवटच्या भागात **यस्य देवा पराभक्तीर्यथा देवे तथा गुरौ** या श्लोकात आढळतो. भक्तीचा उगम दक्षिण भारतात झाला असे भागवत सांगते. तर भक्तीकडे सिध्दांत वेदातही आढळतो असे मानणारा वर्ग आहे. एकूण पहाता, भक्तीच्या उगमाबददल मतभिन्नता असली तरी भक्तीतत्त्व नंतरच्या काळातील संतांच्या प्रभावाने विषष प्रचारित झाले. तळागाळापर्यंत भक्तीचा विचार पोहचला. नारदभक्तीसूत्रे हा ग्रंथ यासाठी महत्वाचा मानला जातो. ''आला नावा रूपा I तुका म्हणे झाला सोपा II'' [4] असे वर्णन असणारा सगुण आणि मायीक असणारा ईष्वर भक्तीने प्राप्त होऊ शकतो हा विचार शास्त्रमान्य, संतमान्य आणि लोकमान्य झाला. यातूनच उपास्य आणि उपासक या आधारावर विविध पंथोपपंथ निर्माण झाले. केवळ भक्तासाठी म्हणून झालेला नरसिंह हा पहिला अवतार होता. प्रह्लाद या भक्तासाठी भगवान विष्णु स्वतः कोरल्या खांबातून प्रगटला. हा अवतार भक्तीचा महिमा वर्णन करण्यासाठी दाखला म्हणून दाखवला जातो.

## मेहकरच्या नृसिंहमूर्तीचे स्थानमहात्म्य

*स्थानिक लोककथा, स्थानमहात्म्य आणि वदंता या आधारावर हे स्थान पद्मपुराणाइतके प्राचीन मानले गेले आहे. येथे मेघंकर नावाच्या राक्षस राजाला भगवान रामाने नरसिंहरूपात दर्षन दिल्यामुळे मेघंकराने भव्य नृसिंहमंदीर बांधले असल्याचे सांगीतले जाते. पण काही पुरावा मिळत नाही.[6] पैनगंगेच्या तीरावरील हे स्थान पैनगंगेच्या उर्ध्वगामित्वामुळे तीर्थ आणि क्षेत्र म्हणून मान्यता पावलेले आहे. नृसिंह अवतारानंतर अवतारलोप क्रमाने अकरा स्थाने मान्यता पावलेली आहे. अवतार प्राकटय स्थान म्हणून मुलतान¼पाकिस्तान½] आपल्या बोटांचा दाह षमन करण्यासाठी हिमालयात बोटे खुपसली ते स्थान जोषीमठ, षिवध्यान केले ते स्थान वाराणसी, स्नान केले ते स्थान नर्मदातटावरील नरसिंगपूर, रक्तरंजीत वस्त्रे टाकली ते स्थान रामटेक, सुग्रास भोजन केले ते स्थान मेहकर , लक्ष्मीभेटीचे स्थान सिंहाचलम ¼तेलंगणा½] गुळपाणी नैवेद्य स्विकारले ते स्थान मंगलगिरी ¼आंध्रप्रदेष½] कोप्पर, संगमेष्वर आणि अवतारलोप स्थान अहोबिलम अषी ती अकरा स्थाने मानली जातात. [7]*

## मूर्तीप्राकटय

विद्यमान नृसिंहमूर्ती इ.स. 1479 मध्ये श्यामराज पितळे यांना भूगर्भात सापडली. मेहकर येथील माळीपेठ भागातील एका वाडयातील कोपÚयात जमीनीखाली हेमाडपंती बांधणीच्या दोन खोल्या आहेत. यात वापरलेले दगड ओबड–धोबड आहेत. हे दगड सच्छिद्र आहेत, त्यामुळे श्वासोछवासाला अडथळा येत नाही. खाली उतरण्यासाठी दगडाच्या काही पायÚया आहेत. हे भुयार सहजासहजी लक्षात येत नाही. या खोल्यांची दारे फार अरूंद आहेत. आतील खोलीत दगडी पीठावर मूर्ती विराजमान होती. हया पीठावर मूर्ती पक्की बसण्यासाठी असणारी छिद्रे स्पष्ट आहेत. अल्लाउददीन खिलजीची स्वारी या भागातून झाली होती. हे पहिले मुस्लीम आक्रमण होते. त्यामुळे यावेळी अथवा नंतरच्या एखाद्या आक्रमणाच्या आषंकेने मूर्ती घाईघाईने लपवली असल्याची शक्यता आहे. हे भुयार नावाचे स्थान आजही यथास्थिती आहे.

## नृसिंहमूर्तीचे वर्णन

नृसिंह हा विष्णुचा अवतार आहे. विष्णुमूर्तींचे तीन मुख्य प्रकार आहेत– स्थानक म्हणजे उभी मूर्ती, आसन म्हणजे बसलेली, शयन म्हणजे निजलेली. या प्रत्येकाचे पुन्हा चार प्रकार आहेत. ते म्हणजे योग, भोग ,वीर, अभिचारक. [8] या षिवाय चल–अचल, पूर्ण–अपूर्ण, उग्र–सौम्य असे आणखी तीन प्रकार आहेत. यातील चलमूर्त्यांचे कौतुकबेर म्हणजे प्रासंगिक पूजेसाठीची मूर्ती, उत्सवबेर म्हणजे मिरवणूकीसाठी मूर्ती, बलिबेर म्हणजे दैनिक पूजोपचारासाठी मूर्ती, आणि स्नपनबेर म्हणजे स्नान घालण्यासाठी मूर्ती असे प्रकार आहेत. नृसिंहमूर्तीबाबत सुदर्षननृसिंहमूर्ती ¼यंत्रस्वरूपात½]dsoyनृसिंह¼ लक्ष्मीरहित~½] लक्ष्मीनृसिंह ¼लक्ष्मीसहित½]स्थौणनृसिंह खांबातून प्रगटताना आणि हिरण्यकष्यपूषी युध्द करणारा½, यानक नृसिंह ¼गरूडावर किंवा आदिषेषावर बसलेला½, गिरीजनृसिंह¼पर्वतातील½, योगनृसिंह ¼योगपट~ट गुंडाळलेला½, विदरणनृसिंह ¼हिरणकष्यपूचे विदरण करणारा½, भोगनृसिंह, शालिग्रामस्वरूपी, तांदुळास्वरूपातील, योगानंदलक्ष्मीनृसिंह, शंखचक्रगदाधारी असे काही प्रकार आहेत. याषिवाय योग नृसिंहमूर्ती ही सात्विकगुणीमूर्ती, आयुधे धारण करणारी राजसगुणी आणि हिरण्यकष्यपूचे विदरण करणारी तामसमूर्ती असे तीन गुणांवर आधारीत प्रकार आहेत.[9]यापैकी मेहकरची नृसिंह मूर्ती स्थानक, विदरण, तामस प्रकारातील आहे. अषी मूर्ती उग्र असते पण मेहकरची मूर्ती शांत वाटते. विदरण पण शांत हेच या मूर्तीचे वैषिष्टय आहे.

ही मूर्ती गंडकी पाषाणातील असून साडेचार फुट उंच व आडीच फुट रूंद आहे. मूर्तीच्या डोक्यातील मुगुट अलंकृत करंडक प्रकारातील आहे. या मुगुटावर केवळ भौमितीय आकृती कोरलेल्या आहेत. चोलकलेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. मूर्तीतील पायांची विषिष्ट ठेवण असते. त्यावर आसन स्पष्ट होत असते. अर्धपर्यंकासन उत्कटित आसन, कुक्कुटासन, पद्मासन,पर्यंकासन, भद्रासन, योगासन, ललितासन, वज्रासन, वीरासन, सुखासन असे आसनाचे अनेक प्रकार आहेत. [10] त्यांपैकी प्रस्तुत मूर्ती सव्य ललितासनास्थ आहे. कारण डावा पाय जेमतेम टेकवलेला आहे आणि उजवा पाय मांडीखाली दाबलेला आहे. त्याचा आकार उलट झाल्याने तळवा पुढे आलेला आहे. उंबरठयावर बसून एका पायाची मांडी घालुन उकिडवा बसल्याचा भास यातून होतो. प्रत्यक्षात या पायाच्या टोंगळयामागील पेचकित हिरण्यकष्यपूचा पाय दुमडुन दाबून धरलेला आहे आणि ही अप्रतिम कारागीरी स्पष्टपणे दाखवण्यात मूर्तीकार यषस्वी ठरलेला आहे. पलीकडून हिरण्यकष्यपूच्या पायाच्या लहान तळवा बाहेर आलेला दिसून येतो. पायांवर कोणत्याही प्रकारची वस्त्रे दिसून येत नाही. पायांखाली म्हणजे पोटरीच्या खालच्या बाजूस मोठा हार पांघुरलेला दिसतो. तो दोन्हीकडून मांडीपर्यंत आलेला आहे. हा हार दुहेरी असून प्रत्येक मणी वेगळा दाखवलेला आहे.

नृसिंहमूर्ती द्विहस्त, चतुर्हस्तअसी साधारणपणे असते. प्रस्तुत मूर्ती अष्टहस्त आहे. हातांमधील शस्त्रांच्या धारणाक्रमाने विभवनाम म्हणजे संध्येतील विष्णुच्या चोविस नावांपैकी एखादे नाव विष्णुमूर्तीस प्राप्त होत असते. या क्रमानुसार अग्निपुराण, पदम्मपुराण, स्कंदपुराण, बृ.हारीत स्मृती, अपराजितपृच्छा, अभिलाषितार्थ चिंतामणी, चतुर्वर्गचिंतामणी, धर्मसिंधु या ग्रंथांनी एकमताने नरसिंह या देवतेचा शस्त्रांचा क्रम चक्र, षंख, पद्म, गदा असा सांगीतलेला आहे.[11] पण मेहकरच्या नृसिंहमूर्तीचा आयुधक्रम तलवार, चक्र, शंख, पद्म आणि गदा असा आहे. हा क्रम प्रस्थापित मानकांपेक्षा वेगळा आहे. तलवार हे शस्त्र धारण करणारी भारतातील ही एकमेव नृसिंहमूर्ती असावी. या मूर्तीचे खालील दोन्ही हात हिरण्यकष्यपूचे उदर विदरण करताना दाखवले आहेत. उजवीकडील खालुन दुसरा हात तलवारीच्या मूठीला हिरण्यकष्यपूच्या मांडीवर दाबून धरलेला आहे. उजवीकडून खालुन तिसरा हात वरदमुद्रेत आहे. चौथा हात चक्रधारक आहे. इतरत्र चक्राच्या धावेवर अषा प्रकारे हात असतात. पण येथील चक्र हातांनी एका दोरीद्वार धरलेले आहे. ही दोरी चक्राच्या मध्यबिंदुतून निघुन बोटांच्या वाकलेल्या अवस्थेत म्हणजे मुठीतून मागील बाजूने बाहेर निघलेली दिसून येते. याबाबतीतसुध्दा ही मूर्ती एकमेवाद्वितीय आहे. डावीकडून वरील हातात शंख असून हा शंख दक्षिणावर्त सुअलंकृत आहे. हयाबाबतीत हा शंख वैषिष्टयपूर्ण आहे. बोटांच्या विषिष्ट ठेवणीत हा शंख धरलेला आहे. बोटे वाकलेली असून ती फार नाजूक आणि नखरेल वाटतात. त्याखालील हातात पद्म असून ही बोटे कर्तरीमुख मुद्रेतील आहेत. प्रत्येक बोटात अंगठी आहे. तळवा आतून खोलगट आहे. त्याखालील हात कौमुदकी गदेच्या मुठीवर घट~ट रोवलेला आहे. हया बोटांमध्ये पकडण्यातील जरब दिसून येते. प्रत्येक हातातील मनगटात कंकणे, बोटात अंगठी आणि बाहुंवर बाजुबंद कोरलेली आहेत. पायांमध्ये तोडे अथवा वाळे कोरलेले आहेत.

चेहरा शांत दिसतो पण उग्ररूपात विस्फारलेला जबडा आहे. उग्र पण शांत हा विरोधाभास तीव्रपणे जाणवतो. खालील जबडयातून तीन दात स्पष्ट दिसतात. मिष्याही कोरलेल्या आहेत. कान सिंहाप्रमाणेच छोटेसे आहेत. डावीकडील कान छोटयाष्या कमळाषी सांधलेला आहे. गळयात हार आहे. याचे दोन पदर असून मध्यभागी मेरूमणी किंवा पदक आहे. छातीवर आयाळ उठावदार आहे. आयाळीची प्रत्येक पाकळी कोरलेली आहे. मागील प्रभावळ आणि आयाळ एकमेकांना जोडल्या जातात. कृष अथवा सिंहकटी आहे. मांडीवर आडवा हिरण्यकष्यपू आहे. याच्या मांडीवर तलवारीचे खालचे टोक आणि हनुवटीवर गदेचे खालचे टोक आहे. एक पाय नृसिंहाने आपल्या उजव्या पायाच्या बेचकीत दाबून धरलेला आहे. या मूर्तीवरील मुगुट करंडक आहे. उजवा हात नृसिंहाच्या कमरेमागून खाली लटकलेला आहे आणि डावा हात स्वतःच्या कमरेवर ठेवलेला दाखवला आहे. कठीमेखला पितांबर आणि कासोटा स्पष्ट दिसतो. गळयातील माळा आणि चेहÚयावरील भाव सुंदर आहे. चेहÚयावर भयाऐवजी एक प्रकारची निष्चिंतता दिसते. हिरण्यकष्यपूच्या मूर्तीच्या चेहÚयावर भय असावयास हवे होते पण नाही. आडवे घेतल्यामुळे डावा हाता लोंबकळता तसेच माळा खाली झुकलेल्या आणि विस्कळीत असावयास हव्या होत्या पण तसे नाही. यांवरून तसेच पोटावर नृसिंहाची ठेवलेली बोटे पहाता ही नृसिंहाने पोट फाडण्यास सुरूवात करतानाच्या अवस्थेचा फोटो असावा असे वाटते. यातील हिरण्यकष्यपू जिवंत आहे हे विषेष ! ही त्रिभंग, सायुध मूर्ती आहे. पायाजवळ दोन पुरूषमूर्ती पद्मासनस्थ, माळ, कुंडल, आणि करंडक मुगुट धारी आहेत. नाक तीक्ष्ण आणि डोळे कमलासमान सुंदर आहेत. या मूर्त्या कोणाच्या असाव्या याचा शोध लागलेला नाही. मूर्तीच्या उजवीकडे मागील बाजुस प्रल्हादाची उभी मूर्ती आहे. हात जोडलेले, करंडक मुगुट, माळी, मोठा हार, तीक्ष्ण नाक आहे. यावरून प्रस्तुत मूर्तीला प्रल्हादवरद लक्ष्मीनृसिंह असे म्हणतात. डाव्या पायाभोवती पीठावर कमळाच्या पाकळया कोरलेल्या आहे. नृसिंहमूर्तीच्या कानात गोल

कुंडले आहेत. कमळावर यवाकृती उंचवटा आहे. तो तिसरा डोळा असावा. डोळे मोठे, बाहेर आलेले असून अधोमुखी आहेत. अंगावर जानवे नाही .

**मूर्तीचा कालखंड**

या मूर्तीचा कालखंड नेमकेपणाने सांगता येत नाही. प्रथमदर्षनी ही मूर्ती उत्तर चालुक्य कालीन वाटते. मूर्तीला जानवे असण्यास प्रारंभ सातव्या शतकानंतर झाला. यावरून तसेच तलवार हे आयुध असणे यावरून मूर्तीचा कालखंड सातव्या शतकाच्या आधीपर्यंत पोहचतो. अल्लाउददीन खिलजीची देवगिरी स्वारी इ.स. तेराव्या शतकाच्या शेवटी आहे. यापूर्वी ही मूर्ती अस्तित्वात होती आणि तेंव्हा एखादे भव्य मंदिर असावे. वाकाटक राजे हे वत्सगोत्री आणि नृसिंहउपासक होते. वाकाटकांच्या प्रोत्साहनाने त्याकाळात या मूर्तीचे निर्माण झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही

**सारांष**

भक्तासाठी म्हणून झालेला विष्णुचा नृसिंहावतार सगुणोपासनेत लोकप्रिय झाला. नृसिंहाच्या अनेक प्रकारच्या मूर्त्या आढळतात. बैठकीच्या प्रकारावरून हातातील आयुधांवरून, आणि अन्य वैषिष्टयांवरून मूर्तीला विविध नावे प्राप्त होतात. मेहकरची नृसिंहमूर्ती प्रल्हादवरद लक्ष्मीनृसिंह आहे. गंडकी षिळेतील, विदरण पण शांत प्रकारातील, उत्कटीत आसनातील, सव्य ललितासनातील, खड~ग, चक्र, शंख पद्म, गदा असा आयुधक्रम असणारी आहे.ही. अनेक अर्थांनी आगळीवेगळी आहे. जानवे नसणारी, कृषकटी, करंडक मुगुट, कर्तरीमुद्राहस्त आणि अभयमुद्राहस्त असणारी ही मूर्ती आहे भव्यता, प्रसन्नता, तेजस्वीता, जागृतता उत्कटपणे जाणवते प्राचीन काळातील ही मूर्ती आपल्या वैषिष्टयांमुळे, कोरीव कलाकुसरीमुळे अप्रतिम आहे मूर्तीषास्त्रज्ञ, पुरातत्वज्ञ, पर्यटक आणि भक्तांच्या आपापल्या मागण्या पूर्ण करणारी ही मूर्ती एक अमूल्य ठेवा आहे.

संदर्भ :—

1½ श्री नृसिंह कोष, खंड तिसरा,लक्ष्मीनृसिंह देवस्थान , नीरानरसिंहपूर, 1996, पृ 172

2½ श्री नृसिंह कोष, खंड पहिला लक्ष्मीनृसिंह देवस्थान , नीरानरसिंहपूर, 1991, पृ 5

3½ डॉ. पूर्वा अष्टपुत्रे, महाराष्ट्रातील नृसिंह मंदिरे — एक शोध, 2015 , पृ 35 ते 37

4½ श्वेताष्वतर उपनिषद, 6.23

5½ सार्थ तुकाराम गाथा, धार्मिक प्रकाषन संस्था , मुंबई , 2010, अ.क्र 574 पृ 139

6½ ॲड रंगनाथ महाराज पितळे, मेहकरचा नृसिंह, लक्ष्मीनृसिंह प्रकाषन, मेहकर,2019, पृ 39—40

7½ उपरोक्त टीप 6, पृ 14 ते 24

8½ डॉ. नी. पु. जोषी , भारतीय मूर्तीषास्त्र , प्रसाद प्रकाषन, पुणे, 2013, पृ 60

9½ डॉ. पुर्वा अष्टपुत्रे, उपरोक्त टीप 3, पृ 35 ते 37

10½ भारतीय संस्कृतिकोष, पृ 505

11½ उपरोक्त टीप 8, पृ 105



# महाराष्ट्रातील प्रमुख बौध्द लेणींचा आभ्यास

प्रा. घाडगे रघुनाथ व्यंकटी,
इतिहास विभाग प्रमुख,
छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब
मो. नं. 9404029571

**प्रस्तावना :—**

सुरुवातीला भिक्खुंना राहण्यासाठी खास सोय नव्हती. सुरुवातीचे भिक्खु रानावनात उघडयावर किंवा झाडाखाली, डोंगरकपारी, गुहेत वगैरे ठिकाणी राहात असत. मगधच्या बिंबिसार राजाने गावापासून फार दूर नाही आणि अगदी जवळही नाही, लोकांना जाण्या येण्यास सोयीस्कर, पण त्याचबरोबर एकांतवासास योग्य(1) अशा आपल्या राजगृहाजवळील वेळूवन विहाराचे धम्मदान तथागतांना आणि त्यांच्या संघाला केले. संघास मिळालेला हा पहिला विहार. त्यानंतर अनेक विहार संघास धम्मदान करण्यात आले. तथागतांनी भिक्खु संघास पाच प्रकारच्या निवासस्थानी राहण्याची सुचना केली होती. ते पाच प्रकार म्हणजे 1) विहार 2) अध्यायोग (शिखर असलेले घर) 3) पासाद (मोठे घर) 4) हम्मीय (घराच्या वरच्या माळयावरची खोली) आणि 5) गुहा. (2)

महाराष्ट्रातील हल्ली फक्त लेण्यांच्या, स्वरुपात असलेल्या "गुहा" अस्तित्वात आहेत. भिक्खुंच्या निवासस्थानाचे इतर प्रकार महाराष्ट्रातून आता नष्ट झाले आहेत.

**गृहितके :—**

1) महाराष्ट्रात प्राचीन काळात मोठ्या प्रमाणावर बौध्द धम्माचा प्रभाव होता.
2) महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण बौध्द लेणी आहेत.

**उद्दिष्टे :—**

1) महाराष्ट्रातील प्रमुख बौध्द लेण्यांचा आभ्यास करणे.
2) महाराष्ट्रातील बौध्द लेण्यांतील रंगकला कशी आहे. याचा आभ्यास करणे.
3) महाराष्ट्रातील प्राचीन लेणींच्या आधारे बौध्द धम्माच्या प्रभावाचा आभ्यास करणे.

भिक्खुंची राहावयाची अशी कायमची सोय झाल्यानंतर, हळूहळू पण निश्चितपणे, ते विहार धम्मकार्याबरोबरच शिक्षण केंद्राचे कार्य करु लागले. मनोरथ पूरणी या ग्रंथात असे म्हटले आहे की, जरी शंभर किंवा हजार भिक्खु विपश्चना (ध्यान) करीत असले तरी जोपर्यंत विद्याव्यासंग नाही, तोपर्यंत आर्य आष्टांगिक मार्गात प्रगती नाही.(3)

सुरुवातीला भिक्खुंचे शिक्षण त्रिपिटकांपुरते मर्यादित असे. पण नंतर त्यांच्या शिक्षणात भाषा, व्याकरण, तर्कशास्त्र, इतिहास, वैद्यकशास्त्र इत्यादींचा समावेश होऊ लागला. त्याचप्रमाणे सुरुवातीला फक्त भिक्खुंच्याच शिक्षणाची सोय होती, पण नंतर उपासकांनाही विहारात शिक्षण देण्याची सोय करण्यात आली. विरोधी पक्षाशी वादविवाद करण्यास सोपे जावे म्हणून अभ्यासक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली. विहारांतील शिक्षण आता 'नवंगा' पुरतेच मर्यादित न राहता उपासकांना चार वेदांचे, सहा अंगांचे, चौदा विद्यांचे, अठरा शिल्पांचे आणि चौंसष्ठ कलांचे शिक्षण देण्यात येऊ लागले.(4)

विहारांचे रुपांतर संघारामात आणि संघारामांचे रुपांतर नालंदा, विक्रमशीला, ओदान्तपुरी, जगद्दयाला, वल्लभी इत्यादी बौध्द विश्वविद्यालयात होऊ लागले. कान्हेरी, अजंठा, वेरुळ इत्यादी महाराष्ट्रातील विद्यालये, नालंदा विश्वविद्यालयासारखी किंवा गुजरातच्या वल्लभी विश्वविद्यालयाइतकी प्रसिध्द नाहीत. पण महत्त्वाची शिक्षण केंद्रे म्हणून निश्चितच ती कार्य करीत होती.

**कान्हेरी :—**

कान्हेरी पर्वताचे नाव तेथील एका शिलालेखात 'कन्हासील पर्वत' असे दिले आहे. तेथे 107 विहार आणि 5 चैत्यगृहे आहेत. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून ते इ. स. 11 व्या शतकापर्यंत म्हणजे तेराशे वर्षे तेथे मधून मधून लेणी तयार करण्याचे काम चालू होते.

38 नंबरच्या लेण्यामध्ये आणि आसपास जवळजवळ 600 फुट लांबीच्या गॅलरीमध्ये विटांनी बांधलेले पण आता उदध्वस्त स्थितीत असलेले अनेक स्तुप आहेत.

23 नंबरच्या लेण्यात चार हात असलेली आणि अकरा डोके असलेली एक मुर्ती आहे. अशा मुर्ती नेपाळ, तिबेट, चीन, कंबोडिया आणि जपान येथे पाहावयास मिळतात. येथील पाण्याचे हौद तसेच लेण्यांच्या बाहेर बसण्यासाठी, दगउी बाके, लेण्यांकडे जाण्यासाठीचे मार्ग, जिने उतरतांना, चढतांना हातांनी धरण्यासाठी खडकांतून कोरुन काढलेले कठडे ही कान्हेरीच्या लेण्यांची वैशिष्ट्ये आहेत. सर्वच संघाराम अध्ययन आणि अध्यापनासाठी प्रसिध्द होते.(5)

**जुन्नर :—**

जुन्नरच्या परिसरात जवळजवळ 400 बौध्द लेणी आहेत. ती इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून इ.स.वी सनानंतर तिसऱ्या शतकापर्यंत खोदली गेली असली पाहिजेत.

**नाशिक :—**

नाशिक जवळ ज्या पर्वतावर बौध्द लेणी आहेत, त्याला तेथील शिलालेखात तिऱ्हूनी किंवा त्रिरश्वी असे म्हटले आहे. नाशिकच्या लेण्यात सातवाहन आणि क्षहरथ राजांनी खोदलेल्या लेण्यांत ऐतिहासिकदृष्ट्या अनेक महत्त्वाचे शिलालेख आहेत. इ.स. चौथ्या शतकानंतर महायानी बौध्दांनी तेथील बऱ्याच लेण्यांतील अंतर्गत भागात बदल करुन बुध्द, बोधिसत्व, अवलोकितेश्वर इत्यादी मुर्ती कोरलेल्या आहेत.

**कार्ले :—**

कार्ल्याच्या चैत्यगृहाची गणना जगातील महत्त्वाच्या वास्तुशिल्पात केली जाते. चैत्यगृहाच्या मंडपाची लांबी 124 फुट 3 इंच, रुंदी 45 फुट 6 इंच आणि उंची 40 फुट आहे.

**अजंठा :—**

अजंठाची लेणी जगप्रसिध्द आहेत. सन 1819 मध्ये मद्रास आर्मीच्या ब्रिटिश शिपायांना प्रथम ती दिसली. इ.स. 1836 मध्ये सर जेम्स आलेक्झांडरने त्या लेण्यांबददलची थोडक्यात माहिती लंडन येथील रॉयल एशियाटिक सोसायटीला आणि बंगाल एशियाटिक सोसायटीला दिली. अजंठा येथे 30 लेणी आहेत. सातमाळा पर्वताच्या निसर्गरम्य परिसरात अर्धवर्तुळाकारात ही लेणी खोदली गेली आहेत.

विध्दानांच्या मते अजंठा येथील 8, 9, 10, 12, 13 आणि 15 (अ) नंबरची लेणी इ. स. तीनशे पूर्वीच्या काळातील आहेत. तसेच अजंठा येथील चित्रांचा काळ खालील प्रमाणे ठरविलेला आहे.

1. 9 आणि 10 नंबरच्या लेण्यांतील चित्रे इ.स. पूर्व 200 ते इ. स. 200 .
2. 16, 17, 4, 6, 11 आणि 15 नंबरच्या लेण्यांतील चित्रे इ. स. 350 ते 500 .
3. 10 नंबरच्या लेण्यांतील खांबावरची चित्रे इ. स. 350 नंतर
4. 1 आणि 2 नंबरच्या लेण्यांतील चित्रे इ. स. 636 ते इ. स. 728. (6)

चित्रांमधील विषय जातक कथांमधून घेतले आहेत. नंतर महायानांच्या काळात प्राणिमात्रांवर करुणा करणाऱ्या बोधिसत्वाला मुख्य विषय ठेवून त्यांच्या आणि उपासकांच्या जीवनातील प्रसंगांची चित्रे काढली आहेत.

**वेरुळ :–**

वेरुळ किंवा एलोरा येथे एकूण 34 लेणी आहेत. त्यापैकी 1 ते 12 बौध्द, 13 ते 29 हिंदू आणि 30 ते34 नंबरची जैन लेणी आहेत. बौध्द लेणी कोरण्याचे काम सर्वात पहिल्यांदा म्हणजे इ. स. 450 च्या सुमारास झाले. आठव्या शतकातही बौध्द लेण्यांत काही खोदकाम झाले असल्याच्या खुणा आहेत.

**पितळखोरा :–**

पितळखोरा येथे 13 लेणी आहेत. औरंगाबादपासून चाळीसगावकडे जाताना 68 किलोमीटर अंतरावर पितळखोऱ्याची सातमल पर्वतात आहेत. लेण्यापर्यंत जाण्यास अजूनही रस्ता नाही. अजंठा सारख्याच अर्धवर्तुळाकार आकाराच्या दरीत ही लेणी खोदली गेली आहेत. दरीतून पाण्याचा ओढा वाहत जातो. एकेकाळी ही लेणी अत्यंत प्रेक्षणीय असली पाहिजेत. चैत्यगृहात बुध्दांची आणि बोधिसत्वांची सुंदर चित्रे काढली आहेत.

**औरंगाबाद :–**

औरंगाबाद, शहराच्या उत्तरेस तीन किलोमीटर अंतरावर औरंगाबादची प्रसिध्द 12 लेणी आहेत. थेरवादी बौध्दांची लेणी इ. स. नंतर दुसऱ्या शतकातील आहेत. महायानी बौध्दांनी पाचव्या शतकात काही जुन्या लेण्यांत बदल करुन नवीन लेणी तयार केली आणि सातव्या शतकानंतर वज्रयानी बौध्दांचे वास्तव्य नवव्या–दहाव्या शतकापर्यंत होते. औरंगाबाद येथील कांही शिल्प फार सुंदर आहेत.

**शिवरळ :–**

शिवरळला एक चैत्यगृह आणि 14 विहार आहेत. वाई जवळची 9 बौध्द लेणी नंतरच्या काळात इतकी बदलली आहेत की त्यांचे मुळ स्वरुप जवळजवळ नष्ट केले गेले आहे. कऱ्हाडपासून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या लखनवाडी येथे 66 लहान लहान बौध्द लेणी आहेत.

**कोल्हापूर :–**

कोल्हापूरपासून पाच मैलांच्या अंतरावर जोतिबाच्या डोंगराच्या पायथ्याशी पोहोळाशेजारी काही बौध्द लेणी आहेत. कोल्हापूरची लेणी इ. स. तिसऱ्या–चौथ्या शतकातील आहेत. त्या लेण्यांपासून जवळच पंचगंगेच्या पैलतीरावर ब्रम्हपूरी नावाचे जून्या काळचे महत्त्वाचे शहर होते. उत्खननात तेथे बौध्द स्तूप, रोमची नाणी आणि ब्रॉझच्या वस्तू मिळाल्या आहेत.

**भाजे :–**

मळवली स्टेशनपासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या भाजे येथे 22 बौध्द लेण्या आहेत.येथील चैत्याचे प्रवेशद्वार खुपच मोठे आहे.

तसेच महाराष्ट्रात कुडा, महाड, सुधागड, नेनावली, शेलारवाडी, कोंडीवते, कोण्डाणे, बेडसा अशा अनेक ठिकाणी बौध्द लेणी सापडतात. त्याचा शोध घेणे व संशोधन करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :–**

1. प्राचीन काळात महाराष्ट्रात बौध्द धम्माचा फार मोठा प्रभाव होता.
2. महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणावर बौध्द लेणी आहेत.
3. महाराष्ट्रात अनेक बौध्द लेणींची तोडफोड झालेली दिसून येते.
4. महाराष्ट्रातील अनेक मुळात बौध्द लेणी असूनही त्यांच्यात बदल केलेला दिसून येतो.
5. महाराष्ट्रातील अनेक बौध्द लेणींमध्ये आकर्षक अशा प्रकारचे रंगकाम केलेले आहे.
6. महाराष्ट्रातील अनेक बौध्द लेणी जगातील पर्यटकांचे आकर्षण आहे.

**संदर्भ सूची :–**

1. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर : भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, पृ.357
2. Sacred Books of the East XII, पृ. 178 ते 179 महावग ख, 30
3. राहूल वालपोल : History of Buddhism in Ceylon, पृ.158, 159
4. आळतेकर, Education in Ancient India, १९५७, पृ. 328 तें 331.
5. Bombay Gazetteer thana Dist. vol, II
6. मुल्कराज आनंद : अक्षरपींहर, पृ. 11

# वडेश्वर मंदिर अंभई

नाव राजेश ईश्वर निर्मळ
बी. ए. व्दितीय वर्ग
इतिहास
सौ.के.एस.के महाविदयालय बीड
मो. 7083283953

औरंगाबाद जिल्ह्यात सिलोड तालुक्यात डोंगरांच्या सानिध्यात अंभई नावाचे एक खेडेगाव बसलेले आहे. हे गाव सिलोड पासुन 39 कि.मी आह. सिलोड येथुन गोळेगाव उंडनगाव खिल्लोड व पांगरी मार्गे अंभई येथे जाता येथे तसेच सिल्लोड येथुनही भराडी मार्गे सुध्दा अंभई येथे जाता येथे. अंभई येथे गावच्या उत्तरेस आर्धा किमी अंतरावर कल्यानिच्या चालुक्य काळातील इ.स.वि.सन 974 ते 1200 एक षिव मंदिर आहे हे षिव मंदिर वटेष्वर आणि वडेष्वर मंदिर या नावाने ही ओळखली जाते.

**मंदिर स्थापत्याची वैशिष्टे**

**उंच जोते किंवा पीठ**

**मंडप व गुड पंडपास जाळीदार व नक्सीकाम असलेल्या शिळांच्या भिंती.**

**भैमितीक व फळाफुलांच्या आकृतीची कलाकुसर**

**मंडपात मध्यभागी नदी मंडप**

**मंदीराला दोन, तीन व क्वचीत चार गर्भगृह.**

**मंदिराचे बांधकाम व त्याचा काळ :– कल्यानिच्या चालुक्य कलेची सर्व वैशिष्टे अंभई येथील मंदिर स्थापत्यात दिसुन येतात. हे मंदिर कल्यानिचा चालुक्य** संम्राट स्वमेस्वर तिसरा याच्या कारकिर्दीत इ.स.वि. सनाच्या 12 व्याषतकात निर्माण करण्यात आली.
मंदिर बांधकामासाठी दगड लालसर आणि थोडासा खिसुर आहे. त्यावर केलेले मुर्तिकाम सुबक झाालेले आढळत नाही.

**मंदिराचा पदविण्यास :–** मंदिर त्रिदल पध्दतीचे आहे. गर्भगृह त्यासमोर अंतराळ व मंडप असा या मंदिराचा पदविण्यास आहे. मंदिर पुर्व भिमुख असुन मंडपाच्या पष्चिम दक्षिण व उत्तर बाजुस गर्भगृहे आहेत. मंदिराची पुर्व पष्चिम लांबी 65 फुट व दक्षिण उत्तर लांबी 50 फुट आहे. चार फुट उुचीच्या जोत्यावर मंदिराची उभारणि करण्यात आलेली आहे. परंतु आज हे जोते पुर्ण पणे जमिनित गाढले गेले आहे. हे मंदिर चालुक्य कालिन मंदिरापैकी मंदिरस्थपत्यांचा एक सुदर नमुना आहे. उमरगा बीड व निलंगा येथी षिवमंदिराचा पदविण्यास आणि अंभई येथील मंदिराचा पदविण्यास समान आहे.

**गर्भगृहे :–**

**मुख्य गर्भगृहे :–** मंदिराला तीन गर्भगृहे आहेत मंडपाच्या पष्चिमेस मुख्य गर्भगृह असुन ते पुर्वाभिमुख आहे. हे गर्भगृह अंतराळाच्या पृष्ट भागापासुन चार फुट नऊ इंच खोल आहे. अंतराळातुन पाच पायऱ्या उतरून गर्भगृहात जाता येते. हे गर्भगृह आठ फुट 8 इंच चौरस आकाराचे आहे. मुख्य गर्भगृह षिववडेष्वर यास अर्पण केलेले आहे.

**दक्षिण गर्भगृह :–** मंडपाच्या दुसऱ्या बाजुस गर्भगृह आहे. हे गर्भगृह विष्णु मंदिर आहे हे गर्भगृह चार फुट दहा इंच चौरस आहे. गर्भगृहाचे प्रवेषव्दार चार फुट उंचिचे व 2 फुट सहा इंच रूंद आहे. व्दारपट्टीवर गणेश षिल्प आहे. हे षिल्प 20 से.मी उंचीचे आहे.

**उत्तर गर्भगृह :–** मंडपाच्या उत्तर बाजुस तिसरे गर्भगृह आहे. हे गर्भगृह ब्रम्हदेवास अर्पण केले आहे या गर्भगृहाचा आकार चार फुट दहा इंच चौरस आहे. त्याच्या प्रवेषव्दाराची उंची चार फुट व रूंदी दोन फुट सहा इंच आहे. गर्भगृहाच्या प्रवेषव्दारावर मातृकांची षिल्पे कोरलेली आहेत.

**मंडप** :— मंदिराच्या तिन्ही अंतराळाच्या समोर मंडप आहे. हा मंडप 34 बाय 354 चौरस फुट आकाराचा आहे. मंडपात 28 स्तंभ ओहत. त्यात मध्येभागी चार स्तंभ आहेत याच चार स्तंभानी मंडपाच्या छताला प्रमुख आधार आहे. मंडपाच्या भोवती दगडीषीळांचे नक्षी काम व मुर्ति काम केलेल्या जाळीदार भींती होत्या या मंडपाची पुर्व पष्चिम लांबी 21 फुट असुन दक्षिण उत्तर रूंदी 17 फुट आहे.

**मुर्ती षिल्प** :— मंदिराच्या बाह्यभागावर गर्भगृह व अंतराळाच्या प्रवेषव्दारावर मोठया प्रमाणात मुर्ति षिल्पे कोरण्यात आली आहेत येथील विविध मुर्तिषिल्पांची संख्या 280 आहे. या पेक्षाही आधिक होती. परंतु आज हि सर्व मुर्तिषिल्पे उध्दवस्थ झाली असुन ती विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. दक्षिण गर्भगृहाच्या बाह्यभागावर एकुण 65 मुर्तिषिल्पे आढळतात. या मध्ये पहिला स्थर हंस षिल्पाचा आहे. याच ठिकाणी किर्ती मुखेही कोरलेली आढळतात. येथे 128 हंस षिल्पे आहेत. उत्तर गर्भगृहाच्या बाह्यभागावर प्रथम हंस स्थर दिसतो या मध्ये 86 हंस आहेत. ज्या दगडावर मुर्ति कोरली आहे त्या दगडावर पायथ्यास हंस षिल्प कोरले आहे. मंडपाभोवती असलेल्या दगडीषिळांच जाळीदार विविध मुर्ति आहेत.

**संदर्भ ग्रंथ** :— **मराठवाडयाचा इतिहास**

# मराठवाडयातील दुर्लक्षित पर्यटन स्थळ–धारासुरचे प्राचीन मंदिर

**डॉ. विठ्ठल व्यंकटराव घुले**
प्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख
राजर्शी षाहु महाविद्यालय
परभणी – 431401

**अ) संपन्न गोदाकाठ :**

मराठवाडयाची भूमी गोदावरीच्या पाण्याने सिंचीत झालेली अतिषय सुपिक जमीन आहे. त्यात परभणी जिल्हा ज्वारीचे कोठार म्हणून प्रसिध्द आहे सातवाहन काळात गोदावरीच्या तीरावर मराठी संस्कृतीची पहाट फुलली सातवाहन काळात गोदावरीच्या काठी पैठण सारखे जागतिक किर्तीचे षहर उदयाला आले याच तीरावर राश्टकूट आणि यादव यांच्या राजवटी नांदल्या गोदावरीच्या तीरावरची संमृध्द खेडी आणि नगरे मराठी संस्कृतीच्या व प्राचीन इतिहासाच्या दृश्टीने अभ्यासनीय आहेत.

**ब) यादव काळ** :

मराठी संस्कृतीच्या दृश्टीने अत्यंत महत्वाचे म्हणजे यादवांनी नर्मदा ते तुंगभद्रा, गोवा ते गोंदिया हा भाग आपल्या सत्तेखाली आणला हाच आजचा महराश्ट्र.

सुदैवाने माझे कार्यक्षेत्र परभणी, पूर्वी गंगाखेडला सेवेत होतो. गंगाखेड हे गंगेच्या काठावर असल्यामुळे त्यास 'गंगाखेड' हे नाव पडले आजही ग्रामीण भागात यास 'खेड' असे म्हणतात. गंगाखेडचा व गंगाखेड परीसारातील यादव कालीन अवषेशाचा अभ्यास करावा असे मनात होते आणि त्या नुसार गंगाखेड जवळच्या धारासूरकडे माझे लक्ष गेले. धारासूर हे गंगाखेड (जि. परभणी) गंगाखेड पासून वायव्येस 14 कि.मी. अंतरावर गोदाकाठी वसले आहे. गोदाकाठावर यादव काळात अनेक मंदिरे उभे राहिले येथे हिंदुची सहा देवळे, मुसलमानाचा एक दर्गा आणि एक धर्म षाळा आहे[1]. या मंदिरांना षास्त्रीय भाशेत उत्तर चालुक्य कालीन मंदिरे तर जनसामान्यांच्या भाशेत हेमाडपंथी मंदिरे म्हणतात अषी मंदिरे गोदाकाठावर धारासूर, महातपूरी, साळापूरी, अषी गावी आहेत. या सर्वाचे सर्वेक्षण आणि अभ्यास होणे गरजेचे आहे त्या दृश्टीने हा प्रयत्न आहे.

**क) धारासुरचे मंदिर :**

**1) मुखमंडप :**

धारासुरचे मंदिर गावच्या पष्चिमेस गोदावरीच्या पूर्व काठावर उंच अधिश्ठानावर वसले आहे. मंदिराला मोठी तटबंदी होती ज्यास यादव कालीन भाशेत 'जगती' म्हणतात. मंदिर पूर्वाभिमुख असून पायऱ्या चढुन गेल्यावर समोर मुखमंडप (पोर्टिको) लागतो मुखमंडपात बसण्यासाठी आसने ( पोडीयम सिट्स) आहेत. येथे गावातील पंचायतीच्या सभा भरत असाव्यात किंवा भक्त विश्राम करीत असावेत येथून आपण सभा मंडपात प्रवेषीतो.

**2) सभामंडप :**

सभा मंडपाला उत्तर आणि दक्षिण बाजूला दरवाजे असून त्यांच्याही समोर अर्धमंडपे आहेत. छताला आधार देण्यासाठी अर्धस्तंभाची उभारणी केलेली आहे. सभामंडप 24 स्तंभावर आधारित आहे हे स्तंभ अतिषय अलंकारीत असून त्यावर देवी देवता वृक्षवली, कौस्तुभ यांच्या आकृती कोरलेल्या आहेत मधल्या चार स्तंभाच्या मध्यभागी गोल षिला असून यास रंगषिला म्हणतात येथे देवतेसाठी नृत्य, नाटय, कथा, कीर्तन, पुराण, प्रवचन, संगीत, वादय अषा आठ रंगाचे आयोजन केले जात असे. धारासूरला चक्रधर स्वामीचे वास्तव्य झाले नाही परंतू चक्रधर अषाच रंगषिलेवर बसत असत.

**3) आलींद :**

यानंतर आलींद (कॉलीडॉर) लागते येथे देवासाठी अंग भोगाची व्यवस्था असे त्यात धूप, दीप, चंदन, विलेपन, वस्त्र, पात्र, नैवेदय, आरती हे अश्ठ भोग देवाला अर्पण केले जात असत (हे अश्ठ भोग भिन्न भिन्न आहेत.)

**4) गर्भगृह :**

गर्भगृहात केषवाची (विश्णुचे रुप) मुर्ती असावी (सध्या ही केषवाची मूर्ती जवळच्या मंदिरात स्थानापन्न केली आहे.) आक्रमकांच्या भितीने ही केषव राजाची मुर्ती लपविण्यात येऊन त्याठिकाणी सध्या महादेवाची पिंड स्थापन केली आहे त्यास गुप्तेष्वर म्हणतात. मंदिरासही सध्या गुप्तेष्वराचे मंदिर म्हणून ओळखले जाते. मुख्य मुर्ती लपवून इतर ठिकाणी स्थानापन्न करण्याचे प्रकार अनेक ठिकाणी झाालेले आहेत. उदा. आन्वा ता. भोकरदन जि. जालना कारण केषवाची एवढी सर्वांग सुंदर मुर्ती दुय्यम मंदिरात असणे संभवत नाही.

**ड) केषवाची मुर्ती :**

मुर्ती काळया गडंकी (षाळीग्राम) दगडापासून बनविलेली आहे. मुर्ती सर्वांगसुंदर, सुबक व रेखीव असून या मुर्तीच्या समोर ऊभे राहिले असता डावीकडच्या खालच्या हातात पद्म वरच्या हातात षंख तर उजव्या बाजूच्या हातात चक्र तर खालच्या हातात गदा असलेली दिसून येते.

'पषचग' मुळे अग्नीपुराण, पद्मपुराण, चर्तुवर्ग चिंतामणी धर्मसिंधु, बृदहरित स्मृती आणि अभिलाशीत अर्थ चिंतामणी (हा कल्याणीचा चालुक्य राजा सोमेष्वर तृतीय यांनी लिहिलेला ज्ञानकोष आहे.) या ग्रंथाच्या आधारावरून ही मुर्ती केषवाची असलेली आढळून येते.[2] आजही या मुर्तीस केषवराजाची मुर्ती म्हणतात. विश्णुच्या अषा चोविस मुर्ती विविध ठिकाणी आढळून येतात. अषा चोविसच्या चोविस मुर्ती अन्वा मंदिरावर आहेत. मुर्तीच्या मस्तकावर मोठी प्रभावळ असून त्यावर दषावतार कोरलेले आहेत. दोन विद्याधर दोन्ही बाजूनी उभी आहेत. मस्तकाच्या पाठीमागे प्रभामंडल असून गळयात कंठ (गवैय) आहे. पद्म घेतलेला हात अभयमूर्देत आहे. कठीवर अलंकारित मेखला आहे. दंडावर केयूर, बाजूबंद (अंगद) आणि पायाजवळ परिवारदेवता आहेत. मुर्ती घडीव आणि पुरूशी सौदर्याचा उत्कृश्ट नमुना आहे.

**इ) बाहयभाग :**

गर्भगृहावरचे षिखर नागरी पध्दतीचे छोटया षिखरांनी वर चढवित नेले आहे. वर आम्लषिला आहे. देवळाच्या खालच्या भागात गजथर कोरलेला असून जंघाभागावर अनेक देवी देवतांच्या, अप्सरांच्या मुर्ती कोरलेल्या आहेत.[3] या अप्सरामध्ये दर्पणसुंदरी, विरहकंठीता, श्रृंगारमग्न, केषविन्याषी, तिलकधारी पत्रलेखिका, विशकन्या अषा विविध अर्विभावात आढळून येतात. या षिवाय आयुधधारी नारी, वादक षिल्प, चंडीका षिल्पे, तांडव नृत्य, पूजा विनावादन ही षिल्पे अत्यंत सुरेख कोरलेली आहेत.

मंदिराच्या जंगाभागावरच मुखमंडपातच्या बाजूस अनेक मिथून षिल्पे मध्यप्रदेषातील प्रसिध्द खजुराहो मंदिरावर कोरलेल्या मिथून षिल्पासारखे कोरलेले आहेत.[4] येथील मिथुन षिल्पे दुय्यम प्रतिच्या कलाकारानं कोरले असावेत. कारण मंदिरावर कोरलेल्या इतर षिल्पांसारखी रेखीवता यात आढळून येत नाही. धारासूर येथील या गुप्तेष्वर मंदिराला 1999 मध्ये महाराश्ट्र षासनाने राश्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर केले आहे.[5]

केषवराजाचे प्राचीन मंदिर जवळच असून या मंदिराच्या बऱ्याचषा दुरूस्ती झााल्यामुळे त्याचा निष्चित काळ सांगता येणार नाही जवळच साळापूरी याही ठिकाणी प्राचीन मंदिर असून त्याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे.

या षोधनिंबधात धारासूरच्या मंदिराची बाहयदृश्टया आढळणारी निरीक्षणे मांडली आहेत. सदरील मंदिर आणि परिसर हा पर्यटकांसाठी अत्यंत विलोभनीय असा आहे. परंतु याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे व मंदिराची एका भागाची पडझड झाल्यामुळे सध्या पर्यटक या

भागाकडे फिरकेनासे झााले आहेत. याकडे षासनाने लक्ष दिल्यास हे परभणी जिल्यातील एक समृध्द पर्यटन स्थळ बनु षकते. याचा षास्त्रषुध्द अभ्यास होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

1) चौधरी कि.का. महाराश्ट्र राज्य गॅझिटीयर, परभणी जिल्हा, प्रका. महाराश्ट्र षासन मुंबई मराठी आवृत्ती 1988 पृश्ठ क्र. 637.
2) खरे ग.ह.मुर्तीविज्ञान, प्रका. भा.इ.सं.म पुणे प्रका. वर्श 1939 पृश्ठ 26
3) घरजाळे षंकर, गोदाकाठचे तिर्थक्षेत्र आणि लोक कथा पीएच.डी. प्रबंध पृश्ठ 92.
4) साळवे पि.पि. संपा. आपला परभणी जिल्हा जुलै 2008 पृश्ठ 10.

# "प्रागैतिहासिक भारतीय सभ्यता: दृश्य कलाकृतींमधील लिंग स्थाननिश्चिती, विशेष संदर्भ भीमबेटका आणि सिंधू संस्कृती"

# ["Prehistoric Indian Culture: Gender Location, with context to Bhimbetka and Indus Civilization"]

स्वाती राजन,
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
टिकाराम जगन्नाथ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
खडकी, पुणे-४११००३

परीषद दिनांक: ०८/०२/२०२०

संक्षिप्त गोषवारा

प्रागैतिहास आणि प्राचीन भारतीय इतिहासाचे पुरातत्त्वीय पुरावे म्हणजे तत्कालिन दृश्य कला म्हणजेच चित्रकला, शिल्पकला, दगडावरील चित्रकला, स्थापत्य, शिलालेख, ताम्रपटे इत्यादी होत. या साधनांच्या आधारे इतिहासलेखन केले जाते. समकालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक मापदंडाचे निकष आणि विश्लेषण लिंग या महत्त्वपूर्ण घटकाद्वारे केले जाते. स्त्रीवादी विकासाच्या टप्प्यांमधील कला क्षेत्र व त्यातील स्त्री चित्रण हा एक महत्त्वपूर्ण चर्चेचा विषय राहीला आहे. प्रागैतिहासिक भारतातील कलाकृतींमध्ये स्त्रीचे स्थान कोणत्या आशयाभोवताली बद्ध केले आहे, याचा विश्लेषणात्मक अभ्यास आणि अन्वयार्थ स्त्रीवादी अभ्यासविषयाचे महत्त्व अधोरेखीत करणारे आहे.

**सूचक शब्द: प्रागैतिहास,** लिंग, स्त्री, स्त्रीवाद, चित्रकला, भित्ती चित्रे (खडकांवरील चित्रकला)

## गृहीतक:

प्रागैतिहासिक भारतीय सभ्यतेतील दृश्य कलाकृतींच्या माध्यमाद्वारे स्त्रीच्या सहभागाची नोंद इंद्रियजन्य सुसज्जता आणि त्या अनुषंगाने येणारे प्रजनन आणि मातृदेवता यांवर केंद्रीत होऊन स्त्रीच्या अन्य सामाजिक-सांस्कृतिक योगदानाप्रती अदृश्यतेची चिकित्सा करण्याचा छोटेखानी आणि प्राथमिक स्वरूपाचा प्रयत्न आहे. स्तंभलेख, मुद्रालेख, शिल्प आणि रेखाटने (चित्र) यांच्या नोंदीतून इतिहासातील स्त्रीचा सहभाग आणि प्रतिनिधित्व यांवर प्रकाश टाकता येतो. कलाकृतींच्या माध्यमांतून आढळणारे स्त्री अस्तित्व, एकसंध अथवा अखंड न आढळता निरनिराळ्या श्रेणींच्या अनुषंगाने अधिक जटिल व व्यामिश्र अशा अन्वयार्थाच्या शक्यता तयार होतात. स्त्री प्रतिमा आणि रेखाटनांचा अभ्यास बहुस्तरीय गतिशिलतेच्या मर्यादांमध्ये होण्याच्या शक्यता संभवतात.

## प्रास्ताविक:

प्राचीन भारतीय कलाकृतींसंबंधीत अभ्यासाच्या दिशांचा विकास होण्याच्या शक्यतांची चर्चा या माध्यमातून होऊ शकते. स्त्रीवादी विचारसरणीच्या विकासाच्या टप्प्यांतील स्त्रीचे कलाकृतींच्या माध्यामातून होणारे चित्रण हा चर्चिला जाणारा महत्त्वपूर्ण विषय राहिला आहे. प्रागैतिहासिक भारतीय काळातील बहुतकरून सर्व कला माध्यमांतून स्त्रीची प्रतिमा इंद्रियजन्य सुसज्ज (विषयासक्त) अशी दर्शविली गेली आहे. १९ व्या शतकापासून पुढे सामाजिक-सांस्कृतिक आक्षेपार्ह विषय म्हणून त्याचा अभ्यास केला जाऊ लागला. समकालीन विश्वात स्त्री चित्रणाविषयीच्या कथानकांमध्ये मूलभूत बदल होत गेले आणि अधिक अर्थपूर्ण आकृतीबंधात स्त्री-चित्रण साकारले जाऊ लागले. भौतिक कला-कृतींमधून साकार झालेली स्त्री-चित्रणे ही स्त्रीच्या स्थानाविषयीचे ऐतिहासिक प्रतिनिधित्व करतात.

प्रस्तुत संशोधनात प्रागैतिहासिक भारतातील कला-कृतींतून हाताळले गेलेले स्त्रीसंबंधी विषय आणि त्यांच्या संदर्भ चौकटींच्या आधारे स्त्री प्रतिमांसंबंधी प्रश्नांचे विवेचन प्राधान्याने करून त्यामागील विचारधारांचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. प्रागैतिहासिक कला-कृतींच्या प्रस्थापित अभ्यासपद्धतीच्या पलीकडे अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकून अन्वयार्थाच्या कक्षा रूंदावत नेत मानवी जीवनाशी निगडीत समतेचे मूल्य केंद्रस्थानी ठेवणे हा या अभ्यासाचा मूलाधार आहे.

**भारतातील प्रागैतिहासिक आणि प्राचीन कालखंडातील स्त्रीची दृश्यमानता (visibility):**

मानवी समाजाची जोपासना व जपवणूक ही, स्त्रीतील सहनशिलता व स्त्री जीवनाशी निगडीत अनेक पैलूंशी संबंधीत आहे. स्त्रीचे सहनशीलतेचे अंग हे अतर्क्य आहे. स्त्रीत्वाचा स्थितीदर्शक गर्भितार्थ विशिष्ट कालखंडातील दृश्यकला-कृतींच्या माध्यमातून मांडला जाऊ शकतो. या संदर्भात साहित्य, कला, मूर्तीशास्त्र, स्तंभलेख, स्थापत्य आणि धार्मिक हस्तलिखिते यांचा समावेश होतो. कारण या माध्यमातूनच समाजाचे, समाजस्थितीचे, संस्कृतीचे दृश्य प्रतिनिधित्व करण्याची प्रथा विकसन पावली. कोणतीही कला अथवा कलाकृती सामाजिक-सांस्कृतिक व्यवस्थेतील प्रवृत्ती, अभिमुखता (orientation), पूर्वग्रह (biases), स्वभाववैशिष्टे अधोरेखित करत असतात. एका अर्थी सर्व कलाकृती त्या त्या समाजाचे प्रतिबिंबच असते. म्हणूनच प्रागैतिहासिक आणि प्राचीन भारतातील स्त्रीचे स्थान व स्त्री भूमिकांचा अभ्यास करण्यासाठी कला, मूर्ती, स्थापत्य, शिलालेख, खडकांवरील चित्रकला यांसारख्या प्रभावी माध्यमांचा उपयोग केला जाऊ शकतो. कोणत्याही स्वरूपाची कला-माध्यमे ही मानवी सामाजिक-सांस्कृतिक प्रवृत्ती, समाजव्यवस्था आणि स्वभाववैशिष्टे यांच्याशी दृढपणे जोडली गेलेली असतात.

प्रारंभिक इतिहास काळात, विशेषतः प्रागैतिहासिक काळात चितारलेली गुहांमधील चित्रे म्हणजे, मानवाच्या उत्क्रांत अवस्थेत मानवाने विकासाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल होते, असे मानले जाते. (Misra, 2001) .या दृष्टिकोनातून, गुहांमधील चित्रकारीताचा प्रारंभिक टप्पा म्हणून शोध घेतल्यास असे ध्यानात येते की, काही अपवाद वगळल्यास लिंग ओळखीतून महत्त्वपूर्ण काही अर्थांचा शोध घेणे कठीण होते, कारण भिंतींवर भौमितीय आकृत्यांच्या रेखाटनातील रेखाकृतींमध्ये लिंग दृश्यमान नसते. परंतु जगभरातील सर्वसाधारणपणे खडकांवरील चित्रकलांमध्ये प्रजनन आणि त्याच्याशी निगडीत तत्त्वप्रणाली चित्रीत केल्याचे दाखले मिळतात. (Kleiner, 2008)

भारतीय संस्कृतीच्या संदर्भात प्रागैतिहासिक काळापासून मातृदेवता आणि नंतर सिंधू संस्कृतीमध्ये मातृदेवतेशी निगडीत असलेल्या संकल्पनेचा विस्तार आणि विकास आढळून येतो. (Mathpal, 1984, Kamat 1997) सिंधू खोऱ्याच्या सभ्यतेत चिकनमातीच्या मूर्ती म्हणजे छोटेखानी स्त्री प्रतिमा, कांस्य शिल्पांच्या आणि शिक्यांवर असलेल्या प्रतिकात्मक दर्शवलेली चित्रे यांची साक्ष देतात. (Mcintosh, 2008) वैदिक कालखंडात कला ही उपासना आणि अध्यात्माचे माध्यम होते. पावित्र्य, ऋचा, ग्रंथ या संकल्पनांचा वापर आर्यांच्या काळापासून सुरू झाला. पहिले भाषिक अभिलेख ऋग्वेदकाळातील उपलब्ध झाले आहे. (Khanna, 2007) उपलब्ध पुराव्यांच्या अहवालांनुसार या काळातील कला-कृतींची निर्मिती खूप मर्यादित होती, असे दिसते. पुढे अजिंठा आणि वेरूळ येथाल लेण्यांमधून दिसणाऱ्या भित्तीचित्रांमध्ये धार्मिक विचारांच्या संवर्धनासंबंधी स्त्री प्रतिमा सुशोभित, आकर्षक, मोहक आणि भव्य आहेत. या लेण्यांमधून दिसणाऱ्या भित्तीचित्रांचा स्त्रीवादी परीप्रेक्ष्यातून झालेल्या अभ्यासांद्वारे प्राचीन भारतातील स्त्रीची स्थाननिश्चिती अधिक दृश्यमान होते आणि समकालीन लिखित पुराव्यांच्या आधारे विस्तृत विश्लेषणात्मक अभ्यासाच्या व्याप्तीस सखोलता प्राप्त होते.

**भीमबेटका: स्त्रीचित्रांमधील प्रतिमा**

भीमबेटका गुहांमधील चित्रांचे, अथवा सिंधू खोऱ्यातील संस्कृतीमध्ये सापडलेल्या टेराकोटाच्या मूर्ती, शिक्के आणि कुंभारकाम यांचे स्त्रीवादी सिद्धांकनांच्या आधारे परीक्षण कुतूहल निर्माण करणारे आहे. भीमबेटका येथील प्रतिमांचे विषय प्रामुख्याने 'प्रजनन क्षमता' होय. स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी चित्रे खूप कमी आहेत. प्रजनन संबंधी विषय गर्भवती स्त्रीच्या प्रतिमांद्वारे ओळखली जाऊ शकतात. या गुहेतील चित्रांविषयी सखोल चिंतन मठपाल यांनी त्यांच्या 'प्रीहिस्टोरीक रॉक आर्ट ऑफ भीमबेटका', या ग्रंथात केले आहे. पुस्तकाच्या पूर्वार्धात रेखांकनाची छायाचित्रे तर प्रत्येक रेखांकन प्लेटचे विवेचन ग्रंथाच्या उत्तरार्धात केले आहे. विशेषतः पूर्व-ऐतिहासिक काळातील मुख्य ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य प्रदेशातील भीमबेटकाच्या भित्ती चित्रांशी संबंधित आहे. दुसऱ्या एका प्रतिमेत एक स्त्री विश्रांतीच्या आसनावस्थेत दाखविली आहे ती सुद्धा गर्भवती आहे, हे तीच्या शरीररचनेतून स्पष्टपणे दिसते. उर्वरीत चित्रांचा आशय

विस्तृतपणे पुरूषकेंद्री असून पुरूष वर्चस्वाचे प्रतिनिधित्व करणारे आहे. पुरूष हा वर्चस्ववादाचे प्रतिनिधित्व करणारा सामर्थ्यशाली, जोमदार, जो जगण्यासाठी शिकार आणि अन्न गोळा करणारा असे चिन्हांकीत केले आहे. याशिवाय अलौकीक वीरपुरूष असेही चित्रण केलेल्यासंबंधीची चर्चा मठपाल यांनी केली आहे. (Mathpal, 1984) तर, उलटपक्षी स्त्रीला गर्भवती स्थिती आणि प्रासंगिक दिनक्रमांमध्ये बद्ध केल्याचे मठपाळ यांनी प्रतिपादन केले आहे. (Mathpal, 1984) दुसरी आणखी एक प्रतिमा मातृदेवतेची असून त्यात स्तनांचा आकार शरीराच्या आकारबद्धतेपेक्षा अधिक मोठा करून त्यातून दुधाचे कारंजे पृथ्वीवर पडत असल्याचे दर्शविले आहे. अशाप्रकारच्या मातृदेवतांच्या प्रतिमा प्राचीन भारतातील चित्रणांमध्ये आढळतात. प्रागैतिहासिक कालखंडातील स्त्रीला शिकार आणि अन्न गोळा करण्याच्या कामांमधून वगळले जाऊन केवळ त्यांची प्रजननक्षमता व त्यास अनुसरून आवश्यक उर्जा दर्शवली गेली आहे. कामत यांनीही मठपाल यांच्या मांडणीस दुजोरा मिळतील अशी मांडणी केली आहे. सारांशरूपाने, प्रागैतिहासिक काळातील खडकांवरील चित्रणांमधून समाजातील स्त्रीचे स्थान फारसे महत्त्वाचे नसून केवळ पुनरूत्पादन करणारी मानवशक्ती, तीच्या वास्तव आणि तथ्यात्मक अस्तित्वाच्या ओळखीपेक्षा अधिक साजरी केली जाते.

## सिंधू संस्कृती: मातृदेवता, जन्म देण्याच्या अदभूत सामर्थ्याचे दैवीकरण

प्राचीन भारतातील पहिली संस्कृती म्हणजे सिंधू खोऱ्यातील संस्कृती होय, ज्याठिकाणी टेराकोटाच्या मूर्ती, शिक्के आणि कुंभारकाम अशा विविध तंत्रज्ञानातून कलात्मक नावीन्यपूर्ण निर्मितीचा विकास झाला. पुरातत्त्व सर्वेक्षणातून विविध प्राकारचे शिक्के आणि टेराकोटाच्या मूर्ती सापडल्या आहेत. या मूर्तींमध्ये नग्न मातृदेवतांचे वारंवार चित्रण केले गेले. (Coburn 1991) या संस्कृतीतील स्त्रीचित्रणांचे शिक्के आणि टेराकोटाच्या मूर्ती असे दोन भागांत वर्गीकरण केले जाते. लैंगिक अवयव, जड स्तन आणि रूंद नितंब अधिक चित्तवेधक अशा नग्न स्त्री आकृती (प्रतिमा) सापडल्या आहेत. (Muesse, 2011) चिकणमातीचे लहान पुतळे स्त्री लैंगिकता चिन्हांकीत करण्याशी निगडीत असण्याचे कारण असे असावे की, जन्म देण्याचे सामर्थ्य हे केवळ स्त्रीला निसर्गाकडून प्राप्त झालेले वरदान आहे. अशाप्रकारे लैंगिकता चिन्हांकीत करण्याची मीमांसा ही स्त्रीकडे असणाऱ्या जन्म देण्याच्या अदभूत सामर्थ्यात आहे आणि त्याचे दैवीकरण करून पुजण्याची प्रथा सुरू झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातून अधिक ठळकपणे मातृदेवता या संकल्पनेचा जन्म झाला असावा. लैंगिक उपासना ही फक्त काही स्त्री देवतांशी संबंधीत असून, तीचा अर्थाअर्थी सामान्य स्त्रीच्या जीवनाशी काहीएक संबंध स्थापित केला जाऊ शकत नाही. स्त्री नर्तकी हे कांस्य शिल्प पुरूषांच्या करमवणुकीशी स्त्रीच्या गुंतवणुकीचे प्रतिनिधित्व करणारे आहे. नर्तकीचे सडपातळ शरीर हे कदाचित वय हा घटक असावा. किशोरवयीन मुलीसारखे तीचे शरीर दिसते. मार्टीन यांनी नमूद केल्यानुसार, जगभरातील असंख्य ठिकाणी सिंधू संस्कृतीच्या काळात असलेली लैंगिक उपासना खूप लोकप्रिय होती.

## निष्कर्ष:

मानवी संस्कृतीची गतिशिलता अधिक सामर्थ्यशाली करण्यात स्त्रीची भूमिका महत्त्वपूर्ण असते. आळतेकरांच्या मते, ‘एखाद्या सभ्यतेचा आत्मा समजून घेण्यासाठी आवश्यक श्रेष्ठता व मर्यादा यांचा साकल्याने अभ्यास त्यांमधील स्त्रीच्या स्थानाने निश्चित होतो.’ (Altekar, 1938) ‘प्रारंभापासून, सामाजिक रचना स्त्रीभूमिका आणि स्थाननिश्चिती यांमध्ये स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी जशी सक्रीय राहीली, त्याप्रमाणेच काळाच्या ओघात देशाच्या प्रगतीत अडचणी निर्माण झाल्या आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागले. आहे. प्राचीन भारतीय ग्रंथांनी स्त्रियांच्या दृश्यमानतेवर लक्ष केंद्रीत केले, तर इतिहासकारांनी भूतकाळाची पुनर्रचना करतेवेळी स्त्रियांसाठी काही निश्चित अवकाश निर्माण केला आणि विशिष्ट मापदंडांच्या आधारे स्त्रीची स्थाननिश्चिती केली गेली.’ (Chakravarti Uma and Roy Kumkum, 1988) खडकांवरील चित्रकला, शिल्पकला आणि स्थापत्य यांसारख्या भौतिक माध्यमांच्या अनुषंगाने उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांचा युक्तीवादाची व्याप्ती वाढवत नेली, तर हे स्पष्ट होते की, भीमबेटका येथील स्त्री प्रतिमा आणि सिंधू संस्कृतीतील टेराकोटाच्या छोटेखानी मूर्त्यांद्वारे स्त्रीच्या सहभागाची नोंद इंद्रियजन्य सुसज्जता आणि

त्या अनुषंगाने येणारे प्रजनन आणि मातृदेवता यांवर केंद्रीत होऊन स्त्रीच्या अन्य सामाजिक-सांस्कृतिक योगदानाप्रती अदृश्यतेची प्रचिती येते. भारताच्या इतिहासातील घडामोडींद्वारे स्त्रीकेंद्रीत अभ्यासप्रणाली स्त्रीचे सामाजिक-सांस्कृतिक स्थान अधोरेखीत करून तीचे दृश्य आणि अदृश्य अस्तित्वाचा शोध घेण्याच्या प्रक्रियेचे सखोल विश्लेषणात्मक विवेचन करून क्लिष्टता आणि गुंतागुंत याची सोडवणुकीसाठी बद्ध राहते.

**संदर्भ :**


**1.** Altekar, A. S., 1938, 'The Position of Women in Hindu Civilization: From Prehistoric Times to the Present Day', Banares Hindu University Press, India.

**2.** Chakravarti Uma and Roy Kumkum, 1988, 'In search of our past: A Review of the limitations and possibilities of the Historiography of Women in Early India', Economic and Political Weekly, Vol. 23, no. 18, pp WS2-WS10.

**3.** Coburn , Thomas B. 'Encountering the Goddess: A Translation of the Devi Mdhatmya and a Study of Its Interpretation. SUNY Series in Hindu Studies. Wendy Doniger, editor. Albany, NY: State University of New York Press, 1991. (Published in India by Sri Satguru Publications, Delhi, 1992)

**4.** Kamat, L. K. 1997, 'Prehistoric Rock Paintings of Bhimbetaka' First Online: January 01, 2009.[ http://www.kamat.com/kalranga/rockpain/betake.htm, accessed 01/02/2020]

**5.** Kleiner Fred S., 2008, art through the Ages: A Global History: Volume II: 2, Wordsworth Publishing Co. Inc. 13th Ed.

**6.** Marshall John, 1996, Mohenjo-Daro and Indus Civilization: being an official Account of Archeological Excavations at Mohenjo-Daro carried out by the then Government of India between years 1922 and 1927. New Delhi: Asian Educational Services.

**7.** Mathpal Yashodhar, 1984, Prehistoric Rock Art of Bhimbetka, New Delhi: Abhinav Prakashan. [books.google.co.in/books, mathapal y; Accessed on 29-01-2020]

**8.** Mcintosh Jane R., 2008, 'Understanding Ancient Civilization: The Ancient Indus Valley', New Perspectives, USA:ABC-CLIO Inc.

**9.** Misra V. N., 2001, 'Prehistoric Women Colonization of India', Indian Academy of Science, 26 (4), 491-531.

**10.** Muesse Mark W., 2011 'The Hindu Traditions: A Concise Introduction', Fortress Press Pennsylvania.


**Swati Rajan, Mb. 94422357763**
**swatipungaliya@gmail.com**
**A/8, Surobhi Enclave, Opp. Cotton World,**
**Nagaras Road, Aundh, Pune-411007**

**"प्रागैतिहासिक भारतीय सभ्यता: दृश्य कलाकृतींमधील लिंग स्थाननिश्चिती, विशेष संदर्भ भीमबेटका आणि सिंधू संस्कृती"**

- स्वाती राजन, टि. ज. महाविद्यालय, पुणे

["Prehistoric Indian Culture: Gender Location, with context to Bhimbetka and Indus Civilization"]

**Bhimbetaka:**

**1**



Figure - 1 Venus of Bhimbetaka



Figure - 2 Seated woman of Bhimbetaka




Figure -3 A Family Scene with a pregnant woman

Figure - 1 Venues of Bhimbetaka, reproduction of Yashodhar Mathpal with Brush on paper, 1984 source Mathpal, 1984
Figure - 2 Seated Woman, reproduction of Yashodhar Mathpal with Brush on paper, 1984 source Mathpal, 1984
Figure - 3 A Family Scene with a pregnant woman, handmade sketch, Malla 2013

**“प्रागैतिहासिक भारतीय सभ्यता: दृश्य कलाकृतींमधील लिंग स्थाननिश्चिती, विशेष संदर्भ भीमबेटका आणि सिंधू संस्कृती”**

- स्वाती राजन, टि. ज. महाविद्यालय, पुणे

[“Prehistoric Indian Culture: Gender Location, with context to Bhimbetka and Indus Civilization”]

**Bhimbetaka: 2**





Figure – 4 Woman with Animals




Figure - 5 Mother goddess

Figure - 4 Woman with Animals or pregnancy, Drawing on paper By Kamat 1997, Prehistoric cave painting, Bhimbetka
Figure - 5 Mother Goddess, Drawing on paper by Kamat 1997, Prehistoric cave painting, Bhimbetka originally photographed and kept in the Tribal Museum Chindwara
Source, Figure – 3 and 4- http://www.kamat.com/kalranga/rockpain/betaka.htm

**“प्रागैतिहासिक भारतीय सभ्यता: दृश्य कलाकृतींमधील लिंग स्थाननिश्चिती, विशेष संदर्भ भीमबेटका आणि सिंधू संस्कृती”**

- स्वाती राजन, टि. ज. महाविद्यालय, पुणे

[“Prehistoric Indian Culture: Gender Location, with context to Bhimbetka and Indus Civilization”]

**Image 3: Sindhu Valley Civilization**



Figure – 6 Terracotta Figurine of Indus Valley



Figure – 7 Seals of Animate Motifs

Figure - 6 Terracotta figurine of woman, 7000 BCE to circa 2500 BCE, Mehrgarh (Pakistan)
Source- https://toranas.wordpress.com/tag/mehrgarh/
Figure -7 Stone seals inscribed with animals and Indus script. Harappan Civilization, 3000-1500 BC
Source- http://www.thenagain.info/WebChron/India/Harappa.html

# देवणी गावातील नागशिल्पे

**कु.शिवणखेडे माया लक्ष्मीकांत**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

लातूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण तसेच ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक प्राचीन वारसा लाभलेले देवणी हे गाव आहे. या गावाचा इतिहास जरी अज्ञात असला तरी गावामध्ये अनेक ऐतिहासिक अवशेष विखुरलेल्या अवस्थेत पहावयास मिळतात. पुरातत्त्वीय साधन म्हणून तत्कालीन शिल्प आपणास मार्गदर्शन करत असतात. ही शिल्पे देवदेवता, वीर, प्राणी, अप्सरा, सती जाणाऱ्या स्त्रिया यांचे शिल्पीत केल्याचे दिसते.

मंदीर, बारवा, प्राचीन मध्ययुगीन वास्तुच्या सजावटीसाठी प्राणी, पक्षींची शिल्पे कोरली जातात. पण कधी–कधी पूजेसाठी अनेक स्वतंत्र प्राण्यांची शिल्पेही आढळून येतात. प्राणी शिल्पात सर्वत्र आढळणारे प्रतिक म्हणजे नाग किंवा सर्प. नाग हे जल, पुनर्जन्म, सृजनशीलतेचे प्रतिक आहे असे समजले जाते. तसेच तिरस्कार व मृत्यू या वाईट गोष्टींचेही प्रतिक समजले जाते. नाग हे अनेक देवतांचे आयुध आहे. त्याचप्रमाणे शिव, पार्वती, गणपती, भैरव, चामुंडा, गौतम बुद्ध, महावीर, पार्श्वनाथ, वृषभनाथ इ. देवतांसोबत तो पहावयास मिळतो.

ब्राम्हण, जैन तसेच बौद्ध या धर्मांत नागाला महत्वाचे स्थान आहे. नाग हे सर्पपूजक मानव असावेत असे फर्ग्युसन आणि होल्डहॅम यांचे मत आहे. सर्व हे नागांचे वंशचिन्ह असावे.[1] नागपूजा किंवा सर्पपुजा हा पंथ वैदिक काळात अस्तित्वात होता. गृहसुत्रात श्रवण किंवा श्रवणकर्म हा विधी यास 'सर्पबली' हे नाव आढळते.[2] नागाच्या सर्वच गोष्टी अद्‌भूत असतात. सापाच्या देहात देवाचे किंवा भूताचे वास्तव आहे किंवा तो स्वयंभेद देव आहे किंवा तो एखाद्या देवाचे प्रतिक आहे.[3] अशा समजुतीने मानव कुलांनी सर्प हे दैवत बनवले. सर्प हा वारुळात राहतो आणि वारुळ हे या देवतेचे प्रतिक मानले आहे.

नागशिल्प हे प्रामुख्याने दोन प्रकारचे पहावयास मिळतात. नागाची मानवाकारात मूर्ती समोर असते आणि त्यामागे वेटोळे घातलेला सर्प असतो. नागमूर्तीच्या डोक्यावर सर्पाने फणा धरलेला असतो. दुसऱ्या प्रकारात नागाचे कमरेपर्यंत शरीर हे मानवी असते आणि कमरेखाली सर्पाचे असते. मात्र नागफणा असतो. एकच शिळेवर कोरलेल्या नागनागिणीच्या शिल्पास आपण 'नागकल' किंवा 'नागदंपती' म्हणतो.[4]

देवणी गावात ईच्छापूर्ती मंदिर, रोकडोबा मंदिर, महादेव मंदिर इ. ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपातील चार नागशिल्पे आढळून आले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात या देवणी गावातील नागशिल्पांचे संशोधन केले असून हे संशोधन प्रथमतःच उजेडात येत आहे.

**उद्दिष्ट्ये**

1) देवणी येथील नागशिल्पांचा अभ्यास करणे, त्यांचे वर्गीकरण करणे.

2) नागशिल्पांच्या माध्यमातून देवणी गावातील शिल्प संस्कृती समजण्याचा प्रयत्न करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, संदर्भ, सर्वेक्षण आदी संशोधन पद्धतीचा आधार घेतला आहे व प्राथमिक दुय्यम साधने वापरली आहेत.

**नागशिल्पे**

**1) नागशिल्प क्र.1 (छायाचित्र क्र.1 पहा)**



हे नागशिल्प ईच्छापूर्ती हनुमान मंदिराच्या सभामंडपाच्या बाह्य भिंतीलगत अर्धभिंतीला चिटकून ठेवलेले आहे. हे शिल्प सपाट शिळेवर कोरले असून 'नागकल' अथवा 'नागदंपती' या स्वरूपातील असल्याचे स्पष्ट दिसते. या नागकल वरील कोरले गेलेले खवले किंवा रेषा ही स्पष्ट स्वरूपात दिसतात. या शिल्पांची उंची 86.36 से.मी. तर रुंदी 35.56 से.मी. आहे. या नागदंपतीचे मुख्य वरच्या दिशेला आहे. नागाच्या शरीराचा आकारही मोठा असून अत्यंत सुबक पद्धतीने हे शिल्पांकन केले आहे.

**2) नागशिल्प क्र.2 (छायाचित्र क्र.2 पहा)**



हे शिल्प रोकडोबा मंदिराच्या सभामंडपात गर्भगृहाच्या बाह्य बाजूस डाव्या बाजूला गर्भगृहाच्या भिंतीला चिकटून आहे. हे शिल्प सपाट शिळेवर कोरले आहे. या शिळेवर कोरला गेलेला नाग हा वेटोळ्यांनी युक्त दिसतो. तसेच या नागाचे मुख वरच्या दिशेला असून डोक्यावर सात फणे आहेत. स्थानिक लोकांनी मूर्तीची पूजा करताना मूर्तीला शेंदूर तसेच हळदी–कुंकू लावले आहे, त्यामुळे मूर्ती जीर्ण झालेली आहे. तरीही या नागाचा आकार मोठा असल्याचे स्पष्ट दिसते. या शिल्पाची उंची 91.44 से. मी. व रुंदी 35.56 से.मी. आहे.

**3) नागशिल्प क्र.3 (छायाचित्र क्र.3 पहा)**



देवणी या गावाच्या मध्यवर्ती भागात यादवकालीन महादेव मंदिर आहे. या मंदिराचा केवळ गर्भगृहाचा भाग सध्या मूळ रुपात असून बाकी सभामंडप हा आधुनिक पद्धतीने बांधला आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख असून देव नदीच्या काठावर आहे. मंदिर परिसर अत्यंत रमणीय असून आजूबाजूला सर्वत्र यादवकालीन स्तंभ, मूर्तीशिल्प विखुरलेले आहेत. या मंदिराच्या सभामंडपात हे नागशिल्प भिंतीला चिकटून आहे. या शिल्पाची उंची 106.68 से.मी. व रुंदी 37.5 से.मी. आहे. हे नागशिल्प सपाट शिळेवर कोरला असून यावर कोरला गेलेला नाग हा उभ्या स्वरूपाचा आहे व नागाच्या डोक्यावर पाच फणे आहेत. स्थानिक लोकांनी या मूर्तीची पूजा केल्याचे दिसते. त्यामुळे या नागाचे मूळ सौंदर्य स्पष्ट काही अंशी कमी झाले आहे. या नागशिळेला सध्या स्थानिक गावकऱ्यांनी बंद जाळीचे आवरण बसवले आहे.

**4) नागशिल्प क्र.4 (छायाचित्र क्र.4 पहा)**

हे नागशिल्प शंकरप्पा मठामध्ये ओट्यावर आहे. या शिल्पाची उंची 60.96 से.मी. व रुंदी 50.8 से.मी. आहे. हे शिल्प सपाट शिळेवर कोरले असून नागदंपती या स्वरूपात असल्याचे स्पष्ट दिसते. या शिल्पाचे विशेष असे वैशिष्ट्य म्हणजे नागदंपती द्विमुखी आहे. त्याचबरोबर नागदंपतीच्या एक लहान आकाराचा वेटोळे घातलेला नाग आहे. या नागाचे मुख वरच्या बाजूस आहे. या शिल्पाची झीज झालेली दिसते. त्याचसोबत देवणी गावातील इतर शिल्पांइतके हे नागशिल्प सुबक व रेखीव दिसत नाही, ते अलीकडच्या काळातील असावे असे वाटते.



**समारोप व निष्कर्ष**

1) प्राचीन काळापासून भारतात नागपूजेचे अस्तित्व दिसून येते. नाग हा प्राणी आहे. त्याप्रमाणे नागवंशीय लोकही आहेत. आधुनिक काळातही नागपूजेचे अस्तित्व समाजात दिसून येते. देवणी गावातही नागपूजेची परंपरा असल्याचे प्रस्तुत नागशीळेवरून दिसून येते.
2) देवणी गावात विखुरलेले शिल्पावशेष आणि अनेक पूर्व मध्ययुगीन, मध्ययुगीन मंदिरावशेष यावरुन देवणी गावाचे राजकीय, सांस्कृतिक महत्त्व प्राचीन, मध्ययुगीन काळात असावे असे लक्षात येते.
3) देवणी गावातील नागशिळेबाबत आजवर कोणीही संशोधन केले नसल्यामुळे हे संशोधन करण्याचा प्राथमिक प्रयत्न केला आहे. त्याअनुषंगाने या नागशिळेच्या कालखंडाबाबत पुढील अभ्यास राहणार आहे. तरीही या शोधनिबंधाच्या माध्यमातून नागशिळाचे सद्यःकाळातील स्थान, त्यांचे वैशिष्ट्ये, मोजमापे, नागपूजेचे संदर्भ आणि देवणी गावाचा सांस्कृतिक, राजकीय इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला आहे.
   या संशोधनातून काही निष्कर्ष समोर आले आहेत. ते पुढीलप्रमाणे

देवणी गावातील नागशिळेकडे केवळ पूजाविधी किंवा नागदेवता म्हणून मर्यादित उद्देशाने पाहिले जाते. या नागशिळेचे शिल्प म्हणून अनन्यसाधारण महत्व आहे हे गावकऱ्यांना पटवणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) जोशी नि.पु., 'भारतीय मूर्तीशास्त्र', नागपूर, 1979, पृ.316
2) जटसा हरिराम, 'भारत में नागपूजा और परम्परा', सन्मार्ग प्रकाशन, दिल्ली, 1882, पृ.33 ते 36
3) डांगे सदाशिव, 'वारुळ प्राचीन संकेत', विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक, 1988, पृ. 1 ते 7
4) माया पाटील, 'मंदिर शिल्पे', मुंबई, 2014, पृ.123 ते 124

# मंदिर व मुर्तीशास्त्र

**डॉ. शिला स्वामी**
मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख
श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुम
ता. उमरगा, जि. उस्मानाबाद.

**श्री. सुर्यवंशी सुनिल सुधाकरराव**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग.
उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :–**

भारतीय संस्कृती ही धर्मिकतेला महत्व देणारी आहे. प्राचीन कालखंडामध्ये ऐतिहासिक स्थापत्य कलेला सुरुवात झाली. भारतात मंदिर बांधण्यास गुप्त काळात खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. 6 व्या शतकात झांशी जवळील देवगळ येथील गुप्त कालीन विष्णु मंदिर हे या काळातील मंदिर स्थापत्यातील नमुना आहे.

''देवस्य देवनाम वा आलयः इति देवालयः'' असं म्हटलंय. देवाचं निवासस्थान! देवालय किंवा मंदिरे या वास्तुच्या नावावरुन त्यांचा उद्देश स्पष्ट होतो. देवालय या वास्तुच्या खुप आधी मुर्ती निर्माण झाल्या. प्राचीन भारताचा विचार करता प्राचीन भारतामध्ये वेदांवर आधारीत धर्मसंकल्पनांना समाजमान्यता असल्याचे आढळुन येते. ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळात मुर्तीचे उल्लेख येतात. मध्ययुगीन कालखंडात भारतामध्ये परकीय मुस्लीम शासकांचा प्रवेश झाल्यामुळे मुस्लीमोत्तर धर्मांच्या लोकांमध्ये चलबिचल होऊन विविध धर्मांमध्ये निरनिराळया पंथांचा व संप्रदायांचा उदय, विकास तसेच प्रसार झाल्याचे दिसते.

परकीय आक्रमणांमुळे भारतीय समाज जीवनामध्ये धर्माचे महत्व संपुष्ठात येण्याऐवजी लोकांच्या मनामध्ये धार्मिकता अधिक खोलवर रुजली गेल्याने धर्माचा भारतीय समाज जीवनावरील पगडा परकीय युरोपिय सत्तांच्या काळामध्ये सुध्दा टिकुन असल्याचे दिसुन येते.

जगभरात सर्व धर्मपंथामध्ये मंदिर ही अत्यावश्यक बाब ठरली आहे. प्रत्येक धर्मात या वास्तुला वेगळी नावे असली तरी उद्देश एकच आहे. पितरांच्या पुजेतुन आलेला 'स्मृतिमंदिर' हा एक प्रकार इजिप्तचे पिरॅमिड, भारतातले स्तुप, समाध्या हे प्रकार स्मृतिमंदिर गटातले. दुसरा प्रकार 'सामुदायिक प्रार्थनास्थान' तेथे सर्वजण एकत्र प्रार्थना करतात. यामध्ये चर्च, चैत्य, मशिदी, मंदिर येतात. तिसरा प्रकार म्हणजे देवालय किंवा देवाचे घर या स्वरुपातील वास्तु. देवाची मुर्ती यात प्रत्यक्ष व्यक्तिप्रमाणे विराजमान असते. आपल्याकडची स्मृतिमंदिरे इजिप्तपेक्षा वेगळी आहेत.

कुठल्याही धर्मांमध्ये त्या धर्माच्या प्रार्थना स्थळांना अनन्य साधारण असे महत्व आहे. इतकेच नव्हे तर व्यक्तिच्या धर्माची ओळख ही तो कुठल्या प्रार्थना स्थळामध्ये जातो. यावरुन ठरते. म्हणजेच प्रार्थना स्थळे ही व्यक्तिच्या धार्मिक जीवनामध्ये महत्वपुर्ण भुमिका बजावताना दिसुन येतात.

हिंदु धर्माचा विचार करता हिंदु धर्मांमध्ये मंदिरांना 'धार्मिक प्रार्थना स्थळ' म्हणुन सर्वत्र मान्यता प्राप्त झाली आहे. म्हणजेच मंदिरे ही भारतात बहुसंख्य असलेल्या हिंदु समाज मनाचे धार्मिक प्रतिनिधित्व करतात. भारतातील बहुसंख्य हिंदु समाजातील लोकांमध्ये धार्मिकतेची भावना जोपासण्यात व वृध्दींगत करण्यात मंदिरांनी महत्वाची भुमिका बजावलेली आहे. मंदिरांनी केवळ लोकांमधील धार्मिकताच जोपासली नाही तर लोकशिक्षणाचे केंद्र म्हणुन देखील महत्वपुर्ण अशी भुमिका पार पाडली आहे.

मंदिर केवळ धार्मिक उपयोगाचे स्थान नसुन आर्थिक, राजकिय, सामाजिक, कौटुंबिक आणि सांस्कृतिक घाडमोडीचेही ते महत्वपुर्ण केंद्र होते. कला, स्थापत्य आणि भारतीय जीवनाच्या विविध पैलुंचे दर्शन मंदिर–स्थापत्यातुन होते. महाराष्ट्रात मंदीर शैलीच्या प्रकारास प्रामुख्याने हेमाडपंथी मंदिरे शैली म्हणुन ओळखले जाते.

हेमाडि पंडितास ''सोडवी'' कार या टोपण नावाने संबोधिले आहे. यावरुन त्याचा गाव सोडवी असावा असे दिसते. हा गाव कर्नाटक प्रांतात आहे. अशी माहिती मिळते. यावरुन व हेमाद्री हे नाम महाराष्ट्रीयन नसल्यामुळे आमचा चरित्रनायक कर्नाटक प्रांतातील मुळ रहिवाशी असावा असे दिसते. यादवांचे राजवटीतील करणाधिपाचे हुद्दयावर असताना राजाश्रय मिळवुन वऱ्हाडात, महाराष्ट्रात व दक्षिणेत शेकडो देवालये निर्माण केली.

महाराष्ट्रात यादव घराण्याच्या राजांचे राज्य होते. त्यातले महाराज रामचंद्र यादव यांच्या पदरी हेमाद्री हा सेनापती होता. त्याने लिहिलेला 'चतुर्वर्ग चिंतामणी' हा ग्रंथ उपलब्ध आहे. हेमाद्री हा फार धार्मिक वृत्तीचा होता. तसाच पराक्रमीही होता. अनेक ठिकाणच्या मंदिरांचा जिर्णोध्दार करण्यात तर कांही ठिकाणी नवी मंदिरे उभारण्यात महत्वाचा वाटा असावा.

**भारतातील स्थापत्य शैली ही तीन प्रकारात मोडते.**

- नगर शैली
- द्रविड शैली
- वेस्सर शैली

उत्तर भारतातील मंदिराच्या स्थापत्य शैलीस नागर शैली असे म्हणतात.

दक्षिण भारतातील मंदिराच्या स्थापत्य शैलीस द्रविड शैली असे म्हणतात तर,

उत्तर–दक्षिण भारतातील मंदिराच्या स्थापत्य शैलीस मिश्र वेस्सर शैली म्हणतात.

संपूर्ण भारतामध्ये वरील तीन शैलींचा वापर करुन मंदिरांची स्थापना करण्यात आली आहे. तीन प्रमुख शैलींचा वापर करुन गुजरात, सौराष्ट्र, ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटकातील उत्तर–दक्षिण भाग, मदुराई अशा भागामध्ये विशेष प्रकारची मंदिरे उभारली गेली. त्यांची प्रांतिक वैशिष्टये सहज जाणवतात.

**मंदिर व मुर्तीशास्त्रांचा संबंध :–**

प्राचीन काळी मंदिरांअगोदर मुर्ती तयार करण्यात आल्या. अग्निपुराण म्हणते देवालय म्हणजे मानवी शरीरच आहे. शिखर म्हणजे शिर, त्याखाली बेकी म्हणजे मान, मग स्कंध, गाभारा म्हणजे हृदय. मग मंडोवर म्हणजे छाती, पोट हा भाग, कटिभाग म्हणजे जंघा इत्यादी. विख्यात मुर्तिशास्त्रज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी मंदिर या वास्तुची कल्पना, प्रतिकात्मकता आध्यात्मिक दृष्टीकोनातून विशद केली आहे. मंदिरांचे स्थापत्यशैलीनुसार नागर, द्रविड आणि वेसर असे तीन प्रकार पडतात. सुप्रभेदागम या ग्रंथात त्यांचे पदविन्यास अनुक्रमे चौरस, अष्टकोन आणि वर्तुळाकार असल्याचे म्हंटले आहे.

ग्रंथकारांच्या वर्णात 'स्वर व व्यंजन' असे भेद आहेत. चित्रकारांच्या वर्णात 'उज्वल व छाया' असे भेद आहेत व शिल्पकारांच्या वर्णात पुरुष व स्त्री असे भेद आहेत. अनेक इंद्रियांच्या मार्फत अज्ञानी लोकांनासुध्दा गोष्ट पटवुन देणे हा शिल्पाचा विशेष आहे. आरास हे चित्रकाराचे काम, मुर्ती हे शिल्पकाराचे काम व मंत्रपठन हे ग्रंथकाराचे काम व तिघांचीही मदत घेऊन परम्यात्म्याचे सृष्टीच्या मार्फत ज्ञान करुन देणे हा मुर्तिपुजेचा विशेष आहे. मुर्तिपुजेने सगळया इंद्रियांना संतोष मिळतो व या संतोषाचा अनुभव घेता घेता एक दिवस परम्यात्म्याचे वास्तविक ज्ञान होते.

ज्याप्रमाणे ऊन, वारा वगैरेंचा योग्य उपयोग मिळावा हा हेतु असुन प्रत्येक मालकाचे घर निरनिराळया स्वरुपाचे असते. त्याचप्रमाणे परमात्म्याचे ज्ञान व्हावे हा हेतु असुन, प्रत्येक भक्तांना मंदिरांमध्ये मुर्ती असेल तरच भक्त मंदिरामध्ये रममाण होऊन भक्ती करतो. मंदिर व मुर्ती याचे नाते अतुट आहे. शिल्प हे परम्यात्म्याचे ज्ञान करुन देणारे सुलभ साधन असुन हे काम ते कसे करते हे त्याच्या अभ्यासाने कळते.

राष्ट्रकुटांच्या काळात बांधीव मंदिरापेक्ष कोरीव लेण्यांना अधिक उत्तेजन मिळालं. इ.स. पुर्व काळात त्याकाळी भारतात एकुण बाराशे (1200) लेण्यांची निर्मिती झाली.

त्यापैकी नऊशेहुन अधिक महाराष्ट्रात आहेत. विदर्भातील आणि तेरची मंदिरं ही महाराष्ट्रातील प्रारंभीची बांधीव मंदिर, त्यांची निर्मिती होण्याच्या काळात बौध्द धर्माची लोकप्रियता थोडी कमी होऊ लागली होती. राजघराण्यांनी हिंदु धर्माला अधिक उत्तेजन दिलं. शिवाय कोरी लेण्यांच्या विकासाचा मानदंड म्हणजे कळसापासून पायापर्यंत एका दगडातून कोरुन काढलेलं कैलास मंदिर लेणं. कारागिरांनी घडवलं.

महाराष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने राष्ट्रकुटानंतर दहाव्या शतकाच्या उत्तरार्धात–अकराव्या शतकापासुन मंदिर उभारणीने पुन्हा जोर धरला. मंदिरांचा काळ ठरविण्यासाठी त्याचे स्थापत्य, मुर्ती, नक्षीकामाची पध्दत याची मदत घ्यावी लागते. फारच कमी मंदिरामध्ये शिलालेख आढळले आहेत. शिलालेखात मंदिर उभारणीचा काळ, त्यासाठी दान देणाऱ्या व्यक्ती किंवा राजा यांची माहिती असते. त्यावरुन नक्की कोणत्या काळात, वर्षात मंदिर उभारले गेली याची स्पष्ट कल्पना येते. असं व्यक्तिगत उल्लेख असलेलं पहिलं मंदिर इ. स. 1060 मध्ये उभारलेलं अमरनाथ किंवा अंबरनाथ हे ठाणे जिल्हयातलं शिवमंदिर, हे शिवमंदिर पश्चिमाभिमुख आहे.

भारतीय पुरातत्व शास्त्र शाखेने मुर्ती, शिल्प मंदिरांचे जतन करण्यासाठी खुपच मोठे प्रयत्न करत आहेत. पुराणवस्तु संशोधनाचे काम व्यवस्थित रीतीने चालावे या हेतुने पुणे येथील भारत इतिहास–संशोधक मंडळ कार्य सुस्थितीत करत आहे.

**सारांश :–**

मंदिर व मुर्ती हे एकमंकांचे श्वास आहेत. मंदिरामध्ये मुर्ती असेल तर पुर्णत्व येते. मंदिराशिवाय मुर्तीला व मुर्तीशिवाय मंदिराला पुर्णत्व येत नाही. मंदिर व मुर्तीशास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. मंदिर हे शरीर आहे तर त्यातील मुर्ती हा शरिरातला आत्मा आहे. म्हणजेच तो मंदिरातील परमात्मा आहे. मंदिर व मुर्तीचे संगोपन व संरक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली ऐतिहासिक मंदिरे व मुर्ती यांचे संवर्धन करुन हा अनमोल ठेवा आपण जपला पाहिजे.

**संदर्भग्रंथ :–**


1. प्राचीन हिंदी शिल्पशास्त्रसार–लेखकः कृश्णाजी विनायक वझो, वरदा प्रकाषन, प्रा. लि. 'वरदा' सेनापती बापट मार्ग, 397/1, वेताळबाबा चौक पुणे, 411016.
2. कलावस्तु आणि ग्रंथालय साहित्याचे जतन– मुळ लेखक – ओ. पी.अगरवाल, अनुवाद सुजला देव, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1998.
3. महाराष्ट्राची मंदिरशैली, डॉ. भाग्यश्री काळे–पाटसकर डायमंड पब्लिकेशन 264/3 शनिवार पेठ, पुणे.
4. प्राचीन भारत, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीषम, नागपूर.
5. हेमाद्रि उर्फ हेमाडपंत (त्यांचे चरित्र) लेखक : केशव आप्पा पाध्ये, 'वरदा' सेनापती बापट मार्ग, 397/1 वेताळबाबा चौक पुणे 411016.

# निलंगा येथील निळकंठेश्वर मंदिर

**स्वामी शिवसांब विरपक्षप्पा**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**प्रस्तावना**

चालुक्यकालीन स्थापत्य कलाविष्कार मंदिराच्या उगमाची व विकासाची प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध झाल्याची दिसते. सातवाहन काळातील मंदिराचे उल्लेख गाथा सप्तशतीत मिळतात तर रामटेक नगरधन येथे वाकाटकालीन मंदिर अवशेषावरुन मंदिराची विकसित संकल्पना लक्षात येते. राष्ट्रकूट काळात तर वेरुळसारख्या लयन स्थापत्यासोबतच अनेक मंदिराची उभारणी राष्ट्रकूट नरेशाकरवी झाली होती. याच काळात बांधीव मंदिराचाही विकास झाला. इसवीसनाच्या सातव्या शतकापासून भारतभर मंदिर स्थापत्यात अनेक बदल घडून अनेक शिल्पशैलीचा उदय झाला. निरनिराळ्या राजघराण्यांनी स्थापत्याचे आणि कलेचे नवे आयाम निर्माण केले. गर्भगृह, अंतराळ, प्रदक्षिणापथ, गुढमंडप आणि मुखमंडप या रचनेत बदल होऊन गुढमंडपाचे रुपांतर मोकळ्या अर्धमंडपात झाले. दोन्ही बाजूच्या अर्धमंडपाचे रुपांतर नंतरच्या गाभाऱ्यात होऊन त्रिदल गाभाऱ्याची मंदिरे इसवीसनाच्या बाराव्या शतकात विकास पावली. मुख्य गाभारा आणि दोन्ही बाजूने दोन गाभारे, समोर सभामंडप, मुखमंडप अशी सर्वसाधारण रचना या काळात विकास पावली. निलंगा येथे अशची रचना असणारे निळकंठेश्वराचे (महादेवाचे) मंदिर आहे.

**उद्दिष्ट्ये**

1) मध्ययुगीन कालीन मंदिर स्थापत्य शैलीवर प्रकाश टाकणे.
2) मंदिराची सामाजिक, सांस्कृतिक भूमिका स्पष्ट करणे.

**गृहितके**

1) प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत मंदिरे खूप महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.
2) तत्कालीन समाजजीवनाची माहिती शिल्पातून प्राप्त होते.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, विवेचनात्मक, संदर्भ, सर्वेक्षण आदी संशोधन पद्धतीचा आधार घेतला आहे.

**निळकंठेश्वर मंदिराचे स्थापत्य**

लातूर जिल्ह्यातील निलंगा या तालुक्याच्या ठिकाणी पूर्वेस भर वस्तीत असेच एक त्रिदल गाभारा असणारे अत्यंत देखणे निळकंठेश्वराचे शिल्प स्थापत्य आहे. या मंदिराचा सर्वप्रथम वर्जेस यांनी अभ्यास केला आहे. त्यानंतर डॉ.देगलूरकर, डॉ.प्रभाकर देव, डॉ.माया पाटील इत्यादी अनेक संशोधकांनी मंदिराची दखल घेतल्याचे दिसून येते. सभामंडप, अंतराळ, तीन गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. अधिक चिन्हाप्रमाणे वितान व ताराकृती रचना असणारे हे सद्यःकाळातही बऱ्याच अंशी सुस्थितीत असणारे मंदिर आहे. तैलरंगाच्या बोजडपणामुळे येथील अंतर्गत व बाह्य भागातील शिल्पे नजरेस पडतात.

मंदिराचा पदविन्यास हा ताराकृती आहे. मुखमंडप सध्या अस्तित्वात नसले तरी त्याच्या अवशेषावरुन मुखमंडपाच्या अस्तित्वाची माहिती मिळते. सभामंडप 30 फूट 7.30 फूट असा आहे व मंडपात रंगशिल्प आहे. यावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे.

मंदिराच्या मंडपात एकूण सोळा स्तंभ आहेत. तर चार देवकोष्टे आहेत. ही देवकोष्टे कोरीव कामाने सजल्याची दिसतात. मंडपाचे छत भौमितिक रचना कीर्तिमुख पुष्परचना यांनी बहरलेले आहे.

**मंदिराचा अंतर्भाग**

मंदिराचे अंतराळ 9 फूट 7.6 फूट असे असून अंतराळात लागून गर्भगृह आहे. गर्भगृहाला अत्यंत सुंदर अशी नंदिनी द्वारशाखा आहे. पत्रशाखा, पुष्पशाखा, विद्याहार, स्तंभशाखा, व्यालशाखा व नागशाखा यासारख्या उत्कृष्ट शाखा गर्भगृहाच्या द्वारावर कोरल्या आहेत. द्वारषाखेच्या खालच्या बाजूस गंगा, यमुना, पामरधारिनी, शिव, प्रतिहारी नक्षी कोरल्या आहेत तर ललाटबिंबावर गणेशमूर्ती आहे. गर्भगृह हे 9 फूट 7:9 फूट असे चौरसाकृती असून गर्भगृहात भव्य शिवलिंग आहे. येथील भिंती सपाट असून मंडपाप्रमाणे गर्भगृहाचेही छत आहे. मंडपाच्या दोन्ही बाजूस अर्थातच उत्तर व दक्षिणेस दोन अंतराळ आहेत व त्यातूनच गर्भगृहात प्रवेश करता येतो. दोन्ही गर्भगृहाला मुख्य गर्भगृहाच्या द्वारशाखेप्रमाणेच द्वारशाखा आहेत. उत्तरेकडील गर्भगृहात विष्णूमुर्ती आहे. तर दक्षिणेकडे, शिवमूर्ती, कार्तिकेय मूर्ती आहेत. दोन्ही गाभारे 8 फूट 7.8 फूट असे आहेत.

**मंदिराचा बाह्य भाग**

निळकंठेश्वर मंदिराच्या अंतर्भागातील सौंदर्यापेक्षा बाह्यभागावर शिल्पसौंदर्याचा अद्वितीय आविष्कार पहावयास मिळतो. मंदिराचे पीठ दिसत नसले तरी उलट्या पद्याचा भाग दिसतो व त्यावर उपाण आहेत. मंदिराच्या भिंतीची क्षिप्त व उत्क्षिप्त अशी रचना आहे. क्षिप्त व उत्क्षिप्त रचना म्हणजे थोडासा पुढे आलेला स्तंभाप्रमाणे भाग व आत गेलेला भाग होय. या आत गेलेल्या भागावर मूर्तिशिल्पे आहेत तर बाहेर आलेल्या भागावर कोरीवकाम आढळते. बाह्यभागावर एकूण नऊ देवकोष्टके आहेत. त्यापैकी आठ देवकोष्टात महिषासुरमर्दिनी, शिव, उमा, भैरव, चामुंडा, वराह, नृसिंह या मूर्ती आहेत.

**बाह्यभागावरील अप्रतिम अप्सरा**

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथील अप्सरा किंवा सुंदरी या अत्यंत रेखीव, बांधेसूद, आकर्षक आणि दागिने, वस्त्राप्रावरणे यांनी नटलेल्या आहेत.

**डालमलिका** – उजव्या हाताने वृक्षाची फांदी धरून व डाव्या हातात फुलांची परडी घेतलेली.**पद्मगंधा** – हातात कमलपुष्प घेऊन त्रिभंगात उभी असलेली. **मर्दला** – तंतुवाद्य तसेच बासरी वाजवणाऱ्या, **शुकसारिका** – हाताच्या पंजावर पोपटास घेऊन उभी असलेली शुकसारिका, **जया** – उजव्या हातात कलश व डाव्या हातात वीजपूरक घेऊन उभी असलेली.

मंदिराच्या बाह्यभागावर या स्त्री प्रतिमांचे शिल्पांकन करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे मोक्षप्राप्तीच्या वाटेवर जाताना अनेक विषय विकार यांचे दमन होणे आवश्यक असते. याचे सूचकच या सुरसुंदरी देतात. केवळ मंदिराचा बाह्य भाग सजवणे एवढाच शिल्पांचा उद्देश नसतो तर तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंबही शिल्पामधून दिसून येते. या स्त्रिया केवळ अध्यात्माचे ज्ञान देत नाहीत. तर समाजातील चालीरिती रुढी, परंपरा यांचीही माहिती देतात.

**समारोप**

निळकंठेश्वर मंदिरातील सध्या असलेली 92 शिल्पे ही शिल्पकलेचा अद्वितीय नमुना आहेत. प्रत्येक शिल्पात एक अलौकिक सौंदर्य आहे. वेगळेपण आहे. शिल्पकाराने आपले सामर्थ्य पणाला लावून शिल्पांकन केले आहे. अध्यात्माचे सोपान चढताना सामाजिक, राजकीय दुवेही शिल्पातून प्रतित होतात. निलंग्याचे मंदिर स्थापत्य आणि शिल्पाचे बहरलेले असले तरी सद्यकाळात या मंदिराच्या यथायोग्य जतनाची गरज आहे. तैलरंगाची आवरणे न चढवता मूळ अस्तित्व जतन करणे आवश्यक आहे. उत्तर चालुक्यकालीन परंपरेतील हे मंदिर स्थापत्याचा विकसित आविष्कार आहे. त्याचप्रमाणे हे मंदिर अद्यापही

सुस्थितीत असल्यामुळे चुकीच्या तंत्राने याचे जतन न होता स्थानिक लोक, नागरिक यांनी धार्मिक भाव जपत असताना ऐतिहासिक दृष्टीने या कलात्मक ठेव्याचे, अनमोल वारसा म्हणून जतन केले पाहिजे. स्थापत्याच्या दृष्टिकोनातून त्रिदल गाभारा व ताराकृती विधान असलेले हे मंदिर ऐतिहासाच्या साधनाच्या दृष्टिकोनातून अजोड वाटणारे तत्कालीन काळातील महत्त्वाचे पुरातत्वीय साधन आहे.

## संदर्भ


1) केतकर संध्या, भारतीय कलेचा इतिहास, ज्योत्सना प्रकाशन, पुणे, 2015
2) खरे ग.ह., मुर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, 2012
3) गद्रे प्रभाकर, मंदिर स्थापत्याचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2010
4) देगलुरकर गो.ब., शिवमुर्तेय नमः, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2018
5) देव प्रभाकर (कल्पना रायरीकर), मराठवाड्यातील शिल्प स्थापत्य अविष्कार, अपरान्त प्रकाशन, पुणे, 2017
6) सहाय सच्चिदानंद, मंदिर स्थापत्य का इतिहास, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा, 2013
7) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास प्राचीन काळ, खंड 1, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2009

# कंदूक क्रीडा सुरसुंदरी – जीवनाचे उत्फुल दर्शन

**वैशाली गंगारामजी टोम्पे**
संशोधक विद्यार्थीनी,
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**डॉ.जी.एस.पिसे**
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

कला ही मानवी जीवनाचे प्रतिबिंब असते. भारतीय मुर्तीकला देखील भारतीय समाज जीवनाचे वेगवेगळया पैलुंचे दर्शन घडविते. भारतीय मुर्तीशास्त्राचा अभिन्न भाग बनलेले सुरसुंदरी प्रतिक हे ही अशाच भारतीय समाजाचा आणि सांस्कृतिक बंधाचा एक भाग होय. समाजाचा अर्धा भाग असलेल्या स्त्री समाजाचे चित्रण, अंकन, वर्णन, रेखाटन आणि अनेक रूपबंध उलगडण्याचे काम ह्या प्रतिकाने केलेले आहे. सुरसुंदरी हे प्रतिक शहर सौंदर्यासाठी वापरलेले पारंपरिक प्रतिक होय. ज्याचे उल्लेख स्तंभयोषिता या नावाने कालिदासाच्या रघुवंश या महाकाव्यातूनही मिळतात. कंदुक क्रीडा लोकप्रिय कलात्मक प्रतिक मथुरा, साँची, भरहूत, अमरावती व नागार्जुन कोंडा येथील शुंग, सातवाहन कलेतूनही आढळते याचे अनेक प्रकार आहेत. शालभंजिका, शुकसारिका, सद्यस्ताना, प्रसाधिका आणि कंदुकक्रीडाभम्ना.

स्तंभयोषितेची व्याख्या करताना असे दिसून येते की, अनेकविध सामाजिक मुद्रांचे नयनरम्य दर्शन घडविणाऱ्या सुरसुंदरी ज्यांना तत्कालीन कलाकारांनी दगडावर जिवंत केले, साकाररूप दिले. केवळ दगडावरच नव्हे तर तत्कालीन साहित्य मग ते प्राकृत असो अथवा संस्कृत दोन्हीसही त्याचे प्रतिबिंब आढळते. संस्कृती नेहमी स्त्री आणि पुरूषांना विशिष्ट साच्यात बसविण्याचा प्रयत्न करते. समाजात सत्तेच्या उतरेतीत स्त्रीला नेहमी खालचे स्थान मिळाले. परंतु निसर्गात मात्र नेहमीच स्त्री उर्जा हीच परिपूर्ण आणि स्वायत्त आहे. तिच्या सृजन शक्तीमुळे शक्तीशाली आहे. तिच्या अनुनयामुळे आणि तिला दिलेल्या योग्य स्थानामुळे भौतिक जीवन समृध्द होत असते आणि म्हणून भारतीय कलेतही हयाच भारतीय लोकसंस्कृतीच आणि मूलभूत तत्वज्ञानाचे दर्शन घडते. याच स्त्रीत्वाला दिलेले महत्व आणि नैसर्गिक ऐहिक जीवनाकडे पाहण्याचा भारतीय समाजाचा उत्फुल दृष्टीकोनच यातून दिसून येतो.

वेदिका स्तंभावरील, तोरण कोष्टक, राजवाड्यातील आणि सामान्य लोकांच्या खोल्यातील स्तंभावरील हे स्त्रियांच्या विविध मुद्रांचे रेखाटन म्हणजे सांस्कृतिक आणि सामाजिक स्थित्यंतरातील स्त्री समाजाचा अभ्यासच होय.

कंदुक क्रीडा हे सुरसुंदरी प्रतिमातील एक अत्यंत देखणं प्रतिक होय. इ.स. दुसऱ्या शतकातील एका वेदिका स्तंभावर कोरलेलं कंदुक क्रीडा हे दृश्य राजकीय संग्रहालय मथुरा येथे ठेवलेले आहे. यात एक सुंदरी एकाच हाताने दोन चेंडूशी खेळत आहे. तिने उजव्या हातात एक चेंडू धरला असून त्याच हाताच्या कोपरावर दुसरा चेंडू धरलेला आहे. कलाकार तिचे अतिशय सुक्ष्मतेने चित्रण करतो. तिचे अधोवस्त्र, बांगड्या, बाजुबंद आणि गळयात, घातलेला हार, संघोळ मुर्तीकलेत इ.स. दुसरे शतक मात्र चेंडू ऐवजी कोपरावर घडा आढळतो. कुशान काळातील कलाकारांनी जे सामाजिक करमणुकीचे साधन होते ते भौतिक ऐहिक रूपक म्हणून धार्मिक कलेत वापरले असावे असे वाटते, कारण नंतरच्या कलेत हे रूपक कवी कल्पनेच्या प्रभावातून स्त्रीच्या सुंदर आणि मोहक हालचालींचा कामुक ध्वन्यार्थ घेऊन उदयाला आले. चेंडुशी खेळताना शरीर वाकते, मोडते, वळते आणि हेच सहज स्वाभाविक हावभाव प्रेक्षकांना मोहवितात, भुरळ पाडतात. म्हणूनच कंदुकक्रीडा या प्रकारातून स्त्रीच्या सौंदर्याचे प्रशंसनीय प्रदर्शन आढळून येते. ज्याचे प्रतिबंध आपण अभिजात संस्कृत काव्यात पाहतो. भागवत पुराणाच्या आठव्या

स्कंदात जेव्हा मोहिनी रूपातील विष्णू कंदुक क्रीडा करत असतो, तेव्हा तिच्या जादूगर मोहक रूपाच्या मोहापासून स्थिरयोगी शिवसुध्दा वाचू शकले नाहीत असा उल्लेख आहे.

कवी राजशेखरनेही त्याच्या विध्दषालभंजिकामध्ये मृगांकवतीच्या कंदुकक्रीडेचे उत्कृष्ट वर्णन प्रस्तुत केले आहे.[1] चेंडुशी खेळताना होणाऱ्या तिच्या गतिशील अवयवांचे, मोहक शारीरिक हालचालींचे आणि स्फुर्तीने करीत असलेल्या हातवाऱ्यांचे विदुषकांच्या तोंडून वर्णिले आहे. तिच्या कपाली लावलेला कुंकुमतिलक घामाने निथळून धुवून गेल्यामुळे तिची मुळची गौरकांती अजूनच स्पष्ट दिसून लागली आहे. चेंडुला उचलून वर फेकताना तिच्या नेत्रांची होणारी उघडधाप प्रेखकांना अजूनच भूरळ घालत होती. अशाप्रकारचे ते वर्णन आढळून येते. याच प्रकाराचे अजून एक उदाहरण आपणास शुद्रकाच्या पद्मप्राभूतकम या काव्यातही आढळते. प्रियंगुयस्टिका नावाची बाला आपल्या हातात चेंडू खेळताना ती तिच्या सख्यांच्या नृत्यकौशल्यांलाही लाजवेल.[2] जयप्पा याने ही कंदुक नृत्याचा संदर्भ दिला आहे ज्यात ते समूह नृत्य असायचे आणि सर्व स्त्रिया एकमेंकीकडे, बॉल फेकून खेळायचा अशा अजून अनेक काव्यात या खेळाचे उल्लेख आढळतात. जसे भासाचे स्वप्नवासवदत्ता, बृहत्कथेचे तामिळ संस्करणी आणि पेरूमकथई यात अशा अनेक श्लोकात चेंडू खेळणाऱ्या तरूण स्त्रीच्या मोहकतेचे आणि आकर्षाचे वर्णन आढळते.[3] दंडीच्या दशकुमारचरित या प्रणयकाव्यात ही तुंगधानवन राजाची कन्या कंदुकावतीचा उल्लेख आढळतो जिने विध्यांवासिनी देवीला प्रसन्न करण्यासाठीदेखील कंदुकनृत्य केले होते.[4]

नंतरच्या काळात नृत्य प्रबंधात कंदुकनृत्य ही एक नृत्यप्रकार म्हणून उदयास आले. जसे वस्त्र घेऊन नृत्य करणे, खडग घेऊन, चामरहाती धरून पुष्पमाला आणि वीणा घेऊन अशाच पत्रकारे चेंडू धरूनही नृत्य करणे प्रसिध्दीस आलेले होते. अशाच प्रकारच्या मुलांकडून खेळल्या जाणाऱ्या चेंडूच्या खेळाचा उल्लेख गणेश पुराणात देखील आढळतो. ते चेंडू कापूस किंवा रेशमापासून बनल्याचे उल्लेख आढळतात.

अशा रितीने भारतीय क्रीडा आणि उत्सव हे केवळ कालहरण म्हणून नव्हे तर दैनंदिन जीवनातील कंटाळवाणेपणा तोचतोचपणा दूर करून त्यात नवचैतन्य आणने यासाठीच साजरे केल्या जायचे. अशा प्रकारच्या क्रीडा मानसाला स्वः पासून दूर करून समुहाचा भाग म्हणून, वैश्विक प्रेमात स्वतःला विलिनी करण्यासाठी प्रवृत्त करत असत. यातून संस्कृती जन्माला येते, प्रेम वाढीला लागते, उच्च–नीच भेदभाव संपून सामाजिक जीवन प्रगल्भ होते.

कलेत उमटलेल्या याच सामाजिक प्रथांचा हुंकार आपणास तत्कालीन समाजाचा भौतिक जीवनाकडे पाहण्याचा प्रफुल्लित दृष्टीकोन दाखवितो. श्रृंगारिकता, प्रजनन, प्रकृतीस्वास्थ्य आणि त्यातून साधलेला उच्च मानसिक विकास हेच कंदुक क्रीडा या शिल्प प्रतिकांचे प्रयोजन आढळून येते.

अशीच कंदुकक्रीडामग्ना सुरसुंदरीची शिल्पे मराठवाड्यातील अंभई, अन्वा, जि. औरंगाबाद, पानगाव, जि.बीड येथे आढळून येतात.

**संदर्भसूची :–**


1. विद्धशालभंजिका, अंक 2, पृ. 93, श्लोक 6, 7, 8.
2. पद्मप्राभुतकम् श्लोक 30, चतुर्भाणी पृ. 42
3. V.Raghawan, Festival and Past Times in India, Pg. 113
4. V.Raghawan, Festival and Past Times in India, Pg. 115

# बीड जिल्ह्यातील प्राचिन मंदिर कंकालेश्वर

**परमेश्वर मधुकर उबाळे**
बी. ए. प्रथम वर्ग
इतिहास
सौ.के.एस.के महाविदयालय बीड

कंकालेष्वर मंदिर हे जनु बीडषहराच्या पुर्व दिषेला असलेले परिसरातील लोकांचे ग्रामदैवत होय. कंकालेष्वर मंदिराची सांस्कृतीक पार्ष्वभुमी बीडच्या इतिहासाषी निगडीत आहे या मागील दोन कथा सौ. घायाळ एम.व्हि यांनी दिल्या आहेत. महाराश्टामध्ये रत्नमाला प्रवाहिनी, बींदुसरा आणि कर्रपरा यांच्या मधोमध जे बाह्य प्रदेषावरुन त्या सुरम्य कणकाच्या अंतर भागात बीलीनी नगराच्या समिप हे रमणिय जागृत देवस्थान झालेले आहे. हे क्षेत्र चार युंगामध्ये चार भीन्न संषोधकांनी संषोधले आहे. त्यात कृता युगाला भृगदक म्हटले जात आसे. तेत्रा युगात वायु षोधक होते. व्दापार युगात रामसंसार तर कलयुगात बिलीनगर कनकालय झाले. या वरुन आपल्यास या नगरिचे महत्व लक्ष्यात येते. पोथी मध्ये आणखि एक कथा आली आहे त्यात म्हटले आहे की, नावांमध्ये दोन संदर्भ आहे या प्रदेषात कंकाळ नावाचा सिध्दपरुगा जोनाथ पथाच्या कंथडी परंपरेतील होता. त्याच्या नावावरुन व इष्वर षब्दाचा अर्थ षिवास उद्येषुन कंकालेष्वर असे नाव पडले.

दुसरा संदर्भ असा की भद्र षर्मा नावाचा एक भक्त पारायण गरिब ब्राम्हणास महादेव प्रसन्न होऊन सोन्याचे भरलेले एक कुंभ याच जागेवर त्यास दान करण्यात आले. ती जागा म्हणजेच कंकालेष्वर मंदिर होय. कंकालेष्वराच्या भवती अष्याच कथा जोडलेल्या आहेत. कंकालेष्वर मंदिराची बरीच माहिती ही कंकालेष्वर महात्मे या प्राकृत पोथीत सांगितले आहे.

**मंदिराची रचना :—** जुन्या बीडच्या दगडी पुलापासुन जवळच असलेल्या कंकालेष्वर मंदिराची रचना वैषिष्ट पुर्ण आहे. या मंदिराबाबत न.से.पोहनेकर लिहीतात मंदिराच्या सोभोवती पाण्याचा सुंदर खंदक असुन मंदिरात जाण्यासाठी एक छोटासा पुल ओलांडावा लागतो. हे मंदिर हेमाडपंथी असुन इतस्तक अनेक षिल्पकृती दष्टीला पडतात. पावसाळ्यात पाणी कमी आणि उन्हाळ्यात मात्र भरपुर पाणि अषियाखंडकातील पाण्याची वेवस्था असल्याचे सांगण्यात येते त्यावरुन आपणास या मंदिराच्या रचनेची कल्पना येते या मंदिराबाबत बीड राजपत्रात म्हटले आहे बींदुसरा नदिच्या पुर्व बाजुला कंकालेष्वर मंदिर आहे. मंदिराच्या सोभोवताली पाणि आहे व मध्ये भागी मंदिर आहे. हे मंदिर म्हणजे सौंदर्य आणि वास्तुषिल्पाचा उत्तम नमुना आहे. या मंदिरामध्ये अनेक कोरिव षिल्पे आहेत. हे मंदिर बीडच्या सांस्कृतीक जिवनाषी निगडीत आहे. श्री कंनकालय महात्मय या मराठी पद्य रचनेत सुध्दा या मंदिराविषयी माहिती अनेक अंगाने उपलब्ध आहे. हे कंकालय महात्म 7 अध्ययाचे आहे व ते पद्मावति या नावाने ही उपलब्ध आहे. या मराठी रचनेच्या 7 अध्ययात समारोप करताना असे म्हटले आहे की,

**पद्मावति महात्मे ग्रंथ ! संमंध स्कंध पुराणार्तगता ते ऐकोत प्रेमळ भक्त अध्याय गोड हा !!**

अषा प्रकारे कंकालेष्वर मंदिराची ही सांस्कृतीक पार्ष्वभुमी बीडचा संमृध्द इतिहास स्पष्ट करते. हे मंदिर चालुक्यकला स्थापत्याचे अभिनव उदाहरण होय. त्याच्या सभोवतिचे खंदक आणि जलाषय या मुळे त्याची विषेषता वाढली आहे. डॉ. प्रभाकर देव म्हणतात मंदिराचे महामंडप मुखमंडप आणि त्या सभोवतीची षिल्पे पहाता हे मंदिर निलंगा येथील निलकंठेष्वर व उमरगा येथील महादेव मंदिरासारखे आहे. डॉ. गो.ब देगलुकर यांनी या मंदिराचे वैषिश्ट सांगताना मी मासा अर्थ पुर्ण वाटते ते म्हणतात मंदिराभोवतीचा तलाव हा

278 गुणे 252 ऐवढा आहे. हे मंदिर अंबरनाथ मंदिराषी मिळते जुळते आहे. विश्णु कुबेर गणेषाच्या मुर्ति वैषिस्टे पुर्ण आहेत. चालुक्य स्थापत्याबाबत के.आर श्रिनीवास म्हणतात दक्षिण भारतीय कलेच्या एकात्म दृष्टिने आभ्यास केला असता त्याचे स्वातंत्र स्वरुप लक्ष्यात घ्यावे लागते त्याचा उगम व विकास विषिस्ठ काळात झाला आहे. यातुन त्याचे प्रादेषिक स्वरुप स्पस्ट होते. त्यातील फरक व परस्पर प्रभाव लक्ष्यात घेतले पाहिजेत.

मराठवाडा विभागातील मंदिरातही ही प्रक्रिया दिसुन येते. प्रा. देगलुरकर हे कंकालेष्वर मंदिराबाबत म्हणतात, यात्रीदत्त मंदिराभोवती असलेले षिल्प वैभव आगळे वेगळे आहे. कमल पुष्पा वृती आकृती या अत्यंत वेधक आहे यातील नशीका व त्याची सजावट लक्षणि आहे. या वरुन आपल्याला चालुक्य स्थापत्याची त्रसुत्री लक्ष्यात येते. ती असी सांगता येइल, कंकलय महात्मे या प्राकृत पोतीमध्ये चंपावती हे प्राचिन नाव आले आहे. व ते चालुक्य घराण्याषी निगडीत आहे. चंपावती ही बदामी चालुक्य सम्राट विक्रमा अदित्याची भगीनी होती.चालुक्य कलेची विषेषता बीड परिसरातील प्रामुख्याने प्रकट होते त्याचे कारण या भागाचा चालुक्याषी असलेला संबंध होय.

**मंदिराची स्थापत्य व षिल्पषैली :–** या मंदिराचे स्थापत्य आणि षिल्पषैली लक्ष्यात घेता हे मंदिर इ.स.वि. सनाच्या 12 व्या षतताक बांधले गेले असे दिसते. तथापी या मंदिरातील कलाकुसर आणि नक्सी कामाची तुलना हि अजिंटा लेण्यातील सजावटीषी करण्यात आली आहे. प्राचिन कालखंडातील मंदिराप्रमाणेच मंठाच्या स्थापनेवरही चालुक्याचा प्रभाव दिसतो. तरीपण या मंदिराचा स्थापनेचा काळ हा चालुक्यांचा की यादवांचा या बाबत अभ्यासकात अजुनही बरेच मतभेद अढळतात पण बरेचदा हे मंदिर चालुक्य काळातील असावे याचे पुरावे षोधले आहेत. या मंदिराच्या स्थापत्याबध्दल प्रा. जामखेड म्हणतात मंदिर पच्षिमाभुक असुन मुखमंडप त्याच्या मागे अर्धखुला मंडप आणि या मंडपाला जोडुन 3 बाजुंना अंतरालायुक्त गर्भगृहे असा त्याचा तलविण्यास आहे.सर्व म्हणजे तिनही गर्भगृह सारख्याच आकाराचे असुन त्यांचा तलविण्यास तारकाकृती आहे. अषा प्रकारची स्थापत्ये रचाना हे मंदिराचे वेगळेपण होय मंडप अर्धखुला असुन अष्टकोनी आकाराचा आहे. मंडपाच्या चार मुख्य दिषांना आणि चार कोपऱ्यांमध्ये प्रत्येकी दोन स्तंभ किंवा एक स्तंभजोडी आहे या सोळा स्तंभावर घमटाकार छात पेललेले आहे. हे घुमट आकार छत उत्तरोत्तर लहान होत जाणाऱ्या वर्तुळाकृती वलयांनी बनले आहे. या छतावर मन्यांची नक्षी पडंदता आणि फुलांची नक्षी यांचे अलंकरण आहे छातात्या मध्येभागी आणि सर्वात वर असलेला प्रस्ततारकाकृती असुन त्यावर क्षीप्त कमळ आहे. मंडप आणि गर्भगृहामधील स्तंभ चौरस तलविणासाचे असुन चौरस तळखडा आणि वरकाही अंतरावर अनुक्रमे अष्टकोणी चौरस आणि वर्तुळाकार बननारा चौरस खाम आणि खांबच्या वर्तुळाकार भागावर किचकहस्थ असा स्तंभाचा घटनाक्रम आहे.

मंदिराच्या बाह्यभागामध्ये पिठभागावर विविध स्तर असुन सगळयात खालचा स्तर चौकटच्या नक्षीने तर सगळ्यात वरचा स्तर किर्तीमुखाने अलंकृत केला आहे. भद्र भागाने देवकोश्टकांमध्ये षक्ती,ब्रम्हदेव आणि षिवसंप्रदायातील देवदेवता आहेत. हि सव्र प्रमुख वैषिस्ठे चालुक्य कालीन कला स्थापत्यात दिसुन येतात. या मंदिरातील कलात्मक सजावटिषी सुक्ष्म मिमान्सा केल्यानंतर असे जाणवते की गर्भगृहांची व्दारे पंचषाख प्रकारची असुन त्यावर कमलदत्त पुष्प आणि व्याल या सारखी प्रयोजने आहेत. अनेक मुर्त्यांच्या हाती षैव आयुधे आहेत. मुख्य ललाआवर गणेष मुर्ति आहेत. या मंदिराबाबत सौ. घायाळ म्हणतात कंकालेष्वर मंदिर मुळात ब्रम्हा विष्णु व महेष यांचे त्रिमुर्ति देवालय आहे. हे मंदिर स्थापत्ते कलेचा व षिल्पवैभवाचा अप्रतिम अवषेस आहे. ब्रम्हा विष्णु महेष हे हिंदु त्रिमुर्ति चालुक्य काळात लोकप्रिय होते. मुंबई जवळच्या धारापुरी लेण्यात पहिल्या पुलकेषी काळात प्रथम ब्रम्हा विश्णु महेष या त्रिमुर्तिची कल्पना एका षिल्प पटात साकार झाली या वरुन असे समजते की, बीड परिसरात चालुक्यांचा प्रभाव असल्यामुळे कंकालेष्वर मंदिर हे

त्यांच्याच काळात उभारले गेलेले असावे. या मंदिराचा सुक्ष्म अभ्यास केल्यांनंरत असे दिसते की मंदिराच्या व्दारपट्टीवरील मुर्ति विशणुच्या आहेत. वरच्या हातात षंख व चक्र असुन उजवा हात वरमुद्रेत व डाव्या हातात गदा. विशणुच्या बाजुस लक्ष्मी भुमिदेवता चौरिधारी स्त्रिया आहेत. या मुर्तिवरुन तरी हे गर्भगृह विष्णु देवतेचे निवासस्थान होते असे वाटते. त्रिमुर्तिची पुजा एकत्र करण्याची पध्दत चालुक्य काळात अधिक लोकप्रिय असल्यामुळे हे मंदिर यादव काळातील नसुन चालुक्य काळातील आहे असे सिध्द करता येते. अंबाजोगाईच्या सर्व मंदिरात षैवपंथाचा प्रभाव आहे. ते कोठेही त्रिमुर्तिचे षिल्प नाही. त्यामुळे या मंदिराला बऱ्याच अभ्यासकांनी यादव काळात सामाविष्ट केलेले दिसत नाही.

**निष्कर्ष :–** मंदिराच्या सुक्ष्म पहाणिवरुन आणि अभ्यासावरून असे दिसते की जल मंदिराची परंपरा यादव काळात प्रचलीत नव्हती त्यामुळे हे मंदिर चालुक्य कालीन आहे असा आनखी एक पारिसारीचा संदर्भ असल्याचा सापडतो.

**संदर्भ ग्रंथ :–** **महाराष्ट्र बौध्दिक संदर्भ ग्रंथ**

**प्राचिन कला व स्थापत्य. लेखक :– अनिल कठारे**

**बीड जिल्हयाचा प्रचिन,संस्कृतीक इतिहास.**

**लेखक :– विष्वास कंधारे– पुस्ठ क्र. 76 व 133**

# बुद्धमूर्तीची निर्मिती, विकास व पूजा पद्धती अन्वयार्थ

**- विजय ज्ञानोबा साळवे**
संशोधक छात्र,पाली ॲण्ड बुद्धिझम विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद 431004

**पार्श्वभूमी :**

बौद्ध धम्मात कालौघात प्रामुख्याने दोन सांप्रदाय निर्माण झाले. हीनयान आणि महायान ही त्यांची नावे होत. हीनयान हे तथागत बुद्धांच्या मूळ शिकवणूकीला मानणारे तर महायान बुद्ध शिकवणूकीत सोयीप्रमाणे बदल करणारे आहेत. हीनयान हे नाव स्वताहून महायानींनी हीनयानींना दिले आहे. हीनयानींचे मूळ व पर्यायी नाव स्थविरवादी/थेरवादी असे आहे. हीनयान हे नाव देण्यामागे वर्णव्यवस्थेचा स्पष्ट पूर्वलक्षी प्रभाव तत्काळात असल्याचे सूचित होते.

हीनयान सांप्रदायात स्वता केलेल्या कर्मांवरच प्रगतीचा भर देण्यात आला आहे, तर महायान सांप्रदायात तथागत बुद्ध आणि बोधिसत्व यांना देवतुल्य मानून केवळ त्यांच्या नामस्मरणाने संकटे दुर होतात.[01] असे मानण्यात आले आहे. एवढेच नाही तथागत बुद्धांना महायान सांप्रदायाने अवतार बनवून मर्यादीत केले.[02] प्रारंभीच्या काळात बौद्ध कलाकृतींमध्ये तथागत बुद्धांना बोधिवृक्ष, धम्मचक्र, आसन, पदचिन्ह आणि निर्वाण दाखवणारा स्तुप आदि चिन्ह स्वरुपात प्रक्षेपीत केले जात असे. महायान अस्तित्वात आल्यानंतर बुद्धांची संकल्पनाच बदलली, तेंव्हा बुद्धमूर्तीची आवश्यकता प्रकर्षाने जाणवू लागली. मूळच्या ऐतिहासिक बुद्ध मूर्तीच्या प्रारुपावरून उत्तर काळात मूर्त्या बनविण्यात येऊ लागल्या.[03] व उत्तरोत्तर त्यांचा वैविध्यपूर्ण विकास होत गेला.

**बुद्धमूर्तींची निर्मिती :**

बहूतांशी धर्मग्रंथांतून तथागत बुद्धांनी आपली मूर्ती बनविण्याची अनुमती दिल्याचा संदर्भ मिळतो.[04] प्रथम निर्माण झालेल्या बुद्धमूर्तीविषयी अनेक बाबी प्रचलित आहेत. समस्त आशिया खंडात भारतात असलेल्या तथागत बुद्धांच्या प्रथम मूर्तीला प्रमाणीत (अधिकृत) मूर्ती मानले जाते. तिच्याच प्रतिकृतीनंतर इतर मूर्ती निर्माण झाल्या. ह्यु-एन-त्संगने आपल्या बरोबर अशा मूळ मूर्तीची एक प्रतिकृती आपल्याबरोबर चीनला नेली होती. सदर मूर्तीच्या प्रतिकृती नंतर कोरिया, जापान आदि बौद्ध राष्ट्रांत निर्माण झाल्या. मथुरा आणि गांधार येथे एकाचवेळी तथागत बुद्धांच्या मूर्त्यांची निर्मिती झाली. प्रारंभीच्या काळात मथुरा येथील मूर्त्या थेरवादी पद्धतीच्या होत्या तर गांधार शैलीतील मूर्त्या महायानी पद्धतीच्या होत्या. महायानी आचार्यांची प्रेरणा कनिष्कासाठी बुद्धमूर्ती बनविण्याचे कारण ठरले.[05] यातूनच महायान सांप्रदायाने भारतात सर्वप्रथम बुद्धमूर्ती कनिष्काच्या माध्यमातून निर्माण केली.[06,07] दुसऱ्या शताब्दीनंतर धातूंच्या बुद्धमूर्ती फार लोकप्रीय झाल्या. धातूंपासून बुद्धमूर्ती बनविण्याची कला अतिशय प्राचीन आहे. तथापी या प्रकारच्या बनलेल्या मूर्ती प्रथम शताब्दी इ.स.पूर्वी मिळत नाहीत. या कालखंडातील काही छोट्या मूर्ती उत्तरेत तक्षशिला आणि दक्षिणेत अमरावती येथे मिळाल्या आहेत.[08] तथागत बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तन केल्यानंतर बुद्धमूर्ती निर्मिती व्हायला सुमारे सहाशे (600) वर्षांचा काळ लागला.[09] यानंतर पुढे उत्तरीय कालखंडात विविधांगी स्वरुपात बुद्धमूर्तींचा विकास होत गेला.

**बुद्धमूर्तींचा विकास :**

तथागत बुद्धांच्या मथुरा आणि गांधार येथील मूर्त्या सर्वसामान्य व्यक्तींची सर्वसाधारण बौद्धिक आणि मानसिक पातळी डोळ्यासमोर ठेवून बनविण्यात आल्या आहेत. सर्व आशिया खंडात सदर मूर्ती प्रमाणीत मानून दुसऱ्या मूर्ती निर्मिल्या गेल्या. धम्मग्रंथात दिलेली तथागत बुद्धांची 32 (बत्तीस) मुख्य लक्षणे आणि 80 (ऐंशी) उपलक्षणे मूर्तीची घडण करताना दाखविता येणे शक्य नाही. परंतू मूर्तीत प्रमाणबद्ध शरीर, रुंद खांदे, अरुंद बैठकीचा मागचा भाग, सिंहासारखे धड, हरिणासारखे पाय, गुडघ्यापर्यंत पोहोचणारे हात (अजाणबाहू), खाली आलेल्या कानाच्या पाळ्या इत्यादी गोष्टी प्रामुख्याने तथागत बुद्धांच्या मूर्तीत दाखविण्यात आल्या आहेत. हाताच्या आणि पायांच्या तळव्यांवर धम्मचक्र काढलेले आहे. दोन्ही डोळ्यांच्यामध्ये उर्णा आहे. डोक्यावरचे केस उजवीकडे वळून डोक्याला चिकटलेले आहेत. त्याच्यातून विश्वाला प्रकाश देणाऱ्या ज्ञानाच्या प्रकाशरश्मी काढलेल्या आहेत. डोके आणि शरीराच्या मागे 'आभा' (प्रकाश) दाखवलेली आहे[10] हे बुद्धमूर्तीचे विशेषत्व होय.

विकास पावलेल्या तथागत बुद्धांच्या मूर्ती सात मुद्रांत आहेत.[11]

1) पद्यासन मुद्रा 2) धम्मचक्र प्रवर्तन मुद्रा 3) भूमिस्पर्श मुद्रा

4) ध्यान मुद्रा 5) अभय मुद्रा 6) पिंडपात मुद्रा 7) महापरिनिर्वाण मुद्रा

उपरोक्त काही मूर्तीतील मुद्रांविषयी प्रातिनिधीक स्वरुपात भाष्य करायचे झाल्यास धम्मचक्र प्रवर्तन मुद्रा व भूमिस्पर्श मुद्रा याविषयी करता येईल.

सिद्धार्थ गौतमांना ज्ञानाची प्राप्ती झाल्यानंतर ते सम्यक संबुद्ध अर्थात तथागत बुद्ध झाले. त्यांनी जो प्रथम उपदेश सारनाथ (वाराणसी) येथे पंचवर्गीय भिक्खूंना केला, त्या प्रथम उपदेशाचे प्रतीक म्हणून 'धम्मचक्र प्रवर्तन' मुद्रेतील मूर्तीकडे पाहिले जाते.

सिद्धार्थ गौतम आणि मार (मनुष्याची अधोगती करणाऱ्या मनातील दुष्ट प्रवृत्तींचा समुच्चय) यांच्यातील युद्ध सर्वश्रुत आहे, माराशी संवाद करताना सिद्धार्थांनी आपल्या वर्तनाला साक्षीदार म्हणून आकाशाला आवाहन केलेले नसून पृथ्वीला आवाहन केलेले आहे. ते कोणत्याही अलौकीक वा पारलौकीक शक्तीच्या जोरावर आपले कर्तृत्व व अधिकार सिद्ध करीत नाहीत, ही फार महत्त्वाची बाब आहे. ते पृथ्वीचा आधार घेत आहेत, याचा अर्थ ते वस्तुस्थितीमधील मानवी प्रयत्नांच्या आधारे आपल्या उद्दिष्टाकडे (बुद्धत्व प्राप्तीची) वाटचाल करण्याचा निश्चय करुन आहेत. ते माराला म्हणतात, “या आसनावर बसण्याचा मला पूर्णपणे अधिकार आहे आणि माझ्या या अधिकाराला ही महापृथ्वी साक्षीदार आहे,” असे म्हणून त्यांनी भूमीला स्पर्श केला आहे. ते आपल्या उजव्या हाताने भूमीला स्पर्श करीत आहेत, या स्थितीमधील त्यांची मुद्रा “भूमिस्पर्श मुद्रा” म्हणून विख्यात आहे. या मुद्रेतील त्यांच्या मूर्ती जगभर आढळतात. श्रीलंकेतील अनुराधपूर येथील विख्यात बोधिवृक्षाच्या परीसरात असलेली त्यांची मूर्ती याच मुद्रेमध्ये आहे.[12] अशाप्रकारे तथागत बुद्धांच्या जीवनातील महत्वपूर्ण प्रसंगांचे प्रतीक म्हणून विविधांगी स्वरुपातील बुद्धमूर्तींच्या मुद्रा प्रसंगपरत्वे विकास पावल्या आहेत.

**पूजा पद्धतीचा अन्वयार्थ :**

बुद्धमूर्ती विकासनशील अवस्थेत असताना हीनयान सांप्रदायाचे लोक तथागत बुद्धांची पूजा कमळ, वज्रासन, बोधिवृक्ष, धम्मचक्र, त्रिरत्न, स्तुप व चैत्य या प्रतीकांच्या माध्यमातून करत असत. औरंगाबादेतील लेणी क्र.04 (चार) ही एकमेव लेणी हीनयान सांप्रदायाची आहे.[13]

जीच्यात बुद्धमूर्तीचे शिल्प नाही, चैत्यगृहात केवळ स्तुपाची निर्मीती करण्यात आली आहे. तत्कालीन कालखंडात स्तुपाचा सामुदायिक पूजाअर्चेसाठी किंवा वंदनेसाठी वापर करण्यात येत असे.[14] या बाबीला दुजोरा मिळण्याचे कारण म्हणजे ही हीनयान लेणी आहे. महायान सांप्रदायाच्या माध्यमातून पहिल्यांदा बुद्ध व बोधिसत्वाच्या मूर्त्यांची निर्मीती करण्यात आली, यामुळे महायान सांप्रदायातील लोक बुद्धमूर्तीची पूजा करणे स्वाभाविक आहे. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. तथापि आधुनिक कालखंडात हीनयान (थेरवादी)सांप्रदायाचे लोक बुद्धमूर्तीची पूजा मान्य नसूनही का करतात, हे पाहणे औत्सुक्यपूर्ण ठरेल.[15] मूलत बौद्ध धम्म पूजाअर्चेला महत्व देत नाही, तो माणसाच्या आचरणाला महत्व देतो, थेरवादी (हीनयानी) भिक्खूसंघामध्ये मूर्ती पूजेला आणि व्यक्ती पूजेलाही महत्व नाही. तथागत बुद्धांनी धम्मात स्वताचे अस्तित्व ठेवले नाही, अर्थात विभूती पूजेला महत्व दिले नाही हे अगदी निर्विवाद सत्य आहे. मात्र आधुनिक कालखंडात भावनावश होऊन कार्यक्रमांमध्ये बुद्धमूर्ती किंवा प्रतिमा ठेवल्या जातात. हे मनुष्याच्या श्रद्धेमुळे ऐतिहासिक प्रतीक म्हणून ठेवल्या जाते. यापेक्षा त्याला अधिक महत्त्व नाही. बुद्धमूर्ती स्थानापन्न करुन जी पूजा केली जाते ती मूर्तीची नसून त्या महामानवाच्या गुणांची पूजा असते. त्यांचा गुणगौरव काया, वाचा व मनाने केल्यामुळे मानसिक समाधान लाभते. त्रिरत्नांचे (बुद्ध-धम्म-संघ) वंदन करणे म्हणजे त्यातील रत्नांत असणाऱ्या गुणांचा गौरव करणे होय. बुद्धमूर्तीची पूजा हा भावनेचा प्रश्न आहे. परंतू बौद्ध धम्माच्या इतिहासात मूर्ती पूजेला आणि विभूती पूजेला स्थान नव्हते आणि नाही, ही लक्षणीय बाब आहे.

**निष्कर्ष :**

1. हीनयान सांप्रदायाची वर्णव्यवस्थेच्या पूर्वलक्षी प्रभावातून जाणीवपूर्वक निर्मीती करण्यात आली.
2. हीनयान हे नाव बादरायणतेतून (जबरदस्ती लादणे) देणे ही क्रांती आणि प्रतिक्रांतीची तत्कालीन सूचक घटना होती.
3. महायान आचार्यांच्या प्रेरणेतून भारतात सर्वप्रथम बुद्धमूर्ती निर्माण झाली.
4. राजा कनिष्क यांच्या कार्यकाळात त्यांचे अधिपत्य व नियंत्रणात प्रथम बुद्धमूर्तीचे निर्माण झाले.
5. तथागत बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तन केल्यानंतर सहाशे (600) वर्षांनी बुद्धमूर्ती निर्माण झाली.
6. हीनयान सांप्रदायात प्रारंभीच्या काळात मूलत बुद्धमूर्तीची पूजा करण्याऐवजी बुद्ध प्रतीकांची पूजा केली जात असे.
7. तथागत बुद्धांच्या विविध मुद्रांतील बुद्धमूर्ती बुद्ध जीवनातील महत्वपूर्ण प्रसंगानुरूप 'प्रतीक' म्हणून विकसीत झाल्या आहेत.
8. आधुनिक युगात हीनयान (थेरवादी) सांप्रदायात बुद्धमूर्तीची पूजा तथागत बुद्धांच्या गुणांचा गुण-गौरव म्हणून केली जाते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1. बौद्ध धम्म जिज्ञासा-कीर्ती पाटील, प्रकाशकःविकास पाटील, ऊरूवेला कॉलनी, नागपूर, द्‌वितीयावृत्ती : 12 ऑक्टोबर 2005, पृष्ठांक : 263
2. बौद्धकालीन भारत का इतिहास-मुंशी एन.एल.खोब्रागडे, समता प्रकाशन, लष्करीबाग, नागपूर, प्रथम संस्करण : 2002, पृष्ठांक : 76
3. बौद्ध शिक्षण पद्धती-मा.शं.मोरे, कौशल्य प्रकाशन, हडको, औरंगाबाद, द्‌वितीय आवृत्तीः 17 नोव्हेंर 2013, पृष्ठांक : 164-165
4. उपरोक्त (कित्ता), पृष्ठांक - 165
5. भारतीय संस्कृतीला बौद्धधर्माचे योगदान-डॉ.भागचंद्र भास्कर, प्रकाशक : कुलसचिव, नागपूर विद्‌यापीठ नागपूर, पहिली आवृत्ती : मार्च 1977, पृष्ठांक : 217
6. प्राचीन भारतीय मूर्ती विज्ञान - डॉ.वासुदेव उपाध्याय, प्रकाशकः चौखंबा विद्‌याभवन, वाराणसी, द्‌वितीय संस्करण :1982, पृष्ठांक : 48
7. बुद्ध विश्व विजय-भिक्षु निगुर्णानंद महाथेरो, प्रकाशक : सारीपुत्त प्रकाशन, वासीनाका, मुंबई (शाक्यमुनी श्रावक संघ, [मुंबई] जालना), चतुर्थ संस्करण : 2008, पृष्ठांक : 394
8. बौद्ध धर्म के 2500 वर्ष - संपादक : पी.वी.बापट, प्रकाशन : सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, द्‌वितीय संस्करण : मे 1997, पृष्ठांक :232
9. विदर्भातील बौद्ध धर्म क्षेत्र पवनी - डॉ.प्रदीप शालीग्राम मेश्राम, विद्‌यार्थी साहित्य प्रकाशन (वडगाव) जि.यवतमाळ, द्‌वितीय आवृत्ती : 14 ऑक्टोबर 1994, पृष्ठांक : 25
10. बौद्ध शिक्षण पद्धती - मा.श.मोरे (कित्ता), पृष्ठांक 165-166
11. बुद्ध नित्य वंदना पाठ-संदर्भ संग्राहक : फुलनबाई गो.भिमकर, वरळी, मुंबई -18 प्रकाशिका : भिक्षुणी संघमित्रा, बुद्ध विहार, नालासोपारा (पूर्व) ठाणे, प्रकाशन वर्ष : उल्लेख नाही, पृष्ठांक : 66
12. सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध - डॉ.आ.ह.साळुंखे, लोकायत प्रकाशन, गेंडामाळ सातारा, आठवी पुनर्मुद्रण आवृत्ती : जून 2014, पृष्ठांक:32
13. औरंगाबाद नामा-डॉ.दुलारी कुरेशी/डॉ.रफत कुरेशी, विद्‌या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती : 2018 पृष्ठांक : 19
14. वेरुळ आणि औरंगाबाद बौद्धलेणी-प्रा.एस.आर.हणमंते, प्रकाशक : भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था, मुळवा ता.उमरखेड जि.यवतमाळ, पहिली आवृत्ती : 26 जानेवारी 2005, पृष्ठांक : 59
15. तुमचे प्रश्न आमची उत्तरे - भदंत अंगुलीमाल शाक्यपुत्र महाथेरो, प्रकाशक : शाक्यमुनी श्रावक संघ, जालना, प्रथम आवृत्ती : 09 मे 2009, पृष्ठांक - 97,98


***

# आमळी येथील कन्हैयालाल महाराज मंदिरातीलमुर्तीशास्त्र


| गायकवाड पोपट काशिराम | दुबे जुगलकिशोर विजयकुमार |
|---|---|
| संशोधक विद्यार्थी | मार्गदर्शक |
| सामाजिक शास्त्रे प्रशाळा | मूळजी जेठा महाविद्यालय |
| कवयित्री बहिणाबाई चौधरी | जळगाव |
| उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. | मो.नं. ९४२३४९९४५५ |


**प्रस्तावना :-**

मानवाला राहण्यासाठी जशी घराची आवशक्ता असते तशी देवालाही राहण्यासाठी मंदिराची गरज असते. या धार्मिक भावनेने मानवाने वेगवेगळ्या प्रकारे मंदिराची निर्मिती करण्यास सुरवात केली. आणि आज भारतात लाखोच्या संखेने मंदिरांची निर्मिती करण्यात आली आहे. भारतात मंदिराच्या प्रमुख्याने तीन शैल्या महत्वाच्या आहेत. त्या म्हणजे उत्तर भारतात विकसित झालेली नागर शैली, दक्षिण भारतात विकसित झालेली द्रविड शैली, वया दोघांच्याही मध्ये मिश्र पणे विकसित झालेली वेसर शैली होय. या तिन्ही शैली नुसार भारतात अनेक मंदिरांचे बांधकाम करण्यात आले आहेत. या मंदिरात देवरूपी मूर्तीच्या स्वरुपात अनेक देवी देवतांची निर्मिती करण्यात आल्या. यातूनच एक मुर्तीशास्त्र शिल्पकला विकसित झाली.या मुर्तीशास्त्राचे अनेक नमुने आपल्याला पहावयास मिळतात. त्या पैकी आभ्यासाच्या दृष्टीने धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्याच्या पश्चिम भागात प्रसिद्ध असलेले आमळी येथील श्री तीर्थक्षेत्र कन्हैयालाल महाराजांच्या मंदिरावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न संबधित शोध निबंधात करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) धनेर आमळी येथील मंदिराचा इतिहास जाणून घेणे.
२) मंदिरात असलेली मुर्तीशास्त्राचा अभ्यास करणे.
३) कन्हैयालाल महाराज मंदिराचे वैशिष्ट्य समजून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तूत शोध निबंधासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर करून माहिती संखलनासाठी प्रकाशित ग्रंथ, वर्तमान पत्र, इंटरनेट व प्रत्यक्ष नरीक्षण करून प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :-**

महाराष्ट्रातील खान्देश म्हणून ओळखला जाणारा प्रदेशातील धुळे जिल्हामध्ये साक्री तालुक्यातील एक प्रसिद्ध असलेले धार्मिक स्थळ म्हणजे धनेर आमळी येथील कन्हैयालाल महाराजांचे मंदिर होय. धुळे पासून ९० किलोमीटर च्या अंतरावर असलेले आमळी गाव धुळे ते सुरत हायवेला कोंडाईबारी पासून १० किलोमीटर च्या अंतरावर असलेल्या धनेर गाव व त्या धनेर गावापासून अवघ्या दोन ते ३ किलोमीटरच्या अंतरावर आमळी हे एक आदिवासींचे वसतीस्थान असलेले लहानसे खेडे गाव आहे. धनेर पासून जवळ असल्याने त्याला धनेर आमळी असा एकत्र उच्चार करूनच त्याचा उल्लेख धनेर-आमळी म्हणून केला जातो.

**१) मंदिराच्या नावाची उत्पत्ती :-**

आमळी गावात श्री तीर्थक्षेत्र स्थळ म्हणून कन्हैयालाल महाराजांचे मंदिर प्रसिद्ध आहे.हे मंदिर साधारणता सतराव्या शतकात बांधले गेले असले. तरी त्यातील मूर्ती ही हजारो वर्षापूर्वीची येथे असावी असे येथील स्थानिक लोक सांगतात."नावात जरी कन्हैया असले, तरी हे कृष्णाचे मंदिर नाही.महाराज असा जरी शब्द असला, तरी हे कोणी महाराज देखील नाहीत.इथे निद्रावस्थेतील विष्णूची पुरातन मूर्ती आहे."[१] कन्हैया या नावावरून निश्चितच असे वाटते की हे मंदिर कृष्णाचे मंदिर असावे. परंतू प्रत्येक्षात तेथे जाऊन पाहिले तर परस्थिती वेगळीच आहे. शेषशाही नागावर निद्रावस्थेत असलेली विष्णूच्या पायातील काटा काढतांना बसलेली लक्ष्मीची मूर्ती असलेले उत्तर महाराष्ट्रातील हे एकमेव मंदिर आहे. विष्णूचे मंदिर असतांनाही हे देवस्थान विष्णु मंदिर म्हणून प्रसिद्ध नसून ते कन्हैयालाल महाराजांचे मंदिर म्हणूनच येथे परिचित आहे.मंदिराच्या बांधकामा विषयी अशी आख्यायिका सांगीतली जाते की विष्णू भगवान "पाव्हबा भगत नावाच्या एका गरीब माणसाच्या स्वप्नात गेले आणि त्याला आपल्यासाठी एक छोट मंदिर बांधण्याची विनंती केली. पाव्हबाने त्याच्या गरिबीमुळे आपली असमर्थता दाखवली पण प्रभुने त्याला हे समजावले की तू कामाची सुरवात कर,त्यानंतर तुला इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली संपत्ती सापडेल. त्यानुसार पाव्हबाने कार्य हाती घेतले आणि जे स्वप्नात सांगितले होते तसे सर्वकाही झाले."[२]यावरून असे वाटते की प्राचीन काळात पाव्हबा नावाच्या व्यक्तीच्या स्वप्नात भगवंत आला व त्याला मंदिर बांधण्याचे सांगण्यात आले या कथेतील पाव्हबाचे खरे नाव कन्हैया असावेया कन्हैयाला देव स्वप्नात येत असल्याने त्यांनी देवाची सेवा करण्यास सुरवात केली. यातूनच त्याला देव स्वप्नात प्रसन्न झाला. म्हणून याला आदिवासीमध्ये देव पावला असे म्हटले जाते.या पावला शब्दावरून पाव्हाबा शब्द रूढ झाला असावा व ज्याला देव पावतो त्याला आदिवासीत भगत किंव्हा महाराज मानतात. या वरूनच कन्हैया चा कन्हैया महाराज झाला असेल व त्याचाच अपभ्रंश होऊन कन्हैयालाल महाराज हे नाव रूढ होऊन याच कन्हैयालाल महाराजांनी गरिबीची परस्तिथी असतांनाही मंदिराच्या कामाला सुरवात केली असता.आख्यायिका प्रमाणे त्याला जमिनीत धन संपत्ती सापडली असावी अथवा इतरांच्या किंवा स्थानिक राजाच्या मदतीने पैशांची जमवाजमव करून हे मंदिर त्याने बांधले असावे. या वरुण हे मंदिर कन्हैयालाल महाराजाने बांधलेले मंदिर म्हणून कन्हैयालाल महाराजाचे मंदिर या नावाने ओळखले जात असावे.

**२) मंदिराची रचना :-**

धनेर आमळीच्या मंदिराची रचना वैशिष्ट्पूर्ण पद्धतीची असून मंदिराच्या आजूबाजूला पाच ते सात लहानलहान मंदिरे आहेत. परंतू या मंदिरात सर्वात महत्वाचे व वैशिष्ट्य पूर्ण आकर्षक करणारे मुख्य मंदिर म्हणजे कन्हैयालाल महाराजांचे मंदिर होय. या मंदिराचे बांधकाम १६१४ मध्ये पूर्ण झाले असल्याचे मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या शिलालेखा वरून समजते. हे मंदिर दोन मंदिरं एकमेकांना जोडून बांधले गेले आहे असे वाटते. परंतू या मंदिराचा प्रवेशद्वाराचा पुढचा भागहा सभा मंडप असून त्याला जोडूनच मंदिराचा गर्भगृहाचा भाग आहे. या गर्भगृहात दगडी चौथऱ्यावर काळ्या पाषाणाची सुंदर विष्णूची मूर्ती कोरण्यात आली आहे. ही मूर्ती विष्णूची जरी असली तरी ती कन्हैयालाल महाराज म्हणूनच या भागात ओळखली जाते. या मंदिराला दोन प्रवेशद्वार असून पूर्वदिशेला असलेले प्रवेशद्वार हे मंदिरात प्रवेश करण्यासाठी वापरले जाते. तर दुसरे दक्षिण दिशेला असलेले प्रवेशद्वाराचा वापर मंदिरातून बाहेर निघण्यासाठी वापरला जातो. मंदिराच्या भिंती चौकोनी आकाराच्या असून भिंतीच्या मधोमध गणपतीच्या मुर्त्या कोरण्यात आल्या आहेत.तसेच भिंतीच्या वरती चौकोनी आकाराच्या जाड चौकटीच्या कमानीवर पाच लहान लहान खिडकीच्या आकाराच्या चौकटी तयार

करून त्यात वेगवेगळ्या देवी देवतांची मुर्त्या कोरण्यात आल्या आहेत.असे चार बाजूना एकूण वीस मुर्त्या कोरल्या आहेत.तर प्रत्येक बाजूला मध्ये भागी पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, अशा चारी देशांना माकडाच्या चार मुर्त्या बसवण्यात आल्या आहेत. प्रत्येक चौकोनाच्या कोपऱ्यावरील चार कोनावर लहान लहान चार स्थंभ बनवले असून त्या स्थंभावर च्यारी दिशांना चार वाघांच्या मुर्त्या बसवण्यात आल्या आहेत. या वाघस्थंभाच्या वरच्या भागावरच्यारी कोपऱ्यावर चार लहानलहान कळस बसवण्यात आले आहेत. मंदिराच्या मुख्य कळसा कडील भागाकडे वरती जातांना चौकोनाचे रुपांतर अष्टकोनात व अष्टकोनाचे रुपांतर सोळाकोनात होऊन शेवटी शिखरावर वर्तुळाकार वरवर निमुळते होत जाणारे मुख्य टोकदार कळस असलेले हे सुंदर मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे.

**३) मूर्ती शास्त्राचे वैशिष्ट्ये :-**

आमळी येथील कन्हैयालाल महाराजांच्या मूर्तीची रचना शिल्पकाराने एवडी सुरेख व रेखीव पद्धतीनेबनवली आहे.की काळ्या पाषाणावर कोरलेली सात फनी शेषनागावर निद्रावस्थेत असलेला विष्णूचा उजवा पाय लक्ष्मीने आपल्या मांडीचा आधार देऊन हातात पकडला आहे. या वरून या मूर्तीची अशी आख्यायिका आहे की विष्णूच्या उजव्या पायात काटा रुतला असून त्या काट्याला पायातून काढण्यासाठी काटा पायात कुठे रुतला हे न्याळतांना लक्ष्मीचे सुंदर शिल्प प्रभावी व तेवढेच उच्च कोठीचेशिल्पकाराने कोरलेले आहे. काळ्या पाषाणावर कोरलेले हे शिल्प रेखाटतांना शिल्पकार तेवढ्यावरच न थांबथा त्याने या शिल्पच्या "मूर्तीच्या वरच्या भागावर सागरमंथन आहे. त्याखाली विष्णूचे अवतार रेखाटण्यात आले आहेत. मूर्तीच्या खालच्या बाजूला नवरत्न असून एक हत्ती कोरण्यात आला आहे."[३] या मंदिरातील सर्वात आगळे वेगळे व आज पर्यंत कोणालाही न उलगडता येणारे मूर्तीचे खास वैशिष्ट्य म्हणजे या मूर्तीच्या बेम्बीतून सतत २४ तास पाणी झिरपत असते. हे पाणी नेमके कोठून येते. याचा उलगडा मात्र आजही कायम आहे.काही अभ्यासकांनी याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला यासाठी मूर्तीला "मूळ स्थानावरून उचलून प्लयास्टिकचे कागदावर ठेवली. तर कागदावर पाणी जमले. म्हणजे भूगर्भातून ते मूर्तीचे आसनापर्यंत येत नाही हे निश्चित झाले."[४]मूर्तीतून सतत पाझरणारे पाणी हे त्याच मूर्तीत तयार होत असावे हे येथे स्पष्ट होते. दुसरा प्रश्न राहिला तो मूर्तीत दिर्गकाळ अवितरीत पणे पुरेल एवडे पाणी या छोट्याच्या मूर्तीत साठून ठेवणेही शक्य वाटत नाही. वैज्ञानिक दृष्ट्या विचार केले असता. असा तर्क लावला जाऊ शकतो की "मूर्ती ज्या दगडाची आहे. अथवा तिच्यावर जो वज्रलेप दिला आहे. तो दगड अथवा लेप हा हवेतील आद्रत्ता शोषून घेतो आणि तेच पाणी थेंबाचे स्वरुपात / पाझरणारे पाणी ह्या रुपात दिसते."[५]हे तर्क काही प्रमाणात खरे वाटत असले. तरी ते वज्रलेप नसावे कारण वज्रलेप लावला असता तर अतिपुरातन काळापासून असलेल्या या मूर्तीचे पापुद्रे आतापर्यंत काही प्रमाणात का होईना पण निघायला सुरवात झाली असती. परंतू ही मूर्ती आजही जशीच्या तशी आवस्थेत आढळते. म्हणून या मूर्तीसाठी वापरलेले दगडच वैशिष्ट्यपूर्ण असावे. मूर्तीचे आणखीनच वेगळे वैशिष्ट्य असे सांगता येईल की या मूर्तीवर कोणत्याच ऋतूमानाचा परिणाम होत नाही. हिवाळा, पावसाळा, असो की कडक उन्हाळा असो. या मूर्तीतून पाझरणाऱ्या पाण्यावर कमी जास्त असे कोणतेच परिणाम होतांना दिसत नाही. कडक उन्हाळ्याच्या दिवसात तर शंभर दीडशे फुट जमिनीत खोल असणाऱ्या विहरीही जेथे कोरड्याखाक पडतात. तेथे मात्र मंदिराच्या चौथऱ्यावर असलेली ही मूर्तीचा ओलावा तसूभरही कमी होतांना दिसत नाही. हे एक अप्रतिम कला कौश्यल्याचे प्रतीकच म्हणावे लागेल. मूर्तीचे आणखीनही वेगळेपण म्हणजे मूर्तीतून सगळ्याच भागातून हे पाणी पाझरते. असेही नव्हे. तर निद्रावस्थेत असलेल्या विष्णूच्या मूर्तीतील

बेंबीच्या छोट्याच्या भागातूनच हे पाणी पाझरत असते. म्हणजेच जर या मूर्तीसाठी वापरलेला दगडच हवेतील आद्रक्ता शोषून घेत असेल व त्याचे पाण्यात रुपानंतर होऊन पाणी पाझरत असल्याचे तर्क लावला. तरी हे पाणी सर्वच भागातून पाझरायला पाहिजे होते. परंतू ते फक्त बेंबीच्या विशिष्ट भागातूनच पाणी पाझरत असल्याने मुर्तीबनवतांना मुर्तीकाराने किती मुर्तीशास्त्राचे कौशल्य पणाला लाऊन ही  मूर्ती तयार केली असेल.हे त्याच्या कौश्यल्या वरूनच समजते. पुरातन काळातील मूर्तीकारांना मुर्तीशास्त्राचे ज्ञान किती उच्च कोठीची होते. हेआमळी येथील मूर्तीतून सतत पाझरत असणाऱ्या पाण्याचे आजही न उलगडणाऱ्या कोडावरून समजते. म्हणून आमळी येथील मुर्तीशास्त्र महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात वेगळेपण सिध्द करणारे आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. परंतू ऐतिहासिकदृष्ट्या या  मंदिरातील मुर्तीशास्त्र उजेडात येऊ न शकल्याने मुर्तीशास्त्राच्या आभ्यास हव तसा  आजही झालेला दिसत नाही.

**४) इच्छापूर्ती गोटा (दगड)**

आमळी येथील कन्हैयालाल महाराजाच्या मंदिराच्या बाहेर एक अंडाकृती आकाराचा इच्छापूर्ती दगडी गोटा आहे. हा दगडी गोटा माणसाच्या इच्छापूर्ती होणार की नाही हे दर्शवण्याचा प्रयत्न करीत असतो. मंदिराला भेट देणारा प्रत्येक भक्त या इच्छापूर्ती गोटा दोन्ही हातांनी वरती उचलून आपल्या इच्छा पूर्ण होणार की नाही. याची अनुभूती घेतल्या शिवाय जात नाही. इच्छापूर्ती दगडी गोटा हे वैज्ञानिक दृष्ट्या विचार केले असता अंधः श्रद्धेचा भाग वाटत असला. तरी तेथे जाणाऱ्या भाविकांचे या दगडी गोट्यावर श्रध्दा व विश्वास असल्याने ते आपली इच्छा जाणून घेण्यासाठी दगडी गोटा वरती उचलून पहातात. “हा दगड उभाच्या उभा उचलून बघायची गंमत आहे. उभा उचलला गेला तरच मनातील इच्छा पुरी होते,असे श्रद्धाळू मानतात.”[६] या दगडी गोट्याचे वजन २० ते २५ किलोचे असून त्याचा आकार गोल अंडाकृती असल्याने तो सहजतेने हातात पकडता येत नसल्याने तो वाकडा तिकडा न उचलता सरळ उचलला गेला तरच इच्छा पूर्ण होत असल्याने त्याला उचलतांना भाविकांना मोठी कसरत करावी लागते.या गोट्याची अनेकांनी खरी अनुभूती घेतली आहे. असे अनेक उदाहरण या परिसरात ऐकायला मिळतात. यावरून असे वाटते की या दगडी गोट्याची ही जडणघडण अशा पद्धतीने बनवली आहे. की माणसाच्या मनातील इच्या सांगतांना त्याच्या मनातील भावना गोटा उचलतांना कशा असतात यावरून त्यांची गोट्यावरील पकड सैल (ढिल्ली) किंवा घट्ट होत असावी व ज्याचे संपूर्ण इंद्रिय एकाग्राताने एकत्र येऊन गोटा उचलत असल्यास ते सरळ उचलले जात असावे अन्यथा एकाग्रता नसल्याने तो गोटा वाकडा तिकडा होत असल्याने भविष्यात होणाऱ्या घटनांचा अंदाज खरा किंवा खोटा हे त्यांच्या सकारात्मक व नकारात्मक विचारसरणीच्या अनुबंधनातून ठरत असल्याने या गोट्याची अनुभूती सर्वांनाच खरी वाटत असते. या वरून हे समजते की मंदिराच्या बाहेर असलेला दगडी गोटा नुसताच दगड नसून त्या दगडीगोट्यावरही मूर्तीशास्त्राचे मोठे अभ्यासपूर्ण कौशल्य वापरून  हा गोटा तयार केला असावा म्हणूनच आजही लोकांचे या दगडी गोट्यावरश्राद्ध व विश्वास आहे. हा गोटा पुरातन काळापासून येथे असावा असा अंदाज लावला जातो.

**५) पुरातन काळातील चाफ्याचे वृक्ष :-**

मंदिराच्या परिसरात देवाला लागणारे फुलांची व्यवस्था व्हावी यादुष्टीने “मंदिराच्या एका बाजूला अतिशय  जुने चाफाचे झाड आहे.या चाफ्याचे फूल स्थितीला बरोबर मूर्तीच्या पायाशी पडत असे. असे मानले जाते.”[७]पूर्वी मंदिर बांधलेले नसेल तेव्हा या चाफ्याचे फुले मूर्तीवर पडत असावेत परंतू आज मंदिर बांधलेले असल्याने हे चाफ्यचे फुले मूर्तीच्या पायावर पडतांना दिसत नाही. एकंदरीत देवाच्या

पूजेसाठी लागणाऱ्या फुलाची व्यवस्था ही तिथल्यातिथे परिसरातच उपलब्ध व्हावी या हेतूने चाफ्याचे झाड लावले असावे ते आजही तेथे पहावयास मिळते.

एकंदरीत मंदिराच्या अवतीभवतीच्या परिसराचा विचार केले असता. असे दिसून येते की मंदिराची रचना एक वैशिष्ट्य पूर्ण पद्धतीने केली असून मंदिरातील विष्णूची मूर्ती काळापाषणात आखीव, रेखीव व सुरेख पद्धतीने कोरली असून मंदिराच्या आवारात लहान लहान पाच ते सात मंदिरे असून त्यात हनुमान, शिव शंकर, नंदी, वशिवलिंगाच्या मुर्त्या आहेत. यामंदिर परिसरात भक्तांसाठी लागणाऱ्या आवश्यक बाबींचा विचार करून सर्वच सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे. पिण्याच्या व इतर कामासाठी लागणाऱ्या पाणीसाठी विहर व तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. तर दर वर्षाला दिवाळी नंतर खोपडी एकादशिला येथे मोठी यात्रा भरत असते. या यात्रेला महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात राज्यातून लाखोच्या संख्येने भाविक येतात.व कोट्यावधी रुपयाची उलाढाल अवघ्या तीन दिवसात होत असते.

**निष्कर्ष :-**

१) काळ्या पाषाणात कोरलेली विष्णुच्या मूर्तीची रचनाच अशा पद्धतीने करण्यात आली आहे. की पाण्याची व्यवस्था नसतांनाही मूर्तीतून सतत पाणी पाझरत असते.

२) आमळी येथिल मंदिरात विष्णूची मूर्ती असतांनाही हे मंदिर विष्णूच्या नावाने न ओळखले जाता. कन्हैयालाल महाराज म्हणूनच ओळखले जाते.

३) आमळी येथील मंदिराच्या बाहेर इच्छापूर्ती दर्शवणारा दगडी गोटा इतरत्र पाहवयास मिळत नाही.

४) मंदिराच्या परिसरात तलाव व विहिरीची व्यवस्था पूर्वी पासूनच करण्यात आली आहे.

**संदर्भ :-**


१) लोकसत्ता वृत्तपत्र २२ फेब्रुवारी २०१७

२) https://dhule.gov.in/mr/महत्वाचे ठिकाणे

३) www.youtube.com / 24taasnews

४) धाराशिवकर मुकुंद ‘ मंदिर शिल्प धुळे जिल्हा.’ प्रकाशन भांडारकर पब्लिकेशन प्रथम आवृत्ती २५ एप्रिल २०१३ पृ.क्र.७२

५) धाराशिवकर मुकुंद ‘ मंदिर शिल्प धुळे जिल्हा.’ प्रकाशन भांडारकर पब्लिकेशन प्रथम आवृत्ती २५ एप्रिल २०१३ पृ.क्र.७२

६) https://www.loksatta.com/lokbhramanti-news/tourism-in-nandurbar-best-places-in-dhule-district-1415535/

७) लोकसत्ता वृतपत्र २२ फेब्रुवारी २०१७

# चारठाणा येथील मानस्तंभ व त्यावरील शासनदेवता

**लक्ष्मीकांत सोनवटकर**
चारठाणा ता. जिंतुर
जि. परभणी
(मूर्तीशास्त्र अभ्यासक)

मराठवाडा हा शिल्प आणि स्थापत्याची खाण असून वेरूळ लेणी स्थापत्यानंतरच्या काळात पुढे १२ व्या शतकापासुन मुख्य प्रवासी मार्गांवर 'गाव तिथे मंदिर' असे दिसून येते. चारठाणा हे मराठवाडयातील परभणी जिल्हयातील जिंतुर तालुक्यातील मोठे गाव असुन या ठिकाणी उत्तर चालुक्य कालीन व यादव कालीन मंदिरे आहेत. औरंगाबाद-हैद्राबाद महामार्गावर औरंगाबादपासुन १४० कि. मी. अंतरावर असलेले चारठाणा हे गाव मंठा आणि जिंतुर यांचे मध्ये मंठ्या पासुन पुर्वेस २० कि. मी. अंतरावर आहे.

चारठाणा येथे यादव काळात प्रामुख्याने वसाहतीचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला गेला. येथे शैव, शाक्त व गाणपत्य उपासकांची वस्ती होती. त्यातुन विविध मंदिरे उभारण्यात आली. ही मंदिरे हिन्दुंची व जैनांची होती.**(१)**गावाच्या मध्यभागी देशपांडे गल्ली जवळ एक मोठा 'दगडीस्तंभ' प्राचीन काळात उभारलेला असुन त्याची रचना गावात असलेल्या इतर मंदिरातील स्तंभासारखीच असुन मात्र तुलनात्मक दृष्टया मंदिराच्या स्तंभापेक्षा ३ पट मोठा आहे. सदरील स्तंभाची उंची ३१.६. फुट असून शिरोभाग ते कुंभपट २६.८ फुट तसेच कुंभपट समोरील प्रदक्षिणापथ ते पाया असे स्तंभासनपिठ याची एकुन ऊंची ४.८ फुट आहे. पिठ किंवा चौथरा ६x६ फुटाचा असून मूर्ती असलेला तळखडा ३.५ फुट उंचीचा व ५ फुट रुंदीचा आहे.

स्तंभाच्या कुंभपटावर किंवा खालील बाजुस असलेल्या तळखडयावर चार दिशांना प्रत्येकी एक देवतामुर्ती कोरलेली असुन स्तंभाच्या**(2)**पद्म भागात वरच्या बाजुला चार दिशांना प्रत्येकी दोन अशा एकुन ८ देवता कोरलेल्या आहेत. स्तंभावरील सर्व शिल्पे ही स्त्री देवतेंची असुन त्यांची एकुन संख्या १२ आहे.

काश्यपशिल्प या ग्रंथातील वर्णनानुसार तुलना केल्यास चारठाणा येथील दगडीस्तंभ 'शिवछंद' प्रकारात मोडतो, खालच्या भागात चौकोनी, मध्यभागी अष्टकोनी व त्याचा वरचा भाग गोल असे भाग असतात की त्यांनी खांबाचे तिन भाग होतात. अशा खांबाना 'शिवछंद' म्हणतात. शिवालयात याची स्थापना करावी असा उल्लेख येतो**(३)**

प्राचीन काळात जे स्तंभ उभारल्या गेले आहेत त्यात विजयस्तंभ, स्मृतीस्तंभ, किर्तीस्तंभ, मानस्तंभ, गरुडस्तंभ आदी प्रकार दिसुन येतात. मध्य भारतात विदिशा इथे 'हेलीयोडोरस' याने विष्णु मंदिरा समोर गरुडस्तंभ उभारल्याचे उल्लेख आहेत.**(४)**मराठवाडयात वेरूळ येथील कैलास लेणी, जैन लेणी येथे स्तंभ कोरलेले आहेत तसेच पैठण येथे देखील विजयस्तंभ पहावयास मिळतो. त्या शिवाय असलेला चारठाणा येथील दगडीस्तंभ हा एकमेव म्हणावा लागेल!

चारठाणा येथील गोकुळेश्वर मंदिर, उकंडेश्वर महादेव मंदिर, खुराची देवी मंदिर, नृसिंहतिर्थ मंदिर व हा दगडीस्तंभ यांचा दगड एकच असुन त्या वरिल शिल्पांची धाटणी देखील साम्यता दर्शविते. नृसिंहतिर्थ मंदिरावरील एका शिलालेखच्या आधारे एस. जी. तुळपुळे

यांनी नृसिंहतिर्थ मंदिर चा निर्मितीचा कालखंड इ. स. १२०२ तथा शके ११२४ असा निश्चित केला आहे.**(5)**

इ. स. १९५२-५३ मध्ये हैद्राबाद पुरातत्व विभागातर्फे या दगडी स्तंभाजवळ उत्खनन केले गेले. त्यात दगडी फरशीवर महावीर वर्धमानाच्या सुमारे ६ फुट उंचीच्या काही मुर्ती सापडल्या. परंतु त्या मुर्तीचा दगड व शिल्पकला येथील मंदिरातील शिल्पांशी मिळतीजुळती नाही असे इतिहासकारांचे मत आहे. पुराणवस्तू संशोधन खात्याने या उत्खननात सापडलेल्या सर्व मूर्ती सरस्वतीच्या एका सुंदर मुर्तीसकट जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयात हलविल्या**(6)**मात्र आजच्या स्थितीला तिथे स्तंभाजवळ महाविर तिर्थकरांचे मुर्तीचे पिठासन सापडले आहे ते स्तंभाच्या दक्षिण भागाच्या प्रदक्षिणा पथावर ठवेलेले आढळून आले. तसेच या दगडीस्तंभाच्या उत्तरेला असलेल्या वाडयात एक भग्न, तिर्थकर मुर्ती दगडी पवळीवर पडलेली आढळून आली. तसेच स्तंभाच्या पश्चिमेला शिरोविरहीत ३ फुट व्दिभुज पुरूष मुर्ती पडलेली असुन पोट सुटलेली ही मुर्ती जैन यक्षाची असु शकेल. या स्तंभाच्या पुर्व बाजुस एक भव्य मंदिर असावे हे तिथे आज उपलब्ध असलेल्या अवशेषांवरून वाटते. ७ ते ८ वर्षापूर्वी या स्तंभाच्या पुर्वेस असणारा वाडा खोदत असतांना या वाडयात पुर्वाभिमुख मकरप्रणाल आढळून आली होती. तसेच स्तंभाच्या पश्चिमेस एका लहान मंदिराचा पाया व फरशी आढळून आली होती. अनाधिकृतउत्खनन व तेथून ट्रॅक्टर ने आन केल्यामुळे अगदी अलीकडच्या काळात हा प्राचीन ठेवा नष्ट झाला.

आजुबाजुला कोणतेही मंदिर आजघडीला उपलब्ध नसल्यामुळे या स्तंभाला हिन्दु मंदिरासमोरील स्तंभ म्हणावे की, जैन मंदिरासमोरील मानस्तंभ म्हणावे? हा प्रश्न निर्माण होतो. मात्र या दगडी स्तंभावरील कुंभपट भागातील मुर्तिचे बारकाईने निरिक्षण केल्यावर या देवतामुर्तीच्या देवकोष्टांवर निरिक्षण केल्यावर या देवतामुर्तीच्या देवकोष्टांवर वरच्या भागात ध्यानमुद्रेतील जीनबिंब किंवा तिर्थंकर प्रतिमा स्पष्ट दिसतात. या सर्व बाबींचा एकत्रीत विचार केल्यास जैन-स्थापत्यशास्त्राप्रमाणे व मुर्तिशास्त्र प्रमाणे हा जैन मानस्तंभ सिध्द व्हावा इतपत पुरावे आढळून येतात. मात्र काही अभ्यासकांचे मते या स्तंभावरील शिल्पे ही सप्तमातृकांपैकी असुन त्यांची वाहने खाली कोरलेली आहेत. मात्र या बाबत एक बाब स्पष्टपणे मांडता येईल की, मातृदेवता या 'शक्ती' असुन त्यांचे शिरोभागावर ध्यानस्त योगी कोरलेला आढळूनयेत नाही. सप्तमातृकापटांवर देखील ध्यानमुद्रेतील प्रतिमा चारठाणा गावात किंवा आजुबाजुंच्या गावातील स्थापत्यात आढळून येत नाही. तेंव्हा या दगडी स्तंभाला 'मानस्तंभ' म्हणण्यास वाव आहे.

स्थानीक लोकांच्या म्हणण्यानुसार व परभणी जिल्हा गॅझेटीयर मधील उल्लेखानुसार, स्तंभाशेजारील दक्षिणे कडील भिंतीवर उभेराहून या स्तंभास धक्का दिल्यास तो संपुर्ण हलतो. म्हणून त्यास 'झुलतास्तंभ' असे म्हणतात**(7)**मात्र सदय स्थितीला ही भिंत अस्तीत्वात नाही, तसेच या स्तंभाची रचना, दगड एकमेकांना सांधन्यासाठी वापरलेल्या खाचा व त्यात ओतलेले लोखंड बघता, हा स्तंभ झुलतास्तंभ नाही. मात्र हा स्तंभ हलविण्याचा प्रयत्न करणाऱ्याची नजर आकाशाकडे असल्यामुळे व तो स्वत: हालत असल्यामुळे दृष्टीभ्रम होवुन स्तंभ हलत असल्याचा भास निर्माण होत असावा.

**पूर्व कुंभपटावरील मुर्ती:** दगडी स्तंभाच्या पूर्व बाजुस पूर्वाभिमुख असलेली स्त्री देवतामुर्ती कोरलेली असुन ती दोन्ही बाजुस स्तंभ असलेल्या व अमलकासहीत शिखरयुक्त देवकोष्टात विराजमान आहे. स्त्री देवतेच्या मस्तकाच्या वरच्या भागात असलेल्या देवकोष्टाच्या भागात मध्यभागी जीनबिंब असुन त्यातील पुरुषाकृती ४x४ से.मी.आकाराची असुन ध्यानमुद्रेत व वज्रासनात बसलेली आहे. या जीनबिंबामुळेच या स्त्री देवतामुर्ती या जिनशासन देवता असाव्यात असे वाटते. देवकोष्ट १८x३१ इंच व जिन शासन देवतामुर्ती १७ इंच उंची x ११ इंच रुंदीची आहे. कुंभपटावरील ४ देवता सारख्याच मोजमापाच्या असुन देवकोष्टे ही त्याच प्रमाणात सारखी आहेत.

**आयुधे -** प्रदक्षिणाक्रमाने,उजवा खालचा हात भग्न असुन त्या हातात खड्ग असावे त्याची मुठ स्पष्ट दिसुन येते उजव्या वरच्या हातात चक्र असुन डावा वरचा हात भग्न आहे तसेच डावा खालचा हात देखील भग्न आहे.

**वाहन -** अंजली मुद्रेतील,मनुष्य रुपात असलेला,उजवा पाय मुडपलेला डावा पाय गुडघ्यात वाकवलेला गरुड दाखविला आहे.

**तिर्थंकर-** प्रथम तीर्थंकर ऋषभनाथ यांची चक्रेश्वरी शासन देवता आहे.

दिंगबर आणि श्वेतांबर ग्रंथानुसार हीचे वाहन गरुड असुन अपराजीतपृच्छा व रुपमण्डन या ग्रंथानुसार देखील चक्रेश्वरीचे वाहन गरुड सांगीतले आहे. चक्रेश्वरी चतुर्भुजा,अष्टभुजा व्दादशभुजा स्वरुपात आढळते. दिंगबर परंपरेनुसार गरुडासन स्थितीत असतांना ती चतुर्भुज असते.

या मुर्तीचे हात व आयुधेभग्न झालेली असली तरीही उजव्या हातातील चक्र व गरुड वाहन पाहता ही जिवनशासन देवता तथा याक्षिणी 'चक्रेश्वरी' असावी.

**उत्तर कुंभपटावरील मुर्ती** :- मानस्तंभाच्या उत्तरे कडील कुंभपटावरील उत्तराभिमुख मूर्ती चतुर्भुज असुन हातांमध्ये बाजुबंद,कंकणे,मोठाली कर्णफूले,डोक्यावर करंडमुकुट घातलेला असुन मस्तकाभोवती प्रभावलय असुन देवता सव्यललीतासनात बसलेली आहे.

**आयुधे :-**प्रदक्षिणाक्रमाणेउजवा खालचा हात वरदमुद्रेत उजवा वरचा हात भग्न, डावा वरचा हात भग्न तर डावा खालचा हात देखील अर्धवट भग्न असुन या हातात बिजपुरक असावे हे कळण्याइतपत अवशेष शिल्लक आहे.

**वाहन:-** उंच मान असलेला पक्षी दिसत असुन त्याची रचना पहाता तो कोंबडा व सर्प यांचं मिश्रण असलेला 'कुर्कुट सर्प' असावा.

**तिर्थंकर**:- २३ वे तिर्थकर पार्श्वनाथ यांची यक्षिणी तथा जिन शासन देवता पद्मावती असुन या देवतेचा 'तिलोयपण्णती' मध्ये पदमा असा उल्लेख आहे. इंद्रनंदी आणि मल्लीषेण यांनी देखील पद्मा नावानेच स्मरण केले आहे. अपराजितपृच्छा मध्ये पद्मासना आणि कुक्कुटस्था तथा रुपमंडणामध्ये कुर्कोटोरगस्था असे पद्मावती बाबत विधान येते. श्वेतांबर ग्रंथानुसार त्रिषष्टिशलाकापुरुष चरित्र आणि आचारदिनकर मध्ये पद्मावतीला कुर्कुटसर्पावर आसनस्थ म्हटले आहे. पदमावतीच्या भुजांबाबत जैन मतात मतभिन्नता दिसुन येते.वसुनंदी आणि नेमिचंद्र यांनी पद्मावतीस चार,सहा,चोवीस भुजांची म्हटले आहे. आशाधर यांनी चार,सहा,आठ भुजा पद्मावतीस असतात असे म्हटले आहे. श्वेतांबर ग्रंथात पद्मावतीस चतुर्भुजाच म्हटले आहे. नेमीचंद्र यांचे मतानुसार पद्मावतीची आयुधे उजव्या हातात अक्षमाला आणि वरदमुद्रा तर डाव्या

हातात अंकुश व कमळ असतात. रुपमण्डन मध्ये पदम,पाश,अंकुश,बिजपुर अशी आयुधे**(8)**सांगीतली आहेत. आशाधर व श्रीचंद्रसुरि यांनी त्रिफणसर्पमौलि तथा मल्लिषेण यांनी पन्नगाधिपशेखर आदि विशेषणाद्वारेसुचित केले आहे की, पद्मावतीच्या मस्तकावर सर्पफणा चे छत्र असते मात्र चारठाणा येथील मुर्तीवर सर्पफणा दिसुन येत नाही. एकंदरीत सर्व संदर्भ पाहता आयुधे भग्न झालेली असली तरीही देवकोष्टांवरील जिनबिंब, शिल्लक असलेली वरदमुद्रा, कुर्कुटसर्प वाहन या वरून ही देवता पद्मावतीच असावी.

**पश्चिमकुंभपटावरील मूर्ती :-**मानस्तंभाच्या पश्चिमेकडील कुंभपटावरील पश्चिमाभिमुख मूर्ती व्दिभूज असुन ललीतासनात बसलेली आहे. तीच्या डाव्यामांडीवर मुल असून तीने डाव्या हाताने त्याला पकडले असुन देवतेचा उजवाहात भग्न झालेला आहे. डोक्यावर आम्रवृक्षाचा भाग दाखविला असुन देवतेच्या कर्णाभुषणांचा आकार मोठा व जाडजुड आहे. गळ्यात हार, बाजुबंद कंकण वगेरेअलंकार आहेत. देवता अधोवस्त्रांकीत असुन तीच्या उजव्या बाजुला छत्र घेतलेला, दाढी असलेला एक पुरूष अंकन केलेला असून त्या खाली अजुन एक मानवी आकृती आहे ती हात जोडलेली दिसुन येते.

**आयुधे :-** उजवा हात भग्न असुन डाव्या हाताने शुभंकर मुलाची मांडी पकडलेली आहे.

**वाहन :-** डावा पाय पुढे आणि उजवा पाय थोडा वर उचलुन जमीनीच घट्ट पकड घेत आक्रमक अवस्थेतील सिंह हे वाहन कोरलेले आहे.

**तिर्थंकर :-** २२ वे तिर्थंकर नेमिनाथ यांची यक्षीणी आम्रा किंवा अंबिका मानली जाते.

दिगंबर परंपरेनुसार ही देवता व्दिभूज असुन या श्वेतांबरमतानुसार ती चतुर्भुजा आहे. वसुनंदी, आशाधर आणि नेमिचंद्र यांनी या यक्षीचा उल्लेख ‘आम्रा’ नावाने केला आहे. श्वेतांबर मतानुसार या देवीस शुभचंद्र आचार्य यांच्या मतानुसार अम्बा, आम्रकुष्मांडी, अंबिका, तारा, गौरी, वज्रा आदि नावे आहेत**(9)**अपराजीतपृच्छानुसार बावीसवे तिर्थंकर यांची यक्षी ची नावे चामुंडा व अंबिका अशी दोन्ही आहेत. आशाधर यांचे नुसार या यक्षीचे वाहन सिंह असून या वाहना विषयी पुर्वजन्म कथानक आहे. आाशाधर यांचे मतानुसार आम्रा देवी आम्रवृक्षाच्या छायाखाली बसलेली असुन नेमिचंद्र यांचे मतानुसार देवी आम्रवृक्ष छायेखाली बसलेली डाव्या मांडीवर आपला पुत्र प्रियंकर यास ठेवलेले आहे असे सांगीतले आहे. आाशाधर यांचे मते अंबिकेचा उजवा हात तिचा पुत्र शुभंकर याचा हातात हात दिलेला असावा तर डाव्या हाताने पुत्र प्रियंकर यास डाव्या मांडीवर आधार देवुन आम्रलुंबी पकडलेल्या स्थितीत असावी. सर्व संदर्भ पाहता ही मूर्ती आम्रा किंवा अंबिकाचीच असावी.

**दक्षिण कुंभपटावरील मुर्ती :-**मानस्तंभाच्यादक्षिणेकडील कुंभपटावरील दक्षिणाभिमुख मूर्ती अष्टभूज असुन, करंडमुकुट, गळ्यात हार, बाजुबंद, कंकणे, मस्तकाभोवती प्रभावलय व ललीतासनात बसलेली असुन देवकोष्टांवर जिनबिंब कोरलेले आहे.

**आयुधे :-**प्रदक्षिणाक्रमाणे उजवा खालचा वरद, बाण, पाश(भग्न), खडग् तसेच डावा वरचा खेटक, सुरा, चक्र(भग्न), बिजपुरक

**वाहन:-** वृष अथवा महीष

**तिर्थंकर:-** ८ वे तिर्थंकर चंद्रप्रभ यांची ही यक्षिणी आहे.

दिगंबर परंपरेनुसार ही मुर्ती ज्वालामालिनी (भृकुटि) ची असुन प्रतिष्ठासार संग्रह या ग्रंथानुसार ही प्रतीमा अज्ञात कलाकाराने कोरण्याचा सुरेख प्रयत्न केला आहे**(10)**

श्वेतांबर ग्रंथामध्ये आठव्या तिर्थकरांची यक्षीणी चे नाव भृकुटी सांगीतले जाते. दिगंबर मते ज्वाला यक्षीणी चे वाहन महिष असुन अपराजितपृच्छे नुसार ज्वालामालीनी पद्मासना आणि वृषारुढा म्हटली जाते.

इंद्रनन्दी यांनीज्वालीनीकल्प मध्ये हीची आयुधे त्रिशुल, पाश, मत्स्य, धनुष्य, बाण, फळ, वरद आणि चक्र अशी सांगीतली आहेत. आशाधर आणि नेमिचंद्र यांनी उजव्या हातात शुल, बाण, मत्स्य, खड्‌ग तर डाव्या हातात चक्र, धनुष, पाश आणि खेटक अशी सांगीतली आहेत.**(11)**

सर्व संदर्भ पाहता ही देवता ज्वालामालिनी (भृकुटी) ची असावी. जैन धर्मातील श्वेतांबर दिगांबर मतमतांतरे मुर्तिबाबत भिन्नभिन्न आयुधे व वाहनांचे भेद यामुळे तसेच ग्रांथीकभेदामुळे चारठाणा मानस्तंभावरील शासन देवता, त्यांची वाहने व आयुधे व ग्रांथिक उल्लेख यांचा ताळमेळ बसत नाही या उपरोक्त मुर्तितील छुरीका किंवा सुरा यांचे संदर्भ सापडत नाहीत.

**मानस्तंभाच्या पद्म भागातील आठस्त्री मुर्ती:-**

**१.मानस्तंभाची पूर्व बाजु :-** पूर्वाभिमुख असलेल्या या भागावर पुर्वेकडे तोंड असलेल्या दोन स्त्रीमुर्ती असुन स्वतंत्र देवकोष्ट करुन मध्यभागी छोटे स्तंभ कोरून त्यांचे स्वतंत्र अस्तीत्व दाखविले आहे.

**प्रथम :-** हंस वाहीनी तसेच वरद, अंकुश, पाश व बिजपुरक घेतलेली मुर्ती असुन ती प्रज्ञप्ती किंवा **जिनवाणी (सरस्वती)** म्हणून ओळखली जाते. काही जिनाचार्य यांचे वर्णनानुसार पाशांकुशधारीणी पद्मावती म्हणून देखील ओळखली जावु शकते.

**व्दितीय** :- वाहन थोडे भग्न असुन शिल्लक अवशेषांवरुन ते मोर किंवा हंस असावे हातातील आयुधे अक्षमालेसहीत अभयमुद्रा, विणा, फुल(कमल), पुस्तक अशी आहेत. ही मुर्ति देखील आयुधावरून **जीन सरस्व्ती** किंवा पद्मावतीचेच थोडे भिन्न स्वरूप आहे. ग्रांथीक वर्णनात विणा आढळून येत नाही.

ज्या ऊंचावरील शिरोभागातील पटावर या मुर्ती कोरलेल्या आहेत त्या उर्ध व अधोभागी किर्तीमुख देखील कोरलेले आहेत.

**२.मानस्तंभाची उत्तर बाजु :-** डावीकडील प्रथम मुर्ति उत्तराभिमुख असुन वाहन हंस आहे आयुधे प्रदक्षिणाक्रमे वरद अंकुश, पाश, बिजपुरक अशी असून पुर्व बाजुवरील मुर्तिप्रमाणेच आहेत. पाशांकुशधारीणी ही जिन सरस्वती किंवा **पद्मावतीचाच** अवतार दिसतो.

उजवीकडील **व्दितीय** मुर्ति हंस वाहीनी असुन आयुधे प्रदक्षिणाक्रमे अभय मुद्रेसहीत अक्षमाला. विणा कमलकलीका (कमळ) वरदमुद्रेसह पुस्तक अशी आहेत. आयुधांवरून ग्रांथीक वर्णनात हीला नाव सापडत नाही मात्र ही देखील **जिन सरस्वती** किंवा पद्मावतीचेच भिन्न स्वरूप आहे.

**३. मानस्तंभाची पश्चिम बाजु :-** पश्चिमाभिमुख दोन स्त्री मुर्ति कोरलेल्या असुन प्रथम डावीकडील मुर्तिचे वाहन वृषभ असुन आयुधक्रम प्रदक्षिणामार्गे अभयमुद्रेसहीत अक्षमाला, त्रिशुळ, त्रिशुळ, बिजपुरक असा आहे. ही देवता सुपार्श्वनाथ तिर्थंकर यांची यक्षिणी **काली** शी मिळतीजुळती आहे काली ची आयुधे घंटा, फळ, त्रिशुळ, वरदान व वाहन वृषभ सांगीतला आहे.

**व्दितीय** उजवीकडील मुर्ति चे वाहन गरुड असुन आयुधक्रम प्रदक्षिणाक्रमानुसार अभय (अक्षयमालासह), चक्र, चक्र, बिजपुरक असून ही देवता अदिनाथ तिर्थंकर यांची यक्षिणी **चक्रेश्वरी** आहे.**(12)**

**४. मानस्तंभाची दक्षिण बाजु :-** दक्षिणाभिमुख २ स्त्री देवता कोरलेल्या असुन **प्रथम** डावीकडील देवतेच वाहन गरूड असून आयुधक्रम उजवा खालचा हात खड्ग, उजवा वरचा हात चक्र, डावा वरचा शंख, डावा खालचा बिजपुरक असा आहे. ही मुर्ति **चक्रेश्वरी** ची आहे.

**व्दितीय** मुर्ति उजवीकडील देवकोष्टातील सिंहवाहीनी व डाव्यामांडीवर मुल तसेच उजवीकडे मुल दाखविले असुन डोक्यावर आम्रवृक्षाची शाखा तसेच उजव्या हातात आम्रलुंबीका आम्रफलासहीत दाखविलेली आहे. ही मुर्ति **आम्रा** तथा **अंबिकेची** आहे.

**निष्कर्ष :-**

१. दगडीस्तंभावरील जिनबिंबे, आजुबाजुला पडलेले अवशेष, ग्रंथ संदर्भानुसार चारठाणा येथील हा स्तंभ जैन **'मानस्तंभ'** च आहे.

२. कुंभपटावरील पुर्वेकडील देवता **'चक्रेश्वरी यक्षिणी'**, उत्तरे कडील देवता **'पद्मावती यक्षिणी'** पश्चिमेकडील देवता **'आम्रा/अंबिका यक्षिणी'** तर दक्षिणेकडील देवता **'ज्वालामालीनी यक्षिणी'** आहेत.

३. स्तंभाच्या वरच्या शिरोभागात असलेल्या देवता

**पुर्व बाजुस -**

१. पाशाअंकुशधारीणी**जिन सरस्वती** पद्मावतीचे भिन्न स्वरूप.

२. विणा, पुस्तक धारीणी **जिन सरस्वती** पद्मावतीचे भिन्न स्वरूप.

**उत्तर बाजुस -**

**१.** पाशांकुशधारीणी **जिनसरस्वती** पद्मावती चे भिन्न स्वरूप.

**२.** विणा, पुस्तकधारीणी **जिन सरस्वती** पद्मावती चे भिन्न स्वरूप.

**दक्षिण बाजुस -**

**१.** चक्र, शंख धारीणी **चक्रेश्वरी**

२. आम्रलुंबिकाधारीणी **आम्रा/अंबिका**

**पश्चिम बाजुस -**

**१.**वृषभवाहीणी **काली**

२.गरुडवाहीणी **चक्रेश्वरी**.

या प्रमाणे या जिन शासन देवता तथा यक्षिणी असून देवतांच्या अंकनानुसार हा **मानस्तंभ** आहे, स्तंभावर असते तशीसर्वतोभद्र तिर्थंकर प्रतिमा सदयस्थितीला मात्रस्तंभावर दिसुन येत नाही.

**संदर्भ :**

१. मराठवाडा एक शोध -ले. डॉ. अरुणचंद्र पाठक -पा. क्र. ५९

२. काश्यपशिल्प -अनुवाद. डॉ. र. पु. कुलकर्णी -पान ५६

३. काश्यपशिल्प -अनुवाद डॉ. र. पु. कुलकर्णी -पान ४०

४. प्राचीन भारतीय स्तुप गुहा एवं मंदिर ले. प्रा. वासुदेव उपाध्याय. प्रकाशक: बिहार हिन्दी ग्रंथ अकादमी पटना - पान क्र. १९५

५. प्राचीन मराठी कोरीव लेख -क्र. ७५ ले. एस. जी तुळपुळे -क्र. ७५,
पान ३७९

६. महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर, परभणी जिल्हा - पान क्र. ६०६

७. जैन प्रतिमा विज्ञान, ले. बालचंद्र जैन. प्रकाशन : मदनमहल जनरल स्टोअर, जबलपुर -पान ८६

८. जैन प्रतिमा विज्ञान -ले. बालचंद्र जैन- पान क्र. १०३

९. अंबिका कल्प ७/२–३ रचनाकार शुभचंद्राचार्य

१०. महादेव्ये नमो नम: शक्ति देवतांची मुर्तरुपे ले. डॉ. किरण देशमुख, डॉ. दत्तात्रय जगदाळे निर्मल प्रकाशन नांदेड- पान क्र. १६९

११. जैनप्रतिमा विज्ञान -ले. बालचंद्र जैन -पान क्र. ६१

१२. भारतीय मूर्तिशास्त्र -ले. नि. पु. जोशी. -पान क्र. ४३४

# चालुक्य कलेचा अप्रतिम आविष्कार: सिद्धेश्वर मंदिर

डॉ. स्मिता साहेबराव शिंदे,
विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद

चालुक्यांचे बदामीचे चालूक्य आणि कल्याणीचे चालुक्य हे दोन राजवंश मराठवाड्यात नांदून गेले. बदामीच्या चालुक्यांच्या काळात तगर, प्रतिष्ठान, नांदेड, भोगवर्धन इत्यादीशहरांची व्यापारी केंद्रे व सांस्कृतिक क्षेत्रामध्येप्रगती झाली. राष्ट्रकुटांच्या पतनानंतर कल्याणीच्या चालुक्यांची सत्ताप्रस्थापित झाली इ.स.९७४तेइ.स.१२००हा कल्याणीच्या चालूक्यांचा कालखंड मराठवाड्याच्यादृष्टीने भाग्याचा होता. या काळात नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बीड या शहरांचाविकास झाला. त्यातही नांदेड शहरासाठी चालुक्यांची राजवट ही परम भाग्याचीठरली, कारण या काळात नांदेड येथे होट्टल, मुखेड, खानापूर,बा-हाणी, सुगाव,एकलारा, एरगी, करडखेड, सगरोळी व आदमपूर येथे अनेक मंदिरे बांधली गेली व मोठ्या प्रमाणातमूर्ती शिल्पे निर्माण झाली. कल्याणीचे चालुक्य राजे हिंदू धर्माचे उपासकअसल्याने त्यांनी शिव, विष्णू आणिनृसिंहाची मंदिरे बांधली.होट्टलयेथेअसलेल्या सर्व मंदिरातील सर्वोत्तम शिवमंदिर म्हणून ज्याचा उल्लेख होतो तेसिद्धेश्वर मंदिर या विषयी अधिक जाणून घेण्यासाठी हा शोधनिबंध लिहिण्याचाप्रयत्न केला आहे.

**होट्टल**

नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यात असलेले आजचे हेछोटेसे खेडेगाव होट्टल. या गावाला ऐतिहासिक परंपरा लाभली होती. या गावातचालुक्यकालीन तीन शिलालेख प्राप्त झाले.[१] या शिलालेखांतून या गावाचा राजकीय,धार्मिक, सांस्कृतिक इतिहास समजतो.होट्टल गावचे प्राचीन नाव पोट्टलहोटलूर[२]असे होते.पोट्टल या शब्दाचा अर्थ डोंगर होय.[३] हे गाव उत्तर कल्याणीच्याचालुक्यांची उपराजधानी होती. तसेच चालुक्यांचे मांडलिक राजे वन्हीराजकुलाची राजधानी होती.

वान्हीकुल किंवा पावककुल हे चालुक्यांचे मांडलिकराजकुल इ.स.९७३च्या सुमारास नांदेड परिसरात होते. या काळात मंडलिक राजांनामहामंडलेश्वर[४] अशी पदवी होती. हे प्रांतिक राज्यपालांचा योग्यतेचे होते. चालुक्य सम्राट जयसिंह यांच्या काळात दुय्यम राजधानी म्हणून होट्टलकेरे[५]यास्थानाचा उल्लेख करण्यात आला आहे.

**सिद्धेश्वरमंदिर**

हे मंदिर परमेश्वर मंदिरही म्हणून ओळखले जाते. चालुक्य घराण्यातीलराजा विक्रमादित्य सहावा याच्या काळात हे मंदिर बांधले गेले आहे . मंदिरातीलउपलब्ध एका संस्कृत शिलालेखानुसार हे मंदिर इसवी सन ११२० मध्येबांधले गेले आहे. [६] या शिलालेखात अश्व यूज अमावस्येच्या सूर्यग्रहणा निमित्त दिलेल्यादानाचा उल्लेख आढळतो. या शिलालेखात वन्हीराजा अर्ग व श्रेष्ठी सिद्धुगी यांनी मंदिर बांधल्याचा आणि कार्तिक पौर्णिमेला लक्ष्मणाने सदरील लेखलिहिल्याचा उल्लेख आहे.वान्हीराज्कुलातील राजा अर्ग उर्फ रेभेय (अर्गाच्या आईचे नावरेभेयदेवी होते.)याने आणि त्याचा (व्यापारी) मित्र वैश्यसिद्धुगीकिंवाश्रेष्ठी सिद्धगी यांनी हे मंदिर बांधले.अर्ग राजा २०००गावचा अधिपती होता. त्यापैकी त्याने एक हजार गावांचे उत्पन्न

या मंदिराला दान दिले.[७]वैश्यसिद्धुगीहा वान्हीराजकुलाचा अधिकारी, श्रेष्ठी व कल्याणी चालूक्यांचा महामंडलेश्वर होता. तो शिवभक्त होतातसेच होट्टल या गावचा रहिवासी होता. एकंदरीतच कल्याणीच्या चालुक्य राजाच्याया महामंडलेश्वरानी या जागेचे भौगोलिक महत्त्व लक्षात घेऊन हे शिवमंदिरबांधले. मराठवाड्याचे ज्येष्ठ संशोधक डॉ. प्रभाकर देव यांनी प्रथमत:१९६६मध्ये या देवळांचे सर्वेक्षण केले.

**मंदिराचीरचना**

सिद्धेश्वर मंदिर होट्टल गावात पश्चिमेस असून पूर्वाभिमुख आहे. यामंदिराला मुखमंडप, मंडप, अंतराळ, गर्भगृह असे मुख्य भाग आहेत. चार फूट उंचअसलेल्या या मंदिराला प्रदक्षिणापथआहे. मंदिर स्थापत्या साठी मोठ्याशिळांचा वापर करण्यात आला आहे. या मंदिराचा आराखडा

नक्षत्राकृती असून,मंदिराच्या कोनाकृती भिंती पायापासून वर पर्यंत ठाशीवपणे चढत गेल्या आहेत.मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख असून त्याची लांबी व रुंदी अनुक्रमे१५ x १० फूट आहे. मुखमंडपात असलेल्या दोन स्तंभानी प्रवेशद्वाराच्या छतालाआधार दिला आहे. या मंदिराला उत्तर,दक्षिण आणि पूर्वेला तीन मुखमंडप असून त्याच्या दोन्ही बाजूला सुबक कामकेलेले आहे.त्या ओट्यावर विविध प्रकारची शिल्पे आढळतात. त्या तीन फूटअकरा इंचाचे सुंदर नक्षीकाम केलेले स्तंभ आहेत. कोरीव कोनाड्याच्या नक्षीने नटलेल्या भिंती, छत तोलणारे अर्धस्तंभ यामुळे मुखमंडप सुरेख बनला आहे.

यामंदिराला ३५फूट लांब व रुंद असे मंडप आहेत. त्याला तीन प्रवेशद्वारअसून ते तीनही बाजूंना खुले आहेत. सभामंडपात मधोमध फुलांच्या आकारातीलमोठी रंगशीला कोरली आहे. सुबक नक्षी कामाने नटलेले चार स्तंभ येथे दिसतात. नऊ विभागात विभागल्याने मंडपात छत नवरंग प्रकारचे झाले आहे. तिरप्या तुळया रचल्याने चौकट आकार तयार झाला आहे. छतावर कीर्तिमुख आणि इतर भौमितिक आकाराचीनक्षी कोरली आहे. येथे पाषाणात घडवलेला सुंदर नंदीही आहे . मंदिराच्यादक्षिण व उत्तरेला दोन अर्ध मंडप असून येथूनही मंदिरात प्रवेश करता येतो.याद्वार मंडपाच्या अर्थात अर्धमंडपची लांबी व रुंदी अनुक्रमे १० x ०५ फूट आहे. मंडप आणि गर्भगृह यांच्या दरम्यान असलेल्या लहान खोलीस अंतराळअसे म्हणतात.या मंदिराला चौकोनी अंतराळ असून त्याची लांबी व रुंदी अनुक्रमे१५ x १० फूट आहे. अंतराळाच्या दोन्ही भिंतीवर देवळ्या कोरलेल्या आहेत. छतावर व्याल व कीर्तिमुख इत्यादी कलाकृती आहेत.अंतराळाच्याप्रवेशद्वारावर दोन्ही बाजूंना स्तंभपुत्तलिका कोरलेल्या दिसतात. या स्त्रीप्रतिमाम्हणजे द्वारपाल होय. त्यांच्या अंगावर कर्णकुंडल, कंकण, मेखला, नुपूर असेविविध दागिने आहेत. त्यांनी उत्तम केशभूषा केल्याचे दिसते. या स्त्रीप्रतिमा१३७सेंटिमीटर उंचीच्या असून त्रिभंग आहेत. द्वार शाखेच्या वरमकरांच्यानक्षीमध्ये म्हणजेच मकरतोरणांमध्ये अप्रतिम अशी नटराजाची मूर्ती कोरली आहे. गर्भगृह ज्याला बोलीभाषेत गाभारा म्हणतात. या मंदिराच्या गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर गजलक्ष्मी आहे. ही चालुक्य काळातील लोकप्रिय प्रतिमा होय.[८]ती कदाचित चालुक्यांची कुलदैवत असावी. गजलक्ष्मी च्या बाजूला चवरीधारी सेविका दाखविल्या आहेत. गाभारा साधा, सपाट भिंतीचा आहे. पायऱ्या उतरून गेल्यावर शिवलिंगस्थापल्याचे दिसते. गाभाऱ्याच्या बाहेरील भागातदोन फूट रुंदीचा प्रदक्षिणापथ आहे.गाभाऱ्याचा दरवाजा सहा शाखांचा असून स्थापत्य शास्त्रानुसार

मालिनी / मोहिनी प्रकारातील आहे. मंदिराच्या चार फूट उंचीच्या जोत्यावर उपान, पद्म, कणी, कुमुद यांचे नक्षीकाम दिसते.

**मण्डोवर**

मंदिराच्या बाह्य भिंतींनामण्डोवरअसे म्हणतात. या मंदिराच्या बाह्य भिंतीवर४५ , जगती (चौथरा ) यावर २४३अशी एकूण २८८ शिल्पे आहेत. मूर्तिकलेचाअप्रतिम अविष्कार जर कुठे पाहायला मिळत असेल तर तेआहे मण्डोवर. यामंदिराच्या मण्डोवरावर नृत्यांगना, आलासिका , शीलालेखिका,पुत्रवल्लभा यासुरसुंदरी नीरनिराळी वाद्य वाजवणा-या अप्सरा , अंधकासुर वध, हत्ती, सिंह या शिल्पाशिवाय एरव्ही बसलेला गणपती बघण्याची आपल्याला सवय असते, पण येथे नृत्य करणारा गणपतीनजरेत भरल्याशिवाय राहत नाही. शिवाचे तांडवनृत्याचे शिल्पही अप्रतिम आहे. या शिल्पांमधून निरनिराळी वाद्ये, वेशभूषा, केशभूषा, अलंकार इत्यादीचे दर्शनहोते. येथील काही शिळा या संगीत शिळा आहेत त्यातून सारेगमपधनिसा हे सप्तस्वरही प्रतीध्वनित होतात.

**समारोप/**निष्कर्ष

मराठवाड्याच्या सांस्कृतिक इतिहासात कल्याणीच्या चालुक्यांचेयोगदान फार मोठे आहे. बांधीव मंदिर स्थापत्य, अलंकार, वेशभूषा यावरचालुक्यकालीन कलेचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. छतावर अष्टदिग्पाल कोरण्याचीपद्धती, गुडमंडपाला जाळीदार आणि नक्षीकाम केलेल्या शिळांच्याभिंती, उंच जोते ,भौमितिक आणि फळा फुलांच्या आकृतीची कलाकुसर. इत्यादी गोष्टींमधून चालुक्यकालीन कला आपले वेगळेपण दर्शविते. चालुक्य येथील सांस्कृतिक इतिहासात भर घातलीच आहे पण तत्कालीन धार्मिक, सामाजिक वराजकीय बाबींचा उलगडा देखील केला आहे.

**संदर्भ:**


1. RittiShrinivas and Shelake G.C.(Edi),op.cit, No.12,22
2. Ibid P 22
3. डॉक्टरठोसर हरिहर, प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व, काळे भगवान संपादित मराठवाडाकाल आणि आज, जालना, संकेत प्रकाशन, १९८६पृष्ठ ६४
4. RittiShrinivas and Shelake G.C.(Edi),op.cit, Introduction P No.12,22
5. डॉक्टर कठारे, डॉ.साखरे, मंदिरेआणि मूर्तीशिल्प, अल्फा पब्लिकेशन २००८, पृ.१४.
6. EpigraphicaIndia- Vol-xxxVI, P-64
7. प्रा. पाटील, साबणे, डॉ.कठारे , प्राचीन शिव आणि जैन मंदिरे, पूनम प्रकाशन , कंधार,२०१०पृष्ठ २७
8. डॉ.काळे- पाटसकर महाराष्ट्राची मंदिर शैली, डायमंड पब्लिकेशन २००९पृष्ठ २१
9. डॉक्टर कठारे, डॉ.साखरे, मंदिरेआणि मूर्तीशिल्प, अल्फा पब्लिकेशन २००८, पृ.१७

# नेमगिरिच्या लेण्या, जिंतूर

**श्री. बोरकर विनोद सखाराम**
रा. जिजाऊ कॉम्प्यूटर, जिजामाता नगर, हिंगोली
ता. जि. हिंगोली ४३१५१३

शिल्प्, वस्तू व चित्र या तीनही कलाच्या अभ्यासाला मूर्तीशास्त्र म्हटले जाऊ शकते. शिल्पकला हा मूर्तीशास्त्राचा भाग आहे. तसेच शिल्पकला व मंदीर स्थापत्य् यांचा जवळचा संबंध आहे. मूर्तीशास्त्राचा इतिहास हा बराच प्राचीन आहे. ग्रीक कलाकारांनी प्राथमिकपणे शरीरशास्त्राचा अभ्यास करून वास्तववादी मूर्ती घडवायला सुरूवात केली. त्या आधी इजिप्त् येथील संस्कृतीचे पुरावे आढळून येतात. मौर्य साम्राज्य् भारतात असताना इसवी सन पूर्व ४ थ्या शतकापासून भारतात मूर्ती बनवायला सुरूवात झाली. राष्टकूट व यादव या सत्तांच्या काळात भारतात मूर्तिघडण शास्त्रात प्रगती झाली. बौध्द काळात या शास्त्राची विशेष भरभराट झाली. आपन मूर्ती व शिल्प् हया संशोधना अंतर्गत परभणी जिल्हातील तालुका जिंतूर शहराजवळल वसलेल्या नेमगिरी नावांच जैन धर्मीय तीर्थक्षेत्र किंवा नेमगिरीच्या जैन लेण्या यांचा हया शोध निबंधातून चित्किसक अभ्यास करणार आहोत.

**उध्दिष्टये :**

१ ) मूर्ती आणि शिल्पकलेचा अभ्यास करणे.
२ ) जैनपूर ( जिंतूर ) येथील ऐतिहासिक स्थितीचा अभ्यास करणे.
३ ) जैन धर्माचा अभ्सास करणे.
४ ) जैन धर्मातील जैनपूर किंवा जिंतूर येथील लेण्याचा अभ्सास करणे.

**शिल्पकला** म्हणजे संगमरवरासारखे दगड, धातू, लाकूड इत्यादी कठीण पदार्थ किंवा माती पदार्थ किंवा माती, मेण, पॉलिमर इत्यादी मऊ पदार्थांना आकार देऊन , जोडून अथवा कोरुन त्रिमितीय आकृती बनवण्याची कला होय. शिल्पकलेतून बनवलेल्या कलाकृतीस ‘ शिल्प् ’ असे म्हणतात. मूर्ती , पुतळे तसेच रचनात्म्क आकृतीबंध अशा स्वरूपांत शिल्पे घडवली अथवा कोरली जातात. संस्कृती साहित्यात मूर्तिकलेचे शास्त्र विकसित झालेले आढळते.

जिंतूर येथील जैन मंदीराचा उल्लेख् शके ११४० म्हणजे सन १२१८ चे शिलालेख् असून दैवेद्रकिर्ती राजाचे वंशजाचे जैन मूर्तीना प्रणाम करीत आहेत असा उल्लेख् त्यात आहे. याचा अर्थ त्याआधी हे मंदीर बांधलेले असावे . येथील नेमिनाथ् मूर्तीचे वेदिवर सिंहाच्या प्रतिभा कोरल्या आहेत. त्यावरून हे मंदीर राष्टकूट राजा अमोघवर्ष यांने बांधले असावे असा तर्क करतात. प्राचीन काळी हे क्षेत् जैनपूर या नावाने प्रसिध्द होते. हा राष्टकूट कुंटुबातील सम्राट अमोघवर्षाच्या काळात हया लेण्यावर अक्रमण् होऊन येथील बरेच स्थापत्य नष्ट करण्याचा प्रयत्न् झाला. हया लेण्याचे वैशिष्टय म्हणजे हया पूर्णत: जमीनीत १७ फूट खोलात जमीनीमध्ये दबलेल्या होत्या. सुमारे ९००० किलो वजनाची श्री १००८ भगवान पार्श्वनाथ यांची मूर्ती आहे जी जमिनीपासून ४ इंच वर केवळ एका सुपारीएवढया दगडावर विराजमान आहे हे येथील आश्चर्य आहे अशा ७ गुफा येथे आहेत. नेमगिरी जैनपूर किंवा जिंतूर येथे दोन टेकडया आहेत एक नेमगिरी व दुसरे चंद्रगिरी प्रसिध्द आहेत. चंद्रगिरी येथे प्राचिन ज्योतिर्लिग आणि

चमत्कारिक जैन गुफा मंदीर व चैत्यलय्यासाठी प्रसिध्द आहे.ते नेमगिरी पासून थोडया अंतरावर चंद्रगिरी नावाचे धार्मिक स्थ्ळ आहे. जैनमान्यतेनुसार जे २४ तीर्थंकार होऊन गेले त्यामधील २२ वे तीर्थ्ंकार नेमिनाथ् यांच्या नाववरून या लेण्याला नाव नेगमिरी असे देण्यात आले.

**ऐतिहासिक स्थिति :**

प्राचीन काळात यमराज आणि नेमिराज हे दोन बंधू येथील राजा होते त्याच्या जैनपूर वैभवाच्या शिखरावर होते धन संपन्न् अशी जैन समूदायाची ही नगरी आध्यात्म् व श्रध्दावंत राहिली आहे असे म्हटल्या जाते. येथे या जैनपूर नगरीत एकून १४ जैनमंदीर होते आणि येथील राजा यमराज आणि नेमिराज याचं जोपर्यंत मंदीर दर्शन होत नसे तो पर्यत हया जैनपूर मधील कोणताही व्यवहार सुरू होत नसे. जैनपूर या भूमीने अनेक आक्रमने पाहिली त्यामध्ये १० विशाल असे जैनमंदीर तसेच अनेक हजारोच्या संख्याने जैनधर्मियांच्या प्रतिमा नष्ट करण्यात आल्या असे सांगितले जाते. या अशा अनेक आक्रमनामुळे हया नगरीचे नाव जैनपूर वरुन जिंतूर असे पडले हे येथील ऐतिहासिक परिस्थिती सांगते.

या लेण्याचा पुढे इतिहास म्हणजे अनेक अक्रमणकारकांनी हे स्थापत्या नष्ट करण्याचा प्रयत्न् केला. त्यामध्ये सैदुल कादरी हा अफगाणिस्तानातून दिल्लीला आला तो दिल्लीहून अजमेरला ख्याजा साहेबाच्या दरबारात पोहचला . दरबारात त्याला असा आदेश देण्यात आला की , जैनपूर ( जिंतूर आजचे ) ला जाऊन तेथील असणा-या मजबूत लेण्यामधील जैन धर्मियाच्या संस्कृती नष्ट करुन त्यांच्या मंदीराची नासधूस करून आपला झेंडा फडकावयाचा आदेशानुसार कादरी अजमेरहून खुलताबाद, दौलताबादमार्गे जैनपूरला आला. तेव्हा जैनपूरमध्ये यमराज आणि नेमिराज नावाचे भाऊ राज्य करत असत. कादरीने गुलबर्ग्याच्या राजा आलमगीरच्या फौजेच्या सहाय्याने हा प्रदेश् कब्जात घेऊन त्या परिसरातील लेण्या, मंदीर आणि मूर्त्यांची तोडफोड केली त्यामध्ये ३०० जैन कुंटुंब होती ती बेघर झाली १४ जैन मंदीर होती आज त्यातील केवळ दोन मंदीर शिल्ल्क आहेत. त्यानंतर १६ व्या शतकामध्ये नांदगोव येथून श्री वीर संघवी त्यांची पत्नी “ घालावी ” मुले नेमा संघवी , सातु संघवी , अंतु संघवी आणि ३ सुनासंह जिंतूर येथे आले. त्यावेळी नेमगिरी पूर्णपणे झाडा - झुडपांनी वेढलेले होते. पण मंदीराचे शिखर दिसत होते तेव्हा त्यांनी त्या मंदीराचा जीर्णोव्दार केला . याची आठवड म्हणूनच गुफा क्रमांक ४ मध्ये असलेल्या मूलनायक श्री नेमीनाजी यांच्या प्रतिमेच्या खाली या कुंटूंबियांचे शिल्प् रेखाटलेले आहे.

**मंदीराचे वैशिष्टये :**

**गुफा क्र. १.)** विक्रम संवत १६७६ ही पहिली गुफा मध्ये महावीर स्वामीची साडे तीन फुट उंचीची अत्यंत प्राचिन मूर्ती आहे. या गुफेमध्ये आचार्य भद्रभाहु, आचार्य शांतीसागरजी यांचे पद कमळ हे या गुफेचे वैशिष्टये आहे.

**गुफा क्र. २ )** श्री १००८ आदिनाथ स्वामींची महान प्रतिमा आहे ध्यान करण्यात मग्य् असणारी ही प्रतिमा पाहताक्षणी मनाला मोहिणी घालते.

**गुफा क्र. ३ )** या गुफेमध्ये दर्शन होते ते सकलविहमोपशाकमल , परमशांतिदायक , देवाधिदेव श्री. १००८ शांतिनाथ् स्वामी यांच्या पददय्सनामध्ये विराजमान मूर्तीचे सहा फूट उंच या मूर्तीचे दर्शन घेताना भक्तांना दु: खाचा पूर्णपणे विसर पडतो आणि तो ध्यानात मग्य् होतो.

**गुफा क्र. ४ )** मूलनायक श्री १००८ नेमिनाथ् स्वामीची भव्य् मूर्ती विराजमान आहे. पाहताक्षणी मन मोहून टकणारी काळया पाषाणातली मूर्ती विराजमान आहे.

**गुफा क्र. ५ )** सर्वाच्च् आकर्षणाचा केद्रबिंदू असणारी श्री १००८ अंतरिक्ष पार्श्वनाथ स्वामी पाषाणातील मूर्ती आहे. सुमारे ९००० किलो वतनाची श्री १००८ भगवान पार्श्वनाथ् यांची मूर्ती आहे. जी जमिनीपासून ४ इंच केवळ एका सुपारीएवढया दगडावर विराजमान आहे हे देखील एक येथील आर्श्चय आहे. या मूर्तीच्या मागे सर्प आहे त्या सर्पात ओम तयार होतो.

**गुफा क्र. ६)** या गुफेमध्ये साडेचार फुट उंचीची आणि एखादया स्तंभासारखी दिसणारी नंदिश्वराची मूर्ती आहे.

**गुफा क्र. ७ )** भगवान बाहुबलीची मूर्ती आहे. तपश्चर्येत मग्य् अशी ही मूर्तीद आहे. मानेपर्यंत आलेली वेल खांदयावर नांगाचे वास्त्व मांडीमध्ये भुंग्याचे केलेले छीद्र यावरून या मूर्तीची तपश्च्र्येतील मग्नता दिसून येते.

**चंद्रगिरी** : अर्धचंद्रकार असे चंद्रगिरीचे दर्शन घेतल्या शिवाय नेमिगीरीची प्रार्थना पूर्ण होत नाही असे येथील भाविक सांगतात. नेमगिरी उतरून चंद्रगिरीला जात असताना रस्तेत्यात युगल चारणऋध्दीधारी मुनिचे चतर्थकालीन चरणपादुका आहेत. दक्षिण मधील तेर क्षेत्रास भेट देत वेळेस भगवान महाविर यांचा जथ्था येथे आला होता अशी माहिती मिळते. अशा ऐतिहासिक पावन भूमित जैनपूर मध्ये संवत १६६५ मध्ये साडे पाच फूट उंच चौवीस तीर्थकारामध्ये वैशिष्टये पूर्ण असे शांतिनाथ् , कुंथुनाथ् , अरनाथ् भगवान ध्यानस्थ्आसन मूर्ती आहे.

**निष्कृर्ष् :**

जिथे जिथे जैन मूर्ति भूर्गभातून प्राप्त् झाल्या आहेत त्यातून मोठया प्रमाणात जैन धर्माचा आणि त्याकाळीतील ऐतिहासिक सत्य् बाहेर आले आहे व यामधून आश्चर्य कारक गोष्टी समोर आल्या आहेत. हेच आश्चर्य या जैनपूर किंवा जिंतूर येथील नेमगिरीच्या लेण्यामधून समोर आले आहे. या रांगेतील लेणी क्रंमाक ५ मध्ये श्री १००८ भगवान पार्श्वनाथाची जे जैन तीर्थकारामध्ये २३ तीर्थकार होते त्याची ९००० किलोची मूर्ति जमिनीपासून ४ इंचवर केवळ सुपारी एवढया दगडावर विराजमान आहे . हे येथील सर्वात मोठे आश्चर्य आहे. हया मूर्तिच्या मागे सर्प आहे आणि हया सर्व मूर्ति स्थापत्या कलेतील उत्कृष्ट कलेचा अविष्कार म्हणता येईल कारण सर्व लेण्या हया १७ फूट खोल भूर्गभात एकमेकांना आतून जोडल्या आहेत. हया सर्व मूर्ति पाषानाच्या आहेत. यांच आजपर्यंत काही प्रमाणात संवर्धन करण्यात आल आहे. यापुढे या लेण्याचं संवर्धन करून कलेला नमूना जिंतूर येथील नेमगिरी लेण्याचा ऐतिहासिक वारसा प्रत्यक्ष लेण्याला भेट देऊन हा वारसा समाजापुढे आण्याचा थोडा फार प्रयन्त् येथील माहिती संकलन करून या शोधनिबंधातून तो करण्यात प्रयन्त् करण्यात आला आहे.

**संदर्भ् ग्रंथ :**

१ ) प्राचिन भारतीय मूर्तीशास्त्र नी. पु. जोशी

२ ) प्राचीन भारतीय कला म. श्री. माटे

३ ) श्री दिगंबर जैन अतिश्य क्षेत्र नेमगिरी याचे माहिती पत्रिका

४ ) mr.vikaspedia.in ( apala-maharashtra)

५ ) विकिपीडिया ( Wikipedia.org)

# कंकालेश्वर मंदिर बीड

**डॉ.बाबासाहेब शेप**
इतिहास विभाग प्रमुख
वैद्यनाथ कॉलेज, परळी

**प्रस्तावना :-**

भारतात हिंदु संस्कृतीत मंदीरांना अनन्य साधारण महत्व आहे. मुळ भारतीय संस्कृतीत देवांना अग्नीमध्ये आहुती दिल्या जाते त्यामुळे यशाविधी हाच पुजेचा एकमेव प्रकार आहे. पुर्णपणे विकसीत मंदीर स्थापत्यात अनेक गोष्टींचा समावेश झाल्यामुळे त्यात हिंदु किंवा भारतीय जीवनाचे घटक आणि सामाजिक संस्था म्हणून त्यात झालेल्या विकासाची किंवा फेरफाराची प्रतिबिंबे दिसून येतात. अशाच अनेक वैशिष्टयपुर्ण असलेल्या मंदिरापैकी एक म्हणजे बीड येथील कंकालेश्वर मंदीर होय.

**उददेश :- 1. बीड येथील कंकालेश्वर मंदीराचा अभ्यास करणे.**

कंकालेश्वर मंदिर सामान्य किंवा सर्व मंदिरासारखे नाही याची बांधणी वैशिष्ट पुर्ण असुन अत्यंत सुंदर व सुबक कलाकारी दिसून येते. याचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे मंदीराच्या सभोवताली पाणी आहे. 84.79 मीटर x 84.79 मीटर आकाराच्या तलावात मध्यभागी मंदीर आहे. मंदिरात जाण्यासाठी तलावाच्या पश्चिमेकडुन मार्ग आहे. तलावाच्या मधोमध एक मोठया आकाराचा कटटा आहे. या कटयावर 9.52 मीटर उंचीच्या जगतीवर मंदीर उभे आहे. पण आज केवळ मंदिराच्या मागील भागाकडील जगतीचा भागच दिसुन येतो.

मंदिर पश्चिमाभिमुख असून असुन मुखमंडप आणि त्या मंडपाला जोडून तीन बाजुंना अंतरालयुक्त गर्भगृहे असा नलविन्यास आहे. मंदिराला तीन गर्भगृहे आहेत. तीनही गर्भगृहे सारख्याच आकाराची असुन त्याचा जलविन्यास तारकाकृती आहे. मंडपाच्या चार मुख्य दिशांना आणि चार कोपऱ्यामध्ये प्रत्येकी दोन स्तंभ किंवा एक धुमटाकार छत पेललेले आहे. हे धुमटाकार छत उतरोत्तर लहाण होत जाण्याच्या वर्तुळाकृती वाल्यांनी बनले आहे. छताच्या मध्यभागी आणि सर्वात वर असलेल्या प्रस्तर तारकाकृती असुन त्यावर कमळ आहे. मंडप आणि गर्भगृहामधील स्तंभ चौरस तलविन्यासाचे असुन चौरस तळखडा आणि वर काही अंतरावर अनुक्रमे अष्टकोनी चौरस आणि वर्तुळाकार बनणारा चौरस खांबा आणि खालच्या वर्तुळाकृती भागावर किचकहस्त असा या स्तंभांचा घटकक्रम आहे.

मंदिराच्या बाहयांगामध्ये पीठ भागावर विविध थर असुन सगळयात खालचा थर किर्तिमुखांनी अलंकृत केला आहे. भद्रभागातील देवकोत्यांमध्ये शक्ती, ब्रम्हदेव आणि शिव संप्रदायातील देवदेवता ओहत. तर मंडोवरावरी जंहाभागात विष्णुचे दहा अवतार आणि अष्ट दिक्पात्य दाखवले आहेत.

गर्भगृहाची दारे पंचशाख प्रकाराची आहेत त्यावर कमलदल, पुष्प आणि व्याक्त यासारखी प्रयोजने आहेत. मध्यभाग अर्धस्तंभाच्या स्वरुपात आहेत. द्वारशाखांवर खालच्या भागात कुंभ आणि चौरी धारण करणाऱ्या दासी आणि निधी दाखवले आहेत. बहुसंख्य मुख्य प्रतिहारांच्या हाती शैव आयुधे आहेत. मुख्य गर्भगृहाच्या ललाटावर गणेशमुर्ती आहे. इतर दोन उपगर्भगृहाच्या ललाटावरील मुर्ती उघडून टाकण्यांत आल्या आहेत आणि दारावरच्या उत्तरोगावरील रथिकांमध्ये फक्त चौकटचे आकार कोरले ओहत. त्यामुळे या दोन उपगर्भग्रहांमध्ये नक्की कोणती दैवते होती याचा बोध होऊ शकत नाही. या मंदीराचे स्थापत्य आणि शिल्पशैली लक्षात घेता हे मंदीर इ.स. च्या 12 व्या शतकात बांधले गेले असे दिसते.

**निष्कर्ष :- 1. सामान्य मंदीर नाही पाण्यात असल्यामुळे वैशिष्टयेपुर्ण बांधणी आहे.**

**संदर्भ :- महाराष्ट्र गॅझेटीअर**

1) प्रत्यक्ष केलेली पाहणी
2) मोखंचीकर रा.श्री.सातवाहनकालीन महाराष्ट्र, अपरांत प्रकाशन
3) जोशी महादेवशास्त्री भारतीय मुर्तिकला.
   अनमोल प्रकाशन पुणे 1980
4) देव प्रभाकर मराठवाडयांतील मंदीर शिल्पस्थापत्याविकार
   अपरांत प्रकाशन, पुणे 2017
5) डॉ.साळुंके सतिश बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथमावृत्ती जुन 1997.



# यादव कालीन मंदिर स्थापत्य

प्रा.डॉ.सय्यद मुजीब
इतिहास विभाग प्रमुख,
कला महाविद्यालय,बिडकीन ता.पैठण
जि. औरंगाबाद 9890906117

**गोषवारा :-**

आधुनिक मराठवाडा खान्देश,विदर्भ या भागात इ.स.900 ते 1400 या काळात असंख्य मंदिरे बांधण्यात आली. ही मंदिरे शिलाहार व यादव वंशातील राजांनी तसेच त्यांचे मांडलिक, आश्रित राजांनी बांधली. या काळात बांधल्या गेलेल्या मंदिरांना हेमाडपंथी मंदिरे या नावाने ओळखले जाते.कारण यादव राजा महादेव व राजा रामचंद्र यांच्या दरबारात हेमाद्री उर्फ हेमंडपंथ हा मुख्य सचिव या पदावर कार्यरत होता.हेमाद्री याने अनेक मंदिरे बांधली असली तरी ही सर्व मंदिरे यादव राजांच्या काळात व त्यांच्या आश्रयाने व इतरही राजा,मांडलिक,मंत्री यांनी बांधलेली असल्यामुळे या सर्वांना यादव काळातील मंदिरे असे संबोधता येईल.

**मुख्यशब्द**-प्राचीन काळ, यादव घराणे, महाराष्ट्रातील राजकीय स्थिति, स्थापत्यकला, मंदिर स्थापत्य.

**प्रस्तावना:-**

सेवून/सिऊण/देवगिरी च्या यादव घराण्याने इ.स.880 ते 1334पर्यंत आधुनिक महाराष्ट्र,उत्तर कर्नाटक आणि मध्यपदेशाच्या भागावर राज्य केले. यादव राजांनी राज्यात प्रजाहिताची अनेक कामे केली.त्यांनी अनेक मंदिरे बांधली. हेमाडपंथी पद्धतीची बांधकामे हे यादव काळातील मानली जाते.यादवांच्या दरबारात मुख्य सचिव पदावर असणारा हेमांड पंडिताने स्वता:चे नाव या शैलीला दिले.यादवांनी शिक्षणाला प्रोत्साहन दिले होते. या काळात देवगिरि, प्रतिष्ठान नाशिक ही विद्देची कैंद्रे होती.शिक्षणाचे माध्यम संस्कृत होते.

**यादव कालीन मंदिरे :-**

यादवकाळातील मंदिर स्थापत्याचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.पहिले 11 व्या शतकपासून ते 12 व्या शतकापर्यंत व दूसरा म्हणजे 12व्या शतकपासून इ.स.1350 पर्यंत या कलावधीत बांधलेली मंदिरे. प्रारंभीच्या काळातील मंदिरावरील शिल्पांकन जास्त प्रमाणात होते तर नंतर च्या काळात ते कमी कमी होत गेल्याचे दिसते. नंतर च्या काळात बांधलेली मंदिरे ओबडथोबड आहे किवा कसल्याही प्रकारचे शिल्प कोरलेले नाहीत. यालाच नंतरच्या काळात हेमांडपंथी मंदिर प्रकार हा शब्द रूढ झाला असावा.

या काळातील मंदिरे ही चौथारे उभारून बांधलेली आहेत. बांधणीत चुना-सिमेंट वा इतर पदार्थाचा वापर केलेला दिसत नाही. दगडांना खाचा वा खोबणी पाडूनएकावर एक दगड रचून भिंतीची बांधणी केलेली दिसते. भिंतीवर थरांमध्येविविध प्रकार आणि आकार असून दोन मोठ्या स्तरांच्या मध्यभागी योजलेल्या कणीचा आकार दुधारी सूरीच्या पात्याचा आडवा छेड घेतल्यासारखा वाटतो.बहुतेक मंदिरांचे विभाजन गर्भगृह,अंतराळ,सभागृह व प्रवेश मंडप अशा स्वतंत्र भागात केलेले आहे. सामान्यात: या काळातील मंदिराला एकच द्वार आहे.परंतु काही

मोठ्या मंदिरांना तीन द्वारे व प्रवेश मंडप आढळतात. काही मंदिरे पंचायतन या उपशैलीत बांधलेली आहे.या शैलीत मुख्य मंदिराच्या चार कोपऱ्यात चार छोटी पण स्वतंत्र मंदिरे बांधलेली असते. याचे उदा.नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील गोंदेशवर मंदिर होय.

यादव काळातील मंदिरे ही एकाच पाषाणात वा एका पाषाणावर उभी असलेली आहे तर काही ठिकाणी क्वचित प्रसंगी पाषाणाला जोडून एकसंध पाषाणाचा वापर केलेला दिसतो. एकसंध पाषाणाचा कातीव स्तंभ चौकोनी,अष्टकोणी इत्यादि भिन्न आकारांचे पाषाण एकावर एक रचून ठेवल्यासारखा दिसतो.

यादव कालीन स्तंभ अत्यंत मनोवेधक, पैलुदार,कलाकुसर युक्त व विविध प्रकारचे आहेत. मंदिरातील स्तंभ वेगवेगळ्या घडणीचे व सर्व साधारण रचनेवरुन खाली अनुक्रमे चौकोनी स्तंभ शीर्षनंतर चौकोनी व लहान शिल्पपट्ट मधला भाग कधी षटकोणी तर कधी फुगीर होत गेलेला दिसतो. सर्व मंदिरांची शिखरे ही इतर मंदिरपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असूनशिखरांची घडण आणि मंदिरांच्या पायाची आखणी यात फार मोठा समतोल साधला गेला. प्रमुख दिशांना कोण येतील असा चौरस कल्पून एका कोणासमोर प्रवेशद्वारची व्यवस्था केलेल्या या मंदिराची विभागणी इतर अनेक कोणात केली असल्याचे दिसते.

अशा प्रकारे यादव काळात मंदिर स्थापत्यशैलीची नविन पद्धती अस्तित्वात आली. या मंदिर स्थापत्य शैलीला हेमांडपंथी शैली म्हणून ओळखली जाते.नंतरच्या काळात या शैलीचा वापर कमी होताना दिसून येतो व मंदिर शिल्पविरहित आढळतात.

**निष्कर्ष:-**

1) यादव राजांनी इ.स.1334 पर्यंत राज्य केले.
2) यादव राजांनी समाजोपयोगी अनेक कार्य केली.
3) हिंदू धर्माचा तत्वज्ञाचा प्रसार प्रचार करण्यासाठी यादवांचा श्रीकर्णाधिप (मुख्य सचिव) हेमांडपंत याने अनेक मंदिरांचे निर्माण यादव राजांच्या मदतीने केले.
4) याकाळातील मंदिरे ही हेमांडपंथी मंदिरे या नावाने ओळखली जातात.
5) महाराष्ट्रातील अनेक भागात अशी मंदिरे आजही काही चांगल्या अवस्थेत तर काही जीर्ण शीर्ण अवस्थेत दिसून येतात.
6) ही मंदिरे वर वर पाहता एकाच दगडावर दगड ठेवून निर्माण केल्याची काही चौकोनी, षटकोनी,अष्टकोनी आकाराची दिसतात.
7) या मंदिराची जीर्ण शीर्ण शिखरांची भव्यता,त्यांची कलात्मक बांधणी आणि शस्त्रशुद्ध वास्तुरचना आजही नजरेत भरते.

**संदर्भ सूची:**


1) डॉ.सू.र. देशपांडे,भारतीय शिल्पवैभव प्राचीन-मध्ययुगीन, मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे-30.
2) पानसे,मु,ग. यादवकालीन महाराष्ट्र मुंबई,1963.
3) सोनार ब.लु.,महाराष्ट्रचा संस्कृतिक इतिहास,मोघे प्रकाशन 1985.
4) देशपांडे ब्रह्मानंद, देवगिरीचे यादव,समर्थ प्रकाशन, औरंगाबाद,1975.
5) पेंडसे श.दा. महाराष्ट्रचा संस्कृतिक इतिहास, इंटरनेशनल, पुणे 1993.

# हातकणंगले तालुक्यातील धार्मिक स्थळे, मंदिरे व मूर्ती यांचा अभ्यास

**श्री. प्रकाश धोंडीराम माने,**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲन्ड सायन्स,
माळवाडी, कोतोली.

**प्रा.डॉ.शिला स्वामी**
इतिहास विभाग प्रमुख
माधवराव पाटील महाविदयालय,
मुरूम, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण बारा तालुक्यांचा समावेश आहे.या बारा तालुक्यांपैकी हातकणंगले हा एक महत्त्वाचा तालुका आहे.कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा हा तालुका हा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचा आहे. अश्या पन्हाळा तालुक्याच्या शेजारीच असणारा तालुका म्हणजे हातकणंगले तालुका होय. या तालुक्यालाही प्राचीन काळापासून ऐतिहासिक व धार्मिक परंपरा लाभलेली आहे. हातकणंगलेच्या प्रदेशावर प्राचीन काळापासून सातवाहन, राष्ट्रकूट, शिलाधार, यादव, आदिलशहा, मराठे, मुघल व ब्रिटिश यांच्या राजवटी सन १९४७ पर्यंत होत्या.सन १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देशाला स्वांतत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्यानंतर १३ वर्षांनी म्हणजे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.त्यामध्ये महाराष्ट्रातील एक तालुका म्हणून हातकणंगले तालुक्याचा समावेश झाला.हातकणंगले तालुक्याचे मुख्य प्रशासकीय कार्यालय हातकणंगले हे शहर आहे.कोल्हापूर जिल्ह्यापासून पूर्वेकडे १७ कि.मी.अंतरावर व मुंबई राजधानीपासून उत्तर दिशेला ३४७ कि.मी.अतंरावर हा तालुका आहे.

हातकणंगले तालुक्यातील बहुसंख्य लोक हे हिंदू असले तरी अल्प प्रमाणात जैन, बौध्द, मुस्लिम व ख्रिश्चन धर्मीय समाजही आहेत. हिंदू धर्मियांमध्ये जैन व मराठा समाज मोठया प्रमाणात आहेत. याखेरीज बारा बलुतेदार व १८ मालुतेदार ही काही काही गावांमध्ये असल्याचे दिसून येते. या तालुक्यातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहत आहेत. या ग्रामीण भागात विविध जाती-जमातींचे लोक असले तरी ते गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. या परिसरातील सर्व सण, उत्सव व यात्रा एकत्रितपणे साजरे करतात. या तालुक्यामध्ये जवळजवळ ६१ गावांचा समावेश आहे. यापैकी काही गावांना ऐतिहासिक स्थळे म्हणून महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. यामध्ये आळते, कुंभोज, हेरले, हुपरी, इचलकरंजी, हातकणंगले, वडगाव इ. गावांचा समावेश आहे.या गावांमध्ये प्राचीन व मध्ययुगीन धार्मिक स्थळे, मंदिरे व मूर्ती असल्याचे दिसून येते.त्यांचे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लघु शोध निबंधामध्ये केलेला आहे.

**उद्दिष्टये-**

१. हातकणंगले तालुक्यात काही प्राचीन व मध्ययुगीन मंदिरांचा व त्यातील मूर्तींचा अभ्यास करणे.
२. आळते या गावातील रामलिंग, आलमप्रभू व धुळोबा या धार्मिक स्थळांचे महत्त्व जाणून घेणे.
३. कुंभोज येथील श्री अतिशय क्षेत्र बाहुबली या तीर्थक्षेत्राची माहिती घेणे.

४. बाहुबली डोंगरावर श्री १००८ आदिनाथ, श्री चंद्रप्रभू व श्रीशांतीनाथ यांची प्राचीन जैन मंदिरांची माहिती घेणे.
५. धार्मिक स्थळांचे, मंदिरांचे व त्यातील मूर्तीचे महत्त्व जाणून घेणे.
६. हातकणंगले तालुक्याची ऐतिहासिक व धार्मिक परंपरा जाणून घेणे.
७. रूकडी येथील महादेवाचे मंदिर,हातकणंगले गावातील गोरीसाहेब पीर दर्गा व हेरले येथील मारूती देऊळ यांची माहिती घेणे.

**१. आळते -**

आळते हे गाव सुमारे ९०० वर्षापूर्वी वसलेले आहे.पूर्वीच्या काळी आळते गावाला कसबा या नावाने ओळखले जात होते आणि ते परिसरातील मुख्यालय होते.कोल्हापूरच्या ईशान्येला १९.३१ कि.मी.वारणेच्या दक्षिणेला ९.६६ कि.मी.आणि हातकणंगले रेल्वे स्थानकापासून ३.२२ कि.मी.अंतरावर आहे.सन १७६५ ते १८७६ पर्यंत येथे आळते पेठयांचे हे मुख्य ठिकाण होते.[१]आळते गावातील प्रेक्षणीय स्थळे म्हणजे रमझान दर्गा आणि गावच्या पश्चिमेला अंदाजे दिड कि.मी.अंतरावर असलेली लिंगायत साधू, सिध्दोबा, धुळोबा, रामलिंग किंवा शिव यांची देवळे आहेत.

१. **रमझान दर्गा** - रमझान दर्ग्याचा आकार चौकोनी असून हा दर्गा १२ मीटर लांब, १२ मीटर रूंद व १० मीटर उंच आहे. दरवर्षी सव्वाल महिन्याच्या पंधरा तारखेला एक उरूस भरतो.
२. **सिध्दोबा** - या गावामध्ये असणा-या मंदिरापैकी सिध्दोबाचे देऊळ छोटेसे असून दगड व चुना याच्या साहाय्याने बांधलेला आहे. सिध्दोबा हे कुणबी समाजाचे दैवत आहे.
३. **धुळोबा** - कागलमधील एका कोष्टयाने धुळोबाचे मंदिर आळते येथे बांधले असे म्हणतात. त्याचे स्थापत्य व शिल्प मध्ययुगीन धाटणीचे असून हे देऊळ ७ चौ.मी.आहे. दरवर्षी चैत्र महिन्यात देवळामध्ये मोठी यात्रा भरते.

**४. आलमप्रभू -** लिंगायताच्या देवळाचे नाव आलमप्रभूचे देऊळ असे आहे. या मंदिराची बांधणी देखील मध्ययुगीन पध्दतीची असून देऊळ ८ मी लांब, ५ मी रूंद आणि ३ मी.उंच आहे. या देवळाला प्रामुख्याने लिंगायत व जैन लोक भेट देतात. आपल्या गुरूबद्दल वाटणारा आदर प्रकट करण्यासाठी आदिलिंगाने प्रभुचे देऊळ बांधले आणि त्या ठिकाणी एक नंदादिप तेवत राहील अशी व्यवस्था केली. आळते कसबा गावातील लोक सांगतात की, या देवळात औरंगजेब बादशहा आला होता व त्याने त्या देवळास एक माचा नजर दिला. या देणगीचे स्मरण रहावे म्हणून देवाचे नाव आलमप्रभू असे ठेवले.[२] देवळाच्या समोर काही छोटे छोटे घुमट बांधण्यात आलेले आहेत. ज्या शिवभक्तांनी जिवंत समाधी घेतली त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ हे बांधण्यात आलेले आहेत असे म्हणतात. अशा त-हेची शेवटची जिवंत समाधी एका शिवभक्ताने इ.स.१८०८ मध्ये घेतली.

**५. रामलिंगाचे देऊळ -**

खडकाळ टेकडीच्या एका बाजूला रामलिंगाचे देऊळ कोरलेले आहे.पूर्वी ही गुंफा साडेतीन चौरस मीटर होती.परंतु नंतरच्या काळात यापैकी ३/४ भागात दीड मीटर खोल असे एक टाकी बांधण्यात आली.देवळाच्या अगदी आतल्या बाजूस लिंग व गणपती

यांच्या मूर्ती खोदलेल्या आहेत. वरच्या भागातून पाणी सारखे टिपकत असते.त्यामुळे लिंगाची पूजा करण्यास जवळजवळ एक मीटर खोल पाण्यातून जावे लागते.या गुफेच्या बाहेरच्या बाजूला दगडी खांबावर उभारलेल्या चार चौरस मीटर आकाराचे एक हेमांडपंथी शिल्प आहे. देवळाच्या जवळच अखंड वाहणारे झरे असून त्यापैकी नीलगंगा आणि पापनाशिनी हे दोन झरे पवित्रतीर्थ म्हणून मानले जातात. देवळामधील लिंग आणि गणपतीची मूर्ती यांची मांडणी असे दर्शविते की, ही गुंफा बौध्द किंवा जैन काळातील असावी आणि नंतर तिचा उपयोग ब्राम्हण काळात पूजास्थान म्हणून करण्यात आला असावा.[3]

**२. कुंभोज -**

हातकणंगले तालुक्यात को्ल्हापूर- मिरज रेल्वे मार्गावर हातकणंगलेगावापासून उत्तरेस ६.४४ कि.मी.अंतरावर व कुंभोज गावाच्या पश्चिमेस २.४१ कि.मी.अंतरावर बाहुबली हे प्राचीन जैन मंदीर आहे.या परिसरातील डोंगरावर श्री १००८ अदिनाथ, श्री.चंद्रप्रभू व श्री.शांतीनाथ यांची प्राचीन जिन मंदिरे आहेत. या मंदिराचे जवळच काळ्या पाषाणांचे २.१३ मी.उंच खडगासनी श्री १००८ बाहुबली भगवंताचे खंडित परंतु अतिशय मनोवेधक जिनबिंब आहे.डोंगरमाथ्यावरून खालचा परिसर अतिशय रमणीय आहे.

प्रमुख प्रवेशव्दाराच्या एका बाजूस भगवान बाहुबलीचे प्रशस्त मंदीर आहे.त्यामध्ये बदामी रंगाच्या संगमरवरी पाषाणाची १.८३ मी उंच भगवान बाहुबलीची मुर्ती आहे.या मंदिरासमोरील शुभ्र संगमरवरी १२.५० मी.उंचीच्या कलात्मक मनोज मानस्तंभावर तीर्थंकर भगवंताची सर्वतोभद्र प्रतिमा आहे.तसेच भगवान बाहुबलीच्या मंदिराच्या शिखरात एक हजार वर्षापूर्वीची हरितवर्णी भगवान आदिनाथाची अतिप्राचीन अर्धपद्मासनस्थ मनोज मूर्ती आहे.श्री बाहुबली जिनमंदीर व श्री महावीर समवसरण मंदीर यांच्या मधोमध सुमारे ८२.३० मी.आत १५.२४ मीटर उंच भागी श्री १००८ भगवान बाहुबलीची पांढ-या संगमरवरी पाषाणाची ८.५० मी. उंचीची अतिशय सुरेख महामूर्ती माघ शु.१३ दिनांक ८ फेब्रु.१९६३ रोजी विधीपूर्वक प्रतिष्ठापित केली आहे.[४] सभोवार गुलाबी रंगाचे सुंदर कमलासन व खाली प्रशस्त उंच वेदिका असल्याने प्रवेशव्दारातून आत येताच ती पूर्ण दिसते.

**३. हातकणंगले-**

कोल्हापूरच्या ईशान्येस २१ कि.मी.अंतरावर हातकणंगले हे शहर असून कोल्हापूर-मिरज रेल्वे मार्गावरील स्थानक आहे. एका आख्यायिकेनुसार पूर्वी या गावातील एका व्यक्तीने उकळत्या तेलामध्ये आपले हात बुडवून आपण निष्पाप आहोत असे दाखविण्याचे दिव्य केले त्यावरून या गावाला हातकणंगले या नावाने संबोधले जाऊ लागले. या गावामध्ये गौरीसाहेब पीर यांचा दर्गा आहे.दर्गा अजूनही चांगल्या अवस्थेत असून त्याची बांधणी जवळजवळ सहाशे वर्षापूर्वी झाली असावी असे सांगितले जाते.दर्ग्याची लांबी १० मीटर,रूंदी ८ मीटर व उंची १० मीटर आहे.घुमटाचा घेर २०.७३ मीटर असून आतील बाजूला तांब्याच्या पत्र्यावर कोरण्यात आलेला फारशी भाषेतील लेख आहे.[५] या दर्ग्याचा उरूस बकरी ईदनंतर १४ दिवसांनी भरतो.आजही या ठिकाणी मोठया प्रमाणात उरूस भरतो.

**४. हुपरी -**

हातकणंगले तालुक्यातील हे गाव हातकणंगले रेल्वे स्थानकाच्या दक्षिणेस १४.५० कि.मी.आणि कोल्हापूरच्या आग्नेयेस १६ कि.मी.अंतरावर वसलेले आहे.याठिकाणी दोन पुरातन देवळे आहेत. त्यापैकी एक अंबाबाईचे मंदीर होय. हे मंदीर ५.१८ मीटर लांब, ४.७५ मीटर रूंद आणि ८.२३ मी.उंच आहे आणि दुसरे महादेवाचे मंदिर ४.५७ मी.लांब, ३.१६ मी.रूंद व ५.४९ मी उंच आहे.दोन्ही मंदिराची रचना करीत असताना दगड आणि चुना याचा वापर करून बांधलेली आहेत. दरवर्षी माघ वद्य अष्टमीला अंबाबाईच्या देवळात जत्रा भरते. जत्रेदिवशी कुस्त्या व बैलगाड्यांच्या शर्यती होतात. अंबाबाईच्या देवालयासमोर सुमारे एक लाख रूपये खर्चून नवीन सभामंडप (अंदाजे १९x१०x६) मीटरचा बांधला आहे.[६] हे गाव चांदीच्या उत्तम कलाकुसरीच्या दागिन्यांसाठी प्रसिध्द आहे.

**५. हेरले-**

हेरले हे गाव कोल्हापूर-मिरज रस्त्यावर कोल्हापूरच्या ईशान्येस १२.८७ कि.मी.आणि रूकडी रेल्वे स्थानकापासून ४.८३ कि.मी.अंतरावर वसलेले आहे.गावात दोन जुनी देवळे असून त्यापैकी मारूतीचे देऊळ (९मी.x ६मी.) तीनशे वर्षापूर्वीचे असून त्याची बांधणी दगडातील आहे.महादेवाचे देऊळ (१०.६६ मी.x ६.४० मी.) त्यापेक्षाही जुने असून त्याच्या दर्शनीभागी सुंदर वाटोळ्या खांबाची ओसरी आहे.या गावी जुन्या कानडी लिपीत लिहिलेला शके १०४० (सन १९१८) सालचा शिलाहार राजाचा एक शिलालेख मिळाला.त्यात एक जैन देवळास दिलेल्या देणगीविषयी उल्लेख आहे.[७] तसेच माघ महिन्यात महाशिवरात्रीस महादेवाची यात्रा भरते.

**६. रूकडी -**

मिरज-कोल्हापूर रस्त्यावर कोल्हापूरच्या पूर्वेस १४ कि.मी.अंतरावर रूकडी हे गाव आहे.ते कोल्हापूर-मिरज या रेल्वे फाटयावरील स्थानकही आहे.पूर्वी येथे रूक्कादेवी नावाची देवी होती तिच्या नावावरून गावास रूकडी नाव पडले आहे असे सांगितले जाते.गावामध्ये गोपूर, महादेवाचे देऊळ आणि दर्गा आहे.गोपूर १२ मीटर उंच असून त्याचा घेर ५३ मीटर आहे.भूतपूर्व कोल्हापूर संस्थानातील एक मामलेदार सदाशिवपंताने हे गोपूर बांधले असे म्हणतात. पूर्वी या गोपूराचा कैदयांना ठेवण्यासाठी उपयोग करीत असत.अलिकडच्या काळात गोपूराची पूर्णपणे नासधूस झालेली आहे.महादेवाचे देऊळ दगडात बांधलेले आहे.त्याची लांबी ५ मी., रूंदी ५ मी व उंची ३ मी इतकी आहे.गावामध्ये दर्गाही चांगल्या पध्दतीने बांधण्यात आलेला आहे.

**७. वडगाव-**

हातकणंगले तालुक्यातील वडगाव या गावाचे अक्षवृत्तीय स्थान १६°४५' उत्तर तर रेखावृत्तीय स्थान १७°३०' पूर्व इतकी आहे.कोल्हापूरच्या ईशान्येस १६ कि.मी.अंतरावर आहे.वडगाव या गावचा स्थानिक कारभार १८८७ साली स्थापन झालेली नगरपालिका पाहते.

वडगाव या गावची धार्मिक पार्श्वभूमी पाहिली असता गावच्या नैऋत्येस लक्ष्मीचे देऊळ आहे.त्याची लांबी ७ मी., रूंदी ६ मी.आणि उंची ९ मी.असून त्याची बांधणी हेमांडपंथी आहे.गावाच्या मध्यभागी जैन धर्माचे मंदीर आहे.ते १६९६ साली आदाप्पा भगशेटने ४०,००० रूपये खर्च करून बांधले असे म्हणतात. मंदिराच्या समोरील सभामंडप टोपची पद्मिनीबाई नाईक हिने बांधला. येथे भाद्रपद महिन्यात दहा दिवस पूजाअर्चा होते व पालखी काढतात. ज्याच्या युध्दकौशल्याने औरंगजेबासारखा मोगल बादशहा काही काळ भयभीत झाला होता त्या

मराठा सेनापती धनाजी जाधवची येथे समाधी आहे. त्याच्या पत्नी गोपिकाबाई सती गेली, तिचे वृंदावनही जवळच आहे.

**सारांश -**

अशा पध्दतीने हातकणंगले तालुक्याचा ऐतिहासिक, धार्मिक व प्रेक्षणीय स्थळे या दृष्टीकोनातून अभ्यास केल्यानंतर या तालुक्यास प्राचीन काळापासून ऐतिहासिक, धार्मिक महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. ऐतिहासिक परंपरेची साक्ष देणारी अनेक स्मारक शिल्पे, मंदिरे, मूर्ती व त्यांचे अवशंष आजही अस्तित्वात असल्याचे दिसून येते.या स्मारक शिल्पांमधून, मंदिरामधून धार्मिक व वास्तुकला शास्त्र परंपरचे दर्शन घडते.शिलाहारपूर्वी सातवाहन, कंद, चालुक्य व राष्ट्कूट या राजवंशांच्या राज्यात कोल्हापूर जिल्हा समाविष्ट होता. त्यामुळे हातकणंगले तालुक्यातील काही ठिकाणे प्राचीन व मध्ययुगीन स्मारकशिल्पे असणे स्वाभाविकच आहे. जैन, बौध्दव हिंदू धर्मियांच्याही अनेक मूर्ती व मंदिरे या परिसरामध्ये आढळतात.

**निष्कर्ष -**

१. हातकणंगले तालुक्यातील ठराविक अशा प्रेक्षणीय स्थळामुळे प्राचीन काळापासून त्यास ऐतिहासिक व धार्मिक परंपरा लाभली आहे.
२. ऐतिहासिक व धार्मिक परंपरेची साक्ष देणारी अनेक स्मारकशिल्पे, मंदिर, मूर्ती व त्यांचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत.
३. स्मारकशिल्पे, मंदिरे, मूर्ती यांच्यामधून धार्मिक तसेच वास्तुकलाशास्त्र परंपरेचे दर्शन घडते.
४. हिंदू धर्म, जैन धर्म व बौध्द धर्मीयांच्याही अनेक मूर्ती व देवालये तालुक्यामध्ये असल्याचे आढळतात.
५. मूर्तिभंजकाच्या दृष्टपणामुळे बरीच मंदीरे, मूर्ती व त्यातील शिल्पे यांचा नाश होत चालला आहे.
६. काही मंदिराचा नाश होत असला तरीसुध्दा ब-याच शिल्पांचे, मंदिराचे व मूर्तीचे अवशेष गतवैभवाची साक्ष देतात.
७. ऐतिहासिक वैभवाची आणि प्राचीनतेची साक्ष देणारी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत.

**संदर्भ**

१. चौधरी खि.का. (संपा), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर' कोल्हापूर जिल्हा दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई आवृत्ती -१९८९, पृ.क्र.६५३
२. देव शांताराम भालचंद्र, 'महाराष्ट्र व गोबे शिलालेख - ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची', शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर, आळते रामलिंग मंदिर स्तंभ शिलालेख, पान नं. ३२,३३
३. सार्थवाह स्मरणिका, फुले-आंबेडकर विचारधारा प्रणित - इतिहास परिषद, कोल्हापूर दि. १७ व १८ फेब्रु.१९९६.
४. Dr. Shinde Bharti, 'Geo-Ecological Study of Sacred Groves in ज़olhapur district (Maharashtra)'.

५. चौधरी खि.का. (संपा), 'महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर' कोल्हापूर जिल्हा दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई आवृत्ती -१९८९, पृ.क्र.६९१
६. कित्ता,पृ.क्र. ६९२.
७. कित्ता, पृ.क्र. ६९२.
८. डॉ. जामखेडकर अ.प्र.,'महाराष्ट्र राज्य गॅझेटियर', इतिहास प्राचीन कालखंड १ भाग २ स्थापत्य व कला संपादक डॉ.पाठक अ.शं.प्रकाश श्री.गोविंद स्वरूप मुंबई आवृत्ती २००२.

# बेटसांगवी येथील शिवमंदिर

**डॉ. किशन केंद्रे**
इतिहास विभाग प्रमुख.
लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड
ता. लोहा, जि. नांदेड.
मो . 7083670465

लोहा तालुक्यातील बेटसांगवी नावाचे एक गांव आहे. हे गाव सोनखेड पासून (पश्चिमेस) 10 किमी अंतरावर आहे. या ठिकाणी यादवकालीन हेमाडपंतीय शैलीचे शिवमंदिर आहे. हे मंदिर आज महादेव मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. बेटसांगवी हे मुळगाव गोदावरी नदीच्या काठावर बसलेले होते. परंतु गोदावरी नदीच्या पुराच्या धोक्यामुळे हे गाव पुनर्वसित केलेले आहे.

या पुनर्वसित गावाच्या पश्चिमेस म्हणजे मुळ गावी हे मंदिर आहे. हे मंदिर यादव कालीन असून या मंदिराची मोठी पडझड झाली आहे. मंदिर पुर्वाभिमुख असून प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस एक-एक दीपमाळ आहे. गर्भग्रह, अंतराळ, मंडप व मंडपासमोर मुखमंडप असे या मंदिराचे विधान आहे. मुखमंडप मात्र आज पडक्या अवस्थेत आहे. पूर्वाभिमुख असलेला या मंदिराचे गर्भ ग्रह 6 x 6 चौरस फुट आहे. यामध्ये उत्तराभिमुख शिवलिंग व शिवपिंड आहे. गर्भग्रहाचे दगडी प्रवेशद्वार 2 फुट रूंदी आणि 3 फुट उंचीचे आहे. गर्भग्रहात 3 कोनाड आहेत. मंडप पूर्व-पश्चिम 15 फुट लांब व दक्षिण-उत्तर 12 फुट रूंद आहे. त्यामध्ये 16 स्तंभ असून त्याची उंची 6 फुट आहे. स्तंभ एकाच दगडाने बनविले असून त्यावर कसलेही कोरीव काम नाही. ते चौकणी आहेत. हे स्तंभ ओवड धोबड असून त्यावर कसलेही कोरीव काम नाही. एका रांगेत चार स्तंभ याप्रमाणे स्तंभाच्या चार रांगा आहेत. दोन स्तंभाच्या दरम्यानचे अंतर 2.5 फुट आहे.

या शिव मंदिरातील हा नदी मंदिराच्या मुख्य मंडपात असून स्वतंत्र नंदी मंडम नाही. शिवमंदिराकडे तोंड करून स्थापित केला आहे. हा नंदी अत्यंत गुळगुळीत असल्याची पहावयास मिळतो. 107 सेमी लांब 56 सेमी रूंदीचा अखंड पाषाणात हा नंदी कोरलेला आहे. या नंदीची उंची 72 सेंमी ऐवढी आहे. नदीच्या गळ्यात माळ व साखळी देखील आहेत. अंगावर झूल नसून बैठ्या अवश्थेतील या नंदिच्या गळ्यापासून ते पाठीवर मोठ्याव लहान घुंगरांना जोडणारी पट्टी जोडलेली असुन 4 भागात नक्षी काम केलेल्या नंदीच्या साळ्यातील आभुषनांना जोडते. नदीच्या पाठीवर या पट्टीची गाठ बांधल्यासारखे सुबक व देखीव कोरीव काम आहे. खाद्यावरील वसंडेची संमातर रेषेद्वारे दोन भाग केले आहेत.

यादव राजे शिवभक्त होते. त्यानी मराठवाड्यात अनेक शिवमंदिर बांधली नांदेड जिल्हात अशी अनेक मंदिर आढळतात त्यापैकी बेटसांगवी येथील हेमाडपंथी शिवमंदिर आहे. येथे आढळणाऱ्या पुरातत्वीय मंदिर स्थापत्यांचे अवशेष व येथील शिवमंदिर बेटसांगवी गावास ऐतिहासिक वारसा असल्याचे सांगते. शिवाय यादव कालीन राज्यांनी बांधलेल्या हेमाडपंथी मंदिर स्थापत्य शैलीचा इतर मंदिरासारखीच बेटसांगवी येथील मंदिराची रचना व मुर्ती कलेतील साम्य असल्यामुळे हे यादव राजानी बांधल्याचे स्पष्ट होते.

**<u>संदर्भ</u> ः-**

बेटसांगवी येथील हेमाडपंथीय शिवमंदिराचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून प्रस्तुत शोध निबंध तयार केला आहे.

# अहमदनगर शहरातील मंदिरांचा अभ्यास

**प्रा. नवनाथ काषिनाथ वाव्हळ,**
जनता कला व विज्ञान महाविद्यालय, रूईछत्तीसी,

मंदिर स्थापत्य ही भारतीय वास्तुकलेतील एक अनोखी निर्मीती. प्राचीन काळापासून माणसाने आपल्या श्रध्दास्थानी असलेल्या प्रतिकांना स्वतंत्र अषा वास्तु स्थानात संभाळून ठेवले आहे. अहमदनगर षहराला रामायण कालीन, नाथपंथीय, सातवाहन, निजामषाही, मोगल,मराठे, पेषवे आणि इंग्रज यांचा वैभवषाली इतिहास आहे. त्यामुळे इथं विविध काळात अनेक देवदेवतांची प्राणप्रतिष्ठापना झालेली दिसते. अहमदगनरची सर्व देवालय समाजाची स्फुर्तीस्थाने आहेत. अहमदनगरची ग्रामदैवते, मंदिर रचना, मंदिरांची वैष्टिये आणि मंदिर एक वास्तू कला आणि त्या त्या मंदिरातील मुर्ती विज्ञान समजावून घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. तसेच मुर्तीचे स्वरूप, त्यामागील कथा, मुर्तीची वैषिष्टये या स्वरूपाची मांडणी या शोध निंबधात केली आहे. हा अभ्यास मनोरंजक आणि ज्ञानवर्धक आहे. अहमदनगरचे ग्रामदैवत विषाल गणपती मंदिर,षिवपुर्वकाळी येथे मालोजीराजे भोसलेंनी स्थापलेले अमृतेष्वराचे मंदिर, संत रामदास स्वामीच्या षिष्यांनी उभारलेले मारूती मंदिर म्हणजेच सध्याचा नान महाराज मठ, अव्वज इंग्रज आमदानीत उभारलेले खाकीदास बाब मठ. मानवतावादी आचार्य सम्रट आनंद ऋषीजी महाराज आणि अवतार मेहेरबाबा यांचे स्मारक मंदिर यांचा अभ्यास या शोध निंबधात केला आहे. भारतीय मंदिरांची रचना भारतीय धर्मातील पूजायंत्रांच्या रचनेवर आधारीत असे[1] ही वस्तूस्थिती अहमदनगरमधील मंदिरांचे निरीक्षण केल्यावर दिसून येते. भारतीय मंदिर स्थापत्य क्षेत्रात अहमदनगर शहरातील मंदिरषैली व स्थापत्याचा धांडोळा प्रस्तुत शोध निबंधात आपण घेणार आहोत.

**विषाल गणपती मंदिर** : विषाल गणपती, माळीवाडा गणपती, सिध्दीविनायक, मानाचा गणपती आणि महागणपती अषा विविध नावाने ही अहमदनगरची ग्रामदेवता ओळखली जाते. गणेषाची भव्यमुर्ती तीन हातांनी आषिर्वाद देणारी षेंदुरी मूर्ती भारतात इतरत्र कोठेही आढळत नसल्याने एकमेव अव्दीतीय अषा प्रकारची आहे. हा महागणती उजव्या सोंडीचा आहे. शहरातील माळीवाडा भागात असलेली ही गणपतीची मूर्ती नावाप्रमाणे विषाल आहे. या मंदीराचे वैषिष्टये म्हणजे भव्य गोलाकार श्रीगणेषाची मुर्ती. या मंदीरातील मुर्तीची उंची अकारा ते सव्वा अकारा फुट उंच आहे. तीची बैठक नेहमीपेक्ष वेगळी आहे. या श्रीगणेषाच्या मुर्तीच्या मस्तकावर पुणेरी पगडी आहे.[2] खरे तर आपणास अषा प्रकारची पुणेरी पगडी घातलेली श्रीगणेषाची मूर्ती पुण्यात सुध्दा दिसत नाही. तसेच त्याच्या मस्तकावर पुणेरी पगडी अधिक शोभून दिसते. डोळे अंत्यत बोलके आणि कपाळावर अष्टगंध अधिक खुलून दिसतो. या गणपतीचे उदर विषालकाय आहे. तसेच नाभीमध्ये लिंग आहे. या श्री गणेषाच्या मुर्तीतील नाभीवर फणाधारी नाग आहे. या महागणपतीचे तीन्ही हात आपल्या प्रिय भक्तांना भर भरून आषिर्वाद देत आहेत. तर एका हातात मोदक आहेत. श्रीची मुर्ती अधिक आकर्षक आणि मनमोहक वाटते. या विषाल गणपतीचा चांदीचा मूकूट 6 किलो वजनाचा आहे. तसेच या मुर्तीचा चांदीचा दुर्वाहार 2 किलो वजनाचा आहे. तर जानवे सोन्याचे आहे. ही मुर्ती उजव्या सोडेंची आहे. ती पुर्वाभिमुख आहे. ही मूर्ती विषिष्ठ मिश्रणापासून तयार करण्यात आली आहे. या मुर्तीच्या बरोबर पाठीमागे षिवलिंग आहे. त्या समोर नंदी आहे. पुर्वी कधी काळी येथे नाथपंथाचे ठाणे असले पाहिजे. मुळमंदिर हे लाकडामध्ये कोरीव काम करून बांधलेले होते. एकंदरीत त्यावेळच्या मंदिराच्या रचना, बांधणी, अवषेष यावरून ते खूप जुने होते. येथील पुरातत्वीय अवषेषावरून हे ठिकाण नाथ पंथाच्या उर्जीत अवस्थेच्या वेळचे असावे. सध्याच्या श्री विषाल गणपती मंदीराच्या रचनेत काळाच्या ओघात अनेक बदल झालेले आहेत. हे

मुळमंदीर पुरातन काळातील असून सिनानदीतीरी वसलेले आहे. येथे सिध्दनाथांची समाधी आहे. अहमदनगरच्या स्थापनेपुर्वी या परीसराची वस्तूस्थिती तपासली तर आपणांस स्थानपोथी आणि लोकपरंपराचा आधार घ्यावा लागतो. या मंदीराचा जिर्णोध्दार मोठया प्रमाणात पेषवे काळात झालेले आहे. कारण पेषवे काळात नगरचे एक किल्लेदार भवानीपंत हे या श्रीगणेषाचा भक्त असल्याने हे त्याचे श्रध्दास्थान होते. म्हणजे या गणेष मंदिराला त्योवळी राजाश्रय लाभलेला होता. कदाचित या उत्तर पेषवाईत या गणेषाचा जिर्णोध्दार झाला असावा. हा कालखंड साधारणतः सन 1750च्या आसपास असावा. या मुर्तीच्या डोक्यावरील मुकूट हे पेषवाई काळाचे वैषिष्टये मानले जाते. पुढे सन 1901 ते 1970 पर्यंत या मंदीरात फारसा बदल झालेला दिसत नाही. परंतु सन 1990 नंतर श्री विषाल गणपती मंदिर माळीवाडा हे नूतन मोठे मंदिर संगमरवरात बांधले गेले.

***अमृतेश्वर मंदिर*** : छत्रपती षिवरायांचे आजोबा मालोजीराजे भासेलेंचा अहमदनगरषी संबंध फार जुना होता. पहिल्या बु—हाण निजामयाहाच्या काळात येथे एक सुफी संत षहाषरीफ बाबा आले, त्यांना भेटण्यासाठी मालोजीराजे 1590—92च्या सुमारास अहमदनगरला आले होते. पुढे त्यांनी सध्याच्या नगरमधील नवीपेठ जवळील अर्बन बॅकेंच्यच्या परीसरात आपली वसाहत निर्माण केली. त्यावेळी त्यांचे सर्व कूटूंब येथे वास्तव्यास होतं. मुळातच भासेले हे राजघराणे षिवउपासक होते.ते1599ला निजामषहाच्या पदरी येतात. त्यानंतर ते अहमदनगरध्ये वस्ती करतात. या वसाहतीमध्ये त्यांनी अमृतेष्वराचे पुरातन पध्दतीचे षिव मंदिर उभारले.[3] या मंदिराची उभारणी सन 1599 नंतर झाली. हे मंदिर मोठं देखणं आणि उत्तम षिल्पकाम असलेले आहे. या मंदिराला भव्य तटबंधी आहे. मुख्यमंदिरांच्या भिंती सुमारे चारफुट रूंदीच्या आहेत.

1. उपासनी नो.द.,कलोचा इतिहास आणि रसग्रहण,1974,पृष्ठ क्रं.88
2. ऋषी पी.डी., नगरची नवलाई,नाही,पृष्ठ क. 01
3. देषमुख वसंतराव, अहमदनगर पंचषताब्दी विषेषांक,1990,पृष्ठ कं. 19

एवढया रूंद पध्दतीच्या भिंती बांधण्याामागे या मंदीराची असलेली उंची आणि भरीव कळसा पर्यंतचे बांधकाम हे कारण असले पाहिजे. मंदिरात असलेली षिव पिंड ही त्याच काळातील आहे.ही माहिती मंदिराचे व्यवस्थापक वैद्य आणि गुरव थोरात देतात. मंदिर रचनेवर हिंदु, मुस्लीम स्थापत्यषैलीचा प्रभाव जाणवतो. मंदिराच्या गाभा—यात असणा—या महिरपी कमानी आणि स्तभं, मंदिरांच्या बाहेरील बाजुला कळसाकडे जाणा—या भागावर कोरलेली विविध देवदेवतांची मनमोहक ष्ल्पि रस्त्यावरूनच आपले लक्ष्य वेधून घेतात. मालोजी राजांचा रहाता वाडा मंदिराच्या उत्तरेस आहे. हे मंदिर सरकारवाडयाचाच एक भाग आहे.या मंदिरा समोर त्याकाळी प्रषस्त कारंजे बांधलेले होते. मुळ अमृतेष्वर मंदिराच्या रचनेत फारसा बदल झालेला आढळत नाही. परंतु मंदिरात सन 1925 नंतर मात्र गाभा—यात दानषुर भक्तीांनी आपल्या प्रियजनाच सृतिप्रित्यर्थ विठ्ठल रूखमीणी, लक्ष्मी आदी देवतांची मंदिरे उभारली आहेत. तसेच याच काळात चिंतामण वैद्य यांनी अमृतेष्वर मंदिराच्या आतील मुख्य दरवाजाला तांब्याच्या पत्र्याचे आवरण अर्पण केले. त्यामुळं या मंदिरला वेगळीच षोभा आलेली आहे. तसेच गाभा—याच्या समोर मोठा वैषिष्टपुर्ण सभामंडप नंतर बांधलेला आहे. या सभागृहात अतिषय सुंदर आणि प्रसन्न, धार्मिक चित्र आपलं लक्ष्य वेधून घेतात. सभागृहात अमृतेष्वराकडे तोंड करून उभे राहिल्यास डाव्या बाजुस तटबंधीच्या आतील भिंतीवर 50 वर्षापुर्वी वसंत थोरात या हरहुन्नरी चित्रकारांने सुंदर पौराणिक चित्रे काढली होती. ती आजही ती काल काढल्यासारखी टवटवीत आहेत. हे षिव मंदिर असल्यानं पहिलचं चित्र बारा जोर्तिलिंग आहेत. त्याच्या षेजारी महाराष्ट्रातील अष्टविनायक आणि पुढं नवग्रह देवतांची चित्र आहे. मंदिरांच्या मुख्यदारात आतील बाजुने तटबंधीत गणपती, मारूती, देवीच्या मृती बसून छोटी मंदिरे आहेत.

अमृतेष्वराच्या मंदिरांची उभारणी मालोजी राजांनी आपली धर्म पत्नी उमाबाईसाहेब यांच्या आग्रहामुळं केली होती.

**राष्टसंत आचार्य सम्राट आंनदऋषीजी स्मारक मंदिर** : आनंदधाम हे आंनद आंनदऋषीजींच्या पवित्र स्मृतींचे पावन प्रतिक मानण्यात येते. 28 मार्च 1992 रोजी आचार्यांचे देहवासन झाले. त्यावेळी त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या इथ हे स्मारक निर्माण केले. आहे. आठ कमळांच्या उमललेल्या पाकळयाच्या आकारांची ही समाधीस्थळ मोठे अर्थपुर्ण आहे. कमळांच्या उमलेल्यापाकळया सारखे आंनदऋषीचे जीवन सर्व बाजुनी उमलेले होते. त्यात खाली तीन–चार फुट गोल संगमरवरी चैाथरा दिसतो. ही तीच आंनदऋषीजीची पवित्र समाधी, येथे येण्यासाठी पाय–या उतरून खाली जावे लागते. जणू काही यष मिळविण्यासाठी खाली येवून नमावे लागते. हे स्थळ सर्व धर्मियासाठी खुले आहे. समाधी परीसर अत्यंत सुंदर आहे. सर्वत्र हिरवळ,आजुबाजूला नाराळांची इतरष्षोभिंवत वृक्ष,अंत्यत प्रसन्न,एकांत वातावरण आहे. आनंदधाम हे अहमदनगरातील लोकांचे श्रध्दोचे व अस्थेचे केंद्र बनले आहे.[4] तो परीसर आंनदऋषीजीच्या अनुपस्थीत आपल्याला दैंनदिन जीवनासाठी उर्जा पुरवत आहे.

**अवतार मेहेरबाबा समाधी मंदिर**:मेहेरवान शेरियार इराणींना आपण मेहेरबाबा म्हणून ओळखतो. त्यांचा जन्म 25 फेब्रुवारी 1894 रोजी पूण्यात झाला. बबांनी 10 जूलै 1926 पासून तब्बल 44 वर्षे आमरण मौन धारण केले. त्याचें मते मौन म्हणजे प्रेमेचा अनाहत नाद होय. ते आध्यात्मीक कार्यासाठी व मानवाजातीमध्ये प्रेमभावनेची बीजरोपन करण्यासाठी 69 देषांना भेटी दिल्या .आपल्या महानिर्वाणाच्या 40 वर्षे आगोदर त्यांनी मेहरबादच्या टेकडीवर स्वतःचे समाधिस्थान बांधुन घेतले होते. या समाधी मंदिरात चारीही कोप–यात हिंदू, मुसलीम, ख्रिष्चन,आणि पारषी धर्माची बोधचिन्हे आहेत. तसेच 'सेवेतील स्वामीत्व' हे ध्येय वाक्य मंदिरावर कोरलेले दिसते.

**जयरामनाना महाराज मंदिर** : दिल्लीगेटच्या बाहेर नाना महराजांच्या मठातील दोन षिखरे असलेले मंदिरे दुरवरून दिसतात.[5] पुर्वी रामदास स्वामींच्या षिष्यांनी श्रीराम व ध्यान मंदिरे बांधलेले होती. तेथेच पुढे षिवालय उभारण्यात आले. देषमुखाच्या वाडया समोरील त्याच मोगळया जागेत नानामहारांजीनी संजीवन समाधी घेतली. श्रीराम मंदिराला सगवानी सभा मंडप होता. त्याच जागेवर काही अंषी तसाच सभामंडप उभारण्यात आला. येथील षिवमंदिराची रचना उत्तर पेषवाईत झालली असावी. सभामंडपाचे लाकडी कोरीव काम प्रेक्षणीय आहे. त्यामुळं इथं प्रसन्नता मिळते.एका साक्षत्कारी संताच्या सानिध्यात आल्याचे भाविकांना समाधान मिळते. दिल्ली दरवाजच्या बाहेरील बाजुला शनि मंदीर आहे. त्या रांगेत जवळच जयरामनाना देषमुख यांचा मठ व मंदिर आहे. दिल्लीगेट लालटाकी रस्त्यावरूनच उजव्या बाजुला सिध्दीबागेच्या आलिकडे हे प्राचीन षिवालय आपल्या दृष्टीस पडते. महादेवाचे मंदिर हे दगडी बांधकामात असलेले अस्सल पेषवाईतील वाटते. त्या पष्चिमेला षिवालयाचे प्रवेषव्दार जुन्यापध्दतीचे बांधलेले आहे. आत प्रवेष करताच या मंदीराच्या सभामंडपात येतो. हा सभामंडपात अतिषय सुंदर सागवानी लाकडात बांधण्यात आला आहे. त्याच्या खांबावर विविधप्राणी व पक्षांच्या आकाराची नक्षी काढली आहे. सभामंडपाच्या आतील छतावर आकर्षक,नाजुक,सुंदर नक्षीकाम केलेले दिसते. नानामहाराजांनी याच मंदिरात योगवासिष्ठय,महाभारत या ग्रंथांचे वाचन केले.[6]

4. आदर्शऋषी, आस्था का केंद्र आनंदधाम,2009,पृष्ठ क्रं.2
5. ऋषी पी.डी., नगरची नवलाई,नाही,पृष्ठ क. 31
6. जयराम नानामहाराज,श्री विवेकसुदर्षन,संपा. देषमुख पद्‌मजा,2002 पृष्ठ क्रं. 04

काचेच्या झुबरांनी त्यावर साज चढविलेला आहे. विद्युत रोषणाईने त्याला अधिक मनमोहकता येते. खरं तर देषमुख हे या भागातील वतनदार घराणे. तो वतनदार घराण्याचा डामडौल या मंदीरात जाणवल्या षिवाय राहत नाही. पण त्याचा उपयोग या मंडळीनी ईष्वर भक्तीसाठी केला. मुळात इथं ही वस्ती उत्तर पेषवाईत किंवा ब्रिटीषकाळाच्या प्रारंभी सन 1821 पुर्वी वसली असावी. ते येथील बांधकामावरून आपल्या लक्षात येते. संत जयरामनाना देषमुखाच्या काळात षिवालय होतं. याच मंदीर परीसरात ते राहात असल्याने ही सर्व सुबत्ता होती. ऐसपैस जागेवरून हे लक्षात येते. इंथ षिवालयात स्वंभु षिव पिंड आहे. या षिवालयाच्या शेजारीच दुसरे मोठं साधारणतः दक्षिणमुख मंदिर आहे. तीच संत जयराम नाना महाराजांची संजीवन समाधीस्थान होय. श्रेष्ठ साधु संत विष्वचैतन्यात विलीन होण्यासाठी जीवंत समाधी घेतात.या अषा पवित्र समाधीस्थलावर मंदीरे उभारून मोठ मोठे उत्सह साजरे केले जातात. जायराम नानाच्या समाधी स्थलावर मंदीर उभारले गेले आहे. येथे श्रीमहादेव, श्रीदत्तमंदिर, श्रीराम मंदीर अषी इतर मंदीरे आहेत. या मठाच्या सभोवती तटबंदी आहे. जयराम अनंत वाबळेनानांनी याच मंदिरात लोकांना षरीरषक्ती व धनषक्तीपेक्षा ईष्वरषक्ती शाष्वत असल्याचा उपदेष केला.[7]

**खाकीदाबाबा समाधी मंदिर** : अहमदगनरमध्ये लालटाकी येथे खाकीदाबाबांचा मठ व मंदिर आहे. . इथं एक परम तपस्वी खाकीदास बाबांचे वास्तव्य होतं. ते एक हट योगी होते. ते ब्रिटीष पोलिस दलात कार्यरत होते. त्यांना वैराग्य प्राप्त झाल्या नंतर त्यांनी तो पोलिसांचा ड्रेस अंगावर तसाच ठेवला. पोलिस दलातील खाकी वस्त्र परधान करणारा माणूस वैरागी होतो. या गाष्टीचे त्यावेळच्य येथील लोकांना मोठ कौतुक वाटायचं. त्यातुन त्यांना खाकीदास असे नाव लोकरूढीत पडल असावं. त्याचं मुळ नाव बाळकदास होते. बाळकदास बुवांनी इथं आपली तपष्चर्या केली. येथील भगवान जगन्नाथाचे बिर्ला पध्तीचे आकषक मंदीर दृष्टीस पडतं.

**पंचमुखी मारूती मुर्ती** : मठात प्रवेष करताच समोर सुमारे पाच फुटी आकर्षक रंगात रंगविलेली संगमरवरी मारूतीची पाच मुख असलेली मुर्ती मोठी विलोभनीय भासते. अषी मुर्ती संपुर्ण भारतात आंध्र प्रदेषातील मंत्रालय या गावत आणि अहमदनगर मध्येच आहे. पुर्वी येथे पंचमुखी मारूतीची साधी मुर्ती होती. ती षेंद—या रंगाची होती. ती रामदास स्वामींनी स्थापीली. भगवान जगन्नाथाचे भव्य व संगमरवरातील मंदिर जमीनीपासून सुमारे वीस फुट उंचीवर एक विषाल चौथ—यावर बांधण्यात आले आहे. मंदिराकडे जाण्याठी पंचमुखी मंदिराच्या डाव्याबाजुने पुढे जावे लागते. तेथुन पुढं काही पाय—या चढून वर गेल्यावर उजव्या बाजुने वळून पुन्हा पाय—या चढल्यावर एक मोठा सभा मंडप दिसतो. तिथं जगन्नाथ पुरी सारखीच गरूड देवता आहे. तेथे फरषीवर सुंदर डिझाईन काढलेली आहे.समोर गाभा—यात मध्यभागी तीन मुर्ती दिसतात. भगवान जगन्नाथ त्यांच्या बाजुला सुभद्रा व शेजारी बलराम आहेत. बलरामचाच्या षेजारी राधाकृष्णाची मुती आहेत. तर याच गाभा—यात डाव्या बाजुला राम,लक्ष्मण आणि जानकी यांच्या सुंदर मुर्ती आहेत. या षिवाय भगवान जगन्नाथची उत्सव मुर्ती देखील आपल्याला दिसते. *तेथे* डाव्या बाजुला खाली पाच फुटी दगडी स्तंभावर खाकीदास बाबांची संजीवन समाधी आहे. त्याच जागेवर त्याचां अंत्यविधी आला. तेथेच त्यांची समाधी बांधली आहे. त्यावर एक षिलालेख कोरलेला आहे. त्यात 'श्री वैकंटवासी श्रीरामउपासक महाराज बालकदासजी देव लोक झाले. मिति फालगुन वद्य 6 गुरूवार समत 1945' अषी माहिती दिसते. .या समाधीच्या डाव्या बाजुला नगरमधील अष्ठविनायका पैकी एक प्रसिध्द गणपती मंदीर येथे आहे. ती उजव्या सोंडेची आहे.या षिवाय अहमदनगरमध्ये बागडपट्टीमध्ये श्री लक्ष्मीनाराण मंदिर,गांधी मैदनातील मार्कंडेय मंदिरेही उल्लेखनीय आहेत.

**निष्कर्षः** अहमदनगर शहराच्या स्थापनेपुर्वीपासून त्यावेळी अस्तीत्वात असणा—या छोटछोटया गावा गावातुन समाजाने आपले श्रध्दास्थाने निर्माण केलेली होती. समाज

स्वरंक्षणासाठी किंवा समाजाच्या अस्तीत्वसाठी ईष्वरीषक्तीपुढे शरण गेले, त्यामुळे श्रध्दा ठेवली जात. अहमदनगरमधील समाजाला सुबुध्द बनविण्याचे, येथील सर्वसामान्य लोकांच्या अस्थिर मनाला दृढ व स्थिर करण्याचे काम आणि त्यांच्या हृदयामध्ये श्रध्दा–भक्ती जागृत करण्याचे कार्य येथील विविध मंदिरांनी शतकानुषतके सक्षमपणे केलेले दिसून येईल.त्यातुन त्यांनी उपलब्ध साधनाच्या मदतीने देवालयांची उभारणी केली. त्यावर विविध राजवटींचा प्रभाव स्पष्ट दिसतो. त्यातुन समाजाला मोठी शक्ती ,प्रेरणा आणि जीवन जगण्याचे बळ मिळत गेले. हे विविध मंदिरे उभारण्याच्या पध्दतीवरून आपल्या लक्षात येईल. ही श्रध्दास्थळे,पुजास्थळे, उपासना केंद्रे मानवाच्या तत्कालीन गरजेतुन निर्माण झाली आहेत. त्यांची रचना मोठी अभिनव पध्दतीची आहे. आपले दुःख, अडचणी, समस्या ,व्यथा सोडवणारा,तारणारा परमेष्वर आहे. त्याचे अस्तीत्व म्हणजे मुर्ती होय. त्या मुर्त्यादेखील मोठया आकर्षक,वैषिष्टयपुर्ण आहेत. महामानवांचा आदर्ष समाजाला नेहमीच पथदर्षक राहिला त्यातुन स्मारक मंदिराची निर्मिती झालेली आढळते. याच प्रक्रीयेतुन अहमदनगर शहरात अनेक वैषिष्टयपुण मंदिरस्थापत्य उभ राहिले.भारतीय संस्कृतीचे वैषिष्टये चिंरतन राखण्यात येथील मंदिरांनी महत्वाची भुमिका बजावलेली दिसून येते.

**संदर्भ :**


1. ऋषी पी.डी., 100 वर्षातील नगरचे बदलते समाज जीवन, शार्प प्रिंटर्स 2014,अहमदनगर
2. देषमुख वसंतराव,दैनिक सांवतम अहमदनगर पंचषताब्दी विषेषांक,1990,श्रीरामपुर
3. दैनिक दिव्य मराठी ,मॅजिस्टीक अहमदनगर,
4. देषमुख प.ग.,श्री सदगुरू जयराम नानामहाराज हयांचे चरित्र,तृतीय,आवृत्ती,2013,अक्षय ऑपसेट,अहमदनगर
5. ऋषी पी.डी.,नगरची नवलाई,शार्प प्रिंटर्स,अहमदनगर
6. आदर्शऋषी,आस्था का केंद्र आनंदधाम,श्री तिलोकरत्न स्थानकवासी जैन धार्मिक परीक्षा बोर्ड,2009,अहमदनगर
7. कुंटे भ.ग.महाराष्ट राज्यगॅझेटिअर मध्ययुगीन कालखंड :राजकीय व सामाजिक इतिहास, दर्षनिका विभाग, मराहाराष्ट षासन ,2014 मुंबई
8. कोळसे पाटील दादासाहेब, षिर्डा–शनिषिंगणापूर अहमदनगर जिल्हा पर्यटन,बंटी थापर,श्रीरामपुर
9. पारखे ह.ग.,आमचा नगर जिल्हा,दामले विद्याधर हरि,1930,पुणे
10. मिरीकर ना.य., अहमदनगर शहराचा इतिहास,कस्तुरे वा.द. प्रथम आवृती 1967,अहमदनगर
11. फिरोदिया कुं.सो.,शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ,1954,अहमदनगर
12. दर्डा जवाहरलाल,नगर पंचषताब्दी विषेषांक,,पृथ्वी प्रकाषन,1990,औरंगाबाद.

# देगलूर तालुका : येरगी येथील मुर्तिशिल्पांचे अध्ययन

**डॉ. मारोती चव्हाण, 9730706160**
**maroti3399@gmail.com**

नांदेड जिल्हयातील देगलूर तालुक्यामध्ये 'होट्टल' हे गाव कल्याणी चालुक्य काळाचा वारसा जोपासलेले ऐतिहासिक स्थान आहे. या गावापासून 4 कि.मी. अंतरावर व देगलूर शहरापासून 18 कि.मी. अंतरावर 'येरगी' हे गाव वसलेले आहे. येरगी भौगोलिक स्थान $19^0$ 32'' उत्तर आणि $72^0$ 58'' पूर्व अक्षांशावर वसलेले आहे.[1] हे ठिकाण समुद्र सपाटीपासून साधारणतः 900 ते 1000 मिटर उंचीवर आहे. देगलूर शहरापासून नैऋत्य दिशेस 18 कि. मी. अंतरावर येरगी येथे जाण्यासाठी स्थल मार्गाचा उपयोग करता येते. येरगी येथे पूर्वेला दोन कल्याणी चालुक्य कालीन मंदिरे आढळतात. या गावात कल्याणी चालुक्याच्या काळातील एकुण पाच शिलालेख उपलब्ध झालेले आहेत. या शिलालेखात आलेल्या वर्णनात मंदिरास दिलेल्या दानासंबंधित माहिती येते.[2] येरगी येथे कल्याणी चालुक्य काळातील प्रसिध्द बाजारपेठ होती. तसेच येरगी हे 40 गावाचे प्रमुख प्रशासन केंद्र होते.[3] या स्थलनामातील मुख्य शब्द 'एर' असून कानडी भाषेत त्याचा अर्थ बोरीचे झाड असा होतो.[4] येरगी येथील कन्नड भाषेच्या शिलालेखात ''एरिगे'' असे नाव आलेले दिसून येते. येरगी येथील मुर्तिशिल्पांच्या माध्यमातून प्रमाणबध्दता, भव्यता व शिल्पसौंदर्य निदर्शनास येते. आध्यात्मिकतेतून लोकमाणसात अनेक देवी–देवतांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा प्रघात प्राचीन काळापासून दिसून येतो.

मनुष्य वास्तुला घडवितो व वास्तुला माणसाला घडविते.[5] या परस्परविरोधी विधानातच मनुष्य जीवनाचे व वास्तुकलेचे सुत्र सापडते. धर्मसत्तेतून मानवी जीवन विकसित होते. विविध प्रकारचे घट एकत्र आणुन तयार केलेली कृती म्हणजे 'वास्तु' होय.[6] अशा वास्तूशिल्पकारांच्या भावनांचा आविष्कार असतात. मंदिरे म्हणजे देवतांसाठीच्या वास्तू होय. या वास्तुंवर प्रथम दर्शनीय भागावर गणेश मुर्तीचे शिल्पांकन आढळते. 'मूर्ती' या शब्दाने विशिष्ट व्यक्ती किंवा देवतेचे मूर्त स्वरूप व अनकृती आणि सादृश्य[7] या गोष्टी ध्वनित होतात. 'मूर्ती' शब्दासाठी प्रतिमा अर्च्चा, शिल्प, प्रतिरूप, कृती, इत्यादी[8] पर्यायी शब्द वापरले जातात. हिंदू धर्मात ज्या मूर्ती निर्माण होतात. त्या पाषाण कोरून निर्माण केलेल्या मुर्तीचा उल्लेख 'मुर्तिशिल्प' म्हणून केला जातो. अशा मुर्ती हिंदू देवी–देवतांच्या असतात. त्यामुळे विविध देवतेची उपासना प्राचीन काळापासून प्रचलित आहे. हिंदू धर्मात मुर्तीपूजेला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. येरगी येथील मुर्तिशिल्पांच्या माध्यमातून तत्कालीन कल्याणी चालुक्य काळातील धार्मिक व सामाजिक परिस्थितीची जाणीव होते. येरगी येथे प्रामुखाने सहा मुर्ती शिल्पावशेष आढळतात.

**1. लक्ष्मीनारायण : (छायाचित्र क्र. 01. पाहा.)**

येरगी येथील मारुती मंदिराच्या पारावर स्थित एक शिल्पाकृती निदर्शनास येते. विष्णुची पत्नी लक्ष्मी आहे. विष्णुला 'नारायण' असे संबोधिले आहे, लक्ष्मी व विष्णुच्या आलिंगन मूर्तीस 'लक्ष्मी–नारायण मूर्ती'[9] असे संबोधिले जाते. लक्ष्मीच्या स्वतंत्र मूर्ती मात्र गजलक्ष्मीच्या रुपाने पाहावयास मिळतात. लक्ष्मी–नारायणाच्या रुपाने मूर्ती स्थानक आणि आसन स्थितीत आढळतात. ही मूर्ती आलिंगन स्वरुपातील आहे. या मूर्तीच्या खाली गरुड नमस्कार मुद्रेत दाखविला आहे. मूर्तीचा उजवा पाय खाली सोडलेला आहे. नारायणाने डाव्या हाताने लक्ष्मीस आवळून धरलेले आहे. लक्ष्मीने उजवा हात नारायणाच्या गळ्याभोवती टाकला आहे. अशा ठेवणीस 'आलिंगनमुद्रा' म्हणतात.[10] लक्ष्मीचा डावा हात तुटलेला असून मूर्तीचे उजव्या बाजूचे दोन्ही हात तुटलेले आहेत. विष्णु व्दिभंग स्थितीत उभा आहे. त्याची मुद्रा प्रसन्न आहे त्यांच्या उजव्या वरच्या हातात कमळ तर डाव्या वरच्या हातात गदा आहे. विष्णु चतुर्भूज असून उजवा हात कोपऱ्यापासून खंडीत झाला आहे तर

डाव्या हाताने लक्ष्मीस आलिंगन दिले आहे विष्णु व लक्ष्मीच्या मस्तकाच्या पाठीमागे प्रभामंडल आहे.

**2. शिवपार्वती (उमा–महेश्वर) : (छायाचित्र क्र. 02. पाहा.)**

येरगी येथे मारुती मंदिराच्या पारावर हे मुर्तिशिल्प ठेवलेले आहे. ही मूर्ती आलिंगन मुद्रा स्वरुपातील आहे. पार्वतीला 'उमा' असेही नाव आहे. 'उमा' म्हणजे पार्वती आणि महेश्वर म्हणजे शिव होय. हे शिल्प शिव–पार्वतीचे आलिंगन मुद्रेतील शिल्प आहे. खाली शिवाचे वाहन नंदी दाखवलेला आहे. केवळ आलिंगनमुद्रेत बसलेल्या शिव–पार्वतीस उमा–महेश्वर म्हणतात.[11] मूर्तीचा उजवा पाय खाली सोडलेला असून, पार्वती डाव्या मांडीवर बसलेली आहे. शिवाच्या मूर्तीला चार हात असून, खालचा उजवा हात अभयमुद्रेत आहे. वरच्या उजव्या हातात त्रिशूल व वरच्या डाव्या हातात सर्प आहे. खालच्या डाव्या हाताने त्याने पार्वतीस आवळून धरलेले आहे. शिव–पार्वती दोन्हीही मूर्ती अलंकृत आहेत. पार्वतीने आपला उजवा हात शिवाच्या मानेभोवती टाकलेला आहे.[12]

**3. ब्रह्ममूर्ती : (छायाचित्र क्र. 03. पाहा.)**

कल्याणी चालुक्य काळात ब्रह्मदेवाची पूजा आणि उपासना प्रचलित होती. ब्रह्मदेवाची मंदिरे जशी तुरळक प्रमाणात आढळतात त्याच प्रमाणे ब्रह्मदेवाच्या मूर्तीही तुरळक प्रमाणात आढळतात. कंधार तालुक्यात शिराढोण येथे ब्रह्मदेवाचे एक मंदिर आहे या मंदिरावर ब्रह्मदेवाची स्थानक प्रतिमा आहे.[13] येरगी येथील मारुतीच्या पारावरील ही मूर्ती चर्तुभूज आहे. या मूर्तीचे खालचे दोन्ही हात तुटलेले आहेत. मूर्ती अलंकृत आहे. मूर्तीच्या मधल्या तोंडावर दाढी दाखवली आहे. मूर्तीच्या वरच्या डाव्या हातात पोथी आहे. मूर्तीच्या वरच्या उजव्या हातात स्त्रुक असावे.[14] मूर्तीची बरीच झीज झालेली आहे, त्यामुळे खालच्या हातात कोणती आयुधे आहेत हे स्पष्ट सांगता येत नाही.

**4. विष्णु मूर्ती : (छायाचित्र क्र.04. पाहा.)**

विष्णु ही देवता प्राचीन काळापासून पूजनीय आहे. विष्णुच्या अवतारानुसार व संप्रदायानुसार मूर्ती घडविण्यात आलेल्या आहेत. विष्णुची 24 रुपे मानली जातात. गदा, चक्र, शंख, पद्म, जलपात्र आणि फळ ही विष्णुची आयुधे[15] आहेत. येरगी या ठिकाणी गावाच्या बाहेर पूर्वेला एका मंदिरासमोर एक विष्णुमूर्ती आढळते. ही मूर्ती चतुर्भूज आहे. या मूर्तीच्या डाव्या खालच्या हातात गदा आहे व वरच्या डाव्या हातात चक्र आहे. उजवा खालचा हात योगमुद्रेत असून वरचा डाव्याहात तुटलेल्या स्थितीत आहे. डोक्यावर मुकूट, जानवे, कटिसूत्र, मण्यांचा लोंबता हार, वनमाला इत्यादी अलंकार विष्णुने परिधान केलेले आहे. या मूर्तीच्या दोन्ही बाजूस चवरीधारक स्त्रीयांच्या मूर्त्या पाहावयास मिळतात.

**5. मातृदेवता मूर्ती : (छायाचित्र क्र.72. पाहा.)**

मातृदेवतेचे उल्लेख प्राचीन काळापासून मिळतात काही ठिकाणी लक्ष्मीच्या रुपात माता अवतरल्याचे उल्लेख आहेत. येरगी येथील शिल्पावशेषात एक मातृदेवतेची मूर्ती आढळलेली आहे. ती मातृदेवतेची मूर्ती गावाच्या मध्यभागी असलेल्या एका शिवालयाच्या अवशेषात दिसून येते. यातच शिवपिंड ठेवलेले आढळते. या मूर्तीचे पाठीमागचे दोन्ही हात तुटलेले आहे. ही मूर्ती चतुर्भूज असून वरच्या दोन हातात कोणते आयुधे आहे, हे सांगता येत नाही. या मूर्तीच्या डोक्यामागे प्रभावळ आहे. डावा पाय वर घेऊन व उजवा पाय खाली अंगठ्याच्या भारावर ठेवलेला आहे खालच्या दोन हातात कोणती आयुधे आहे, हे स्पष्ट सांगता येत नाही. कर्णकुंडल, मण्यांचे हार, बाजूबंद कंबरपट्ट्यावरील लोबंत्या मण्यांचे हार स्पष्टपणे दृष्टीस पडतात. या मूर्तीची लांबी 3 फुट 7 इंच तर रुंदी 2 फुट 8 इंच आहे. ही कोणत्या मातृदेवतेची मूर्ती हे स्पष्ट करता येत नाही. या मूर्तीप्रमाणे कंधार येथे राष्ट्रकुट कालखंडातील एक कालिकामातृदेवी[15] कोरविण्यात आलेली आहे. शाक्त संप्रदायाची परंपरा या मातृदेवतेच्या मूर्तीच्या माध्यमातून स्पष्ट होते.

**6. सप्तमातृका :**

'सप्तमातृका' या शब्दाचा प्रयोग सर्वप्रकारच्या देवीसाठी केला जातो. ऋग्वेदकाळापासून त्याचे उल्लेख सापडतात. देवी भागवत पुराणांत[16] ब्रह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वराही, इंद्राणी व चामुंडा या सात सप्तमातृकाची माहिती येते. या सप्तमातृकांबरोबर आठवी मातृका लक्ष्मीचा उल्लेख केलेला आढळतो. तसेच शैव व वैष्णव संप्रदायाच्या अनेक मातृदेवतांचा उल्लेख आलेला असून खजूराहोच्या म्युझीयममध्ये सप्तमातृकाचा शिल्पपट आढळतो.[17] येरगी येथे जी मातृदेवता मूर्ती आढळून येते त्या मूर्तीच्या पाठीमागे एक भिंतीत सप्तमातृकाचा पट्टा आढळून येतो. या सप्तमातृकाच्या एका बाजूला गणेश आहे. या सप्तमातृका शिळेची लांबी 5 फुट व रुंदी 17 से.मी. इतकी आहे. सप्तमातृकेचे प्रत्येकाचे वाहन वेगवेगळे दाखविण्यात आले आहेत. जसे ब्रह्मीचा हंस, माहेश्वरीचा वृषभ, कौमारीचा मोर, वैष्णवीचा गरुड, वराहीचा महिष, इंद्राणीचा गज व चामुंडाचा गिधाड[18] तर उजव्या बाजूकडून दोन गणेश शिल्प शिल्पांकीत केले आहेत.

येरगी येथील कल्याणी चालुक्य काळात बांधण्यात आलेली बहुतेक स्मारके नष्ट झालेली आहेत. या मंदिर स्मारकांची पडझड झालेली आहे. बाह्यभागावर असलेले मुर्तिशिल्पही विशेष उल्लेखनीय होती. पण आज येथे मंदिरांचे अवशेष आज सापडतात. येरगी येथील मुर्तिशिल्पे ही कल्याणी चालुक्य काळातील ऐतिहासिक वारसा आहे. त्यामुळे या ऐतिहासिक स्मारके आणि मुर्तिशिल्पांचे जतन करणे आवश्यक आहे. हे काम भारतीय पुरातत्त्व विभागाचे असले तरी हे काम त्या—त्या गावातील नागरीकांनी करणे आवश्यक आहे. यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा ठरतो. स्थानिक पातळीवर उपलब्ध मंदिरे व ऐतिहासिक अवशेषांचे जतन व संर्वधन करण्यासाठी गावातील नागरीक व पुरातत्त्व विभागाने प्रयत्न करावे. मंदिराची पडझड थांबविण्यासाठी मंदिराची दुरुस्ती करावी. मंदिराचे उपलब्ध अवशेष नदीत, विहीरीत इतर ठिकाणी टाकू नयेत. त्याचा संग्रह करावा. योग्य स्थानिक ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. मुर्तिशिल्पावशेषांची तोडफोड झाल्यास दगडी शिळा म्हणुन बांधकामात वापर न करता, त्या शिल्पांची दुरुस्ती करून योग्य ठिकाणी प्रतिष्ठापना करावी किंवा पुरातत्त्व विभागाकडे द्यावे. येरगी येथील उपलब्ध ऐतिहासिक स्मारकांना रंगलावून मुळ अस्तित्व नष्ट करु नयेत. ती आहे त्या स्थितीत राहू द्यावीत व त्यांचे संरक्षण व जतन करावे. असे आवाहन केले जावे. प्राचीन ऐतिहासिक अवशेष उपलब्ध झाल्यानंतर सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी शासनामार्फत देगलूर येथे ऐतिहासिक दालन व इमारतीची निर्मिती करावी.

**संदर्भ ग्रंथ यादी**

1. नांदेड डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन गॅझेटिअर विभाग, मुंबई, 1971.पृ. 442.
2. रित्ती श्रीनिवास व शेळके जी. सी.(संपा.),: इनस्क्रिप्शन फ्रॉम नांदेड डिस्ट्रिक्ट, यशवंत महाविद्यालय, नांदेड, 1968. पृ. 26 (लेख. 22.)
3. ठोसर हरिहर, : स्टडिज इन दि हिस्टोरिकल जॉग्राफी ॲण्ड इकनोग्राफी ऑफ मराठवाडा, अप्रकाशित शोधप्रबंध, डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, 1977 पृ.132.
4. ठोसर हरिहर, : प्राचीन मराठवाड्याचे व्यक्तिमत्व, मराठवाडा काल आणि आज, (संपा.—काळे भगवान) संकेत प्रकाशन, जालना, 1986 पृ. 72.
5. कॉलिगंकुड आर. जी.,: कलेची मुलतत्त्वे, (भाषांतर—मालशे स. गं. व मिलिंद स. मा.) म.रा.सा. आणि संस्कृति मंडळ, प्रथमावृत्ती, मुंबई, 2004. पृ. 88
6. वाड विजया,(संपा.) : मराठी विश्वकोश, (खंड 17 वा) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 2007. पृ.792
7. साखलकर र. वि., : कलाकोश, राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपुर, संस्करण प्रथम, मुंबई, 1998 पृ.116
8. त्रिपाठी रामप्रसाद, (प्र. संपा.), : हिंदी विश्वकोश, खंड तिसरा, नागरी प्रचारीणी

सभा, वाराणसी, 1963. पृ. 335
9. सोमपुरा प्र. ओ., : भारतीय शिल्पसंहिता, (पूर्वार्ध) सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. प्रथमावृत्ती, नवी दिल्ली, 1975. पृ. 107–108.
10. खरे ग. ह., : मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, 1939 पृ. 29.
11. कित्ता, पृ. 98.
12. पुरी सुनिल, : नांदेड जिल्ह्याचे ऐतिहासिक व्यक्तिमत्व, (इ.स. पूर्व ते 13 वे शतक) पीएच. डी. अप्रकाशित शोध प्रबंध, डॉ. बा. आं. म.,वि. औरंगाबाद, 2000., पृ. 263.
13. कठारे अनिल व साखरे विजया, मंदिरे आणि मुर्तिशिल्पे, अल्फा पब्लिकेशन, नांदेड, 2008. पृ. 152.
14. पाठक अ. शं., (संपा.), नांदेड जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र राज्य भाग–2, 2011. पृ. 286.
16. जोशी नि. पु., : भारतीय मूर्तिशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ निर्मिती मंडळ, प्रथमावृत्ती, नागपूर, 1979. पृ. 50–51.
17. देव प्रभाकर, कंधार :एक ऐतिहासिक शहर, पुरावत्व व वस्तुसंग्रहालय विभाग, पुणे,1991. पृ.14.
18. देवीभागवत पुराण, मनसुखराय मोर, कलकत्ता, 1960, 7, 28–56, पृ. 686.

## छायाचित्र





1. लक्ष्मीनारायण

2. शिवपार्वती (उमा–महेश्वर)

:

3. ब्रह्ममूर्ती







4. विष्णु मूर्ती

5. मातृदेवता मूर्ती :

# The Iconographic Programme of The Virūpākṣa Temple, Pattadakal, Dis. Bagalkot, Karnataka

**Shalaka Pravinkumar Bhandare.**
Ladies Hostel, Deccan College Post Graduation and Research
Institute, Deemed University, Yerwada, Pune- 411 006
Permanent Address- 355/4 Sai Palace, Madhali Ali,
Near Old Ganesh Theatre, Wai, Satara, Satara-412 803

## Introduction

Karnataka contains a rich heritage and culture in the centre of Deccan region of peninsular India. These remains are in the form of temples, sculptures, inscriptions on stones and copper plates, etc.The typical remains of the ancient Karnataka art and architecture in their original vigorous form are extant in the temples and sculptures of Pattadakal near Badami. They form a basic group for the multitudinous growth of temples and sculptures of the medieval and late schools of artistic styles in Karnataka and thus furnish the earliest specimens without which a connected history of the styles of Indian architecture and sculpture is impossible.[1]These art grandeursin red- yellow sandstone present at Pattadakal.[2]The spread in and around the towns of Badami, Aihole, the village of Pattadakal and Mahakuta had been subjected to the sway of the Andhras, the early Cālukyas, early Kadaṁbas of Banvāsi, the Pallavas, the Rāṣṭrakūṭas.

## Location of the Virūpākṣa temple

Pattadakal the group of royal consecration temples situated in15̊ 57’5” North and 75̊ 48’53” East in the Bagalkot district of Karnataka state is located approximately 14 miles east of Badami and 6 miles south from Aihole, stands on the western (Left) bank of river Malaprabhā. The river which here takes a turn to the north before resuming its overall north-eastern course, has added grace and sanctity to the village.Within the group, nine out of the ten existing temples are of Brahmanical origin, belongs to the Cālukyas of Badami and one is Jain temple, some half miles from the main group of monuments, probably of later period. The description of the group of monuments follow an approximate north-south sequence, beginning with the Kāḍsiddhēśvara temple, Jambulinga temple, Chandrasekhara temple, Gaḷagnatha temple and Saṅgamēśvara continuing with the Kāśīviśvanātha, and the Virūpākṣa temple, Mallikārjuna temple, Pāpanātha temple. Almost all temples are dedicated to Śiva. The Virūpākṣa temple, originally known as Lōkeṣvara temple, the largest and most sophisticated of the monuments. The temple stands at the southern perimeterof the site’slandscaped compound, was the last temple to be constructed at Pattadakal and the last major temple of the Early Cālukyas. The temple faces East which stands close to the village

## Architectural Style of the Virūpākṣa temple

In Karnataka particularly both Nāgara and Drāviḍa temples were built, sometimes side by side. These two types are different from the late Karṇāṭa Drāviḍa or “Vesara”, with various characteristics of Nāgara style, which can be more prominent to the some early Cālukyan temples. Nagara temples and its hybridization were common in the Early Cālukya period. Likewise, the Virūpākṣa temple is originally in Drāviḍa style[3] of architecture with squareśikhara and these mixtures of styles seems through the feature of Śuḳanāsika, which is purely Nāgara element. The

provision of a front porch as well as side porches of an open type in continuation of the main vestibule occurs in Cālukyan features for the first time only in theVirūpākṣa temple at Pattadakal. The temple carved under the patronage of the Lōkamahādēvī, born in the family of Haihayas or Kalachuris,[4]the queen of Badami Cālukya King Vikramāditya II (733-744 CE), to commemorate his crucial victory over his rival the Pallavas.The architectural idioms commence from the Rajāsiṁhēśvara or Kailāsanātha temple at Kanchipuram constructed under the royal patronage of the Pallavas,

**Iconographical Programme of the Virūpākṣa Temple**

The iconographic scheme of temple exhibits the visual imagery representing Śaivism, Vaiṣṇavism and Śaktism through all architectural units such as a garbhagriha, praḍakśināpātha, mahāmanḍapa, mukhamanḍapa (with eighteen pillars in four rows), containing various bas-reliefs on pillars from Puranic stories and isolated nandimanḍapa with flat roof, surrounds sixteen parivara devata cells (most of the cells lost the images). The temple compounded by two doorways as on eastern and western side.The inscriptions on the temples provide much information about their patronage, age, architects, and the guilds that built them, and some of the names of the artists who did the carvings are also given.[5] As the profusion and quality of the carvings on the temple attest to the largenumbers of specialist artists especially recorded name as 'Guṇda' and 'Tribhuvanāchārya'[6]whom can be noticed through the inscriptions present in the porch (on two heavy pillars) andon entrance door in the vicinity of the temple. Much of this imagery reveals the heroic exploits of the gods and links these to the conduct and personality of the king, as one image of Śiva identified as manifestation of Vikramaditya II, as author compared king and state of kingship with the Śiva and his superiority.Vikramāditya II's military and political relationships with contemporary powers suggests his three successful excursions against the Pallavas and it reinvents iconographic scheme of Pallava dynasty. The Early Cālukya long-time rivals and their complex and nuanced relationship with Kalchuri and Kadaṃba dynasties can be exerted on the icons of the exterior wall. Here, a reason of influence of imagery can be seen that, queens of Vikramaditya II were from Hayhaya or Kalchuri dynasty. Another kind of symbolism like royal Hindu temples usually had clear political functions so, in consideration of the functions, Pattadakal was site for consecration of kings, can be helpful in identifying the images.[7]

Iconographic program of the Virūpākṣa temple is the construction, which can be elaborately seen firstly through the icons associated with the Early Cālukya capital of Badami, resembles to Badami cave no 3. For example- Viśṇu images from Daśāvatāra (Narasimha, Varaha), especially on the northern side of temple, then sculptures suggest royal consecration and sacrifice can be seen from images of Śiva like Lingoḍbhava is a very first image from the south (left) of main entrance to mandapa on the exterior wall of the temple, which have influence of the Pallava art with associated imagery of Viśṇu, Brahmā, flames aside of the lingam, then comes image of Gangādhara, which bears similarity with relief at Maṃṃalāpuram,another form of Śiva, Nateśa, Nataraja as dancing Śiva in various varieties present on the exterior wall as well as on parivara shrine. The temple also contains images on the porch pillars as facing to west there is an image of battle scene which can be identified as the climax scene of Kirāṭarjunīya battle, in which Siva and Arjuna is depicted. In front of this battle scene, on another pillar Ravana is shaking Kailasa, exactly similar in Ellora (Cave no. XVI) Kailāsa cave- temple carved under the

Rāṣṭrakūṭas. The image of Tripurāṇṭaḳa on the south exterior wall represented as a king's proper role on earth as Śiva which is confirmed by inscriptional records of Vikramāditya II and his victory over Pallavas' Kāñchipuram. The [6]See George Michell's Pattadakal. Series of Monumental Legacy.[7] see Cathleen Cummings- 'Decoding a Hindu Temple- Royalty and Religion in the Iconographic Program of The Virupaksha Temple, Pattadakal.' form of Bhikśaṭana suggests the philosophy out of materialistic life. The Aṇdhakāsuṛa mūrti on the south wall, and two- three unidentified forms of Śiva, so simply called as Śiva as dvārapāla, are present. Other than, another category seems of the images of Śiva with Pārvati, like image of Umāsahiṭa Canḍṛaśekhaṛa, which is wrongly identified as Kalyansundar mūrti i.e. marriage of Śiva and Pārvati, both playing dice also identical with the image in Kailāsa monolith, Ellora. Another image is the combination of half Śiva and half Pārvati i.e. Ardhanāriśvaṛa. and lastly imagery of the Rāṃa narrative as a model of ideal king in which three image panels of Vāli- Sugriva, Ravana and Jatāyu on either side with centre image-piece of Sita's abduction.The imagery of temple also contains images of Lakuliśa who was the greater teacher and systematizer of Pāśupata Śaivism, which comes here as key themes and figures. In this context, we recall that the Elephanta cave temple as well as the Rāmeśvara cave (XXI) Ellora are pure Saiva.[8] As in the context of Pāśupata Śaivite, it specifically suggests a state of perpetual nearness to god, to Śiva. Equating the philosophy of Pāśupata Śaivism with the actual iconographic scheme of the Virūpākṣa temple, Dukkhāṇṭa (end of suffering) is core idea, which visualized by the image of Aṇdhakāsuṛa. There is also an iconographic turn in the opposite direction, in sculptures directing viewers towards release from the world, towards mokṣa (liberation, salvation) by the sculptural program ofMarkaṇdeya below the image of Śiva in the same panel. The Patronage of chief queenexhibited the female aspect of queen's role[9] effects on iconography and layout especially on Nandi mandapa as many female images especially of Indrāṇi's image with Elephant staff, images of Nayikasand kinnara couples are carved. The image of Mahiśāsurmardini inside the north minor shrine is present in loose context. One small image of Ganeśa in the corner niche of south wall is also there.At theentrance into the hall of the temple, images of Śaṇkhanidhi, Padṃanidhi seated in niches with inscription below, also shows similarity from the Kailāsa-cave temple with same position of images. These deities symbolize the prosperity from the entrance, in iconographic terms. The ceiling image in the Virūpākṣa temple of Sūrya with full of iconographic details, adds sculptural beauty of temple monument. Apart from [8]The presence of Lakuliśa on the architrave of the main entrance indicates the Pāśupata sectarian,See Aschwin Lippe's article 'Early Chālukya Icons' [9]See Cathleen Cummings- 'Decoding a Hindu Temple- Royalty and Religion in the Iconographic Program of The Virupaksha Temple, Pattadakal.' main imagery scheme, presence of imagery of dvārapālas, *mithuṇa* couples[10] on the exterior walls also gives the iconographic evolution of particular images through the changes in expression, attributes, and other ornamentor details.

## Conclusion

Many scholars worked on the architecture and icons of early Cālukyan structural temple monuments, but very few scholars attempted the identification perspective in case of the Virūpākṣa temple. Among them Cathleen Cummings analysis become important but author deal icons in the perspective of royalty, dharma. Thorough investigation of the iconographic program of the Virūpākṣa temple can reveal a detailed analytical study. The focus points such as location of particular icon, orientation, physical appearance like postures, number of hands, attributes, mounts,

associated imagery with the principal icon, special iconographic features. After the identification of image of deity, it is required to unearth symbolism or related myth behind it. This grasped meaning after understanding symbolism, transforms the image into deity and further made the place as sacred shrine for devotees since the erection of monument till the survival of ideas of sacredness.

**References**


1. Annigeri, A.M. 1961. *A Guide to The Pattadakal Temples*. Dharwar: Kannada Research Institute.
2. Bolon, Carol R. 1988. Two Chalukyan Queens and their Commemorative Temples- Eighth Century Pattadakal. In *Royal Patron and Great Temple Art* ed. Vidya Dehejia. Bombay: Marg Publication. 39-2 p. 61-76.
3. Burgess, J. 1881. Inscription of Lōkamahādēvī. No.102. *The Indian Antiquary: A Journal of Oriental Research.* Delhi: Swati Publications. 10: 166.
4. Cummings, Cathleen. 2014. *Decoding A Hindu Temple: Royalty and Religion in the Iconographic Program of The Virupaksha Temple, Pattadakal*. California: SASA Books.
5. Hardy, Adam. 2001. Tradition and Transformation: Continuity and Ingenuity in the Temples of Karnataka. *Journal of the Society of Architectural Historians*. University of California Press on behalf of the Society of Architectural Historians. 60: 180-199.
6. Hultzsch, E. 1894-1895. Pattadakal pillar inscription of the time of Kirtivarman II. No.3. *Epigraphia Indica and Record of The Archaeological Survey of India.* Calcutta. J. F. Fleet. 3: 1-6.
7. Lippe, Aschwin. 1972. Early Chālukya Icons. *Artibus Asiae*, Artibus Asiae Publishers. 34: 273-330.
8. Michell, George. 2002. *Pattadakal.* Monumental Legacy. New Delhi: Oxford University Press.
9. Michell, George. 2014. *Temple Architecture and Art of the Early Chalukyas: Badami, Mahakuta, Aihole, Pattadakal.* New Delhi: Niyogi Books.
10. Panchmukhi, R.S. 1947. Pattadakal and its Sculptures- A Brief Outline. *Bulletin of Deccan College Post Graduate and Research Institute* 8: *60-72*

# STONE SCULPTURE AT JAIN DARMA IN PARBHANI DISTRICT

**DR RAJARAM R PIMPALPALLE**
A E S ARTS COMM& SCI COLLEGE HINGOLI

Marathwada region comprising seven districts is one of the Revenue Divisions in the State of Maharashtra. Aurangabad city is the headquarters of the region and also the seat of the Marathawada University. Lying at the cross-roads of ancient trades routes and nestled centrally in the Deccan-Plateau this region provide a vital link between the north and south. Its historical and cultural dimensions are reelected in the varied and variegated, artistic and archaeological monuments representing distinct religious faiths of all ages. Many a saint philosopher have trodden on the banks of the sacred river Godavari and stirred the souls of the masses and left behind them rich religious tractions with an inspired following.

The stone sculptured represent the three major religious faiths such as Buddhism, Hinduism and Jainism and their dates range between the $8^{th}$ and the $13^{th}$ the centuries A.D. The small icons wrought in black and white marble, as well as bronze and copper represent Jainism and they are datable to about the $16^{th}$ $17^{th}$ centuries. The Buddhist sculptures are much less in number which could be possibly due to declining conditions of Buddhism. The absence of loose sculptures of early centuries of the Christian era was probably due to large scale excavatory activities of the cava temples in this region. The structural temples in Marathwada prior to the Chalukays of Badami are conspicuous by their absence.

The stone sculptures depict the popular Vaishnavite and Shaivite themes such as the incarnations if Lord Vishnu and different manifestations of Lord siva. There are some scalpers of Ganeshs, Kartikeya and Sarbesamurti. The small icons are, by and large, the depictions of different Jaina tirthankaras and those of Siddhaika and Matangi.

The stone sculptures can be broadly analyzed into three groups which correspond with the rule of the Rashtrakutas, the Chalukays of Kalyana and the Yadavas of Devgiri. While the rock-cut architectural traditions persisted in Western india for more than 1200 years from about $2^{nd}$ century B.C.to about the $10^{th}$ century A.D. the beginnings of structural temple building activities certain to be a takeoff from the Deccan cannot be placed before the $8^{th}$ century A.D. Though it appears to be a takeoff from the existing art traditions certain departures were warranted. The sculptor had no longer vast rock surfaces on which his predecessors carved extensive tableaus overspreading vertically and horizontally. In the changed situation the sculptor was required to work on some slabs which were placed in the niches of the outer walls. Thus religious themes visualized in extensive narratives have been reduced to a single major incident. One may be inclined to compare the themes of Ravana shaking Kailasa depicted in rock-cut temple with the structural temple carvings. As S.K.Sarawati rightly puts it, the temples try to harmonize the rock-out medium of heavy physiognomic from with the slender and elegant physique. Gradually the temple sculpture exhibit a tendency towards elongation with liner flow of the limbs. With slender and supple bodies the figures have graceful movements and are more dynamic and expressive.

The Jaina sculptures which conform to the above descriptions may be associated with the Rashtrakuta art forms. This view is strengthened by the epigraphically data testifying the leaning of several. Rashtrakuta rules towards Jainism. Several Jaina temples, besides the Jaina group of caves at Ellora have been attributed to the Rashtakuta period. Some of the sculptures of Saivite themes seem to be of Rasjtrakuta affiliation. On the whole the Rashtrakuta temple sculpture continues to be free from excessive ornamentation unlike the succeeding periods. In this respect it follows the classical

traditions which is characterized by the smooth and unbroken planes ro the body's formation without any indication of muscular structure thereby suggesting the anatomy of a Divine being. The facial expression , the body flexions and the gestures of hands immediately suggest a dynamic life.

The Chalukyas of Kalyana emerged as the political successors of the Rashtrakutas in the Deccan. Their rule witnessed a vigorous and almost unprecedented temple building activity throughout the Kingdome. We have the largest number of extant temples of this period which can be favorably compared, both qualitively and quantitatively, with those of the Cholas and later on the Vijaynagara rules. A large number of temples, situated in Marathwada which were hitherto clubbed with the Yadava temples, have been conclusively established as Chalukyan temples. Apart form stylistic similarities with other Chalukyan temples form Karnataka, these temples contain in the inscriptions of Vikramadity VI. The Sculptors of the Chalukyan period have, for the first time attempted certain bold artistic experiments which became in course of time, highly evolved and standardizes are forms specially during the period of the Hoyas alas

Towards the end of the $12^{th}$ century A.D., the Yadavas of Devgiri became the dominant rules in last Hindu dynasty which held sway over the Deccan before the advent of Islamic rule. It is, therefore, a natural corollary that art and architecture embodying the Hindu and the Jaina religious themes did not flower subsequently. The Yadavas were also great patrons of art and provided liberal grants to both the religions.

1)Parsvanath StoneManwat (Parbhani District) 1626 A.D.23x17 cm.

Seated on a flat rectangular platform in padmasana and in dhyanimudra. The srivatsa mark is seen on the chest. The broken snake hoods emerge above the head. A snake is visible ate the base. Inscription is unclear.

2)ParsvanathSoap/Slate StoneManwat (Parbhani District) $16^{th}$ cent. A.D.18x11 cm.

Seated in padmasana in dhynimudra with the broken snake hood slightly emerging above the heads, srivatsa mark on the chest and inscription at the base is worn out.

3)ParsvanathaSoap/Slate stoneAshti (Parbhani District) $16^{th}$ cent. A.D. 17x12.5cm

Seated in Padmasana and in dhynimudra. The srivatsa mark is seen on the chest. Mahapurusha lakshanas like long ears, large palms and large feet are seen. He has a sharp and long nose, thick eyebrows and bulging eyes. The sculpture is in very good condition. Inscription at the base.

4)Tirthankara Green stoneWalhoor (parbhani District)$15^{th}$ cent. A.D.100x605 cm.

Seated in padmasaona and in dhyanimudra. The ears are shown unusually long. The figure is slightly stunted. The srivatsa is conspicuous by its absence.

5)ParsvanathaStoneWalhoor (parbhani District)$15^{th}$ Cent. A.D.12x8.5 cm

The figure is very badly obliterated and the part below w the waist and lower parts of the hands are missing. The snake hood above the head is intac with seyen hoods.

6)Parsvanatha Slate stone Manwat (parbhani District)$15^{th}$ Cent. A.D.12x8.5

Seated in padmasana and in dhyanimudra. The snake hood emerges slightly above the head. This sculpture is also badly obliterated.

7)Parsvanatha Slate stoneWalhoor (Parbhani District)$15^{th}$ cent.A.D.15.5 x 10.5 cm.

Seated in padmasana and in dhyanimudra the five headed snake hood emerges above the head. The asana or base is prominently shown. Inscription at the base is not clear.

8)TirhankaraBlack stoneWalhoor (Parbhani District)$17^{th}$ cent. A.D.9 x 7 cm.

The tirthankara is seated cross legeed ( padmasana) in dhyanimudra with curls on the head. The face is badly obliterated. There is an inscription at the base.

9)Jaina shrineTrap rock Walhoor (Parbhani District)$12^{th}$ cent. A.D.32 x 28 cm.

A mini shrine with a shikhara at the top and decorative motifs on either side. The seated figure of mahavira inside the shrine; cross legged with hands in meditative attitude.

10) **ChandraprabhanathaBlack stoneWalhoor (Parbhani District)15th cent.A.D.10.5 x 8 cm**

He is seated in padmasana and in dhyanimudra. The symbol is seen at the base. On his shest is the srivastsa mark. He has long ears and a sort of protuberance at the top of the head. There is an linscription at the base with its date corresponding to 1468 A.D.

11) **ParsvanathaBlack StoneWalhoor ( Parbhani District)1691 A.D.37.5 x 26 cm.**

Seated in padamsana and in dhyanimudra with srivatsa mark on the chest. Seven headed snake hood emerges above the head, stylized curls on the head with a protuberance above the head. The figure is static and lifeless yet conforming to certain idealized norms of art canons. The inscription at the base is dated 1691 A.D. and belongs to mula sangha.

**12) ParsvanathaBlack stoneManwat ( parbhani District)1742 A.D.21 x 17 cm.**

Seated in padmasana and in dhyanimudra. The seven headed snake hood emerges above the head. Srivastsa mark on the chest. Stylised curls on the head with long ears and roundish face. Inscription at the base is dated 1742 and belongs to kashtha sangha.

13) **Parsvanatha Manwat ( Parbhani District)16th cent. A.D.**

Seated in padmasana and in dhyanimudra. The snake coil is partially broken and slightly emerging above the head.

14) **ChandraprabhanathaManwat ( Parbhani District)16th cent.A.D.10.5 x 8 cm**.

Seated in padmasana and in dhyanimudra. The shape of the head is rather abnormal. Ardha Chandra ( a haif moon) can be seen at the base.

15**) ParsvanathaBlack MarbleAshti ( Parbhani District)16th cent. A.D.20 x 17** cm.

Seated in padmasana and in dhyanimudra. A srivatsa mark is seen on the chest. The broken snake hood emerges slightly above the head. Symbols of good luck are shown on the palm of the hand and feet. Inscription at the base is indistinct.

16) **ParsvanathaBlack StoneWalhoor ( Parbhani District)16th cent. A.D.23 x 14.5 cm**

**Seated with fold**ed legs ( though not in padmasana) and in dhyanimudra; the face is slightly blurred. One single snake hood emerges above the head. The body is erect with the bent face set in between the collar bones, suggesting his deep meditation.

17) **TirthankaraBlack StoneWalhoor ( Parbhani District)Dt.1626 26 x 21.5 cm**.

Seated in padmasana and in dhyanimudra. A srivatsa mark on the chest: long ears, curls on the head and a protuberance on the head. Inscriotion at the base is not clear.

18) **TirthankaraPathri ( Parbhani District)16th cent. A.D.28 x 22 cm.**

Seated in padmasasna and in dhyanimudra, a vague srivatsa mark is seen on the chest; sharp features. Inscription at the base is not clear,

Reference;1)Mri Dulari Kureshi,T V Pathy—Stone Sculpture Aurangabad 1984

2)Vivek Chandurkar----Udhvast Wastu SamurdhItihas Midiya Watch Publication25 Des 2019

3)WWW.Jain Murti Parbhni jila

4)Sanshipt jain itihas voi 1 kamla parsad jain p 13

5)Jain Darmacha Parchin itihas

# Kamsutra Sculptures at Daitysudan Temple of Lonar

**Dr. Shyam Prakash Deokar**
**Address -Gopal Nagar,Near Hanuman Mandir,**
**Khamgaon, Dist- Buldana, Maharashtra.**

**Introduction -** ***'Kamsutra'*** is an ancient Sanskrit book of sexual knowledge. It is written by Maharshi Vatsayan. In this book sex is stated as an art of living. The Hindu concept of ***'Purushartha'*** also stated the importance of ***'Kam'***. The sexuality and the erotic emotional fulfillment is one of the goal of human life. One have to right to choice the way to fulfill it. The ideology behind the ***'Kamsutra'*** is also to fulfill the one point of ***'Puruasharth'***. It may be the only one text of Hinduism which state the ***'Kam'*** as the art of life. By the book the emotion of sex got the justice as a art of life, as one of the ***'Purusharth'*** of life. It gives the religious touch to the emotion. ***'Kamsutra'*** is not the erotic counterpart and not about the sex positions as the many people think about it.[1] This thought about the text ***'Kamsutra'*** emerged by the sculptures of Khajuraho. The temples of Khajuraho was built during the rule of the Chandela dynasty.[2] By the historical records there were Eighty Five temples then. But there is only 25 temples remains. The temples is of Hinduism and Jainism. Some scholars stated that erotic art work which is at the Khajuraho is the part of ***'Tantrik Sexual Practices'***[3] and some other stated that it is the part of Hindu tradition of ***'Purusharth'*** in which ***'Kam'*** is the essential and proper part of life.[4]

India is only the country where the ***'Kamsutra sculpture'*** found on large number. There are many erotic, miscellaneous, aphrodisiacs, passionate sculptures and pictures at the walls of temples, stupas and chariots. Khajuraho, Konark, Modhere, Bhubneshvar etc. are the best examples of that. There are many types of sculptures on the walls of the antiquities eg sculpture of male and female osculation, male female sexual intercourse (there are many types of sculpture as the type of sexual intercourse like unnatural intercourse, blowjob intercourse, sodomized sculpture etc), sculpture of various stages of intercourse, some sculpture of group sex, male female in the mood of sexual antics, the sexual feeling is express on the face of sculpture, in some woman sculpture she is full of puberty, in some there found antics with woman breast, the expression on the face of loving couple revels clearly etc.[5]

**About Maharashtra -** There were many temples built in Maharashtra in the period of tenth century to fourteenth century. Most of it is in the style of ***'Nagar-Bhumij'*** style of temple architecture. The temples which were built in the reign of ***'Shilahara dynesty'*** have ***'Kamsutra sculpture'*** on it. There are all types of sex sculpture from Kissing to intercourse. The sex sculptures of the Maharashtra is as artistic as that of the Khajuraho. There were carved the naked sculptures of ***'Yaksh', 'Apsara', 'Gandharva', 'Kinnar'*** on the door pillars.[6]

**Kamsutra Sculptures in Buldhana District** - There are many intercourse sculpture on the various temples in Buldhana district. The general idea behind this types of intercourse sculpture is that it is one of the important duty of human being. The Hindu mythology also agreed with this. The 'Kam' is one of the 'Purusharth' of human life. It is our holy duty to give birth and for that the intercourse is the medium of it. Sex gives birth so temple used to be great place to spread the learning for those who are not literate[7]. But the most of the sculptures are at the Lonar lake and it is at the Daityasudan Temple. We are going to study some sculpture of the Daityasudan Temple which are of the style of 'Kamsutra'. They are as fallows –

1) **Standing Intercourse Sculpture** – There is intercourse sculpture on the Daityasudan temple of the Lonar lake. This is carved in the corner to the left side of the Narsingh sculpture. Male and female are naked and in the mood of intercourse. The breast of the female are athletic and orbicular. She have waister and bonny body. The male hand which touching to her left breast caught by her. She is standing on her left leg and she caught the male butt with her right leg. Male is bent from his knees and he caught her with his right hand and he is pressing her breast with his left hand. There is serious lustful expression on their face. The intercourse in going on.
2) **Hugging and Kissing Intercourse Sculpture** - This figure is carved on the outer side of Daityasudan Temple of Lonar lake. The male and female are in standing position and they are kissing and hugging each other. Male have hugged the female with his left hand and pressing her breast with his right hand. She has caught the male with his hands around his neck. She is more lustful than male. She hugged him with her left leg around his butt. The female is more aggressive for intercourse in this figure.
3) **Cowgirl Intercourse Sculpture** – This sculpture is carver to the corner at the outer side of the Daityasudan Temple. This figure is carved as a cowgirl intercourse going on. The figure is of male and female intermingled for sex. He is laid down on the floor and she is riding on him for intercourse. She caught his head with both of her hands and kissing to him. Both of her legs spread to both sides and the intercourse is going on. This position of intercourse calls as a cowgirl intercourse position.
4) **Hugging and Kissing Intercourse Sculpture II -** This figure also carved at the outer wall of the temple. In this position of intercourse the male caught her with his hands at her waist. He is kissing her and intercourse is going on. His left leg locked her thigh and she hugged him tightly. The glad expression on face carved skillfully by the sculptor.
5) **Zoophilia Sculpture -** This figure is carved at the outer side of the temple. There are three characters in the figure. The calf headed animal seems to bent for intercourse. It has human body beneath his waist. The man is standing back to him by keeping both of his hands on his back and the intercourse in going on. There is female standing to the side and she is helping the male for intercourse.
6) **Climber Intercourse Sculpture** – This figure is carved in the middle of the pillars of the temple. The male caught the left thigh of the female with his left land. This position is as she is trying to climb. That’s why the figure called as the climber Intercourse sculpture. Both of her hands are around the neck of the male. Both of them are lustful and the intercourse in going on.
7) **Open Intercourse Sculpture –** This figure also carved at the outer side of the corner of the temple. The male is pressing the breast of the female and the intercourse is going on. The legs are spreaded for more space of both of the participant. They are kissing each other.
8) **Group Intercourse Sculpture –** This figure is carved at the outer side of the temple. Male and female is busy in intercourse and other female is attracting to the male for the intercourse. That other female caught the right hand of the male.
9) **Back Hugged Sculpture –** In this sculpture the male hugged to the female from the back side. The breast of the female are circular and athletic. He is

pressing her breast with his right hand. The lustful expression clearly revels from their face.

10) **Handling the 'Lingam' –** In this sculpture the female is handling the 'lingam' of the male and he caught her waist with his right hand. She is full of lust and eager for the intercourse. Her butt is huge and athletic with waister. She have bonny body and she is full of puberty.[8]

There are more sculpture of intercourse at the various temples of Lonar and at the others in the Buldana district.

**Conculsion** – The 'Kamsutra' sculptures are not only at the Khajuraho but that are available at the temples of Maharashtra also. Buldana district is richer about that. The Daityasudan temple is one of them. This sculptures are more beautiful than that of Khajuraho. But there needed to study and preserve it. There is no security to those sculpture. Most of them damaged by the visiotor.

**Keywords and Notes –**

1. *Purusharth – The Hindu religion stated four Purusharth as the most important works to do in the life. That are 'Dharma' , 'Artha' , 'Kam' and 'Moksha'.*
2. *Kamsutra - It is the book written by the Maharshi Vatsayan. The text is about the information of the sex.*
3. *Apsara – Apsara is the character of Hindu concept and she is showgirl of the heven/Indrasabha.*
4. *Yaksha – Yaksha is the character in Hindu and Jain mythology. He proposed as the friendly with the 'Rakshas' but not opponent to the human.*
5. *Gandharva – Gandharva is a name used for distinct hevenl beings in Hinduism, Buddhism and Jainism. It also term for the skilled singer.*
6. *Kinnar – In Hindu mythology a Kinnara is a paradigmatic lover, a celestial musician, half-human. 'Ki- nar' means means it is not definite that he is human.*







# References –


1. Doniger Wendy, ***'The Kamsutra : It isn't all about Sex'***,The Kenyon Review, New Series, Vol 25, No 1, Winter 2003, Page no 18 to 37 (JSTOR)
2. Ghurye G. S**.,** ***'Rajput Architecture'***, Popular Publication,Bombay,Reprint 2005, Page no 19-24
3. Rabe (2000), ***'Secret Yantras and Erotic Display for Hindu Temples, Tantra in Practice'*** (Editor: David White), Chapter 25, pp 434-446
4. Danielau Alain, 'The Hindu Temple : Defication of Eroticism', (Translated by Ken Hurry), Inner Traditions Rochester, Vermount, 1999, Page no 101 – 119
5. Deshpande S. R., ***'Bhartiy Kamshilp'***, Continental Publication, Vijaya Nagar, Pune, 1986, Page no 1
6. Misal Nilkanth Narayan, ***'Buldhana Jilhyatil Eitihasik Sthale : Ek chikitsak Abhyas'***, Thesis submitted to BAMU, Aurangabad,2016, Page no 171 – 176.
7. http://punetopune.com/kamasutra-at-daitya-sudan-temple-lonar/
8. Misal Nilkanth Narayan, ***'Buldhana Jilhyatil Eitihasik Sthale : Ek chikitsak Abhyas'***, Thesis submitted to BAMU, Aurangabad, 2016, Page no 171 – 176

# Caves of Panhalkaji: The Cultural Heritage of Konkan

**Dr. Dnyanoba Tukaram Kadam**
D.B.J. College, Chiplun (Maharshtra)
E-Mail: dtkadam78@gmail.com

**Introduction:**

History eminents divide Konkan in parts Raigarh and Thane includes in the north region and Ratnagiri and Sindhudurgh includes in the South Konkan. According the said opinions lord Parashurama established human in habitants in Konkan region but in my personal opinion they relisted long before.

Rashtrkut established their reign in Konkan and their deity was "Gajant Lakshmi". In which region they expanded their boundaries, they used to established the deity and her worship, Shilahar king – Aprajit established his reign in 983 in Punak Sangmeshwar, chiplun etc. Afterward Aparaditya came to throne and declared Panhal kaji as his capital.

In later period Vikramaditya Halpaldev Malikarjun came to the throne during 1155 – 1170 Malikarjun established hi reign on Chiplun Malikarjun might be an administrative head of Shilahar dynasty.

Three branches of Shilahar dynasty ruled over Konkan, thane and Raigarh of North Konkan Ratnagiri and Sindhudurgh of south Konkan and out of the Konkan.

Due to Shilahar dynasty the District Ratnagiri felt a complete change the district is considerd as essential district on the Konkan coastal lane. The district has 250 k.m. sea coast to the north side of this district two main districts thane and Mumbai are situated and goa and Sindhudurgh are situated to the south side. Ratnagiri district is situated of the center of Konkan and getting rainfall to the north and of narrow shape. In this district, we can see Buddha cave at Mandangarh, Khed, Chiplun, Sangmeshwar, Ratnagiri. The study of the caves will be undertaken in the following way.

**5.10.22 Panhal kaji Caves**

Panhalkaji is located in Dapoli taluka, Ratnagiri District. We can come a crass the information that in Shilahar period, the place might be quake important due to hard efforts of archeology department. The 29 caves came into light in 1973.

The caves are giving testimony about Vajrayan creed. Once was common in this place the exparts knew about this fact before due to Verul and Kanheri caves and inscription it that Vajrayan creed way the ruling creed. In one inscription, we meet with the enunciation that in the reign of Shilahar Kapadi and Rashtrakut king Amoghversha – I in the middle of $9^{th}$ century gaud citizen gomin avighnakara carved the cave at Krushagiri for meditation. From this proof we can conclude, that Buddha of konkan and Buddha of bangal might be 6 in close contact due to this Vajrayan creed of the east India spread in Maharashtra and mainly in Konkan. After the deep study of Buddha idols the erudite J.V. Malandra came to a conclusion that distinguished Buddha centers should be in close contact. We get a bold proof of this at Panhal kaji. In all we come across multiple citation of Vajrayan creed's existence in many dynasties for example, Akshomya and his strength mamaki's relics. Unique idols of Mahachandroshan and Shidhaikavir, the idols of Akshomya family, exist here only in Maharashtra. The idol of Mahachandroshan of Panhal kaji have a great resemblance with the description of the same idol in the scripture edited by D.V. Bhattacharya named, "Sadanmala". The idol also shows precise resemblance with the idol caved on kamya stupa in the Mahavira of Ratnagiri. At panhal kaji, Buddha and Brahmin creed's caves exist. Total 29 caves are these in which of cave no. 17, 19, 20, 22, 23, 24, 25, 28, 29 caves are Brahmin creed. Cave no. 21 and 14 are not basically Brahmin but Nathasiddha made them Brahmin to suit his purpose. During 11 – 12 century. Buddha creed had eradicated form this region. So these cave don't have any unique feature which can assert the uniqueness. So, now we can't assert about any specification otherwise nothing is special in them. About one thing we can assert that the constructors of Vajrayan creed kept persistence to bring desired changes.

According to Mr. Deshpande, cave no 4, 5, 6 were digged in the $3^{rd}$ century and cave no. 2, 7, 11, 14, 15, 17, 18 and 27 were digged in the $4^{th}$ – $5^{th}$ century. In $10^{th}$ century, the followers of Vajrayan creed made all these caves suitable for their purpose. The structure of these caves don't show any relation with the caves of Aurangabad and Verula.

Panhal Kaji is a village made up of many scattered parts. During clearance work, 29 Shailagraha were found to archeology department of Maharashtra government. The excavation work lasted for two years. These caves are important in both aspects, religious and historical. The tradition of cave digging started in $13^{th}$ and $14^{th}$ century. The second important thing is that we come to know in which way local people paved their way from Hinyan to Vajrayan, Vajrayan to Hindu and Nagpantha. M.N. Deshpande studied the connectivity among many regions of India about the rituals and traditions. He stated firmly in which way they people moved to Nagpantha.

At the declining phase of Hinyan creed, at the end of $2^{nd}$ century or at the starting of $3^{rd}$ century, Buddha religion. Started to fortify its root's in Konkan region. These caves got united impressions of Hinyan, Mahayan, Vajrayan and shaive creed.

**Cave No. 01 :** While studying 28 caves of Panhal Kaji, we find a cave no. 1 at the east side of korjai river bed. The cave can be measured 3.70 m. in length, 3.78 m in breadh and having 1.97 m height the entrance door is somehow different having half circled shape metal is also used in it making and stone seat can be seen in the cave to the west side. The structure of hall is different and socketed in between two walls. The roof is of hemi-circled shape. On the seat of this cave an idol is carved but it is in the devasted position.

**Cave No. 02 :** The façade side of this cave is the north side and in front of it there is a big ground. Some carved part is destroyed. The pillars are built to balance the whole structure. The total area can be measured as 4.55 m. in length, 3 m. in breadth and 2.20 m in height.

Near to the entrance, on the big rock steps are carved. The windows fired enhance the beauty of the complete structure four images named Vipassi Sikhi, Vishwabhu Krukuchchandra, kanak muni Kashup and Shakya lion and immensely devasted.

**Cave No. 03 :** The cave is built in the spaciow Veranda of second cave's eastward wall. The rooms can be measured as 2.35 m, in length, 2.48 m. in breadth and 1.80 in height.

**Cave No. 04 :** In between cave no. 4 and 5, a common veranda is built. The entrance door of cave no. 04 is of size as 1.43 m in bredth and 0.70 m. in height.

**Cave No. 05 :** Some relics of stupa of cave no. 04 and 05 still exists. This indicates that monk houses did exist in Hinyan period. The stupa of cave no. 05 can be compared with the symbol of lotus carved in stupa of chaul dynasty.

**Cave No. 07 :** Near the east entrance door of this cave s statue of a man guard and his servant is fixed. The inner part of this cave is carved and downward stairecase can be seen. In the outer room, the broad benches for sitting are arranged.

**Cave No. 08 :** In this cave for the roof, wood is used. This cave have a specious veranda.

**Cave No. 09 :** The inner height of this cave is only 2 m in this cave also a rectangular corner having a long slab is carved in eastward direction.

**Cave No. 10 :** The cave can be measured as 4.95 m. in length, 4.85 m/ in breadth and 2.7 m. in height on the door of this cave three guards and a beautiful woman's image has been carved. The most important thing in this cave is an image of Mahachandrasen and this is an image carved from one stone, belonging to the Buddha period. So its cultural importance is very great.

**Cave No. 11 :** A straight way can be seen in the front of this cave and two guards are carved on the door. The structure of this cave resembles with cave no. 04 and 06 and this cave also have a rest room. The walls of cave are plastered.

**Cave No. 12 :** In the middle of this cave an oval shaped stupa exists.

**Cave No. 13 :** A spacious ground can be seen in this cave.

**Cave No. 14 :** This cave is just 30 m. away from cave no. 13. The specially of this cave is this cave has and the Ganesha idol is carved on it.

**Cave No. 15 :** In cave no. 15 a specious gallery with a rest room inside does exist and in front of the cave a varanda is accompanied. Under the roof a systematic drainage system for draining of rain water is arranged.

**Cave No. 16 :** A spacious ground can be seen in cave no. 16 but the door of this cave becomes out of its socket.

**Cave No. 17 :** Compare to other cave, this cave is not so specious of the smallest of all. On the octagonal pillars these caves, cave no. 02, 05, 06 rests.

**Cave No. 18 :** The cave is supported by octagonal pillars and the images of  are carved. The benches are arranged per rest

**Cave No. 19 :** The cave can be explained as a small piece of carving made up by cutting rocks. A seating place is arranged to the east side and nearby it a deep rectangular corner can also be seen.

**Cave No. 23 :** An open ground can be seen in front of this cave and a small room exists to the west directioned descending bulwark.

**Cave No. 24**

The cave have an open ground and along with the back side and descending direction a stone elevation is arranged.

**Cave No. 25 :** This cave is a vihara

**Cave No. 26 :** In cave no. 25 a small room is made up to encompass a sculpture in the west direction.

**Cave No. 27 :** The cave is in dilapidated condition in it basic feature, there might be a small entrance door.

**Cave No. 28 :** This is a small cave having a simple door. In the back sided wall opposite to entrance door a stone elevation for the purpose of keeping an idol is arraged.

**Cave No. 29 :** In front of the cave 5.20 m X 7.20m, ground cand be seen. The northern wall of façade side is digged while southern wall is well proportioned.

**Conclusion:**

There are five caves near the Khed city in Rathnagiri district. All are Buddhist caves. The idol of lord Buddha here is very attractive but this idol is placed in recent time. At Panhalkaji, near Dapoli, there are group of 29 caves. Here, we found  various caves from the period of Heenyan Buddhist Tantrik Vajrayan Panth,  and Nathpanth. Again various statues of

Hindu God and Godess like Ganapati, Laxmi, Saraswati, Shivalinga are also found here. This is the peculiarity of these caves. From this, we can conclude that there was the concept of fraternity in the era of 2 B.C. Also. The Buddhist architecture got royal patronage to propagate Buddhist ideas at Panhale in Ratnagiri district during the period of Shilahar. The Buddhist caves are the eyewitness of it.

**Bibliography**


1- Dahiya Vidhya – Eaonly Buddhist Roclccut Temple Chnonological Study –Thonsam & Husom, Londan, 1972 – Page No. 22

2- Pruthi Ram Chaturvedi – Buddhism and Art - Commonwealth Publishers Pvt.Ltd. 2011 – Page No. 173.

3- NagayanS. – Buddhist Arthite ture in Western India – Agan Kala Prakashan, New Delhi 1981 – Page No. 16.

4- Kumar Raj. Eassyas on Indian Arts and Architecture, Discovery Publishing house . New Delhi-2003 i`”B dz-4

5- Chopra P. N. – The Gazzetter of India , Indian Union Vol-II , Gazzetter History and Culture Unit Ministry Of Education and Social Welfare Gov. India, New Delhi 1973 – Page No. 65.

6- Bid – Page No. 61.

7- Chaudhari K. K. (edi) Maharashtra State Gezzetter – Greater Bombay District Vol-III – Gezzetter Department Government of Maharashtra 1986 – Page No 423

8- Gokhale, B. G. Ancient India History And Culture – Asia Publishing House, Mumbai – 1959 Page No. 189

९. Gokhale Shobhana –Kanhew Insccption Deccan College Pune 1991 – Page No. 1

10- Dhavalikar Late Hinyan Caves of Western India Deccan College, Pune 1989 – Page No. 68

11- Pruthi Ram Chaturvedi – Buddhism and Art - Commonwealth Publishers Pvt.Ltd. 2011 – Page No. 3.

12- Chopra P. N. – The Gazzetter of India, Indian Union Vol-II, Gazzetter History and Culture Unit Ministry Of Education and Social Welfare Gov. India, New Delhi 1973 – Page No. 216.

13- Mishra Ajay Buddhist Monks And Mon Asteriles Vandna Publication, New Delhi 2015 – Page No. 138

14- Guang Xing – The Concept Of The Buddha It’s Evolution From Easly Buddhism To The Trikay 2004 – Page No. 115

# स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना : चिंतेश्वर मंदिर

**प्रा. चव्हाण आर. ए.**
(इतिहास विभाग)
महिला महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागामध्ये औरंगाबाद महसूल विभागातील बीड जिल्हयात गेवराई तालुका येतो. बीडच्या उत्तरेला ३२ कि. मी. अंतरावर गेवराई गाव आहे. राष्ट्रीय महामार्ग ५२ हा गेवराई गावातून जातो १ . रामायण ग्रंथामध्ये गेवराईचा उल्लेख मगौरीपूरफ असा केलेला आहे. बदलत्या काळानुरुप गौरीपुराचे सुरुवातीचे नाव बदलून मगेऊरवावीफ, गौराई (गौरीआई) व नंतर गेवराई असे प्रचलीत झाले. याशिवाय डॉ. हरिहर ठोसर यांनी आपल्या संशोधन प्रबंधात गेवराई या नावाचा उल्लेख मगेऊरवावीफ असा केलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधाचा विषय मंदिर हा असल्यामुळे मंदिर स्थापत्याची कल्पना खूप पुरातन आहे. जेव्हा मानवाच्या मनात निसर्गाविषयी आश्चर्य आणि भिती निर्माण झाली. तेव्हा निसर्गाच्या अनाकलनीय शक्ती विषयी त्याच्या मनात श्रध्देची भावना निर्माण झाली. या भावना जतन करण्यासाठीचे ईश्वरी शक्तीचीच कल्पना करुन त्याचा आधार त्याने घेतला व या शक्तीची पूजा, अर्चा करण्याचा प्रघात सुरु केला. याच श्रध्देच्या भावनेतून कल्पीत देवतांना साकार रुप देवून त्याची आराधना करण्यासाठी मंदिर निर्मितीची संकल्पना उदयास आली. मानवाने निर्माण केलेल्या काल्पनिक दैवी संकल्पनेची दैवी प्रतिके बनविण्यास मानवाने सुरुवातीला प्रयत्न केला आणि मूर्त संकल्पनांबद्दल मानवाला आदरयुक्त भिती असल्याने या संकल्पनेसाठी त्याने मद्रौणासारख्या पानाची बैठकफ तयार केली. त्यानंतर लहानशा ओटयावर, त्यांना स्थानापन्न केले, ऊन पाऊस या पासून त्या देवीमुर्ती कल्पनेचे संरक्षण व्हावे म्हणून त्यावर गवताचे छत तयार केले. ही मंदिर रंचनेची प्राथमिक अवस्था होती २ . गेवराई शहाराच्या पश्चिमेला चिंतेश्वर महादेव मंदिर आहे. हे मंदिर विद्रुपा नदीच्या तिरावर वसलेले आहे. पौराणिक आख्यायिका लाभलेली आहे. श्रीराम प्रभू वनवासात असतांना नाशिक येथून रावणाने सिता मातेचे अपहरण केले. सितामातेच्या शोधात श्रीराम दंडक अरण्यात तिचा शोध घेण्यासाठी प्रवासात असताना ते विद्रुपा नदिच्या तिरावर थांबले येथेच गौरीदेवी त्यांना प्रसन्न झाली आणि सीतेचे अपहरण रावणाने केले असे सांगून पुढील मार्ग दाखविला. त्यामुळे श्रीराम चिंतामुक्त झाले त्यांनी भगवान चिंतेश्वराची या ठिकाणी स्थापना केली ३ . हे मंदिर दगडावर दगड रचून त्यांचे बांधकाम केले आहे. रामदेवराय यादवांचा प्रधान हेमाद्री (हेमडपंत) यांनी ही पध्दत रचली यालाच आज हेमडपंती मंदिर शैली म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर १४ व्या शतकात बांधले आहे. हे मंदिर हेमाडपंती शैलीचे असून पूर्वाभिमुख आहे ४ . तिन्ही बाजुंनी तटबंदी आहे आणि पुढचा भाग म्हणजे गर्भगृहाचा समोरचा भाग मोकळा आहे. ही तटबंदी दगडी स्वरुपाची आहे. बाहेरुन या मंदिराकडे पाहताच आपणास सुंदर अशी वास्तू नजरेस पडते. त्या मंदिराला आज रंगकाम केल्याने अधिकच आकर्षकता आली आहे.

**सभामंडप :-**

मंदिराच्यासमोर आता एक नवीन सभामंडप बांधलेला आहे. परंतु मंदिराच्या मध्ये जुना सभामंडप आहे. हा पूर्णपणे दगडी स्वरुपाचा आहे. त्याची बाहेरील रचना लांबी २३ रुंदी २३ फूट आहे. तर उंची ८ फुट आहे. सभामंडपाला जोडुन अंतराळ आहे. तो पुर्ण दगडी आहे. त्याला जोडून मंदिराची मुख्य इमारत ती पूर्णपणे दगडी आहे. मुख्य मंदिराची बाहय रचना १५ ु १७.८ फुट आहे. ताऱ्याच्या आकाराचे हे मंदिर चौकोनी दगडांनी बांधलेले आहे. १० उभे आयताकृती चिरे आणि ६ आडवे कोणाच्या माध्यमातून भिंतीची रचना केलेली आहे. हेमाडपंती शैलीचे हे बांधकाम असल्याने दगडावर दगड रचून इमारत उभी केली आहे ५ . बाहेरील भिंतीवर कुठलेही नक्षीकाम केलेले नाही तर सपाट चिऱ्यांच्या आहेत. मंदिराच्या उत्तरेला गाभाऱ्यातील शिवपिंडावर टाकलेले पाणी दूध इ. वाहुन जाण्यासाठी गोमुख काढलेले आहे. मंदिरावर शिखर आहे. त्याचा जिर्णोध्दार केल्यानंतर नविन पध्दतीने वेगवेगळया मूर्ती तयार केलेल्या आहेत. हे मंदिर हेमाडपंती असले तरी नंतरच्या काळात विकास पावत गेले या परिस्थितीची कल्पना त्याच्या स्थापत्याकडे पाहिल्यानंतर येते.

मंदिराच्या आतील बाजूचा अभ्यास करताना असे दिसते की, सभामंडप हा पूर्णपणे दगडी असून तो चौरस स्वरुपाचा आहे. १७.८ ु १७.८ फुट अशी आहे. तर उंची ८ फुट आहे. हा सभामंडप १६ दगडी खांबावर उभा आहे. प्रत्येक खांबाखाली षटकोनी मध्यभागी चौकोनी व वर पुन्हा षटकोनी आकाराचा आहे. त्या खांबावर फुलाचे कोरीव काम केलेले आहे. सभामंडपाच्या समोर नंदिमंडप आहे. दगडी चार खांबाचा असून त्याची लांबी ६.५ रुंदी ६.८ फुट तर उंची ९ फुट आहे. त्याखांबाला मंडपातील खांबाचा आकार आहे. सभामंडपात खाली दगडी कासव असून ते पश्चिमाभिमुख आहे.

**अंतराळ :-**

सभामंडापाच्या पुढे अंतराळ तो पूर्णपणे दगडी असुन सभामंडपाला जोडून ४ खांबावर उभा आहे. त्याची लांबी ६.८ फुट व रुंदी ६.८ फुट तर उंची ९ फुट आहे.

**गर्भगृह :-**

अंतराळ ओलांडून पुढे गेल्यानंतर गर्भगृहाचा भाग येतो तो चार खांबाचा असून त्यावर नक्षिकाम केलेले आहे. मंदिराच्या दाराच्या चौकटीला वास्तुशास्त्रात व्दारशाखा हे नाव दिलेले आहे ६ . दरवाज्यावर गणेशमूर्ती कोरलेली आहे. नंतर चौरस स्वरुपाचा दगडी गाभारा आहे. त्याची रचना एकात एक असे दोन चौकोन करुन अष्टकोनी बनविलेली आहे. गाभाऱ्याची लांबी ६.८ फुट तर रुंदी ६.८ फुट आहे. या गाभाऱ्यात कोदया पाषाणापासून बनविलेली शिवलिंग उत्तराभिमुख आहे. त्याचा व्यास १८ ु २२ इंच आहे. मंदिरासमोर बारव स्थापत्य आहे. चिंतेश्वर मंदिराच्या उत्तरेला जुने बांधकाम असलेल्या तीन समाधी चांगल्या अवस्थेत आहेत. त्यापैकी या मंदिराच्या ठिकाणी राहिलेल्या दोन महाराजांच्या व एक प्रसिध्द पंडित कवी विठ्ठल बीडकर यांची आहे. मंदिराच्या डाव्या बाजुला दीपमाळ आहे. मंदिर परिसरात अनेक सुबक पण काळाच्या ओघात नष्ट होत गेलेल्या मूर्त्या ठेवल्या असून त्यात शेषनागावरील विराजमान विष्णुची शिल्प अप्रतिम आहे. शिवाय शाकंबरी देवी, गणपतीचे शिल्पे सापडतात ७ .

**निष्कर्ष :-**

१) सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जडणघडणीत या मंदिराचे महत्व आहे.

२) नैतिक मूल्याची देवाण-घेवाण करण्याचा प्रयत्न मंदिरामुळे होतो.

**सारांश** :-

चिंतेश्वर मंदिर आज चांगल्या स्थितीत आहे. या मंदिराच्या देखभालीची कामे तेथील चिंतेश्वर ट्रस्टचे अध्यक्ष गुरु शंकरनाथ हे करीत आहेत. मंदिराच्या नावाने अकरा एकर इनामी जमीन आहे. यातून आलेल्या उत्पन्नावर मंदिराची देखभाल केली जाते. येथे नाथ सांप्रदायाचे गुरु शंकरनाथाचे गुरु केशरीनाथजी अशी गुरु परंपरा सांगता येते. मंदिराचे रक्षण व देखीभाल नाथ सांप्रदायाने केलेली आहे. आज या ठिकाणी नाथसांप्रदायाचे शिष्यगण वास्तव्यास आहेत.

**संदर्भ** :-


१) महाराष्ट्र शासन, बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सन २००३-०४ पृ. क्र. १

२) देगलूरकर गो.नं. बिबब्रम्ह आणि वास्तुब्रम्ह;, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, व्याख्यान १ ले व २ रे पृ.क्र. १७०

३) घोगे दिलीप, चिंतेश्वर आरती संग्रह;, चिंतेश्वर मंदिर, गेवराई पृ.क्र. ५

४) Dev Prabhakar, The Temple of Marathwada, Anuj Printers, Jaipur 1973, P. No. 135

५) The Gazatt of Maharashtra Government Dist. Beed, Jan 1969 P. No. 162

६) माटे म. श्री. प्राचीन कलाभारती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथमावृती १९९८, पृ.क्र. ११९

७) साळुंके सतीष, बीड जिल्हयाचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, प्रथमावृत्ती २३ फेब्रु. २०११, पृ.क्र. २६६

# गेवराई येथील खंडोबा मंदिर - एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ. सावंत के. डी.**
(इतिहास विभाग प्रमुख)
महिला महाविद्यालय, गेवराई
मो. नं. ९२२६७२७५०५

**प्रस्तावना :-**

गेवराई बीड जिल्हयामध्ये असून बीडच्या उत्तरेस साधारण ३२ कि. मी. अंतरावर असून राष्ट्रीय महामार्ग ५२ वर वसलेले आहे. गेवराई म्हणजे एक ऐतिहासिक वारसा लाभलेल नगर आहे. या नगराचा इतिहास प्राचीन काळापासून ज्ञात आहे. वाकाटक राजा प्रवरसेन दुसरा याच्या ताम्रपटात उल्लेखित रेपूरला व गेवूरवावी म्हणजे आजची गेवराई असून ते प्रतिष्ठान (पैठण) या मार्गावरील एक व्यवस्थापकीय केंद्र म्हणून विकसित होते. राजा अमोघवर्ष (तिसरा) च्या खर्डा ताम्रपटातही गेवराईचा उल्लेख मगेवूरवावीफ म्हणून आला आहे. १ वैभवशाली नगरी असे विशेषण ही या नगरीला खर्डा ताम्रपटात दिले गेले आहे. प्राचीन काळात गेवराईला स्थानिक पोथ्यामध्ये गेऊरवावी नावाने उल्लेखिले. वाकाटक, राष्ट्रकूट काळात गेवराई व्यापाराचे वैभव संपन्न केंद्र असल्याचे दिसते. महानुभाव वाङःमयातही गेऊरवावीचे वर्णन आले आहे. गेऊर हे एका वनस्पतीचे नाव असून उपपद वावी हे वापी (विहीर) संस्कृत शब्दाचे तद्भव रुप होय. २९७ व्या लिळामध्ये गेऊरवावी ऐसि जोगेश्वरीसि वसती पीसाचीका प्रति या शीर्षकारवाली चक्रधर स्वामी गेवराईत एका देवीच्या मंदिराच्या आवारात थांबले असा उल्लेख आहे. या कागदपत्राअधारे गेवराई शहाराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे हे स्पष्ट होते. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, वाकाटक आणि यादवांच्या काळात गेवराई नगर व्यापाऱ्यांचे केंद्र होते असे दिसते.

इ.स. ४ थ्या शतकात सातवाहन, चालुक्य, कलचूरी, वाकाटक ,कदंब इत्यादी घराण्यांनी या प्रदेशावर राज्य केले अथवा या घराण्यांचा संबंध या गेवराई नगरीशी आला असे महणता येते. पुढे यादवांच्या व तद्नंतर खिलजीच्या अमलाखाली गेवराई व सभोवलतचा परिसर होता. अल्लाउद्दीन खिलजीने हा प्रदेश जिंकून घेतला व त्यावर राज्य केले. पुढे बहामनी साम्राज्याच्या उदयानंतर या प्रदेशावर बाहमनी सत्ता प्रस्थापित झाली. बहामनी राजवटीच्या विघटनानंतर हा प्रदेश निजामशाहीचा एक भाग बनला. दि. १० ऑगस्ट १७६३ रोजी निजाम-मराठे यांच्यात राक्षसभूवनची लढाई झाली. त्यात मराठयाने निजामाचा पराभव केला व औरंगाबादच्या तहानंतर मराठयांना हा प्रदेश मिळाला. तथापि मराठेशाहीच्या अस्तानंतर या प्रदेशावर पुन्हा निजामाची राजवट प्रस्थापित झाली ती थेट १८ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने हैदराबाद संस्थानाच्या भारतातील विलीनीकरणास मान्यता देईपर्यंत दि. ०१ नोव्हेंबर १९५६ व्दैभाषिक मुंबई राज्य अस्तीत्वात आल्यानंतर बीड जिल्हयातील गेवराई तालुका महाराष्ट्र राज्यात समाविष्ट झाला. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे मराठवाडा हे माहेरघर असून हा प्रदेश इतर प्रांतापेक्षा मंदिर, मूर्ती व चित्रकलेचे समृध्द आहे. मराठवाडयात वेगेवेगळया राजकीय घराण्याच्या काळात मंदिर निर्मिती झाल्याचे दिसते. २ त्यापैकीच गेवराई नगरीच्या दक्षिणेला पालख्या डोंगरावर खंडोबा मंदिराची निर्मिती झालेली दिसते. आजपावेतो हे मंदिर अभ्यासकडून दुर्लक्षित राहिल्याने तसेच इ.स. १९०५ नंतर रॉबर्ट डच यांनी स्थानिक इतिहास लेखन इतिहासामध्ये समाविष्ट केले. ३ त्याअर्थाने या मंदिराच्या स्थानिक इतिहासाची माहिती समाजासमोर यावी हा या संशोधन पेपरचा उद्देश आहे.

**गेवराई येथील पालख्या डोंगरावर खंडोबा मंदिर :**

खंडोबा पुरातन मंदिर गेवराई नगरीच्या दक्षिणेला ७.१ कि. मी. अंतरावर असून समुद्रसपाटीपासून २२५ फुट उंचीवर पालख्या डोंगरावर आहे. ४ खंडोबा देव हे बहुनाचे श्रध्दास्थान असून खंडोबा या देवाला मैलार, मैलर, मैलारी, मल्हारी, मल्ल्या, मार्तंड, मालतेश या नावांबरोबर मैलार-मार्तंड, मार्तंड - भैरव असे अनेक नावे रुढ आहेत. ५ मंदिराच्या रचनेवरुन ते मराठाकालीन असावे असे वाटते. हे मंदिर गेवराई नगरी, वडगांव ढोक, मानमोडी, राजपिंपरी व मन्यारवाडी या गावांच्या सिमेवर येत असल्याने त्याला खऱ्या अर्थाने एका विशिष्ट गावचा असा उल्लेख करता येत नाही. मंदिराच्या निर्मितीमागे एक दंतकथा प्रचलित आहे ती अशी. पालख्या डोंगरावर एक शेतकरी आपले शेत नांगरीत होता. नांगरताना नांगराच्या फाळाला अचानक एक शिळ आडवी आली. त्याने उकरुन पाहिले तेंव्हा त्या शिळेवर एक मूर्ती होती. स्वच्छ केल्यानंतर ती खंडोबाची मूर्ती असल्याचे लक्षात आले. मात्र ही मूर्ती अश्वारुढ नसून ती निद्रित अवस्थेत होती आणि तेंव्हापासून त्या मूर्तीची प्रतिष्ठापना या ठिकाणी करण्यात आली आहे. आज ही मूर्ती त्याच अवस्थेत असलेली दिसते.

**वेदिक :**

खंडोबाच्या मंदिराला मोठया स्वरुपाचे वेदिक आहे, चौकोणी दगड व चुन्याने बांधलेल्या भिंती आहेत. वेदिक आयातकार असून दक्षिण - उत्तर आहे. दक्षिण - उत्तर बाजू १४२ असून पूर्व-पश्चिम ७७ फुट आहे. भिंतीची रुंदी ३ फूट तर उंची ८ फूट आहे. वेदिकाला पूर्वमुखी व उत्तर मुखी गोपूर आहेत. पूर्वमुखी गोपूर छोटे असून उत्तर मुखी गोपूर प्रमुख आहे. हे पुर्णपणे दगडी चिऱ्यांचे बांधलेले आहे. शिवकाळातील किल्ल्याच्या रचनेचा आकार त्याला लाभलेला आहे. हे गोपूर वेदिकाच्या भिंतीपेक्षा उंच आहे. लांबून पाहतांना ते आयाताकृती वाटते.

**बारव स्थापत्य :**

खंडोबा मंदिराच्या वेदिकाच्या आग्नेय बाजूस २०० मीटरवर पुरातन बारव आहे. बारवाचा आकार आयताकृती आहे. बारवाला उतरण्यासाठी उत्तर बाजूला दगडी पायऱ्या आहेत. या बारवाला बाराही महिने पाणी असते. खंडोबा मंदिराच्या पश्चिमेला भग्न अवस्थेमध्ये पूरातन महादेव मंदि आहे. हे मंदिर हेमाडपंथी शैलीचे असून पूर्णपणे दगडी आहे. त्याच्या उत्तरेला एक भूयार आहे.

**दिपमाळ :**

खंडोबा मंदिराच्यासमोर वेदिकाच्या आतमध्ये दगडी दिपमाळ आहे. मंदिराच्या पुर्वेलाही एक दिपमाळ आहे. या दिपमाळीची उंची १५ फुट असून खाली महारादेवाची पिंड व दगडी नंदी आहे. दिपमाळीला बाहेर आलेली दगडी हस्त आहेत. मंदिरासमोरील दिपमाळही पूर्णपणे दगडी असून ती ५ फूट दगडी चोपाऱ्यावर उभी आहे. दिपमाळीची उंची एकूण २० फुट असून वरती निमूळती होत जाऊन शेवटी टोकावर दिप लावण्यासाठी मोठी पणती ठेवलेली आहे. दिपमाळीला गोलाकार चहुबांजूनी दगडी हस्त आहे.

**सभामंडप :**

मुख्य मंदिरासमोर मुख्य सभामडंपाच्या पुढे नंतरच्या काळात बनविलेल्या पत्र्याचा मंडप आहे. या मंडपामध्ये दगडी चौथरा तयार करुन त्यावर मध्यभागी भैरोबा व दोन्ही बाजूला बानू आणि म्हाळसा आहे या तिनही दगडीपूर्ती अश्वारुढ आहेत. त्या काळया रंगाच्या पाषाणातून बनविलेल्या आहेत. मुख्य सभामंडप चौरस असून त्यांची बाजू १५-१५ आहेत तर उंची १२ फुट आहे.

सभामंडपाला मुख्य एकच व्दार असण्याऐवजी तीन सारख्याच स्वरुपाचे घुमटावर व्दार आहेत. पूर्णपणे दगडी चिरे व चुन्याचा वापर बांधकामासाठी केलेला आहे. सभामंडपाच्या खाली दगडी फरशी आहे. तर छताखाली दगडी शिळा आहेत. या मंडपाला आतमध्ये खांब नसून दगडी भिंतीवर छत आधारलेले आहे.

**गर्भगृह :**

मंदिराचे गर्भगृह सभामंडपाच्याच समांतर आहे. खाली दगडी फरशी असून मध्यभागी ३-२ फुट आयाताकृती १ फुट खोलीचा कुंड आहे. त्यामध्ये झोपलेली खंडोबाची मूर्ती आहे. मूर्ती पूर्णपणे भंडाऱ्याने माखलेली आहे. मूर्तीच्या पायथ्याला वर चौकोनी दगडी कुंडामध्ये भंडारा ठेवलेला आहे. गर्भगृहाचा आकार चौरस असून ११-११ बाजू आहेत. तर उंची २० फूट आहे. वर दगडी छत आहे. छताला गोल घुमटाचा आकार दिलेला आहे.

**मंदिर :**

मंदिराच्या इमारतीचा आकार हा आयाताकृती असून त्यात मुख्य मंदिर व सभामंडप असे दोन चौकोनी टप्पे पडतात. इमारत पूर्णपणे दगडी व चुन्यात बांधलेली आहे. सभामंडापाची बाहय रचना १८.३-२०.१० फुट आहे तर उंची १४ फूट आहे. मुख्य मंदिराची बाजू १९.४-१९.४ फुट चौरस असून १२ फूट उंच आहे. खाली २ फुट चौथरा आहे. शिखरापर्यंतची एकूण उंची ३५ फूट आहे. मंदिराच्या छतावर चारही बाजूने मनोरे आहेत. तर सभामंडापाच्या समोरील दोन कोपऱ्यावर मनोरे आहेत.

**शिखर :**

गोल घुमटावरच शिखराचे काम केलेले आहे. एकूण चार टप्प्यात अष्टकोनी आकाराचे शिखर असून शेवटी कुंभाचा आकार आहे. शिखरावर एकूण १२ देवकोष्ट असून त्यामध्ये गणेश सनाईवादक व इतर मूर्ती आहेत. शिखराच्या डेऱ्यावर पितळी कळस आहे. मंदिराला उत्पन्नाची कोणतेही साधने नाहीत. भक्तांच्या देणगीतून वर्षभर चालणारे धार्मिक कार्यक्रम व मंदिराची देखभाल केली जाते. सध्याची मंदिराची अवस्था चांगली असून त्याला रंगरंगोटी केलेली आहे.

**सारांश :**

मंदिर स्थापत्याला खूप पूर्वीपासून इतिहास असून काळाच्या ओघात व राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रियेमूळे या स्थापत्य शैलीमये बदल घडून आले. पूर्वीची द्रोणाच्या आकाराची मंदिरे नंतर इमारतीमध्ये बदलली. परंतू त्या त्या काळातील शिल्पकारांनी आपआपल्या शैलीनूसार मंदिर बनवून आपली ओळख निर्माण केली. हे मंदीर मराठाकालीन असून महादेवाचे मंदीर हेमाडपंथी शैलीचे आहे.

**संदर्भसूची :**


१) डॉ. साळुंके सतीश, बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, बीड जिल्हा इतिहास परिषद, बीड, प्रथमावृती, २०११, पृष्ठ ४९

२) Dev Prabhakar, The Temples of Marathwada, Publication Scheme, Jaipur, (India), 1993, P No.1

३) Robert Douch, New movements in the study and teaching of History, P. NO. 105

४) पगडी सेतु माधवराव, (संपा), बीड डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, १९६९, पृष्ठ १०

५) Sarkar D. C. and Bhattacharya, Epygraphia, India, Part -35, Delhi, 1963-64, Page 105, 114

# दुर्मिळ चतुर्भुज गरुड शिल्प – धर्मापुरी

**श्री. मयुरेश खडके**
पुरातत्त्व समन्वयक
पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,
महाराष्ट्र शासन, पुरातत्त्व विभाग,
औरंगाबाद (मो.नं. ९७६५०५२९४८)

**प्रस्तावना :**

'धर्मापुरी' बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात असलेले एक लहानसे गाव आहे. आज जरी हे खेडे असले तरी चालुक्य व यादव काळात नावारुपास आलेले महत्त्वाचे शहर, सांस्कृतिक कलाकेंद्र व धार्मिक स्थान असलेले ठिकाण होय. चालुक्यांच्या शिलालेखात या गावाचा उल्लेख धर्मापूरी असा असून त्याद्वारा हे समृद्ध नगर असल्याचे प्रतिक होते. मंदिरे, मठ, तलाव, बारवा, शिलालेखातील वर्णने तसेच किल्ल्याच्या ठिकाणी असलेले राजप्रसादाचे अवशेष अशा अनेक पुराव्यांवरुन पूर्वमध्य युगात धर्मापुरी हे मोठे चालुक्यकालीन नगर होते, याची साक्ष पटते. गावामध्ये रोकडेश्वर व तुकाई मंदिर हि प्राचीन मंदिरे आहेत, गावाच्या दक्षिणेस असलेल्या तलावाच्या जवळ धर्मापुरीचा किल्ला असून गावाच्या नैऋत्येस काही अंतरावर मरळ सिद्धेश्वर किंवा कालेश्वर मंदिर आणि बारव आहेत. परंतु धर्मापुरीतील विशेष आकर्षण म्हणजे गावाच्या पूर्वेस थोडयाच अंतरावर असलेले केदारेश्वराचे प्राचीन मंदिर होय. 'विक्रमांक' नावाने ओळखल्या जाणाऱ्या चालुक्य विक्रमादित्य सहावा (इ.स.१०७८ ते ११३०) या महापराक्रमी राजाने धर्मापुरीच्या केदारेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंदिराची निर्मिती केली. 1

केदारेश्वर मंदिर हे एका उंच अधिष्ठानावर बांधलेले असून मंदिराचे विधान हे चतुरस्त्र पद्धतीचे आहे. मंदिर पश्चिमाभिमुख असून मंडप, अंतराळ, गर्भगृह अशी या मंदिराची रचना आहे. सभामंडप, मुखमंडप हे भग्न स्वरुपात असल्याने सद्यस्थितीत राज्य पुरातत्त्व विभागातर्फे मंदिराचे जतनकाम सुरु असून मंदिर पुनर्रचनेचे काम सुरु आहे. गर्भगृहाच्या द्वारशाखेवर वैष्णव द्वारपाल अंकित आहेत. तर ललाट बिंबावर गणेश आहे. गर्भगृहात शिवलिंग स्थापित असून उत्तरेकडे बाह्यभागात मकरप्रणाल आहे. मंदिराच्या बाह्यभागावर अप्रतिम शिल्पाविष्कार झालेला दिसून येतो. या शिल्पांपैकी बहुत शिल्प हि वैष्णव आहेत. धर्मापुरी मंदिरावरील शिल्पे हि अत्यंत मोहक व प्रमाणशीर असून काही शिल्पे दुर्मिळ आहेत यापैकी दक्षिणेकडील बाह्यभिंतीवर असलेले तिसऱ्या क्रमांकाचे शिल्प म्हणजे चतुर्भुज गरुडाचे असलेले शिल्प होय. याच्या बाजूला हिरण्यकश्यपूवध (विदरण नरसिंह) व त्याच्या बाजूस वामन, बळी व शुक्राचार्याचे शिल्प आहे. आधी हि तिन्ही शिल्पे मंदिराच्या प्रांगणात पडलेली होती परंतु मंदिर पुनर्रचनेच्या वेळी या शिल्पांना पुन्हा मंदिराच्या जंघाभागावर बसविण्यात आले आहे. 2 या शिल्पांमध्ये असलेल्या चतुर्भुज गरुडाच्या शिल्पाबाबत प्रस्तुत शोधनिबंधात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**गरुडाची उत्पत्ती :**

गरुड हे विष्णूचे वाहन म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु विष्णुमूर्तींचे अंकण घडवण्याआधीच गरुडाची उत्पत्ती झाल्याचे दिसून येते. गरुडाचा उल्लेख सर्प्रथम वेदांमध्ये आढळून येतो. गरुडाला वेदांमध्ये 'गुरुत्मान' म्हणून संबोधले गेले असून गरुडाला सुवर्णासमान पंख असलेला असा उल्लेख आहे.

त्यामुळे गरुडास ‘सुपर्ण’ असेही म्हणले जाते. 3 महाभारताप्रमाणे वजनदार वस्तूंना घेऊन उडणारा तो गरुड अशी या शब्दाची व्युत्पत्ती आहे. 4 पौराणिक साहित्यानुसार कश्यप ऋषी व विनिता यांचा पुत्र म्हणजे गरुड; त्यामुळेच गरुडास वैनतेय असेही नामाभिधान आहे. 5 सूर्याच्या घोड्याचा रंग कोणता यावरून पक्षी कुळाची जननी विनिता व तिची सवत नागमाता कद्रू या दोघींमध्ये पैज लागली होती. परंतु नागांच्या षडयंत्रामुळे विनितेला कद्रुचे दास्य पत्करावे लागले. योग्य काळ गेल्यानंतर अंडे फोडून गरुड बाहेर आला. जन्मापासून तो अग्निसमान तेजस्वी, उच्चरवाने ओरडणारा, पिंगट डोळ्यांचा व सुवर्णमय कांतीचा होता. 6 आपली आई दासी असल्याकारणाने गरुडाच्या नशिबीही दास्यत्व आले त्यामुळे जन्मापासूनच गरुडाचे नागांसोबत वैर होते परंतु आईला दास्यातून मुक्त करण्याच्या दृष्टीने नागांना अमृत सुलभ करून देणे गरजेचे होते. त्यासाठी पराक्रमी गरुडाने देवांसोबत युध्द केले, ज्यामध्ये देव हरले. परंतु अमृत जर नागांच्या हाती लागले तर अनुचित होईल त्यामुळे अशी तडजोड करण्यात आली कि गरुड अमृतकुंभ नागांच्या सुपूर्त करेल आणि नंतर नागांनी ते प्राशन करण्याआधीच इंद्राने तो पळवावा. त्याप्रमाणे नागांना अमृतकुंभ मिळाल्यामुळे विनितेची सुटका झाली व अमृतकुंभ दर्भावर ठेवला असतांनाच इंद्राने संधी साधून तो पळवला व नागांनी तोंडाला पाने पुसल्याने त्यांच्या जिव्हा दुभंगल्या. 7 अमृत घेऊन गेल्यामुळे गरुडाला ‘अमृतहरण’ असेही म्हणतात. 8

गरुडास विष्णुसोबतही युध्द करावे लागले. शेवटी सामोपचाराने गरुडाच्या म्हणण्यावरून विष्णूने गरुडाला आपल्या ध्वजावर स्थान दिले. त्यासोबतच विष्णूनेही गरुडाला आपले वाहन होण्याचा वर मागितला, गरुडानेही ते स्विकारले व विष्णूचे वाहन झाले. 9 ऋग्वेदातील उल्लेखानुसार विष्णूचे मूळ सौररूप असल्याचे अनेक उदाहरणे आहेत. व ऋग्वेदानुसार सूर्यरूप पक्ष्याला सुपर्ण व गुरुत्मन अशी नावे आहेत. 10 योगवसिष्ठमधील वर्णनानुसार “विजयास विक्रमाप्रमाणे, प्रकाशास तेजाप्रमाणे, बुद्धीच्या निर्मळतेस विद्येप्रमाणे गरुड वहन करतो” अर्थात विष्णु आणि गरुड एकच आहे. 11 यावरून विष्णु हा तेजस्वी असून गरुड हे तेजाचे प्रतिक असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे गरुड हे विष्णूचे वाहन असणे समर्पक ठरते.

**गरुड प्रतिमेची लक्षणे :**

बऱ्याच लक्षण ग्रंथांमध्ये गरुडाच्या स्वरुपासंबधी वर्णने आढळतात. गरुडाचे वर्णन करतांना हरिवंश सांगतो कि, कश्यप गरुड खग असूनही त्यास शिखा व चुडा होती. सुंदर पंख हे त्याचे वस्त्र होते. व तो कानात नेहमी सुवर्ण कुंडले परिधान करीत असे. 12 हरिवंशाचे हे वर्णन कुशाणकालीन गरुड प्रतिमांना बरेच लागू पडते. 13

श्रीतत्त्वनिधीप्रमाणे गरुड हा द्विभुज असावा असे म्हणले आहे. 14 शिल्परत्नातही गरुड द्विभुज असावा असे सांगितले आहे. 15 शुक्रनितीसारातही मनुष्यरूप गरुडास मुकुट, अंगद व कवच असावे व त्याचे दोन हात अंजलीमुद्रेत जोडलेले असावेत असा उल्लेख आहे. 16 गरुडपुराणात गरुड हा कमलासमान आहे असा उल्लेख आहे. 17 महाभारतातील कथेप्रमाणे विष्णु व इंद्राच्या सांगण्यावरून गरुडाने सुमुख नावाच्या एका सर्पाला सदैव आपल्या हातात ठेवण्याचे कबुल केले होते. 18 मानसार या ग्रंथात गरुडाचे वर्णन पोपटाप्रमाणे नासिका असलेला, आठ नागांनी विभूषित भिषण नेत्र असलेला, करंड मुकुट धारण केलेला, तप्त सुवर्णाप्रमाणे कांती असलेला असे आहे. 19

विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे गरुडाचे नाक कौशिक (घुबड) समान अणुकुचीदार असावे. रंग लालसर असावा. त्याचे नेत्र गोल असून चार भुजा असाव्यात तर गृद्ध (गिधाड) समान जंघा व पाय

असावेत. गरुड जर एकटा दाखवलेला असेल तर त्याच्या दोन हातात छत्र व कुंभ असावे व उर्वरित दोन हात हे अंजलीमुद्रेत जोडलेले असावेत. पाठीवर विष्णु असल्यास छत्र व कुंभ न दाखवता त्याने दोन हातात विष्णूचे पाय धरावे. 20 गरुडाला पुराणात 'तार्क्ष्य' असेही संबोधले आहे. 21

अग्निपुराणामध्ये गरुडाला आठ भुजा असल्याचे सांगितले आहे. उजव्या चार भुजांमध्ये चक्र, खडग, मुसळ व अंकुश असून डाव्या चार भुजांमध्ये शंख, खेटक, गदा आणि पाश ही आयुधे असतात. शिल्परत्नातही गरुडास आठ भुजा असल्याचा उल्लेख आहे. त्यानुसार गरुडाच्या हातात अमृतकुंभ, गदा,शंख, चक्र, खडग, सर्प व समोरच्या दोन भुजांमध्ये त्यांच्या पाठीवर आरूढ असलेल्या विष्णूचे दोन्ही चरण असावे, असे सांगितले आहे. 22 अपराजित पृच्छा या ग्रंथाच्यामते विष्णूच्या मुर्तीसमक्ष गरुडाची मूर्ती स्थापन केली पाहिजे. विष्णु सोडून अन्य कोणत्याही देवतेच्या समोर गरुडाची मूर्ती स्थापन करू नये. गरुडाची प्रतिमाही मनुष्याच्या आकाराप्रमाणे घडवलेली असून उंच, तीक्ष्ण व उग्र नासिका असलेली असावी. 23

**गरुडाची विविध शिल्पांकने :**

गरुडाच्या प्रतिमा या पक्षी स्वरुपात, मानवी स्वरुपात, अर्धपक्षी-अर्धमानव अशा मिश्र स्वरुपात व विष्णूचे वाहन म्हणून उपलब्ध होतात. गरुडाचे पहीले शिल्पांकन आढळते ते शुंगकाळापासून म्हणजे इसवीसनपूर्व पहिल्या शतकापासून ते पक्षी म्हणून त्यानंतर गरुडाचे अंकण हे नाण्यांवर, राजमुद्रांवर, तसेच प्रतीक स्वरुपात विविध ठिकाणी झाल्याचे दिसून येते. विष्णूचे वाहन स्वरुपात गरुडाचे अंकण हे गुप्तकाळापासून म्हणजे इसवीसनाच्या चौथ्या शतकापासून प्राप्त होण्यास प्रारंभ होतो. या शिल्पांकनाचे दोन प्रकार आढळतात. एक पक्षीरुप व दुसरे मानवीपक्षीरुपात. 24 त्यातही तीन प्रकार आहेत, पहिले म्हणजे विष्णूचे वाहन म्हणून विष्णुसोबत व विष्णुशिल्पपटात, दुसरे म्हणजे गरुडाच्या स्वतंत्र रुपात झालेले अंकण आणि तिसरे म्हणजे गरुड स्तंभाच्या रुपात होय.

उत्तर भारतात मध्यकाळात सहसा आढळणाऱ्या गरुड प्रतिमा या द्विभुज दाखवलेल्या असून अति सालंकृत आहेत. गरुडास तीक्ष्ण नासिका, पंख दर्शविले जात असून गरुड उभ्या किंवा विरासनात अंकित असे. त्याचे हात अंजलीमुद्रेत जोडलेले तर क्वचित स्वरुपात गरुडाच्या एका हातात कुंभ किंवा छत्र आणि दुसऱ्या हातात नाग दाखवला जात असे. याशिवाय एका हातात नाग आणि दुसरा हात स्तुतीसाठी वर उठलेल्या स्वरुपातही असलेल्या गरुड प्रतिमा प्राप्त होतात. बऱ्याच वेळेस नाक अणुकुचीदार न दाखवता ते साधारण माणसासारखेच दाखविले जात असे, त्याचे कारण असे कि बऱ्याच वेळेस विष्णूभक्त राजा स्वतःला नमस्कार मुद्रेत विष्णुसमोर गरुडाच्या रुपात अंकित करीत असे. 25 गरुडाच्या अधिकांश प्रतिमा या विष्णू प्रतिमेच्या प्रभावळीत तसेच लक्ष्मीनारायण शिल्पांमध्ये दर्शविल्या जातात. अशा चित्रणात त्यांची प्रतिमा हि लहान, ऊर्ध्व केश किंवा करंड किंवा किरीट मुकुट असलेले, क्वचित प्रसंगी दाढी व मिश्या असलेल्या अंजलीमुद्रेत किंवा विष्णूचे चरण पकडलेले व उडणाऱ्या स्वरुपात अंकित केलेल्या दिसून येतात. काही शिल्पांमध्ये गरुडास नागाचे केयुर व गळ्यातही नाग अंकित असलेले शिल्प आढळून येतात.

दक्षिणेत द्विभुज आणि चतुर्भुज दोन्ही प्रकारचे मनुष्यरूपातील गरुड शिल्प आढळतात. तरीही द्विभुज गरुड शिल्पे हि प्रचुर प्रमाणात उपलब्ध होतात, त्यामानाने दक्षिणेत चतुर्भुज गरुड शिल्प हि क्वचित प्रमाणात का होईना पण प्राप्त होतात. बंगलोर येथील संग्रहालयात असलेल्या विष्णू प्रतिमेत गरुड चतुर्भुज असून त्याने मागील दोन हाताने विष्णूचे चरण धरलेले आहेत. व समोरील दोन हातात अमृतकुंभ धरलेला आहे. 26 अशाच स्वरुपाचे एक शिल्प हे प्रिन्स ऑफ वेल्स

म्हणजे आजचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई येथेही आहे. 27 तर समोरील हात अंजलीमुद्रेत व मागील दोन हातांनी विष्णू व लक्ष्मीचे चरण धरलेले शिल्प हि प्राप्त होतात. 28 ढाका येथील बास्ता येथून प्राप्त झालेले शिल्पही अशाच स्वरुपाचे आहे. 29 तामिळनाडूतील तिरुचीपल्ली जिल्ह्यातील श्रीरंगम येथे समोरील दोन हात अंजलीमुद्रेत असलेले व उपरोक्त दोन हातात अमृतकुंभ व नाग असलेले स्थानक शिल्प आहे. 30 तसेच तामिळनाडूतीलच तंजावर जिल्ह्यात तीरुवेल्लीयांकुडी येथे असलेल्या ‘कोला वलविल्ल रमार’ मंदिरातही चतुर्भुज गरुडाचे प्रसिद्ध शिल्प आहे. हे स्थानक शिल्प असून समोरील हात अंजलीमुद्रेत आहेत व अन्य दोन हातात चक्र आणि शंख आहे. अशा स्वरूपाचे असलेले हे एकमेव शिल्प आहे. 31 महाराष्ट्रात नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर व अहमदनगर येथील ऐतिहासिक संग्रहालयात चतुर्भुज गरुडाचे शिल्प प्राप्त होतात. 32

**केदारेश्वर मंदिरावरील गरुड शिल्प :**

केदारेश्वर मंदिराच्या दक्षिण बाजूस मंडोवरावर तिसऱ्या क्रमांकावर हे गरुड शिल्प आहे. हे शिल्प त्रिभंगावस्थेत दर्शविलेले असून अत्यंत मोहक व प्रमाणशीर आहे. गरुडाचे समोरील मुख्य दोन्ही हात हे अंजलीमुद्रेत म्हणजे नमस्कार स्वरुपात अंकित असून दुसरा उजवा हात ऊर्ध्व दिशेस दर्शविलेला असून त्यामध्ये खडग आहे. तर डावा दुसरा हात हा खालच्या दिशेला दर्शविलेला असून त्यामध्ये खेटक आहे, जे सद्यस्थितीत अंशतः भग्नावस्थेत आहे. मानवी स्वरूपातील गरुडाला ज्याप्रमाणे पंख दर्शविले जातात त्याप्रमाणे शिल्पाच्या खांद्यावर दोन्ही बाजूंनी पंख दृश्य आहेत. ते काहीसे भग्न असले तरीही स्पष्टपणे ओळखू येतात. शिल्प अतिशय अलंकृत आहे. डोक्यावर किरीट मुकुट, कानात कुंडले, ग्रीव्हा, गलाहार, केयूर, कंकण, हस्तजालक, अंगुलिका, यज्ञोपवीत व वैजयंतीमाला तसेच कमरेला अलंकृत कटीवस्त्र व कमरेच्या उजव्या बाजूस तलवारीची म्यान दर्शनीय आहे. दुर्दैवाने कमरेखालील भाग भग्न झालेला असल्याने कमरेखालील अलंकरणाबाबत कल्पना येत नाही. फक्त खाली उजव्या पायाचा पंजा शिल्लक असून त्यामध्ये पाद्जालक असल्याचे दिसून येते. मुकुटापासून कर्णावर मोत्यांच्या माळा दर्शविलेल्या आहेत. मुकुट असूनही त्यामधूनही सुंदर केशरचना दाखवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. शिल्पाच्या भालावर मुकुटातून किंचित बाहेर आलेले कुरळे केसांचे अंकन आहे तर मागच्या बाजूस केसांचा चुडा (अंबाडा) असलेला दिसून येतो. शिल्पाचे नाक खंडीत झाले असल्याकारणाने गरुडाची नासिका हि तीक्ष्ण व अणुकुचीदार असावी किंवा मनुष्याच्या प्रमाणे असावी याबाबत नीट कल्पना येत नाही. शिल्पाच्या डोळ्यातील शरणागतीचे असलेले भाव शिल्पकाराने अप्रतिमरीत्या कोरलेले आहेत. त्यामुळेच शिल्पामध्ये जिवंतपणा असल्यासारखे भासते. हातामध्ये खडग व खेटक असूनही नमस्कार मुद्रा आणि चेहऱ्यावरील भावामुळे गरुडाची शांत व शरणागत आलेली मुद्रा पाहताक्षणीच ज्ञात होते. 33

**निष्कर्ष :**

गरुडाच्या प्रतीमा लक्षणानुसार, केदारेश्वर मंदिर, धर्मापुरी येथील असलेले शिल्पात कानात कुंडले, किरीट मुकुट, केसांचा चुडा, खांद्यावर पंख आणि समोरील हातांची अंजलीमुद्रा हि लक्षणे दिसून येतात. गरुड हा द्विभुज, चतुर्भुज व अष्टभुज ही असतो व खडग व खेटक हि आयुधेही गरुडाजवळ असतात असे ग्रांथिक वर्णानातून समजते. त्यानुसार केदारेश्वर येथील शिल्प हे चतुर्भुज गरुडाचे आहे असे स्पष्ट होते. क्वचित प्रमाणातच का होईना परंतु चतुर्भुज गरुडांचे शिल्प भारतात मुख्यत: दक्षिण भारतात आढळून येतात हे आपण पाहिले, परंतु एकट्या दर्शविलेल्या जाणाऱ्या उपलब्ध चतुर्भुज गरुडाच्या प्रतिमांच्या लक्षणांनुसार अंजलीमुद्रा, अमृतकुंभ, छत्र व सर्प हीच लक्षणे

सहसा आढळून येतात. फक्त तीरुवेल्लीयांकुडी येथे असलेले गरुड शिल्पाच्या हातातच शंख व चक्र असल्याचे दिसून येते, हेच त्या शिल्पाचे वेगळेपण आहे. त्याचप्रमाणे केदारेश्वर मंदिरावरील असलेल्या गरुड शिल्पाच्या हातात खडग व खेटक दर्शविलेले आहे, या स्वरुपाचे अंकण इतरत्र कुठे असल्याचे अद्याप निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे केदारेश्वर मंदिर, धर्मापुरी येथील एकट्या स्वरुपात मनुष्यरुपामध्ये असलेल्या चतुर्भुज, खडग व खेटकधारी असलेल्या अंजलीमुद्रेतील गरुडाचे असलेले शिल्पांकन हे आपल्या स्वरुपाचे एकमेव असावे, असे प्रस्तुत संशोधनातून समजते.

**संदर्भ-**


1. देशपांडे ब्रह्मानंद, शोधमुद्रा, खंड-१, पृ. ४०.
2. प्रत्यक्ष केलेली स्थळपाहणी.
3. 'दिव्यस: सुपर्णो गुरुत्मान' - ऋग्वेद १.१६४.४६
4. 'गुरुमादाय उड्डीन: इति गरुड:' - महाभारत, आदिपर्व, ३०.७,चित्रशाला प्रेस, पुणे, १९२९-३३, पृ. १०३
5. अग्नीपुराण, १५.४८, सरस्वती प्रेस, कोलकाता, १८८२
6. देगलूरकर गो.ब., विष्णुमुर्ते नमस्तुभ्यं, स्नेहल प्रकाशन, पुणे, द्वि.आ., २०१३, पृ. १०१
7. Gopinathrao T.A, Elements of Hindu Iconography, Vol.1, Part-1, Law Printing House, Madras, 1916, Pp.283-287
8. पूर्वोक्त, महाभारत, आदिपर्व, ३३.१६
9. Gopinathrao T.A, op-cit,Pp.284
10. देगलूरकर गो.ब.,पूर्वोक्त,पृ. २५
11. मिश्र जनार्दन, भारतीय प्रतीकविद्या, बिहार राष्ट्रभाषा परिषद, पटना, द्वि.आ. १९८९, पृ.७०
12. पूर्वोक्त,महाभारत, हरिवंशपर्व,४४.४१-४४, पृ. १६४; ४८.४, पृ. १७९
13. जोशी नी.पु., भारतीय मुर्तीशास्त्र, प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वि.आ.,२०१३, पृ.३९८
14. Gopinathrao T.A, op-cit,Pp.286
15. Banerjea Jitendra Nath, Development of Hindu Iconography, MunshiramManoharlal Publishers Pvt. Ltd., 2016, Pp. 532
16. देगलूरकर गो.ब.,पूर्वोक्त,पृ. १०२
17. गरुडपुराण, १.११.४०(१)
18. पूर्वोक्त, महाभारत, उद्योगपर्व,१०५ ३१-३२, पृ. २३४२
19. Acharya P.K., Mansara on Architecture and Sculpture, Oxford University Press, 1933 Pp. 375-382
20. विष्णुधर्मोत्तरपुराण, ३.५४.१-६, इंग्रजी अनुवाद, प्रियवाला शाह, बडोदा, १९६१, स्टेला केमरीश, कोलकाता, १९२८
21. देगलूरकर गो.ब.,पूर्वोक्त,पृ. १०२
22. Banerjea Jitendra Nath,op-cit,Pp. 532
23. अपराजित पृच्छा, पृ. २१९, ४६-४८ (१)
24. देगलूरकर गो.ब.,पूर्वोक्त,पृ. १०२
25. जोशी नी.पु., पूर्वोक्त,पृ.३९८-३९९
26. जोशी नी.पु., पूर्वोक्त, पृ.३९९
27. Malla Bansi Lal, Vaishnava Art and Iconography of Kashmir, Abhinav Publications, New Delhi, 1996, Pp. 25
28. Banerjea Jitendra Nath,op-cit,Pp. 533

29. BagchiJhunu, The History and Culture of Palas of Bengal and Bihar (750 A.D.-1200A.D.), Abhinav Publications, New Delhi, 1993, Pp. 104
30. https://www.divyadesam.com/photofeature/sri-garuda-panchami-2012/srirangam-sri-amirtha-kalasa-garudar.shtml
31. https://www.divyadesam.com/photofeature/sri-garuda-panchami-2012/tiruveliyankudi-garudar.shtml
32. देगलूरकर गो.ब.,पूर्वोक्त,पृ. १०४
33. प्रत्यक्ष केलेले निरीक्षण



**चतुर्भुज गरूड, केदारेश्वर मंदिर, धर्मापुरी, ता.परळी, जि.बीड**
**(छायाचित्र : मयुरेश खडके)**

# हम्पी मंदिर स्थापत्य कला

**मधुकर मुरलीधर काळे**
संशोधक विद्यार्थी
अर्थशात्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर माराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रस्तावना**

१४ व्या १६ व्या शतकात हंपी मुख्यतः विजयनगर साम्राज्याच्या राजधानीचे ठिकाण होते. मध्यवर्ती कर्नाटकातील, बेल्लारी जिल्ह्यातील तुंगभद्रा खोऱ्यात आहे. हम्पी राज्य तुंगभद्रा नदी, वेदाल डोंगर रांगा आणि मोकळे मैदानी प्रदेश असून तेथे मोठ्याप्रमाणात भौतिक अवशेष आहेत. विविध शहरी, शाही आणि पवित्र यंत्रणेचे परिष्कृतपणा १६०० हून अधिक अवशेषावरून दिसून येतो. ज्यात किल्ले, नदीकाठची वैशिष्ट्ये, शाही व पवित्र परिसर, मंदिरे, देवस्थाने, खांबाचे सभाग्रह, मंडप, स्मारक रचना, प्रवेशद्वार, संरक्षण तपासणी नाका, अस्तबळ, पाण्याची रचना इ. यापैकी कृष्णा मंदिर परिसर, नरसिंह, गणेशा, हेमाकुटा मंदिराचा समूह, अच्युत्यराय मंदिर परिसर, विठ्ठल मंदिर परिसर, पत्ताभिराम मंदिर परिसर, कमळ मंदिर परिसर यावर प्रकाश टाकण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. या लेखाद्वारे हम्पी या येथील मंदिर व मूर्तीकला यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

विजयनगर साम्राज्याची राजधानी हंपी तुंगभद्रा नदीच्या काठी वसली आहे. विरुपाक्ष मंदिर हंपी येथे तीर्थ क्षेत्रांचे मुख्य केंद्र आहे. शतकानुशतके सर्वात पवित्र मंदिर मानले जात असे. विजयनगर साम्राज्यात द्रविड स्थापत्य कलेची भरभराट झाली. त्यांची वैशिष्ट्ये सुशोभित खांबांनी बांधलेल्या प्रवेशद्वारावरील भव्य परिमाण, मोठ्या बुरुजांनच्या खोल्या आहे.

हम्पी येथील मंदिरांचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे रथांचा उत्सव विधींचा अविभाज्य भाग बनला. तेव्हा खांबाच्या मंडपाच्या पंक्तींनी रथांनी भरलेल्या रथांचे रस्ते. मंदिरासमोरील दगडाचा रथदेखील त्याच्या धार्मिक विधीची साक्ष आहे. हंपी येथे बहुतांश रचना स्थानिक ग्रॅनाइट, भाजलेल्या विटा आणि चुना यांनी बांधल्या आहेत. दगडी बांधकाम आणि छतावरील कंदील पोस्ट आणि लिंटेल सिस्टम सर्वात अनुकूल बांधकाम तंत्र होते. भव्य तटबंदीच्या भिंतींवर कागदाच्या जोड्यांसह कट आकाराचे अनियमित दगड असतात आणि कोणत्याही बंधनकारक सामग्रीशिवाय कोसळलेल्या दगडी बांधकामात कोर भरला जातो. प्रवेशद्वारांवरील गोपुरे आणि गर्भगृह दगडाने आणि विटाने बांधले गेले आहेत. वीट जेली आणि चुनाच्या जलरोधकने झाकलेल्या जाड ग्रॅनाइट छत घालण्यात आले आहेत.

**विरुपाक्ष मंदिर आणि बाजार परिसर**

विरुपाक्ष मंदिर हे सर्वात प्राचीन मंदिर आहे आणि एक सक्रिय हिंदू पूजा स्थळ आहे. ११ व्या शतकात शिव, पंपा आणि दुर्गा मंदिरांचे भाग अस्तित्वात होते. विजयनगर काळात ते वाढविण्यात आले. या मंदिराची विशेषता येथे मंदिर लहान मंदिरे, उंच गोपुरम, हिंदू मठ, पाण्याची टाकी, एक सामुदायिक स्वयंपाकघर, इतर स्मारके आहेत.

मंदिर पूर्वेकडे शिव आणि पंपा देवी मंदिरांची सुर्योदय करण्यासाठी रेखित करतात. एक विशाल गोपुरम त्याचे प्रवेशद्वार चिन्हांकित करते. या उत्तम रचना एक पिरॅमिडल कळस असून त्यातील प्रत्येक पायरेस्टर्ड कथा असून त्यापैकी प्रत्येकजण काल्पनिक शिल्पांसह कलाकृती आहे. मध्ये गोपुरम आयताकृती भागाकडे नेतो जो दुसऱ्या छोट्या गोपुरममध्ये संपतो. त्याच्या दक्षिण बाजूस एक १००-स्तंभ दिवाणखाना आहे ज्यामध्ये प्रत्येक स्तंभाच्या चारही बाजूंनी हिंदू संबंधित आराम आहे. या सार्वजनिक दिवाणखान्यास जोडलेले एक सामुहिक स्वयंपाकघर आहे, हे वैशिष्ट्य इतर प्रमुख हंपी मंदिरांमध्ये आढळते. स्वयंपाकघर आणि सार्वजनिक सभाग्रह मध्ये पाणी पोहोचविण्यासाठी खडकात एक जलवाहिनी कापलेली आहे. लहान गोपुरम नंतर अंगणात दिप-स्तंभ आणि नंदी आहेत.

**कृष्ण मंदिर**

हेमाकूट डोंगराच्या दुसऱ्या बाजूला असलेले कृष्ण मंदिर, ज्याला बालकृष्ण मंदिर देखील म्हणतात, उध्वस्त झालेल्या मंदिरासमोर येथे बाजारपेठ अस्तित्वात होती. कोलोनेडेड दगडाच्या अवशेषांदरम्यान एक लांबलचक मार्ग आहे हा मार्ग ज्यामुळे रथांना बाजारात आणि तेथून सामानाची वाहतूक करता येत असे आणि औपचारिक कार्ये आणि उत्सव साजरे करण्यात आले. या रस्त्याच्या उत्तरेस आणि बाजाराच्या मध्यभागी एक मोठी पुष्करणी आहे. एक सार्वजनिक उपयोगाची असलेल्या पाण्याची टाकी असून त्याच्या मध्यभागी एक कलात्मक मंडप आहे. टाकीच्या पुढे लोक बसण्यासाठी सार्वजनिक सभाग्रह (मंडप) आहे.

मंदिर पूर्वेस उघडते आत कृष्णाचे उध्वस्त मंदिर आणि देवींसाठी लहान, उद्ध्वस्त केलेली मंदिरे आहेत. मंदिराचा परिसर बाह्य आणि आतील बाजूस असलेल्या मंडपामध्ये स्तरित आहे. कुंपण दोन गोपुरम प्रवेशद्वार आहेत. कमलापुरम हंपीला जोडणारा पूर्वेकडील गोपुरासमोर एक आधुनिक रस्ता जातो.पश्चिम गोपुरममध्ये शस्त्र निर्मितीचे आणि सैनिकांचे राहण्याची व्यवस्था आहे.

**अच्युतराय मंदिर व बाजार परिसर**

अच्युतराय मंदिर, ज्याला तिरुवेनगलनाथ मंदिर देखील म्हणतात, हे विरुपाक्ष मंदिराच्या पूर्वेस आहे आणि तुंगभद्रा नदीच्या अगदी जवळ आहे. शिलालेखात अच्युतपुरा येथे असल्याचे सांगितले जाते. हम्पीमधील चार सर्वात मोठ्या संकुलांपैकी एक आहे व विष्णूला समर्पित आहे. विजयनगराच्या काळात, नदी पारंपारिकपणे मंदिराकडे जात होती, प्रथम विधीवत टाकी पार करुन नंतर बाजारपेठेत विस्तृत रस्ता मंदिराच्या बाहेरील गोपुरम अंगणात १०० स्तंभ कक्ष आहे आणि विष्णू मंदिराकडे जाणारा आतील गोपुरम होता. १०० स्तंभ कक्षामधील प्रत्येक खांबाच्या प्रत्येक बाजूला विष्णूच्या अवतारांचे आराम आहे. शिव, सूर्य, दुर्गा अशा इतर देवता दैनंदिन जीवनाचे दृष्य - ऋषि, प्रेमळ जोडपे, विनोद योग, आसनातील लोक, नमस्ते लोक आणि विजयनगर चिन्हे आहे. मंदिर प्रवेशद्वार विजयनगर वंशातील चिन्हे दर्शविते. वराह, तलवार, सूर्य आणि चंद्र यांचे एक सुवर्ण मंदिर आणि बाजाराचा रस्ता उध्वस्त झाला आहे. परंतु त्यांच्या मांडणीवरून असे दिसते की रथ वाहतुकीसाठी रस्त्यांची सोय केलेली ही एक मोठी बाजारपेठ होती.

**विठ्ठल मंदिर**

विठ्ठल मंदिर परिसर तुंगभद्रा नदीच्या काठाजवळील विरुपाक्ष मंदिराच्या ईशान्य दिशेस

आहे. हम्पी मधील सर्वात कलात्मकदृष्ट्या परिष्कृत हिंदू मंदिर आहे आणि ते विजयनगरातील पवित्र केंद्राचा भाग आहे. मंदिर पूर्वेस उघडते, चौरस योजना आहे आणि त्यात प्रवेशद्वार असलेल्या गोपुरम आहेत ज्यात दोन बाजूचे गोपुरम आहेत. मुख्य मंदिर एक अंगण आणि अनेक सहाय्यक मंदिरांच्या मध्यभागी उभे आहे, सर्व पूर्वेला संरेखित केले.

विठ्ठल मंदिर सर्वात सुंदर सजावटीची रचना आहे आणि विजयनगर मंदिर स्थापत्य कलेचे प्रतिनिधित्व करते. एक पूर्णपणे विकसित मंदिर आहे ज्यात कल्याण मंडप आणि उत्सव मंडपासारख्या संबंधित इमारती आहे ज्यामध्ये प्रवेशद्वाराच्या तीन गोपुरामांद्वारे छिद्रित बंदिस्त आहे. समकालीन मंदिरांमध्ये सध्याच्या ठराविक जागांव्यतिरिक्त, येथे ग्रॅनाइट रथ आणि भव्य बाजारपेठ अशी गरुड मंदिराची उभारणी केली जाते. या वसंतोत्सव मंडप, एक मोठी पुष्कराणी (पायऱ्यांची टाकी), विहिरी आणि पाण्याचे जलवाहिन्यांचे जाळे देखील आहे.

**हजारा राम मंदिर**

शिलालेखात रामचंद्र मंदिर म्हणून ओळखले जाणारे हजारा राम मंदिर हंपीच्या शाही मध्यभागी असलेल्या शहरी भागाच्या पश्चिम भागावर व्यापलेले आहे, हे मंदिर रामायण कीर्ती आणि विष्णूचे अवतार राम यांना समर्पित होते. राजघराण्याचे औपचारिक मंदिर होते. मंदिराच्या बाहेरील भिंतींमध्ये हिंदू महानवमी (दसरा) आणि वसंत ऋतु होळी उत्सव मिरवणूक आणि कलाकृतीच्या समांतर उत्सव साकारण्यात आले आहेत.

**कोदंडाराम मंदिर आणि नदीकाठची स्मारके**

कोंडंदरम मंदिर परिसर तुंगभद्रा नदीच्या जवळ आणि अच्युतराय मंदिराच्या उत्तरेस आहे. मंदिर चक्रतीर्थाचे निरीक्षण करते, जिथे तुंगभद्र उत्तरेकडे हिमालयच्या दिशेने वळते. पवित्र नदी मानल्या जाणाऱ्या नदीकाठ विजयनगरकालीन घाट आणि आंघोळीसाठी मंडपाची सोय आहे. मंदिराच्या समोर दीप स्तंभ आहे. आत राम, सीता, लक्ष्मण आणि हनुमान यांना समर्पित एक गर्भगृह आहे.

**पट्टाभीराम मंदिर परिसर**

शहरी भागाच्या दक्षिणेस उपनगरीय केंद्रात पट्टाभीराम मंदिर परिसर आहे. हे आता कमलापुराच्या ईशान्य दिशेस असलेल्या या उपनगराच्या आर्थिक आणि सांस्कृतिक कार्याच्या केंद्रस्थानी होते. मंदिर  ज्याला वरदेवी अम्मना पट्टना देखील म्हटले जाते, 16 व्या शतकाच्या सुरूवातीस बांधले गेले आणि राम (विष्णू अवतार) यांना समर्पित केले गेले. मुख्य मंदिर आहे, एका भिंतीच्या आत अंगण आहे आणि गर्भगृह समोर स्तंभ व छतावरील मंडप आहे. कॉम्पलेक्स आणि गर्भगृह पूर्वेकडे तोंड करतो. सामान्य प्रवेशद्वार पूर्व गोपुरामार्गे होते. अवशेष सूचित करतात की गोपुरमला सहा स्तर आहेत. पट्टाभीराम मंदिरात बंदिस्त कुंपणाच्या दक्षिणेकडील भिंतीशी जोडलेले १०० स्तंभ असलेला दिवाणखाना बहुधा एक भोजन कक्ष होता. खांबांना हिंदू दर्शविणाऱ्या आरामात, ज्यामध्ये देवता, देवी, हिंदू ग्रंथातील दृश्य, योग आणि नमस्ते यांचा समावेश आहे.

साम्राज्यात द्रविड स्थापत्य कलेची भरभराट आली. कृष्णा मंदिर परिसर, नरसिंह, गणेशा, हेमाकुटा मंदिराचा समूह, अच्युत्यराय मंदिर परिसर, विठ्ठला मंदिर परिसर, पत्ताभिराम मंदिर परिसर, कमळ मंदिर परिसर हे मंदिर विजयनगरच्या स्थापत्य कलेची उत्त्कृष्टता दर्शवतात.

**संदर्भग्रंथ**

1) Matthew LwDec, (2012) “Discourses of Heritage and Tourism At a World Heritage Site: The Case of Hampi, India” Practicing Anthropology, Vol. 34, No. 3, Tourism: Beyond Hosts and Guests , pp. 29-33
2) Nicholas F. Gier , (2014) “The Origins of Religious Violence: An Asian Perspective”, Lexington. pp. 11–14
3) John M. Fritz and George Michell, (2012) “Living Heritage at Risk”, *Archaeology* Vol. 65, No. 6, pp. 55-57, 60, 62
4) Vasundhara Filliozat, (1977) “LES Quartiers ET Marches DE Hampi”, *Bulletin de l'École française d'Extrême-Orient*, Vol. 64, pp. 39-42
5) Group of Monumets at Hampi , https://whc.unesco.org/en/list/241
6) Wikipedia.org
7) Patil, Hemant A.; Gajbhar, Shrishail S. (2012). *Acoustical analysis of musical pillar of great stage of Vitthala temple at Hampi, India*. *Signal Processing and Communications*. IEEE. pp. 1–5